म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
ग्रं. क्र.

# आम्ही अमेरिकन

REFBK-0009750
REFBK-0009750

अनुवादक : पां. वा. गाडगीळ

विश्वसाहित्य प्रकाशन

# आम्ही अमेरिकन

अनुवाद

पां. वा. गाडगीळ

REFBK-0009750

REFBK-0009750

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८०६०
अनुक्रम ५५४२१
क्रमांक ७५५
१५/३/७१

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य तीन रुपये

विश्वसाहित्य : ३१

Copyright, 1957 by Bradford Smith

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबअी ४

प्रकाशक :
वि. ग. परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्रमांक २, मुंबअी ४

## अनुक्रम


| | |
|---|---|
| सांस्कृतिक दृष्टीकोन | १ |
| चला अमेरिका पाहूं या | ९ |
| अनेक राष्ट्रांचें एक राष्ट्र | १६ |
| भाषा | ३८ |
| कौटुंबिक जीवन | ४५ |
| अमेरिकेचा स्वभाव | ६६ |
| आटोपशीर गांवें | ८९ |
| शिक्षण | ११६ |
| राजकारण | १३७ |
| राजकारणाचें नाटक | १५३ |
| विपुलतेचें जीवन | १७१ |
| वांटणीप्रधान अर्थसंघटना | १८८ |
| कला | २१० |
| टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्रें | २१६ |
| करमणूक | २२५ |
| भौतिक शास्त्र व माणूस | २३२ |
| आम्ही कोठें चाललों आहों ? | २३९ |
| अमेरिका आणि जग | २६१ |

दिला. अशा प्रकारें अमेरिकनांना* सुरुवातीपासूनच नव्या कल्पना घ्याव्या, त्यांचे प्रयोग करावे, ते फसले तर पुन्हा प्रयोग करावे या गोष्टीचें शिक्षण घ्यावें लागलें.

"सर्व मानव जन्मतःच समान आहेत हा सिद्धांत अमलांत आणण्यासाठीं सर्वस्वार्पणपूर्वक जीवनाचा प्रयोग करणें ही अमेरिकनांची आकांक्षा असली पाहिजे," हा सर्व अमेरिकनांच्या अंतःकरणाला भिडणारा सारभूत विचार लिंकननें त्याच्या अत्यंत उदात्त अशा एका भाषणांत व्यक्त केला. "ज्या राष्ट्राची उभारणी या कल्पनेवर झाली व जें यासाठींच जगलें असें राष्ट्र दीर्घ काळ टिकून राहतें कीं नाहीं याची अग्निपरीक्षा यादवींत होईल," असें त्याच भाषणांत लिंकन म्हणाला होता.

पण सामान्यतः अमेरिकनांना आपल्या संस्कृतीचा अर्थ फारसा कळत नाहीं, आणि परदेशांतील आमच्या मित्रांना अमेरिकन संस्कृति म्हणजे काय याचा गंधहि नाहीं. नुसती विविध माहिती अनेकांना पुष्कळ आहे. पण कुणालाच त्या माहितीपासून कांहीं बोध झालेला नाहीं. आमच्या जीवनाच्या पृष्ठभागावर आमच्या जीवनाचीं जीं ठळक लक्षणें दिसतात, उदाहरणार्थ : भौतिक वस्तूंचें खूप उत्पादन, आमच्या औद्योगिक व लष्करी संघटनांचें सामर्थ्य, उद्योगधंदे व खाजगी साहस यांस आम्ही देत असलेलें महत्त्व, आमच्या स्त्रियांची पोषाखबाजी, आमच्या मुलांचें फाजील वर्चस्व या गोष्टी सर्वांना माहीत आहेत. पण या सर्व गोष्टींना आधार असणारें आमचें वैशिष्ट्य कोणतें यासंबंधानें फार थोडी माहिती कोणासहि आहे. अमेरिकन लोकांचें वर्तन व त्यांच्या संस्था यांचें निरीक्षण करणारे पुष्कळसे लोक अमेरिकनांच्या जीवनपृष्ठावर दिसणाऱ्या या वरवरच्या गोष्टी पाहतात, मग अधिक खोल न जातां एवढ्याचीच वाहवा अथवा निंदा करतात. आमच्या जीवनसंगीताच्या मागें आधारभूत असा सांस्कृतिक सूर कोणता आहे याचा विचार ते कधींच करीत नाहींत.

---

* अमेरिकेचीं दोन मोठीं खंडें असून त्यांत अनेक राष्ट्रें आहेत, त्या सर्वांना आपण 'अमेरिकन' आहों असें म्हणण्याचा अधिकार आहे. पण निदान इंग्रजी भाषेंत तरी 'अमेरिकन' हा शब्द 'युनायटेड स्टेट्स ऑफ् अमेरिका' या राष्ट्रांतील नागरिकास उद्देशून वापरण्याचा प्रघात आहे. 'युनायटेड स्टेट्स' चा नागरिक तो 'युनायटेडस्टेट्सीअन' असा शब्द कोणीच वापरीत नाहीं. म्हणून या ग्रंथांत 'युनायटेडस्टेट्स' चा नागरिक या अर्थानेंच 'अमेरिकन' हा शब्द वापरण्यांत आला आहे.

अमेरिकेचें यथार्थ ज्ञान बाहेरच्या जगाला होण्याच्या मार्गांत असलेला आणखी एक अडथळा आहे तो हा कीं, कोणत्याहि व्यक्तींत कोणतेहि गुणावगुण दिसून येवोत, त्या सर्वांवर 'अमेरिकन' असा शिक्का मारण्यांत येतो. उदाहरणार्थ, अमेरिकन्स हे भौतिकवादी आहेत असें म्हटलें जातें. पण त्याचा अर्थ एवढाच कीं, मध्यमवर्गीय हे भौतिकवादी असतात व सर्व अमेरिकन्स हे मध्यमवर्गीयच असल्यानें अमेरिका ही सर्वच भौतिकवादी दिसते. विदेशीय निरीक्षकाला अमेरिकन माणूस हा आक्रमक, गोंगाट करणारा, प्युरिटॅनिकल म्हणजे तापसी वृत्तीनें राहणारा, सावध, खूप खाणारा दिसतो. पण अमेरिकनाचें हें दृश्य स्वरूप त्याचा धंदा, त्याची कौटुंबिक पार्श्वभूमि, त्याचा धर्म, वय, संपत्ति यांमुळें त्याला मिळालेलें असतें. धंदा, धर्म, वैभव वगैरे बाबतींत अशी पार्श्वभूमि जेथें असेल तेथें वरील लक्षणें अशींचीं अशीं दिसतीलच.

तरी पण अमेरिकनांच्या म्हणून कांहीं खास खुणा आहेत. त्यांची विशिष्ट मनोवृत्ति, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, त्यांच्या श्रद्धा, त्यांच्या निष्ठा आहेत; आणि अमेरिकन समाजाच्या खास म्हणून कांहीं विशिष्ट संस्थाहि आहेत. अमेरिकनांची संस्कृतिविषयक कल्पना हीच या गोष्टी समजून घेण्याची किल्ली होय.

## संस्कृति म्हणजे काय ?

संस्कृति याचा अर्थ कोणत्याहि समाजाची जीवनपद्धति. त्यांचीं हत्यारें, त्यांच्या श्रद्धा, त्यांचा ज्ञानसंचय, आणि त्या समाजांतलीं माणसें ज्या मूल्यसंचांत जगतात तो मूल्यसंच—या सर्वांचा संस्कृतींत समावेश होतो. तसेंच कला, बालसंगोपन, विवाहपद्धति व प्रियाराधनपद्धति, शिक्षण, व्यवसाय, सरकार— थोडक्यांत सांगायचें तर समाजजीवनाचा जो जो परंपरागत वारसा माणसाला मिळतो तो तो सर्व त्याच्या संस्कृतीचा भागच असतो.

सांस्कृतिक दृष्टिकोनांतून माणसाकडे पाहण्याचा फायदा हा असतो कीं, कोणत्याहि समाजाचें सामुदायिक वर्तन हें त्याच्या सांस्कृतिक जीवनाचा एक भाग आहे असें मानल्यावांचून तें कळणार नाहीं ही गोष्ट त्यामुळें स्पष्ट होतें. आजवर अमेरिकेबद्दल जें लिखाण झालें आहे त्यांतलें बरेंचसें अपूर्ण आहे, कारण त्यांत 'अमेरिकन' जीवनाचीं वैशिष्ट्यें म्हणून जीं वर्णिलीं आहेत तीं एकंदर जीवनापासून अलग काढून वर्णिलीं असून तीं अतिरेकी नैतिक दृष्टिकोनांतून वर्णिलीं आहेत. तीं तीं वैशिष्ट्यें कशीं निर्माण झालीं आणि एकंदर जीवनांत त्यांचें स्थान कोणतें, तें कोठें आहे, हें त्या लिखाणांत सांगितलेलें नसतें. अमुक राष्ट्र 'सुखवादी' आहे,

'धनलोलुप' आहे, 'अतिक्षुब्धकाम' आहे अथवा 'अति सलगीखोर' आहे असें म्हणणें म्हणजे त्या त्या समाजाची पार्श्वभूमि समजून न घेतां त्याजवर आपला नैतिक अभिप्राय लादण्यासारखेंच आहे.

समाज ज्या व्यक्तींचा बनलेला असतो त्या व्यक्तींचें वर्गीकरण अनेक प्रकारें करतां येतें व त्यांची संघटनाहि अनेक प्रकारें होत असते. आणि व्यक्तिशः त्यांच्यांत भेद असले तरी सर्वांचा म्हणून कांहीं वर्तनाचा साचा असतो. समाजांतील विशिष्ट गटांची प्रतिक्रिया विशिष्ट प्रसंगीं एकसारखी होते.

माणसाच्या संस्कृतीनें त्याच्या व्यक्तित्वाला आकार येतो. त्या संस्कृतीच्या व्यापक क्षेत्रमर्यादेंत व्यक्तिव्यक्तींत बरीच विविधताहि त्या संस्कृतीमुळेंच निर्माण होते. उलट या व्यापक विविधतेंतहि एक सर्वसाधारण राष्ट्रीय स्वभाव ओळखतां येतो. कारण त्या संस्कृतीच्या कक्षेंत सर्वांना समान असा कांहीं वारसा मिळालेला असतो. म्हणून राष्ट्रीय स्वभाव शोधणें हें खात्रीनें योग्य आहे. पण हा राष्ट्रीय स्वभाव त्या त्या लोकांची कपोलकल्पित अंतःस्फूर्ति, त्या समाजाचें रक्त अथवा वंश यांत शोधणें अथवा यांच्याशीं चिकटविणें योग्य नसून त्या राष्ट्रीय स्वभावाचें मूळ त्या राष्ट्राच्या संस्कृतींत शोधलें पाहिजे.

समजा, एक मूल अमेरिकन आईबापांपोटीं जन्मलें, पण तान्हेपणींच त्याला फ्रान्समध्यें नेऊन फ्रेंच कुटुंबांत वाढविलें तर, तें जन्मानें अमेरिकन असलें तरी तें फ्रेंच संस्कृतीचेंच होईल. तसेंच एकादें चिनी मूल अमेरिकन कुटुंबांत वाढविलें तर त्याचें बोलणें, वागणें, विचार करणें हें अमेरिकन संस्कृतीचेंच होईल. तें मूल मोठेपणीं दिसेलहि अमेरिकनासारखें. कारण त्याला मिळणारें अन्न, हवा वगैरे-मुळें तें दणकट होईल आणि त्याच्या मुद्रेवरील आविर्भाव त्याचें पालनपोषण करणाऱ्या कुटुंबाप्रमाणें होईल. त्याची शरीरयष्टि व चेहरेपट्टी मोंगलॉइड असेल, त्वचेचा रंगहि त्याच्या आईबापांचा असेल, पण त्याच्या मनःप्रवृत्ति, त्याच्या संवयी व त्याच्या आकांक्षा या त्याच्या पालक कुटुंबाच्याच असतील.

म्हणून अमुक एक लोक आपणाला समजायला हवे असतील तर आपण त्यांची भौतिक परिस्थिति (भौगोलिक स्थान, हवा, नैसर्गिक साधनें, अन्नपुरवठा, यंत्र-संचालनशक्ति, उद्योगधंदे), त्यांची मानवी परिस्थिति (कुटुंब, शाळा, चर्च, वरिष्ठ वर्ग, सरकार, व्यवसाय), त्यांचा कलात्मक आविष्कार व त्यांचीं ध्येयें (त्यांचे राष्ट्रीय व स्थानिक संस्कार, समारंभ, धर्म, गटनिष्ठा, पूर्वजपूजा) आणि (१) आत्मरक्षण, (२), वंशविस्तार व (३) आत्माविष्कार या ज्या तीन मूलभूत मानवी गरजा त्या भागविण्याची त्यांची पद्धति, या गोष्टींचें अवलोकन केलें पाहिजे.

प्रत्येक संस्कृति हें एक जाळें असतें. तिचा प्रत्येक धागा इतर धाग्यांत विणलेला असतो. आपण आर्थिक व राजकीय, शैक्षणिक व करमणूकविषयक (दोनच ठळक उदाहरणें घेऊन बोलायचें तर) इत्यादि प्रकारचें जें वर्गीकरण करतों तें फारसें खरें नसून वरवर दिसण्यापुरतें असतें. सरकार हें कर बसवितें, प्रांता-प्रांतांतील व्यापाराचें नियंत्रण करतें, मजूरतंट्यांत मध्यस्थी करतें, इत्यादि ज्या अनेक गोष्टी सरकार ही संस्था करते त्यांचें वर्णन केल्यावांचून आपण आपल्या अर्थसंघटनेचें वर्णन पुरें करूं शकणार नाहीं. पण आपल्या मनाच्या शक्तीला मर्यादा असल्यानें आपण मानवी संस्कृतीचें हें जाळें एकदम समग्र पाहूं शकत नाहीं. म्हणून या जाळ्याचे धागे प्रथम वेगवेगळे कल्पून पाहावे लागतात आणि नंतर मग पुन्हा तें सारें जाळें पाहिलें तर तें आपणांस समजूं शकतें.

## संमिश्र संस्कृति

आंतरराष्ट्रीय दळणवळण हल्लीं इतकें जलद व सोपें झालें आहे कीं इतिहासांतल्या कोणत्याहि काळापेक्षां आजच्या काळीं आम्ही जगांतल्या किती तरी अधिक संस्कृतींशीं संबंध ठेवूं शकतों. दरसाल पंधरा लक्षांहून अधिक अमेरिकन्स युरोपला जातात. आम्ही अगदीं घर सोडून परदेशीं गेलों नाहीं तरी परदेशी विद्यार्थी व प्रवासी मिळून पन्नास हजार परकी लोक आमच्यांत आहेत, यामुळें अनेक विदेशी संस्कृतींशीं आपला घरबसल्याहि संबंध येतो.

संस्कृतींचें मिश्रण हें मोठें उत्साहदायी व वैभवकारी असतें. अशा मिश्रणानें संस्कृतींचा विकास होतो असा इतिहास आहे. प्राचीन पौरस्त्य साम्राज्यापासून ग्रीसला जें शिकतां आलें त्यामुळें ग्रीक संस्कृति भरभराटली. रोमचा ग्रीक संस्कृतीशीं संबंध आला त्यामुळेंच रोमन लोकांचा रानटीपणा जाऊन ते सुसंस्कृत झाले, रोमन संस्कृतीशीं संबंध आल्यामुळें उत्तर युरोपची संस्कृति उच्चतर झाली. पुढें अंधारयुग येऊन गेलें. नंतर इस्लामशीं युरोपचा संबंध आला आणि प्राचीन अभिजात वाङ्मयाचें व विचारांचें पुनरुत्थान झालें. यामुळें युरोपीय संस्कृतीस नवा बहर आला. अमेरिकेला जो सांस्कृतिक वारसा मिळाला तो जुडाओ-ग्रीक-रोमन-युरोपियन संस्कृतीचा मिळाला इतकेंच नव्हे तर आफ्रिका, आशिया, स्पॅनिश अमेरिका व अमेरिकेंतले रेड इंडिअन यांच्याहि संस्कृतीचा मिळाला.

आमच्या अन्नांत जर्मनी, मेक्सिको, जपान, इटाली इत्यादि देशांचे खाण्याचे पदार्थ आहेत. रेड इंडिअनांनीं आम्हांला धान्य पिकविण्याला, तें दळण्याला व मका आणि वाटाणा यांची खिचडी खायला शिकविलें. चिनी विश्रांतिगृहें

साऱ्या अमेरिकाभर पसरलीं आहेत. प्रत्येक मोठ्या मार्केटांत चिनी अन्नप्रकारांचें एक कपाट असतें. ते प्रकार घरीं नेऊन खातां येतात. अर्थात् मूळच्या चिनी वस्तूचें कांहीं तरी अमेरिकन रूपांतर होतेंच. पण संस्कृतींचें मिश्रण म्हटलें कीं दोन्हीमध्येंहि थोडाफार बदल हा होणारच.

आम्हीं आमचें पुष्कळसें संगीत इटाली, जर्मनी या देशांपासून घेतलें; आमची रंगचित्रकला फ्रान्सपासून, न्यायविषयक कल्पना इंग्लंडपासून व आमचें लोकसंगीत आफ्रिकन सुरांतून घेतलें.

विविध संस्कृतींच्या मिश्रणामुळें सांस्कृतिक वैभव जसें वाढतें तसे त्यांत कांहीं धोकेहि असतात. बोलण्याचालण्यांतल्या निरनिराळ्या देशांच्या खाणाखुणा परस्परविरुद्ध अर्थद्योतक असतात. भारतीय लोक होकारार्थी मान डोलावतात त्याचा अर्थ परकीयांना नकारार्थी वाटतो. जपानी लोक "तुम्ही गेलां नाहीं?" या प्रश्नास "हो" असें उत्तर देतात, पण त्याचा अर्थ "गेलों नाहीं" असा त्यांना अभिप्रेत असतो. या उलटसुलट अर्थांच्या संकेतांतून केव्हां फसवणूक अथवा अपमानहि होतो, तेव्हां त्यांना गंभीर स्वरूप येतें. जपानांत दुसऱ्याला गैरसोयीचें अथवा दुःखद होईल असें बोलणें हें असभ्य मानलें जातें. पण अमेरिकन लोक खडखडीत व सरळ स्वभावाचे असल्यानें त्यांना जपानी लोकांची ही सभ्यतेची व सहानुभूतीची नाजुक कल्पना ढोंगीपणाची वाटते. जर्मन लोक अधिकार व दर्जा याला मान देतात. यामुळें त्यांच्या वर्तनांत जी सभ्यता व आदरबुद्धि दिसून येते ती कोणाशींहि बरोबरीच्या नात्यानें व सहजपणें वागणाऱ्या व आपण उच्चनीच दर्जा मानीत नाहीं अशी सदा बतावणी करणाऱ्या आम्हां अमेरिकनांना अडचणीची वाटते. जर्मनांचें हें वर्तन आम्हांला प्रामाणिकपणाचेंहि वाटत नाहीं यामुळें तें चीड आणणारें ठरतें. या परस्परविरुद्ध संकेतांनीं गैरसमज माजून पुष्कळदां शब्दाशब्दी होते व त्यांतून खड्डाखड्डीहि निघते. म्हणून आजच्या या आंतरराष्ट्रीय जगांत हे संकेत आपण नीट समजून घेतले पाहिजेत. नाहीं तर खूपशा परदेशप्रवासांतून खूपशा मैत्रीऐवजीं खूपसा वैरभावच पैदा व्हायचा.

परदेशांत राहणें व प्रवास करणें हें मोठें नाजुक काम आहे. ज्यांना परक्यांचें जीवन चटकन् आकलन करण्याची कला अवगत नसते त्यांना परठिकाणीं जाण्या-राहण्यांतला आनंद लुटतां येत नाहीं व ते चिडून छिद्रान्वेषण करूं लागतात. अशा तक्रारखोरीबद्दल अमेरिकन टूरिस्ट हे प्रसिद्ध आहेत. परदेशांतील अन्न, बिछाने व आगगाड्या अमेरिकेंतल्यासारख्या नाहींत अशी तक्रार ते नेहमीं करतात. पण अमेरिकेंतल्यासारखें कांहींहि इतरत्र नसणारच. जग अमेरिकेहून कसें व किती

वेगळें आहे हें पाहण्यासाठींच अमेरिकन लोक जगांत हिंडतात ना? उलट याच अमेरिकनांना येथें आमच्यावर इतरांनीं केलेली टीका मात्र सहन होत नाहीं! पाहुण्यांनीं अमेरिकेंत यावें हें अमेरिकनांना आवडतें. विदेशी पाहुण्यांचा सत्कार करणें, त्यांना अमेरिकेंतील सौंदर्यस्थळें वा अमेरिकेंतल्या सोयी दाखविणें यांत अमेरिकनांना आनंद वाटतो. पण अमेरिकनांना आपल्यावर केलेली टीका मात्र आवडत नाहीं. परदेशीयांनीं अमेरिकेवर टीका केलेली ऐकली कीं "मग आलांत तसे परत जा ना!" हा एकच अगदीं छापील संतापोद्गार अमेरिकनांनीं काढलेला ऐकूं येतो.

भिन्नभिन्न संस्कृतींत असे सतत गैरसमज झालेले पाहिले म्हणजे "आपला देश हाच जगांत चांगला" असें मत बनवून घेण्यासाठींच लोक जगप्रवासास जातात कीं काय असें वाटूं लागतें. यामुळें नवीन पाहिलेल्या परिस्थितीवर प्रतिकूल टीका होणें हा परदेशी प्रवासाचा आपल्या देशांत एक अपरिहार्य परिणाम आहे असें मानावें लागतें. पण अशी प्रतिकूल टीका ही शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाची असते हेंहि तितकेंच खरें आहे.

प्रवासांत प्रवाशाला घराची सदा ओढ लागलेली असते हेंहि या टीका-प्रवृत्तीचें एक कारण असतें. आपण आपल्या सुरक्षित ठिकाणापासून अधांतरीं झालों अशी एक भीति प्रवाशाच्या मनाला सतत वाटत असते. अंतर्मनांतल्या या भावनांनीं प्रवासी त्या नव्या जगाकडे पाहत असतो. "अमेरिकन अन्न एकाच प्रकारचें व बेचव आहे," असें तो जेव्हां म्हणतो तेव्हां त्या प्रवाशाला आपल्या देशाचें अन्न अधिक बरें वाटतें एवढाच त्या बोलण्याचा अर्थ असतो. वाटपीण अदबीनें वागत नाहीं, न्यूयॉर्कवाल्यांना इंग्रजीच समजत नाहीं, अशी तक्रार प्रवासी करीत असतो. त्याचबरोबर त्याच्या मनांत एक भीतीहि डोकावत असते— "माझे उत्कृष्ट इंग्रजी उच्चार समजायला जर या लोकांना इतका त्रास पडतो तर ज्या विद्यापीठांत मी जाणार आहें तेथें मी वजन कसें पाडणार आणि उच्च श्रेणींत परीक्षा कशी पास होणार?"

या अडचणींतून मार्ग काढण्यास सांस्कृतिक दृष्टिकोन हा उपाय आहे. त्यामुळें एक गोष्ट लक्षांत येते कीं ज्या भेदामुळें माणसांचे सांस्कृतिक गट पडतात ते भेद महत्त्वाचे नसून सर्व मानवांना एकत्र आणणारी मानवता ही महत्त्वाची आहे. भेद जे आहेत त्यांचा अभ्यास करावा आणि भेदाबाबत सवलतीनें वागावें म्हणजे आंतरराष्ट्रीय जगांत अधिक सलोखा निर्माण होईल व दूरदूरच्या ठिकाणांना लोक अधिक वेळां भेट देतील.

कोणत्याहि देशाचा इतिहास, भूगोल, हवा, भाषा, संस्था, चालीरीति या सर्वांहून त्या राष्ट्राचें जीवन पुष्कळ अधिक असतें. कांहीं अंशीं त्या जीवनांत गूढताहि असते. कारण सामाजिक शास्त्रांनीं मानवी जीवनाबद्दलच्या संशोधनांत खूप यश मिळविलें असलें तरी अजून अनेक प्रश्न असे आहेत कीं त्याबाबत सामाजिक शास्त्रांना अजून उत्तर सांपडलेलें नाहीं. एकादें राष्ट्र घट्ट वर्गभेद असलेला समाज कां पत्करतें व त्याच्या शेजारच्या राष्ट्राला वर्गभेदरहित आणि समानतेवर आधारलेला समाज कां आवडतो ? एकाद्या राष्ट्रांत खूप हिंमत व धडाडी आढळते, तर दुसरें आरामशील असतें; असें कां ? अशा अनेक प्रश्नांचीं जीं उत्तरें आज मिळतात तीं इतकीं सोपीं दिसतात कीं त्यामुळेंच तीं खरीं नसावींत असें वाटतें.

अमेरिकन संस्कृति ही वर्णन करण्याला अत्यंत कठिण अशा संस्कृतींपैकीं आहे. कारण तिचे उगम अनेकानेक असून तिच्यांत असेच अनेकानेक प्रवाह येऊन मिळाले आहेत. तें एक विविध वस्तूंचें प्रदर्शन असून आम्हांला अशीं प्रदर्शनें आवडतात. प्रत्येक प्रकाराचा थोडाथोडा भाग मोठ्या धडाडीनें एकत्र आणलेला—हें आम्हांला आवडतें. एकादा मानववंशशास्त्रज्ञ अगदीं पहिल्यानें ज्याप्रमाणें एकाद्या प्राचीन टोळीचा अभ्यास करतो तशा अभ्यासी दृष्टीनें आपण आतां अमेरिकन जीवनाकडे पाहूं या. अमेरिकन माणसाच्या विशिष्ट व्यापारांचा अर्थ काय ? यां प्रश्नाचें उत्तर मिळविण्यासाठीं या विचित्र देशांत आपण आतां जिज्ञासेनें व निर्भयपणें प्रवेश करूं या.

## प्रकरण दुसरें

# चला अमेरिका पाहूं या

अमेरिकेच्या पूर्वेस समुद्रक्षितिजावर सूर्य येऊन त्याच्या खडकाळ किनाऱ्याला आणि किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर असणाऱ्या बेटांना जेव्हां प्रकाशित करूं लागतो त्या वेळीं पश्चिम किनाऱ्यावर कॅलिफोर्नियांत अजून गडद अंधार असून उजाडण्याला तीन तास अवकाश असतो. अमेरिकेची ही प्रचंड भूमि दोन महासागरांच्यामध्यें पसरलेली असून अगदीं अलीकडेपर्यंत हा प्रदेश सबंध जंगली मुलूख होता. पण आतां जगाच्या सर्व भागांतून आलेल्या माणसांनीं हा सर्व प्रदेश आपलें घर केलेलें असून अनेक राष्ट्रांतले हे लोक असतांहि ते स्वतःला एकराष्ट्र म्हणवितात.

वास्तविक त्यांच्यांत धर्म, भाषा, त्वचेचा रंग, व्यवसाय, परंपरा, हवा, लोकरीति अशा सर्व बाबतींत तीव्र भेद आहेत. न्यू इंग्लंडच्या छोट्या ग्रामीण लोकराज्यांतले नागरिक तीनशें वर्षांपूर्वींप्रमाणें अजूनहि आपला कारभार आपण चालवितात. आपल्यांतून माणसें निवडतात. हीं माणसें पगार मुळींच न घेतां अथवा फार थोडा घेऊन मतदारांच्या वार्षिक ग्रामसभेंत मिळणाऱ्या आदेशाप्रमाणें त्या त्या गांवाचा कारभार चालवितात. पण येथून मोटरनें फक्त एक तासांत जातां येईल एवढ्याच अंतरावर मोठमोठीं उद्योगप्रधान शहरें आहेत. तेथें युरोपच्या अनेक भागांतून आलेल्या मजुरांमुळें अगदीं वेगळ्या प्रकारची वसाहत झाली असून तिथें जे प्रश्न आणि जे मनःक्षोभ उद्भवले आहेत ते न्यू इंग्लंड प्रदेशांतील खेडुतांच्या गांवींहि नाहींत.

अमेरिकन जीवन एकछापाचें आहे असें जे मानतात त्यांनीं तें जीवन न्यूयॉर्कच्या नृत्यमंदिरांत पाहिलेलें असतें. अमेरिका समजून घेण्याचा उपाय एकच. पूर्वेकडून पश्चिमेकडे किनाऱ्यापासून किनाऱ्यापर्यंत प्रवास करणें, विमानानें अथवा

आगगाडीनें नव्हे तर मोटारीनें फुरसतीनें प्रवास करणें, हाच तो उपाय होय.

न्यू इंग्लंडमध्यें प्रवासास सुरुवात करा, त्या भागांत नव्या मोठ्या राष्ट्रीय सडका फार थोड्या आहेत. जवळजवळ दर चारपांच मैलांवर एकादें लहान शहर लागेल. तेथें मोटारचा वेग कमी करून चाला. कारण त्या लहान शहरांत जो व्यापारधंदा वाढला आहे त्याला जरूर असे रस्ते तेथें कधींच झाले नाहींत. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं मोठ्या सडकेपासून जीं लहान शहरें दिसतात, तीं अगदीं वाईट आहेत. गिरण्यांच्या इमारती खोक्यासारख्या बांधलेल्या, जुने पडूं लागलेले वाडे, त्यांत खोल्या पाडून थोड्या भाड्याचीं घरें केलेलीं आहेत, मुख्य रस्त्यांना दुकानें आहेत तीं जुन्या फळ्याविटांनीं बांधलेल्या घरांना चिकटविलीं आहेत. त्याच गांवांत नवीन पद्धतीचीं घरें बांधलीं जात असलेलींहि तुम्हांला आढळतील. युद्ध संपल्यापासून अमेरिकेंत घरबांधणी धूमधडाक चालू आहे. त्यामुळें सबंध अमेरिकेचें रूपच बदलून गेलें आहे. हीं नवीं घरें नव्या कालांतील अभिरुचीचीं द्योतक आहेत. तीं अगदीं साधीं, डामडौल मुळींच नसलेलीं, सताड मोठ्या खिडक्यांनीं जगाशीं स्नेहभाव दाखविणारीं, अशीं आहेत. रस्त्याच्या बाजूनें हीं घरें एकमेकांस अगदीं लागून आहेत. रस्त्यांनींहि एकमेकांशीं अगदीं कठोर काटकोन केलेले नसून डौलदार वळणें घेतलीं आहेत.

या रस्त्यांच्या जवळच कुठें तरी नवीन बाजार असतो. तेथें सर्व वस्तूंचीं मोठीं दुकानें असतात. एकादी गृहिणी तेथली एक ढकलगाडी—बरोबरच्या लहान मुलाला ठेवतां येईल अशी जागा असलेली गाडी—निवडते आणि मग दुकानांच्या रांगांमधून ती गाडी फिरवीत हिंडते. सर्व दुकानांत अन्नांचे पुडे नीटपणें बांधून तयार ठेवलेले असतात ते ती खरीदते. पैसे देण्याच्या टेबलाजवळ एक कारकून तिच्या मालाची तपासणी करून हिशेब करतो. तिला मदत हवी असल्यास एकादा माणूस तो सारा माल तिच्या मोटारींत नेऊन ठेवतो. असें काम करून घेणें हल्लीं अमेरिकेंत, मजुरीचे दर फार असल्यानें, महाग पडतें, म्हणून ती गृहिणी कोणाची मदत न घेतां आपला माल आपणच मोटारींत नेऊन ठेवते. तरी पण लोकांना मदत करण्याच्या नोकऱ्यांत पूर्वीं केव्हांहिपेक्षां आज अधिक लोक आहेत.

न्यू इंग्लंड प्रदेशांतून न्यूयॉर्क शहराकडे मोटार निघाली कीं ती डोंगरी मुलुखांतून सुमारें शंभर मैलपर्यंत अगदीं नित्रस्तपणें जाते. आठवड्याचा शेवट अथवा दिवसांतली गर्दीची वेळ सोडली तर रस्त्यावर वाहतुकीची गर्दी मुळींच नसून खुद्द न्यूयॉर्क शहरांतूनहि न्यू जेरेसीपर्यंत कांहींहि अडथळा न येतां गाडी जाऊं शकते. रस्ते फार चांगले बांधलेले असून त्यांवर ओळखीसाठीं

नंबर घातलेले आहेत. त्या रस्त्यांच्या माहितीचे नकाशे मिळतात आणि रस्त्याबाबत मार्गदर्शन हवें असल्यास तेलकंपनीला कार्ड टाकलें कीं मार्गदर्शन मिळतें. गाडी जसजशी पश्चिमेकडे जाते तसतसा भूमीचा आकारच नव्हे तर रंगहि बदलतो. पूर्वप्रदेशांतील प्रचंड गर्दीचीं शहरें हें अमेरिकेचें खरें स्वरूप नसून तीं शहरें हा फक्त कांठाचा देखावा होय. पश्चिमेकडे शहरें लहान होत गेलीं असून अमेरिकेच्या प्रचंड विस्तारांत लहान शहरांच्या मानानें मोठीं शहरें हीं अगदींच थोडीं आहेत. लहान शहरें आहेत तींहि दिसण्यांत क्षुद्र व घाणेरडींच दिसतात.

न्यू मेक्सिकोंत नदीला महिनोगणती पाण्याचा थेंबहि नसतो. नदी ओळखण्याची खूण म्हणजे धुळीचे ढग. रस्त्यांच्या कडेच्या रखरखीत मातींत कांहींहि उगवत नाहीं. ॲरिझोना प्रदेश खडकाळ असून तेथले उंच उंच खडक हे मुद्दाम उभारलेल्या भिंतींसारखे दिसतात. त्यांतील फुटक्या खडकांचे उंच उंच सुळे प्राचीन उद्ध्वस्त झालेल्या शहरांतले खांब आहेत कीं काय असें वाटतें. तिथें झाडें नाहींतच. निवडुंगसुद्धां उगवत नाहीं. उंच उंच पर्वत आणि खोल खोल दऱ्या असा प्रदेश सुरू झाला कीं झाडें पुन्हा दिसूं लागतात. या दऱ्यांतून अगदीं पावसाळीपासून अगदीं उन्हाळीपर्यंत सर्व प्रकारचीं हवामानें थोडथोड्या अंतरावर बदलत जातात. या भागांत गुरांचीं मोठमोठीं खिल्लारें पाळण्यांत येतात. येथें ढग दिवसभर असतच नाहींत, आणि ऊन पडतें तें फार कडक पडतें. हिरवें कांहीं तरी खायला मिळावें म्हणून गुरें हपापलेलीं असतात. मोठमोठ्या कड्यांमुळें या प्रदेशांत देखावे पुष्कळ व चांगले आहेत. अमेरिकन इंडिअनांची वस्ती या भागांत बरीच असून शहरांतून यांची जमात पुष्कळ आढळून येते. हा सर्व मध्यप्रदेश या कडेपटारापर्यंत सपाट दिसतो. पण तो भ्रम आहे. मिसिसिपी नदीपासून प्रदेश उंचावत जातो. 'मोठ्या कड्या'पर्यंत म्हणजे 'ग्रँड केन्यॉन'पर्यंत सात हजार फूट उंचीपर्यंत जातो.

हा सारा प्रदेश पुष्कळसा नापीक व फार विस्तीर्ण आहे. तासाला सत्तर मैल या वेगानें तुम्हीं गाडी चालविली तरी वाट कधीं संपेल कीं नाहीं याची शंकाच वाटते. या प्रदेशावर माणसाला आपली कांहींच छाप पाडतां आलेली नाहीं. गाडीला ड्रायव्हर दोन असल्यास आठ ते दहा दिवसपर्यंत तुम्ही या रस्त्यावर सतत प्रवास करूं शकतां. देखावे पाहण्यासाठीं गाडी मधूनमधून इकडेतिकडे हिंडवाल तर सुमारें दोनशें गॅलन गॅस संपेल. लुब्रिकेशन कित्येकदां करावें लागेल. दोनतीनदां तेल बदलावें लागेल, प्रत्येक वेळीं गाडी थांबविल्यावर विंडशील्ड साफ करावें लागेल. कारण गाडी तासाला ७० मैल वेगानें धावत असली म्हणजे

हवेंतले लक्षावधि कीटक तावदानावर वेगानें आपटून मरतात. त्या बिचाऱ्यांना तो मृत्यूचा सापळाच होतो. गाडी न बिघडतां तीन हजार मैल गेली पाहिजे अशी अपेक्षा असते. अमेरिकेंत गाड्या इतक्या कार्यक्षम आहेत हें गृहीतच धरलें जातें.

मोटारगाडी नसेल तर अमेरिकनांचें जीवन स्थगितच होईल. मोटार ही अमेरिकनाचा घोडा आणि चिलखत होय. प्राचीन ब्रिटनमधील आर्थर राजाचे सरदार ज्याप्रमाणें घोडा आणि चिलखत यांच्या बळावर जंगलांतून लढाया मारीत हिंडत त्याप्रमाणें आजचा अमेरिकन मोटारीच्या बळावर निर्जन प्रदेश व लांब लांब अंतरें तोडून जातो. मोटारचा आवाज हें त्याचें काव्य असतें, अडाणी इंडिअनाला आरसा जसा प्रिय असतो तसा अमेरिकनाला मोटारचा चकचकीतपणा प्रिय असतो. तेजस्विता व सौंदर्य यांबद्दलची अमेरिकन प्रीति मोटारीनें व्यक्त होते. मोटार ही अमेरिकनाच्या वैभवाची खूण व प्रियकरणीला पकडण्याचा गळ असतो. मालक अंगावर ओरडला आणि बायको संतापली तर अमेरिकन माणूस मोटारच्या मिजाशीनें आपला मोठेपणा आपल्या मनाला पटवून समाधान मानून घेतो.

पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रवास करीत जाणें म्हणजे अमेरिकेचा पुनर्जन्म अनुभवण्यासारखें आहे. कारण प्रथम पूर्व किनाऱ्यावर वसाहत करून तेथून पश्चिमेकडे जातजातच अमेरिकनांनीं आजची अमेरिका उत्पन्न केली. पूर्वेकडून पश्चिमेकडे जातां जातां जीवनाच्या सर्व शाखांचें शिक्षण मिळतें. जमिनींचे विविध प्रकार, नद्या, मैदानें, पर्वतांच्या निरनिराळ्या रांगा, हा सर्व भूप्रकार यांत आढळतो. हरीण, काळवीट, रेडा, ससा, असे निरनिराळे प्राणी त्यांच्या त्यांच्या प्रदेशांत आढळतात. युरोपांतील बहुतेक राष्ट्रांतले लोक, तसेंच मेक्सिकन्स, इंडिअन्स, जपानीज् हे सर्व वाटेंत आढळतात. पूर्वेकडील अनिश्चित व ढगाळ हवामानापासून पश्चिमेकडील पर्जन्यरहित, स्वच्छ व कडक हवामानापर्यंत हवेचे सर्व प्रकार येथें आहेत. नद्यांचे प्रदेश, विविध भूधन व माणसें यांचे संबंध, धंद्यांचे प्रदेश, अचानक कॅन्ससमध्यें आढळणाऱ्या तेलाच्या विहिरी अशीं हजारों दृश्यें मोठीं बोधप्रद आहेत.

स्थळनामेंहि बोधप्रद आहेत. मॅसच्युसेट्सपासून कॅलिफोर्नियापर्यंत नद्यांच्या सुंदर नांवांत इंडियन संस्कृति आढळते. मोनोंगाहेला, सुस्किहाना, मिसूरी, मिसिसिपी या नद्यांच्या नांवांत अथवा कॉनेक्टिकट, आरकॅन्सास, ओक्लाहोमा या राज्यांच्या नांवांत इंडिअनांची विशिष्ट संस्कृति आहे. पूर्वेकडील बोस्टन, हार्टफोर्ड, न्यूयॉर्क हीं नांवें इंग्रज लोकांनीं इंग्रजी पद्धतीचीं दिलीं आहेत, तर

सिरॅक्यूज, रोम, कार्थेज, अटिका वगैरे नांवें पश्चिम न्यूयॉर्कच्या अभिजात वाङ्मयांतून घेतलीं आहेत. ओहिओ, इंडिआना, इलिनॉइस हीं इंग्लिश नांवें आहेत. सॅन्टा फे, अल्बुकर्क, लास व्हॅगास, लॉस एंजल्स हीं नांवें स्पॅनिश वसाहतींत आहेत. केन्यॉन, वॉश वगैरे नांवें प्रादेशिक स्वरूपाचीं निदर्शक आहेत.

अत्यंत नापीक व रखरखीत अशा प्रदेशांत माणसाचें अफाट कर्तृत्व पाहायला मिळतें. ॲरिझोनाच्या वायव्य भागांतून जाणारी मोठी सडक डोंगरकपारांतून वळणें घेत घेत एकदम खालीं उतरते ती तुम्हांला प्रचंड हूव्हर बंधाऱ्याशीं आणते. तेथें अडविलेलें पाणी ग्रँड केन्यॉनपर्यंत विस्तीर्ण तलावांत साठविलेलें आहे. वसंत ऋतूंत महापूर येऊन या मैदानी प्रदेशांतील माती वाहून जात असे ती या बंधाऱ्यानें थांबविली आहे. निर्जल अशा रखरखीत प्रदेशावर पाणी फिरवून तो प्रदेश फलपुष्पांनीं प्रफुल्लित करणें हें या बंधाऱ्यामुळें शक्य झालें. पंचाहत्तर लक्ष लोकवस्तीला पुरेल एवढी वीज या पाण्याच्या प्रपातापासून निर्माण होते. या वाहत्या पाण्याचें नियंत्रण करून, नदीप्रवाहाच्या खालच्या बाजूस आणखी धरणें बांधून पाणी साठविण्याची सोय केली आहे. तेथें आणखी वीज निर्मिणें व शेतीला पाणी पुरविणें शक्य होईल. हूव्हर धरणापासून लास व्हॅगास, नेव्हाडा हें अंतर पंचवीस मैल. पण एवढ्या लहान प्रदेशांत लोकशाहीच्या उदात्त कल्पनेपासून उघड्यानागड्या जुगारापर्यंत सर्व प्रकार पाहायला मिळतात. लास व्हॅगासपासून कॅलिफोर्निया अगदीं थोड्या मैलांवर आहे. येथवर आपण देशाचा बहुतेक भाग मागें टाकलेला असतो. अजूनहि पूर्व-कॅलिफोर्नियांत खडबडीत पर्वत, सपाट प्रदेश, निर्जल ओसाड प्रदेश, झाडीचा प्रदेश वगैरे विविध प्रकार आढळतातच. सॅन बर्नार्डिनो येथें ओसाड प्रदेश संपतो. ताडाच्या व संत्र्यांच्या बागा, पाटांनीं भिजविलेली सुपीक जमीन असा प्रदेश येथून लागतो. मोठमोठीं शहरें आतां मागें राहून धान्याच्या सुपीक शेतीचीं प्रचंड खोरीं येथें आढळतात. अमेरिकेच्या पश्चिमेकडील वासाहतिक साहसाचा हा शेवट असून अमेरिकन कर्तृत्वाचा हा स्वर्ग आहे. कॅलिफोर्निया हा आतां फक्त फळझाडांचा अथवा हिरव्यागार शेतीचा मुलूख राहिलेला नाहीं. किंवा तो नुसता होलिवुड या सिनेमा वसाहतीचा मुलूखहि नव्हे अथवा विविध धर्मपंथांचाहि प्रदेश नव्हे. कॅलिफोर्निया हा प्रदेश आतां प्रचंड धंद्यांचा प्रदेश झाला असून एकट्या लॉस एंजल्स शहरांत इतक्या मोटारी आहेत कीं कित्येक सबंध राज्यांत तितक्या नाहींत.

हा सर्व पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पसरलेला विस्तीर्ण प्रदेश ओलांडून जाणें हें

कंटाळवाणें आहे, तसेंच प्रक्षोभकहि आहे. पुस्तकांत लिहितां येतें त्यापेक्षां डोळ्यांनीं पाहायला किती तरी अधिक मिळतें. थोडक्यांत लिहिलेलें वाचण्यापेक्षां प्रत्यक्ष पाहून किती तरी अधिक शिक्षण मिळतें. पण अमेरिकेसंबंधानें कोणतेंहि अनुमान काढतांना तिचा प्रचंडपणा ही बाब नेहमीं ध्यानांत ठेवली पाहिजे. कारण प्रचंडपणामुळेंच विविधता व परस्परविरोध तींत आहेत. जमीन, माणसें, हवा, धंदे, लोकांच्या रीतीभाती, श्रद्धा व मूर्खता, सुराज्यव्यवस्था, गुन्हेगारी, औदार्य, क्षुद्रत्व, सौजन्य व खलता, बोलण्याच्या व पोषाखाच्या तऱ्हा ही सर्व विविधता प्रदेशाच्या प्रचंड विस्तारामुळें आली आहे.

पश्चिमेकडून पूर्वेकडे सरळ प्रवास केला तर अमेरिकेची सर्व विविधता पाहून संपतहि नाहीं. युरोपांतून अटलांटिकमधून अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्याशीं जहाजानें आलेला माल त्याच जहाजांतून मोठ्या सरोवरांच्या मार्गानें शिकागोपर्यंत जातो व मेक्सिकोच्या आखातांतून दोन हजार मैल सेंट पॉल (मिनेसोटा) पर्यंत जहाजें जातात. हे जलमार्ग या पूर्व-पश्चिम प्रवासांत पाहायला मिळत नाहींत. मेनपासून जॉर्जियापर्यंत दोन हजार मैल जंगलांतील पायवाट आहे, ती या प्रवासांत येत नाहीं. दक्षिण प्रदेशांतील विविधता, टेक्ससचा अनंत प्रदेश, आणखी किती तरी प्रकार पूर्व-पश्चिम प्रवासांत येत नाहींत. खरोखर सारी अमेरिका समजून घ्यायची तर एक आयुष्यहि पुरणार नाहीं. अमेरिकेंत भू व जल मिळून ३० लक्ष चौ. मैल क्षेत्र असून यांतील ४० टक्के जमीन गुरचरणाला, २८ टक्के जंगलाखालीं, २२ टक्के पिकाखालीं आणि १० टक्के शहरें व सडका यांखालीं गेली आहे. ३० टक्के जमीन फेडरल सरकारची असून तींत बरीचशी जमीन जंगल व गुरचरण याची आहे. कांहीं जमीन ग्रँड केन्यॉन, कार्लसबाड कॅव्हर्न्स, गरम झरे व यलो स्टोनचे गेसर्स इत्यादि ऐतिहासिक महत्त्वाच्या अथवा निसर्गसौंदर्याच्या स्थळांची आहे. ५ कोटि ६० लक्ष एकर म्हणजे इंग्लंड, स्कॉटलंड व वेल्स एवढी जमीन इंडिअन लोकांसाठीं राखून ठेवलेली आहे. जगांतील वन्य श्वापदांचे जास्तींत जास्त प्रकार येथें आहेत. अमेरिकेंत कल्पनातीत प्रमाणांत अन्न पिकतें. १९५४ सालीं तीनशें कोटि बुशेल गुरांचें धान्य, शंभर कोटि बुशेल गहूं आणि पस्तीस कोटि पन्नास लक्ष बुशेल बटाटे एवढें पीक झालें. त्याच वर्षी पंचवीसशें कोटि पौंड मांस उत्पादन करून खाऊन टाकण्यांत आलें.

दगडी कोळसा, पेट्रोल, पोलाद, विजेची शक्ति, तांबें, कापूस वगैरे द्रव्यांच्या उत्पादनांत अमेरिका पहिली आहे. यांतील पुष्कळसें धन अमेरिकेनें अविचारानें उपसलें व उधळून टाकलें, जुलमाविरुद्ध जगाचें रक्षण करण्यांत

अथवा युद्धांत उद्ध्वस्त झालेल्या जगाची पुनर्वसाहत करण्यांत फाजील औदार्यानें उधळलें. तरी पण जमीन, खाणी व जंगल यांत अमेरिकेजवळ अफाट धन अजूनहि आहे आणि हें धन जपून वापरलें पाहिजे याची जाणीव अमेरिकेला आतां झाली आहे.

परकी पाहुण्यांना अमेरिकेंत सर्वत्र एकसारखेपणा व एकप्रमाणता दिसते. सिनेमा व रेडिओमुळें, मोटारी व कपडे यांच्या राष्ट्रीय स्वरूपाच्या खरेदीपद्धतीमुळें, डबाबंद अन्नामुळें, नियतकालिकांमुळें अमेरिकन्स हे एकसारखे दिसतात व वागतात असें भासतें. संस्कृतीचीं कांहीं अंगें अशीं आहेत कीं तीं सर्वांना सारखींच मिळतात. पण यामुळें त्यांच्यांत विविधता नाहीं असें नाहीं. व्हर्मॉंटचा शेतकरी, दक्षिणेंतला शेतीभागीदार, मिसिसिपीचा नावाडी, कॅन्ससचा दुकानदार, शिकागोचा प्रोफेसर, टेक्ससचा गवतवाला व तेलवाला, नीग्रो औद्योगिक कामगार, ग्रीक हॉटेलवाले, पोलिश आईबाप असलेला अमेरिकन डॉक्टर, जपानी पूर्वज असलेला वायव्येकडील अमेरिकन फळबागवाला म्हणजे 'निसी', हे सर्व अमेरिकन म्हणून ओळखतां येऊनसुद्धां त्यांचें वेगवेगळेपणहि ओळखूं येतें.

गोंधळ निर्माण न करतां विविधता टिकविणें, माणसांना त्यांचें व्यक्तित्व नष्ट करण्याची सक्ती न करतां एका संस्कृतींत आणणें हा मानवी संस्कृतीचा जास्तींत जास्त उदात्त हेतु नव्हे काय? आणि एकाद्या संस्कृतीनें विविध प्रकारच्या लोकांना त्यांची विविधता उपभोगूं देऊन पण त्याचबरोबर एका समाजांत त्यांना गोवण्यानें त्या समाजाचें सामर्थ्य व आनंद वाढवून ती सर्व विविधता आपल्या अंगीं रिचविणें हें ती संस्कृति उच्च कसोटीला उतरण्याचें लक्षण नव्हे काय? हें सर्व कर्तृत्व ज्यांनीं आजची अमेरिका या अवस्थेला आणली त्यांनीं दाखविलें आहे.

प्रकरण तिसरें

# अनेक राष्ट्रांचें एक राष्ट्र

मानवी इतिहासांत असें कधीं घडलेलेंच नाहीं. इटालींतून व आयर्लंडमधून, जर्मनींतून व रशियांतून, ग्रीसमधून, बाल्कन राष्ट्रांतून आणि स्कँडिनेव्हिअन राष्ट्रांतून हीं माणसें येथें वसाहतीला आलीं. अनादिकालापासून त्यांचीं कुटुंबें त्यांच्या त्यांच्या देशांत ज्या खेड्यांत राहिलीं होतीं आणि जेथें परंपरागत चालीरीती व ओळखीचीं माणसें यांच्या छायाछत्रांत हीं माणसें राहत आलीं होतीं तीं खेडीं मोडून हजारों मैल जमीन, सागर ओलांडून हीं माणसें येथें आलीं.

कुटुंबेंच्या कुटुंबें अशीं मूल स्थानांतून उन्मळून दुसरीकडे लावलीं गेलीं यांत जी मानवी कथा घडली असेल ती आंकड्यांच्या परिभाषेंत सांगतां येणार नाहीं. ज्यांनीं कधींहि परदेशचा प्रवासहि केला नसेल अशा माणसांनीं स्वदेशाच्या सरहद्दी ओलांडून किनारे कसे गाठले, सरकारी ऑफिसरांना कसें तोंड दिलें, पुढें घाबरलेल्या व गोंधळलेल्या मनःस्थितींत ते अमेरिकन किनाऱ्यावर कसे आले, या सर्व धावपळींत व प्रवासांत त्यांना दुःख, यातना, अपमान कसा भोगावा लागला याचें मोजमाप कोणत्या आंकड्यांनीं करतां येईल? पण एवढ्या हालअपेष्टा भोगाव्या लागूनसुद्धां १८५० सालाइतक्या जुन्या काळीं अमेरिकेंत दरसाल ३ लक्ष ७० हजार इतकीं नवीं माणसें परदेशांतून येत होतीं. अटलांटिकच्या दोन्ही किनाऱ्यांवर परिस्थिति जशी बदलली तसा हा आंकडा पुढें कमी-अधिक होत गेला. पण एकंदरीनें ही माणसांची आयात पुढें वाढतीच राहिली. १९०५ च्या सुमारास ही आयात दर साल दहा लाखांवर गेली. पहिल्या महायुद्धामुळें हा माणसांचा महापूर थांबला. त्या युद्धानंतर तो पुन्हा वाढूं लागलेला पाहतांच अमेरिकन कायद्यांनीं तो बराच कापला. कारण बहुतेक अमेरिकनांचें असें मत झालें कीं जे दशलक्षावधि परदेशी लोक या देशांत येऊन राहिलेले आहेत त्यांना सामावून

घेणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय. तरी पण अजूनहि दरसाल दोन लक्ष माणसें परदेशाहून येथें वसाहतीसाठीं येतात. अमेरिकेसारख्या देशाला हा आंकडा फारसा मोठा नाहीं हें खरें, पण ओटावासारखें एक सबंध शहर वसवतां येईल एवढा हा आंकडा मोठा आहे.

१८२० पासून १९५३ पर्यंत सुमारें ४ कोटि लोक या देशांत परदेशाहून वसाहतीसाठीं आले. त्यांत ४५ लक्ष ग्रेट ब्रिटनमधून, त्यापेक्षां थोडे अधिक आयर्लंडमधून, २५ लक्ष स्कँडिनेव्हिआंतून, ५० लाख इटालींतून आणि सुमारें ८० लाख मध्य व पूर्व युरोपांतून आले. (युरोपच्या मध्य व पूर्व भागाची या काळांत विभागणी व फेरविभागणी इतके वेळां झाली आहे कीं त्यांतल्या कोणत्या राष्ट्रांतून किती माणसें अमेरिकेंत गेलीं हें आंकडेवार सांगणें अशक्यच आहे.)

याचा परिणाम काय झाला? अमेरिका हें अनेक राष्ट्रांचें एक राष्ट्र तयार झालें. जगांतल्या सर्व प्रमुख भाषा जेथें बोलल्या जातात, जेथें म्युनिचइतकें खास जर्मन शहर, माद्रिद्इतकें खास स्पॅनिश शहर, झूरिचइतकें खास स्विस शहर अशीं खास परदेशीयांचीं शहरें आहेत, अशी ही भूमि झाली आहे. हॅमट्रॅमक हें पोलिश शहर असून त्याचें स्वतःचें सरकारहि आहे. त्याच्या सबंध भोवतीं डिट्रॉइट शहर आहे. लॉस एंजल्स हें साऱ्या जगांत दुसरें मोठें मेक्सिकन शहर आहे. सॅन्फ्रॅन्सिस्कोंत जितके चिनी लोक आहेत तितके चीनयाहेरच्या दुसऱ्या कोणत्याहि शहरांत नाहींत. तेथें हॉस्पिटल, पोस्ट ऑफिस, थिएटरें, रेडिओ स्टेशन, दैनिक वृत्तपत्रें, टेलिफोन सर्व्हिस वगैरे सर्व खास चिनी लोकांच्या सोयी आहेत. टेलिफोन ऑपरेटर्सना सहा चिनी पोटभाषा येतात आणि आपल्या वर्गणीदारांचीं नांवें व नंबर त्यांना पाठ आहेत. शिकागोंत इटालिअन लोकसंख्या मिलानच्या खालोखाल असून पोलिश लोकसंख्या वॉर्साच्या खालोखाल आहे. इडाओ राज्यांत बास्क लोकांची जेवढी वसाहत आहे तेवढी पिरनीज् पर्वताच्या या दिशेकडील प्रदेशांत कोठेंहि नाहीं. येथें वसाहतीस आलेल्या स्विस लोकांनीं वसविलेलें विसकॉन्सिन हें शहर साऱ्या स्विस चीजची मुख्य भूमि म्हणून प्रसिद्ध आहे.

न्यू मेक्सिको हें द्विभाषी राज्य असून तेथें सरकारी नोटिसा स्पॅनिश व इंग्लिश भाषेंत लावल्या पाहिजेत. त्या राज्याची घटनाहि दोन भाषांत मंजूर झाली होती. न्यू मेक्सिकोंत कांहीं खेडीं स्पेनच्या अमलाच्या काळापासूनचीं असून तेथें इंग्रजी भाषा ऐकूंहि येत नाहीं. ॲरिझोनामध्यें एक तृतीयांश जमीन इंडिअनांच्या मालकीची असून त्यांतले पुष्कळ जण आपल्या वाडवडिलांच्या पद्धतीनेंच राहतात.

न्यूयॉर्क हें आमच्या सर्व शहरांत अत्यंत संमिश्र आहे. इंग्रजीखेरीज इतर भाषांत प्रसिद्ध होणारीं दोनशेंहून अधिक वृत्तपत्रें तेथें आहेत. न्यूयॉर्कच्या ऐंशीं लाख लोकसंख्येपैकीं निम्म्याहून अधिक माणसें परदेशांत जन्मलेलीं अथवा ज्यांचे आईबाप परदेशीय होते अशीं आहेत. इटालियन व रशियन प्रत्येकीं ४ लक्ष हे परदेशीय लोकसंख्येंत जास्तींत जास्त संख्येचे आहेत. ज्यू हे अनेक राष्ट्रांतून आले असून न्यूयॉर्कमध्यें कित्येक पिढ्या राहिले आहेत. त्यांची संख्या न्यूयॉर्कच्या एकंदर लोकसंख्येंत चतुर्थांश आहे. जगांत न्यूयॉर्कइतके ज्यू कोणत्याहि एका शहरांत नाहींत. शिवाय नीग्रो, पोर्टोरिकन्स, हैती, मेक्सिकन यांच्याहि मोठ्या संख्या न्यूयॉर्कमध्यें असून हॅर्लेमच्या मध्यभागीं स्मॅक येथें अमेरिकेंतली मोठ्यांत मोठी फिनिश वसाहत आहे.

अशा प्रकारें युरोपांतलीं सारीं राष्ट्रें, आशिया व आफ्रिका यांतलीं कांहीं राष्ट्रें आणि अमेरिका खंडांतलीं कांहीं राष्ट्रें या सर्वांनीं आजचे अमेरिकन लोक बनविले आहेत. हे सारे अमेरिकनच होत. अध्यक्ष रूझवेल्ट म्हणाला तें अगदीं खरें कीं, "अमेरिकेंत आपण सर्व बाहेरून आलेलेच आहोंत."

रूझवेल्टचें हें विधान अमेरिकेंतल्या इंडिअनांनाहि लागू पडतें. कारण ते आशियांतून बेरिंगच्या सामुद्रधुनींतून वाट काढीत अमेरिकेंत आले. अमेरिकेंत पहिले गोरे वसाहतवाले आले तेव्हां इंडिअनांची संख्या ८ लक्ष ४५ हजार होती. आतां त्यांची संख्या ३ लक्ष ४० हजार झाली असून त्यांची ही संख्या आतां वाढत आहे.

## विविधतेंतलें एकत्व

सतराव्या शतकांत युरोपिअन वसाहतवाल्यांची लाट प्रथम आली त्या वेळीं, कोलंबसानें युरोपीयांना खुल्या केलेल्या या नव्या जगांत सुमारें सहा-सात राष्ट्रांनीं किनाऱ्यांवर आपल्या आघाडीच्या छावण्या टाकल्या होत्या. त्यानंतर स्पॅनिश लोक नैर्ऋत्येकडे व कॅलिफोर्निआच्या किनाऱ्याकडे गेले. फ्रेंच लोक हे मिसिसिपी नदी आणि खोरें या भागाचे पहिले संशोधक असून त्यांनीं न्यू ऑर्लिन्स शहर वसवलें. त्याच्या जुन्या भागांत फ्रेंच संस्कृति अजून जशीची तशी जतन केलेली आढळते. लुइसिआनाच्या पाणथळ भागांतील वसाहतींत अजून फ्रेंच हीच प्रभावी भाषा आहे.

डीलावेअर हें शहर प्रथम स्वीडिश लोकांनीं वसविलें व त्याचें नांव न्यू स्वीडन ठेवलें होतें. न्यूयॉर्क हें इंग्लिश अमलाखालीं जाण्यापूर्वी डच होतें हें

सर्वांना माहीत आहे. पेन्सिल्व्हानियावर जर्मन सरकारचा अंमल कधींच नव्हता, तरी तें १७२० इतक्या जुन्या काळीं फार मोठ्या प्रमाणांत जर्मन होतें.

पण युरोपांतून आलेल्यांपैकीं प्रभावी संख्या आली ती ब्रिटिश बेटांतल्यांची आली. इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स व उत्तर आयर्लंड यांनीं आमची निम्मी लोकसंख्या बनली आहे. तसेंच अमेरिकन जीवनाचा मूलभूत नमुना बहुंशीं ब्रिटिश धर्तीचाच आहे. भाषा, कायदा, कौटुंबिक नांवें, सरकारसंबंधींची मनोवृत्ति, वाङ्मय वगैरे सर्व आमच्या जीवनाचीं अंगें ब्रिटिश संस्कृतींतूनच आलीं आहेत. अमेरिकन संस्कृतीवर इंग्रजांखेरीज इतर राष्ट्रांच्या संस्कृतींची छाप फारशी पडली नाहीं हें कसें?

याचें एक फार महत्त्वाचें कारण असें कीं, ज्यांतून आजचें अमेरिकन राष्ट्र विकसित झालें त्या पहिल्या वसाहती ब्रिटिश होत्या. १७० वर्षेंपर्यंत अमेरिकेंतल्या त्या वसाहती ब्रिटिश राजाच्या अंकित होत्या. त्या वसाहतवाल्यांचा मूळ देश इंग्लंड हा असून त्यांची भाषा, त्यांच्या संस्था, इतकेंच नव्हे तर त्यांनीं ज्या पद्धतीनें ब्रिटिश राजाच्या सत्तेला विरोध केला ती पद्धति हें सर्व ब्रिटिश होतें. "ब्रिटिश पार्लमेंटांत आम्हांला हक्काचें प्रतिनिधित्व नसेल तर आम्ही कर देणार नाहीं," ही हक्काची भाषा अमेरिकनांनीं मांडली ती ब्रिटनचे अंकित नागरिक म्हणून अथवा अमेरिकन म्हणून नसून जन्मसिद्ध स्वतंत्र ब्रिटिश नागरिक म्हणून मांडली.

जेम्सटाउन येथें पहिली कायम इंग्लिश वसाहत स्थापली गेली, तिची योजना ब्रिटिश राज्यांतल्या वड्या लोकांनीं आंखली असून त्यांचा तिला पाठिंबाहि होता व त्या वसाहतीला ब्रिटिश राजाकडून सनदहि मिळाली होती. प्लायमाउथ ही दुसरी कायम ब्रिटिश वसाहत. ती उत्तर इंग्लंडमधील लहान शेतकऱ्यांच्या हातीं मुख्यतः होती. ब्रिटनचे स्वतंत्र नागरिक या आपल्या दर्जाबद्दल त्यांना विशेष अभिमान असून सरकारी कर भरावा व आपल्या जमिनीवरचा ताबा टिकवावा, तसेंच ब्रिटिश चर्च व राजा यांनीं धर्मोपासना कशीहि करायला सांगितली असली तरी बायबलाचा अर्थ आपणच लावून त्याप्रमाणें आपणास वाटेल तशी धर्मोपासना करावी असा त्यांचा निर्धार होता. प्लायमाउथ ही अशी पहिलीच धार्मिक वसाहत होती. पुढें सॅलेम येथें, नंतर बोस्टन व प्रॉव्हिडेन्स येथें, न्यू हेवन येथें, नंतर अंतर्गत भूप्रदेशांत कॉनेक्टिकट नदीच्या कांठीं, लहान लहान वसाहती स्थापन झाल्या. या वसाहती एकमेकींपासून स्वतंत्र होत्या. सबंध न्यू इंग्लंड प्रदेशांत ग्रामीण गणराज्यें स्थापन झालीं. तीं लहान लहान असून त्यांच्या नागरिकांत एकमेकांशीं निकट संबंध असे.

या सर्व वसाहती परतंत्र होत्या त्या काळांत (राष्ट्रीय सरकार स्थापन झाल्यापासून आजवर जेवढा काळ गेला तेवढा मोटा तो कालखंड होता.) अमेरिकेंत वसाहती करण्यासाठीं येणारे लोक इंग्लिश व स्कॉटिश-आयरिश (उत्तर आयर्लंडमध्यें गेलेले स्कॉटिश) असत. पुढें अमेरिकेंत वीस लक्ष गुलाम आणविले गेले. अमेरिकन संस्कृतीला विशिष्ट वळण त्यांच्यामुळें लागलें. पण इंग्लिश कायदे, सरकार व भाषा यांच्या अमलाला या गुलामांच्या आयातीनंतरहि कोणीं आक्षेप घेतला नाहीं.

अमेरिकेंत आलेल्या इंग्रजांत व स्कॉच नागरिकांत पुष्कळच फरक होता. तरी पण त्यांच्यांत दोन गोष्टी समान होत्या. दोघांनाहि मूळ स्वदेशांतील परिस्थितीबद्दल पूर्ण असमाधान होतें आणि स्वतःचें भवितव्य स्वतंत्रपणें आखण्याला जरूर तीं साधनें व हिंमत त्यांच्या ठिकाणीं होती. विल्यम ब्रॅडफोर्ड, जॉन विंथ्रॉप, विल्यम पेन, लॉर्ड बाल्टिमोर यांसारखे पहिले कर्तृत्ववान पुरुष जे अमेरिकेंत आले ते आपल्या धर्मश्रद्धेप्रमाणें राहण्याचें व विचार करण्याचें स्वातंत्र्य असणाऱ्या वसाहती आपण स्थापूं या आकांक्षेनेंच आले. दुसरे जे अनेक आले ते स्वदेशांतली कुटुंबपोषणास अपुरी जमीन, क्रूर जमीनदार, डोईजड करभार इत्यादि प्रकारच्या विविध आपत्ती चुकविण्यासाठीं आले. विल्यम स्टाउटन लिहितो : "अमेरिकेच्या या निर्जन जंगलांत मानवाचें उत्तम बीजच पाठवावें या हेतूनें ईश्वरानें चाळण मारून माणसें निवडलीं."

अर्थात् आरंभापासून येथें वसाहतीला फक्त इंग्रजच आले असें नव्हे, तर इतर अनेक राष्ट्रांतलेहि लोक आले. पहिल्या 'पिल्ग्रिम्स' (यात्री) बरोबर वाल्रून व फ्लेमिश वंशाचे लोक आले. जेम्सटाउनमध्यें इटालिअन्स, डच व पोल्स होते. फ्रान्समधील ह्युजेनॉट्स हे पहिल्या पहिल्या वसाहतवाल्यांपैकींच होते. त्यांच्यांतूनच पॉल रीव्हिअर, फॅनील्स, डुपॉन्ट्स हीं लोकोत्तर घराणीं निपजलीं. जर्मन प्रॉटेस्टंट्स, विशेषतः मेनोनाइट्स व मोरॅव्हिअन्स वगैरे युरोपांत विशेष छळ पावलेले गट, विल्यम पेनच्या सहनशील छत्राखालीं पेन्सिल्व्हानियांत राहण्यास आले. याप्रमाणें अटलांटिक किनाऱ्यावर स्थापन झालेल्या प्रत्येक वसाहतींत जी इंग्लिश संस्कृति होती तिला विविध आंतरराष्ट्रीय सुगंधानें गोडवा आणला होता.

१६५४ मध्यें पहिले ज्यू वसाहतवाले मॅनहाट्टनमध्यें आले. पण १६४६ सालींच त्या बेटावरील लहानशा वसाहतींत बारा निरनिराळ्या राष्ट्रांचे लोक आलेले असल्यानें मॅनहाट्टन हें बेट जगांतल्या सर्व संस्कृति वितळून एकजीव करण्याची कढई होणार हें ठरून चुकलें होतें. अमेरिकन संस्कृतीचें वैशिष्ट्य हें

आहे कीं ती संस्कृति अनेक संस्कृतींपासून निर्माण झाली आहे, तरी पण तिचा म्हणून एक विशिष्ट आकार तिला आलेला आहेच. अमेरिकन संस्कृति ही ऐन-जिनसी नवी नसून ती अनेक संस्कृतींचा मिलाफ आहे. जी जी संस्कृति या मिलाफांत मिसळली आहे त्या प्रत्येकीचा स्वाद तिला येतो. आज आलेली परिणति ही अंतर्गत लढ्यावांचून आली नसून त्यांत कांहीं शरम आणण्यासारखे अन्यायहि झाले आहेत. डचांनीं स्वीडिश लोकांना डीलवेअरमधून हाकललें व मग ते स्वतः ब्रिटिशांकडून हाकलले गेले. उत्तर अमेरिकेचा प्रचंड निर्जन मुलूख एकमेकांनीं वांटून घेऊन उपभोगण्याऐवजीं इंग्रज व फ्रेंच यांनीं त्यासाठीं शंभर वर्षेंपर्यंत युद्ध केलें. अमेरिकेंतला हा अँग्लो-फ्रेंच लढा युरोपांतील त्या दोन राष्ट्रांच्या युद्धाचा उपांगभूत असा होता. त्यांनीं दोघांनीं त्या लढ्यांत इंडिअन लोकांनाहि गोवून त्या युद्धांत फार क्रूरपणा केला.

१७६३ सालीं पॅरिसचा तह होऊन उत्तरेकडूनच्या हल्ल्याची भीति संपली आणि अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील सर्व वसाहती इंग्रजांच्या हातीं पूर्णपणें आल्या. कारण स्पेन अँग्लो-फ्रेंच युद्धांत फार उशिरां फ्रेंचांच्या बाजूस आलें व त्याला फ्लोरिडा गमवावें लागलें. (फ्लोरिडा १७८३ सालीं थोडा काळ स्पेनला दिलें होतें. पण नंतर अमेरिकेनें तें पुन्हा खरेदी केलें.) यामुळें सरकार, धर्म व कौटुंबिक जीवन यांविषयींच्या इंग्रजांच्या कल्पनांना आपलें वर्चस्व स्थापण्यास विशेष संधि मिळाली. पण डचांचें व्यवस्थित राहणीबद्दलचें प्रेम, फ्रेंचांचें दाक्षिण्य, नीग्रोंचा चाणाक्षपणा व सौजन्य, त्यांची उदास वृत्ति व त्यांचें संगीत, स्कॉच लोकांचा कष्टाळूपणा व त्यांचा काटकसरीपणा, ह्यूजेनॉट्स्ची कारागिरींतली चिकाटी इत्यादींच्या मिश्रणामुळें या इंग्रजी संस्कृतीचें वैभव वाढलें आहे. इंग्रज लोक अमेरिकन झाल्यावर इंडिअनांप्रमाणें शिकार व शेती करण्यास शिकले. इंडिअन्स हे क्रांति झाली त्या वेळीं ब्रिटिशांपेक्षां अधिक चांगले लढवय्ये होते. या एकाच गोष्टींत इंडिअन्स हे ब्रिटिशांना वरचढ होते. पण इंग्रजांनीं इंडिअनांची युद्धकला हस्तगत करून त्यांचें तें वर्चस्व नष्ट केलें.

अटलांटिक किनाऱ्याच्या पश्चिमेकडील कल्पनातीत अशा अफाट प्रदेशावर जेव्हां वसाहत सुरू झाली तेव्हां पुन्हा अनेक लोकांचें चातुर्य व साहस उपयोगास आलें. लहानशा प्लायमाउथ शहरानें कॉनेक्टिकट नदीच्या कांठीं जेव्हां एक व्यापारी ठाणें उघडलें आणि थॉमस हूकरनें जेव्हां त्या जंगलांत तेथेंच आपलें चर्च सुरू केलें तेव्हां पश्चिम दिशेकडे वसाहती स्थापण्याचा क्रम सुरू झाला. कानडा इंग्रजांच्या हातीं पडल्यावर पश्चिम प्रदेशाची आकर्षकता वाढली. व्हर्मॉटची

स्थापना झाली. पश्चिम न्यूयॉर्कच्या पूर्वीच्या वसाहती वाढविण्यांत आल्या. राज्य-क्रांति पूर्ण झाल्यानंतर, स्वातंत्र्यासाठीं जे तरुण लढले होते, त्याचें लक्ष वायव्य प्रदेशाकडे वेधलें. ओहिओ कंपनी ऑफ असोसिएट्स या कंपनीचे सदस्य ओहिओ नदीकांठीं पहिली वसाहत स्थापण्यासाठीं न्यू इंग्लंडमधून गेले. पेन्सिल्व्हानिआंतून मेनोनाइट्स व अतिकष्टाळू स्कॉच-आयरिश हे पश्चिमेकडे वसाहतीसाठीं सरकले. विस्कॉन्सिन, मिशिगन, इंडिआना इत्यादि ठिकाणीं वसाहती झाल्या. पुढें जेफर्सननें लुझिआना प्रदेश खरेदी करुन आणखी एक प्रदेश संशोधनाच्या कक्षेंत आणला. पश्चिम सरहद्द उड्या मारीत वाढत चालली.

## 'सरहद्द' म्हणजे काय ?

'सरहद्द' या शब्दाचा युरोपांत जो अर्थ आहे त्याहून अगदीं वेगळा अर्थ अमेरिकनांच्या लक्षांत येतो. युरोपांत अमुक देशाची 'सरहद्द' म्हटली कीं तेथें त्या देशाच्या लोकांनीं थांबायचें असतें व ती सरहद्द ओलांडण्यापूर्वीं ओळख, परवाने वगैरेबद्दलचे कागदपत्र दाखवावे लागतात. पण अमेरिकेंत जो कोणी आपल्या मुलुखाच्या सरहद्दीवर येई तो तेथें स्वतंत्र होई. त्याला नवीन मुलूख व तो व्यापण्यास संधि मिळत असे. सरहद्द ही अमेरिकेंत थांबण्याची जागा नव्हे, तेथें मुक्तद्वार असे, तुम्ही कोण आहां तें सांगण्याची ही जागा नसून, तुमची इच्छा असल्यास अनोळखीपणें राहण्याची ती जागा असे; येथें आधुनिक जीवनानें आपला साचा निर्मिला नसून येथें मुलूख विस्तीर्ण असे व नव्या वसाहतवाल्यांना आपले कायदे करण्याचें स्वातंत्र्य असे.

माणसांना वसाहत करायची असो, नसो, वसाहत करायची असेल तर पश्चिमेकडे वाव आहे ही जाणीव अमेरिकन स्वभावाची अवश्य पार्श्वभूमीच असे. अमेरिकनांची समजूतच अशी कीं सरहद्द म्हटली म्हणजे तेथें प्रस्थापित मानवी जीवनाचीं बंधनें नाहींत, तेथें माणसाचें राज्य निसर्गानें घेतलें आणि माणसानें लबाडीनें केलेलीं दुष्कृत्यें प्रचंड नद्या, विस्तीर्ण आकाश, वाहती स्वच्छ हवा यांत विरून जातात. नव्या वसाहतींच्या लाटांमागून लाटा पश्चिमेकडे उसळल्या. पहिल्यानें शिकारी गेले, पुढें प्राथमिक वसाहतवाले गेले, नंतर कायम शेतकरी गेले. आणि शेवटीं एकटदुकट-घरांऐवजीं लहानमोठीं शहरें वसलीं.

पश्चिमेकडील पहिल्या वसाहती चार मार्गांनीं वाढत गेल्या. दक्षिण अटलांटिक किनाऱ्यावरून मेक्सिकोच्या आखाताच्या मार्गानें, दक्षिण प्रदेशांतील डोंगरांतून टेनेसी व ओल्ड साउथवेस्ट भागांत, ओहिओ नदीच्या खोऱ्यांत; आणि महा-

सरोवरांनीं दाखविलेल्या जलमार्गाच्या बाजूनें. या मुख्य चार मार्गांनीं गेलेले लोक वसाहतयोग्य दिसेल अशा कोणत्याहि मुलखांत पुढें शाखोपशाखांनीं शिरले. १८४०-५० या काळांत पश्चिम दिशेनें सर्व मुलूखभर वसाहती स्थापण्याचा क्रम सुरू झाला तेव्हां भूरचनेमुळें मैदानावरून व डोंगरांतून जाण्याचे कांहीं रस्ते निश्चित झाले. मैदानी प्रदेशावरील राज्यें स्थापलीं जाण्यास बराच काळ जावा लागला.

आघाडीवरचे वसाहतवाले जसजसे पुढें जात तसतसे त्यांच्या जागीं शेतकरी येत. शेतकरी हे मागाहून आलेले परदेशी होत. १८२०-३० या काळांत शेतकऱ्यांनीं पश्चिम न्यूयॉर्क, ओहिओ व पेन्सिल्व्हानिया येथल्या सोडून दिलेल्या जमिनी घेतल्या. १८४०-५० या काळांत शेतकरी मिसूरी, इलिनॉइस व दक्षिण विस्कॉन्सिन येथें गेले. १८५०-६० व १८६०-७० या काळांत ते पूर्व आयोवांत आणि मिन्नेसोटा येथें गेले. १८७०-८० च्या सुमारास ते गवत पिकविणाऱ्या राज्यांत होते. रोज नव्या नव्या सरहद्दी गाठण्याच्या उद्योगानें अमेरिकन स्वभाव बनला आहे हें मत आतां निर्विवाद मानलें जातें. फ्रेडरिक जॅक्सन टर्नर यानें हा सिद्धांत प्रथम मांडला व स्वतंत्र वृत्ति, स्वावलंबन आणि व्यक्तिवाद हे अमेरिकेचे विशेष गुण होत असें म्हटलें.

पश्चिमेकडे वसाहती वाढविण्याची ही मोहीम जरी वैयक्तिक स्वरूपाची होती, तरी पण कायम शहरें वसविण्याचा प्रश्न आला तेव्हां ऐच्छिक संघ स्थापावेच लागले. केव्हां या संघांनीं लेखी घटना तयार केल्या. 'मेफ्लॉवर कॉपॅक्ट' मधील शब्दयोजना या घटनेंत वापरण्यांत येई. केव्हां केव्हां एक शहर स्थापण्यासाठीं एकत्र येणारे लोक इतके एकमेकांच्या सलगीचे असत कीं त्यांना आपल्या संघटनेसाठीं लेखी घटनेची जरुरी मुळींच भासली नाहीं. वेस्टर्न एमिग्रेशन सोसायटी ही मोठमोठीं मैदानें ओलांडून कॅलिफोर्नियाला गेली; आयोवा प्रदेशांत ऑरेगॉन एमिग्रेशन सोसायटी स्थापन झाली. या अथवा दुसऱ्या कोणत्याहि सोसायट्या असोत, पहिल्यानें सुरक्षित व यशस्वी वसाहत करायची तर संघटना अवश्यच होती. सोन्यासाठीं कॅलिफोर्नियाला जाण्याची जी झुंबड उडाली त्या वेळीं स्थापन झालेल्या संघटनांनीं लिखित घटना, गणवेष, डॉक्टर्स, भूगर्भशास्त्रज्ञ, धर्मगुरु, खाणशास्त्रज्ञ, यंत्रशास्त्रज्ञ वगैरे अनेक तज्ज्ञांचा संच अशा सर्वांगपूर्ण संघटना बनविल्या होत्या.

आद्य अमेरिकन वसाहतवाल्यांचा स्वभाव जो दिसून येतो तो एकाद्या दणकट व्यक्तीच्या गर्वोक्तींत दिसून येत नसून, धान्यकोठारें बांधणें, गाद्या करणें,

अस्वलाची शिकार करणें, रस्ते बांधणें, धान्य सडणें इत्यादि असंख्य कामांत जें परस्परसहकार्य दिसून येई व येतें तो आद्यवसाहतवाल्यांचा स्वभाव होय. हीं सर्व कामें वास्तविक मोठी यातना देणारीं होतीं, पण परस्परसहकार्य ज्या प्रकारें करण्यांत आलें त्यामुळें तें कठिण कामहि करमणुकीसारखें झालें आणि त्याला सामाजिक संमेलनाचें स्वरूप येत गेलें.

युरोपांतून एकादा गटच्या गट जो येई तो बहुधा एका क्षेत्रांतच वसाहत करी, तेथें आपलीं चर्चेस, आपल्या सामाजिक संघटना, आपलीं वृत्तपत्रें, आपल्या सांस्कृतिक संस्था या सर्व तो गट या वसाहतींत निर्माण करीत असे. सहकार्यानें गट करून राहणें, एकमेकांस साहाय्य करणें हा ग्रामीण समाजाचा स्वभाव जगांत सर्वत्र आढळतो. तो येथें वसाहतीसाठीं येणाऱ्या युरोपीयांना अपरिचित नव्हता. कारण ते स्वदेशांत शेतकरी असून शेतींत एकमेकास मदत करीत व त्यांचे जे कांहीं थोडे आनंदाचे प्रसंग असत ते त्यांच्या परस्पर-सहकार्यांतून निर्माण होत.

१८८२ पर्यंत बहुतेक परदेशी लोक आले ते जर्मनी, स्कँडिनेव्हिआ व ब्रिटिश बेटें यांतूनच आले. पुष्कळसे इंग्लिश लोक मिसिसिपी दरींत गेले, व तेथें जर्मन संस्कृति वाढीस लागली असतां तेथली इंग्लिश संस्कृति टिकवून धरण्याला त्यांनीं विशेष साहाय्य केलें. १८९६ नंतर पूर्व व दक्षिण युरोपांतून इतके पुष्कळ लोक आले कीं त्यांनीं उत्तर युरोपांतल्या लोकांना मागें टाकलें व पहिल्या महायुद्धापूर्वींच्या दहा वर्षांत दक्षिण व-पूर्व-युरोपीयांचा महापूरच अमेरिकेंत आला. यांतले पुष्कळसे लोक युरोपांत जी सक्तीची लष्करभरती चालू होती ती चुकविण्यासाठीं आले. अमेरिका त्या काळीं युरोपपासून अलग राहू पाहत होती, म्हणून अमेरिकेंत सक्तीच्या लष्करभरतीचा प्रश्नच नव्हता.

## अमेरिकेंत येणारे परदेशीय

युरोपांतील लहान लहान खेड्यांतून अमेरिकेंत वसाहतीसाठीं आलेल्यांना प्रथम तें मोठें भीतिदायक वाटलें असेल. त्यांना इंग्रजी कळत नसे. प्रवासांत, बोटींत गर्दी व एकान्ताचा अभाव यामुळें त्यांचा स्वाभिमान दुखावला असेल. किनाऱ्यावर माणसें व सामान तपासणाऱ्या अधिकाऱ्यांनीं तपासणी करून त्यांची मुक्तता केल्यानंतर ते एका गोंधळून टाकणाऱ्या जगांत अवतरले. व्यापारी, जे स्वतः नुकतेच पूर्वीं परदेशाहून आलेले असतील ते, या नवीन आलेल्यांच्या गाद्या व जुने कपडे खरीदण्यासाठीं तेथें आले होते. 'फळें घ्या', 'ब्रेड घ्या', 'गाडी हवा

का?', 'मोलकरीण हवी का?' म्हणून विविध माणसें त्यांच्या मागें लागत. 'जमिनी खरेदी करा' म्हणणारे लोक त्यांच्या नाकापुढें निशाणें फडफडावून ओरडत. 'आमच्या बोर्डिंगांत या', 'आमच्या आगिनगाडींतून चला' असाहि तगादा कांहीं माणसें करीत.

अगदीं प्रारंभीं जे जर्मन व स्कॅंडिनेव्हियन वसाहतवाले आले त्यांनीं खास आपापल्या समाजांच्या वसाहती वसवल्या, यामुळें त्यांच्या मूळच्या देशांतलीं अनेक सामाजिक अंगें त्यांना तशींचीं तशीं पुन्हा निर्माण करतां आलीं. नुसतीं ग्रामीण खेडींच नव्हेत, तर अनेक सुखसोयींनीं व सांस्कृतिक साधनांनीं युक्त अशीं शहरेंहि त्यांनीं उभारलीं. १८५६ सालीं जर्मन भाषेंत छप्पन्न वृत्तपत्रें निघत होतीं. सिनसिनाटीमध्यें १८६०-७० सालांत जर्मन नाटकगृहांत रात्रीं सर्व प्रकारचीं नाटकें होत. सुमारें बारा चर्चेसमध्यें जर्मन भाषेंत प्रार्थना चाले. जर्मन धार्मिक शाळेंत जर्मन भाषेंत शिक्षण मिळे. पाठांतरें, व्याख्यानें, शारीरिक खेळांचे व संगीताचे सामने वगैरे कार्यक्रम सायंकाळीं करून सायंकाळ चांगली घालवीत. उन्हाळ्यांत सर्वजण वीर बागेंत बसत आणि आवडतीं पक्वान्नें व पेयें चाखून खेळ, नाच, गाणें इत्यादि प्रकारची मौज करीत. कमी-अधिक प्रकारांत युरोपांतून येणाऱ्या राष्ट्रांचे सारे गट आपलें स्वदेशांतलें सांस्कृतिक जीवन पुन्हा अमेरिकेंत निर्मीत असत. त्यांचे संगीत क्लब, विम्याचे गट, सहकारी संस्था, या पूर्वीच्या संघटना पुन्हा निर्माण होत.

त्यांचीं चर्चेस हीं त्यांची स्वदेशी संस्कृति व त्यांचा सनातनीपणा यांचे बालेकिल्ले होतीं, एवढेंच नव्हे तर आद्य ब्रिटिश वसाहतवाले प्यूरिटन असूनहि प्यूरिटन अथवा तापसी वृत्ति संभाळण्यालाहि चर्चचा त्यांना उपयोग होई. कारण धर्मगुरु हे देशांतराला नेहमीं तयार असून मोठे उत्साही, वागणुकींत कडक असे असत. परक्या मुलखांत, निर्जन मुलखांत जायचें यामुळें आपल्या स्वदेशी संस्कृतीला चिकटून राहणें हें त्यांना अत्यवश्यच वाटे. आपल्याच संस्कृतीला चिकटून राहण्याची गरज ही त्यांना इतकी महत्त्वाची वाटली कीं पोलिश, जर्मन व इटालियन पूर्वज असलेल्या रोमन कॅथॉलिकांनीं एकच कॅथॉलिक चर्चहि पत्करलें नाहीं. प्रत्येक गटानें आपलें चर्च वेगळें ठेवावें असा हट्ट धरला आणि अजून तें वेगळेंपण कायम आहे. चर्च हें ईश्वरी शक्तीला आळवणारें असल्यानें जुनी संस्कृति टिकविण्याचें तें अमोघ हत्यार होतें. परदेशांतून आलेलीं हीं माणसें मुळासकट उपटलीं जाऊन हजारों मैल दूर फेकलीं जात असल्यानें त्यांनीं सर्वस्व गमावलेलें असे व त्यांना एकत्र गुंफून स्थिर ठेवणारा कांहीं तरी समान बंध

हवा असे. पूर्वीच्या देशांत तो शेतकरी या नात्यानें अगदीं दरिद्री असला तरी त्याला एक सामाजिक दर्जा होता. पण आतां परदेशी मजूर या नात्यानें त्याला दर्जा कांहींच राहिला नाहीं. शेतकरी या नात्यानें त्याच्यावर जे संस्कार झाले होते त्यांनीं त्याला आपला दर्जा टिकविण्याला शिकवलें होतें, पण जीवनांत पुढें घुसण्याला, स्वस्थितीविरुद्ध बंड करण्याला शिकविलें नव्हतें. अमेरिकेनें, हे गुण शिकविले. कारण तेथें जो धूर्त आणि आक्रमणशील तोच यशस्वी होई.

या परदेशी माणसाजवळ स्वतःच्या श्रमशक्तीखेरीज कांहींच धन नसल्यानें तो मिळेल तें काम पत्करी. आपल्याच देशबांधवांच्या गटांत पुष्कळदां त्याला सामील व्हावें लागे. त्या गटाचा पुढारी साऱ्या गटासाठीं कंत्राटें मिळवी. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं परदेशी मजूर रेल्वे व इतर बांधकामाला मिळत इतकेंच नव्हे तर खाणी व कारखाने यांसाठींहि हे मजूर मिळत व लहान धंद्यांचे मोठे यंत्रप्रधान धंदे बनविण्यालाहि हे मदत करीत. परदेशी मजुरांमुळें अमेरिकन अर्थसंघटनेचें रूपांतर शेतीप्रधानतेंतून उद्योगप्रधानतेंत लवकर झालें.

या परदेशी लोकांचे पुढारी बहुधा राजकीय निर्वासित असत. त्यांना शिक्षण चांगलें मिळालेलें असून स्वदेशांतल्या जुलमापासून निसटून ते अमेरिकेस आलेले असत. आपल्या मूळ देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ते अटलांटिकच्या पश्चिमे-कडून चळवळ करीत आणि अनुकूल काळाची वाट पाहत राहत. अमेरिकेंतील या लोकांच्या वास्तव्यामुळें त्या लोकांचा विशिष्ट राष्ट्रवाद वाढता राहून अमेरिके-बद्दल त्यांना आपुलकी वाटूं लागण्याचा काळ लांबणीवर पडे. पण हे परदेशी पुढारी संपादक, शिक्षक व जमातनेते म्हणून फार चांगली कामगिरी करीत. राजकीय दृष्ट्या ते जागृत असल्यामुळें त्यांना आपला परदेशी गट व भोवतालचा इतर समाज यांच्यामध्यें भांडणें माजण्याचा धोका लक्षांत येई.

परदेशाहून आलेल्या या वसाहतवाल्यांना आपल्या जुन्या देशांतले देखावे आणि व्यवहार हे पुन्हा अनुभवायला मिळावे अशी ओढ लागलेली असे. ज्यांना या नव्या जगांत अतिश्रमाचें जीवन कंठावें लागे, अंधारलेले व गडगडाट करणारे कारखाने, गर्दीचीं घाणेरडीं घरें, यांना जे त्रासले, अमेरिका हें कांहीं गोड स्वप्न नव्हे अशी ज्यांना खात्री झाली अशांपैकीं कांहीं लोक स्वदेशीं परतहि गेले. पण बहुसंख्य लोक परत गेले नाहींत. तरुण व नवीन संधीचा फायदा घेण्याला समर्थ अशा धीर स्वभावाचे जे लोक होते त्यांना अमेरिका मोठी उत्साहजनक वाटली. १८४९ सालीं येथला एक नॉर्वेजिअन लिहितो : "येथें तुझा बाप कोण अथवा तो काय करतो हें कोणीहि विचारीत नाहीं. तुमचा

व्यवसाय काय एवढाच प्रश्न विचारला जातो. व्यक्तिस्वातंत्र्य हें येथें जीवनसत्त्व असून तें जणुं आईच्या दुधांतच मिळतें आणि श्वासोच्छ्वासाला हवेची जेवढी गरज आहे तेवढी येथें व्यक्तिस्वातंत्र्याची गरज व्यक्तीच्या अस्तित्वाला आहे, असें मानलें जातें असें दिसतें.''

परदेशांतून येथें आलेल्या लोकांना आपलें येथें स्वागत होत आहे असा अनुभव येतो. कारण त्यांच्या श्रमाला जशी येथें मजुरी मिळते त्याप्रमाणें गिऱ्हाईक म्हणूनहि येथल्या दुकानदारांना ते लोक हवे असतात. तसेंच त्यांना त्यांच्या पद्धतीप्रमाणें वागतां येतें, अमुकच पद्धतीनें वागा अशी त्यांच्यावर सक्ती होत नाहीं. तरीपण या प्रदेशांत आपुलकीनें आपण राहूं असें त्यांना वाटत नाहीं. आपल्या संस्कृतीपासून त्यांनीं स्वतःला राजीखुषीनें तोडून घेतलें. पण नव्या जगाबद्दलहि त्यांच्या मनांत परकीपणाच राहिला. आपण मुळासकट उन्मळून निघून अधांतरीं झालों ही जी जाणीव या परदेशीयांच्या मनांत डाचत राहिली तिचा अमेरिकन संस्कृतीवर फार परिणाम झाला आहे. परदेशांतून येथें आलेल्या माणसांना दोन्ही दिशांनीं ओढ लागे. पूर्वीच्या ग्रामीण जीवनांतला उबारा गेला याची त्यांच्या मनाला भुणभूण असे. पण अमेरिकन जीवनाची वस्तुस्थिति पाहिल्यावर 'त्या ग्रामीण जीवनाच्या पलीकडे आपण गेलों आहों' हेंहि त्याच्या लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. त्याच्या नैतिक मूल्यावर हल्ला होई व म्हणून त्यांचा बचाव तो करी. अमेरिकन पद्धतीप्रमाणें वागून जर आपण अमेरिकनांच्या अधिक चांगल्या मोहल्यांत राहायला गेलों तर 'इकडे तुम्ही येऊं नका' असें सांगून ते लोक थप्पड देतील अशीहि भीति त्यांना वाटे.

## सांस्कृतिक सात्म्य

अशा परिस्थितींत हा परदेशी माणूस भावी काळाबद्दलची भिस्त आपल्या मुलांबाळांवर ठेवी. पण त्यांतहि अडचणी होत्याच. हीं मुलें खास अमेरिकन झालीं. वडिलांनीं आपल्या पूर्वीच्या ग्रामीण संस्कृतीचें शिक्षण आपणांस द्यावें, जुनी ग्रामीण शिस्त आपणावर लादावी याचा त्या मुलांना राग येई. इंग्लिश पूर्वज व इंग्लिश संस्कृति असलेल्यांना शाळेंत मान मिळतो असें त्यांना आढळलें. उलट आपल्या वडिलांच्या देशाच्या संस्कृतीला लोक नांवें ठेवतात असें मुलांना क्रीडांगणावर आढळलें. म्हणून इतर सर्व तरुणांप्रमाणें आपणहि अमेरिकन झालें पाहिजे असें त्या मुलांना मोठ्या ईर्ष्येनें वाटूं लागलें, त्यांचीं वडील माणसें जुन्या जीवनाला चिकटून राहिलीं तींहि त्या जीवनाच्या प्रेमानें नव्हे तर त्यांना दुसरें

जीवन माहीतच नव्हतें म्हणून. दुसऱ्या पिढीनें ती जुनी राहणी सोडून दिली. तिसऱ्या पिढीला शिक्षण अधिक चांगलें मिळालें, वडिलांच्यापेक्षां अधिक चांगली सामाजिक व आर्थिक परिस्थिति मिळाली. जुन्या वाडवडिलांच्या ग्रामीण जीवनाचा त्यांच्या ठिकाणीं मागमूसहि न राहतां ही तिसरी पिढी संपूर्ण अमेरिकन झाली.

आपला अमेरिकन म्हणून स्वीकार होऊन आपणाला अधिक मान मिळेल या आशेनें हे तरुण अमेरिकन राष्ट्रवादाचा पुरस्कार करूं लागले. अमेरिकन तरुणांत जो राष्ट्रवाद परकी लोकांना दिसून येतो त्याचा उगम यांत आहे. आपल्या पूर्वजांच्या देशाबद्दल आपला जो तिरस्कार होतो व आपणांस जें पक्षपातानें वागविलें जातें तें टाळण्यासाठीं या तरुणांनीं आपल्या टोळयाहि बनवल्या होत्या. त्यांतल्या कांहीं लवकरच गुंडगिरी, गुन्हेगारी करणाऱ्या टोळ्या झाल्या. अंगांतल्या मस्तीखेरीज दुसरी कोणतीच विशेष अनुकूलता नाहीं, आणि अमेरिकेंत यशस्वितेला मान मिळतो हें पाहून यश मिळविण्याची अंगीं आलेली ईर्ष्या, यामुळें मस्तवाल लोकांनाच जेथें वाव आणि भाव मिळतो अशा राजकारणाच्या सरहद्दीवर हे लोक वावरूं लागले. दुसरे कांहीं तरुण अधिक न्याय्य मार्गानें, म्हणजे खेळांतील प्रावीण्यानें सामाजिक उच्च दर्जाला पोंचले. इतके कीं ज्या पोलिश नांवांवर पूर्वी उच्चारहि न करण्यासारख्या विनोदी कोट्या केल्या जात त्या नांवांचे पोलिश तरुण उत्तम खेळाडू होतांच त्यांचीं नांवें आदरणीय व प्रमाणभूत मानलीं जाऊं लागलीं. याहून अधिक चांगल्या मनांच्या तरुणांनीं शिक्षणाच्या सोयींचा फायदा घेऊन ते बौद्धिक व्यवसायांत शिरले व तिकडून मान्यता पावले.

वडिलांचा परदेशीपणा टाकून दिल्यावर या तरुणांना स्वतंत्र विवाहाची आतुरता उत्पन्न झाली. कारण त्यामुळें जुने कौटुंबिक बंध तोडून टाकून आपलें खास स्वतःचें, खास अमेरिकन घर उभारतां येईल अशी त्यांना आशा वाटली. प्रीति ही मुक्तीचें चिह्न झाली, पूर्ण अमेरिकन होण्याची शेवटची पायरी ठरली. वाढलेल्या मोठ्या कुटुंबाऐवजीं परस्परांवर प्रीति करणाऱ्या माणसांचें दांपत्य हाच कुटुंबाचा पाया ठरला.

जुन्या पिढीपासून नवी पिढी अशा प्रकारें तुटून निघणें हा प्रकार दुःखदायक खराच; परदेशांत जन्मून अमेरिकेस आलेले आईबाप आणि त्यांचीं अमेरिकेंत जन्मलेलीं लेकरें यांची ही ताटातूट त्यांची त्यांना फारच दुःखद झाली. त्यांना दारिद्र्य आलें. मद्यपान, जुगार, गुन्हेगारी, वेड या गोष्टींनाहि हीं माणसें बळी पडलीं. पण अशा एका अपयशाबरोबर दहा यशेंहि त्यांना मिळत होतीं. आणि एकंदरीनें परदेशी लोक अमेरिकन जीवनाशीं सात्म्य पावत गेले. ही गोष्ट लक्षांत

येण्यासाठीं ब्राझिल व न्यू साउथ वेल्समध्यें गेलेले जर्मन्स आणि अमेरिकेंत गेलेले जर्मन्स यांची तुलना करणें योग्य होईल. ब्राझिलमध्यें गेलेले जर्मन अजून जर्मन भाषाच बोलतात, मनानें ते जर्मन आहेत व जर्मनांनाच ते निवडून देतात. न्यू साउथ वेल्समधील जर्मन्स हे मिसूरींतल्या जर्मनांपेक्षां अधिक जर्मन राहिले आहेत. असें कां व्हावें ?

जॉन डिफरारीची कथा विचारांत घ्या. तो नऊ वर्षें वयाचा असतां बोस्टनच्या रस्त्यांत हिंडून फळें विकीत असे. जॉनचा बाप इटालींतून आला होता. त्याला आठ मुलें पोसायचीं असून जॉन हा सर्वांत मोठा होता. बोस्टनच्या बड्या भांडवलदारांच्या कचेऱ्या स्टेट स्ट्रीटच्या आसपास असून तेथेंच आपणाला उत्तम गिऱ्हाईक मिळेल हें त्याला माहीत होतें. टोपलीभर फळें विकलीं कीं तो घरीं येऊन बापाला पैसे देई. आठव्या इयत्तेनंतर त्यानें शाळा सोडली, पण अभ्यास चालू ठेवला. स्टेट स्ट्रीटमध्यें जे लोक आपलीं फळें घेतात ते धंद्यांत भांडवल गुंतवून खूप पैसा कमावतात हें त्याला ठाऊक होतें. हा धंदा ते कसा करतात हें जाणून घेण्यासाठीं त्यानें सार्वजनिक ग्रंथालयांतून पुस्तकें घेतलीं व वाचलीं. रस्तोरस्तीं फिरून फळें विकणें त्यानें चालूच ठेवलें. सोळाव्या वर्षी एक घोडा व वॅगन तो खरेदी करूं शकला. तीन वर्षांनीं फनील हॉल्जवळ त्यानें घाऊक फळविक्रीदुकान सुरू केलें. करारांत सामील होण्याला कायद्यानें अवश्य असें त्याचें वय झालें नव्हतें, म्हणून त्यानें दारावर बापाचें नांव घालून जोरांत धंदा सुरू केला. १८९० सालीं सार्वजनिक ग्रंथालयाशेजारीं बोल्स्टन स्ट्रीटवर त्यानें एक मोठें दुकान उघडलें. फळांचा धंदा, भांडवल गुंतविणें, इमारती, कायदा, कर्तबगार लोकांचीं चरित्रें इत्यादि विषयांवरील ग्रंथ तो रात्रीं ग्रंथालयांतून आणून वाचीत असे. निरनिराळ्या तऱ्हांचीं फळें परठिकाणांहून आणून व तीं हॉटेलें, जहाजें, सुखवस्तु लोक यांना विकून पैसा कमवायचा असें त्यानें ठरविलें.

धंद्यांत पैसे गुंतवितां येतील इतका पैसा त्याच्याजवळ जमा झाला होता. तोंपर्यंत त्याच्या वाचनानें त्याला कांहीं ठाम अनुमानें बांधतां आलीं होतीं. एक अनुमान असें कीं, ज्या धंद्यांतल्या धंदेवाल्यांनीं आरंभापासून धंदा सुरू करून तो बरकतीला आणला अशा धंद्यांतच पैसा गुंतवावा. "धंदेवाला शहाजोग असला तर धंदाहि शहाजोग असतो," असा त्याचा सिद्धान्त होता. दुसरें अनुमान असें होतें कीं जमीन व इमारती यांत गुंतविलेला पैसा हाच सुरक्षित होय. त्यानें लहान लहान घरें घेऊन व तीं भाडेकऱ्यांच्या सोईचीं करून भाड्यानें देण्यास सुरुवात केली.

वयाच्या ८० व्या वर्षी जॉन डिफरारी हा चाळीस लाख डॉलरचा धनी झाला होता. आपण कांहीं अमर नाहीं हें लक्षांत घेऊन त्यानें आपल्या पैशाचें काय करावें याचा विचार सुरू केला. तो ग्रंथालयांत गेला व अशा परिस्थितींत इतर माणसें कशीं वागलीं याचें त्यानें संशोधन केलें. पण त्याचें कशानेंच समाधान होईना. बोस्टनमधील तरुणासाठीं, आपल्यासारख्याच पराक्रमी तरुणांसाठीं आपण कांहीं तरी करावें अशी त्याला इच्छा होती. त्यानें ज्या अनेक बँकांत आपले पैसे विभागून ठेवले होते त्या बँकांकडे सावधपणें चौकशी केली. हा साधा म्हातारा माणूस लखोपति आहे हें कोणासच माहीत नव्हतें. पुढें त्याला एक ट्रस्ट ऑफिसर भेटला, तो जॉनला चांगला माणूस वाटला व जॉननें त्याच्याजवळ आपली इच्छा व्यक्त केली. जॉन म्हणाला, "माझ्याजवळ जें आहे तें मला बोस्टननें दिलें आहे. बोस्टनच्या गरीब तरुणांसाठीं मला कांहीं तरी करायचें आहे. माणसांना आपल्या वेळेचा चांगला उपयोग करण्याचें शिक्षण मी देऊं इच्छितों."

ज्या ग्रंथालयानें जॉनला बौद्धिक साहाय्य केलें होतें त्या ग्रंथालयास जॉन डिफरारीनें १० लक्ष डॉलर दिले. हा पैसा गुंतवून त्याचे वीस लक्ष झाले म्हणजे त्यांतला निम्मा पैसा इमारतीसाठीं खर्चून तिला 'डिफरारी विंग' असें नांव द्यायचें आणि त्यानंतर पुन्हा वीस लक्ष झाल्यावर ट्रस्टींनीं तो पैसा आपल्या इच्छेप्रमाणें खर्चायचा अशी जॉननें व्यवस्था केली. आपल्या पैशाची अशी देणगी देऊन टाकल्यानंतर, एका परदेशी कुटुंबांतला स्वतःच्या कर्तबगारीवर पुढें आलेला हा मुलगा आपल्या अनेक घरांतल्या एका साध्या लहानशा खोलींत जाऊन राहिला. आपला पत्ताहि त्यानें कुणाला दिला नाहीं.

जॉन डिफरारीला त्याच्या जीवनांत ज्या अडचणी आल्या त्या जशा बोधप्रद आहेत त्याप्रमाणें त्याच्या ठिकाणीं त्याचा अमेरिकेबद्दलचा अभिमान वाढवणारें त्याचें आर्थिक यश हेंहि बोधप्रद आहे. आपल्या वडिलांची काटकसरीची वागणूक त्यानें अंगीं बाणविली होती. कधीं एक पैहि त्यानें वायां खर्चली नाहीं. चालत जाणें शक्य असतां भाड्याची गाडी त्यानें केली नाहीं, मालमत्तेची दुरुस्ती तो स्वतः करी, आपला हिशेब आपण ठेवी, त्यानें टेलिफोन बाळगला नाहीं, पत्रें लिहिलीं नाहींत. आपलीं कामें तो स्वतः करी. तो आपला स्वैंपाक स्वतः करी. त्यानें कधीं आराम केला नाहीं. त्यानें लग्नहि केलें नाहीं.

विपुल नैसर्गिक साधनें व आर्थिक व्यवहाराची संधि यामुळें अमेरिकेंत यश येत असे. पण हें यश येण्यासाठीं इतका झगडा करावा लागे कीं इतक्या कष्टानें

मिळविलेला पैसा खर्चण्याची इच्छा त्या माणसांच्या ठिकाणीं राहतच नसे. परदेशांतून आलेल्यांची पिढी बेकारी व मंदी यांच्या भीतीनें गांजलेली असे म्हणून ती फार काटकसरीची होती. पुढल्या पिढींत पैसा खर्चण्याची प्रवृत्ति वाढली व लोकांनीं पैसा खर्चणें हेंहि एकंदर समाजाच्या आर्थिक हिताला अवश्य आहे हा सिद्धांत लोकांना कळूं लागला.

## एकजीवत्व आलें

पहिलें महायुद्ध संपल्यावर अनेक अमेरिकनांना कळून आलें कीं युरोपांतून अमेरिकेंत वसाहतीला येणाऱ्यांचा लोंढा थांबविला पाहिजे. एकूण लोकसंख्येंत एक अष्टमांश लोक परदेशीं जन्मलेले होते. पैकीं तीन चतुर्थांश शहरांत राहत होते. त्यांतले पुष्कळ जण शहरांतल्या गर्दीच्या गलिच्छ वस्तींत राहत व त्यांचीं मुलें तेथें गुन्हेगारीला बळी पडत.

पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेंत अनेक सामजिक प्रश्न उद्भवले. युद्धामुळें अमेरिकेंत स्वदेशाभिमानाची लाट उसळली. जगांत लोकशाही सुरक्षित करण्याची जी मोहीम अमेरिकेनें काढली ती निष्फळ झाल्यामुळें तिजबद्दल अमेरिकेचा भ्रमनिरास झाली. अमेरिकेला मंदीचीहि भीति वाटूं लागली. यामुळें अमेरिकनांनीं परदेशीयांच्या आयातीवर मर्यादा घालण्याचें ठरविलें. १९२१ व १९२४ सालीं कॉंग्रेसनें कायदे करून मर्यादा घातल्या. १९२९ सालीं कोणत्या राष्ट्राचीं किती माणसें येऊं द्यायचीं याचें प्रमाण ठरून अमलांत आलें. त्यांत ब्रिटिश बेटें व उत्तर युरोप यांना अधिक सवलती मिळाल्या. दरसाल फक्त दीड लक्ष माणसें येऊं द्यायचीं असें ठरलें होतें. पण प्रत्यक्ष आलीं तीं माणसें अधिकच आलीं. कारण परदेशांतून नवीन येणाऱ्यांचीं मुलें आधींच आलीं होतीं.

या वेळेपर्यंत अमेरिकेंतील लोकसंख्येचा साचा वांशिक दृष्ट्या फार गुंतागुंतीचा झाला होता. न्यू इंग्लंड हें मोठें औद्योगिक उत्पादनाचें क्षेत्र असून परदेशांतून नवीन आलेले लोक येथें बहुतेक मजूर होत. नवीन येणारे आयरिश, फ्रेंच कॅनडिअन्स, पोल्स अथवा इटालिअन्स हे नोकऱ्या मिळवीत, याचा जुन्या वसाहतवाल्यांना हेवा वाटे. पण या नव्या लोकांना रोजगार चटकन् मिळे. कारण दुसऱ्या कुणालाहि नको असणारे रोजगार ते तत्परतेनें स्वीकारीत. आजसुद्धां मॅसॅच्युसेट्समध्यें प्रत्येक पांचांपैकीं एक जण विदेशी आहे. ऱ्होड आयलंडची ७५ टक्के लोकसंख्या स्वतः परदेशांतून आलेली अथवा आईबाप

परदेशांतून आलेली अशी आहे. सर्व वंशांचीं मुलें शाळांत एकत्र शिकतात. पण लग्नें वांशिक गटांतच होतात.

मिडल अटलांटिक राज्यें म्हणजे अटलांटिकचा किनारा व पश्चिमेकडील धान्य-शेतीचे मुलूख यांच्यामधील राज्यें व्यापारांत फार पुढें आलीं. पश्चिमेकडे जल-वाहतूक शक्य झाल्यानें मिशिगन व मिनेसोटा येथून अवजड माल न्यूयॉर्कला पाठविणें सोपें झालें. त्या भागांत दुधाचा धंदा व फळबागा पुष्कळ होत्या. तरी पण त्यांत शहरें बरींच होतीं. म्हणून परदेशांतून आलेले पुष्कळ कामगार येथें खपले. तेथें वंशविविधता खूप झाली.

विस्कॉन्सिनची पहिली वसाहत न्यू इंग्लंडर्सनीं केली. पुढें जर्मन्स १८४८ मध्यें आले. त्यांनीं बरीच कारागिरी आणली. आजहि विस्कॉन्सिनच्या अर्थ-संघटनेचा ही कारागिरी हा महत्त्वाचा भाग आहे. मिल्वाकी हें दारूभट्टयांसाठीं प्रसिद्ध आहे. नॉर्वेजिअन्स, पोल्स, फिन्स, डेन्स यांनींहि येथें वस्ती केली. उत्तर भागांतील मध्यप्रदेशांत सपाट मैदानें असून तो सर्व सरोवरांचा व सुपीक शेतजमिनींचा मुलूख आहे. तिथें धान्य, मोटारी, शेतीचीं यंत्रें, कच्चें लोखंड इत्यादि उत्पादन होतें. या उत्पादनांत रोजगारी मिळण्याच्या आशेनें आयरिश, जर्मन, पोलिश, झेक, इटालिअन, व या सर्वांपेक्षां अधिक स्कॅंडिनेव्हिअन लोक त्या प्रदेशांत आले. स्टॅस्सेन, स्टीनवे, वुर्लिट्झर, ऐसेनॉर, रॉकफेलर, वीरहॉसर, क्रिस्लर, हीन्झ, मर्क वगैरे नांवांवरून येथें आलेल्या जर्मन लोकांच्या मुलांनीं व नातवंडांनीं अमेरिकन जीवनांत केवढी उच्च कामगिरी बजावली आहे हें कळून येतें.

ग्रेट सेंट्रल प्लेन्स हा प्रदेश जगांतील सर्वांत लांब अशी जी मिसिसिपी नदी तिच्यापलीकडे असून तो अजून पुष्कळसा खुला आहे. या जमिनीचा पुष्कळसा भाग अजून फक्त गुरचरणायोग्यच असल्यानें एका माणसाला चरितार्थाला दोन हजार एकर जमीन लागते. यामुळें त्या भागांत वस्ती अगदीं विरळ असून जुन्या सरहद्दप्रदेशाचा हा अवशेष आहे. येथें महापूर, बर्फाचीं वादळें, अवर्षणें वगैरे उपद्रव खूप होतो. या भागांत धातुमिश्र दगड व तेलेंहि निघतात. अलीकडे येथें परदेशी वसाहतवाले कमी आले. तरी पण नेब्रास्का येथें ११ टक्के झेक-वस्ती असून विस्कॉन्सिनखेरीज नेब्रास्काइतकी जर्मन वस्ती कोठेंच नाहीं. कांहीं कौंटींत इंग्रजीइतकीच झेक भाषाहि रूढ आहे.

साउथ डाकोटांत ६ लक्ष ५० हजार लोकवस्ती असून त्यांतील १ लक्ष ४० हजार जर्मन वंशाची व ९० हजार स्कॅंडियन देशांतली आहे. उत्तर डाकोटा तर आणखी आश्चर्यकारक आहे. तेथल्या ४० टक्के लोकांचें मूलस्थान स्कॅंडिनेव्हिया

(बहुंशीं नॉर्वे) हें असून ३० टक्के जर्मन व 'व्होल्गा' जर्मन (म्हणजे मूलतः रशियन) आहेत. मॅटनांत ४६ टक्के लोक विदेशांत जन्मलेले अथवा ज्यांचे आई अथवा बाप अथवा दोन्ही परदेशांत जन्मले असे आहेत. त्यांत स्वीड्स, पोल्स, इटालिअन्स, युगोस्लाव्ह, कॉर्निशमेन, फिन्स, आयरिश इत्यादींचा समावेश होतो. बट्टे येथील खाणीकामगारांत चाळीस निरनिराळे वंश आहेत.

दक्षिण प्रदेश पुन्हा अगदींच वेगळा आहे. टेनेसी व्हॅली ऑथॉरिटीनें निर्मिलेल्या वीजशक्तीमुळें वाढल्या प्रमाणांत तेथें खूप नवे धंदे निघत आहेत. पण ज्या काळीं परदेशी वसाहतवाले फार मोठ्या प्रमाणावर अमेरिकेंत येत होते त्या काळीं हा प्रदेश शेतीप्रधान होता. दक्षिण प्रदेशांतला स्थानिक शेतकरीच त्या वेळीं मोठ्या मिनतवारीनें आपली गुजराण करीत असल्यानें परदेशी लोकांना तेथें फारसें आकर्षण नव्हतें. तेथील कापूस, साखर, तंबाखू, तांदूळ इत्यादि पिकें तिथें असलेले शेतकरी आपल्या शक्तीवर निघूं शकतील तेवढीं काढीत असत. दक्षिण भागांत प्रामुख्यानें ब्रिटिश व नीग्रो आणि फ्लोरिडांत ग्रीक कोळी होते. टेक्ससमध्यें मेक्सिकन वसाहती असून शिवाय अगदीं बव्हेरियाइतकी जर्मन वसाहत आहे. अशा एका जर्मन वसाहतीमधूनच ॲडमिरल चेस्टर निमिट्झ आला आहे.

पश्चिम किनारा उद्योगधंदे व शेती अशा दोन्ही प्रकारच्या उत्पादनानें समृद्ध होत आहे. तेथें इटालिअन्स, जपानीज्, चिनी, फिलिपिनोज्, मेक्सिकन्स, इंडिअन्स इतके वंश आहेत. दक्षिण कॅलिफोर्नियांत युरोपांतील हुकुमशाही राज्यांतून अथवा वाईट हवेच्या प्रदेशांतून अनेक सुशिक्षित वसाहतवाले आले आहेत.

याप्रमाणें अमेरिकेंत निरनिराळ्या प्रदेशांत निरनिराळें वांशिक मिश्रण असल्यानें जी सौंदर्ययुक्त प्रादेशिक विविधता अमेरिकारूपी वस्त्राच्या विणींत आली आहे तींतच अमेरिकेचें सामर्थ्यहि आहे. विस्तृत क्षेत्रावर पसरलेल्या या विविधतेची जाणीव अमेरिकनांना असल्यानें त्यांना या खंडप्राय देशाबद्दल आपुलकी वाटते व त्यामुळेंच अमेरिकन स्वभावांत थोडासा तुसडेपणा व घमेंडखोरपणाहि आला आहे.

१७९०त त्या वेळच्या अमेरिकेंत ९२ टक्के लोकसंख्या ब्रिटिश बेटांतून (यांत १·६ टक्के आयरिश) आलेली होती. हे लोक सोडले तर जर्मन्स (५·६ टक्के) व डच (२ टक्के) एवढेच परदेशी गट खास नोंद करण्याइतके मोठे होते. १९२० सालीं लोकसंख्याप्रमाण पुढीलप्रमाणें होतें. ग्रेट ब्रिटन (उत्तर आयर्लंडसह) ४१ टक्के; आयर ११ टक्के; जर्मनी १६ टक्के; पोलंड ४ टक्के; इटाली ४ टक्क्यांहून थोडे कमी; स्वीडन व नेदर्लंड्स प्रत्येकीं २ टक्के;

फ्रान्स, झेकोस्लोव्हाकिया, रशिया, नॉर्वे व स्वित्झर्लंड प्रत्येकीं १ व २ टक्क्यांचे दरम्यान; या मानवी मसाल्यांत इतर वंशांचे लोक १ टक्क्यांपेक्षांहि कमी होते.

पूर्वीप्रमाणेंच अलीकडेहि नवीन येणाऱ्यांना मूळच्या समाजाशीं एकरूप होण्याला फार अडचणी आल्या. पश्चिमेंत व नैर्ऋत्येंत आलेल्या मेक्सिकनांना व न्यूयॉर्कमध्यें आलेल्या पोर्टोरिकनांना (हे दोन्ही गट अमेरिका खंडांतलेच आहेत.) फार त्रास झाला. प्राप्ति कमी, आरोग्य कमी, इंग्रजीचें ज्ञान व संवय कमी, आणि म्हणून शिक्षणाचा अभाव यामुळें त्यांचा दर्जा उंचावूं शकेना. पण पूर्वीच्या नववसाहतवाल्यांप्रमाणें हे गटहि उन्नतीच्या शिडीवर चढतांना पहिल्यानें अपरिहार्य असे कष्ट सोशीत आहेत. थोड्या वर्षांपूर्वी एडवर्ड रॉमबल हा मेक्सिकन अमेरिकन लॉस एन्जलसमध्यें सिटी कौन्सिलच्या निवडणुकीस उभा राहिला. पण त्याचा सडकून पराभव झाला. तेव्हां आपल्या लोकांत राजकीय जागृति नाहीं हें लक्षांत येऊन त्यानें आपल्यासारखे वीस अनुभवी लोक मिळविले आणि ते व तेवढ्यांच्या बायका यांच्या साहाय्यानें त्यानें समाजसेवासंघ स्थापन केला. एका वर्षांत त्या संघांत आठशें कार्यकर्ते येऊन लोकसेवा करूं लागले. लोकांना जरूर अशा अनेक योजना हातीं घेऊन त्यांनीं फावल्या वेळांत समाजस्थिति सुधारण्यास सुरुवात केली. त्यानंतर रॉमबल जेव्हां पुन्हा निवडणुकीला उभा राहिला तेव्हां हजारों मेक्सिकन्स, ज्यांनीं पूर्वी कधीं मतदान केलेंच नव्हतें ते, मतें द्यायला आले व त्यांनीं त्याला मतें दिलीं. इतकेंच नव्हे तर ज्या अनेक 'अँग्लोज'नीं रॉमबलचें समाजसेवाकार्य पाहिलें होतें त्यांनींहि त्याला मतें दिलीं व प्रचंड मताधिक्यानें रॉमबल निवडून आला.

असेंच न्यूयॉर्कमध्यें पोर्टोरिकनांना मूळच्या समाजांत मिसळून जाणें सोपें व्हावें या दृष्टीनें साहाय्य करण्यांत येत आहे. प्रौढ माणसें 'वडील भावा'ची भूमिका घेऊन शाळेंतल्या मुलांना मदत करतात, इंग्रजीचे खास वर्ग चालवतात, सायंकाळचे प्रौढवर्ग चालवतात, गटागटांचे संबंध सुधारण्यासाठीं संघटना काढतात. अलीकडे संस्कृतींचे प्रकार भिन्नभिन्न असणें व त्यांच्या एकीकरणास वेळ लागणें हें अपरिहार्य आहे ही गोष्ट लोकांना चांगल्या प्रकारें पटली असल्यानें या नव्या गटाचें जुन्याशीं विलीनीकरण हें अधिक सोपें झालें आहे.

## जुनी व नवी संस्कृति

परदेशांतून येणाऱ्या वसाहतवाल्यांच्या मनोवृत्तीचा पहिल्यापहिल्यानें अमेरिकन संस्कृतीवर असा एक परिणाम होई कीं हीं माणसें ज्या ज्या

परदेशांतून येत त्या त्या परदेशांचा अभिमान हा अमेरिकन संस्कृतीचा एक भागच बने. पण पुढल्या पुढल्या पिढ्यांत पूर्वजांच्या राष्ट्रांच्या भानगडींत अमेरिकेनें गुंतू नये (अर्थात् त्यांच्याशीं युद्धहि करूं नये), ही वृत्ति वाढत गेली. अमेरिकेमध्यें पुढील काळांत जो अलगपणा (आयसोलेशनिझम्) वाढला त्याचें हें एक प्रमुख कारण होतें. पण अमेरिकनांचा दूरगामी दृष्टिकोन मात्र वेगळा आहे. जगांतलीं जीं राष्ट्रें आज अधिक चांगली राहणी व साम्राज्यवाद्यांच्या गुलामगिरींतून सुटका यांसाठीं झगडत आहेत, त्या राष्ट्रांतून अमेरिकेंत आलेल्या लोकांनींच अमेरिकेचें हल्लींचें सामर्थ्य उभारलें असल्यानें त्या पूर्वीच्या राष्ट्रांचें हित साधण्याची नैतिक जबाबदारी आपणावर आहे हा दृष्टिकोन अमेरिकेनें आतां स्वीकारला आहे. परदेशी लोक येथें वसाहतीस आले म्हणून रेल्वे, शहरें व सडका बांधण्यास जरूर ती मनुष्यशक्ति मिळाली. एका साध्या शेतीप्रधान अर्थसंघटनेला या मनुष्यशक्तीमुळें प्रचंड उद्योगप्रधान अर्थसंघटनेचें स्वरूप आलें. शेतींत पूर्वी वापरून वापरून नापीक केलेल्या जमिनी नवीन आलेल्या परदेशी लोकांनीं घेऊन पुन्हा सुपीक केल्या.

या नवीन अमेरिकनांनीं अन्नधान्याचें पीक वाढविलें इतकेंच नव्हे तर अन्न शिजविण्याच्या अमेरिकन प्रकारांत अधिक विविधता आणली. स्पाघेटी, गौलाश, व्हील कटलेट, चाउमीन, करी, शिस्काबॉब, स्कालोपिनी, पिझा, बोईलाबेस, चिली कॉन कार्ने, हीं व अशीं शंभर पक्वान्नें आतां अमेरिकेंत लोकप्रसिद्ध असून लोकांना आवडतात.

या परदेशी वसाहतवाल्यांनीं कलेच्या विकासाला खूप मदत केली आहे. मेलव्हिल, व्हिटमन, थोरो, फ्रीनॉ वगैरे आद्य लेखकांनीं इंग्रजीची इतर प्राचीन विचारांशीं जोड घातली. नीग्रोंनीं जाझ, पोर्जी व बेस इत्यादि संगीत प्रकारांची पुष्कळ भर घातली. आमच्यांतील कांहीं उत्तम गायक व लेखक नीग्रो आहेत. जर्मन व इटालियन जे आले त्यांच्याबरोबर त्यांची संगीताची आवड आली, त्यामुळें उत्तम गायक-वादक आणि रसिक श्रोतृसमाज आम्हांला मिळाला.

अमेरिकेंतील ज्यूंची कामगिरी फारच विस्तीर्ण क्षेत्रावर झाली आहे. तयार कपड्यांचा धंदा पुष्कळसा त्यांच्या हातीं असून रेडिओ, सिनेमा, वृत्तपत्रें येथपासून शास्त्रीय व कलात्मक जगांतील यशापर्यंत अमेरिकन ज्यूंनीं पुष्कळच कर्तृत्व गाजविलें आहे. स्ट्रॉस, गिंबेल, गग्गेनहीम, फ्रॉहमॅन, रोझेनवॉल्ड वगैरे घराण्यांचे अमेरिकेंतील मूळ संस्थापक मालाच्या पुड्या घरोघर विकीत असत. त्यांनीं मुळींच भांडवल न घालतां मोठमोठ्या दौलती केल्या. ज्या हजारों ज्यूंनीं

अमेरिकन जीवन संपन्न केलें त्यांत सुप्रीम कोर्ट जजेस्, नोबेल बक्षिस मिळविणारे उत्तम नट, उत्तम गायक, लोकप्रिय संगीत-लेखक, नाट्यलेखक, सिनेमा जगांतील पुढारी, सरकारी अधिकारी, औद्योगिक पुढारी इत्यादींचा समावेश होतो.

सौंदर्यपूर्ण विविधता हा जो परिणाम अमेरिकन जीवनावर घडलेला दिसतो त्याचें कारण अनेक राष्ट्रांतून परदेशी लोक वसाहतीसाठीं येथें आले हें होय. न्यू इंग्लंड भागांत व दक्षिणेंतील डोंगरी भागांत अजूनहि फक्त मूळचे ब्रिटिश असणारे लोक राहतात. पण त्यांच्या वसाहतींनाहि एक विशिष्ट सौंदर्य आलें आहे. कारण यांच्यासारखी बिनमिसळीची अशी वसाहत क्वचितच आढळते. न्यू मेक्सिकोंतील हिस्पॅनो-अमेरिकन, चायनाटाउन्स, लिट्ल् टोकिओज्, दि इटलीज् इत्यादि या वसाहती अशाच प्रत्येकीं एकजिनसी पण अगदीं अपवादात्मक आहेत. सरसकट नमुन्याची अमेरिकन वसाहत घेतली तर तेथें दहाबारा परकी राष्ट्रांच्या पार्श्वभूमीचे लोक आढळतातच.

व्हरमॉट राज्यांतील एक लहान शहर बेनिंग्टन यांतील मेनस्ट्रीटकडे पाहा. निरनिराळीं सुंदर फळें आणि भाजलेला खाण्याचा माल विकणारे बाजार ग्रीक लोकांचे आहेत. कोपरा वळून नॉर्थ स्ट्रीटला गेलांत तर तेथलीं दोन उत्तम हॉटेलें आणि शिप्याचें दुकान ग्रीकच आहे. बूट-जोडे दुरुस्त करण्याचें एक दुकान एक इटॅलिअन कुटुंब चालवितें. भांडीं, औषधें, कपडे इत्यादि दुकानें ज्यूंचीं आहेत. सिगारचें दुकान सिसिलिअनाचें आहे. न्यू इंग्लंडमधले मूळचे वसाहतवाले जे इंग्रज त्यांचीं नांवें यांत मधून मधून आढळतातच. एक उत्तम मार्केट सिरिअनांनीं चालविलें आहे. वाणसौद्याच्या दुकानासारखे लहानसान धंदे फ्रेंच कॅनडिअन्स करतात. डच पूर्वज असलेल्या एका अमेरिकन कुटुंबाचा एक छापखाना आहे. वकिलांत अगोस्तिनी, लेविन, मॉरिस्से हीं नांवें आढळतात तशींच बार्बर, होल्डन हींहि नांवें आढळतात. यांपैकीं कित्येक कुटुंबें व्हरमॉटला कित्येक पिढ्या राहिलीं आहेत, कांहीं नुकतींच आलेलीं आहेत. अमेरिकेंत येण्यापूर्वीं आपसांत शतकानुशतकें लढलेलीं माणसें या देशांत आल्यावर गुण्यागोविंदानें राहिलीं आहेत, हें यश कांहीं लहानसान नव्हे.

हें सर्व घडवून आणण्याच्या प्रयत्नांत त्या त्या जमातींचे उत्सव, वांशिक गटांच्या संघटना, त्यांच्या त्यांच्या भाषांचे वर्ग, त्यांचीं वेगवेगळीं चर्चेस, या सर्व भिन्नतेला उत्तेजन द्यावें कीं सर्वांच्या भिन्न संस्कृतींचा एक रांधा करावा याचें उत्तर अजून आम्हांला मिळालेलें नाहीं. अमेरिकेंतील भिन्न भिन्न गटांच्या जुन्या जगाचीं वैशिष्ट्यें टिकविणें चांगलें कीं त्यांची भिन्नता नष्ट करणेंच चांगलें ?

बहुतेला (प्लूरॅलिटी) मान्यता द्यायची आणि अनुभव लक्षांत घेऊन वागायचें. (प्रॅग्मॅटिझम्) ही जी आमची रीत तीमुळें आम्ही कदाचित् दोन्ही प्रकारांनीं वागलों आहों. मिशिगन व पेला येथील डच लोकांचा ट्युलिप फुलांचा उत्सव संपला कीं ते लोक पुन्हा अमेरिकनासारखे वागूं लागतात. फ्लोरिडांतील टारपन स्प्रिंग्जवर ग्रीक लोकांचा 'ब्लेसिंग दि वॉटर्स' हा समारंभ असतो. पण समुद्रांतून क्रॉस बाहेर काढला कीं लोक तो उत्सव विसरून टी. व्ही., रोटरी क्लब वगैरे नेहमींच्या गोष्टींकडे वळतात. पूर्वीं स्थापलेल्या इटालो-अमेरिकन, पोलिश-अमेरिकन वगैरे संघटना, दुसऱ्या-तिसऱ्या पिढीचीं माणसें सिटी कौन्सिल सभासद झालीं अथवा अनेक सिव्हिक बोर्डांचीं सभासद झालीं कीं, मोडकळीस येऊन नाहींशा होतात. कारण लोकांना आपल्या भिन्नतेचा विसरच पडतो. भाषिक फरक नष्ट झाले तरी धार्मिक फरक मात्र कायम राहतात.

अमेरिकेंत नव्यानें आलेल्या परदेशी माणसाला अनेक संकटें व दुर्ग्रह यांजशीं झगडावें लागतें हें खरें, पण या आव्हानामुळेंच त्याला पराक्रम करून यश मिळवितां आलें आहे. स्वतांच परदेशांत येऊन जे येथें मोठे झाले अथवा ज्या मोठ्या लोकांचे आईबाप परदेशी होते अशांची यादी फार मोठी असून तीवरून हेंच सिद्ध होतें. ज्युलिअस लेह्मन याची गोष्ट प्रातिनिधिक आहे. तो तरुण असतांच बोहेमियांतून आला. तो न्यूयॉर्कमध्यें आला व तेथें नोकरी करून त्यानें अभ्यास केला. त्याचा विवाह होऊन त्यानें तीन पिढ्या पाहिल्या. तो फारसा श्रीमान् झाला नाहीं, पण सुखवस्तु राहिला. ९२व्या वर्षीं तो वारला. त्यानें दोन मोठ्या देणग्या दिल्या. १ हजार डॉलर त्यानें जर्मनींतल्या आपल्या आई-बापांच्या थडग्याची व्यवस्था ठेवण्यासाठीं दिले. बाकीचे ६० हजार डॉलर "अमेरिकन नागरिक या नात्यानें मी व माझी पत्नी यांचेवर अमेरिकन सरकारनें जे उपकार केले त्याबद्दल कृतज्ञतेचें द्योतक" म्हणून त्यानें अमेरिकन सरकारला देऊन टाकले.

## प्रकरण चवथें

# भाषा

शेक्सपीअरनंतर इंग्रजी भाषेला जर कधीं जिवंतपणा आला असेल तर तो अमेरिकन प्रजासत्ताकाच्या आरंभींच्या दिवसांत आला होता. १६०७ सालीं पहिले इंग्रज वसाहतवाले जेम्सटाउनला आले त्यावेळीं त्यांना प्राणी, वनस्पती, अन्नपदार्थ इत्यादि सर्व नवीन पाहायला मिळालें. त्या इंग्रजांनीं त्या काळीं इंडिअन लोकांचे शब्द जसेचे तसे उचलले व नंतर 'कॅनो', 'हॉमिनी', 'मोकॅसिन', 'सॅचेम', 'टोमॉहॉक', 'स्क्वॉ' इत्यादि शब्द मूळचे इंडिअन असूनहि अमेरिकन इंग्लिशमध्यें आतां रूढ झाले आहेत. नव्या परिस्थितीशीं झगडून तीवर ताबा मिळविण्याचें सामर्थ्य व कर्तृत्व ज्यांच्यांत होतें त्यांच्या अंगीं नव्या भाषेशीं जमतें घेण्याचेंहि सामर्थ्य होतें. नवीन वसाहतवाल्यांपुढें निसर्ग विपुल होता पण त्याच्याशीं झगडायचेंहि पुष्कळ होतें. ही नवी परिस्थिति व नवे झगडे यांबरोबरच नवे शब्द पुष्कळ निर्माण झाले. एलिझबेथच्या काळांत स्वतः इंग्लंडनें अनेक नवीन शब्द इंग्रजी भाषेंत आणले होते, पण इंग्लंडलाच याचा विसर पडला. आणि अमेरिकेंत आलेल्या इंग्रजांनीं 'ऑपोज', 'प्रोग्रेस', 'ऑब्लिटरेट', 'इमिग्रेट', 'लोकेट' वगैरे नवीं क्रियापदें बनविलीं तेव्हां अमेरिकेंत गेलेले हे इंग्रज अत्याचारी आहेत असा आरोप त्यांच्यावर इंग्लंडांतून करण्यांत येऊं लागला. 'इन्फ्ल्यु-एन्शल', 'रिलायेबल' इत्यादि नवे शब्द पाहून इंग्रज इतके चवताळले कीं त्यांच्या राजाला कुणीं शिव्या तर दिल्या नसतील ना अशी शंका एकाद्याला आली असती. अमेरिकनांनीं मात्र गरजेप्रमाणें भाषेंत बदल करीत राहून इंग्रजी भाषा अधिकाधिक जोमदार केली. शब्दांच्या मूळ अर्थांत नवीन अर्थ भरून अमेरिकनांनीं संवादांत जोर आणला. संक्षिप्त शब्द बनविण्याकडे अमेरिकनांचा विशेष कल असतो. 'फोन', 'को-एड', 'जिम्', 'मुव्ही', 'ऑटो' इ. हे असे शब्द होत.

एकादी गोष्ट चटकन् धाडधाड करणें हा अमेरिकन स्वभाव असून भाषाहि तशीच झाली आहे. भाषेंत नावीन्य, अधिक अर्थ व सुटसुटीतपणा आणणाऱ्यांना अधिक पगार मिळतो. टी. व्ही. व जाझ यांतून जे नवे शब्द येतात ते लहान मुलांना भराभर पाठ होतात. अमेरिकन इंग्रजींत जो साधेपणा व रंगदारपणा आला आहे तो इंग्रजी न येणाऱ्या परदेशीयांनीं आपले शब्द वापरून, मूळच्या शब्दांचे ढोबळ अर्थ करून जी भाषा केली तीमुळें आला आहे. इंडिअन, डच, फ्रेंच, जर्मन, आयरिश वगैरे अनेक भाषांनीं इंग्रजीला मारझोड खूप केली आहे. जुने हल्ले परतवून लावावे तों नवे येत. यामुळें हजारों परदेशी शब्द इंग्रजींत घुसले. परंपराप्रेमी माणसांना ही नवी भाषा फारच अस्थिर व प्रवाही आणि सारे नियम झुगारून देणारी वाटते. पण ही नवी भाषा जोमदार, आनंददायी, कदाचित् अमेरिकनांच्या अत्युत्साहीपणाची थोडीशी थट्टा करणारीहि आहे. अमेरिकन भाषा ही सर्वांना सपाट करणारी आहे. ती समता मानते, उच्चनीचता मानीत नाहीं. अमेरिकेच्या अध्यक्षालाहि फक्त 'मिस्टर' म्हणतील अथवा नुसतें 'आइक'च म्हणतील. अमेरिकनांना खेळ आवडतात व खेळांतली भाषा आणि मनोवृत्ति ते व्यवहारांत आणतात.

## भाषण इंग्रजी संभाषण : अमेरिकन

सुशिक्षित अमेरिकन जें इंग्रजी बोलतो तें अगदीं इंग्रजांचें इंग्रजी असतें; पण कमी शिकलेल्या अमेरिकनांचे शब्द, त्यांचें व्याकरण, त्यांची वाक्यरचना सारें स्वतंत्र आहे. शास्त्रीय प्रमाणानें पाहतां ही भाषा अत्याचारी वाटते. पण तिचाहि एक अंगभूत जोम आहे. शाळेंत मुलें शास्त्रोक्त इंग्रजी शिकतात व बोलतात. घरीं आल्यावर घरांतली रूढ घरगुती भाषा बोलतात.

अमेरिकेंत तीन उपभाषा अथवा लोकभाषा मानलेल्या आहेत : (१) ईस्टर्न (न्यू इंग्लंड व न्यू यॉर्कचा कांहीं भाग), (२) सदर्न (पेन्सिल्व्हानिया व ओहिओ नदी यांच्या दक्षिणेस) आणि (३) वेस्टर्न अथवा सर्वसामान्य अमेरिकन. ओझार्क्समध्यें अथवा न्यू इंग्लंडमधील डोंगरी खेड्यांत तशाच इतरत्रहि अनेक उपभाषा आहेत. न्यूयॉर्कमध्यें जागोजाग भाषेंत फरक असून एकादा तज्ज्ञ माणूस एकाद्याच्या नुसत्या उच्चारांवरून न्यूयॉर्कच्या कोणत्या मोहल्ल्यांतून माणूस आला हें सांगू शकेल. ब्रुक्लिनमध्यें शब्दांवर जो जोर दिला जातो तो राष्ट्रीय विनोदाचा विषय झालेला आहे. सुमारें तीन चतुर्थांश लोकसंख्या 'जनरल अमेरिकन' भाषा बोलते. या उपभाषेंत स्थानपरत्वें फरक पुष्कळ आहेत. (दक्षिणेंतील लोक

'आर्' चा उच्चारच करीत नाहींत.) शब्दांच्या उच्चारावरून जसें माणसें कोणत्या प्रदेशांतलीं हें ओळखतां येतें तसाच माणसें शब्द कोणते निवडतात त्यावरूनहि त्यांचा प्रदेश ओळखतां येतो. इंग्रजांपेक्षां अमेरिकन (पूर्व व दक्षिण प्रदेश सोडून) लोक अधिक स्पष्ट इंग्रजी बोलतात.

आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठीं मात्र इंग्रज व अमेरिकन्स आपली भाषा एकच आहे असें खास मानूं शकतील. ब्रिटिश कॉमनवेल्थ, अमेरिका व त्यांच्याशीं संबद्ध असलेले इतर देश, आणि ज्या देशांत व्यापार, परराष्ट्रसंबंध इत्यादिसाठीं इंग्रजी हीच भाषा चालते असे देश या सर्वांत इंग्रजी चालत असल्यामुळें हीं सर्व राष्ट्रें मिळून साऱ्या जगांत सर्वांत मोठा असा हा एकभाषी समाज होतो. अमेरिकन लोकांना इतर भाषा येत नाहींत त्याचें हें एक कारण आहे. त्या शिकण्याची त्यांना कधीं गरजच वाटलेली नाहीं. एक चमत्कारिक गोष्ट अशी आहे कीं स्वदेशांत इतक्या अनेक परभाषा बोलल्या जाणारा अमेरिकेसारखा दुसरा देशच नाहीं. पण आम्ही असें धरूनच चालतों कीं परदेशांतून अमेरिकेंत वसाहतीला येणाऱ्यांचें कर्तव्य इंग्रजी शिकणें हें आहे, आम्ही त्यांच्या भाषा शिकणार नाहीं.

इंग्रजीच्या अडचणी अनंत आहेत. स्पेलिंग जवळजवळ अशक्य कोटींतलेंच आहे. कारण स्वरांचे जे आठ लांब उच्चार आहेत त्यांचें स्पेलिंग निरनिराळया सहासष्ट प्रकारांनीं करतां येतें. ough या अवयवाचा उच्चार पांचसहा प्रकारांनीं करतात. अनेक शब्दांना परस्परविरुद्ध अर्थ आहेत. कांहीं म्हणींचा अर्थबोधच होत नाहीं. तरीपण इंग्रजीला व्याकरण कमी, शब्द इतर कोणत्याहि भाषेपेक्षां छोटे आहेत. या भाषेंत निष्णातत्व मिळविण्याला कदाचित् सारें आयुष्य लागेल. पण कामचलाऊ ज्ञान मिळविण्याला फार थोडा काळ लागतो.

## भाषा हें हत्यार

लोक इंग्रजी शिकण्यांत खूप हौसेनें लक्ष घालतात. सामान्य लोकांना या विषयांत जेवढी आस्था वाटते तेवढीच शास्त्रज्ञांनाहि वाटते. विद्यापीठांतून इंग्रजी बोलायला शिकविण्याचीं स्वतंत्र खातीं निघालीं आहेत. हा इंग्रजी बोलण्याला शिकण्याचा हव्यास अनेक क्षेत्रांत शिरला आहे. नाटक, सिनेमा व टी. व्ही.-वरील नाटकें, सार्वजनिक सभा, चर्चा-सभा, जाहिराती, इत्यादि द्वारा भाषणाचा अभ्यास केला जातो. बोलण्यांतल्या विविध प्रकारांचा अभ्यास केला जातो. दुसऱ्याचें मन वळविणें, स्नेहसंबंध ठेवणें इत्यादि सर्व प्रकारांनीं इंग्रजी बोलण्याचा

व्यासंग वाढविला जात आहे. कांहीं कॉलेजांत इंग्रजी बोलणें हा एक अभ्यासाचा प्रमुख विषय मानला गेलेला आहे. माल विकण्याला, आपलें बोलणें दुसऱ्याला पटविण्यासाठीं, संघटना करण्यासाठीं भाषेचा उपयोग उत्तम प्रकारें करतां आला पाहिजे अशा धोरणानें या विद्यापीठांत बोलायला शिकविलें जातें. ही बोलण्याची कला उत्तम संपादून ती मालाच्या जाहिरातीसाठीं, गिऱ्हाइकाचें मन त्या मालाबाबत आळवण्यासाठीं वापरली जाते. एकादी मोटारगाडी, विशिष्ट प्रकारची सिगरेट अथवा अमुक एक नेत्रांजन तुम्हांला खास हवेंच आहे असें गिऱ्हाइकाला पटविलें जातें. हें काम इतकें यशस्वीपणें होतें कीं गिऱ्हाइकाला त्या मालावांचून आपण सुखानें अथवा यशस्वीपणें (हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत असें अमेरिकन संस्कृतींत मानलें जातें.) जगू शकणारच नाहीं अशी खात्री वाटते.

अमेरिकेंत वस्तूच्या गाभ्यापेक्षां वस्तूच्या तंत्राला महत्त्व अधिक दिलें जातें. निदान आजवर अशी परिस्थिति होती. अलीकडे प्रोफेसर लोक शिक्षणांत वस्तूच्या गाभ्याला अधिक महत्त्व देऊं लागले आहेत. पण आज अजून जाहिरातींच्या क्षेत्रांत शब्दांचा बाजारच चालतो. शब्दबाजीनें गिऱ्हाइक कसें जिंकायचें याला महत्त्व दिलें जातें. कांहीं शिक्षणतज्ज्ञहि याच गुणाला महत्त्व देतात. डी टोकेव्हिल म्हणतो, "अमेरिकनांना संभाषण करतां येत नाहीं, ते फक्त वादविवाद करूं शकतात. जो दुसऱ्याचें मन कोणत्याहि कामासाठीं अथवा वस्तूसाठीं वळवूं शकतो त्याची पाठ थोपटली जाते. दुसऱ्याचें मन वळविण्याची मनोवृत्ति उतूं चालली आहे. रेडिओ, टी. व्ही., वृत्तपत्रांचे रकानेच्या रकाने कांहीं तरी माल खपविण्यासाठीं, कोणत्या तरी मताबद्दल लोकांचें मन वळविण्यासाठीं केलेल्या युक्तिवादानें भरलेले असतात. पुष्कळ नियतकालिकांत मुख्यतः जाहिराती अथवा बाहेरून पैसे देऊन आलेला मजकूरच असतो. त्यांतून उरलेल्या जागेपुरता मजकूर संपादक घालतात. 'सेल' (म्हणजे विकणें) हा शब्द व्यापारी भाषेंतच नव्हे तर सांस्कृतिक भाषेंतहि रूढ झालेला आहे. एकाद्या यशस्वी प्रोफेसरानें आपला विषय विद्यार्थ्यांना चांगला शिकवला पाहिजे म्हणजे 'विकला' पाहिजे. विद्यार्थी हेहि गिऱ्हाइकाची भूमिका धारण करतात. कारण ते कॉलेजांत येतात ते आपण प्रोफेसराच्या व्याख्यानांत रस घेणार नाहीं असें ठरवूनच येतात. प्रोफेसरानें विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं आपल्या विषयाबद्दल कितीहि उत्साह उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला तरी आपण थंडच राहायचें असा जणूं त्यांचा निर्धारच असतो. शिक्षकाला जर विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं उत्साह उत्पन्न करतां आला नाहीं तर विद्यार्थ्याला तो आपला विजयच आहे असें वाटतें. अर्थात, एकाद्या मुलीनें

आपल्या पावित्र्याचा मोठ्या यशस्वितेनें बचाव केला तर त्या विजयाच्या आनंदा-बरोबरच तिचें मन थोडें खटकतहि असतेंच, त्याप्रमाणें या विद्यार्थ्यांचें मन विजयानंदाबरोबरच थोडें खटकत असतें, कारण अभ्यासाविना एक टर्म वायां गेली एवढें नुकसान तर झालेलें असतेंच. पण 'माल विकणाऱ्या'च्या शक्तीपेक्षां आपली खरेदीप्रतिकारशक्ति श्रेष्ठ ठरली या आनंदांत तो असतो. उलट एकादा प्रोफेसर इतका उत्साही असेल कीं तो आपल्या विद्यार्थ्यांत त्यांच्या विषयाबद्दल उत्साह निर्मू शकला तर ते विद्यार्थी त्याचे चाहते होतात. कारण तो प्रोफेसर मग त्या समाजाचा आदर्श बनतो. गिऱ्हाइकानें कितीहि प्रतिकार केला तरी आपला 'माल विकूं शकेल' इतका तो प्रोफेसर कर्तबगार ठरतो.

लोकशाहींत सरकारी धोरणाला जनतेचा पाठिंबा हा हवाच. पण चर्चा करणें व लोकांचें मन वळविणें हीहि कला अत्यवश्य आहे. राज्यसरकार, काँग्रेस, राष्ट्रपति, अशा कुणालाहि एकाद्या महत्त्वाच्या विषयावर लोकमत काय आहे, लोकांचा पाठिंबा आपणास मिळेल कीं नाहीं हें कळल्यावांचून आपलें धोरण अंमलांत आणतां येत नाहीं. सरकारी धोरणांच्या अमलबजावणींतील दिरंगाईनें कित्येकदां अगदीं चीड येते, पण त्या दिरंगाईचें कारण सार्वजनिक रीतीनें चर्चा करून एकमत बनविण्याला लागणारा वेळ हें असतें. अशा वेळीं मन वळविण्याची कला हीच बहुमोल ठरते.

अमेरिकन लोक हे नुसतें संभाषण करण्यांत नालायक आहेत असें सर्वांना वाटतें याचें हें कारण असावें. आम्हांला कोणत्याहि बोलण्यांतून कृति निघायला हवी असते. नाटकांतून वगैरे धंदेवाईक विनोद पुष्कळ असतो व त्याला प्रेक्षक-समुदायहि खूप मिळतो. अलंकारिक, विशेषतः विनोदी बोलण्याची हौस अमेरिकनांना पुष्कळ आहे. पण परस्परविरुद्ध सिद्धांतांचें द्वंद्व अथवा अनुभवी वावदूकांच्या अनुभवयुक्त सिद्धान्तांच्या तरवारीचा खणखणाट अमेरिकेंत क्वचितच पाहायला मिळतो.

पण अमेरिकेंत उत्तम संभाषण फारसें ऐकायला मिळत नसलें तरी पण चांगलीं भाषणें तेथें पुष्कळ होतात. लोकांना एकमेकांबद्दल आस्था पुष्कळ असते, जिज्ञासाहि असते. लोक एकमेकांचे अनुभव एकमेकांना सांगून अनुभवांची देवाण-घेवाण करायला केव्हांहि तयार असतात. अमेरिकेंत धंद्यांची विविधता मोठी, प्रदेश मोठा असल्यानें दूरवर जाणें-येणें व अनुभव पुष्कळ. यामुळें अशीं माणसें एकदां भेटलीं तर एका वेळीं ज्ञान किती तरी मिळतें. भोजनानंतर झालेल्या एकाद्या संवादांत आधुनिक भांड्यांच्या धंद्यांची संपूर्ण माहिती दिली-घेतली

जाईल, मुलांची गुन्हेगारी नाहींशी करण्याचे उपाय चर्चिले जातील, फंड गोळा करण्याच्या चालू मोहिमेची प्रगति ऐकायला मिळेल (अमेरिकेंत एक ना एक फंड सदा चालू असतो), नवीं पुस्तकें कोणतीं आलीं आहेत, नवे चित्रपट कोणते आहेत, आंतरराष्ट्रीय संकट, जें सध्यां अगदीं डोकीवर आलें असेल त्याचें स्वरूप काय आहे, शेजारच्या वस्तींतल्या शाळेंत गर्दी फार झाली आहे ती कशी निवारावी, इत्यादि विषय तेथें निघतील व चर्चा होईल. धंदे, मुलें, गृहव्यवस्था, तेथें हजर नसलेले परिचित लोक वगैरे सर्व गोष्टींसंबंधानें बोलणीं होतील. हीं बोलणीं अनौपचारिक होतील, त्यांत कोणी कसलाहि आव आणणार नाहीं. आणि राजकीय मतभेदांतून तेढ न निघेल तर बोलणें सारें स्नेहभावाचें होईल. राजकीय वादविवादांतील तेढ सुद्धां लवकरच नरम येईल. कारण अमेरिकन लोकांत राजकीय सिद्धान्तांबद्दल तीव्र मतभेद नाहींत. अमेरिकन लोक अमुक एका राजकीय पक्षांत असतात याचा अर्थ एकाद्या खेळाच्या या किंवा त्या टीममध्यें ते असतात इतकाच असतो. राजकीय पक्षभेदाला ते खेळांतील टीमहून अधिक महत्त्व देत नाहींत.

अमेरिकन लोक अगदीं अपरिचिताशींहि, ओळख करून दिली असतां, अगदीं फार जुनी मैत्री असल्यासारखे बोलूं लागतात. ते वैयक्तिक नांवांनीं संबोधतात, एकमेकांच्या समान ओळखीच्या माणसांची चौकशी, विचारपूस करतात, एकमेकांच्या छंदांत साम्य आहे कीं काय तें पाहतात आणि अशा प्रकारें स्नेह लवकर जोडतात. अगदीं दोन तिऱ्हाइतांना आपण कधीं तरी एकाच गांवांत राहिलों होतों एवढें कळलें तर मग, ते एकाच वेळीं त्या गांवांत राहिले नसले तरी, तेवढी गोष्ट त्यांचा स्नेह जमण्यास पुरेशी होते.

अमेरिकेंतील बोलभाषा शुद्ध इंग्रजीपासून वेगळी झालेली असून अमेरिकनांच्या गरजा व स्वभाव यांनुसार संस्कार तीवर झाले आहेत. अमेरिकेसारख्या दूरदेशांत जाऊन त्यांना मोठ्या धाडसानें वसाहती कराव्या लागल्या, बाहेरच्या जुन्या जगांतल्या अनेक राष्ट्रांचे व भाषांचे लोक अमेरिकेंत एकत्र आले. एकमेकांचें मन वळविण्याची व दुसऱ्याच्या मतास अनुकूल होण्याची, एकमेकासाठीं काम करण्याची, एकमेकावर प्रेम करण्याची व प्रेम करून घेण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत उत्पन्न झाली. या सर्व कारणांचा स्वाभाविक संस्कार त्यांच्या भाषेवर झाला.

लेखी भाषाहि इंग्लंडांतील लेखनशैलीपासून वेगळी झाली असून ती अधिक अनौपचारिक, अधिक खुसखुशीत, अधिक वेगाची व झगझगीत रंगाची, पण जींत सूक्ष्म छटा कमी आहे अशी, झाली आहे. कॉंग्रेसमधील भाषणांचीं रेकॉर्ड्स

पाहिलीं तर हें खरें वाटणार नाहीं. पण वृत्तपत्रें व लोकांना आवडणारीं नियतकालिकें पाहिलीं तर ही बदललेली लेखी भाषा कळेल. वृत्तपत्रकचेरींत तार त्रोटक शब्दांची येते तीच मथळ्याला वापरतात. 'टाइम' पत्राची भाषा तुटकी असते. पहिल्या परिच्छेदांत बातमींतल्या सर्व घटना त्रुटितपणें उल्लेखलेल्या असतात. मग सारी तपशीलवार बातमी येते. वृत्तपत्रीय भाषेची छाया सर्व अमेरिकन भाषाशैलीवर पडली आहे. बहुतेक अमेरिकन कादंबऱ्यांवरून हें दिसून येतें.

इतर क्षेत्रांतहि लेखनशैली अनौपचारिक व गप्पाष्टकासारखी झाली आहे. "आपलें सोळा तारखेचें पत्र पोचलें, मजकूर समजला" ही जुनी पत्राची भाषा आतां अगदीं लुप्त झाली आहे. आतां पत्र सुरू होतें तें—"प्रिय जॅक, सोळा तारखेच्या पत्राबद्दल फार फार आभार. इतक्या तातडीनें तुम्हीं लिहिलें, खूप झालों बुवा. तुमची मागणी आली कीं पूर्ण करूं असें अगदीं वचन देतों," वगैरे. आणखी एक नमूद करण्यासारखी गोष्ट आहे ती ही कीं हल्लीं बराचसा धंदा लांबच्या टेलिफोनवरूनच होतो त्यामुळें अनौपचारिकपणा व संभाषणीपणा भाषेंत अधिक आला आहे.

शुद्ध व अभिजात इंग्रजी भाषेचे बालेकिल्ले म्हणजे कॉलेजांचीं टेक्स्ट-बुकें व सरकारी दस्तऐवज. यांत कल्पना थोड्या व शब्दावडंबर फार. पण यांतहि फरक होऊं लागला आहे. ग्रामरस्कूल व हायस्कूल यांचीं टेक्स्टबुकें आतां आकर्षक रीतीनें चार रंगांत छापतात. त्या लिखाणांतील शब्दसंग्रह, ज्या वयाच्या मुलांसाठीं तें लिखाण असेल त्या मुलांना योग्य असा असतो. माहिती संक्षिप्त सांगण्याऐवजीं मुलांना चांगली समजेल अशी सांगण्यांत येते. साध्या इंग्रजीचा एक तज्ज्ञ हीं टेक्स्टबुकें तपासण्यासाठीं नेमलेला आहे. पूर्वीं सरकारी 'टांकसाळी'नें उगीचच निरर्थक असे निर्मिलेले जे शब्द आहेत ते या टेक्स्टमधून तो कापून टाकतो.

अमेरिकन भाषा ही सदा बदलणारी भाषा आहे. ती अधिकाधिक साधी व रंगदार होते आहे. अमेरिकन संस्कृतीचीं जीं मोठीं ध्येयें आहेत व तींत जी धडाडी आहे तिला ही भाषा जुळणारी आहे.

प्रकरण पांचवें

# कौटुंबिक जीवन

अमेरिकन कुटुंब छोटें असतें. आई, बाप आणि मुलें एवढाच त्याचा पसारा असतो. जगांतल्या अनेक देशांत कुटुंब हें बरेंच मोठें असतें. तीन पिढ्यांतले सारे पुरुष, त्यांच्या बायका आणि मुलें एका घराच्या छायेंत असतात. पण अमेरिकेंत आणि पश्चिम युरोपांत विवाह झाला कीं जोडपीं वेगळीं होऊन वेगळा संसार थाटतात. पण अशा प्रकारें वेगळें घर केलें तरी त्या पुरुषाची आपल्या आईबापांबद्दलची आपुलकी नष्ट होत नाहीं. उलट पुरुषाचें लग्न झालें म्हणजे पत्नीच्या माहेरच्या नातलगांबाबत त्याला एक नवी आपुलकी निर्माण होते. त्याचबरोबर इतर नातलगांच्या कुटुंबांशीं यांचा संबंध कमी होत जातो. अशा प्रकारें अमेरिकन माणूस एका मोठ्या कुटुंबाचा घटक नसून अनेक लहान लहान कुटुंबांचा घटक होतो असें म्हणतां येईल. पण लग्न झाल्यानें तो जें कुटुंब स्थापन करतो तें त्याच्या मुख्य जबाबदारीचें कुटुंब ठरतें. आईबापांपासून वेगळा झाल्यावरहि त्यांचेबद्दलची त्याची प्रेमाची आपुलकी मात्र कायम राहतेच.

लग्न झाल्यानें वेगळा निघालेल्या मुलाच्या नव्या संसारांत आईबाप ढवळाढवळ करीत नाहींत. आईबापांपैकीं एकजण मृत्यु पावल्यास शिल्लक राहणारी व्यक्ति एकटीच राहते. बाई असली तर एकट्याच राहणाऱ्या एखाद्या बहिणीकडे जाते अथवा 'वृद्धगृहांत' राहायला जाते. अमेरिकन जीवन धावपळीचें असल्यामुळें तें निव्वळ तरुणांसाठींच आहे. कुटुंबप्रमुखांचे वृद्ध आईबाप, त्यांच्याजवळ राहण्याची पद्धत तिथें नाहीं. आईबापांशीं, भावंडांशीं प्रेमाचे संबंध मात्र कायम राहूं शकतात व दूरदूर राहणारे असे नातलग मधून मधून चारआठ दिवस एकमेकांकडे राहायला जातात-येतात.

पण पुष्कळ मुलें, मुली, नातवंडें, अनेक सख्खे व चुलत भाऊ वगैरे नातलग

असण्यांत अमेरिकन लोक अभिमान बाळगतात. आपणाला अमुक इतकीं नातवंडें आहेत असें वृद्ध लोक मोठ्या अभिमानानें सांगतात. 'थँक्सगिव्हिंग' हा (म्हणजे चर्चमध्यें जाऊन नोव्हेंबरच्या शेवटच्या गुरुवारीं देवाचे त्यानें पीकपाणी चांगलें दिल्याबद्दल आभार मानण्याचा) जो समारंभ असतो त्यावेळीं वयोवृद्धांच्या घरीं त्यांचीं मुलें-नातवंडें लांब लांब अंतरावरून मोठ्या मेजवानीसाठीं येतात.

ही आपुलकी पुरुषाच्या नातेवाइकाबद्दल जशी असते, तशीच स्त्रीच्या माहेरच्या नातलगांबद्दलहि असल्याचें आढळतें. कुटुंबाला नांव पुरुषाकडून मिळतें या अर्थी पुरुष हा अमेरिकेंत अग्रहक्काचा मानला जातो हें उघड आहे. पण स्त्रीला व तिच्या माहेरच्या नातलगांनाहि तितकाच मान देणें हें सौजन्याचें लक्षण मानतात. मुलांचीं मुलें व मुलींचीं मुलें हीं सारख्याच प्रेमाचीं नातवंडें ठरतात. एका कुटुंबाकडे तुम्ही थँक्सगिव्हिंगच्या समारंभाला गेलां तर दुसऱ्या कुटुंबाकडे तुम्ही ख्रिसमसला जातां. बापाकडल्या आज्याचें नांव एका मुलाला दिलें तर आईकडल्या आज्याचें दुसऱ्या मुलाला दिलें जातें. (अलीकडे मात्र ही प्रथा मागें पडत असून आईबापांना गोड वाटेल तें नांव तीं मुलांना देतात.)

अमेरिका जेव्हां शेतीप्रधान होती त्यावेळीं सर्व कुटुंब हें धनोत्पादनकार्याचा एक घटक मानलें जात असल्यानें निदान एक मुलगा शेती करण्यासाठीं घरीं राहीच. पण आतां उत्पादनकार्य हें कुटुंबक्षेत्रापुरतें राहिलेलें नाहीं. खाणें, राहणें, सुखोपभोग घेणें, एवढ्यासाठीं कुटुंबें आतां आहेत. म्हणून एकत्र मोठ्या कुटुंबांची गरज आतां संपली आहे. प्रौढ विधवा, विधुर व अविवाहित यांचें जीवन मात्र फार वेगळें, एकलकोंडें झालें असून त्यांचा प्रश्न अजून अमेरिकेला सोडवतां आलेला नाहीं.

अमेरिकेंत मोठ्या कुटुंबांचे असे तुकडे पडले, शाळा वगैरे निघून कुटुंबांचीं कामें व गरज कमी झाली, यामुळें समाज दुबळा होत आहे असें कांहीं लोक म्हणतात. पण तें चूक आहे. आजच्या उद्योगधंद्याच्या जीवनांतहि कुटुंब हें धंद्यापेक्षां अधिक चिवट ठरलें आहे. कित्येक धंद्यांच्या पेक्षां कुटुंबें अधिक दीर्घकाल टिकून राहिलेलीं आढळतात.

शिवाय आजच्या उद्योगधंद्यांच्या काळांतहि कुटुंबांना अजून पुष्कळ काम आहे. मुलांना पहिलें शिक्षण अजून घरांतच मिळतें. तान्ह्या मुलांचें पोषण कुटुंबांतच होतें. धर्म मुलांना कुटुंबाकडूनच मिळतो, सांस्कृतिक प्रवृत्ति व वर्तन यासंबंधींचे धडे मुलांना घरांतच मिळतात. करमणूक आणि नातलगांची परस्परांशीं वागणूक याविषयींचे पहिले धडेहि घरांतच मिळतात. लहान मुलांना पहिला

सामाजिक दर्जा कुटुंबाकडूनच मिळतो; मग मोठेपणीं त्याचा तो आपला दर्जा केवढाहि वाढवो. मुलें आपला सामाजिक दर्जा आईबापांपासून चटकन् ग्रहण करतात आणि त्याच दर्जानें शाळेंत वागून पुढें त्याच दिशेनें पुढलें शिक्षण घेतात. समाजांत एकाद्या कुटुंबाला जो दर्जा मिळतो त्याचीं कारणें ठाम अशीं नसून कुटुंबप्रमुखाचा व्यवसाय आणि त्याची मिळकत, कौटुंबिक पार्श्वभूमि, राहण्याचें ठिकाण, सार्वजनिक जीवन, धर्म, त्याच समाजांत राहत असल्याचा कमीअधिक काळ, कुटुंबाचा अनुवंश इत्यादि अनेक कारणांनीं कुटुंबाचा सामाजिक दर्जा ठरतो.

अमेरिकन कुटुंबांत सर्व माणसें सारख्या दर्जाचीं मानलीं जातात हें अमेरिकन कुटुंबांच्या दुर्बलतेचें कारण आहे असें विदेशीयांना वाटतें. पण खरोखर अमेरिकन कुटुंबसंस्थेला या समतेमुळें बळकटपणा आला आहे. अजूनहि अमेरिकेंत कांहीं कुटुंबें अशीं आहेत कीं तिथें बापाची आज्ञा विनतक्रार मानावी लागते, पैसा खर्च करण्याबाबत गृहिणीला मत देतां येत नाहीं, मुलांनीं किरकोळ चुका केल्या अथवा आई त्रासली, थकली असली तर मुलांचीं थोबाडें फुटतात. पण सामान्यतः जगांतल्या इतर संस्कृतींशीं तुलना करतां अमेरिकन कुटुंबांत वैयक्तिक समता पुष्कळच अधिक आहे असें म्हणतां येतें.

कुटुंबांतील ही समता विवाह होतांच अमलांत येते. कारण हल्लीं विवाह होतात ते परस्परांच्या संमतीनें, समान भागीदारीच्या तत्त्वावरच होतात. पहिलें मूल होईपर्यंत पत्नी नोकरीवर जाते. पुढें मुलें मोठीं होऊन आपापली काळजी घेण्यास समर्थ झालीं म्हणजेहि बायका पुन्हा नोकऱ्या करूं लागतात. पण नोकरी असो नसो, स्त्रीला घरांत भरपूर काम असतें. कारण अगदीं फार श्रीमंतांखेरीज इतर कुणालाहि घरकामाला नोकर परवडत नाहींत. आणि यांत्रिक साधनें, तयार अन्नें वगैरे सोयी असल्या तरी नवराबायको व तीनचार मुलें आणि नागरिक जीवनांतील कर्तव्यें एवढयासाठीं स्त्रीला सारा दिवस सख्त राबावेंच लागतें.

अमेरिकन पुरुष म्हणेल कीं आमच्या येथें एक प्रकारें आर्थिक समताहि आहे. पुरुष पैसा मिळवतो, बाई खर्च करते. स्त्रियांचीं नियतकालिकें, दिवसाचे रेडिओ व टेलिव्हिजन कार्यक्रम व त्यांतील जाहिराती या सर्वांची रचना व योजना अमेरिकन स्त्रियांच्या गरजा लक्षांत घेऊनच केलेली असते. बाईला एकादी नवी गाडी अथवा दुसरी एकादी हौसेची वस्तु हवी असली तर पैसा मिळविण्यासाठीं बाई थोडा काळ नोकरी करते. अशा रीतीनें तीहि पैसे मिळविते अथवा तिनें पूर्वीं पैसे मिळविलेले असतात या जाणिवेनेंच पत्नी व पति यांत समतेची भावना नांदते.

गृहप्रमुख या नात्यानें पुरुषाचा दर्जा अमेरिकेंत अजूनहि श्रेष्ठ आहे हें खरें. पण पुरुषांची ही श्रेष्ठता निव्वळ औपचारिक असते आणि स्त्रीची श्रेष्ठता ही खरीखुरी असते. घर, मोटार इत्यादि मालमत्ता बहुधा दोघांच्या नांवानें नोंदलेली असते. (अमेरिकेंत ५६ टक्के कुटुंबांचीं घरें स्वतःच्या मालकीचीं असतात.) जमाखर्च दोघेंहि ठेवतात आणि स्त्री बिलें देते व प्राप्तीवरील कराचा हिशेब ठेवते. विवाहापासून उभयतांच्या प्राणिसहज, सामाजिक व मानसिक अशा तीन प्रकारच्या गरजा भागाव्या अशी अपेक्षा असते. आणि विवाह होतांच वेगळें बिऱ्हाड थाटावें लागल्यानें या गरजा इतर कोणाच्याहि मदतीवांचून परस्पर-साहाय्यानेंच भागवाव्या लागतात. यामुळें परस्परांत समानतेची भावना वाढण्याला मदत होते.

## विवाह : हक्क व उपचार

विवाहव्यवस्थेचें हें महत्त्व लक्षांत घेऊन विवाहाला स्थैर्य आणण्यासाठीं कायदा, धर्म व सामाजिक विधिनिषेध समाजानें निर्माण केले आहेत. दोघांपैकीं कोणासहि सांसर्गिक रोग नाहीं ना याची खात्री करून घेण्यासाठीं कांहीं घटकराज्यांत विवाहापूर्वी रक्त तपासण्याची सक्ती आहे. विवाहाचा अर्ज आल्यापासून कांहीं काळ गेल्यावांचून विवाहास परवाना मिळत नाहीं. विवाह घाईनें होऊं नये असा हेतु यांत असतो. नोंदणीविवाहास परवानगी आहे. पण सामाजिक दर्जा आणि हौस या दृष्टीनें बहुतेक जोडपीं धार्मिक विधि करून घेतात. तसेंच विवाह हा कांहीं तरी उच्च कोटीचा, गूढ संस्कार असून सुख व स्थैर्य यासाठीं विवाहास ईश्वराचा आशीर्वाद हवा या भावनेनेंहि धार्मिक विधि केला जातो.

## मुलांना वळण कसें मिळतें

विवाहानें पतिपत्नींत जी समतेची भावना निर्मिली जाते ती पुढें मुलांच्या बाबतींतहि अंमलांत यायची असते. मुलांवर आईबापांनीं हुकमत चालवून त्यांचें मार्गदर्शन करावें हें स्वाभाविकच होय. पण मुलांनीं शक्य तितक्या लवकर स्वतंत्र व स्वावलंबी व्हावें अशी अमेरिकन कल्पना आहे. म्हणून जगांतल्या कोठल्याहि संस्कृतीपेक्षां अमेरिकन संस्कृतींत लहान मुलांना देहधर्मविषयक स्वच्छता फारच लहानपणीं शिकविली जाते. (हल्लींच हें वय किंचित् वाढलें आहे.) जें मूल या बाबतींत पूर्ण स्वावलंबी होईल त्याला शाबासकी मिळते. आपल्या मुलांनीं लवकर

चालावें, लवकर बोलावें, लवकर परिपक्व बुद्धीचें व्हावें यासाठीं स्त्रिया एकमेकींच्या मुलांशीं तुलना करून चढाओढीनें झटतात. अलीकडे जेसेल यांच्या संशोधनाचा परिणाम स्त्रियांवर झाला असून मुलांवर हें सर्व कर्तृत्व घाईनें लादूं नये ही गोष्ट स्त्रियांच्या लक्षांत आली आहे. मुलांना बाटलींतून दूध पाजणें, प्रत्येक मुलाला वेगळी खुर्ची असणें इत्यादि गोष्टींनीं मुलांच्या मनावर पृथक्‌पणा, स्वातंत्र्य व समता यांचे संस्कार होतात. घरांत मुलें अनेक असलीं तर प्रत्येकाला या वस्तू अगदीं मालकीनें वेगवेगळया मिळतात. घरांत शेकोटी असल्यानें गरम कपड्यांचें बंधन झुगारून मुलांना उघडेंवाघडें वावरतां येतें. यामुळेंहि अनिर्बंध स्वातंत्र्याची मुलांची संवय व भूक वाढते. आईबाप बहुधा तरुण व विचारी असतात. मुलाचा जन्म अगदींच प्राणिसहज नव्हे तर योजनापूर्वक झाला असण्याचा संभव असतो. मुलांना शिक्षण, कपडे, औषधपाणी, खेळ, करमणूक या गोष्टी प्रत्येकीं पुरेशा मिळायला हव्या या हेतूनें आपल्याला होणाऱ्या मुलांची संख्या आईबापांनीं बहुधा नियमित केलेली असते. आईबापांनीं एकाचे लाड, एकावर राग, असें मुलांना न वागवतां सर्वांना समतेनें व निःपक्षपातानें वागवावें अशी अपेक्षा असते. (मुलांना मात्र तसें वाटतेंच असें नाहीं.) आईबापांच्या मालमत्तेंत सर्व मुलांचा सारखा वांटा असतो. बऱ्याच पूर्ववयापासून त्यांचा त्यांनीं विचार करावा आणि कौटुंबिक गोष्टींच्या निर्णयांत आपले विचार मांडून भाग घ्यावा असें मुलांना उत्तेजन देण्यांत येतें. आपण कसें वागावें, काय घ्यावें इत्यादिविषयक निवड करण्याची संधि त्यांना देण्यांत येते; त्यांना एकादी गोष्ट करायला सांगितली (विशेषतः त्यांना नको वाटणारी) तर त्यांनीं नुसता हुकूम बिनतक्रार मानावा अशी अपेक्षा नसून त्यांनीं ही गोष्ट करणें कां अवश्य आहे याचा खुलासा आईबापांनीं मुलांना सांगितला पाहिजे अशीहि अपेक्षा असते. थोडक्यांत सांगायचें म्हणजे प्रत्येक अमेरिकन कुटुंब ही एक लोकशाहीप्रधान अशी वसाहतच आहे. त्यांतल्या प्रत्येक नागरिकाला हक्क आणि कर्तव्यें नेमून दिलेलीं असतात. बाप कायदा सांगतो, आई त्याप्रमाणें राज्यकारभार करते आणि मुलेंहि मताधिकार असलेले नागरिक असतात. अमेरिकन संस्कृतीचें वैशिष्ट्य असें आहे कीं त्या संस्कृतीचीं कौटुंबिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक इत्यादि अंगें वस्त्रांतल्या धाग्याप्रमाणें एकमेकांत विणलेलीं असून तीं एकमेकांपासून वेगळीं काढतां येत नाहींत आणि म्हणून त्यांचें पृथक् पृथक् वर्णनहि करतां येत नाहीं.

घरांत आईबाप आणि शाळांत शिक्षक मुलांच्या मनावर जी एक कल्पना खोल बिंबवूं पाहतात ती म्हणजे खेळाडूपणाचा गुण. लवकरच मुलेंहि एकमेकांना

हा गुण शिकवूं लागतात. ही कल्पना आमच्या अंगीं इतक्या लहानपणीं येते कीं गुरुत्वाकर्षणाच्या नियमाइतकीच ती आम्हांला नैसर्गिक वाटते. खेळाडूपणा म्हणजे काय ? दुबळ्याबद्दल सहानुभूति व त्याला साहाय्य देण्याची तयारी, आपल्या टीमचा विश्वासघात न करणें, नियमांचें पालन करणें, दुसऱ्याच्या दुःस्थितीचा गैरफायदा न घेणें ('पडलेल्याला मारू नये') खेळांत आपली सर्व शक्ति वेचणें, जय अथवा पराजय दोहोंचाहि स्वीकार उमदेपणानें करणें इत्यादि गोष्टींचा खेळाडूपणांत समावेश होतो.

फुटबॉलच्या खेळांत शेवटीं प्रत्येक टीम दुसरीचा जयजयकार करते ना ? ही भावना अमेरिकन राजकारणांतहि अवतरली असून निवडणुकींतला पराभूत उमेदवार विजयी उमेदवाराचें अभिनंदन करतो आणि 'त्या विजयी पुढाऱ्याला साहाय्य करा' असें आपल्या अनुयायांना सांगतो.

एकादें लहान मूल दुसऱ्या लहान मुलाचें खेळणें हिसकून घेत असेल तर पहिल्या मुलाची आई 'असें नाहीं करायचें; त्या बाळालाच तें आधीं मिळालें आहे, तें त्याचें आहे' असें आपल्या बाळाला बजावते. कां ? तर ज्याच्या हातीं एकादी वस्तु प्रथम आली त्याच्या ती मालकीची झाली हा सामाजिक प्रघात पाळायला आई मुलाला शिकवीत असते. मुलाच्या हातीं एकादें खेळणें फार वेळ असलें आणि दुसऱ्या मुलाला तेंच हवें असलें तर खेळणें असलेल्या त्या मुलाची आई म्हणेल, "बेबी, आतां किती वेळ हें खेळणें तुझ्याजवळच आहे ! आतां जरा जॉनीला खेळूं दे." वस्तूच्या मालकानें इतरांसमवेत त्या वस्तूचा उपभोग घ्यावा हें तत्त्व यांत आहे. याप्रमाणें अगदीं लहान वयांतच अमेरिकन मुलांना वस्तु आपल्याच ताब्यांत ठेवणें व इतरांसमवेत तिचा उपभोग घेणें, चढाओढ करणें व सहकार्य करणें यांतला फरक समजून घ्यावा लागतो. अमेरिकन संस्कृतींत सर्वत्र अशा खुणा दिसतात कीं त्यावरून बेमुर्वतखोर चढाओढीऐवजीं खुषीच्या सहकारी जीवनाकडे अमेरिका ओढ घेत आहे, चढाओढ व सहकार या दोहोंचे फायदे मिळवूं पाहत आहे अशी खात्री पटते.

खेळाडूपणाच्या कल्पनेचें आणखी एक सर्वप्रिय लक्षण म्हणजे गटनिष्ठता. सर्वांनीं स्वेच्छेनें बनविलेल्या गटांत राहून सर्वांनीं त्या गटाचें ध्येय ठरवावें, सर्वांनीं मान्य केलेले नियम प्रत्येकानें पाळावे हें एक अमेरिकन संस्कृतीचें महत्त्वाचें अंग आहे. खेळांत या भावनेचें शिक्षण सुरू होतें. पुढें धंदे, शास्त्रीय व सामाजिक प्रगति, व्यक्तीऐवजीं गटानें करावयाचें कारागिरीचें काम या सर्व प्रसंगीं हा गटनिष्ठेचा गुण अंगवळणीं पडल्याचें आढळून येतें.

लहान मुलांच्या शिक्षणांत नैतिक शिक्षणावर विशेष भर असतो. घरीं, शाळेंत, चर्चमध्यें, युवकसंघटनांत, सर्वत्र या नैतिक शिक्षणाला महत्त्व देण्यांत येतें. बालवीर चळवळींत जाऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला पुढील मंत्र मुखपाठ करावा लागतो: "बालवीर हा विश्वासू, कर्तव्यनिष्ठ, साहाय्यकारी, स्नेहभावपूर्ण, सौजन्यशील, दयाळू, आज्ञाधारक, आनंदी, काटकसरी, शूर, स्वच्छ, आदरशील असला पाहिजे." हा मंत्र शिकून पस्तीस वर्षें झाल्यावरहि तो न थांबतां एकटाकी सर्वांना लिहून टाकतां येतो यावरूनच त्याचा कांहीं तरी टिकाऊ परिणाम मनावर होत असला पाहिजे हें दिसून येतें. बायबलांतील नीतिकथा आणि आत्मिक सुखाची कल्पना हीं परंपरागत शिक्षण मिळालेल्या मुलांच्या मनावर दृढ संस्कार करीत असून आयुष्यभर त्या उपदेशाचा ध्वनि त्यांच्या कानाशीं गुणगुणत राहतो.

न्याय व अन्याय यांसंबंधींच्या कल्पना मुलांच्या मनावर फार लहानपणीं बिंबवलेल्या असतात. या भावनांची अवज्ञा अमेरिकन माणूस जेव्हां करतो तेव्हां मग तो आपली चूक जाहीर होऊं नये व शासन चुकावें या आशेनें अवज्ञा करतो. माणसाचें नीतिअनीतिविषयक मानसिक शिक्षण चालू असतां, 'सांपडूं नको' हा पापीजनांचा अकरावा आदेश त्याच्या कानीं पडत असतो व मनावर बिंबत राहतो. यामुळें कायमचे जे वाममार्गी होतात असे लोक सोडले तर बाकी सर्वांच्या अंगीं न्याय्य कायदे पाळण्याची संवय इतकी जडलेली असते कीं सहसा अमेरिकन माणूस कायद्याचें उल्लंघन करीत नाहीं.

लहान मुलांना वळण लावणें ही बाब अमेरिकन आईबाप मोठी जिव्हाळ्याची मानतात. हें काम अगदीं योग्य पद्धतीनें व्हावें म्हणून अमेरिकन आईबाप नियतकालिकें व पत्रकें वाचतात, व्याख्यानें ऐकतात, इतर आईबापांशीं विचारविनिमय करतात. मुलांना अगदीं शास्त्रशुद्ध पद्धतीनें वळण लावलें पाहिजे असा त्यांचा प्रयत्न असतो. पण शास्त्रज्ञांचे बालशिक्षणाविषयींचे विचार दर हंगामाला बदलल्याचें आढळून आलें म्हणजे शास्त्रशुद्ध वागणेंच अवघड होतें. शास्त्रज्ञांच्या चंचलतेमुळें निराश झालेली एक माता म्हणते, "बालमानसशास्त्रावरील पुस्तकें वाचण्याचें मीं आतां बंदच केलें आहे. एकदां एक विचार, पुन्हा त्याबद्दल संशय; निश्चित कांहींच नाहीं. ही चंचलता फार वाईट." पण अखेर ती तरुण माता आपल्या अनुभवी आईबापांपासून व सासूसासऱ्यांपासून दूर असते, स्वतांच्या लहानपणच्या आठवणीपलीकडे बालशिक्षणाबाबत अनुभवाचें मार्गदर्शन असें तिला कांहींच मिळत नाहीं, आणि मग पुन्हा बालमानसशास्त्रज्ञांच्या लिखाणाचा आश्रय तिला घ्यावाच लागतो.

तीन पिढ्या एकत्र असणाऱ्या कुटुंबांतहि लहान मुलांच्या मातेलाच महत्त्व फार असतें. पांचसहा वर्षांचें मूल होईपर्यंत दिवसाचा बहुतेक वेळ तें मूल आईच्या देखरेखीखालींच असतें, तिच्या वागणुकीचे संस्कारच त्या मुलाच्या मनावर होत असतात. कारण त्या बालकाच्या गरजा, त्याचा आनंद या गोष्टी त्या मातेवरच अवलंबून असून तिचीच शिस्त त्याला लागत असते. आजाआजी घरांत असलीं तरी आईबापांना लहान मुलाबाबत त्यांचाहि हस्तक्षेप सहन होत नाहीं. कारण अमेरिकन समाज इतका प्रवाही आणि बदल पावणारा झाला आहे कीं जुन्या पिढीचे संस्कार नव्या पिढीला जुनाट व अपायकारकहि वाटतात.

अमेरिकन आईबाप मुलांना ज्या पद्धतीनें शिक्षण देतात त्या पद्धतीचा शेवट कांहींसा करुणापूर्ण होत असतो. कारण मुलांना जें स्वातंत्र्य व स्वावलंबन शिकविलें जातें त्यामुळेंच मुलें पुढें अपरिहार्यपणेंच आईबापांपासूनहि वेगळीं होतात. पण अशा प्रकारें आईबापांपासून स्वतंत्र होण्याची मुलांची प्रवृत्ति कमी व्हावी असें वाटून आईबापांनीं मुलांच्या शिक्षणाबाबतचें आपलें आजचें धोरण बदलावें काय ?

इतरहि अनेक कारणांनीं अमेरिकेंत मुलें व आईबाप यांचे संबंध दूरावत असतात. मुलांचें शिक्षण व करमणूक यांतली बरीचशी जबाबदारी आतां शाळांनीं उचलली आहे. मुलांचे दांत, डोळे व सर्वसामान्य आरोग्य यांची तपासणी करणें, रोगप्रतिबंधक उपाय सुचविणें, आईबापांना शक्य नसल्यास चष्मे वगैरे मुलांना पुरवणें या गोष्टी शाळा करतात. ज्यांच्या प्रकृतीची विशेष काळजी घेणें जरूर असतें अशा मुलांना आरोग्यधामांत पाठवतात. तेथें त्यांची शारीरिक विकृति दुरुस्त करण्यापासून मानसोपचारापर्यंत सर्व उपाय केले जातात. बालवीर संघटना, चर्चसंघटना, या मुलांच्या सामाजिक व करमणुकीच्या जीवनाची तरतूद करतात. उन्हाळ्याच्या सुटींत मुलें घरीं राहतील आणि घराशीं त्यांचा अधिक परिचय होईल म्हणावें तर उन्हाळी शिबिरें मुलांना घरांतून पळवून नेतात. रोज थोडा वेळ नोकरी करून पैसा मिळविण्याची संधि मुलांना जी मिळते तीमुळें मुलांची कुटुंबावर अवलंबून राहण्याची प्रवृत्ति कमी होऊन त्यांची स्वावलंबनप्रवृत्ति वाढते.

अमेरिकेची अर्थसंघटना दारिद्र्याकडून विपुलतेकडे चालली आहे. याचाहि परिणाम आईबाप व मुलें यांचे संबंध दूरावण्याकडेच होतो. ज्या काळीं रोजगार-धंदा कमी असे आणि कामगारांना मालकवर्गापुढें नमतें घेऊन वागावें लागे त्यावेळीं बाप मुलांवर, कारखानदार कामगारांवर गाजवीत असे तसा, अधिकार गाजवी आणि जीवनकलहांत टिकून राहण्यासाठीं अवश्य असणारा लीनता

हा गुण मुलांच्या अंगीं बाणवी. पण आतांच्या विपुलतेच्या कालखंडांत काम पुष्कळ आणि कामगार कमी अशी परिस्थिति झाली असल्यानें जीवनकलहांत जगण्यासाठीं लीनतेची गरज राहिलेली नाहीं व ती शिकविलीहि जात नाहीं.

विदेशीयांना हें सारें अतिरेकी वाटणें स्वाभाविक आहे. त्यांच्या दृष्टीनें अमेरिकन समाजव्यवस्थेंत लहान मुलांनाच प्रामुख्य आलें असून एकंदर सामाजिक प्रवृत्ति बालिश झाल्या आहेत. मुलांनीं जेव्हां तोंड मिटून मौन पाळावें त्यावेळीं त्यांना बडबडूं देऊन आम्ही त्यांना 'बिघडवतों', ज्या वयांत त्यांनीं सांगितलेल्या आज्ञा मुकाट्यानें पाळाव्या त्या वयांत त्यांना आम्ही वाद घालायला शिकवतों. वडील माणसांपुढें ज्या वयांत मुलांनीं आदरशीलतेनें लवून वागावें त्या वयांत आम्ही मुलांना उद्धटपणें बोलूं देतों. शहरी जीवनांत अस्थिरता अतिशय आली असून बापाचा मुलांवर अधिकार कांहींहि राहिलेला नाहीं. आई मजूर असून वाढत्या वयाच्या मुलापासून दिवसभर दूर असते. मुलांच्या वागण्याला मग कांहींच धरबंध राहत नाहीं व लहानपणींच मुलें गुन्हेगारहि होतात.

या सर्व दुःस्थितीबद्दल आमचे आम्हीच जबाबदार आहों अशी कबुली आम्ही देऊंहि. पण याचें खरें उत्तर असें आहे कीं संस्कृति हें एक अनेक निर-निराळ्या दिशांनीं विणलेल्या धाग्यांचें जाळें आहे. शिवाय आमची स्वातंत्र्यावर निष्ठा असून चढाओढीवर आधारलेल्या आजच्या जीवनांत या स्वातंत्र्यवृत्तीची मुलांना गरज आहे, म्हणून त्यांना आम्ही स्वातंत्र्याचें वळण लावतों. आणखी एक कारण म्हणजे अमेरिकनांची तारुण्यप्रीति. आपण तरुण आहों याच एका भावनेनें सारे अमेरिकन लोक जगतात. आमच्या सर्व जीवनांत ही एकच भावना सर्वत्र व्यक्त होत असते. कल्पित कथा तारुण्यांतील प्रेमाच्या असतात. बायका आपलें खरें वय कधींहि सांगणार नाहींत. म्हाताऱ्या स्त्रिया आपली शरीरयष्टि खुडखुडीत राहावी असा प्रयत्न करतात, तरुण स्त्रियांसारखे पोषाख करतात आणि सार्वजनिक कामांत नेहमीं गढलेल्या राहतात. चाळीस वर्षें वयानंतर उद्योगधंद्यांत आपणाला रोजगार मिळणें कठीण होईल या भयानें पुरुष आपली शरीरप्रकृति चांगली ठेवून तरुण दिसावें यासाठीं झटतात.

तारुण्याला आम्ही एवढें महत्त्व कां देतों? याचीं कारणें सूक्ष्म असून अनेक आहेत. अमेरिकेच्या मूळ वसाहतीसाठीं दणकट तरुणांची गरज होती. पहिले 'यात्रेकरू पिताजी' (पिलग्रिम फादर्स) जे प्रथम अमेरिकेंत वसाहतीसाठीं आले ते सारे विशीतिशींतले तरुण होते. कॅ. जॉन स्मिथ अमेरिकेला पोंचला

तेव्हां सत्तावीस वर्षांचा होता. अमेरिकन राज्याच्या ज्या संस्थापकांनीं स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सही केली त्यांच्यांतला जेफर्सन हा तेहतीस वर्षांचा, हॅन्कॉक एकुणचाळीस वर्षांचा, थॉमस लिंच (ज्यू) फक्त सदतीस वर्षांचा होता. हें राष्ट्र तरुणांच्या मजबूत हातांनीं उभारलें गेलेलें असून त्याचा औद्योगिक विकासाचा वेग इतका कष्टाचा आहे कीं बटण दाबतांच कामाला लागणारी कणखर व चपल माणसेंच येथें हवींत. अधिक चांगली राहणी, अधिक चांगला भविष्यकाळ आम्हीं आमच्या डोळ्यांपुढें ठेवला असून तरुणांनाच तें ध्येय साध्य होईल. आमच्या कपड्यांच्या, आरोग्याच्या जाहिराती, आमचे खेळ, आमचें संगीत, या सर्वांत तारुण्य हें कायम टिकेल असेंच आश्वासन असतें. आमचा ख्राइस्टहि, क्रॉसवर टांगलेला दुःखी आम्हांला आवडत नसून, आशापूर्ण अशा बालकाच्या स्वरूपांतलाच आम्हांला आवडतो.

## कुमारांचा प्रश्न

पण तारुण्यावर आम्ही एवढा भर देतों तरीहि कांहींशा प्रौढ वयांतल्या कुमारांना आम्ही आमच्या संस्कृतींत समरस करूं शकलों नाहीं. आमच्यापेक्षां अधिक साध्या समाजव्यवस्थांत बाळपणांतून प्रौढत्वांत प्रवेश करण्यासंबंधानें कांहीं सुबोध संस्कार व चालीरीती असतात. पण अमेरिकन मुलांना आपण प्रौढ झालों असें केव्हां मानायचें अथवा प्रौढत्व म्हणजे नेमकें काय हें माहीतच नसतें. सर्वत्र आणि सर्व काळ तारुण्यावर भर दिलेला मुलांना दिसतो व ऐकूं येतो, त्यावरून त्यांना वाटतें कीं तारुण्य हा भूषणभूत गुण आपल्या अंगीं सदाच असून तो अनायासें मिळतो. आतां त्यांना तारुण्याचा अभिमान वाटण्याला आणखी एक गोष्ट हवीशी वाटते. आपण तरुण आहों असें वाटण्यासाठीं आई-बापांचा अधिकार झुगारून दिला पाहिजे. आपल्या जीवनाचे निर्णय आपणच ठरविण्याचा आपला हक्क प्रस्थापित करून आपलें व्यक्तिस्वातंत्र्य आपण खरेंखुरें अनुभवलें पाहिजे असें त्या तरुणाला वाटत असतें.

यामुळें प्रौढ कुमारांनीं बंड उभारलें आहे. त्यांतले उलटसुलट भावनाप्रवाह मोठे दुःखदायी व दिङ्मूढ करणारे आहेत. मुलांचा हा खरोखरच पुनर्जन्मच होत असून तो अपरिहार्य आहे हें त्या मुलांना व त्यांच्या आईबापांनाहि पटलेलें असतें. दोघांनाहि त्याचा त्रास होतो, राग येतो, त्याचा ते प्रतिकार करतात, पण तरीहि हा पुनर्जन्म त्यांना हवाहवासा वाटतोच. मुलांना त्यांच्या पायांवर उभें राहण्याचें शिक्षण दिलेलें असून तसें स्वावलंबी होण्याचा प्रयत्न मुलें करतात. पण

त्याचबरोबर त्या स्वावलंबनांतल्या एकाकीपणाचीहि त्यांना भीति वाटत असते. आईबाप मुलांना स्वावलंबी होण्यास उत्तेजन देतात, पण त्याच वेळीं त्यांना वाटत असतें कीं "अजून हा फार लहान आहे, थोडे दिवस जाईनात कां?" पण मग त्यानें स्वावलंबी व्हायचें केव्हां हा प्रश्न पुन्हा उरतोच.

अमेरिकन मुलांना हा मानसिक कलह फार जाणवतो. कारण कुटुंब मूळचेंच लहान असल्यानें मुलांना आईबाप व भावंडें यांचा फार ळळा असतो. प्रेम व सहानुभूति यांचा एकच एक आधार जे आईबाप त्यांच्याचपासून स्वतंत्र व्हायचें, त्यांच्याविरुद्ध बंड करायचें? आईबापांना सोडायचें तर आजाआजी अथवा एकदम बराच मोठा भाऊ यांपैकीं कुणाशींच मुलांची विशेष सलगी झालेली नसते. लहान वयांत एकाद्या मित्राशीं विशेष सलगी झालेली असते, पण अगदीं बाळपणापासून आईबापांचें जें प्रेमळ, संरक्षक छत्र मुलांवर असतें त्याची बरोबरी दुसऱ्या कशानेंच होत नाहीं.

प्रौढावस्था प्राप्त होण्याच्या काळांत जास्तींत जास्त मनस्ताप देणारा व्यवहार म्हणजे लैंगिकसंबंधविषयक व्यवहार. परंपरागत समजुतीप्रमाणें पाहतां विवाह होईपर्यंत शारीरिक पावित्र्य पूर्णपणें पाळलें पाहिजे. उलट सामाजिक जीवन दिवसानुदिवस असें होत आहे कीं विशेष विकारशील अशा मुलांच्या समोर लैंगिक अत्यानंदाचे देखावे सर्वत्र दिसतात. आणि मग लैंगिक आनंद अनुभवल्या-वांचून आपण खरेखुरे प्रौढ होणारच नाहीं असें प्रत्येक मुलाला वाटूं लागतें.

लहान मुली या बाबतींत सावधपणें वागूं पाहतात. याला शारीरिक व सामाजिक कारणेंहि असतात. पण स्त्रीवर ताबा मिळवून आपलें पौरुष सिद्ध करावें असें आव्हान पुरुष मुलाभोवतालची परिस्थिति त्याला सतत देत असते. जो या बाबतींत अयशस्वी होतो अथवा नुसता प्रयत्नहि करीत नाहीं तो पुरुष कांहीं तरी चमत्कारिक असला पाहिजे असें मानलें जातें. पण समजा, एकदां त्याला यश आलें तर तेवढ्यांत समाधान नसतें. अनेकानेक विजय मिळविणें हीच श्रेष्ठ पौरुषाची कसोटी मानली जाते.

अमेरिकन समाजांत तरुण मुलगे व मुली अनेक कारणांनीं जणूं कांहीं एका कोंडवाड्यांत ढकलल्ीं जातात. शाळा, चर्चनें चालविलेल्या संघटना, शाळांनीं योजलेले नृत्यसमारंभ इत्यादि ठिकाणीं असे प्रसंग येतात. मुलगे मुलींना तारखा ठरवून देतात. त्या दिवशीं मग सिनेमाला, खेळांना, नाचायला ते मुलींना घेऊन जातात. ही आतां रूढीच झाली आहे. दिवसानुदिवस या तारखा ठरविण्या-बाबतची वयोमर्यादा कमी कमी होत आहे. खरोखर स्त्रीपुरुषांनीं वरचेवर एकत्र

येण्यानें एकमेकांना एकमेकांची संवय होते या दृष्टीनें हें एकत्र येणें चांगलेंहि असतें. प्रौढ कौमार्यावस्थेपूर्वी या तारखा ठरविण्याच्या रूढीचा उपयोग परस्परांच्या भावनांचे ताण सैल पडण्याच्या दृष्टीनें चांगला होतो. ज्या समाजांत तरुण स्त्रीपुरुषांनीं स्वतांच परस्परांची निवड करायची असते त्या समाजांत या रूढीची जरुरी आहेच.

पण तरुण स्त्रीपुरुषांना ही परस्परांमधली सलगी वाढवावी किती, कोठवर न्यावी, हें ठरवितांना दीर्घकाळ फार यातना भोगाव्या लागतात. वय जेवढें अधिक, तेवढे प्रेमाराधनेचे व विवाहाचे दिवस जवळ येतात, त्यामुळें सलगी अधिक वाढते. पण त्या परिस्थितींत पुरुषानें आपल्या प्रियेशीं समागम करण्याचा प्रयत्न जर केला तर नैतिक बंधनांचीं भुतें दोघांनाहि भेडसावूं लागतात. तो म्हणतो, "तुझें माझ्यावर निस्सीम प्रेम असेल तर त्याचें अंतिम निदर्शक असें हें देणें मला तूं दिलें पाहिजे." पण तिच्यापुढें प्रश्न असा पडतो कीं "आपण जर रुकार दिला तर असाच रुकार हिनें पूर्वी कुणाला दिला असेल काय, अशी शंका याला आली तर?" कारण तिला माहीत असतें कीं, पुरुषाला स्वतःला लैंगिक स्वातंत्र्य हवें असतें पण आपली वधू ही अगदीं पवित्र कुमारिका असावी अशीहि त्याची महत्त्वाकांक्षा असते. त्यामुळें प्रियकराच्या इच्छेपुढें शरण जाण्यानें प्रियकर अधिक आपलासा होईल कीं उलट दूर जाईल हें स्त्रीला ठरवितांच येत नाहीं. अखेरीस त्याच्याशीं लग्न करून जर जन्माची सोबत करायची तर आधीं त्याची जास्तींत जास्त सलगीची ओळख झालेलीच बरी असा विचार ती शेवटीं करते.

अलीकडे 'धीरे चलो' (गोइंग स्टेडी) असा एक स्नेहप्रकार तरुणतरुणींनीं तडजोड म्हणून रूढ केला आहे. बहुधा लैंगिक संबंध वजा केलेला असा हा लग्नाचाच एक प्रयोग असतो. या प्रकारें तरुणतरुणी आपला वैवाहिक सोबती निवडतात. आपले आईबाप तरुण असतांना निरनिराळ्या भागीदाराबरोबर त्यांच्या तारखा ठरल्या जात आणि नाचाला गेले असतां विरुद्ध लिंगाच्या जास्तींत जास्त जोडीदारांशीं नाचण्यांत ते फुशारकी मानीत असें हल्लींच्या तरुणांना कोणीं सांगितलें तर त्यांना त्याची इतकी शिसारी वाटते कीं त्यांच्या अंगावर शहारे उभे राहतात.

हल्लींचीं तरुणतरुणी एकजोडीदारनिष्ठ झालीं आहेत. हायस्कुलांत असतां-वेळेपासून (अथवा त्यापूर्वींहि) एकाद्या जोडीच्या चारपांच तारखा लागल्या कीं त्यांचें एकमेकाशीं 'धीरे चलो' सुरू झालें असें मानण्यांत येतें. आतां यापुढें

कोणत्याहि सामाजिक व्यवहारांत तीं एकमेकत्र जोडीनें असायचीं, त्यांतला कोणीहि जोडीदार बदलायचा नाहीं असें मानलें जातें. नाचाला गेलीं तर त्या दोघांनीं एकमेकाशींच नाचायचें, एकमेकांनीं जोडीनें अभ्यास करायचा, एकमेकांच्या घरीं जायचें, एकमेकाशीं टेलिफोनवर बोलायचें, अशा प्रकारें जी जोडी 'धीरे' चालली आहे त्या जोडींतील मुलीला मग दुसऱ्या कोणीं तारीख द्यायची नाहीं अशी रूढि पडत आहे. असा स्नेहसंबंध कित्येक आठवडे, महिने, वर्षेंहि राहतो. वरचेवर जोडीदार बदलणें हा छचोरपणा मानला जातो. पण प्रत्यक्ष वैवाहिक जोडीदाराची अखेर निवड होण्यापूर्वी जोडीदारीचे अनेक प्रयोग होतातहि. पत्नीचें पोषण करण्याची ऐपत येण्यापूर्वीहि विवाह होऊं लागले आहेत. या 'धीरे चलो' पद्धतींत लैंगिक संबंध कितपत टाळले जातात? किन्से या संशोधकानें प्रसिद्ध केलेल्या अहवालांत म्हटलें आहे कीं ८० टक्के विवाहित पुरुष व ५० टक्के विवाहित स्त्रिया यांचा विवाहापूर्वी समागम झालेला असतो. मात्र बहुसंख्य उदाहरणें अशीं आहेत कीं आज जीं विवाहित दांपत्यें आहेत त्यांचे एकमेकाशींच विवाहापूर्वी हे संबंध झालेले असतात.

विवाह यशस्वी कसा करावा यासंबंधानें मार्गदर्शन करणारीं जितकीं पुस्तकें अमेरिकेंत झालीं आहेत तितकीं जगांत इतरत्र कोठेंहि नाहींत. या पुस्तकांत समागमतंत्राच्या विशिष्ट वर्णनापासून तों गृहरचना कशी करावी, भांडणें कशीं टाळावीं येथपर्यंत सर्व गोष्टी सांगितलेल्या असतात. विवाहांत यशस्वी होण्यासाठीं एक गोष्ट अवश्य मानली जाते. ती म्हणजे विवाह सुखी होण्यासाठीं उभयतांचें मानसिक व लैंगिक समाधान झालें पाहिजे ही होय. विवाह हा आर्थिक गरजेनें अथवा मुलें हवीं म्हणून केला जात नाहीं. आयुष्यभरचा जोडीदार मिळवावा, आनंद व जबाबदारी दोघांनीं जोडीनें अनुभवावी, एकमेकांनीं एकमेकाच्या व्यक्तित्वाचा विकास करावा हा विवाहांतला मुख्य हेतु असतो.

## समाजांत स्त्रीचें स्थान

हल्लीं अमेरिकन मुलीला नवरा मिळेपर्यंत ती आपला चरितार्थ चालवूं शकते. अथवा लग्न झाल्यावर जरूर वाटल्यास नवऱ्याला टाकून देऊन एकटी राहूं शकते. कांहींशा प्रमाणांत या धाकानें पुरुष बायकांना मानानें वागवितात. हल्लीं विवाहित स्त्रियांपैकीं निम्म्या रोजगारी आहेत. यामुळें पूर्वी शेतीच्या धंद्यांत स्त्री ही मिळवणारी असे त्याप्रमाणें हल्लींच्या अमेरिकन जीवनांत स्त्री मिळवता घटक झाली आहे. यामुळें नवरा हल्लीं घरकामांत पुष्कळ मदत करतो आणि

स्त्रीपुरुषांचीं कामें सरमिसळ होऊन दोघांत अधिक समानता स्थापन होत आहे. अर्थात् घरांतली सत्ता दोघांत वांटली गेली आहे, सुखें दुःखें वांटलीं जात आहेत आणि दोघांत ज्याचा स्वभाव प्रभुत्वशाली असेल ती स्त्री असली तरी संसारांत तिला आपोआप प्रभुत्व मिळत आहे.

अमेरिकेंत अनेक कारणांनीं स्त्रियांना पुरुषांपेक्षां कांकणभर वरचढपणाहि मिळाला आहे. पुरुष-मतदारांपेक्षां स्त्री-मतदारांची संख्या २४ हजारांनीं अधिक आहे. स्त्रिया पुरुषांपेक्षां अधिक काळ जगतात. १९५२ सालीं स्त्रीचें जीवनमान ७३ तर पुरुषाचें ६७ होतें. अल्सर, हृदयविकार व इतर कांहीं मोठीं दुखणीं स्त्रियांना पुरुषांपेक्षां कमी होतात. कायदा पूर्वी स्त्रियांना पक्षपात करीत असे. पण आतां मालमत्तेचा हक्क स्त्रीपुरुषांना कायद्यानें सारखाच दिलेला आहे. इतकेंच नव्हे तर पुरुषांना नसणारे कांहीं फायदेहि कायदा स्त्रियांना देतो. त्यांना सरकारी नोकरी मिळूं शकते. हल्लीं परराष्ट्रवकील, मंत्री अशा मब्या अधिकारांतल्या जागांवरहि स्त्रिया नेमल्या गेल्या आहेत. धंद्यांत गुंतलेल्या भांडवलांत स्त्रियांचें भांडवल पुरुषांपेक्षां थोडें अधिक (५१.६%) आहे.

शिवाय स्त्रीदाक्षिण्यादाखल पुरुष स्त्रियांना विशेष मान देतातच. दारांतून आंत जातांना पहिला क्रमांक स्त्रीला; जेवतांना वरचा क्रमांक स्त्रीला; तिला आधीं वाढायचें; कुटुंबांतले निर्णय स्त्रीनें घ्यायचे; सन्मान कोणाचे करायचे, राहायचें कुठें, देणगी कोणाला कोणती द्यायची इत्यादि निर्णय स्त्रियांनीं ठरवायचे असतात (अर्थात् पुरुषाची संमति मिळवावी लागतेच).

पुरुषांच्या विद्यापीठांत स्त्रिया शिक्षण घेऊं शकतात; पुरुषांचे धंदे करूं शकतात; पूर्वी वकिलींत स्त्रियांना मज्जाव असे, पण आतां स्त्रिया वकील होऊं शकतात; शारीरिक ताकदीचे खेळ खेळूं शकतात; पतीची निवड स्वतां करतात; आपल्याला मुलें किती व्हावीं हें ठरवूं शकतात; अलीकडे स्त्रिया पुरुषांप्रमाणें विजारी घालूं शकतात आणि कमींत कमी कपडा किती पेहरावा हेंहि आतां त्यांच्या मनावर आहे. सार्वजनिक संघटनांत अथवा कमिट्यांत राहून स्त्रिया नागरिक जीवनाचें नियंत्रण करतात. शेंकडा ६५ स्त्रिय कोणत्या ना कोणत्या नागरिक कमिटीवर असतात. क्लब, व्याख्यानमाला, जलसे, वाचनालयें वगैरे सर्व सांस्कृतिक क्षेत्रांत स्त्रियांचें वर्चस्व आहे.

यावरून विदेशी निरीक्षकांना वाटतें कीं या देशांतील समाजांत स्त्रीलाच प्राधान्य आहे. पण स्त्रियांची तक्रार अशी आहे कीं "उद्योगधंद्यांतल्या फारशा वरच्या जागा स्त्रियांना मिळालेल्या नाहींत; राज्यकारभारांत, शिक्षणक्षेत्रांतहि त्या

फारशा संख्येनें वर चढलेल्या नाहींत; पुष्कळ पगाराच्या जागा पुरुषांनाच मिळतात आणि सारख्याच कामाला बायकांना कमी पगार मिळतो; घराबाहेर नोकरीधंदा करणाऱ्या स्त्रियांनींहि घरकाम करावें अशी अपेक्षा असतेच." आणि "पुरुषांना मुलें व्हावीं असा शोध अजून कोणीं लावला नाहीं" अशीहि त्यांची तक्रार असणें शक्य आहे.

गृहिणीला किती भूमिका कराव्या लागतात? सैपाकीण, माता, रुग्ण परिचारिका, मोलकरीण, धोबीण, सार्वजनिक कामांतली सेक्रेटरी, बाजार-मास्तरीण, मोटारड्रायव्हर (मुलांना शाळेंत पोंचवणें, तिथून गाण्याच्या वर्गांत पोंचवणें, तिथून बालवीरशिबिरांत पोंचवणें हें आईचेंच काम असतें), माळी, समाजसेविका, क्लबसदस्य, गोड शेजारी, इतक्या भूमिका करून शिवाय नवऱ्याची सोबतीण, सल्लागार व लैंगिक सहकारी या मुख्य भूमिका तिला कराव्या लागतातच.

स्त्रीजातीच्या जीवनांत भराभर पालट होत आहे. कांहीं स्त्रिया आपल्या नव्या स्वातंत्र्याचा अनुभव संशोधनपूर्वक घेण्याच्या नादांत थोड्याशा वाहवतहि जातात आणि मग त्यामुळें येणाऱ्या नव्या जबाबदाऱ्यांचाहि विचार त्यांना करावा लागतो. कांहींचें मानसिक स्वास्थ्य भंगतें आणि मग कांहीं तरी अविश्रांत उद्योग पत्करून त्या आपलें दुःख मागें टाकतात. अमेरिकन स्त्रिया आपल्या पुरुषांबरोबर अमेरिकेंत आल्या त्यावेळीं त्यांना जंगल तोडून नांगर धरावा लागला, नवऱ्याच्या बरोबरीनें त्यांनीं वेळप्रसंगीं रणांगणहि गाजविलें. त्यावेळीं जो कणखरपणा त्यांनीं दाखविला त्याच कणखरपणानें आजच्या नव्या गरजांना त्या तोंड देत आहेत.

अजून सामान्यतः पुरुषच मजुरी करतात व स्त्री घर संभाळते. पण या दोन भूमिका दिवसानुदिवस सरमिसळ होऊं लागल्या आहेत, आणि त्याबरोबरच स्त्रीपुरुषांत समानता स्थापन होत आहे. अमेरिकन समाजांत सर्वांगीण विकासाचें जर कोणतें एक तत्त्व असेल तर तें समतेकडे सर्वांनीं खेचलें जाणें हेंच आहे. लैंगिक समता, मागल्या विद्यमान व पुढल्या पिढ्यांत समता, वर्गावर्गांत, मालक-कामगारांत, गुरुशिष्यांत, दुकानांतले नोकर व गिऱ्हाईक यांत अशी सार्वत्रिक समता अमेरिकेंत निर्माण होत आहे. केव्हां केव्हां ही समता इतकी ठळकपणें दिसून येते कीं विदेशी पाहुण्यांना हॉटेलांतला नोकर उद्धट आहे असें वाटतें. पण आम्हां अमेरिकनांना या लोकांच्या या वर्तनाचा अर्थ "मीहि तुझ्याबरोबरीचा आहें, कदाचित् थोडा वरचढहि असेन" असें त्याला म्हणायचें आहे, इतकाच वाटतो.

परंपराप्रेमी लोकांची तक्रार अशी आहे कीं वैवाहिक जीवनांतील समतेमुळें

घटस्फोटांचें प्रमाण वाढलें आहे. (शेंकडा वीस विवाह घटस्फोटानें मोडतात.) दुसऱ्या कांहींच्या मतें जबाबदारीची जाणीव कमी झाली आहे, अथवा धर्महीनता वाढली आहे. पण चर्चमध्यें प्रार्थनेला जाणाऱ्यांची संख्या हल्लीं जास्तींत जास्त असते.

घटस्फोटांची संख्या कमी मिळकतीच्या मजूर वर्गात जेवढी असते तेवढी मध्यम मिळकतीच्या अथवा डॉक्टर, वकील वगैरे व्यावसायिकांत असत नाहीं. लहान गांवांपेक्षां मोठ्या शहरांत, दक्षिण आणि ईशान्य प्रदेशापेक्षां पश्चिम व नैर्ऋत्य प्रदेशांत घटस्फोट जास्त आहेत, सुशिक्षितांपेक्षां अशिक्षितांत अधिक आहेत.

एक गोष्ट मात्र आतां नक्की झाली आहे कीं ज्या विवाहांत समाधान नाहीं तो विवाह सहिष्णुतापूर्वक नांदवायला कोणीहि राजी असत नाहीं. घटस्फोटाच्या कलंकापेक्षां वैवाहिक जीवनांतलें दुःखहि निमूटपणें सोसावें हें आतां कोणीच मानीत नाहीं. घटस्फोट इतके सतत झाल्याचें ऐकूं येत असतें कीं त्यांत कमीपणा असतो ही भावना आतां पुष्कळच कमी झाली आहे. यामुळें घटस्फोट अधिक सोपाहि झाला आहे. पण अनेकानेक मानसोपचार, विवाह यशस्वी करण्याची हमी देणाऱ्या योजना इत्यादि विविध खटाटोप विवाह टिकविण्यासाठीं चालू असतां घटस्फोटांची संख्या कां कमी होत नाहीं ?

विवाह व घटस्फोट हे दोन्ही अवघड करण्याची जास्तींत जास्त खटपट कायदा करतो. दोन्ही पक्षांनीं कराराच्या शर्ती मोडल्या तर करार रद्द झाला पाहिजे असा कराराच्या कायद्याचा नियम आहे ना ? पण विवाहाच्या बाबतींत कोर्टें हा नियम मोडतात आणि व्यभिचार इत्यादि स्वरूपाचा विवाहविनाशक गुन्हा जर दोघांनींहि केला असेल तर कोर्टें घटस्फोट देत नाहींत. एका पक्षानें असा अपराध केला असेल तर मात्र परवानगी देतात. पतिपत्नींनीं अपराधाचा पुरावा दिला अथवा कबुली दिली एवढ्याचवरून घटस्फोट देऊं नये असा बत्तीस घटक राज्यांचा कायदा आहे. नेवाडा राज्यांत घटस्फोट फार सोपा आहे, म्हणून तेथें पुष्कळ जोडपीं जातात. पण नेवाडा हा अपवाद आहे, नियम नव्हे.

घटस्फोट बहुधा आतां विवाहानंतरच्या तिसऱ्या वर्षांत होण्याचा संभव असून दोन तृतीयांश घटस्फोट मुलें नसणाऱ्यांचे होतात. यामुळें विवाहविच्छेद झाला तरी कुटुंबविच्छेद होत नाहीं. शिवाय घटस्फोटितांपैकीं शेंकडा ७० चीं पुन्हा लग्नें होतात व तीं यशस्वी होण्याचा फार संभव असतो. वधूवरांची निवड अव्यवस्थितपणें होते यामुळें घटस्फोटांची ही संख्या आश्चर्यकारक मानतां येत नाहीं. ज्या दांपत्यांना मुलें झालेलीं असतात त्यांचे घटस्फोट मात्र चिंताजनक ठरतात.

## बालगुन्हेगारी

ज्या मुलांच्या जीवनांतली सुरक्षितता उद्‌ध्वस्त झालेली नसते तीं मुलें सामान्यतः सीधें आयुष्य घालविणारीं निघतात. पण कुटुंबें मोडल्यानें जीं मुलें अनाश्रित अथवा असुरक्षित होतात त्यांचीं मनें सामाजिक दर्जाबाबत अनिश्चित व संशयग्रस्त होतात व मग त्यांच्यामध्यें बंड प्रवृत्तीहि उद्भवते. वांशिक अथवा अन्य कारणांनीं ज्यांना वाईट वागणूक मिळते अथवा गलिच्छ वस्त्यांत जीं मुलें वाढतात त्यांचें जीवन अधिकच बिकट होतें. शाळांत अथवा समाजांत आपणापेक्षां अधिक चांगली वागवणूक इतरांना मिळत असलेली त्यांना स्पष्ट दिसते. मग स्वतांच्या बचावा-साठीं अशा शाळांपासून व समाजापासून दूर जाणें, आपसांत एकजूट करणें व ज्या संघटना आपल्याविरुद्ध पक्षपात करतात त्यांच्यावर हल्ले करणें असे मार्गहि मुलें अवलंबतात. व्यक्तिस्वातंत्र्याच्या गुणाचा सर्वत्र गौरव केलेला ऐकूं येत असल्यानें हीं मुलें बंड करून लोकांचें लक्ष वेधून घेतात व त्यांतच समाधान मानतात. जेथें विशिष्ट वांशिक गट, त्यांच्याविरुद्ध झालेल्या पक्षपातामुळें, दरिद्री व अडाणी राहतात अशा ठिकाणीं वाम मार्गानें जाऊन परिस्थितीवर सूड घेण्याची प्रवृत्ति बळावत असते. अशा क्षेत्रांत गुन्हेगारी विशेष प्रकारें माजते.

अमेरिकेला जीं अपयशें आजवर आलीं आहेत त्यांत बालगुन्हेगारीबाबत आलेलें अपयश हें फार ठळक असें अपयश होय. वर या गुन्हेगारीचीं जीं कारणें सांगितलीं त्याहून फार अधिक गुंतागुंतीचीं इतर अनेक कारणें आहेत. युद्ध-कालीन व युद्धोत्तरकालीन परिस्थिति, वाईट व कमी घरें, रात्रंदिवस घराबाहेर कामावर असणारे आईबाप, कुठेंहि बूड स्थिर न होतां सतत करावा लागणारा मुलुखपालट, घरांतलें दारिद्र्य आणि भांडणें यांनीं वैतागलेल्या मनाला कांहीं तरी भडक वागून हुरूप आणण्याची इच्छा, राहणीच्या दर्जात सतत होणारे फरक, हीं व आणखी अशीं अनेक कारणें बालगुन्हेगारीला जन्म देतात. गुन्हेगारी हा फक्त एक मानसिक रोग असून शिक्षेच्या धाकानें तो बरा होतो असें मानणें हें अगदीं चूक आहे. गुन्हेगारीचीं मुळें समाजजीवनांत रुजलेलीं असतात. पक्षपात, समाजापासून दूर लोटणें, दारिद्र्य, अज्ञान इत्यादि गोष्टी जितक्या कमी होतील तितक्या प्रमाणांत गुन्हेगारीला आळा बसेल. म्हणून गलिच्छ वस्त्या नाहींशा करणें, घरें सुधारणें, करमणुकीचीं क्षेत्रें वाढविणें या धोरणाला विरोध करणाऱ्यांना जे मतदार मतें देतात अथवा जे इतरांना पक्षपातानें वागवितात ते मतदार

स्वतांच गुन्हेगार होत. समाजांतील हीन वर्गांत गुन्हेगारी असते म्हणून त्या वर्गांना गुन्हेगारीनें वागविलें पाहिजे असें या लोकांचें म्हणणें असतें. पण हें चूक आहे. विषमता व पक्षपात नष्ट करणें हाच या लोकांना सुधारण्याचा उपाय आहे.

हा प्रश्न अवघड आहे हें खरें, पण दरसाल लक्षावधि परकीयांना आपल्या समाजांत सामावून घेण्याची संवय ज्यांच्या अंगीं इतिहासकाळांत बाणली आहे त्या अमेरिकनांना हा प्रश्न आपणास खास सोडवितां येईल असें आत्मविश्वासानें म्हणतां येईल. लोकांचें राहणीचें मान उंचावत आहे ही गुन्हेगारी कमी होण्याच्या दृष्टीनें अनुकूल गोष्ट आहे. शिवाय सामाजिक शास्त्रांचें संशोधन आणि त्या संशोधनाचा समाजकार्यकर्त्यांनीं चालविलेला उपयोग यामुळें गुन्हेगारीसंबंधीं लोकांचें ज्ञान वाढतें आहे हीहि या दृष्टीनें अनुकूल गोष्ट आहे. बालगुन्हेगारांना सराईत गुन्हेगारांसारखें न वागवतां त्यांना सहानुभूतीनें वागवावें म्हणून बाल-गुन्हेगारांचीं कोर्टें वेगळीं करण्यांत आलीं असून त्यांना सुधारण्यासाठीं मानसोपचार करण्यांत येतात हीहि चांगली गोष्ट आहे.

गुन्हेगारीला तोंड देण्याच्या योजना साऱ्या अमेरिकाभर अमलांत येत आहेत. पेन्सिल्व्हॅनियांतल्या एका जजाला वाढत्या गुन्हेगारीची काळजी वाटूं लागल्यामुळें त्यानें तेथल्या रोटरी क्लबाचें मन वळवून त्यांना बालगुन्हेगारांसाठीं एक 'प्रोबेशन' संघटना (सुधारसंघटना) काढायला लावलें. तिनें नफा करायचा नाहीं असें मुख्य तत्त्व होतें. या संघटनेनें एक फंड उभारून एक सुधारअधिकारी नेमला. नंतर त्यानें एक स्वयंसेवी साहाय्यकांची समिति नेमण्यास त्यांना सांगितलें. या संघटनेनें प्रचार करून "गुन्हेगारी हा वैयक्तिक प्रश्न नव्हे तर सामाजिक प्रश्न आहे आणि शिक्षा करण्यापेक्षां गुन्हे घडूंच नयेत अशी तजवीज करणें हा खरा मार्ग होय" हें तत्त्व लोकांना शिकविलें. हें प्रचारकार्य हा या संघटनेचा महत्त्वाचा कार्यक्रम होता. एखाद्या जजानें गुन्ह्यांना आळा घालण्यासाठीं सरकारकडे न पाहतां स्वयंसेवी सामाजिक संघटनेचें साहाय्य मागावें हें अमेरिकेचें खास वैशिष्ट्य आहे. सरकारकडून तज्ज्ञांची मदत मिळेल; पण स्वतंत्र ऐच्छिक संघटना लोकांत जागृति जशी निर्मूं शकेल तशी सरकार निर्मूं शकणार नाहीं. या ऐच्छिक संघटना हें गुन्हेगारसेवेचें काम हातीं घेऊन प्रथम आपल्या सदस्यांना कामाला लावतात आणि नंतर समाजांतल्या इतरांनाहि त्या कार्यांत ओढून सर्वांच्याच मनांत लोक-कल्याणाच्या आवश्यकतेची जाणीव निर्माण करतात.

वर उल्लेखिलेल्या सुधारसंघटनेच्या अधिकाऱ्याला फ्रॅंक नांवाच्या बालगुन्हेगाराचें प्रकरण हाताळावें लागलें. फ्रॅंक हा मुलगा शाळेंतून व घरांतून सदा पळून जात

असे आणि कांहीं बारक्या-बारक्या चोऱ्याहि त्यानें केल्या होत्या. फ्रँकला चांगलेंच गणिती डोकें आहे असें अधिकाऱ्याला दिसून आलें. तेव्हां त्यानें फ्रँकची शाळा सुटल्यावर फ्रँकच्या गणिती डोक्याला उद्योग मिळेल असें काम त्याला मिळवून दिलें. जुन्या मोटारींच्या दुरुस्तीची फ्रँकला हौस आहे असेंहि त्या अधिकाऱ्याला आढळलें. तेव्हां त्याला १९४० सालचें एक मोटारचें मॉडेल देण्यांत आलें. आतां फ्रँकची विध्वंसक वृत्ति कमी होऊन समाजोपयोगी अशी विधायक वृत्ति त्याच्या ठिकाणीं बळावली. त्याची हिंमत व त्याचा संतापीपणा जो गुन्हेगारीकडे चालला होता तो आतां विधायक कर्तृत्वाच्या दिशेनें चालू लागला.

विशीच्या आंतबाहेर असणाऱ्या मुलांना इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां "आपली समाजाला गरज आहे आणि प्रौढांच्या जगांत उपयुक्त असें कार्य आपण करूं शकतों" अशी ठाम जाणीव असण्याची फार जरुरी आहे. सर्व अमेरिकाभर आतां या प्रौढकुमारांना आकृष्ट करणारे विधायक कार्यक्रम चालू झालेले असून त्यांतले कांहीं स्वतां या प्रौढ कुमारांनींच सुरू केलेले आहेत. न्यू जेरेसी येथील पॅस्कॅक गांवांत एका हॉस्पिटलसाठीं फंड उभारण्याचें काम एका युवक-संघटनेनें पत्करलें. त्यासाठीं नाचांत काम करण्यापासून प्रदर्शनाचीं तिकिटें विकण्यापर्यंत सर्व कामें युवकांनीं केलीं. थोडेंसें मार्गदर्शन केलें म्हणजे लहान मुलांची शक्ति उपयुक्त कामीं लावतां येते व मुलांनाहि समाजजीवनांत आपला विकास कसा करून घ्यावा हें कळतें.

## वयोवृद्धांचा प्रश्न

मुलांचा व युवकांचा प्रश्न जितका अवघड तितकाच वृद्धांचा प्रश्नहि अमेरिकेंत अवघड झालेला आहे. दोन्ही बाबतींत उपेक्षा हेंच तो प्रश्न अवघड होण्याचें कारण आहे. अमेरिकन समाज भराभर वाढतो आहे. औद्योगिक उत्कर्षाला कणखरपणाची गरज विशेष असते. पण यामुळेंच लहानवयी व वयोवृद्ध यांच्या शक्तीचा उपयोग कसा करावा हें अमेरिकनांना अजून कळलेलें नाहीं. युवकांना आपली शक्ति खर्च करण्याला जबाबदारीचीं कामें नसतात तर वृद्धांच्या हातून त्यांचीं कामें काढून घेतलीं जात आहेत. माणसांना ६५ वे वर्षी अथवा साठावे वर्षीहि सेवानिवृत्त व्हावें लागतें.

अलीकडे वयोवृद्धांची संख्या वाढत चालल्यामुळें वयोवृद्धांचे कार्यक्रम सुरू करण्यांत येत आहेत. सार्वजनिक संस्था त्यांच्यासाठीं क्लब काढतात. तेथें त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणें खेळ, नाच, हस्तव्यवसाय, वाचन अथवा एकादा छंद

अथवा नुसत्या बैठ्या गप्पा असें कांहींहि करतां येतें. आपल्या वयोवृद्ध पित्याला अशा कार्यक्रमाचा उपयोग किती झाला हें सांगतांना एक बाई म्हणाली, "त्यांना आतां किती तरी निरनिराळ्या गोष्टी आवडूं लागल्या आहेत. ते आतां अगदीं वेगळेच झाले आहेत." या क्लबांतला एक वृद्ध म्हणतो, "खरोखर हा भूस्वर्ग आहे."

म्हातारपणीं आपण परावलंबी होऊं याची पूर्वी अनेकांना मोठी भीति वाटे. पण आतां सेवानिवृत्तांना पेन्शन देण्याची पद्धत पडल्यानें त्यांना समाजांत सुरक्षितता प्राप्त झाली आहे. ही पेन्शन फार थोडी असते. पण म्हातारा-म्हातारीला जर स्वतांचें घर असेल तर तेवढ्या पेन्शनींत साधेपणानें राहतां येतें. एकादी विधवा अथवा विधुर मुलाकडे अथवा मुलीकडे जाऊन राहील तर आपल्या खर्चाचे पैसे ते त्या पेन्शनींतून देऊं शकतात. ज्यांना परिचर्येची गरज असते ते उपचारगृहांत राहतात. अलीकडेच हीं उपचारगृहें निघालीं आहेत. पण आतां तीं सर्वत्र आहेत. त्यांत आठवड्याला कमींत कमी चाळीस डॉलरमध्यें आजारी माणसांना धंदेवाईक परिचारकाकडून सेवा मिळते. शहरांत भाड्याच्या घरांत राहणाऱ्या सेवानिवृत्त वृद्धांची परिस्थिति मोठी करुणापूर्ण असते. हॉटेलांत थोडेंसें जेवावें, एकाकीपणामुळें आपल्याशींच कांहीं तरी गुणगुणावें, जिवंत प्राण्याशीं संबंध यावा यासाठीं बागेंतल्या कबुतरांना खायला घालावें असे दिवस त्यांना कंठावे लागतात. पण अलीकडे ज्यांना सोबत हवी त्यांना सोबत देण्याची तजवीज वाढत्या प्रमाणांत करण्यांत येत आहे.

धंदेव्यवसायांतून निवृत्त झालेल्या माणसाला जर आपलें कर्तृत्व पूर्णपणें कामीं लावावें असें वाटत असेल तर समाजसेवाकार्य करतां येतें. लोकांचें आरोग्य, मन आणि भावना सुधारण्यासाठीं दर शहरांत अनेक स्वयंसेवकसंघटना असतात. त्यांना नेहमीं स्वयंसेवक हवे असतात. आणि वयोवृद्ध स्वयंसेवकांच्या कार्यामुळें समाजाची सुधारणा फार चांगल्या प्रकारें होते.

समाजशास्त्रकार एक गोष्ट सर्वांच्या नजरेस प्रामुख्यानें आणीत आहेत ती ही कीं वृद्धांना अलीकडे कमी मान दिला जात असून त्यांचें वजन व दर्जा कमी होत आहे. कांहीं अंशीं ही गोष्ट खरी आहे. तरी पण मुलांचा सल्लागार व नातवंडांचा खेळगडी या नात्यानें आजोबा कुटुंबांत फार महत्त्वाची कामगिरी करतात. आजोबांची भेट ही अमेरिकन मुलांना अगदीं चिरस्मरणीय वाटते. आजीबाईचें विणकामकौशल्य व कथापुराणांतली तिची विद्वत्ता मुलांना आदरणीय वाटते. मुलांच्या सेवेसाठीं वृद्धांना फुरसत असते. आपण दोघेंहि जगाच्या

धांदली जीवनाच्या क्षितिजावर आहों या जाणिवेनें एकमेकांना एकमेकाबद्दल ओढ वाटते. वयोवृद्धांबद्दल मुलांना एक गूढ आकर्षण आहे. सगळा इतिहास आणि अज्ञात भूतकाळ वृद्धांच्या रूपानें तरुणांना दिसत असतो. कुटुंबाची सुरक्षितता, कायमपणा व गतिमानता यांचा वयोवृद्ध आजोबा हा पुरावाच आहे असें तरुणांना वाटतें. सत्तर-ऐंशीं वर्षांपर्यंत वडील माणसें जगतात एवढ्यानेंच त्या कुटुंबाला एक प्रकारची प्रतिष्ठा व बळकटी येते. अमेरिकेंत या गोष्टी अजून कायम आहेत.

कुटुंबांचीं किती तरी कामें आतां सामाजिक संघटनांनीं घेतलीं आहेत. तरी पण प्रेमाचें व निष्ठेचें जग अजून कुटुंब हेंच असून जीवनांतल्या अगदीं पहिल्या प्रवृत्ति निर्माण होण्याचें, लोकशाहीचें बाळकडू मिळण्याचें स्थान कुटुंब हेंच आहे. जेथें आईबाप अज्ञ असतात तेथें मात्र अडाणीपणा, मनोभंग व इतर वाईट प्रवृत्ति मुलांत निर्माण होतात. म्हणून कुटुंब संस्था अपायकारक ठरण्याचा संभव असला तरी एकमेकांशीं जमतें घेऊन राहण्याची नागरिकांना अवश्य अशी जी संस्कृति तिचें शिक्षण मुख्यतः कुटुंबांतच मिळतें. ज्या कुटुंबांत हें कार्य फार चांगल्या प्रकारें होतें त्या कुटुंबांतून उच्च दर्जाचे नागरिक निर्माण होतात आणि कुटुंबांत पोसलेल्या प्रेमप्रवृत्ति हे नागरिक साऱ्या मानवजातीपर्यंत पोंचवितात.

## प्रकरण सहावें

# अमेरिकेचा स्वभाव

परदेशी पाहुणे जेव्हां अमेरिकन लोकांचा स्वभाव वर्णन करूं लागतात तेव्हां अमेरिकन लोक अगदीं गोंधळून जातात. "सारे अमेरिकन अगदीं प्यूरिटन म्हणजे अगदीं वैराग्य वृत्तीनें राहणारे आहेत" एकजण म्हणतो. तर दुसरा लगेच म्हणतो, "अमेरिकन लोक सदा उपभोगासंबंधानेंच विचार करीत असतात." एका प्रसिद्ध पाहुण्यानें म्हटलें आहे, "अमेरिकन लोक उद्योगांत वेळ फार घालवतात. त्यांना खेळायचें माहीतच नाहीं." यावर एकजण फटकारतो "त्यांना उद्योग तरी कुठें करावा लागतो? त्यांचीं यंत्रें त्यांचीं सर्व कामें करतात." "अमेरिकन स्त्रिया म्हणजे निर्लज्ज वेश्या आहेत" एकजण म्हणतो. दुसरा दुरुस्ती करतो, "छेः छेः, पोकळ ऐटबाज आहेत एवढेंच." आणि मुलें कशीं आहेत? एक विदेशी पाहुणा सांगतो, "अमेरिकन पोरें काय छान! सदा मोकळेपणें हिंडतात, अगदीं नैसर्गिक राहतात." तर दुसरा म्हणतो, "नैसर्गिक खरेंच. कारण अमेरिकन मुलें शुद्ध पशूसारखीं राहतात. त्यांना रीतभात नाहीं, वडिलांबद्दल आदर नाहीं. नुसतीं तीं छोटीं छोटीं वासरें आहेत."

खरोखर अमेरिकन स्वभाव म्हणून सर्व अमेरिकनांचा एकसारखा एकच स्वभाव असूं शकेल का? इंग्लिश स्वभाव, तुर्की स्वभाव, चिनी स्वभाव म्हणून एकेका राष्ट्राचा एकेक स्वभाव कसा असूं शकेल? शिवाय इतर कोणत्याहि राष्ट्रांतल्यापेक्षां अमेरिकेंतल्या नागरिकाचें व्यक्तित्व अधिकच गुंतागुंतीचें आहे. कारण जगाच्या सर्व भागांतून दरसाल विविध वंशांचीं व संस्कृतींचीं माणसें येतात. शिवाय अमेरिकेंतहि प्रादेशिक विविधता किती तरी आहे. शिवाय धर्मश्रद्धांचेहि शेंकडों प्रकार अमेरिकेंत असून त्यांचे परिणाम व्यक्तिमात्रावर वेगवेगळे होतात. शिवाय कोण कोणत्या पिढींत येथें आला, तो स्वतःच परदेशांतून येथें आला

कीं त्याचा बाप आला कीं आजा आला कीं त्याच्या पूर्वीचा कोणी पूर्वज आला यावरून निरनिराळ्या पिढींत सांस्कृतिक फरक पडत जातो.

असें असूनहि सारे अमेरिकन हे एकसारखेच मानायचे असा मोह टीकाकारांना होतोच. तरी पण थोडें खोल पाहणाऱ्यांना अमेरिकन जीवनांतला परस्परविरोध पाहून गोंधळल्यासारखें होतें. सारेच अमेरिकन लोक उद्योग खूप करतात आणि खेळतातहि खूप. प्रवास, छावण्या, शिकार, खेळ पाहणें, मद्य पिणें, धूम्रपान करणें, सिनेमा-टेलिव्हिजन पाहणें, वृत्तपत्रें व नियतकालिकें वाचणें इत्यादींसाठीं जगांतल्या इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षां अमेरिकन लोक अधिक पैसा व वेळ खर्च करतात. त्याचबरोबर चर्च, समाजकार्य, हॉस्पिटलें, इतर विविध धर्मादाय यांवरहि अमेरिकन लोक इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षां अधिक पैसा खर्च करतात. प्रत्येक कामांत अमेरिकनांची घाई असते, पण विश्रांतींतहि खूप वेळ अमेरिकन लोक घालवितात. दुसऱ्या व्यक्तीच्या हक्कांना जपण्याबावत अमेरिकन लोक अगदीं हळवे असतात आणि दुसऱ्याशीं जमतें घेणें हें त्यांच्या अंगवळणींच पडलेलें असतें. अमेरिकन लोक भव्यतेचे पूजक आहेत, तरी पण सामान्य माणूस हा त्यांचा आदर्श असतो, मग तो सामान्य धंदेवाला अथवा अगदीं साधा नागरिक असो.

## अमेरिका यशाची पुजारी

अमेरिकनांसंबंधानें त्यांना स्वतःला व बाकीच्या जगाला एक गोष्ट मान्य आहे ती ही कीं, यशस्वी जीवनाला अमेरिकन लोक फार महत्त्व देतात. यशस्वी जीवन याचा अर्थ सुखदायी वस्तूंचा लाभ असाच केवळ नाहीं. विशेष ठळक अशी कीर्ति, लोकमान्यता त्यांना हवी असते. आपला मुलगा धंदेवाला न होतां धर्मगुरु झाला तरी आईबापांचें समाधान असतें. पण मग त्याचें चर्च केवढें मोठें, त्याचा श्रोतृसमुदाय केवढा मोठा, यावरून त्याचें यश ठरतें.

अमेरिकेंत यशस्वी जीवनाला संधि इतकी आहे कीं त्या संधीचा फायदा न घेणें म्हणजे तो एक राजद्रोहाचा गुन्हाच होय असें लोकांना वाटतें. अमेरिका ही अगदीं नवी भूमि, तिच्या विकासासाठीं उमेदीचीं, हिंमतीनें उद्योग करणारींच माणसें हवीं होतीं. स्वतांच्या फायद्यासाठींच नव्हे तर, त्याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, सर्व समाजाच्या हितासाठीं झटणारीं माणसें हवीं होतीं. म्हणून एकाद्यानें लौकिक जीवनांत यश मिळविलें तर तो त्याचा स्वार्थ होय असें अमेरिकन लोक मानीत नाहींत. कारण व्यक्तीचें यश समाजालाहि

उपकारक ठरतें असा अनुभव त्यांना आलेला आहे. फोर्ड, कार्नेजी, रॉकफेलर यांनीं स्वतांसाठीं प्रचंड दौलती उभारल्या. पण त्याबरोबरच त्यांनीं अशी एक अर्थसंघटनाहि उभारली कीं जिच्यामुळें लक्षावधि लोकांना अधिक सुखकारक परिस्थिति मिळाली, अधिक आरोग्य मिळालें, आणि शिक्षणाची अधिक चांगली संधि मिळाली. परदेशीयांना कांहींहि वाटो, आम्हां अमेरिकनांना तरी या धनाढ्य व्यक्तींचें वैभव हें समाजालाहि हितकारी ठरलें असेंच वाटतें.

अमेरिकेंत स्पर्धाप्रवृत्तीला फार मान असल्यानें अमेरिका आक्रमक प्रवृत्तीची असणें हें अपरिहार्य आहे. या आक्रमक प्रवृत्तीवर कायद्यानें अनेक बंधनेंहि घातलीं आहेत. अमेरिकन लोकांच्या अंगीं असणाऱ्या दणकटपणामुळें येथली अर्थसंघटनाहि खंबीर झाली आहे. पण ह्यामुळेंच व्यक्तिशः अनेकांना बराच जाच होतो. पहिल्यानें अमेरिकेंत आमचे पूर्वज आले तेव्हां त्यांना हा आक्रमकपणा अवश्य होता. पण आतां या आक्रमक वृत्तीमुळें समाजांतील व्यक्तिस्वातंत्र्यावर संकट येण्याचाहि संभव आहे. कारखान्यांतल्या कामगाराला वर्षानुवर्ष आपणास एकच एक काम करावें लागत असून आपली प्रगति खुंटली आहे असें वाटलें तर त्याची आक्रमक वृत्ति जागृत होऊन ती वांशिक विद्वेषाचें रूप धारण करते अथवा तो मालकाशीं भांडूं लागतो अथवा दारुडा होतो अथवा कामाकडे दुर्लक्ष करून अपघात करतो अथवा त्याच्यांत मानसिक विकृति होते.

मानसशास्त्रज्ञांच्या मतें वैभव आणि कीर्ति यांचा पाठलाग करण्याची जी प्रवृत्ति अमेरिकनांचे अंगीं आहे ती भयप्रवृत्तीला मारक असून मनाचा भकासपणा नाहींसा करणारी आहे. ज्या समाजाचें रूप जोमदारपणें सदा पालटत असतें अशा समाजांत हिंमतवान् माणसाला दुसऱ्याबद्दल स्पर्धा वाटून आपणहि प्रगतीचा केवढा पल्ला गाठूं शकतों हें प्रयत्नानें पाहण्याची ईर्ष्या वाटणें अपरिहार्यच आहे.

यशःप्राप्तीची ईर्ष्या ज्यांच्या अंगीं मुसमुसत असते अशांना ही समाजव्यवस्था फार हितकर ठरते. पण कमकुवत माणसांना ती चांगली ठरत नाहीं. अपयशाची भीति, स्पर्धा करणाऱ्यांचा धाक, स्वतांच्या कर्तृत्वाबद्दलचा अभिमान डळमळणें इत्यादि आपत्ति कमकुवत माणसावर येतात. त्यापुढें त्यांचा टिकाव लागत नाहीं. अशा परिस्थितींत या माणसांना प्रेमाची पाखर हवी असते. म्हणून अमेरिकन समाजांत प्रेम आणि यश यांची साखळी पडली आहे. गोरर म्हणतो, अमेरिकन लोक प्रौढकुमारावस्थेंत येतात त्यावेळीं प्रेम आणि यश यांतला फरक त्यांना अदृश्य होतो. यश हेंच प्रेम आणि प्रेम हेंच यश असें त्यांना वाटूं लागतें. शाळेंत यशस्वी असणाऱ्या मुलांवर आईचें प्रेम अधिक असून ती अशा मुलाचा इतर

मुलांपेक्षां गौरवहि अधिक करते यामुळें हें मातृप्रेम मिळविण्याच्या स्पर्धेनेंहि मुलें अभ्यास अधिक झटून करतात.

समाजांतील उच्चनीचता, आनुवंशिक धंदा अथवा शिक्षण यांपैकीं कशानेंहि माणसाच्या यशाला तत्त्वतः मर्यादा पडत नाहीं. म्हणून "बस, आतां अधिक लोभ पुरे, मिळालें आहे तें संभाळूं म्हणजे झालें!" असें केव्हांच म्हणावें लागत नाहीं. तत्त्वतः तरी कोणीहि माणूस अमेरिकेंत राष्ट्रपति होऊं शकतो, यामुळें महत्त्वाकांक्षेमागें लागणें हें एक नैतिक कर्तव्यच ठरतें. माणूस कोणत्या वर्गांतला आहे यावरून त्याचा दर्जा ठरत नसून त्यानें यश कोणतें व किती मिळविलें यावरून त्याचा दर्जा ठरतो. श्रीमान् अथवा प्रतिष्ठित घराण्यांत जन्मल्यानें नांवलौकिक मिळत नाहीं. तुम्ही कुठें होतां व तिथून कुठवर चढलां यावरून तुम्ही किती थोर आहां हें लोक ठरवतात.

अमेरिकनांना सतत उद्योग हवा असतो. तें त्यांचें अन्नपाणी आहे. अलीकडे अमेरिकनांना खेळ आवडूं लागले आहेत. पण खेळतांना उद्योगांतला जिव्हाळा ते खेळांत ओततात. बर्फावरून घसरायचा खेळ खेळायचा असेल तर अमेरिकन लोक तो इतका जोरानें खेळतील कीं तेवढ्या वेगांत घोडा मरून जाईल. मोठी सुटी असली तर अमेरिकन माणूस रोज पांचशें-सहाशें मैल मोटारनें धावेल, तासाला ६० मैल या वेगानें धावून दिसतील ते देखावे पाहील, मध्यें थांबलाच तर कॅमेऱ्याचें बटन दाबण्यापुरता थांबेल आणि घरीं मुक्कामाला गेल्यावर फोटोग्राफ पाहून आपण काय पाहायला हिंडलों हें समजून घेईल.

अगदीं अलीकडेपर्यंत अमेरिकनांना पुष्कळ काम हातांनीं करण्यासारखें असे, हातांनीं करावेंच लागे; आरंभीं कोणत्याहि परिस्थितींतल्या अथवा दर्जांतल्या माणसाला कुदळ, कुऱ्हाड, खोरें हातीं घ्यावेंच लागे. धर्मगुरूला झाडें तोडून शेत नांगरावें लागे. शिक्षक, डॉक्टर, मॅजिस्ट्रेट यांना खांद्यावर बंदूक घेऊन आपल्या वसाहतीचें संरक्षण करावें लागे. शेतकऱ्याला आपलीं हत्यारें आपणच करावीं लागत, घोड्याचें खोगीर, घरांतील उपकरणें सारीं त्याचा तोच करी. लोहार, सुतार, जिनगर, दारू तयार करणारा, पशुवैद्य त्याचा तोच असे. शेतकऱ्याची बायको ही स्वतः साळी, कोष्टी, वैद्य सर्व कांहीं स्वतःच असे.

आपल्याला साऱ्या गोष्टी स्वतः करतां आल्या पाहिजेत असें अमेरिकनांना अजूनहि वाटत असतें. कॉलेज प्रोफेसर टेबलें-खुर्च्या दुरुस्त करतात अथवा खेड्यावर जाऊन जुनीं घरें सुधारतात. बँकवाले एप्रॉन घालून सैपाक्याचें, वाढप्याचें काम करतात. जवळजवळ सर्वांना निरनिराळीं हत्यारें वापरतां येतात.

पाण्याचे नळ, विजेचे दिवे, बटणें व तारा बसवणें, दुरुस्त करणें, टेबलें-खुर्च्या पुन्हा शोभिवत करणें, भिंती रंगवणें हीं कामें सर्वांना येतात. हीं 'हलकीं' कामें करण्यांत कोणी कमीपणा मानीत नाहीं. उलट हीं कामें करतां न येणारा माणूस उपहासास्पद ठरतो.

प्रत्येक काम करण्याच्या या हव्यासाबरोबरच धंदा बदलण्याचाहि हव्यास अमेरिकनांना फार आहे. बँकवाल्याचा मुलगा शेतकरी झाला अथवा शेतकऱ्याचा मुलगा बँकर झाला तर कोणालाच त्यांत आश्चर्य वाटत नाहीं. एकादा कॉलेज प्रोफेसर पुढें धंदेवाला होतो, अथवा एकादा तरुण प्रथम कर्ज काढून एक ट्रक चालवायला लागतो व आयुष्याच्या शेवटीं अनेक ट्रकांचा एक काफिला त्याच्या मालकीचा होतो, या नेहमीं घडणाऱ्या गोष्टी आहेत. अध्यक्ष ट्रुमन हा शेतकरी होता, कपड्यांचें साहित्य तयार करून विकणारा होता, सैन्यांतला अधिकारी होता, पुढें वकील झाला, शेवटीं राजकारणांत पडला. जेम्स ब्रायंट कॉनंट हा रसायनशास्त्रज्ञ होता, पुढें हार्वर्ड विद्यापीठाचा अध्यक्ष झाला आणि ही शैक्षणिक क्षेत्रांतील सर्वोच्च जागा सोडून हायकमिशनर झाला व शेवटीं जर्मनींत वकील म्हणून गेला. आन्द्रे मोरॉ लिहितो, "युरोपीय माणूस व्यवसाय निवडतो व पत्करतो तो जीवनव्यवसाय म्हणून; पण अमेरिकनांना प्रत्येक व्यवसाय हें एक नवें साहस वाटतें."

यशहि मिळावें आणि प्रेम व कौतुकहि मिळावें या महत्त्वाकांक्षा कांहींशा परस्परविरोधी असल्यानें माणसाच्या व्यक्तित्वावर दोन विरुद्ध बाजूंनीं ताण पडतो. यश हवें तर आक्रमकपणा अंगीं हवा, पण दुसऱ्याचें प्रेम आणि पसंती हवी असेल तर सौम्य व स्नेहयुक्त वर्तन हवें असतें. यामुळें गटप्रवृत्ति उद्भवली आहे. एका मोठ्या इमारतींतील रहिवाशांची संघटना, एकाच चर्चच्या सदस्यांची संघटना, माजी सैनिकांची संघटना, अशा संघटना निर्माण होऊन दृढ मैत्रीचें क्षेत्र निर्मितात. मैत्रीचें क्षेत्र असें निश्चित झाल्यावर याच्या बाहेरचें क्षेत्र आक्रमणाचें म्हणून ठरवितां येतें. इतर वंश व इतर धर्म यांना संशयानें व वैरभावानें वागवण्याची प्रवृत्ति जी अमेरिकेंत आढळते तिचें हें एक अंशतः कारण असतें.

ज्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावून आजची अमेरिका वसविली ते लोक बहुतेक अतिशय दरिद्री होते. त्यांनीं कष्ट अतोनात केले; शिल्लक टाकण्यासाठीं पोटाला चिमटा घेतला आणि धंदा अथवा शेती खरीदण्यासाठीं या शिलकेचा उपयोग केला. हजारों मैल महासागर ओलांडून माणसें अमेरिकेंत आलीं तीं मतदानस्वातंत्र्यासाठीं नव्हे तर धनावर मालकी स्थापण्याच्या स्वातंत्र्यासाठीं

आलीं. यामुळें आपण उभारलेला धंदा अथवा आपण लावलेली जमीन या धनाच्या मालकीला त्यांनीं स्वाभाविकच फार महत्त्व दिलें.

नवीन वसाहत करणाऱ्यांच्या ठिकाणीं जो धनलोभ दिसून येतो त्याहून पैशासंबंधींची भावना त्यांची अगदीं वेगळी आहे. ह्यूगो मॅन्स्टरबर्ग हा जर्मन मानसशास्त्रज्ञ लिहितो, "अमेरिकन माणसाचा सुवर्णलोभ हा सुवर्णप्रेमाचा द्योतक नव्हे. त्याच्या कर्तृत्वाचें निदर्शक म्हणून तो सोन्यावर प्रेम करतो. म्हणून अमेरिकन माणूस सुखलोलुप असून ध्येयवादी नाहीं असें मानणें हें चूक आहे. एकादा चित्रकार पैशासाठीं राबतो असें जेवढ्या अर्थानें म्हणतां येईल तितक्या अर्थानें अमेरिकन धंदेवाला पैशासाठीं राबतो म्हणतां येईल." दोघांनाहि पैशाचें खास प्रेम नसून आपलें कर्तृत्व समाजाला आवडल्याची खूण म्हणून त्यांना पैसा हवा असतो.

यशाचा पुरावा म्हणून कीर्ति, प्रशंसा यांची गरज असते तशीच व त्याचसाठीं पैशाची गरज अमेरिकनाना वाटतें. पण पैसा चिक्कूपणानें सांठवणें हें अमेरिकनांना महत्त्वाचें वाटत नाहीं. पैसा नुसता सांठविण्याच्या लोभानें एकादा माणूस कंगालपणें राहील अथवा प्रसिद्ध धर्मादाय संस्थांना उदारपणें देणगी देणार नाहीं अथवा आपणाहून गरीब व गरजू नातलगांना मदत करणार नाहीं तर अशा माणसाचा अमेरिकन लोक तिटकारा करतात.

म्हणून अमेरिकेंत येणाऱ्या विदेशी पाहुण्याला अमेरिकनांच्या अंगीं जो धनलोभ दिसतो तो धन सांठविण्याचा लोभ नव्हे. पैसा मिळवावा खूप आणि खर्चावाहि खूप असा तो धनलोभ असतो. वास्तविक ही मनःप्रवृत्ति खास अमेरिकेची नसून जगांतल्या सर्व मध्यम वर्गाची आहे. पण अमेरिकेंत सारे लोक मध्यमवर्गीयच असल्यामुळें ही प्रवृत्ति खास अमेरिकन आहे असें वाटतें इतकेंच.

अमेरिकेला फार मोठा कच्च्या मालाचा पुरवठा ईश्वरकृपेनें मिळाला आहे. मंदीच्या काळांत अमेरिकेला एक धडा मिळाला कीं आपली संपत्ति बहुसंख्य जनतेच्या हितासाठीं न वापरणारें धनवान् राष्ट्रहि शेवटीं दरिद्री होतें. ही चूक पुन्हा करायची नाहीं असें अमेरिकेनें ठरविलें आहे. हल्लीं अमेरिका जें धन निर्माण करतें त्यांतला बराच भाग परदेशीं पाठविते. त्यांत शेतीची व औद्योगिक यंत्रसामग्रीहि असते. जगाच्या इतर भागांतहि उत्पादन व उपभोग वाढावा हा यांत हेतु असतो.

उत्पादनाची पातळी उंचावली कीं सुखसाधनांचा पुरवठाहि वाढतो हें निर्विवादच आहे. आणि अमेरिकनांना नित्य नव्या, चकचकीत, मऊ, उत्तम रचना

केलेल्या, कार्यक्षम व मानवी श्रम कमी करणाऱ्या वस्तु आवडतात हेंहि खरें आहे. घरीं रोज ब्रेड येते ती कापून येते यामुळें गृहिणीला ती कापावी लागत नाहीं. ब्रेड भाजण्याच्या टोस्टरमध्यें घातल्याबरोबर दोन्ही बाजूनें भाजण्यासाठीं पूर्वी ती फिरवावी लागे. पण आतां सुधारलेल्या टोस्टरमध्यें दोन्ही बाजू एकदम भाजल्या जातात. पूर्वी भाजलेला टोस्ट वर उचलण्यासाठीं हँडल हलवावें लागे. पण आतांच्या टोस्टरमध्यें टोस्ट भाजतांच आपोआप वर येतो. लवकरच असा टोस्टर निघेल कीं तो टोस्टला लोणी लावून त्याचे चार-चार तुकडे पाडील. कदाचित् असा टोस्टर निघालाहि असेल.

अन्न मिळतें तें शिजवून बर्फांत ठेवलेलें मिळतें. भाजीपाला धुवून स्वच्छ केलेला मिळतो. फरशी आपोआप स्वच्छ होणारी असते, पेनें शाई न भरतां लिहितां येणारीं असतात. वादळापासून बचाव करणारीं खिडक्यांचीं दारें नुसता थोडा स्पर्श केला कीं लगेच फक्त आडोशासारखीं होतात. घरांतील उष्णतामान कमीअधिक आपोआपच होतें. यामुळें उन्हाळ्यांतहि घरांतली हवा आरामशीर असते. स्वयंसंचालित यंत्रांची शक्ति आतां इतकी वाढणार आहे कीं मानवी कष्ट व यातना आतां कायमच्या संपतील. यंत्रांतच अशीं नियंत्रक उपकरणें बसविलीं जातील कीं त्यामुळें यंत्रांच्या हातून आतां चुका होणारच नाहींत.

काम करण्यासाठीं म्हणून बोटहि उचलावें लागूं नये अथवा पाऊलहि टाकावें लागूं नये असें यांत्रिक जग प्रथम निर्मायचें आणि मग अंगांतली कोंडलेली हिंमत वापरायला मिळावी म्हणून मार्ग शोधायचे हा उपद्व्याप अमेरिकन लोक कां करतात ? सर्व अमेरिकन शहरांत चेंडू फेकण्याच्या जागा, गोल्फक्लब, टेनिसकोर्टें, विश्रामगृहें, चर्चेस, असोसिएशन्स, जागोजाग असतात. या ठिकाणीं आपल्या शारीरिक व मानसिक शक्तीला अमेरिकन माणूस वाव देतो. श्रम वांचविण्याचीं साधनें आणि सुखासक्ति यामुळें फक्त एकीकडचा वेळ वांचतो व तो दुसऱ्या कामीं वापरला जातो.

## लोकसेवा हें ध्येय

सुखवाद (मटीरिॲलिझम) व आरामप्रीति (लव्ह ऑफ कंफर्ट) या शब्दांत स्वार्थीपणा सूचित होतो, इतरांना कष्ट देऊन आपले चोज पुरविण्याचा हेतु ध्वनित होतो. पण अमेरिकनांवर इतर कांहीं बाबतींत टीका करतां येत असली तरी, ज्यांच्याजवळ सुखसाधनें कमी आहेत अशा गरिबांबद्दल आपुलकी बाळगून त्यांना मदत करण्याचें औदार्य दाखविण्याबाबत अमेरिकेचे शत्रूहि त्यांच्यावर प्रतिकूल

टीका करणार नाहींत. "इतरांनीं जसें तुमच्याशीं वागावें असें तुम्हांला वाटतें तसें तुम्हीं इतरांशीं वागावें" ही बायबलांतली शिकवण आतां अमेरिकन लोक एकमेकांना नेहमीं सांगतात. अमेरिकेंत अथवा परदेशांत कोठेंहि संकट कोसळल्याची बातमी येवो, ऐच्छिक देणग्यांचा तावडतोब अगदीं पाऊस पडूं लागतो. पहिल्यानें वसाहत करतांना आणि सरहद्द वाढवितांना परस्परसाहाय्याची जेवढी गरज होती तेवढी आतां राहिली नसेल, पण प्रसंग आला कीं परस्पर-साहाय्याची इच्छा जागृत होतेच.

परस्परसाहाय्याचीं अनेक उदाहरणें नियतकालिकांतून नेहमीं प्रसिद्ध होतात. त्यांतलें एक इथें देतों. माइक कॅट्सानेवस हा १९०९ सालीं ग्रीसमधून वयाच्या एकुणिसाव्या वर्षी येथें आला. पहिल्या महायुद्धांत तो लढला. अमेरिकेंत त्याचें लग्न झालें. पण बायको व लहान मूल दोघेंहि मेलीं. पुढें ग्रीसमध्यें आई आजारी पडल्याचें कळल्यावरून तिच्या साहाय्यासाठीं तो ग्रीसला परत गेला. तिथें त्यानें दुसरें लग्न केलें आणि त्याला ९ मुलें झालीं. दुसऱ्या महायुद्धानें त्याला भयंकर दारिद्र्य आणलें. नाझी पॅरॅशूटवाल्यांशीं तो लढला आणि तीन वर्षे एका जर्मन तुरुंगांत डांबला गेला. युद्धानंतर ग्रीसला परत जाऊन पाहतो तों त्याच्या कुटुंबांतलीं माणसें हाडाच्या सापळ्यासारखीं झालीं होतीं.

तो अमेरिकन नागरिक असल्यामुळें त्याला अमेरिकेला परत येण्याचा परवाना अमेरिकन सरकारनें दिला होता. त्याचा फायदा घेण्याचें त्यानें ठरविलें. मोठीं तीन मुलें व स्वतः भाडेखर्चाशिवाय येण्याची परवानगी त्याला मिळाली. पण बाकीच्या कुटुंबासाठीं भाड्याचा पैसा शिल्लक टाकणें जमेना. माइक आतां पासष्ट वर्षांचा झाला होता. वृत्तपत्रांत त्याची हकीकत प्रसिद्ध झाली त्याबरोबर त्याला प्रवासासाठीं हवे असणारे २६०० डॉलर्स तावडतोब जमा झाले. नेव्हल सप्लाय डेपोंत माइक पूर्वी काम करीत होता. तेथल्या कामगार-कल्याण अधिकाऱ्यानें राज्यकारभारांतील दिरंगाईचे सारे अडसर दूर सारून माइकला खरेदी करतां येईल असें एक लहानसें घर मिळविलें. घर रंगविणाऱ्यांनीं स्वयंसेवेनें तें रंगविलें, फर्निचरवाल्यांनीं त्या घरांत फर्निचर आणलें, ग्रीक चर्चच्या स्त्रियांनीं कपडे व सैपाकघरांतलें साहित्य दिलें आणि माइकनें आपलें कुटुंब आणलें. "फक्त अमेरिका हा एकच देश जगांत असा आहे कीं जिथें या गोष्टी घडूं शकतात," माइक म्हणाला.

समाजसेवा हें ध्येय अमेरिकन जीवनाच्या अनेक शाखांत पसरलें आहे. प्रत्येक गांवांतल्या संस्थांनीं आपल्या समाजांतील नागरिकांचें जीवन अधिकाधिक

निरोगी, सुखी व संपन्न व्हावें यासाठीं त्यांच्या गरजा काय आहेत त्या समजून घेऊन त्या पूर्ण कराव्या अशी अपेक्षा असते (त्यासंबंधीं अधिक माहिती पुढील प्रकरणांत). लोकांच्या उपयोगीं पडणाऱ्या धंदेवाल्या संघटना खूपच निघाल्या आहेत. लोकोपयोगी मालाच्या उत्पादनांत अनुभवी मजुरांची लोकसंख्या १८७० सालीं २५ टक्के होती ती आतां ५३ टक्के झाली आहे. रोज तान्ह्या मुलाची सफाई करून त्याला कपडे करणें, गाड्या धुणें (यंत्रानें हें काम १० ते १५ मिनिटांत होतें) अथवा केसाळ कुत्र्याचे केस कापणें हीं कामें मोलानें करून मिळतात. टेलिफोन डिरेक्टरीच्या शेवटीं पिवळ्या पानांवर हीं कामें करणाऱ्यांच्या शेंकडों जाहिराती असतात.

समाजसेवा, दुर्बळ माणसें अथवा स्त्रिया यांचे संबंधानें आस्था, खेळाडूपणा आणि असेच इतर नैतिक सद्गुण मुलांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न आधुनिक माता नेहमीं करीत असतात. अमेरिकेंत मुलांना वळण लावण्याचें काम मुख्यतः मातेला करावें लागत असल्यानें सौजन्यशील वर्तन हा खास स्त्रीगुण आहे असें अमेरिकेंत मानलें जातें. पण अमेरिकन माणसांना हेंहि कबूल करावें लागेल कीं नीतिअनीतिबाबत निर्णय ठरवून अपराध्याला शासन करण्याचा अधिकार अखेर बापाचाच असतो. यामुळें नैतिक कायद्यांचा बजावणी अधिकारी बाप हाच होय असें लोकांच्या मनावर बिंबलेलें असून सौजन्य हा पौरुष गुण आहे असेंच लोकांना वाटतें.

## सर्वांच्या सारख्या वागणुकीची आवड

वागणुकींत सारखेपणा हा अमेरिकन गुणविशेष आहे असें सर्व परदेशी पाहुण्यांना दिसून येतें. या सारखेपणाचें कारण असें आहे कीं अमेरिकनांना परंपरा स्थापावयाच्या होत्या, विविध संस्कृतींतून आलेल्या लक्षावधि लोकांना एकत्र बसवावयाचें होतें, यामुळें मूलभूत भूमिकांबद्दल सारखेपणाची वागणूक त्यांना अवलंबावी लागली. पण परकीयांच्या नजरेस येणारा हा सारखेपणा स्थूलमानानें खरा आहे. इंग्लंडांतील धंदेवाल्यांना जसा विशिष्ट पोषाख करावाच लागतो तितकें बंधन अमेरिकन धंदेवाल्यांवर नाहीं. मोठ्या बाजारांत स्त्रिया जातात तेव्हां लोकरीच्या मोठ्या झग्यापासून झिरझिरीत लांड्या झग्यापर्यंत सर्व प्रकारचे कपडे घालून जातात. रात्रीं सर्वत्र झगमगणाऱ्या रंगीत पाट्यांमुळें शहरें सारीं सारखींच दिसतात. तरी पण अधिक परिचय झाल्यावर त्यांचें वैशिष्ट्य कळून येतें. सिनेमा सर्व देशभर एकाच प्रकारचा दाखविला जातो, तरी पण प्रत्येक

शहराचे संगीतज्ञ, कॅमेराक्लब, चित्रकलेचे वर्ग आपापलें पृथक् वैशिष्ट्य दाखवितातच. १७ कोटी लोकसंख्येच्या या देशांत मनोविकार आणि अभिरुचि यांबाबत पुष्कळच विविधता आहे. नवे नवे धर्म रोज निर्माण होत आहेत, खाण्याच्या पदार्थांत रोज नवीन तऱ्हा निर्माण होत आहेत आणि या सर्व नावीन्याला अगदीं हावरट चाहते मिळत आहेत. जें जें नवें आणि वेगळें दिसेल त्याची आवड हा एक अमेरिकनांचा नवीन स्वभावच बनला आहे.

पण कोणताहि समाज सर्वांना एकत्र बांधणारें कांहीं तरी समानतत्त्व असल्या-वांचून विकास पावत नाहीं. समाजाला जर त्याचीं ध्येयें यशस्वी व्हावयाला हवीं असतील तर अमुक एका पद्धतीनें त्यांनीं वागलें पाहिजे व तसे ते वागतीलच अशी कांहीं तरी तत्त्वनिष्ठा असली पाहिजे. डेव्हिड रीशमन यानें परप्रेरित व्यक्तित्वाचा (अदर डायरेक्टेड पर्सनॅलिटी) सिद्धांत मांडला आहे. त्याच्या आधारें अमेरिकेंत हें कसें घडतें तें समजून येतें. अमेरिकेंत सरहद्द पुढेंपुढें नेऊन नवीन प्रदेश व्यापण्याचें काम चालू होतें व औद्योगिक विकास नव्यानें होत होता त्यावेळीं स्वयंप्रेरित व्यक्तित्वाचीं माणसें येथें फार होतीं. त्यांच्या जागीं आतां परप्रेरित व्यक्तित्वाचीं माणसें येत आहेत. स्वयंप्रेरित माणसाची हिंमत नवीन उत्पादनकार्यांत खर्च होत होती तर हल्लींच्या परप्रेरित व्यक्तित्वाच्या माणसाची हिंमत धनोपभोगाबाबत खर्च होत आहे. कारण हल्लींची अमेरिकन अर्थसंघटना विपुलतेची असल्यानें, धन सांठवावें कसें हा मुख्य प्रश्न नसून सर्वांना काम मिळावें व अर्थसंघटना चालती राहावी यासाठीं सर्वांनीं पुरेसा धनोपभोग कसा घ्यावा हा मुख्य प्रश्न आहे.

हल्लींचा परप्रेरित व्यक्तित्वाचा माणूस स्वतःला सत्ता मागत असून आपलें काम इतरांना पसंत पडावें अशी अपेक्षा करतो. त्याला विविध ज्ञानाची कालसा असते, योग्य असे कपडे त्याला घालायला हवे असतात, गाणीं, पुस्तकें वगैरेचीं विशिष्ट अशी आवड त्याला असते, पुष्कळ संपत्तीपेक्षां मानसिक शांति त्याला पाहिजे असते, समाजाच्यापुढें ठळक जागीं बसण्यापेक्षां वैयक्तिक सुखासाठीं तो झटत असतो. हा परप्रेरित माणूस इतरांच्या पसंतीचा भुकेला असल्यानें चॅमेलॉन प्राणी जसा भोवतालच्या वातावरणानुसार रंग बदलतो त्याप्रमाणें हा परप्रेरित माणूस आपली अभिरुचि आणि कृति भोवतालच्या रोज अथवा क्षणोक्षणीं बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणें बदलत असतो. इतरांना आपणाला अनुकूल करून घेण्यासाठीं तो स्वतः इतरांना अनुकूल असें वागतो. "मित्र मिळविणें व दुसऱ्यावर प्रभाव टाकणें" याचें जें सारें तंत्र आहे त्याचा हा पाया असतो.

*या माणसाला वस्तूची ओढ असते त्यापेक्षां माणसाची ओढ अधिक असते, यामुळें स्वयंप्रेरित व्यक्तित्वाच्या माणसाइतका परप्रेरित व्यक्तित्वाचा माणूस सुखलोलुप नसतो. कर्तृत्वाचा हुरूप आणणारा धोका—कीं ज्यामध्यें फार मोठें* वैभव व कीर्ति मिळण्याचाहि संभव आहे—या परप्रेरित माणसाला नको असून इतरांवर आपलें वजन पडावें, इतरांनीं आपणाला पसंती दाखवावी, मित्र म्हणून आपला स्वीकार करावा, जीवनांत सुरक्षितता असावी असें या माणसाला वाटत असतें. प्राप्तीवरील करानें ही मनोवृत्ति वाढविली आहे. आतां लोकांना जीवर कर बसेल एवढी शिल्लक नकोच असते, तर शिल्लक ठेवण्याची खटपट न पडतां आणि मिळविण्यासाठीं श्रम करावा न लागतां खर्च करतां येईल पण जीवर कर भरावा लागणार नाहीं अशी शिल्लक माणसाला हवी असते.

या सर्वांचा अर्थ असा आहे कीं जुना दणकट व्यक्तिस्वातंत्र्यवाद बदलला आहे व बदलतो आहे. आपणाशीं स्पर्धा करणाऱ्यांच्या डोकीवर पाय देऊन शिखराला जाणाऱ्याचा हल्लीं गौरव होत नाहीं. उलट जो माणूस आपणाशीं स्पर्धा करणाऱ्याशीं, आपल्या सहकाऱ्यांशीं व नोकरांशीं गोडीनें राहतो अशा माणसाची—स्नेहपूर्ण, जमतें घेणाऱ्या, सहकार-प्रवृत्तीच्या व्यक्तित्वाची—लोकांना आवड असून असा जो वागतो तो माणूस आज सर्वांना आवडतो. कुठें तरी बॉंब टाकून युद्ध ओढवून घ्यावें, मधमाशांचें पोळें डिवचून अंगावर त्या माशा ओढवून घ्याव्या हें धोरण असणारा टेडी रूझवेल्ट हल्लीं लोकांना आवडत नसून, गोड हसणारा, समता आणि स्नेहभाव यांचा पुरस्कर्ता असा आइक आज सर्वांना आवडतो. हजारों लाखों लोकांना जो त्यांचें मन अनुकूल करून घेऊन आपल्या म्हणण्याप्रमाणें वागायला लावतो तो समर्थ होय असें मानून आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवतों.

आर्थिक विपुलतेमुळें व्यक्तिस्वातंत्र्य व चढाओढ या परंपरागत प्रवृत्ति कमी झाल्या असून समतेवर भर देण्याची परंपरागत प्रवृत्ति मात्र वाढत आहे. अगदीं थोड्या वर्षांपूर्वी शहरांतल्या श्रीमंताला अथवा राष्ट्रीय पुढाऱ्याला पेहराव, वागणूक, बोलणें या सर्व बाबतींत लोकांच्यापासून आपण अधिक वरिष्ठ दिसूं असें राहावेंसें वाटे व लोकांची अपेक्षाहि तशी असे. पण आज चार्ल्स इव्हॅन्स ह्यूजेससारखी व्यक्ति अशक्य कोटींतलीच आहे. आज पेहराव, वागणूक, शिक्षण यांत बडे लोक लहानांसारखे आणि लहान लोक बड्यांसारखे दिसतात.

लहान मुलें, न्हावी, नोकर, सहकारी, विमानांतला शेजारच्या खुर्चीवरचा परकीय माणूस या सर्वांना आपण चांगला माणूस आहों असें वाटावें अशी

हल्लीं प्रत्येक अमेरिकनाची इच्छा असते. आपणांला साऱ्यांनीं आपुलकीनें मान द्यावा असें आज अमेरिकनांना वाटतें. म्हणूनच क्लबांत अथवा बंधुमंडळांत अमेरिकन लोक हल्लीं फार जातात. कारण तेथें एकमेकाशीं आवडीनें आणि गोडीनें वागायची शपथच सर्वांनीं घेतली असल्यानें एकमेकांना सुख देणारीं माणसेंच भोवतीं असतात.

अमेरिकन लोक श्रमाला मान देतात व स्वतां श्रम करण्याला तयार असतात. यामुळें त्यांची वर्गीय उच्चनीचतेची भावना नष्ट झाली असून आपणांला वाढणारा वाढपीण अथवा आपणांला हुकुम करणारा अधिकारी हे त्यांना आपल्यांतलेच वाटतात. विदेशी पाहुण्यांना येथले मालक व नोकर एकमेकांना साध्या नांवानें हाक मारतात हें पाहून आश्चर्य वाटतें व कांहींना तें आवडतहि नाहीं. अमेरिकनांत एकमेकांबद्दल आदरभाव नाहीं असें त्यांना वाटतें. पण अमेरिकन लोक आदराचे भुकेले नाहींतच. त्यांना आपण लोकांना आवडावें असें वाटत असतें. पण आवड ही उच्च वर्गाची अथवा जातीची तटबंदी चढून जात नाहीं. म्हणून मग तटबंदीच नाहींशी केली जाते.

## गतिमानत्व

समता याचा अर्थ एकाच समान पातळीवर सर्वांची एक-सांची भूमिका असा नव्हे. माणसांच्या कर्तृत्वांत विविधता असून श्रमविभागानें निरनिराळ्या लोकांना वेगवेगळी कारागिरी येते यामुळें एक-सांची भूमिका कोणीं इष्ट मानली तरी ती शक्य नाहीं. उलट रोजमजुरापासून एकाद्या कॉर्पोरेशनचा अध्यक्ष होण्यापर्यंत, नवीन वसाहतीस आलेल्या सामान्य मुलानें कॉलेजांत प्रोफेसर होण्यापर्यंत चढत जाण्याची सर्वांना सारखी संधि मिळावी हें आजच्या अमेरिकेचें ध्येय आहे व वस्तुस्थिति तशीच आहे. याचीं उदाहरणें शोधण्यासाठीं होरेशिओ अल्जरच्या नवलकथा शोधायला नकोत जीवनांत यशस्वी झालेल्यांचीं चरित्रें वाचलीं म्हणजे याचा पडताळा येईल.

एक काळ अमेरिकेंत असा होता कीं जो गरिबाच्या झोपडींत जन्मलेला नाहीं तो राष्ट्रपति होऊं शकत नसे. स्टीव्हन्सनपेक्षां आयसेनहॉवरला एक अधिक अनुकूलता अशी आहे कीं स्टीव्हन्सन श्रीमंताच्या घरीं जन्मला तर आयसेनहॉवर गरीब आई-बापांचा मुलगा होता. समाजशास्त्रज्ञ म्हणतात कीं एकादा मजूर अथवा कारकून कॉर्पोरेशनचा अध्यक्ष होऊं शकेल असे दिवस हल्लीं उरलेले नाहींत. पण हार्लो कर्टिस हा एकवेळचा हिशेबनीस हल्लीं जनरल मोटर कंपनीचा अध्यक्ष आहे आणि

डेव्हिड सार्नोफ हा एकवेळचा निरोप्या शिपाई आर. सी. ए. चा प्रमुख आहे. शिवाय आज मजुराचा मुलगा कॉलेजांत जाण्याचा संभव फार असून तेथून तो चटकन् आणखी वर चढत जातो आणि लोकांच्या राहणीचें मान सतत वाढत असल्यानें कारखानदार व कामगार यांच्या मधलें अंतर कमी होत चाललें आहे. कामगाराला स्वतांची गाडी व टेलिव्हिजन असतो, त्याच्या गृहिणीचा विजेचा रेफ्रिजरेटर, धुण्याचें यंत्र, व्हॅक्युम क्लीनर असतो, मजुराचीं मुलें हायस्कुलांत व पुष्कळदां कॉलेजांत जातात, आणि कारखानदाराला धंदा चालविण्याची चिंता रात्रंदिवस सोसावी लागत असतां कामगाराला आठवड्याचे पस्तीस-चाळीस तास काम केलें म्हणजे निश्चित होतां येतें. अशा परिस्थितींत फार महत्त्वाकांक्षी लोकांखेरीज इतरांना बड्या जागांचें आकर्षण उरलेलें नाहीं.

कार्ल मार्क्सची सर्वांत मोठी चूक झाली ती ही कीं समाज गतिशील आहे ही गोष्ट त्यानें विचारांत घेतली नाहीं. अमेरिकेंत वर्गकलहाच्या भूमिकेवरून पक्ष-संघटना कशी झाली नाहीं याचें अनेक परकी पाहुण्यांना आश्चर्य वाटतें. याचें उत्तर सोपें आहे. युरोपच्या अर्थानें येथें वर्ग नाहींतच. प्रत्येक पिढी गतिमान् आहे, बदलते आहे. वरच्या वर्गाशीं लढून मिळणार काय? जी वरची जागा मिळविण्यासाठीं महत्त्वाकांक्षेनें धडपडायचें ती जागा आपणच पाडून टाकायची असा त्याचा अर्थ होणार. कामगारांच्या मजुरीचे मोठे दर, कामाचे कमी तास, वर्षभराच्या पगाराची हमी इत्यादीमुळें अनेक बौद्धिक धंदेवाल्यांना आणि कारखानदारांनाहि कामगारांचा हेवा वाटत असतो. सामाजिक दर्जाहि बदलतो आहे. एकादा प्लंबर हवापालट करण्यासाठीं फ्लोरिडाला जाऊं शकतो तर वकिलाला परगांवीं जाऊन एकादा दावा गमावणें परवडत नाहीं.

उलट बडा धंदेवाला हा अगदीं एकांतिक सुखवादी असतो असेंहि मानतां येत नाहीं. दिवसानुदिवस आपला पैसा कांहींतरी सांस्कृतिक कामीं खर्च व्हावा असें त्याला वाटूं लागलें आहे. अलिस्टर कूक सांगतो, "शिकागोचा एक धनाढ्य मांसविक्रेता एका म्यूझियममध्यें गेला आणि त्याला तेथें रंगचित्रांची गोडी लागली. आतां आधुनिक फ्रेंच चित्रांबाबत तो जगप्रसिद्ध तज्ज्ञ झाला असून त्या चित्रांचा संग्रह तो करीत असतो." हंटिंग्टन हार्फोर्ड हा सिनेनिर्माता आहे. त्यानें नवनिर्माणकुशल कलावंतांना नित्रस्तपणें आपलें कलाकार्य करीत राहतां यावें यासाठीं एक सदन बांधलें; तो स्वतां रंगचित्रांचा संग्रह करतो, त्यानें न्यूयॉर्क आर्ट गॅलरी बांधली आणि होलिवुडमध्यें नाटकाचें थिएटर बांधून दिलें.

जगांतल्या कुठल्याहि लोकांना स्नेहपूर्ण घर, प्रेम, यश, चांगल्या गोष्टींचा पुरस्कार या गोष्टी आवडतात तशा त्या अमेरिकनांनाहि आवडतात. पण त्यांना मुसाफरीचें प्रेम असून मुसाफरींतच त्यांना आपल्या व्यक्तित्वाचा शोध लागतो. त्यांना हवी असलेली प्रिया (अथवा प्रियकर) त्यांना विमानांत अथवा नृत्यगृहांत अथवा एखाद्या ऑफिशियल मेजवानीच्या वेळीं भेटेल. कॉलेजांत अनेक अभ्यासक्रमांचे प्रयोग करून अमेरिकन लोक आपला व्यवसाय निवडतात, नंतर अनेक कंपन्यांत थारेपालट करून मग योग्य जागीं स्थिर होतात. ज्या कंपनींत काम केलें तिथें प्रगति होते त्यापेक्षां त्या कंपनीशीं चढाओढ करणाऱ्या कंपनींत प्रगति अधिक लवकर होते. याचा अर्थ स्थिरतेनें नुकसान होतें व सदा पालट करीत राहिल्यानें फायदा होतो असा आहे.

व्यवसायांत अशी प्रगति होत असतां अमेरिकन लोक अधिक चांगल्या मोहल्ल्यांत राहायला जातात, अधिक मुलांना राहतां येईल अशी मोठी जागा घेतात. असे थारेपालट करण्याची त्यांना भीति वाटत नसून उलट तशी त्यांना हौस असते. पूर्वी वसाहत एकसारखी पश्चिमेकडे पुढेंपुढें न्यावी लागे यामुळें रोज नवी आघाडी उघडणें हें अमेरिकनांच्या हाडीं मुरलें आहे. आतांची आघाडी भौगोलिकच असते असें नव्हे तर मानसिक, सांस्कृतिक असते. सुखाची वाट पाहत न बसतां त्याचा पाठलाग करावा अशी त्यांची श्रद्धा आहे. नवसंशोधनाला त्यांचें जीवन वाहिलेलें आहे. त्यांत जी अमूर्त चिंता सदा असते तीहि त्यांना आवडते.

अमेरिकनांना सदा पालट हवा असतो. ते स्वतां पालटतात इतकेंच नव्हे तर ते भोवतालच्या परिस्थितीलाहि पालटून टाकतात. क्लाइड क्लाकहॉन म्हणतो, "माणसें संकटाला तोंड देण्यासाठीं स्वतः पालटतात अथवा परिस्थितीला पालटून टाकतात. पौरस्त्य लोक स्वतांच पालटतात, पाश्चात्य लोक परिस्थितीला पालटून टाकतात. अमेरिकनांना परिस्थिति पालटण्यांत फार उत्साह वाटतो. रस्ता करण्यासाठीं ते डोंगर फोडतील, नदीचें वळण बदलून वाळवंटाची सुपीक शेती करतील, माणसाच्या हातकामाऐवजीं तें काम यंत्राकडून करून घेतील. आणि मग फुरसत जी वाढली तिचा उपयोग करण्यासाठीं कांहीं तरी करमणूक काढतील, त्या करमणुकींतून नवीन धंदे काढून, यंत्रानें बेकार केलेल्यांना काम देतील."

## सरहद्द वाढविण्याचा स्वभावावर परिणाम

युरोपांतील माणसें अमेरिकेंत आलीं तीं युरोपीय संस्कृतींतले गुण व दोष घेऊन आलीं. त्या युरोपीय संस्कृतीवर अमेरिकेंतील जमीन व हवा यांनीं जे

संस्कार घडविले त्यांतून अमेरिकन संस्कृति निर्माण झाली आहे. युरोपांत सतराव्या शतकांतहि सरंजामशाहीला मालकी हक्काचा हव्यास होता. अर्थात् अमेरिकेस गेल्यामुळें जे सरंजामशाहीच्या जाचांतून सुटले त्यांनीं स्वतांच्या मालकीची जमीन असावी हें वेड युरोपांतून आणलेंच होतें. जमिनींचा ताबा मिळवून तींत स्थिर होण्यांत अनेक धोके आले. इंडिअन लोकांशीं तह करून अथवा त्यांच्याशीं लढून जमिनी मिळवाव्या लागल्या. निबिड अरण्याशीं झगडून जमिनी तयार कराव्या लागल्या. अगदीं थोड्या व साध्या हत्यारांनीं घरें बांधावीं लागलीं, शेती पिकवावी लागली. युद्धानें, वाईट हवेनें, उपासमारीनें कित्येकजण मेलेहि. यांतून जगले त्यांचा अगदीं कायापालट झाला. आजचा अमेरिकन या भट्टींतून निघाला आहे.

सतत नव्या वसाहतीची नवी आघाडी उघडण्यांत अतिशय कठोर अनुभव अमेरिकनांना येऊन त्यामुळें त्यांचे कांहीं स्वभावविशेष बनत गेले. रोजच्या जीवनांतील कष्टदायीपणामुळें अमेरिकन माणूस वागणुकींत ओबडधोबड झाला. चांगली चांगली जमीन मिळविण्यासाठीं (आणि पुढें सोन्यासाठीं) चढाओढ करावी लागली, स्वतांचा जीव बचावण्यासाठीं इतरांची हत्या करावी लागली. कायदा व सुव्यवस्था नसल्यानें सर्वांनाच दणकट व्हावें लागलें, पाशवी शक्ति वापरावी लागली. यामुळें थोडें प्रक्षोभकारण घडलें कीं अमेरिकन माणूस वाघाप्रमाणें पंजा आणि जबडा पसरून गुरगुरूं लागतो. दरोडेखोरी, वांशिक दंगली, लांचबाजी, संघटित डाकूगिरी आणि राजकीय टीकेंतील अत्याचार हे दोष अमेरिकेच्या वरील इतिहासांतून अवतरले आहेत.

हें जीवन इतकें कठीण होतें तरी पण त्यांत संपत्तीचा लाभ त्यावेळच्या लोकांना खूप झाला. कित्येकदां फार थोड्या श्रमानें फार मोठा लाभ झाला. यामुळेंच 'चटकन् कुबेर व्हा' हें तत्त्वज्ञान उदय पावलें. खूप मेहनत केली आणि दैवानें थोडा हात दिला कीं जवळच्या सर्व वस्तु सोन्याच्या होतील अशी ही श्रद्धा होती. इंडियनांना थोडेसे नकली दागिने देऊन व्यापारी त्यांच्याकडून खूप लोकर मिळवीत. जमिनींतून सोनें, रुपें, तेल या वस्तु इतक्या पुष्कळ निघूं लागल्या कीं जणूं कांहीं या वस्तूंचा पाऊसच पडूं लागला. नंतर रेल्वे लुटणारे दरोडेखोर कुबेर झाले. शेवटीं शेअर बाजारांतले जुगारी आले. १९२९ सालीं त्यांच्या जुगारीमुळें अमेरिकन सराफ बाजार कोसळून अमेरिकेंतील प्रत्येकाची चामडी सोलली गेली.

पण नव्या वसाहती स्थापण्याच्या धाडसी उद्योगांत अमेरिकनांच्या अंगीं कांहीं चांगले गुणहि आले. त्यामुळें मेहनतीनें काम करण्याला उत्तेजन मिळून हातानें

काम करण्यांत प्रतिष्ठा आहे असें मानण्यांत येऊं लागलें. त्यांतून निर्माण झालेला स्वतंत्र स्वावलंबी शेतकरी हा अमेरिकन जीवनाचें प्रतीक झाला असून आमच्या राष्ट्रीय जीवनावर त्याच्या स्वभावाचा ठसा अजूनहि आहे. यांतून निर्माण झालेला अमेरिकन माणूस कल्पनाचतुर, चौकस, व्यवहारदृष्टीचा, कोणतेंहि काम यशस्वितेनें हाताळणारा, लहान आटोपशीर वसाहती स्थापून त्यांचें स्वतांच नियंत्रण करणारा, शोधकबुद्धीचा, कोणत्याहि नव्या परिस्थितीशीं चटकन् जुळतें घेणारा, वर्गभेदापासून बहुतेक अलिप्त, स्वदेशाबद्दल आशा व आत्मविश्वास अंगीं मुसमुसणारा असा असून या गुणांचें भरपूर बक्षीस त्याला मिळालें आहे.

या सर्व गुणांच्या छटा या ना त्या स्वरूपांत आजच्या अमेरिकनाच्या अंगीं आहेत. सर्व खंड व्यापलें गेलें, नवी वसाहत उभारण्याचें थांबलें तरी पण सरहद्द वाढविण्याचें, नवी आघाडी उघडण्याचें काम थांबलें नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं सरकारजवळ नव्या वसाहतीसाठीं अजून भूमि असून दरसाल ४० ते ५० हजार एकर जमीन सरकार वांटतें. शिवाय नवीन वसाहतकाराची धाडसी प्रवृत्ति अमेरिकनांत इतकी मुरली आहे कीं ती त्याला आपल्या जीवनाचा भाग असल्यासारखीच वाटते.

जंगल तोडून ज्यांनीं हें राष्ट्र उभें केलें तीं माणसें सतत नव्या नव्या प्रदेशांत जात होतीं, नवे गट बनवीत होतीं, नवे संबंध त्यांना नेहमीं जोडावे लागत होते. साहजिकच मैत्रीसंबंधींच्या त्यांच्या कल्पना बदलत गेल्या. कोण कसा आहे हें चटकन् ओळखतां आलें पाहिजे, एकाद्याचा लौकिक अथवा त्याची कौटुंबिक पार्श्वभूमि यावरून त्याचेबद्दल अनुमान न बांधतां त्याच्या कृतीवरून त्याची पारख केली पाहिजे, नवीन समाजांत येणाऱ्या माणसाला मित्र हवे असले तर स्वतां त्यानें मित्रभावानें वागलें पाहिजे आणि व्यवहार चालू राहण्यासाठीं मित्र तर अवश्यच आहेत, या गोष्टी अमेरिकनाला त्याच्या जीवनराहणीनेंच शिकविल्या.

अमेरिकन लोक चटकन् मित्रभाव व्यक्त करतात हें परकी लोकांना ढोंग वाटतें. पण अमेरिकनांची ही वृत्ति अगदीं सहजात आहे. कोणतेंहि नातें म्हटलें कीं त्यांत मित्रभाव, प्रेम असें कांहीं तरी असलेंच पाहिजे असें आम्ही मानतों. फक्त कांहीं जिव्हाळ्याचे मित्र व मग इतर सगळे सामान्य जन असा फरक करण्याची रीत अनेक राष्ट्रांत आहे. पण असा फरक अमेरिकन लोक करीत नाहींत. आम्हांला मित्र जितके जास्ती, जितक्या लोकांना आम्ही रस्त्यावर, बोर्डाच्या सभेंत, चर्चमध्यें, सिनेमा थिएटरें वगैरे ठिकाणीं त्यांच्या वैयक्तिक

एकेरी नांवानें संबोधूं शकतों, तितक्या प्रमाणांत आम्हांला आपल्या भोवतालच्या वातावरणांत आपुलकी वाटते.

"तो ना ! तो माझा मित्र आहे" हें वर्णन दोन-तीन जिव्हाळ्याच्या सोबत्यांनाच लागू असतें असें नव्हे. शेजारी, आपल्या क्लबांतले सदस्य, सहकारी कामगार, मोटारींत गॅसोलिन घालणारा कामगार, जुना शिक्षक, धर्मगुरु, दुकानदार या सर्वांचा यांत समावेश होतो. जगांतल्या इतर राष्ट्रांना वाटतें, मैत्री ही फार मूल्यवान् बाब असल्यानें तिचें क्षेत्र मर्यादित असावें. तर अमेरिकनाला मैत्री ही मूल्यवान् वाटत असल्यामुळेंच ती सर्वांनीं मिळून वांटून घ्यावी असें वाटत असतें. जितकें अधिक धन उपभोगावें तितकें तें अधिक वाढतें असें आमचें आर्थिक तत्त्वज्ञान आहे. त्याचप्रमाणें जितकी व्यापक मैत्री आपण देतों तितकी व्यापक मैत्री आपणांला मिळते हें आमचें मानसिक तत्त्वज्ञान आहे. शेतीचें न खपून फार उरलेलें उत्पन्न आणि पहिल्या महायुद्धानंतरच्या आमच्या घोडचुका यांनीं आम्हांला शिकविलें आहे कीं सांठेबाजीनें आपण श्रीमान् होण्याऐवजीं दरिद्री होतों.

स्वदेशांतल्या खाजगी व्यक्तींतच आम्ही मित्र शोधतों असें नव्हे. आमचें मित्रसंचयकार्य हें आंतरराष्ट्रीय आहे. अमेरिका खंडांतील इतर राष्ट्रांसंबंधानें मित्रराष्ट्रधोरण, अविकसित राष्ट्रांना साहाय्य, उरलेलें धान्य गरजूंना देणें, 'वर्ल्ड नेबर्स'सारख्या संघटना, या सर्व गोष्टी राजकीय धोरणाच्या बाबी आहेत एवढें म्हटल्यानें त्यांचा बोध होणार नाहीं. प्रेम द्यावें व प्रेम घ्यावें या तळमळींत त्यांचें बीज रुजलेलें आहे. तुम्हांला जर इतर लोक आवडतात असें दिसलें तर इतरांनाहि तुम्ही आवडूं लागाल आणि मग सारें जग मृदु हिरवळीसारखें मनोहर होईल असें आम्हांला वाटतें. (याच भावनेनें रूझवेल्ट स्टालिनशीं वागला व त्याच्या हातून चुका झाल्या.) यांत भोळसटपणा आहे हें खरें. पण यांत बळजोरीऐवजीं आर्जव, दंडुक्याऐवजीं हस्तांदोलन आहे एवढें तरी खास.

## अमेरिकेची ध्येयनिष्ठा कोणती ?

तर मग अमेरिकन स्वभाव घडविणाऱ्या कल्पना व श्रद्धा कोणत्या ? जॉर्ज सँटायन सांगतो: "आमच्या राष्ट्रीय श्रद्धा व नीति या गोष्टी कल्पना म्हणून अस्पष्ट आहेत. पण भावनेच्या स्वरूपांत त्यांचें प्रदर्शन अगदीं स्पष्ट होतें. सत्कर्माचा आदेश आणि प्रगतीबद्दलचा विश्वास यांनीं अमेरिकन स्वभाव बनला आहे."

क्लाइड क्लकहॉनच्या मतें, तार्किक युक्तिवादावर विश्वास, कोणतीहि गोष्ट नैतिक दृष्ट्या सयुक्तिक आहे असें मांडून दाखविण्याची वाटणारी आवश्यकता, सयुक्तिक मार्गानें प्रयत्न केल्यास तो यशस्वी होतो अशी खात्री, व्यक्तिस्वातंत्र्य व वैयक्तिक हक्क यांच्या आवश्यकतेवर श्रद्धा, सामान्य माणसाचे हक्क व सामान्य माणसांचें सामुदायिक राजकीय मत याबद्दल निष्ठा, पालट व प्रगति यांचें मानण्यांत येणारें उच्च मूल्य व सुखप्राप्तीचा हेतुपूर्वक प्रयत्न करण्यांतच हित असतें अशी खात्री, या गोष्टी अमेरिकनाच्या श्रद्धेचा अवश्य भाग आहेत.

अमेरिकनांनीं निर्मिलेल्या संस्थांवरहि अमेरिकनांचा असाच दृढ विश्वास आहे. 'अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा' आणि 'अमेरिकन राज्यघटना' यांनीं स्वराज्याचीं तत्त्वें इतकीं स्पष्टपणें व निर्णायकपणें मांडलीं आहेत कीं जणूं कांहीं अमेरिकेनंच हीं तत्त्वें प्रथम शोधून काढलीं असें मानण्याची आमच्यांत प्रवृत्ति आहे. निदान हे हक्क आणि हीं तत्त्वें आमचीं खास वैशिष्टयें होत असें तरी आम्ही मानतोंच. या दोन्ही लिखाणाभोवतीं एक तेजोवलय आहे. त्यांत आमच्या जीवनाचीं मूलतत्त्वें सांगितलीं असून त्यांच्यामागें जणूं कांहीं ईश्वरी पार्श्वभूमि असल्यानें सृष्टिनिर्मितीइतकींच पवित्र तीं आम्ही मानतों. त्या तत्त्वांवर आक्षेप घेणें अथवा त्यांचा भंग करणें ही कल्पनाहि आम्हांला सहन होत नाहीं. म्हणून या मूलतत्त्वांचा आम्हांला त्रास होतो अशी तक्रार करून आम्हांला चालणार नाहीं. तीं आम्हांला एकदांच कायमचीं दिलेलीं असून जशीं आहेत तशीं तीं आम्हीं पत्करलीं पाहिजेत.

आम्हां अमेरिकनांत विवेचकप्रवृत्ति नाहीं असें विदेशी निरीक्षकांना वाटतें याचें कारण अंशतः हेंच आहे कीं आमचीं ध्येयें आमच्यासाठीं एकदांच कायमचीं ठरवून दिलेलीं आहेत अशी आमची खात्री झालेली असून त्यांच्या संबंधानें चर्चा करण्याची जरुरी आम्हांला वाटत नाहीं. हीं ध्येयें प्राप्त करून घेण्यासाठीं निकरानें झटणें एवढेंच आमचें काम. कांहीं तरी नवें निर्माण करावें, कांहीं तरी नवें उभारावें, एकादें नवें कर्तृत्वक्षेत्र सुरू करावें, एकादी नवीन खाण खोदावी, एकादी नवी नागरी संघटना सुरू करावी, एकादा नवा धंदा काढावा याचें अमेरिकनांना कौतुक वाटतें. अशा कर्तृत्वाचीं त्यांना सदा स्वप्नें पडतात. (अर्थात् जो कांहीं तरी नवें निर्मितो त्याला त्या नव्यावर प्रतिकूल टीका झालेली खपत नाहीं व तो टीकाकारावर डोळे वटारतो, हाहि अमेरिकनांचा स्वभाव आहे.)

शिवाय कोणत्याहि चांगल्या कार्याबद्दल अमेरिकन लोक तें दुरून पाहत असण्याची भूमिका घेणार नाहींत. ते स्वतां त्या कर्तृत्वांत भाग घेतील. यामुळें

अमेरिकेची परक्यांनीं निंदा केली तर अमेरिकनांनीं आपलें जोरदार समर्थन केलें पाहिजे असें त्यांना वाटतें. अर्थात् अमेरिकेच्या दोषांवर अमेरिकन टीकाकार अगदीं कठोर हल्ला केल्यावांचून राहत नाहींत, हीहि गोष्ट तितकीच खरी आहे. डी टोकेव्हिल हा अमेरिकेचा चाहता आहे. पण अमेरिकनांची ही जी स्वदेशाभिमानाची असहिष्णु कल्पना तिचा त्याला राग येतो. तो म्हणतो, "तुम्ही अमेरिकनांची प्रशंसा करण्याचें थांबवाल तर ते स्वतांच आत्मस्तुति करूं लागतील." प्रेम करा आणि प्रेम करून घ्या असा हा स्वभाव आहे. त्यांत एक पोरकटपणाहि आहे. पण माणसाच्या इतिहासावर आजवर 'द्वेष करा आणि द्वेष पत्करा' असें शिकविणाऱ्या राजवटींनींच प्रभुत्व गाजविलें आहे त्याऐवजीं ही अमेरिकन प्रेमभावना फार बरी.

अमेरिकेच्या ध्येयनिष्ठेंतला बराचसा भाग नवीन वसाहती स्थापन करतांना आलेल्या साहसी वृत्तींतून जसा आलेला आहे तसा कांहीं भाग त्यांच्या प्यूरिटन पूर्वजांच्या वैराग्यवृत्तींतूनहि आलेला आहे. ही पूर्वजांची वैराग्यवृत्ति पश्चिमेकडे वसाहती प्रसार पावत असतां अमेरिकनांनीं आपल्या अंगीं बाणवली होती. सर्व व्यक्तिमात्र ईश्वराचींच लेकरें असून ईश्वरानें आपल्या प्रतिमेप्रमाणेंच त्याला निर्मिलें आहे म्हणून व्यक्तिमात्रावर प्रेम केलें पाहिजे ही एक प्यूरिटन शिकवणच आहे. सरकार हें करारानें व संमतीनें स्थापन होतें ही कल्पना अमेरिकेस प्रथम गेलेल्या यात्रेकरूंची (पिल्ग्रिम्स) आहे. सतराव्या शतकांतील धर्मसुधारकांनीं प्रचंड व गुंतागुंतीचे वादविवाद करून बुद्धीची प्रतिष्ठा स्थापन केली, तो वारसा अमेरिकांना मिळाला. व्यक्तीऐवजीं तत्त्वाबद्दल निष्ठा आणि मानवी राज्याला धर्माचेंच अधिष्ठान असलें पाहिजे ही श्रद्धा प्यूरिटन पूर्वजांकडूनच अमेरिकेला मिळाली.

## विनोदप्रवृत्ति

माणसाची संस्कृति कशी आहे तें अजमावण्याचें एक प्रमुख गमक त्याचे ठिकाणीं विनोदबुद्धि कशी आहे हें असतें. आणि अमेरिकेंत विनोदबुद्धीला जेवढें महत्त्व दिलें जातें तेवढें जगांत इतरत्र मुळींच दिलें जात नाहीं. अमेरिकन जीवनांत हास्यास्पद काय आहे हें आपल्या तिखट लेखणीनें दाखविणारा विल रॉजर्स हा लेखक अमेरिकन लोकांनीं राष्ट्रीय वीरपुरुष मानला आहे. मार्क ट्वेन हा अनेक दृष्टींनीं अमेरिकेचा प्रातिनिधिक लेखक. पण तो अमेरिकनांना आवडतो तो तो अमेरिकन जीवन चातुर्यानें चितारतो म्हणून नव्हे तर त्याच्या

विनोदी लिखाणासाठीं. आमचा दृष्टिकोन आशावादी असल्यानें आम्हांला दुःखान्त कथेपेक्षां सुखान्त कथा अधिक आवडते. टेलिव्हिजनवर विनोदी नटापासून जास्तींत जास्त मिळकत कंपन्यांना होते व तशा नटांनाच जास्तींत जास्त पगारहि मिळतो.

मनावरील सर्व प्रकारचा ताण कमी करण्याचें विनोद हें फार मोठें साधन आहे. अमेरिकेच्या गडबडीच्या उद्योगप्रधान जीवनांत धाड धाड जा-ये चालत असते, गरगरा फिरणारीं यंत्रें, मोटारींचे कर्कश कर्णे, संतत भावना या सर्वांवर विनोदाचा उतारा चांगला ठरतो. हें धांदलीचें आणि प्रक्षुब्ध जीवन विनोदी वाङ्मयांत अशा प्रकारें दाखविलें जातें कीं आमचे आम्ही त्यावर मनापासून हसूं शकतों.

ज्याचें विडंबन होऊं नये इतकें पवित्र आम्ही कांहींहि मानीत नाहीं. उलट जितका विषय पवित्र तितका त्याच्या विडंबनाचा परिणाम जोरदार होतो. धर्मगुरूंबद्दलच्या विनोदी कोट्या लक्षावधि आहेत. एक धर्मगुरु दुसऱ्या धर्मगुरूला म्हणतो, "मी केस कापतांना माझ्या प्रवचनाचा विचार करीत होतों, त्यामुळें मीं माझी हनुवटीच कापून घेतली." दुसरा त्यावर उत्तर करतो, "हनुवटी कापण्याऐवजीं प्रवचन कापलें असतेंस तर ?"

सर्व प्रकारच्या लिहिलेल्या, बोललेल्या वाङ्मयांत स्त्रीपुरुषसंबंधावर अफाट विनोद असतो. एक सुंदर मुलगी सुगंधी द्रव्यांच्या दुकानांत विचारते, "पुरुषाची लोकरी ऊन (मिंक) ज्यानें मिळेल पण ज्यानें त्याच्या अंगचा लांडगा जागा होणार नाहीं असें कांहीं तरी मला द्याल का ?" "स्त्रीशीं लग्न न करतां तिचा घेतां येईल तो सर्व फायदा पुरुषांना हवा असतो" हा मुद्दा विनोदांत नेहमीं येत असतो. स्त्रियांची ही थट्टा पाहा. अपघातांत मोडलेल्या एका मोटारींत मध्यभागीं बाई ड्रायव्हर बसली आहे असें चित्र असून त्यावर लिहिलें आहे, "माझा विचार बदलला अशी मीं खूण केली ती दिसली नाहीं का ?" असें जणूं ती बाई विचारते. वास्तविक गाड्या चालविण्यांत स्त्रियांपेक्षां पुरुष अधिक अपघात करतात. पण स्त्रियांना चंचल म्हणून चिडविणें ही विनोदी लेखकांची खोडच आहे.

घरांत प्रभाव गाजविणाऱ्या सासूची (बायकोच्या आईची) चेष्टा करणें हा प्रकार विनोदांत फार लोकप्रिय आहे.

विनोदाला अमेरिकन लोक इतकें महत्त्व देतात कीं एकादा माणूस फार वाईट आहे असें म्हणायचें असल्यास "त्याच्या ठिकाणीं विनोदवृत्ति नाहीं" एवढेंच ते म्हणतात.

अमेरिकन लोक समतेवर विश्वास ठेवीत असून विनोद हा समता निर्मिणारा आहे. विनोद हा विचारस्वातंत्र्याचा द्योतक आहे, कारण सामान्य माणूस त्यामुळें आपल्या पुढाऱ्याबद्दल कांहींहि बोलूं शकतो. कोणीहि बडा मानलेला माणूस विनोदाच्या चिमट्यांत अगदीं चिपटा होतो. फुगलेले पोटाचे डेरे विनोदानें सपाट होतात. विनोदामुळें स्वताकडे तिऱ्हाईत दृष्टीनें पाहतां येतें. आम्ही जेव्हां आम्हांलाच हसतों त्यावेळीं आमचे दोष आम्हीं घालविले असाच त्याचा अर्थ असतो. अमेरिकेचा रोज नव्या जगाशीं संबंध येत असल्यानें विनोदाचा उपयोग भिन्न भिन्न भावनांत चटकन् ऐक्य आणण्याचे कामीं होतो. विनोदाचा हा परिणाम अतिसूक्ष्म अथवा संकुचित नसून ठळक आणि व्यापक असतो. विनोद हें आपुलकीच्या भावनेचें संगीत आहे.

## अमेरिकन माणूस ओळखावा कसा ?

हेन्री जेम्सच्या एका कथेंतील मिसेस् ट्रिस्ट्राम एका अमेरिकनाला म्हणते, "तूं आहेस तरी कसा, साधाभोळा कीं खोल, कांहींच कळत नाहीं." युरोपीयांना अमेरिकनांसंबंधानें नेहमीं हा घोटाळा पडतो. अमेरिकन हे पोरकट आहेत असें अनुमान सामान्यतः ते बांधतात. पण अमुक समाज परिपक्व आहे अथवा दुसरा तसा नाहीं असें बिनचूक अनुमान कोणत्याहि समाजासंबंधानें काढतां येणार नाहीं. प्रत्येक समाजाच्या वागणुकीचें एक सुसंगत तंत्र आणि शिस्त असते.

मग अमेरिकन कोठेंहि गेला तरी तो अमेरिकन म्हणून ओळखूं येतो कसा? अमेरिकन प्रवाशांचा एक वर्ग असा आहे कीं, तो आरडाओरडा करणारा, बढाईखोर, फाजील चिकित्सक, पैसे उधळणारा असा असतो. पण हें अमेरिकनाला ओळखण्याचें खास लक्षण नव्हे. हे कांहींसे बेताल दिसणारे लोक असे वागतात याचें कारण अमेरिकेंत असतांना ज्या सामाजिक बंधनांमुळें त्यांना मनमोकळेपणानें वागतां येत नाहीं तीं बंधनें जगप्रवासांत त्यांच्याभोवतीं राहत नाहींत आणि मग या स्वातंत्र्यत्वा ते जास्तींत जास्त फायदा घेतात.

अमेरिकन माणूस परदेशीयांना जो दिसतो तो तसा कपड्यांमुळें दिसत नसून त्याच्या विशिष्ट मनोवृत्तीमुळें दिसतो. या मनोवृत्तींत वर्गभावना मुळींच नसते, तर एक प्रकारचा आनंदी आशावाद आणि मोकळा चौकसपणा असतो. युरोपियनांना हा प्रकार भोळेपणाचा वाटतो. अमेरिकनांना वस्तुस्थिति आणि आंकडेवार माहिती या परिभाषेंत बोलण्याचा नाद असतो. त्यांच्यांत एक प्रकारचा

शरिराचा व दृष्टीचा तरतरीतपणा असतो. त्या मानानें बौद्धिक तरतरीतपणा कमी दिसतो. या सर्वोपेक्षां लक्षांत येणारा त्यांचा गुण म्हणजे सलगीची हांव. (डिंक चघळणें, अतिधूम्रपान करणें, कॅन्सास शहर अथवा कोकुक यांच्याशीं पुनः पुनः तुलना करणें इत्यादि त्यांचे दोष सध्यां बाजूला ठेवूं.) अगदीं थोडक्यांत अमेरिकन स्वभाव कसा बनला आहे याचें उत्तर द्यायचें तर असें म्हणावें लागेल कीं एकांतिक स्पर्धा व एकांतिक संधि या अमेरिकेंतल्या परिस्थितीचा परिणाम त्यांच्या स्वभावावर झाला आहे.

अमेरिकन लोक वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ते पिसाटासारखे राबतात व मग निर्माण केलेल्या धनांतलें कितीतरी धन वांटून टाकतात. खेळतात ते अगदीं थकवा येईपर्यंत आणि यालाच सुटींतला आराम म्हणतात. आपण मोठे खंबीर मनाचे धंदेवाले आहों असें म्हणून घेण्यांत त्यांना फुशारकी वाटते. पण एकादी फार दुर्दैवाची कथा ऐकली कीं ते घाबरतात. जगांतील सर्वांत प्रचंड सरकार, मोटारी आणि कर्जें याचा अमेरिकनांना दृढ परिचय आहे. पण तरीहि कोणत्याहि प्रचंड-पणाला ते बिचकतात. प्रचंड सरकार, प्रचंड धंदा, प्रचंड संघटना, प्रचंड वर्चस्व हीं सर्व खंडित करून यांचे लहान लहान तुकडे करावे असा अमेरिकनांचा प्रयत्न असतो. स्वतांला ते लहान, सामान्य माणूस समजतात आणि मग प्रत्येक गोष्ट आपल्या लहान मापाची करणें त्यांना हवें असतें. तरीपण आपल्या उंच इमारती, उत्तुंग पर्वत, लांब लांब नद्या आणि बडीं जेवणें यांचीहि त्यांना बढाई वाटतेच. उत्तम कुटुंब, उत्तम वसाहत, उत्तम राज्य, उत्तम देश, उत्तम जग, उत्तम स्वर्ग, सारें उत्तमोत्तम काय तें अमेरिकेंत, असें त्यांना वाटतें. पण त्याच अमेरिकेंत वाहतुकीच्या अपघातांतले मृत्यु, संपत्तीची उधळपट्टी आणि संघटित गुन्हेगारी जगांतल्या कुठल्याहि देशापेक्षां अधिक आहे.

जेव्हां अमेरिकन लोक एकमेकांना भेटतात, तेव्हां "आरामांत राहा" असें एकमेकांना म्हणतात. पण लगेच हावरटासारखे निरनिराळ्या दिशेनें जातात. ते खेळतांना जणूं रणांगण लढवितात आणि रणांगणावर लढत असतांना जणूं क्रीडांगणावर खेळत असतात. ते अनेक लग्नें करतात, लग्नें मोडतातहि पुष्कळ, आणि जगांतल्या इतर कुठल्याहि लोकांपेक्षां यांची धनप्राप्ति अधिक असते. लहान मुलें, यंत्रें, प्राणी, आई, श्रमाचें काम, गोंगाट, प्रक्षोभ, निसर्ग, टेलिव्हिजन, सुखांतिका, हप्त्यानें खरेदी, गाडीचा वेग, जमावानें पाहण्याचे खेळ, दलित माणूस, राष्ट्रध्वज, ख्रिसमस, जाझ संगीत, डौलदार शरीराची स्त्री, पिळदार पुरुष, उच्च संगीताच्या मुद्रिका, मोठे जमाव, विनोदी चित्रमाला, हिवाळ्यांत उबदार

व उन्हाळ्यांत थंड असणारीं घरें, मांसाचे जाड तुकडे, कॉफी, आइसक्रीम, अनौपचारिक पेहराव, खूपसें वाहतें पाणी, कोणतीहि गोष्ट आपली आपण करणें आणि चाळीस अथवा त्याहून कमी तासाचा आटवडा या सर्व अमेरिकनांच्या आवडीच्या गोष्टी आहेत.

अमेरिकन लोकांच्या गाड्या इतक्या पुष्कळ आहेत कीं त्यांनीं सारे रस्ते भरून जातात, पण वाहतुकींत गर्दी फार म्हणून त्यांचीच तक्रार असते. सिनेमा व टेलिव्हिजनला गर्दी खूप असते, पण कलागुण व व्यापारी दृष्टि या दोन्हीकडेहि त्यांचें लक्ष असतें. ते चर्चला अवश्य जातील पण धर्मोपदेश चालू असतांना त्यांचें तिकडे लक्ष नसतें. शरिराला विसावा मिळावा म्हणून खूप पितात, पण त्या धुंदींत असतांनाहि अधिकाधिक परिश्रम-कार्यांचीं स्वप्नें त्यांना पडूं लागतात.

अमेरिकनाचा म्हणून अमुक एक नमुना आहे असें नव्हे. पण साऱ्या सतरा कोटि स्वभावांची बेरीज केली व तिला पुन्हा त्याच संख्येनें भागलें म्हणजे जो कांहीं एक नमुना मिळेल तो या प्रकरणांत वर्णिला तसा असेल.

## प्रकरण सातवें

# आटोपशीर गांवें

अमेरिकनांचें कौटुंबिक जीवन व त्यांचा स्वभाव यांचें वर्णन केलें. आतां अमेरिकन लोक आपलीं आटोपशीर गांवें (कम्युनिटी) कशीं वसवितात हें पाहूं. असें एकादें अगदीं लहान गांवठाण समजून घेणें हें फार सोपें पडेल. आंकड्यांच्या परिभाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या माहितीवरून असें वाटतें कीं पुष्कळसे अमेरिकन लोक मोठमोठ्या शहरांत राहत असतील. पण वस्तुस्थिति उलट आहे. अमेरिकेंतील फार मोठी संख्या लहान लहान गांवठाणांतच राहते. शिरगणतीच्या ब्यूरोनें २५०० लोकवस्तीहून अधिक लोकवस्तीला 'शहरी वस्ती' म्हटलें आहे. पण २५०० लोकवस्ती असणारीं गांवठाणें हीं शहरांत मोडण्यापेक्षां खेड्यांतच जमा करावीं लागतील. फार काय अमेरिकेंत २५ हजार अथवा ५० हजार लोकवस्ती असणाऱ्या गांवठाणांतील लोकांना आपण त्या वस्तीशीं पूर्ण एकरूप आहों—त्या वस्तीची आपणास खडान् खडा माहिती आहे असें वाटत असतें. अमेरिकेंतील ३७ टक्के लोक ग्रामीण भागांत राहतात (१ हजार अथवा त्याहून कमी वस्ती असलेले राजकीय घटक). २२ टक्के लोक २५ हजारपर्यंत लोकवस्ती असलेल्या लहानमोठ्या शहरांत राहतात आणि बाकीचे ४१ टक्के लोक मोठ्या शहरांत राहतात. अलीकडे अमेरिकनांच्या मनावर राष्ट्रवाद अथवा जागतिक बंधुभाव एक प्रकारें लादण्यांत येत आहे. पण बहुसंख्य अमेरिकन अजून प्रांतवादी अथवा लहान-शहरी मनोवृत्तीचेच आहेत. युद्धकाळापासून ते मोठीं शहरें सोडून उपनगराकडे धाव घेऊं लागले असून नवीं घरें वाढतात तीं उपनगरांत वाढतात व उपनगरांची वस्ती वाढत आहे. आपले सामुदायिक म्हणजे नागरिक व्यवहार आपले आपण चालविण्याची अमेरिकनांना फार आवड असल्यानें ते लोकवस्तीचा एकेक गट फार मोठा होऊं देण्यास विरोध करतात. कारण त्यामुळें

नागरिकांनीं समुदायानें आपला कारभार चालविणें अवघड होतें. लोकवस्ती एकत्र फार वाढली असें वाटलें कीं अमेरिकन लोक कोणता ना कोणता उपाय योजून तिची विभागणी करतातच.

एकाद्या ल्हान शहरांत तुम्हीं प्रवेश केला कीं प्रथम तुम्हांला रोटरी, किवॅनीज, लॉयन्स इत्यादि नांवाच्या लोकोपयोगी क्लबांच्या पाट्या दिसतील. हे क्लब कोणता लोकोपयोग करतात? एकादें क्रीडांगण अथवा करमणुकीची सोय निर्माण करणें, बालगुन्हेगारांचा प्रश्न सोडविणें, बालवीर चळवळीस साहाय्य करणें, ज्यांना ऐपत नाहीं अशांना मोफत नेत्रोपचार करणें, हायस्कूलच्या बँडसाठीं गणवेष खरेदी करणें इत्यादि कामांसाठीं या संघटना आहेत असें जाहीर केलेलें असतें.

कांहीं ठिकाणीं हळूहळू तर कांहीं ठिकाणीं कल्पनातीत जलद्पणें अमेरिकेचें रूप अगदीं पालटलें जात आहे. आधुनिक कारखाने निघत आहेत, निष्कलंक पोलादाच्या खिडक्या सर्वत्र बसविल्या जात आहेत, सुंदर पण साधीं घरें वाढत आहेत. पण अजून जुन्या घरांची संख्या फार मोठी आहे. गांवोगांव अजून गलिच्छ वस्त्या असून अगदीं कोसळायला आलेल्या घरांत अजून गरीब लोक राहत आहेत. त्या घरांचा रंग निघून चाललेला आहे. पण प्रत्येक गांवांत प्रवेश करण्याच्या सर्व रस्त्यांवर मात्र उत्तम वस्तीचे मोहल्ले लागतात. दोन्ही बाजूंनीं छाया देणारीं झाडें, गार हिरवळी, उघडीं व स्वागतशील घरें रस्त्यांच्या बाजूंनीं आढळतील. अमेरिकन घरांना रस्त्यांच्या बाजूंनीं भिंती नसून घरें उघडीं असतात. घरें भिंतींनीं झाकणें हें 'अमेरिकन' लक्षण नव्हेच असें मानण्यांत येतें. कांहीं अगदीं थोडे श्रीमंत लोक मात्र घराभोवतीं भिंती उभारतात.

कोणतेंहि लहान शहर हें मोठ्या बाजाराचें केंद्र असतें. मुख्य रस्त्यावरून हा बाजार ठळकपणें दिसतो. दुकानांच्या पृष्ठभागीं लोकांचें लक्ष वेधणाऱ्या विविध प्रकारच्या पाट्या असतात. रात्रीं झगझगीत लाल, हिरव्या, निळ्या रंगाच्या फ्लुओरेसेन्ट नळ्यांनीं या पाट्या सुशोभित केल्या जातात. गांवांतल्या विशिष्ट भागांत बँका, पोस्ट, टेलिफोन, वीजकंपनी, आगीचा बंब, पोलीसस्टेशन, कोर्ट, म्युनिसिपालिटी, रेलरोड व बस यांच्या मुख्य कचेऱ्या आणि ठाणीं, सिनेमा व किरकोळ विक्रीचीं दुकानें या लोकोपयोगी संघटना जवळ जवळ असतात. त्यांचें जीवन गांवावर व गांवाचें त्यांच्यावर अवलंबून असतें. कापड, भांडीं, अन्न यांचीं दुकानें वरींच असतात, त्याच्या खालोखाल विजेच्या साहित्याचीं व धोब्यांचीं दुकानें असतात. अमेरिकेंत फार प्रसिद्ध असणारे ड्रगस्टोअर येथें असतात. त्यांत फक्त ड्रग्ज म्हणजे औषधें मिळतात असें नव्हे. अमेरिकन लोक

गोडखाऊ असून त्यांना लागणारें विविध प्रकारचें आइसक्रीम, खाऊचे पुडे, साखर, साबण वगैरे साहित्य, पुस्तकें, नियतकालिकें, घरसाहित्य, सिगरेट, खेळणीं—आणि यांबरोबरच औषधेंहि तेथें मिळतात. या दुकानांच्या वरच्या मजल्यावर डॉक्टर, वकील, फोटोग्राफर, दंतवैद्य, केशभूषाकार, गृहरचनाकार, विमाएजंट, स्थावर मिळकतींचे एजंट वगैरे लोकोपयोगी धंदेवाले असतात. मुख्य रस्त्यांच्या बाजूस विशेष ठळकपणें चर्चेस, मोफत सार्वजनिक ग्रंथालय, वाय्. एम्. सी. ए., इत्यादि संघटना दिसतात. यावरून धर्माचा प्रभाव अमेरिकेवर मोठा आहे हें दिसून येत असून, शिक्षण आणि करमणूक यांनाहि अमेरिकेंत सारखेंच महत्त्व देतात हें दिसून येतें.

बाजाराच्या मधोमध अनेक घरांच्या वरच्या मजल्यावर अथवा जुनाट वाड्यांमध्यें क्लब्स व लॉजेस असतात. एल्क्स, ईगल्स, मूस, औल्स इत्यादि पाळींव पक्ष्यांचीं नांवें त्यांना दिलेलीं असतात. अमेरिकन समाजाचे सतत तुकडे होत आहेत, लोक सतत स्थलांतर करीत आहेत, अशा परिस्थितींत या लॉजेसमुळें लहानशा घरांत, अगदीं थोड्या माणसांत ज्याला राहायला हवें आहे त्याची गरज भागते. या लॉजेसचा व क्लब्सचा हेतु लोकांची बंधुभावनेनें सोय करणें हा असून आजारी व असमर्थ यांना साहाय्य व आसरा देणें हाहि आहे. घराला कंटाळलेल्या माणसांचीहि येथें सोय होते. जेथें स्त्रीचा प्रवेश होणार नाहीं असा हा जणूं एक किल्लाच, घराला त्रासलेल्या माणसाला मिळतो. आपल्या पुरुषी श्रेष्ठतेवर आक्रमण करणाऱ्या बायकांना कंटाळून घर सोडणाऱ्यांना हे क्लब मोठे सुरक्षित व सुखाचे वाटतात. उद्योगधंदे व राजकारण यांना उपयोगी अशी मैत्रीहि येथें जोडतां येते.

## जॉन व मेरी आणि त्यांचा गांव

लहान शहरांतला नागरिक आपल्या भोवतालच्या वसाहतींत शेंकडों प्रकारांनीं गुंतलेला असतो. यासंबंधींचें एक प्रातिनिधिक उदाहरण घेऊं. न्यू इंग्लंडमधील दहा हजार लोकवस्तीच्या शहरांत, समजा, जॉन आणि मेरी हें एक जोडपें आहे. जॉन वीजसाहित्य कारखान्यांत विभागअधिकारी आहे. तो आणि त्याची पत्नी मेरी दोघेंहि ब्रिज क्लबाचीं सभासद आहेत. हा ब्रिज क्लब कंट्री क्लबांत भरतो. हें जोडपें कंट्री क्लबाचेंहि सभासद आहे. या दोन्ही क्लबाचे संबंध सामान्यतः सुखी अशा अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांशीं येतात. हीं दोघें चर्चमध्यें जातात. शिवाय तरुण दांपत्यांचे क्लब आहेत तेथेंहि हीं दोघें जातात.

जॉनचा मालक रोटरी क्लबांत जातो. पण जॉन लॉयन क्लबांत जातो. जॉन हा स्कूल बोर्डाचा सदस्य असल्यानें लॉयन क्लबाचें सदस्यत्व त्याला उपयोगी पडतें. कारण लॉयन क्लबांत शाळेचे सुपरिंटेंडंट असतात व तेथें तो त्यांच्याशीं बोलूं शकतो. शाळेसंबंधानें इतरांचीं मतें तेथें त्याला कळतात आणि स्कूल बोर्डाच्या काहीं प्रश्नांसंबंधानें तो तेथल्या सदस्यांत आस्था निर्मूं शकतो.

जॉन हा आपल्या कॉलेजच्या माजी विद्यार्थी संघाचा सभासद असतो, तसेंच तो हायस्कूल माजी विद्यार्थीसंघाचा सदस्य असतो. पतिपत्नी दोघेंहि एका नृत्यसंघाचीं सदस्य असतात. दोघेहि आपापल्या उद्योगांत दिवसभर असल्यानें दोघांना मोकळेपणीं एकत्र येण्याला संध्याकाळची ही नाचाची वेळ सोयीची ठरते. शिवाय लाठीक्लब, बंदूकक्लब, चर्चसंघ, कारखानाव्यवस्थापकसंघ, रिपब्लिकन पक्ष इत्यादि संघटनांचाहि जॉन सदस्य असतो.

मेरीचें जीवन जॉनपेक्षांहि अधिक उद्योगाचें असतें. अमेरिकेंतील प्रचंड बहुसंख्य स्त्रियांप्रमाणें मेरीला घरकाम करावें लागतेंच. तिला घरांतले कपडे धुवावे लागतात, पण तें सर्व काम यंत्रानें होतें. एकाद्या सेनापतीला शत्रूवर हल्ला करण्याची योजना आंखावी लागते त्याप्रमाणें मेरीला दिवसभरच्या आपल्या कामाची योजना आंखावी लागते. सैपाक, स्वच्छता, शिवणेंटिपणें, बागकाम या सर्वांची व्यवस्था इतर कामाच्या वेळापत्रकांत बसवावी लागते.

एक मोठा फंड उभारायचा असून त्यांत मेरीकडे कांहीं काम आलें आहे. त्याच्या प्रचारमोहिमेचें साहित्य तिच्या टेबलावर पडलें आहे. वाय्. एम्. सी. ए. जीं सार्वजनिक हिताचीं कामें करतें त्यासाठीं वर्षांतून एकदां हा गांवफंड (कम्युनिटी चेस्ट) जमवायचा असून तें काम आज मेरी करीत असेल. (गांव मोठें असेल तर तेथें वाय्. डब्ल्यू. सी. ए. ही संघटनाहि असते.) शिवाय बालवीर-कन्यावीर चळवळीं, मानसोपचार केंद्र, कुटुंबसेवामंडळ, हॉस्पिटल, निराश्रित मुलांना साहाय्य, अशा आणखी कांहीं संघटनांचीं कामें मेरीकडे असतात. वर्षांतून कांहीं वेळां रेड क्रॉस, असमर्थ मुलें, अंध, वगैरेंना साहाय्य मिळविण्यासाठीं तिला शेजाऱ्यांच्याकडे जावें लागतें. अशा पुष्कळशा संघटना घटक राज्यांच्या मुख्य शहरांत असून निरनिराळ्या गांवांत दरसाल जी 'कम्युनिटी चेस्ट' जमते तिचा फंड यांच्या वांट्याला येत नसल्यानें त्यांच्यासाठीं वेगळा फंड जमवावा लागतो. शिवाय मधूनमधून 'शाळेंतील हॉटेल सुधारायचें आहे, साहाय्य द्या' इत्यादि स्वरूपाचीं विनंतिपत्रकें येतात. वास्तविक ही स्कूल बोर्डाची जबाबदारी असून मेरी नवऱ्याला तसें सांगेलहि. पण स्कूल बोर्डाचें

बजेट अगदीं वेतास बात असतें. म्हणून स्त्रिया अन्नाच्या पुड्या विकून, ब्रिजच्या चढाओढी लावून, नाचाचे समारंभ करून, पैसा मिळवितात. कोणत्या ना कोणत्या कारणासाठीं नेहमीं कांहींतरी फंड गोळा होत असतो.

इथें प्रश्न असा पडतो कीं हीं कामें सरकारनें अंगावर घेऊन त्यासाठीं कर बसवून पैसा उभारणें योग्य नाहीं काय? पण अमेरिकेचा इतिहास असा घडला आहे कीं सर्वसत्ताधारी अशा सरकारच्या हातीं या गोष्टी देण्याची अमेरिकनांना भीतीच वाटते. आपल्या कार्यांचीं सर्व सूत्रें समाजानें शक्य तों आपल्या हातीं ठेवावीं असें त्यांचें धोरण असतें. शिवाय आणखी एक कारण असें आहे कीं नागरिकांच्या ऐच्छिक प्रयत्नानें ज्या गोष्टी आज केल्या जातात त्या जर सरकार करूं लागेल तर त्याचा खर्च अफाट होईल. बहुतेक लहान गांवांत आगीचा बंबहि खाजगी संस्थांच्या ताब्यांत असतो. आग लागल्याची सूचना बिगुल वाजून मिळाली कीं स्वयंसेवक आपापलीं कामें सोडून मोटारींतून धावतात व आग विझवण्याचें काम उरकतात. सरकारनें औषधें देण्याची योजना अमेरिकनांना पसंत नसल्यानें लोक स्वेच्छ आरोग्य विमा संघटनेचे सभासद होतात. १ कोटि १० लक्ष लोकांना या मार्गें हल्लीं आरोग्यसाहाय्य मिळत आहे.

मेरीच्या नेहमींच्या कामाखेरीज इतरहि सार्वजनिक कामांचा बोजा तिच्यावर असतो. कुणाच्या तरी अन्नविक्रीसाठीं 'केक पुरवा' अशी मागणी असते, मेरीहि चर्चमहिलामंडळाची सभासद असून वापरलेले धड कपडे परदेशाला पाठविण्याचें काम त्या मंडळातर्फे करायचें असतें, हायस्कूलच्या ग्रंथालयासाठीं पुस्तकें जमवायचीं असतात, शाळेंतल्या कांहीं मुलांना शेजारच्या गांवीं खेळांचा सामना पाहण्यासाठीं मोटारींतून न्यायचें-आणायचें असतें, एकाद्या लिलावाचीं पत्रकें तयार करून दुकानाच्या भिंतीवर लावायचीं असतात, शिशुआरोग्यधामांत मुलें आलीं नाहींत म्हणून त्यांच्या मातांना फोन करायचा असतो, वगैरे.

अशा मध्यमवर्गीय जोडप्याचें सार्वजनिक काम वर्णिलें म्हणजे सार्वजनिक कामाचें सर्व चित्र संपलें असें नव्हे. आणखी असंख्य धाग्यांनीं हें दांपत्य समाजांत विणलेलें असतें आणि त्यांना हें सर्व स्वाभाविकहि वाटतें. या सर्व कामांत वेळ जाऊन त्यांची फुरसत कमी होते. पण त्यामुळें त्यांच्या ममत्वाचें क्षेत्र विस्तारलें जाऊन समाजाशीं आपण एकरूप होण्यानें आपला विकास झाल्याचें समाधानहि त्यांना लाभत असतें. गटागटांनीं होणाऱ्या या कामांत प्रत्येक नागरिक गुरफटला जाऊन त्याचा एकलकोंडेपणा नाहींसा होतो आणि समाजाचा आपण एक अवयव आहों ही जाणीव त्याच्या ठिकाणीं निर्माण होते. 'स्वार्थापेक्षां सेवा मोठी' अशी

रोटरीची घोषणा आहे. 'स्वतांप्रमाणेंच शेजाऱ्यावर प्रेम करा' असें चर्च म्हणतें. जॉन आणि मेरी यांना हें तत्त्वज्ञान अगदीं सोपें व स्वाभाविक वाटतें. कारण रोजच्या रोज समाजांत त्याना त्याचा अनुभव येत असतो.

समाजांतील क्रियाशील व्यक्तीला आपलें समाजांतलें स्थान सांपडणें हें या स्वेच्छ परस्परसेवेनें शक्य होतें, यामुळें यशस्वी कर्तृत्वाचें समाधान त्याला मिळतें, आणि सुरक्षितता व परस्पराबद्दल आदर या भावना या परस्परसेवेनें प्रगल्भ होतात. अशा लोकांना आपण एकाकी व असुरक्षित आहों असें कधींहि वाटत नाहीं. आमच्या संस्कृतीचें हें वैशिष्ट्य होय असें अनेक समाजशास्त्रज्ञांनीं सांगितलें आहे.

या पद्धतींत एक मोटा दोष आहे तो हा कीं, समाजांतले सर्व नागरिक, विशेषतः कमी मिळकतीचीं माणसें, अशा समाजकार्यांत गुंतवलीं जात नाहींत. त्यांना या सेवेचा फायदा मिळतो. पण त्याला त्यांचें साहाय्य मिळत नाहीं. एक तर या सर्व लोकांना वेळ नसतो; शिवाय जे समाजाची सेवा करणारे असतात ते मदत मागायला जातात तेव्हां ज्यांच्याशीं त्याची ओळख असेल व ज्यांच्यावर त्यांचा विश्वास असेल अशांचीच मदत ते मागतात. कमी मिळकतीच्या लोकांना समाजसेवाकार्याचें तंत्र माहीत नसतें, त्यांना आत्मविश्वास नसतो, लोकहितार्थ फंड देण्याची अथवा बोर्डाच्या सभांना हजर राहण्याची सत्प्रेरणा नसते. हा दोष घालविण्याचा उपाय म्हणजे शिक्षणाचा दर्जा वाढवून समाजांतील सांस्कृतिक उच्चनीचता नाहींशी करणें हाच होय.

## ऐच्छिक संघटना

ज्या विदेशी निरीक्षकाला अमेरिका समजून घ्यायची असेल त्यानें प्रथम हीं लहान शहरें आणि त्यांतल्या ऐच्छिक संघटना समजून घेतल्या पाहिजेत. ज्या नागरिकांना आपलें खाजगी जीवन व व्यक्तिस्वातंत्र्य टिकवून शिवाय समाजाशीं संबद्ध असावें व समाजावर आपला प्रभाव पाडावा असें वाटतें अशा नागरिकांना हें उद्दिष्ट साधण्यासाठीं ऐच्छिक संघटना हें फार चांगलें साधन आहे. जेकस बार्झुन म्हणतो, "यामुळें नैतिक तत्त्वज्ञान कृतींत उतरतें. आमच्या जबाबदाऱ्या व आमचे दोष आम्ही ईश्वराच्या डोक्यावर लादूं इच्छीत नाहीं. आमचे आम्ही तें ओझें स्वतां उचलतों."

या संघटनांचा दुसराहि एक उपयोग होतो तो हा कीं भिन्न भिन्न सामाजिक, आर्थिक, धार्मिक, वांशिक पार्श्वभूमीचीं माणसें एकमेकांचा परिचय करून घेऊं शकतात. सर्व्हिसक्लबांत, चर्चमध्यें, प्रचारमोहिमेसाठीं एकत्र जेवणें, बाजार

अथवा लिलाव येथें सार्वजनिक हितबुद्धीनें काम करणें, पैसा देणें-घेणें, यामुळें अशीं सर्व माणसें अधिकाधिक जवळ जवळ येतात आणि लोकशाहीप्रवृत्तीचा विकास होत राहतो. समाजकार्यासाठीं वेळ व पैसा खर्चण्यानें आपला दर्जाहि वाढतो. या समाजकार्यांत भाग घेणाऱ्यांना आपल्या भोवतालची परिस्थिति आपणच निर्मीत आहों असें वाटून आपण त्या परिस्थितीचे दास नव्हे असा आत्मविश्वास वाटतो. (अर्थात् ही समाजसेवाप्रवृत्ति निर्माण होण्याचीं कारणेंहि त्या परिस्थितींत होतींच.) यामुळें अमेरिकनांना असें वाटतें कीं आपणाला जसे आपण हवे तसे आपण आपल्या हातांनीं घडविलेले आहोंत. विचारापेक्षां कृति बरी असें ते मानतात. नुसत्या कल्पनांपेक्षां परिणामांवर त्यांचा भर असतो. या ऐच्छिक संघटना हें उद्दिष्ट साधतात.

ऐच्छिक संघटनांचें मूलग्राही महत्त्व डी टॉकेव्हिल याच्या लक्षांत फार चांगल्या प्रकारें आलें आहे. टॉकेव्हिल लिहितो, "अमेरिकन नागरिकांनीं ज्या ऐच्छिक संघटना स्थापल्या आहेत, आणि ज्या राजकीय हक्कांचा ते एवढा उपयोग करतात, त्यामुळें प्रत्येक नागरिकाला हजार मार्गांनीं अशी आठवण दिली जाते कीं, आपल्या बांधवांना साहाय्य करणें यांत जसा अखेर स्वार्थ आहे तसेंच तें आपलें कर्तव्यहि आहे. माणसें पहिल्यानें सामाजिक सेवेंत पडतात तीं त्यांना समाजसेवेची गरज पटते म्हणून. नंतर त्यांना त्याची आवड वाटूं लागते. प्रथम हेतुपूर्वक केलेली क्रिया पुढें अगदीं स्वयंस्फूर्त होते. एकमेकांना साहाय्य करीत राहिल्यानें प्रथम तशा कामाची संवय होते व मग त्यांत गोडीहि वाटूं लागते." अमेरिकनांच्या अंगीं मुरलेली ही ऐच्छिक सहकार्याची संवय सर्व अमेरिकन समाजांत सर्वत्र अंमलांत येत असते. त्यामुळें हुकुमशाही प्रवृत्तीच्या गटांविरुद्ध प्रतिकाराची एक मोठी साखळीच तयार होऊन देशांत हुकुमशाही प्रभावी होणें अशक्य होतें. एकेकटी व्यक्ति ही असमर्थच आहे. पण एखाद्या संघटनेची सदस्य या नात्यानें प्रत्येक व्यक्तीस बळ येतें. या संघटना इतक्या पुष्कळ असतात व त्यांचे हेतु इतके विविध असतात कीं अशा सर्व संघटना मिळून संघटनाबलांचा ताजवा समतोल करतात व त्यामुळेंच या संघटना एकमेकांचें नियंत्रणहि करतात. 'कू क्लक्स क्लन'सारख्या हास्यास्पद पण परिणामीं धोक्याच्या एकेक संघटनेबरोबरच शेंकडों हजारों सत्कार्याला वाहिलेल्या संघटना असतात.

कामगारसंघटना, डॉक्टर, शेतकरी वगैरेंच्या संघटना, विशिष्ट रोगाच्या निवारणासाठीं अथवा शिक्षणसुधारणेसाठीं निघालेल्या संघटना, धार्मिक संघटना, अमेरिकेबाहेरच्या राष्ट्रांतून येणाऱ्या नागरिकांच्या आश्रयावर जगणाऱ्या निरनिराळ्या

राष्ट्रीयकांच्या संघटना, विशिष्ट शिक्षणसंस्थांच्या माजी-विद्यार्थी-संघटना, माजी-युद्धसैनिक-संघटना, करमणुकीच्या, राजकीय, अथवा खास स्त्रियांच्या संघटना, इत्यादींचें साऱ्या अमेरिकाभर फार मोठें रान माजलेलें असतें.

डुकरिणीच्या पिलांप्रमाणें संघटना सतत वाढत असतात. उदाहरणार्थ, चर्च-भोवतीं निरनिराळ्या वयाच्या लोकांच्या संघटना, अथवा विशिष्ट कामाच्या संघटना वाढत असतात. अशा नागरिक-संघटनांची संख्या वाढून एकमेकांना त्यांचा अडथळा होऊं लागला म्हणजे परस्परांच्या कार्यांत संयोग घडवून आणण्यासाठीं सर्वांचें मिळून एकादें कम्युनिटी कौन्सिल स्थापन करतात.

प्रत्येक हितसंबंध, मग तो एकादा छंद, खेळ, धंदा असेल, त्याची संघटना असते. एका अमेरिकन शहराच्या पाहणींत असें आढळून आलें कीं तेथले ४१ टक्के लोक एक अथवा अधिक संघटनांचे सभासद होते. एकेक माणूस अनेक भूमिका घेऊं शकतो, यामुळें अशा अनेकांच्या अनेक भूमिकांच्या गुंतागुंतीनें अनेक बाजूंनीं विणलेलें असें जाळेंच तयार होतें.

चोहों बाजूंनीं चाललेल्या या समाजकार्यानें जेजावलेले लोक संघटनांचें अगदीं जंगल माजलें आहे अशी तक्रार करतात व ही तक्रार खरीहि आहे. यांतल्या कांहीं संघटना निरुपयोगी व कांहीं तर अपायकारकहि असतात. पण ही तक्रार व्यर्थ आहे. कारण संघटनास्वातंत्र्य आहे याचा अर्थ असा आहे कीं शेळ्यांची आणि मेंढ्यांचीहि संघटना होणारच. लोकांची वाहवा मिळविण्यासाठीं या संघटना स्पर्धा करतात तेव्हां त्यांना कळून येतें कीं आपल्या उद्दिष्टांना विरोधहि अनेकांचा आहे. हें ज्ञान हाहि एक त्यांना फायदाच असतो. अमेरिकन समाज हा जसा आर्थिक बाबतींत स्पर्धेवर आधारलेला आहे तसाच तो सामाजिक व नागरिक बाबतींतहि स्पर्धाशीलच आहे. जेथें निवडणुकींनीं बहुमताची सत्ता निर्माण होते तेथें प्रत्येक अल्पसंख्य गटाला आत्मरक्षणाची संधि मिळण्याला दुसरा उपायच नाहीं.

समाजांत संघटना स्थापन करण्याची गरज उत्पन्न झाली कीं स्त्रिया या नेहमीं आघाडीवर असतात. कारण कम्युनिटी चेस्ट, इतर सामाजिक लोकोपयोगी कार्य, अशा बऱ्याचशा संघटनाकामाचा अनुभव त्यांना असून त्यांच्या स्वतांच्या अनेक संघटना असल्यानें आणखी संघटना उभारणें त्यांना सोपें जातें. पुरुष-मतदारांची संघटना अमेरिकेंत नाहीं. पण स्त्री-मतदारांच्या संघानें आश्चर्यकारक कार्य केलें आहे. प्रचलित वादाच्या दोन्ही बाजू संशोधून संघटना त्या समाजापुढें मांडतात. स्त्रियांच्या १९ हजार क्लबांचें एक फेडरेशन असून

त्याची सदस्यसंख्या १ कोटि १० लक्ष आहे. या फेडरेशननें मोफत ग्रंथालयें, बालगुन्हेगारांचीं कोर्टें, जीवनसाधनसंचय, प्रौढशिक्षण व इतर सुधारणा यांसाठीं खूप कार्य केलें आहे. 'होम डेमॉन्स्ट्रेशन ग्रुप' नांवाच्या सरकारच्या शेतीखात्याच्या साहाय्यानें चालणाऱ्या संघटना ग्रामीण भागांत आहेत. एका फ्रेंच स्त्रीनें अशा संघटनांच्या एका केंद्राला भेट दिली त्यावेळीं मध्यमवयी स्त्रिया पोषक अन्न, परराष्ट्रधोरण, राष्ट्रीय धोरण वगैरे विषयांवर चर्चा करीत असलेल्या पाहून तिला आश्चर्य वाटलें.

## ही ऐच्छिकता कोठून आली

ही स्वयंसेवाप्रवृत्ति फार महत्त्वाची असून ती सर्वत्र उघडउघड प्रत्ययाला येते. अमेरिकनांत ही कशी निर्माण झाली? आपण ज्यांना पिल्ग्रिम्स म्हणजे यात्रेकरू म्हणून ओळखतों ते आपले प्राचीन पूर्वज १६०७ सालीं इंग्लंडांतून हॉलंडांत गेले. त्यांनीं 'ईश्वराशीं करार' करून एकमेकाला बांधून घेतलें होतें. इंग्लंडांत त्यावेळीं प्रत्येक नागरिकाला राजाच्या धर्मपंथाचा अनुयायी असण्याची सक्ती असून चर्चमध्यें हजर नसणाऱ्यांना शिक्षा होई. याला या 'यात्रेकरूं'चा विरोध होता. समान धर्मश्रद्धेच्या लोकांचें एक चर्च असणें हाच खरा धर्म होय असें त्यांचें मत असून याच निष्ठेनें त्यांनीं तो 'ईश्वराशीं करार' (कॉव्हेनंट विथ दि लॉर्ड) केला होता.

पुढें त्यांनीं हॉलंड सोडून अमेरिकेची वाट धरली व ते न्यू इंग्लंडच्या किनाऱ्याजवळ आले. त्यावेळीं आतां आपणांजवळ सरकार अथवा अधिकारी नाहीं ही गोष्ट त्यांना आढळली. तेव्हां पुन्हा आपली संघटना स्थापण्याकडे ते वळले. अमेरिकेला ज्या 'मेफ्लॉवर' जहाजांतून ते आले त्याच जहाजावर 'मेफ्लॉवर कॉम्पॅक्ट' त्यांनीं केला आणि आपण जे कायदे आपणांसाठीं करूं ते आपले आपण पाळले पाहिजेत असें त्यांनीं ठरविलें. त्यांनीं आपल्यांतील एकाला गव्हर्नर नेमलें आणि गरजेप्रमाणें इतर अधिकारीहि नेमले. ते ज्या राष्ट्राशीं स्वामिनिष्ठ होते तें राष्ट्र आतां त्यांचेपासून तीन हजार मैल दूर होतें. म्हणून आतां त्यांचें राज्य त्यांनाच चालवावें लागलें व तें त्यांनीं विलक्षण यशस्वितेनें चालविलें. त्यांनीं बनविलेलें हें सरकार आधुनिक लोकशाहीपासून फार वेगळें होतें. कारण आपल्या पसंतीच्या लोकांनाच त्यांनीं मताधिकार दिला होता. पण आपले व्यवहार त्यांनीं शहाणपणानें व चातुर्यानें चालविले.

अशा रीतीनें न्यू इंग्लंडमध्यें प्रथम वसाहत करणाऱ्या पहिल्या वसाहतकारांनीं

स्वतांचे स्थानिक व्यवहार स्वतां चालविण्यास सुरवात केली. या स्थानिक पातळीवर सरकार ही ऐच्छिक संघटना होती. पुढें स्वाभाविकपणेंच असें घडलें कीं लोकांना जशा दुसऱ्या गरजा वाटूं लागल्या तशा दुसऱ्या संघटना त्यांनीं काढल्या. प्रथम चर्चसंघटना निघाल्या. कारण नव्या नव्या वसाहतकारांत नवे नवे चर्चगट होते.

मिशिगन राज्यांत व्हर्‌मॉटीअर्स यांनीं व्हर्‌मॉटव्हिल येथें वसाहत स्थापली. तेथें रोज एक अस्वल येऊन रोज एकेक डुक्कर चोरून नेत असे. तेथल्या सर्व माणसांनीं त्या अस्वलाला मारण्यासाठीं संघटना स्थापली. कुत्रीं व बंदुकी जमवतां येतील तेवढ्या जमविल्या. त्यांनीं त्या प्रदेशांत जेथें अस्वल लपून राहतें असें त्यांना माहीत होतें त्या भागाला वेढा दिला, त्या अस्वलाचा पाठलाग केला व त्याला त्यांनीं ठार मारलें. पण ही संघटना अस्वलाला मारून थांबली नाहीं. त्याचें मांस गांवांतल्या सर्व कुटुंबांना वांटण्यांत आलें व (बहुधा कुत्र्यांनाहि वांटलें असावें), त्याचें कातडें विकून खिस्ती शाळेच्या ग्रंथालयाला तो फंड देण्यांत आला.

याप्रमाणें अमेरिकेंत आलेल्या पहिल्या प्रॉटेस्टंटांचा आग्रह स्थानिक कारभार पूर्णस्वायत्त असावा असा असे आणि जसजशी या वसाहतींची सरहद्द पुढें पुढें सरकत चालली तसतसें या नव्या वसाहतवाल्यांना नवनव्या साहसांना तोंड द्यावें लागलें. यामुळें जिवंत राहून प्रगति करण्यासाठीं त्याना एकजूटहि करावी लागली. या ऐतिहासिक कारणानीं ऐच्छिक संघटना स्थापन झाल्या व आज अमेरिकेंत त्यांना जें महत्त्व आलें आहे तें त्यामुळेंच आलें. म्हणून ऐच्छिक संघटना या अमेरिकन जीवनाचें कोणतेंहि अंग समजण्याची किल्ली आहे. यामुळेंच कोणत्याहि प्रचंड गोष्टीबद्दल आम्हांला अविश्वास वाटतो, आम्ही चटकन् एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशांत जातों व नवीं नातींहि आम्ही अगदीं तत्परतेनें जोडतों.

न्यू इंग्लंडमध्यें प्रथम स्थापन केलेलीं लहान लहान शहरें व त्याच धर्तीचीं इतरत्र स्थापण्यांत आलेलीं शहरें यांचें स्वरूप तितकेंसें सरकारसारखें नसून तीं बहुंशीं ऐच्छिक संघटनेसारखींच आहेत. तेथल्या राजकीय अधिकारापासून कोणासहि लाभ नसतो. पाळीपाळीनें अधिकाराच्या जागा दिल्या जातात. गांवाचें हें काम करण्यासाठीं पगार तर मिळत नाहींच, पण साधे आभारहि न मिळतां फक्त टीका ऐकावी लागते. शेतकरी अथवा व्यापारी जे अधिकाराची जागा घेतात ते राजकारणांत धंदेवाईक म्हणून नव्हे तर फक्त हौसेनें येतात. कर्तव्यबुद्धि अथवा बडे होण्याची इच्छा ही त्यांना सदर जागा स्वीकारण्याची प्रेरक असते. अमेरिकन सरकार याप्रमाणें स्थानिक पातळीवर जन्माला आलें आहे ही मुख्य

गोष्ट लक्षांत ठेवणें फार अवश्य आहे. त्यामुळेंच अमेरिकन जीवनांतलीं किती तरी कोडीं उलगडतात.

अमेरिकन जीवनावर ज्या ज्या वेळीं संकट आलें त्या प्रत्येक वेळीं ही ऐच्छिक संघटनांची प्रवृत्ति निर्णायक ठरली. १७६५ सालीं अमेरिकेवर ब्रिटननें जेव्हां स्टँपाचा कायदा लादण्याची सक्ती केली त्यावेळीं त्यावेळच्या साऱ्या वसाहतींत 'स्वातंत्र्यपुत्र' नांवाच्या अनेक संघटना निघाल्या. त्यांचा हेतु 'पार्लमेंटांत प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार न देतां कर लादण्यांत अन्याय होतो' या अन्यायाचें निराकरण करणें हा होता. मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या प्रतिमा त्यांनीं जाळल्या, स्वातंत्र्याच्या द्योतक अशा काठ्या उभारल्या, स्वातंत्र्यवृक्ष अर्पण केले, स्टँपांच्या त्यांनीं होळ्या केल्या आणि स्टँपमास्टरना अधिकाराच्या जागीं जाण्यास प्रतिबंध केला. त्यांनीं पत्रव्यवहारकमिट्या स्थापन करून सर्व प्रदेशां-तील चळवळ संघटित केली आणि या कमिट्यांनीं क्रांतीच्या वेळीं अशा कमिट्या स्थापण्यासाठीं आपल्या अनुभवाचा पुष्कळ फायदा दिला. 'या कमिट्या म्हणजे क्रांतीचें स्वरूपच होत्या' असें जॉन अॅडम्सनें म्हटलें आहे. दहा वर्षेपर्यंत या स्वातंत्र्यपुत्रांनीं स्वातंत्र्याच्या कार्यासाठीं लोकमत संघटित केलें. त्यासाठीं त्यांनीं जी परिभाषा वापरली तीच पुढें स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांत आली आणि ज्या भावनात्मक संस्कृतीवांचून स्वातंत्र्याची चळवळ होऊच शकली नसती ती संस्कृति या संघटनाकार्यांतूनच निर्माण झाली. टॉकेव्हिल म्हणतो "अमे-रिकेंतल्या आद्य वसाहतवाल्यांनीं जीं छोटीं शहरें वसविलीं त्यांनींच लोकसत्तेच्या तत्त्वास जन्म दिला, त्यांनींच क्रांति घडवून आणली व अखेरीस राष्ट्रीय राज्य-सत्तेचा ताबा घेतला." टॉकेव्हिल असेंहि म्हणूं शकला असता कीं युरोपांतील क्रांत्या मोठ्या शहरांनीं केल्या, अमेरिकेंतल्या क्रांतीचीं बीजें लहान लहान स्वायत्त वसाहतींच्या जीवनांत होतीं.

गुलामांना बंधमुक्त करण्याच्या चळवळीच्या वेळींहि अमेरिकन जीवनावर असाच आणीबाणीचा प्रसंग आला होता. तो शेवटीं याच स्वायत्त पद्धतीनें निवारण्यांत आला. गुलामगिरीविनाशक संघानें कृति करण्याची हांक दिली. तेव्हां 'भुईखालची रेल्वे' नांवाची संघटना स्थापन करण्यांत आली. गुलामगिरी अंमलांत असणाऱ्या मुलुखांतून जे हजारों गुलाम निसटून येत त्यांना स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचें काम या संघटनेनें गुप्त व बेकायदेशीर मार्गांनींहि केलें. गुलामगिरीच्या प्रश्नावर अमेरिकेंत जी फार मोठी यादवी झाली तिच्या कितीतरी पूर्वीं हें स्वातंत्र्यदानाचें काम चाललें होतें.

स्त्रियांना अमेरिकेंत मतदानाचा व इतर अनेक हक्क मिळण्यासाठीं जी चळवळ झाली व दारूबंदीचीहि जी चळवळ झाली तें सर्व कार्य त्यांनीं स्वायत्त संघटनांमार्फतंच केलें. ल्युसिअम चळवळ नांवानें प्रसिद्ध असलेली प्रौढशिक्षण चळवळहि याच ऐच्छिक संघटनांच्या बळावर करण्यांत आली असून त्यामुळें पुढें मग सार्वजनिक शाळांची पद्धति सुधारण्यांत आली. कामगारसंघटनेची चळवळ, राष्ट्राच्या वैभवांतला योग्य वांटा आम्हांलाहि मिळाला पाहिजे यासंबंधानें शेतकऱ्यांनीं केलेली चळवळ, या चळवळी अशा ऐच्छिक संघटनांतूनच निघाल्या. अशा प्रकारें राजकीय व सामाजिक क्षेत्रांत या ऐच्छिक संघटनांची कसोटी लागून त्यांचें बळ वाढलें. नव्या नव्या प्रत्येक क्षेत्रांत या पद्धतीचा जसजसा उपयोग होत गेला तसतशी ही पद्धति नवीन व गुंतागुंतीच्या अशा औद्योगिक संस्कृतीच्या गरजेनुसार बदलत गेली.

पण नैतिक–धार्मिक दृष्टिकोन हा जो त्या पद्धतीचा महत्त्वाचा पाया तो मात्र कायम राहिला. स्त्रियांनीं समान हक्काचा लढा दिला अथवा मदिराराक्षसीचा पराभव केला अथवा अधिक चांगलीं घरें व जागा त्यांनीं निर्माण केल्या त्या सर्व वेळीं नैतिक दृष्ट्या आवश्यक अशी गोष्ट आपण करीत आहों याची त्यांना जाणीव होती. कामगार अथवा शेतकरी यांनीं अधिक मिळकतीची इच्छा बाळगली तीहि राष्ट्राच्या संपत्तींत अधिक वाटा मिळविण्याचा आपल्याला नैतिक हक्क आहे याच भावनेनें.

अमेरिकनानीं पत्करलेलीं नैतिक बंधनें हीं ख्रिश्चन धर्माचींच तत्त्वें होत असें मानण्याची अमेरिकनांना संवयच असल्यानें सरकार ही संस्थाहि जणूं काय धर्माचेंच अंग आहे असें अमेरिकन लोक मानीत आले आहेत. उदाहरणार्थ, स्वातंत्र्याचा जाहीरनामा म्हणतो, "सर्वच माणसांना त्यांच्या निर्मात्यानें कांहीं अविच्छेद्य हक्क दिले आहेत." ईश्वर हाच अशा प्रकारें अमेरिकन लोकांच्या हक्कांचा उगम असल्यानें त्या हक्कांच्या संरक्षणासाठीं लढणें हें त्यांना जसें राजकीय तसेंच धार्मिक कर्तव्यहि वाटतें. शिवाय अमेरिकेच्या थोड्या इतिहासांतहि अमेरिकनांना आपापल्या धर्मपद्धतीचा अवलंब करतां यावा यासाठीं कोणत्या ना कोणत्या प्रकारची स्वायत्तता असणाऱ्या पृथक् वसाहती स्थापाव्या लागल्या. यावरून राजकीय व धार्मिक स्वातंत्र्य एकमेकांत गुंतलेलें आहे अशी अमेरिकनांची खात्री झालेली आहे.

धर्मस्वातंत्र्य म्हणजेच राजकीय स्वातंत्र्य आणि राजकीय स्वातंत्र्य म्हणजेच धर्मस्वातंत्र्य हा अमेरिकनांचा सिद्धांतच झालेला आहे. यामुळें जो माणूस

डा. ५

नागरिकी जबाबदारीचा आपला वांटा उचलत नाहीं, तो एक नैतिक कर्तव्य टाळतो असें अमेरिकनांना वाटतें. आपलें नागरिकी कर्तव्य पार पाडणाऱ्या माणसाला सर्वजण चांगला मान देतात. सामाजिक कर्तव्यांची जबाबदारी अंगावर घेणें हा नैतिक कसोटीचा मुद्दा ठरविलेला असतो.

डी टॉकेव्हिल मार्मिकपणें लिहितो, "अमेरिकेंत धर्मभावना व स्वातंत्र्यभावना यांत विरोध नसून परस्पर सहकार्य आहे. कॉंग्रेगेशनिस्ट, बॅप्टिस्ट, क्वेकर्स वगैरे धर्मसंघटना या लोकशाहीप्रधान संघटना असून अमेरिका ही राष्ट्र या दर्जाला पोंचण्यापूर्वी या संघटनांनींच अमेरिकनांना लोकशाहीचें शिक्षण दिलें, ईश्वराराधनेचा दृष्टिकोन प्रत्येकाचा वेगळा असूं शकतो या मुद्द्यावर अमेरिकन लोक भर देत असल्यानें प्रत्येकाच्या ठिकाणीं जबाबदारीच्या भावनेचें पोषण होतें. यामुळें पुढें नैतिक जबाबदारी व सामाजिक जबाबदारी या आपोआप एकरूप होतात.

पण याबरोबरच थोडीशी चमत्कारिक दिसणारी एक गोष्ट अशी आहे कीं एकीकडून राजकीय व धार्मिक कर्तव्यें हीं एकरूप करतांनाच धर्म आणि राजकारण पृथक् ठेवण्याचा अमेरिकनांचा अगदीं कठोर निर्धार असतो. आम्हांला आमचे पुढारी धर्मबुद्धीचे असावे असें वाटतें. परमेश्वरानें सर्व माणसें समान म्हणून निर्माण केलीं असून त्याचा नैतिक कायदा हाच विश्वाचा शासक आहे असें आमच्या पुढाऱ्यांनीं मानलें पाहिजे. पण त्याचबरोबर धर्मविषयक कामकाज व राजकारणविषयक कामकाज हीं दोन्ही आम्हीं वेगवेगळ्या खिशांत ठेवलीं पाहिजेत असाहि आमचा आग्रह असतो. प्रत्येक कार्यासाठीं, गरजेसाठीं वेगळी संस्था ही जी आमची विभागसंघटनांची संवय आहे तिचें मूळ यांत आहे. मुलांचा पॅरालिसिस, नैसर्गिक संपत्तीची नासाडी अथवा जनतेला संगीताची गोडी लावणें असा कोणताहि विषय असो, आम्ही नवा प्रश्न आला कीं नवी संघटना स्थापतों. आमच्यांतील प्रत्येकजण कुठें साधारण सभासद, कुठें कमिटीचा सभासद, कुठें फंड गोळा करणारा अशा कोणत्या ना कोणत्या भूमिकेंत असतोच. अशा प्रकारें या अत्यंत गुंतागुंतीच्या जगांत निरनिराळ्या आटोपशीर संस्थांचें सदस्यत्व पत्करून आम्ही अनेकांशीं प्रत्यक्ष संबंध मिळवितों. यामुळें आपण एका समाजाचे घटक आहों ही जाणीव व भावना सर्वांच्या मनांत निर्माण होते.

## धर्मपंथ

अमेरिकेंत विविध धर्मपंथांना जितके अनुयायी मिळतात तितके इतरत्र कोठेंच मिळत नाहींत आणि धर्मप्रसार जितका आपोआप होतो तितका इतर

कोणत्याहि देशांत होत नाहीं. निरनिराळे २५० नांवांचे धर्मपंथ अमेरिकेंत असून लक्षावधिपासून अगदीं मूठभरापर्यंत त्यांना अनुयायी आहेत. यूनिटेरिअन पंथासारखे कांहीं पंथ निव्वळ बुद्धिवादी आहेत तर दुसऱ्या कांहीं पंथात विशिष्ट घोषणा व अंगविक्षेप एवढेंच त्यांचें लक्षण असतें. चर्चचे सदस्य अमेरिकेंत दहा कोटीवर आहेत. अमेरिकेच्या सर्व इतिहासांत चर्चसदस्यांची संख्या सतत वाढत गेली आहे. अलीकडे हा वाढीचा वेग पूर्वीच्या कोणत्याहि काळापेक्षां अधिक आहे. १९५०-१९५४ या काळांत चर्चमध्यें जाणाऱ्यांची संख्या ९० लाखांनीं वाढली. कामगारांच्या कुटुंबापेक्षां बुद्धिजीवींचीं कुटुंबें अधिक नियमित-पणें चर्चला जातात आणि कॉलेजला न जाणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षां कॉलेजविद्यार्थी अधिक नियमित असतात.

मॉर्मोन्स व ख्रिश्चन सायंटिस्ट हे पंथ खास अमेरिकन आहेत. बॅप्टिस्ट कॉंग्रेगेशनिस्ट व असेच इतर कांहीं पंथ यांचा विकास वैशिष्ट्यपूर्णतेनें झाला. रोमन कॅथॉलिक, ल्युथरेन, एपिस्कोपेलिअन, ज्यूइश वगैरे पंथ बाहेरून येथें आले ते परिपूर्ण पंथ म्हणूनच येथें आले, पण अमेरिकेंत आल्यावर त्यांना येथल्या ऐच्छिक संघटनेचें रूप कमीअधिक प्रमाणांत स्वीकारावें लागलें.

धर्मश्रद्धा व व्यवहार यात खूप विविधता असल्याचा एक फार चांगला परिणाम समाजावर होतो तो असा कीं, त्यामुळें सर्व धर्मांत परस्परसहिष्णुता निर्माण होते. येथें कांहींशी चमत्कारिक वाटणारी पण खरी गोष्ट ही आहे कीं जेथें विविधता फार असते तेथें धर्मसमजुती अथवा आचार यांतील भेदाचें महत्त्व अगदींच कमी होतें. उदाहरणार्थ, विविध धर्मांच्या लक्षणांचें विडंबन करणारें कितीतरी वाङ्मय अमेरिकेंत झालें आहे. यामुळें हे धर्मभेद विनोदांत मावळून जातात. धर्मभेदांना कलहाचें रूप जेथें येतें तेथें तें धार्मिक कारणामुळें येत नसून अमुक एक धार्मिक गट राजकीय सत्ता बळकावील कीं काय या भीतीमुळें येतें.

कोणत्याहि चर्चचे सदस्य असलेले असे सुमारें सात कोटि अमेरिकन आहेत. चर्चमध्यें जाणारे व न जाणारे यांचेमध्यें युरोपात जसा तीव्र भेद आहे तसा अमेरिकेंत नाहीं. पुष्कळ लोक पूर्वी चर्चचे सदस्य होते पण पुढें चर्च सोडून गेले आहेत. मोठ्या शहरांत समाज एवढा अफाट असतो कीं तेथें वैयक्तिक ओळखीचे संबंध राहतच नाहींत. काहींना धर्मातला उपदेश व कर्मकांड हें ढोंग वाटत असून त्यांचा त्याला विरोध असतो. दुसऱ्या कांहींना धर्म आणि भौतिक शास्त्रें यांत विसंगति वाटते. पण अनेक शास्त्रज्ञांना अशी विसंगति वाटत

नाहींशी झाली आहे. कांहींना वाटतें, मोक्षाचे मा॰ जर इतके विविध आहेत तर त्यांतला खरा मार्ग कोणता हें कसें ठरवायचें? कांहींनीं अमेरिकेंतील लोकशाहींतील व्यक्तिवादास इतकें महत्त्व दिलें आहे कीं कोणत्याहि संघटनेंत सामील होण्यानें व्यक्तिवादाला अपाय होतो असें त्यांना वाटतें—अर्थात् हा अमेरिकन लोकशाहीचा विपर्यासच होय. कांहीं लोक धर्मासंबंधानें तटस्थहि असतात. अनुकूल अथवा प्रतिकूल न राहतां अलिप्त राहणेंच त्यांना बरें वाटतें.

धर्मभेदांनीं आमच्या राष्ट्रीय ऐक्यास अपाय होऊं नये या हेतूनें आम्ही निरनिराळ्या धर्मशाखांच्या भेदापेक्षां ऐक्य घडवून आणण्याचा जो त्या धर्मांचा गुण असेल त्यालाच आम्ही विशेष महत्त्व देतों. धर्मभेद कितीहि असोत, "सर्व माणसें ईश्वराचीं लेकरें असून आपण एकमेकांचे बांधव आहों" हें तत्त्व सर्व धर्मपंथ प्रतिपादतात. धर्मांतील मतभेदामुळें माणसांचे अगणित गट होण्यापेक्षां सर्वांचें ऐक्य साधणारें स्थूलधर्मतत्त्व आम्ही मान्य करतों. पहिल्यानें आमच्या तेरा वेगवेगळ्या वसाहती होत्या, पुढें राष्ट्र एकजूट झालें पण यादवीनें पुन्हा तें फाटलें गेलें. याचा आमच्या मनावर असा परिणाम झाला आहे कीं बारीकसारीक मतभेद बाजूस सारून आम्ही सर्वसामान्यतः एकमत होणाऱ्या मुद्द्यांना महत्त्व देतों.

याचा परिणाम असा होतो कीं परदेशी पाहुण्यांना आमच्या अंगीं कल्पनावैविध्य व बुद्धिवाद नाहींच असें वाटतें. नेहमीं तडजोडीनें वागावें, सर्व कल्पना, संस्कृति, धर्म यांबद्दल समावेशक वृत्ति दाखवावी या आमच्या सर्वसामान्य धोरणामुळें लहानसान कुरबुरी मिटविण्याची आम्हांला नेहमीं घाई असते आणि व्यापक मतैक्य व एकदिल यांना आम्ही महत्त्व देतों. बायबलांत दारूचें मद्य होतें असें सांगितलें आहे आणि तो मुद्दा वादग्रस्त असेल. पण सर्व माणसें ईश्वराचीं लेकरें या नात्यानें भावंडें आहेत ही बायबलांतली शिकवण आम्हांला अधिक महत्त्वाची वाटते. चर्चमध्यें लोक जातात यांत धर्मश्रद्धा नसेलहि. पण तें धार्मिकतेचें प्रदर्शन सामाजिक दडपणामुळें व सामाजिक फायद्याच्या दृष्टीनें होत असलें तरी त्यांत फारसें वाईट काय आहे?

इतर कोणत्याहि गोष्टीप्रमाणें धर्माचाहि परिणाम काय होतो याकडे अमेरिकनांचें विशेष लक्ष असतें. धर्मामुळें माणसें अधिक सज्जन होतात काय? होय. अधिक चांगलीं कृत्यें करतात? होय. सद्विचार आणि सद्वर्तन धर्मामुळें वाढीला लागतें काय? होय. तर मग धर्माला पाठिंबा देणें श्रेयस्कर होय असें आम्ही मानतों. धर्मानें माणसाचें एक विशिष्ट काम करायचें आहे. धर्मानें नीतिमत्ता, शांतता, सुव्यवस्था वाढविली पाहिजे, व्यक्तीला लौकिक जीवनांत यशहि दिलें पाहिजे.

धर्म हीं कार्यें करीत आहे असें आम्ही मानतों. सामाजिक संशोधकांनीं केलेल्या पाहणीवरून असें कळून आलें आहे कीं, जीं जोडपीं नेमानें चर्चमध्यें जातात त्यांचें जीवन परस्पराशीं अधिक स्नेहभावपूर्ण होण्याचा अधिक संभव असतो. धर्मनिष्ठ लोकांचे जितके विवाह अपयशी होतात त्याच्या तिप्पट अपयशी विवाह धर्मश्रद्धा नसणाऱ्यांचे होतात.

सामाजिक सुधारणेची प्रेरणा मुख्यतः चर्चमधूनच मिळाली. सामाजिक पाहणी, अनाथाश्रम, समाजसेवा हा व्यवसाय बनणें या गोष्टींना इतर अनेक कारणांबरोबरच बायबलांतील सामाजिक उपदेशहि कारण झाला आहे. न्यूयॉर्क-मधील ईस्ट हॅर्लेममध्यें मोठमोठीं आरोग्यकेंद्रें आहेत. वरवर पाहणाऱ्याला या केंद्रांत धार्मिकता कांहींच दिसणार नाहीं. येथें एक लक्ष विद्यार्थ्यांना सामाजिक शिक्षण, रोगनिदान, रोगनिवारण व आरोग्याबाबत काळजी इत्यादि साहाय्य देण्यांत येत असून तेवीस संस्थांच्या कार्याचें संयोजन तेथें होतें. यामुळें माणसांच्या ज्या यातना टाळल्या जातात आणि समाजाला निरोगी माणसें दिलीं जातात यांत धार्मिक मूल्य नसलें तरी नैतिक मूल्य खास आहे. अमेरिका धर्माकडेहि व्यावहारिक दृष्टीनेंच पाहत असल्यानें अमुक एक धर्म धर्मशास्त्राला धरून आहे कीं नाहीं हें पाहण्याऐवजीं समाजाला नैतिक दृष्टीनें त्याचा उपयोग किती होतो हेंच अमेरिकन लोक पाहतात.

अमेरिकन हे कर्मयोगी असून माणूस आपलें जीवन कर्मानें सुधारूं शकतो व तसें न सुधारणें ही अनीति होय असें ते मानतात. धर्मश्रद्धेमुळें अमेरिकनांचा आशावाद आणि कार्यक्षमतेचा हव्यास यांची वाढच होते. माणूस हा पापमय असून तो अपयशी आहे असें कॅल्व्हिनिस्ट पंथ मानतो व रीन्होल्ड नीबूरसारखे प्रचारक असा प्रचारहि करतात. पण चर्चेस हीं माणसाच्या परिपूर्णतेस पोंच-ण्याच्या सामर्थ्यावर श्रद्धा ठेवणारीं असून सामाजिक व वैयक्तिक कल्याणकार्यावर नेहमीं भर देतात.

## अमेरिकेंत वर्गभेद आहेत काय ?

कोणत्याहि समाजांतील श्रेष्ठ व्यक्ति कशा आहेत, त्या समाजाजवळ संपत्ति किती आहे व त्याचें कर्तृत्व कसें आहे यावरूनच तो समाज कोणत्या दर्जाचा आहे हें दरविलें जातें व अमेरिकेसहि हाच नियम लागू आहे. पैकीं अमेरिकेंत व्यक्तिमात्राला आपल्या अंगच्या गुणांनीं उच्च सामाजिक दर्जा मिळत असल्यानें, इतर देशांतल्याप्रमाणें अमेरिकेंत अनुवंशाला महत्त्व देत नाहींत. व्यक्तीचा दर्जा

समाजांत वाढविण्याचा उपाय हाहि समाजहितासाठीं स्वेच्छेनें झटणें हाच आहे.

अमेरिकेच्या मूल्यपद्धतींत वैयक्तिक गुणांचें मूल्य मोठें मानतात. कारण तत्त्वतः तरी माणसाचें यश त्याच्या अंगच्या गुणांवरच अवलंबून असतें. ज्यांना वडिलार्जित संपत्तीचा अथवा दर्जाचा लाभ होतो त्यांना आरंभीं उत्कर्षासाठीं मोठी अनुकूलता मिळते. (या अनुकूलतेनेंच चढाओढीची प्रेरणा कमी होऊन उत्कर्षाला तो अडथळाहि होऊं शकतो.) पण अशी अनुकूलता नसणारीं इतकीं माणसें नेहमीं यशस्वी होतांना दिसतात कीं वडिलार्जिताचें महत्त्व हल्लीं कमीच मानलें जातें. अमक्यानें संपत्ति किती मिळवली, धंद्यांत अथवा सामाजिक दर्जांत प्रगति किती केली यावरून माणसाचें यश अजमावलें जातें.

समाजांत व्यक्तींना व्यक्ति म्हणून दर्जा मिळतोच. पण अमुक वर्गांतली व्यक्ति यावरून त्या व्यक्तीचा दर्जा ठरतो का? प्रत्येक समाजशास्त्रज्ञ आपल्या विशिष्ट पद्धतीनें या प्रश्नाचें उत्तर देतो. मार्गारेट मीडच्या मतें, अमेरिकन समाजाचें वर्णन करतांना वर्गांचा उल्लेख करण्याची जरुरी नाहीं. कारण तेथें खरोखर वर्गभेद नाहींतच. उलट लॉइड वॉर्नर आणि पॉल लंट यांनीं 'यँकी सिटी' या संशोधनात्मक ग्रंथांत वरपासून खालपर्यंत सहा वर्ग पाडले आहेत आणि कुटुंब, गट, संबंधी माणसें, आर्थिक दर्जा, शाळा, चर्च, राजकीय संबंध अशा सात थरांत एकूण नव्वद भूमिका बसविल्या आहेत. पण यांतील प्रत्येक थर वरच्यांत व खालच्यांत मिसळलेला असून त्यांचेमधील व्यवच्छेदक भूमिका पुसून गेली आहे. खालून वर आणि वरून खालीं अशीहि माणसांच्या दर्जांची वाहतूक असतेच. यामुळें अचूक बोलायचें तर अमेरिकन समाजांत वर्ग नसून फक्त थर आहेत व ते एका चक्राकार जिन्याच्या पायऱ्यांसारखे असून त्यावरून माणसें नेहमीं खालीं-वर जात-येत असतात असें म्हणतां येईल.

वरच्यांतला जो मध्यम गट त्यांत समाजांतले परिपक्व नागरिक असून समाजाचे पुढारी त्यांतूनच मिळतात. त्यांच्याहि वर असणारे थोडेसे लोक हे धनवान् अथवा आनुवंशिक उच्च दर्जा मिळालेले असून ते चांगल्या कार्यासाठीं पैसा देतात, आपल्या नांवाचा फायदा घेऊं देतात. पण ते समाजांत फारसे मिसळत नाहींत. उलट खालच्या थरांत खालीं जातां जातां असा एक थर लागतो कीं त्यांतलीं माणसें कोणत्याच सामाजिक कार्यांत भाग घेत नाहींत, पुष्कळदां बेकार असतात, कायद्याच्या कचाट्यांत पुनःपुनः सांपडतात, त्यांना चांगलीं घरें नसतात, ते अडाणी असतात आणि कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीनें अस्थिर असतात. ही या वर्गांतली असमर्थता एकमेकांना त्रास देऊन त्यांच्यांत फूट

पाडते व हीं माणसें एकाकी पडतात. वरच्या गटांना खालच्या गटांनीं आपल्यांत पदक्षेप केलेला आवडत नाहीं. चर्च व शाळा येथेंहि या बाबतींतली समता ही नाममात्रच असते. समाजाच्या हीन दर्जातल्या मुलांना, आपल्या कुटुंबांना हीन लेखण्यांत येतें व त्यामुळें आपणहि हीन ठरतों, हें कळतें. याचा त्यांच्या मनावर जो परिणाम होतो त्यांतूनच बालगुन्हेगारी जन्म पावते.

लोकशाहीप्रधान समाजव्यवस्थेसंबंधानें एक ठळक गोष्ट अशी आहे कीं समता व दर्जा या दोनहि कल्पनांची गरज लोकशाही कार्यक्षम राहण्यासाठीं आहे. पण समता व दर्जा यांत परस्परविरोधहि आहे. आमचीं सामाजिक उद्दिष्टें समानता निर्माण करणाऱ्या संघटनेंत गोविलीं आहेत. पण अधिकाधिक उच्च दर्जाच्या कल्पनेचा उपयोग माणसांना अधिकाधिक उच्च पायरीवर चढण्याचा प्रयत्न करण्याची प्रेरणा देणें हा असतो. अमेरिकनांच्या आकांक्षेंत समानता व कमी अधिक दर्जा यांचा समन्वय होतो, त्याच आकांक्षेंतून अत्यंत गरीब कुटुंबांतून अत्युच्च दर्जापर्यंत चढलेलीं लिंकनसारखीं माणसें जन्मास येतात.

सत्तापदावर चढलेल्या लोकांना आपला दर्जा टिकविणें ही गोष्ट अनेकदां इतकी महत्त्वाची असते कीं स्वातंत्र्य आणि समता या ध्येयांना ते फक्त तोंड-देखली निष्ठा दाखवूं लागतात, आपल्या सत्तापदावरून आपल्या गटांतल्या लोकांना खास सवलती देऊन कमी दर्जाच्या लोकांविरुद्ध पक्षपात दाखवूं शकतात. एकाद्या जजाचा मित्र असलेल्या बड्या आरोपीला सवलतीनें वागवून खालच्या वर्गातल्या आरोपीला जबर दंड ठोठावणारा न्यायाधीश, गरीब विद्यार्थ्याला कठोरतेनें वागवून श्रीमंत विद्यार्थ्यांना गोंजारणारा शिक्षक, चर्चमधील श्रीमंत गृहस्थाचीं आर्जवें करणारा धर्मगुरु हे सर्वजण समाजांतील विषमता टिकविण्याला कारण होतात.

मतदाराचे वॉर्ड जे निर्माण झाले ते अंशतः ही विषमता नाहींशी करण्या-साठींच निर्माण झाले. त्या वॉर्डातून मतें मिळवूं इच्छिणाऱ्याला आतां गरिबांच्या गरजा समजून घेऊन त्या पुरवाव्या लागतातच. तो एकाद्याला थोड्या अधिक सवलतीहि देऊं शकतो, पोलिसाच्या कचाट्यांत सांपडलेल्या एकाद्या मुलाला सोडवून सरळ व सुरक्षित मार्गास लावूं शकतो, गरीब माणसांसाठीं फंड गोळा करूं शकतो, अथवा आपत्कालासाठीं मदत मिळवूं शकतो.

अमेरिकेंत फार थोड्यांच्या हातीं संचित संपत्ति फारच आहे. तरीहि तेथें सामाजिक उच्चनीचता फारच कमी आहे हें खरोखर आश्चर्य होय. अमेरिकेंतली वांशिक व धार्मिक विविधता ही विषमता कमी करण्याला उपकारक झाली आहे. भौगोलिक रचनेनेंहि हें कार्य केलें आहे. देश एवढा मोठा आहे व वसाहतीसाठीं

आलेल्यांत विविधता एवढी मोठी आहे कीं, सामाजिक उच्चनीचतेला वाव फार थोडा मिळतो.

विवाह हे सामान्यतः समान दर्जाच्या लोकांतच होतात हें खरें. तरी पण भिन्नभिन्न दर्जाच्या लोकांतहि कांहीं विवाह होत राहतात व सामाजिक थराची थोडीफार उलथापालथ चालू राहते. उदाहरणार्थ एका संशोधकास असें आढळून आलें आहे कीं काहीं लहान धंदेवाल्यांनीं अधिक उत्पन्नाच्या थरांतील मुलींशीं लग्नें केलीं अशीं ५० टक्के उदाहरणें घडलीं तर उलट ४० टक्के लोकांनीं आपल्या वर्गाबाहेर जाऊन कामगार स्त्रियांशीं लग्नें केल्याचींहि उदाहरणें घडलीं होतीं. तरुण माणसें नेहमीं लांब अंतरावर स्थलान्तर करतात. अशांपैकीं एका तरुणाचें दुसऱ्या तरुणीशीं प्रेम जमत असतांना एकमेकाचा दर्जा समजूं शकेल अशी विश्वसनीय माहितीच मिळत नाहीं.

पुढें दिलेल्या आणखी कांहीं कारणांमुळेंहि समाजांतील विषमता कमी होते अथवा विभागरेषा पुसल्याहि जातात. एकाद्या माणसाचा धंदा हलका असतो. पण सार्वजनिक कामामुळें त्याला उच्च दर्जा मिळूं शकतो. फार मोठ्या शहरांत उच्च कोण, कमी कोण याचा पत्ताच लागत नाहीं. माणसें सतत एका ठिकाणाहून दूर अंतरावर दुसऱ्या ठिकाणीं चरितार्थासाठीं जातात व मग कोणाचा दर्जा कोणता हें कळायला मार्गच नसतो. मोठमोठे क्रीडापटु, कामगारपुढारी, मुष्टियोद्धे, यांना मोठमोठ्या मिळकती होत असतात. यामुळें सुशिक्षित अथवा उच्च कुलीन यांनाच धनवान् होतां येतें असें आतां कोणी मानीत नाहीं. समाजांत वागण्याची रीत, कपडे, बोलणें-चालणें, करमणूक या सर्वांत विस्तृत मुलुखावर सारखेपणा येत आहे. शिवाय सार्वजनिक शिक्षण, करमणुकीचीं साधनें, मतदान, लष्करी नोकरी, ज्यूरीकर्तव्यें, सरकारी अधिकारपदासाठीं उमेदवारी, पोलीस-संरक्षण, कायदा इत्यादि बाबतींत संपूर्ण समानता निर्माण करण्यांत आलेली आहेच.

वरील सर्व कारणांमुळें मार्क्सनें कल्पिलेला वर्गकलह अमेरिकेंत होतच नाहीं. कारखान्यांचे मॅनेजर अथवा मालक यांचेबद्दल कामगारांना संताप येत असेल. प्रगतीला कोठेंच वाव दिसेनासा झाला म्हणून कामगारांना आकांक्षाभंगहि होत असेल. दारिद्र्य, बेकारी, न आवडणारें काम, अस्थिर कौटुंबिक जीवन या गोष्टी समाजांत अपरिहार्यपणें घडत असतात. संधि आणि सवलती लोकांना ज्या मिळतात त्यांत कमीअधिकपणाहि फार असतो. पण घट्ट, न हलणारे, वर्गभेद येथें नाहींतच.

निग्रोंना समान संधि देण्याबाबत अमेरिकन समाजाला फार अपयश आलें हें मात्र निःसंशय खरें आहे. अमेरिकेंत निग्रोंना गुलाम म्हणून विकण्याचा व्यापार निग्रोंनींच प्राचीन काळीं सुरू केला तेथपासून अमेरिकेच्या दक्षिण राज्यांत त्यांचा छळ झाला आणि नंतर फक्त दुय्यम दर्जाचें नागरिकत्व त्यांना मिळालें तेथपर्यंतच्या निग्रोंना मिळालेल्या हीन वागवणुकीचा इतिहास जगप्रसिद्ध आहे. पण निग्रोंच्या परिस्थितींत कितीतरी सुधारणा होत आहे ती लोकांच्या लक्षांत तितकीशी येत नाहीं. उदाहरणार्थ १८६० सालीं ९७ टक्के निग्रो निरक्षर होते. १९५२ सालीं हें प्रमाण दहा टक्क्यांखालीं गेलें आहे. अमेरिकन कॉलेजांतून १ लक्ष २८ हजार निग्रो असून जर्मनींतल्या विद्यापीठांतील जर्मनांची संख्या यापेक्षां कमी आहे. रशियांतील २१ कोटी ६० लक्ष रशियन आणि आफ्रिकेंतील सर्व १९ कोटी ३० लक्ष निग्रो यांच्यांत जेवढ्या लोकांच्या मोटारी असतील त्यापेक्षां अधिक अमेरिकन निग्रोंच्या मालकीच्या मोटारी आहेत. अमेरिकन सैन्यांत निग्रो हे आतां पूर्ण अभिन्नपणें सामावले आहेत. १९४० नंतर गोऱ्या कामगारांचे पगार अडीचपट वाढले तर निग्रो कामगारांचे पगार चौपट वाढले. १९३० पासून आतांपर्यंत कॉलेजांतून निग्रोंची संख्या वाढतां वाढतां त्यावेळच्या पंचवीसपट आतां झाली आहे. १९०० सालापासून गोऱ्या कॉलेजविद्यार्थ्यांच्या संख्यावाढीच्या सहापट संख्यावाढ निग्रो कॉलेजविद्यार्थ्यांची झाली आहे. शाळांतून निग्रो विद्यार्थ्यांना सामावून घ्यावें आणि बसेसमध्यें त्यांना बसण्याच्या जागा वेगळ्या देऊं नयेत असा सुप्रीम कोर्टाचा निर्णय झालेला आहे. सुमारें दोन लक्ष निग्रोंचीं स्वतःचीं शेतें असून प्रत्येकीं सरासरी ७८ एकरांचीं तीं शेतें आहेत. १९०० सालीं औद्योगिक कामगारांत फक्त १ टक्का निग्रो असत, हल्लीं ही संख्या ३० टक्क्यांपर्यंत (म्हणजे १५ लक्ष) गेली आहे. सर्व अमेरिकेंत कामगार संघटनांचे एकूण सभासद २ कोटी ६० लक्ष असून त्यांत साडेबारा लक्ष संख्या निग्रो कामगारांची आहे.

दक्षिण प्रदेशांत स्थानिक कौन्सिलांत गोऱ्या नागरिकांच्या मतानें निग्रो लोक निवडून येतात. ते राज्यकायदेमंडळांत व सार्वराष्ट्रीय कॉंग्रेसमध्येंहि बसतात. राल्फ बंच हा निग्रो असून संयुक्त राष्ट्रसंघाचा दुय्यम चिटणीस आहे. डिपार्टमेंट स्टोअर्स, टेलिफोन कंपनी, फेडरल सरकार वगैरेंत निग्रो नोकरांना अभेदानें स्वीकारण्यांत येतें. मेरिअम अँडर्सन, लुइ आर्मस्ट्रॉंग यासारखे कलावंत राष्ट्रीय जीवनविकासास फार मोठें साहाय्य करीत असून त्यांना जागतिक प्रसिद्धि मिळाली आहे. निग्रोंच्या मतांच्या पाठिंब्यावांचून कोणताहि राष्ट्रीयपक्ष अधिकारावर राहूं शकणार नाहीं.

जॉर्जिया राज्यांतील सॅव्हाना शहरांत पाणी पिण्याचे दोन नळ होते. एकावर 'गोरे लोक' अशीं अक्षरें कोरलेली संगमर्मरी पाटी होती. दुसऱ्यावर 'सवर्णांसाठीं' अशी पाटी होती. त्याविरुद्ध पत्रें पाठविण्याची एक मोहीम काढण्यांत आली. परिणाम असा झाला कीं त्या पाट्या काढून टाकण्यांत आल्या. दक्षिण प्रदेशांतील चर्चेसमध्यें धर्मगुरूंनीं आपल्या श्रोत्यांना जाहीरपणें सांगितलें आहे कीं खिस्ती धर्मात वर्णभेदाला मुळींच स्थान नसून चर्चमध्यें सामील होऊं इच्छिणाऱ्या निग्रोंना पूर्ण मोकळीक आहे.

मानवांतील जमातींच्या हाडींमाशीं मुरलेला एक रोग असें स्वरूप त्या जमातींच्या ठिकाणीं एकमेकाविरुद्ध असलेल्या पूर्वग्रहदोषाला असतें. हा रोग फार प्राचीन आहे. एका जमातीला दुसऱ्या जमातीचा संसर्ग झाल्यास त्यामुळें भ्रष्टाकार माजून जमातीवर संकट येतें अशी भीति प्राचीन काळापासून निरनिराळ्या जमातींना वाटत आलेली आहे. हें लक्षांत घेतल्यास सगळ्याच परस्परापासून भिन्न व परक्या जमाती ज्या अमेरिकेनें एकत्र गुंफल्या तिनें तें एक फार मोठें कर्तृत्व गाजविलें असें म्हणावें लागेल. एकाद्या माणसाला आर्थिक प्रगति, मानमान्यता अथवा स्नेह मिळूं शकला नाहीं म्हणजे तो चिडतो, या विद्यमान परिस्थितीशीं त्याच्या मनांत सुप्तपणें वैरभाव भडकत राहतो आणि मग जमातीजमातीमधला भेद जो अगदीं सहज नजरेला पडतो त्याच्या माथीं आपल्या साऱ्या अपयशाचें खापर फोडणें हें त्याला दुर्दैवानें सोपें असतें.

ही जी एक स्वाभाविक मानसिक प्रवृत्ति तिला अमेरिकन निग्रो बळी पडला आहे. पण यांत्रिक कारखान्यांतून अफाट संपत्ति निर्माण होते व तिचा फायदा निग्रोंना मिळतो. तसेंच कारखान्यांत स्वाभाविकच लोकशाही समानता आहे तिचाहि फायदा त्याला मिळतो. दोन जागतिक महायुद्धांमुळें निग्रोंचे फार मोठे समुदाय दक्षिणेकडून उत्तरेकडे वसाहतीसाठीं गेले. (१९१० ते १९४५ या काळांत ३० लक्ष) यामुळें वरील फायदे निग्रोंना मिळूं शकले. दक्षिण प्रदेशांत औद्योगिक उत्कर्ष होण्यास फार विलंब लागला. पण आतां तो होत असून त्याचा फ़ायदा निग्रोंना मिळणारच.

दक्षिणेंत कांहीं निग्रो कांहीं गोऱ्या लोकांपेक्षां अधिक उच्च दर्जाला पोंचले आहेत. अमेरिकेंतील या वांशिक वादांत अलीकडे ठळकपणें दिसून येणारी एक गोष्ट अशी आहे कीं, निग्रो जमातींत एक सुशिक्षित व सुखवस्तु वरिष्ठ मध्यम वर्ग निर्माण झालेला असून निग्रो म्हटला कीं तो आकांक्षाहीन, मूढ असा एक समज होता तो आतां नष्ट होत आहे. हा वरिष्ठ मध्यमवर्गीय निग्रो बुद्धिमान्

असून समान हक्कांच्या झगड्यांत आतां निग्रोंना या वर्गांतूनच नेतृत्व मिळेल.

सरकार व कायदा यांचे संबंधानें विशेष तपशिलानें लिहिणें स्थलाभावीं आतां शक्य नाहीं. स्थानिक स्वराज्य हे हौशी नागरिक फार थोड्या पगारावर अथवा पगाराशिवायहि काम करून चालवितात हें पूर्वी सांगितलेंच असून त्यामुळें स्थानिक स्वराज्याचें ऐच्छिक स्वरूप पुरेसें स्पष्ट झालेंच आहे. कोणताहि निर्णय ठरविण्याचें काम एका माणसावर न सोपवितां तें काम एकाद्या बोर्डाकडे देतात. न्यूइंग्लंड प्रदेशांत तर असे निर्णय सर्व समाजानें एकाद्या सभेंत जमून खुल्या मतदानानें ठरवावे लागतात. एका माणसाकडेच एकादें काम सोपविलें तर तो फार बलिष्ठ होईल अशी अमेरिकनांना भीति वाटते. एकादें काम जर फार प्रचंड प्रमाणांत उभारलें तर नागरिकांना फुरसतीच्या वेळांत तें करतां येणार नाहीं म्हणून कोणत्याहि कामास प्रचंड स्वरूप देण्यास ते नाराज असतात. २५ हजार लोकवस्तीच्या शहराचा मेयरहि अल्पवेळ काम करणाराच अधिकारी असतो. कचेरीच्या वेळानंतर त्याला भेटायचें असेल तर ज्या दुकानांत अथवा विमाकंपनींत तो काम करीत असेल तेथें तुम्हांला जावें लागेल. अशा स्थानिक स्वराज्याचे १ लक्ष १७ हजार गट असून त्यांतले निम्मे स्कूलडिस्ट्रिक्ट आहेत. यावरून अमेरिकन लोक स्थानिक स्वराज्याला फार महत्त्व देतात हें स्पष्टपणें दिसून येतें.

पांच हजाराहून कमी लोकसंख्या असणाऱ्या कित्येक वसाहतींत स्थानिक पोलीस नाहींच. कारण त्यांना तो नकोच आहे. वसाहत संख्येनें व आकारानें वाढत गेली म्हणजे मात्र गुन्ह्यांचा प्रतिबंध व गुन्ह्यांचें शासन ही बाब गंभीर विचाराची होऊन बसते. लहान वसाहतींत सगळे लोक एकमेकांना ओळखतात. पण मोठ्या शहरांत माणसांच्या ओळखी राहत नाहींत यामुळें सामाजिक नियंत्रण अशक्य होतें. एकाकीपणा, समाजांत मान्यतेचा दर्जा नसणें, इत्यादि कारणांमुळें गुन्हेगार प्रवृत्ति बळावते. वाईट घरें, अडाणी आईबाप, घाण, रोगराई ही सर्व गुन्हेगारीची सुपीक भूमि असते. गलिच्छ वस्त्या नष्ट करणें आणि लोकांच्या राहणीचा दर्जा वाढविणें हे उपाय गुन्हेगारीच्या नाशास परिणामकारक होत असें मानलें जातें. निरनिराळ्या कुटुंबांना सामाजिक बाबतींत मार्गदर्शन करणें, आणि एकादा प्रश्न उग्र स्वरूप धारण करण्यापूर्वीच तो सोडविणें हेहि आणखी महत्त्वाचे उपाय आहेत. मागासलेल्या वर्गांचे प्रश्न समजून घेऊन स्नेहभावानें ते दूर करणें हाहि एक महत्त्वाचा उपाय असतो.

'वडील बंधु' (बिग ब्रदर) चळवळ हा एक मागासलेल्यांच्या उद्धाराचाच मार्ग आहे. पोलिसाच्या कचाट्यांत सांपडलेल्या मुलाचा एकाद्या स्वयंसेवकाशीं

संबंध जोडून देतात. तो स्वयंसेवक त्या मुलावर प्रेम करून व त्याची परिस्थिति समजून घेऊन त्याला मार्गदर्शन करण्याचें पत्करतो. (घरांतल्या अशा सहानुभूतीच्या अभावींच तो मुलगा वाममार्गाला गेलेला असतो.) किंवा त्या मुलाचे हितसंबंध जसे आहेत तसेच हितसंबंध असलेला एकादा माणूस शोधण्यांत येतो. हा माणूस मग त्या मुलाला सन्मार्गाची दिशा दाखवितो, त्याचें मित्रप्रेम जिंकतो, त्याला आपल्या घरीं बोलावतो, त्याला खेळांना घेऊन जातो आणि अखेरीं त्याला एकाद्या चांगल्या व्यवसायालाहि लावून देतो. अशा प्रकारें हजारों संभाव्य गुन्हेगारांना डॉक्टर, वकील, कारागीर वगैरे प्रकारच्या उपयुक्त नागरिक जीवनाप्रत पोंचविलें जात असून तेहि अशा प्रकारें इतर अनेकांचे 'वडील बंधु' बनून त्यांचा उद्धार करतात. या मार्गांत अमेरिकेचे सर्व गुणविशेष व्यक्त होतात. कारण हें सुधारणाकार्य स्वेच्छेनें अंगीकारण्यांत येतें, त्यांत मानवाच्या नैतिक मूल्यांवर भर देण्यांत येतो, वडील माणसानें लहानावर प्रेम करावें तसें प्रेम ही तर यांतली मुख्य कल्पना आहे, परकी आणि दलित अशांना स्नेहभाव दाखविण्यावर यांत मुख्य भर आहे, ध्येयाशीं व्यवहाराची यांत सांगड घालण्यांत येते, भावना व तर्कशुद्धता यांचा अन्वय साधण्यांत येतो. या गोष्टी खास अमेरिकन कार्यपद्धतींतल्याच आहेत.

मोठ्या शहरांत माणसांचे वैयक्तिक संबंध व एकमेकांच्या ओळखीच्या लोकांचें स्वराज्य या गोष्टी अशक्य होतात. यामुळें तेथें गुन्हेगार प्रवृत्तीचा प्रश्न अधिक अवघड व हाताळतां न येणारा असा होतो. पण अशा बाबतींतहि मार्ग निघूं शकतो असें न्यूयॉर्कमधल्या मॉर्निंग साइड हाइट्स येथें सिद्ध झालें आहे.

मॉर्निंग साइड हाइट्स येथें कोलंबिया विद्यापीठाभोवतीं चर्चेस, हॉस्पिटल्स, धर्ममंदिरें, इत्यादि उत्कृष्ट सांस्कृतिक संस्था जमा झालेल्या आहेत. अमेरिकेंतल्या ४८ राज्यांचे लोक तेथें असल्यानें साऱ्या अमेरिकेचें प्रातिनिधिक असेंच तें क्षेत्र आहे. कांहीं लोक अगदीं नवीन आलेलेहि आहेत. पण अलीकडे गर्दी वाढून तेथें गलिच्छवस्तीचें स्वरूप येऊं लागलें. इमारती मोडकळीला आल्या, शाळांत गर्दी फार झाली, चर्च व विद्यापीठ यांतले लोक सहकुटुंब उपनगरांत जाऊं लागले, गुन्हेगारी वाढूं लागली. तेव्हां तेथल्या चौदा प्रमुख सांस्कृतिक संस्थांनीं या खालावूं लागलेल्या प्रदेशाच्या उद्धारासाठीं एक संस्था काढण्याचें ठरवून जगांतील उत्कृष्ट सांस्कृतिक केंद्र असें स्वरूप त्याला देण्याचा संकल्प केला. डेव्हिड रॉकफेलरच्या कुटुंबानें या प्रदेशाबद्दल विशेष आस्था दाखविली होती म्हणून त्यालाच त्या संस्थेचा अध्यक्ष नेमण्यांत आलें. मॅनहॅटन व्हिल

नेबरहुड सेंटर येथें मुख्य कचेरी ठेवण्यांत आली आणि निरनिराळ्या लोकांना त्या कार्यक्रमांत गोवण्यांत आलें. व्यापारी, प्राध्यापक, मजूर पुढारी, प्रापंचिक स्त्रिया इत्यादि सर्वांनीं त्या गरजा काय आहेत याची पाहणी सुरू केली. एका धंदेवाईक तुकडीनें तज्ज्ञतेनें सुधारणानियोजन केलें. सुरवातीला गलिच्छवस्ती पाडून टाकून नवीन घरें बांधण्याची योजना त्यांनीं सुचविली. १ कोटी २० लक्ष डॉलर खर्च करून एक हजार मध्यमवर्गीय कुटुंबें राहतील अशा इमारती सहकारी तत्त्वावर बांधण्यांत आल्या. प्रत्येक कुटुंबाचा त्याचा त्याचा गाळा मालकीचा झाला. कमी मिळकतवाल्यासाठीं शहर अधिकाऱ्यांनीं दोन घरयोजना हातीं घेऊन आणखी तीन हजार कुटुंबें राहण्याची तजवीज केली. अशा प्रकारें चाळीस एकर क्षेत्रांतलीं वाईट घरें पाडून बेचाळीसशें कुटुंबांची राहण्याची सोय करण्यांत आली. पण हा नुसता आरंभ आहे. तेथल्या घरमालकांची एक संघटना स्थापण्यांत आली असून त्या सर्व क्षेत्राची पुनर्वसाहत करण्याचें ठरलें आहे.

दरम्यान शाळांची परिस्थिति जी अतिशय वाईट झाली होती ती सुधारण्याचें, करमणुकीचीं क्षेत्रें पुरविण्याचें आणि जीं साधनें उपलब्ध होतीं पण त्यांचा उपयोग केला जात नव्हता अशा साधनांचा भरपूर उपयोग करण्याचें ठरलें असून तसे उपाय अवलंबण्यांत येणार आहेत. उदाहरणार्थ 'कॅथेड्रल ऑफ सेंट जॉन दि डिव्हाइन' या संस्थेनें आपल्या शाळेचें मैदान देऊं केलें, पण कोणींतरी त्यावर देखरेख केली पाहिजे अशी अट घातली. वाय्. एम्. सी. ए. नें तें कार्य पत्करलें. यामुळें वाढत्या गुन्हेगारीचें मूळच खुडून टाकण्यांत आलें आहे. कारण गलिच्छ राहणी आणि खेळायच्या जागेचा अभाव यामुळें रिकामटेकडीं भटकणारीं मुलें हें गुन्हेगारीचें कारण होतें. सन्मार्गदर्शन, मल्लविद्याशिक्षण, नृत्यशिक्षण या सर्व मार्गांनीं या वस्तीला मदत करण्यासाठीं स्वयंसेवक पुढें येत आहेत.

फार मोठ्या शहरांत जेथें वैयक्तिक संबंध मुळींच येत नाहींत अथवा टिकत नाहींत तेथेंहि लहान शहरांतल्याप्रमाणें सामुदायिक प्रयत्न होणें शक्य आहे ही गोष्ट मोठ्या शहरांतल्या नागरिकांनींहि ओळखली आहे. मॉर्निंग साइड हाइट्स येथल्या नागरिकांची अपेक्षा चमत्कार घडावे अशी नाहीं. प्रगति सावकाश होते हें त्यांनीं ओळखलें आहे. पण शहराचा आकार अफाट आणि त्याचे प्रश्न गुंतागुंतीचे असें म्हणून त्यापुढें हात न टेकतां या शहरांचे प्रश्नहि सोडवायचे असा निर्धार त्यांनीं केला आहे.

गेलीं अनेक वर्षें लेविस मंफोर्ड लिहीत आहे कीं माणसाच्या गरजा लक्षांत

घेऊन समाजव्यवहाराचें नियोजन केलें पाहिजे. त्याच्या मतें, आधुनिक शहर हा एक अत्यंत गलिच्छ तुरुंग असून त्यांतील सांस्कृतिक साधनें फक्त फार थोड्या बड्यांच्या वांट्याला येतात, जीवनावश्य अशा चांगल्या गोष्टी प्रचंड बहुसंख्य समाजाला मिळत नाहींत. त्याऐवजीं प्राणिशास्त्र व समाजशास्त्र यांच्या आधारें मानवाला उपयुक्त असें वातावरण शहरांत उत्पन्न केलें पाहिजे. कोणतीहि मानवी वसाहत केव्हांहि कशी असावी हें प्राणिशास्त्राच्या आधारें ठरवून माणसामाणसांत सुबुद्ध सहकार्य शक्य होईल अशा वसाहती स्थापल्या गेल्या पाहिजेत. प्रत्येक शहरी मोहल्ला हा शाळा, ग्रंथालय, समाजकल्याण केंद्र इत्यादि सामाजिक संस्थांनीं परिपूर्ण असला पाहिजे. लहान वसाहत आणि एकमेकांच्या अगदीं ओळखीचीं माणसें ही अमेरिकन विचारसरणीला आदर्श समाजरचना वाटते.

न्यू जेरेसी राज्यांत रॅडबर्न येथें, अथवा मेरी लँड राज्यांत ग्रीनबेल्ट येथें हें ध्येय साधलें आहे. येथें शहरांतलीं माणसें शहराबाहेर जाऊन त्यांनीं 'उपवन वसाहती' (गार्डन कम्युनिटी) स्थापल्या आहेत. एक वसाहत व दुसरी वसाहत यांचे दरम्यान मोठी मोकळी जागा ठेवलेली असते. त्यामुळें घरें रस्त्यापासून दूर असतात व त्यांना रस्त्यावरील वाहतुकीच्या गोंगाटगर्दीचा उपद्रव होत नाहीं. शाळा व करमणुकीची जागा जवळ असावी अशा प्रकारें प्रत्येक वसाहतीची रचना केलेली असते. अशा वसाहती स्थापून तेथें सामुदायिक कार्याची तरतूद ठेवलेली असते. यामुळें समर्थ राजकीय जीवन, सामुदायिक राहणी, आणि संयुक्त जबाबदारीची भावना यांचा विकास भराभर होत गेला आहे.

अमेरिकन वासाहतिक परंपरेचा मुख्य प्रवाह अतिशय ग्रामीण असा आहे. शहरी मूल्यांना ते महत्त्व कमी देतात. अमेरिकनांत जी स्वातंत्र्यलालसा आहे तिचें एक अवश्य अंग असेंच अमेरिकन प्रांतवादाचें स्वरूप असून त्यांत लहान वसाहत व स्वायत्त कारभार यांवर विशेष भर असतो. शहरांचे प्रश्न कसे सोडवावे याचा आम्ही विचार करूं लागलों म्हणजे लहान वसाहत आणि त्यांत परस्पर साहाय्य व ऐच्छिक संघटना हेच उपाय आम्हांला सुचतात. दिवसानुदिवस वाढत्या शहरामुळें उत्पन्न होणारे प्रश्न असे असूं शकतील कीं त्यांच्यासाठीं नवीं उत्तरें शोधणें जरूर असेल. व्यक्तित्वाचा संपूर्ण अंत, सहेतुक स्नेहसंबंधाचा अभाव, यांत्रिक आणि सदा बदलणाऱ्या समाजांत ज्ञाचक ठरणारीं ध्येयें हें सर्व प्रश्न फार गंभीर व सोडविण्यास अत्यंत कठिण आहेत. तरी पण आतांपर्यंत हे प्रश्न सोडविण्याचा उपाय लहान, आटोपशीर वसाहती स्थापणें हाच यशस्वी ठरला आहे. सामाजिक हित जर साधायचें असेल तर माणसांनीं एवढ्या लहान

गटांनीं काम केलें पाहिजे कीं त्या माणसांचा आपसांत 'होमटाउन'प्रमाणें अगदीं स्नेह व घरोबा उत्पन्न होईल.

'होम टाउन' हा अमेरिकन जीवनांत अगदीं प्रतीकभूत शब्द आहे. तुम्ही हल्लीं जेथें राहतां (विशेषतः तुम्ही जर मोठ्या शहरांत राहात असाल तर) तें ठिकाण हें तुमचें होम टाउन नव्हे, तर हल्लींच्या जागीं जेथून तुम्ही आलां तें तुमचें 'होम टाउन'. तुम्ही तिथें एका काळीं राहत होतां एवढेंच त्या ठिकाणाचें महत्त्व नाहीं तर तें सारें गांव हें जवळ जवळ कुटुंबच होतें. तेथें पुढारी हे पिताजी, परस्पर स्नेहानें व संघटनांनीं बांधलेले नागरिक हे बंधु, आणि संरक्षण व संस्कृति यांसाठीं एकत्र येऊन आपण एक आहों अशी जी भावना असते व स्थानाचा जो अभिमान असतो या भावना हें मातृत्व.

अशी ही परस्परओळखीची आणि एकजुटीची वसाहत ही नुसती कल्पना नव्हे तर ती जिवंत वस्तुस्थिति आहे. व्यक्तीचा स्वार्थ आणि सामाजिक गरजा यांचा ती अन्वय बसविते. कारण त्या त्या वसाहतींतील प्रत्येक व्यक्ति त्या वसाहतीची सेवा करून तिजशीं सात्म्य पावते. राल्फ लिंटन हा मानववंशशास्त्रज्ञ म्हणतो, "ज्या वसाहतींत माणसाला समाधानानें आपलें जीवन घालवितां येईल अशी वसाहत केवढी असावी ? वैयक्तिक संबंधांत विविधता येईल एवढी ती वसाहत मोठी असावी. पण उलट त्या वसाहतींतील बहुसंख्य लोकांना एकमेकांशीं वैयक्तिक स्नेहसंबंध ठेवतां आला पाहिजे इतकी ती वसाहत लहान असावी. जगांतील प्रचंड बहुसंख्य मानवजातीची हीच गरज आहे."

बहुसंख्य अमेरिकनांची हीच भूमिका आहे. कुटुंब, चर्च, विद्यालय, शेजार, धंदे अथवा व्यवसाय यांचे गट, सोशल क्लब, राज्य, प्रदेश, राष्ट्र वगैरेसंबंधींच्या भावना व कर्तव्यें यांनीं आपण बांधलेले आहों ही कल्पना त्यांना आवडते. लोकशाही समाजांत जो अंतर्गत सलोखा हवा असतो तो एकतेपेक्षां विविधतेंत, संघटनांच्या अनेकत्वांत, स्वायत्त सत्ताविभागांच्या बहुत्वांत असतो असें अमेरिकनांना वाटतें. अशा समाजांतील बहुत्वामुळें वाद, तणातणी, मतभेद, कलह थोडेफार असणें हें अपरिहार्य असतें. पण त्यांत गतिमानता असते. सतत हालचालीमुळें अशा समाजाचे मज्जातंतु पिळदार होतात, प्रत्येक दडपणाची प्रतिक्रियात्मक जाणीव असा समाज दाखवितो, बदल करून घेण्याची गरज त्याला पटलेली असते, हा समाज स्वयंनियंत्रित असतो, आणि संघटितपणाची गरज जेथें नाहींशी होते तेथें आनंदानें विघटित होण्याचीहि त्या समाजाची तयारी असते.

सरकारनें अमुक एक गोष्ट करावी म्हणून हा समाज वाट पाहात नाहीं, तर आपल्याच संघटनेंतून कार्य सुरू करतो. एकाद्या अमेरिकन शहरांत गलिच्छ वस्त्या फार वाढल्या आहेत काय? मग 'ॲक्शन'[1] नावाची संघटना तेथें लगेच तयार होते.

वाढल्या गुन्हेगारीचा प्रश्न उद्भवला आहे काय? त्या वसाहतींतील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व करमणुकीचीं सर्व साधनें एकत्र आणण्यांत येतात, आपल्या अनेक संघटनांतून प्रतिनिधि बोलावून तो समाज कामाला लागतो. आपण सुटी व्यक्ति नसून एका समाजाचे घटक आहों ही भावना अमेरिकन व्यक्तित्वांत खोल रुजलेली आहे. या भावनेचीं मुळें इतिहासांत व लोकमनांत खोल गेलेलीं आहेत. अतिशय गुंतागुंतीनें बनलेल्या या आटोपशीर वसाहतींचें रहस्य कळल्या-वांचून अमेरिका काय आहे हें कोणासहि कळूं शकणार नाहीं.

[1] Action 'ॲक्शन' या इंग्रजी शब्दाचा अर्थ 'कृति'. शिवाय American Committee To Improve Our Neighbourhood (शेजार सुधारण्याची अमेरिकन कमिटी) या इंग्रजी शब्दसमुच्चयांतील शब्दांच्या आद्याक्षरावरून हा 'ॲक्शन' शब्द बनविला आहे.)

# प्रकरण आठवें

## शिक्षण

अमेरिकन जनतेच्या अनेक संस्था व अनेक मनःप्रवृत्ति यांचा उगम धर्म-भावनेंत असून शिक्षण हें यांतलेंच आहे. सतराव्या शतकांतला व्हर्जिनियाचा गव्हर्नर बार्क्ले याच्या मतें शिक्षण हें तरुणांवर भयंकर वाईट परिणाम करीत असून शाळा या नैतिक अधःपात करणाऱ्या असतात. व्हर्जिनियांत अशा शाळा व शिक्षण नाहीं याबद्दल तो व्हर्जिनियाचें अभिनंदन करीत असे. उलट न्यू इंग्लंडनें १६४७ इतक्या पूर्वी शाळा स्थापल्या आणि या बाबतींत नागरिकावर सक्ती केली होती. सैतानाच्या मोहापासून जनतेचा बचाव करणें हा त्यांचा यांत हेतु असून चर्चमध्यें त्यांनीं विद्वान् धर्मगुरूंचें एक मंडळहि स्थापन केलें होतें. न्यू इंग्लंडमध्यें व नंतर पश्चिमेकडे नवीन वसाहती स्थापण्यासाठीं देणग्या देण्यांत येत तेव्हां प्रत्येक वसाहतींत शाळेसाठीं जागा राखून ठेवण्यांत येई. अगदीं पहिल्या पहिल्या शाळा अगदींच मामुली स्वरूपाच्या होत्या. त्या वर्षांतून फक्त कांहीं काळपर्यंतच भरत आणि त्यांत भाषेचीं मूळतत्त्वें व अंकगणित एवढेंच शिकविण्यांत येई. पण त्यांनीं त्याच वेळीं शिक्षण घेणें हा सर्व नागरिकांचा हक्क आहे हें तत्त्व मान्य करून ठेवलें. अशा प्रकारें सार्वत्रिक शिक्षणाचा पायंडा जगांत पहिल्यानें या न्यू इंग्लंडच्या अमेरिकनांनीं पाडला. (सार्वजनिक ग्रंथालयें आणि स्त्रियांना उच्च शिक्षण यांचा पायंडाहि जगांत पहिल्यानें अमेरिकेनेंच पाडला.)

सुसंस्कृत अशा युरोपांत आपणांला मात्र संस्कृति आणि विद्या मिळूं शकत नाहीं म्हणून पुष्कळसे लोक नाइलाजानें अमेरिकेस आले होते. हीं माणसें फार काळ अतिशय दारिद्र्यांत राहिलीं. यामुळें अमेरिकन समाजावर व विशेषतः अमेरिकन शिक्षणपद्धतीवर त्यांचा भार फार पडून अमेरिकन लोकसंस्कृतींत कांहीं दोष राहून गेले. अधिक चांगल्या परिस्थितींत वाढलेल्या युरोपीयांना हे दोष

अजूनहि दिसत असून ते त्यास नांवें ठेवीत असतात.

सर्व अमेरिकाभर शिक्षणाच्या बाबतींत अमुक एक पद्धति अशी नाहींच. फेडरल सरकारचा शिक्षणावर मुळींच ताबा नाहीं. शिक्षण हें अमेरिकन लोकशाही यशस्वी करण्याचें फार मोठें साधन. पण त्या शिक्षणावर कोणीहि सर्वाधिकारी असा नाहीं, शिक्षणक्षेत्रांतील तज्ज्ञ पुढाऱ्यांचें मार्गदर्शक सल्लागार मंडळ नाहीं, सार्वदेशीय अभ्यासक्रम नाहीं, शिक्षकांचा दर्जा ठरविण्याची कांहीं पद्धति नाहीं, पदवीधर होणाऱ्यानें किती विद्वान् झालें पाहिजे याला कांहीं प्रमाण नाहीं, अभ्यासाचे ग्रंथ ठरविलेले नाहींत. अमेरिकेंत वरील सर्व बाबतींत विविधतेला फार महत्त्व दिलें जातें. स्थानिक स्कूलडिस्ट्रिक्ट, एकादें अगदीं लहान कॉलेज अथवा बडें विद्यापीठ यांना आपलें ध्येय ठरविण्यास स्वातंत्र्य मिळालें पाहिजे असें अमेरिकेचें शैक्षणिक तत्त्व आहे. म्हणजे, शिक्षणांतहि अनेक व विविध प्रकार आणि स्वायत्तता हीं तत्त्वें महत्त्वाचीं होत असें येथें मानलें जातें ही गोष्ट लक्षांत घेतली तरच अमेरिकन शिक्षणपद्धति समजून घेतां येईल.

शिक्षणानेंच माणूस हवा तसा घडविला जातो म्हणून शिक्षण अत्यवश्य आहे ही श्रद्धा अमेरिकन जीवनाचा मुख्य आधार असते. हल्लीं शिक्षण वयाच्या तिसऱ्या वर्षी अथवा त्याहिपूर्वी सुरू होतें, आणि तें प्रौढपणींहि चालू राहून मरणापर्यंत चालतें. आयुष्याच्या शेवटच्या कांहीं दशकांत अधिकाधिक कार्यक्रम ठेवण्यांत येतात.

लेख लिहून पैसे मिळवण्यासाठीं तुम्हांला लेखनकला शिकायची आहे? कीं पिआनो वाजवायला अथवा फ्रेंच बोलायला शिकायचें आहे? पत्रव्यवहाराचा एक अभ्यासक्रम आहे, तो तुमचें शिक्षण करील. फेडरल कायद्याचा भंग करणाऱ्या गुन्हेगारांना पकडून देण्याला समर्थ अशीं माणसें फेडरल सरकारला हवींत का? मग त्यासाठीं फेडरल सरकार शाळा काढतें. एकाद्या धंद्याला आपल्या विक्रेत्यांना एकाद्या नव्या मालाची ओळख करून द्यायची आहे का? ते एकाद्या शिक्षण-तज्ज्ञांना पगार देऊन नेमतात, त्याचा एक अभ्यासक्रम ठरवितात आणि पाहणें व ऐकणें या दोन्ही मार्गांनीं शिक्षण देण्याचीं साधनें पुरवून आपल्या विक्रेत्यांना शिक्षण देववितात. नवीन लग्न झालेलीं जोडपीं विवाह व यशस्वी आईबाप होण्याचें शास्त्र शिकतात. लहान मुलांना शाळा सुटल्यावर नृत्य व संगीत शिकविण्यासाठीं टॅक्सींतून पोंचवितात. कुत्र्यालाहि आज्ञा पाळण्याचें खास शिक्षण देण्यांत येतें. कुणालाहि कांहींहि शिकवितां येतें असें अमेरिकन लोकांचें ठाम मत असतें.

लोकशाहींत शिक्षणाचें काम काय, याबाबतहि अमेरिकनांचे कांहीं ठाम विचार आहेत. उच्च शिक्षणाचा विचार करण्यासाटीं नेमलेल्या प्रेसिडेंट्स कमिशननें म्हटलें आहे कीं, "लोकशाही समाजांत शिक्षणाचें सामाजिक उद्दिष्ट सर्वांना समान स्वातंत्र्य आणि सर्व विविध व्यक्तींना व गटांना समान संधि मिळवून देणें हें असून नागरिकांना समाजांतील कोणत्या व्यक्ति आणि घटना आपल्या स्वातंत्र्याला दुर्बल करणाऱ्या अथवा प्रबल करणाऱ्या आहेत हें समजणें, त्यांचें महत्त्वमापन करणें व त्यांचें नियंत्रण करणें याबाबत शिक्षणानें नागरिकांना समर्थ केलें पाहिजे."

शिक्षणापासून आमच्या अपेक्षा इतक्या व्यापक असल्यामुळेंच आमच्या शिक्षणपद्धतीबद्दल आम्ही नेहमीं असंतुष्ट असतों. प्रेसिडेंट्स कमिशन म्हणतें, "लोकशाहींतले दोष मान्य करणें हें लोकशाहीच्या हिताचेंच आहे. लोकशाहीच्या प्रसारांतून जीवनांत जे पालट होत असतात ते समजून घेणें व आपला समाजाला उपयोग कितीसा होतो याचें पुनः पुनः महत्त्वमापन करणें हें शाळांचें एक महत्त्वाचें कामच आहे."

## शाळा आणि घर

लोक हल्लीं शाळांबद्दल जी आस्था दाखवितात तें समाजाच्या अंगच्या सामर्थ्याचें लक्षण आहे. या आस्थेचें स्वरूप कडक टीका व प्रक्षुब्ध वादविवाद असें पुष्कळदां असतें. लोकशाहींत यशस्वितेनें जगावें कसें हें शिक्षणानें आमच्या मुलांना शिकविलें पाहिजे असें वादांतील एका बाजूचें म्हणणें तर 'ही गोष्ट अशक्यच आहे' असें दुसऱ्या बाजूचें म्हणणें असतें. शिक्षणानें फक्त वाचणें व विचार करणें या मूलभूत गोष्टी शिकवाव्या असें आणखी तिसऱ्यांचें मत असतें.

मतामतांची ही ओढाताण लोकशाहींत व शिक्षणपद्धतींच्या विविधतेंत अपरिहार्य आहे. आजच्या लहान मुलांना त्यांच्या पुढील आयुष्यांत जी कामगिरी करायची आहे त्यासाटीं त्यांच्या मनाची तयारी करण्याचें मुख्य साधन शिक्षण हेंच होय असें अमेरिकेंत मानलें जात असल्यानें समाजांतील मत बनविण्याच्या कोणत्याहि शक्तीचा परिणाम शाळांवर होत असतो. अलीकडे एकदां न्यूयॉर्कच्या प्रचंड रोखेबाजारांत 'आर्-सी ए' शेअरची किंमत जाहीर होतांच एक प्रचंड पण पोरकट गोंगाट व टाळ्यांचा कडकडाट ऐकूं आला. तो गोंगाट एका शाळेंतल्या ११ वर्षें वयाच्या मुलांचा होता. त्यांनीं शाळेंत रोखेबाजार या विषयाचा अभ्यास

केला होता. तेव्हां त्याचा प्रयोग करण्यासाठीं पैसे गोळा केले व आर्-सी-ए-च्या एका शेअरची मागणी केली होती.

खरोखर शाळेला जेवढ्या गोष्टी शक्य असतील त्यापेक्षां अधिक गोष्टींची शाळेकडून अपेक्षा केली जाते. लैंगिक शिक्षण, आरोग्य, चालरीत, मुलांची जोपासना या ज्या घरीं शिकायच्या गोष्टी त्याहि शाळेवर सोपविल्या जातात. त्यामुळें मुलांवरचा आईबापांचा अधिकार कमी होतो व आपणच अधिकार कमी करून घेऊन जबाबदारी टाळतों याबद्दल आईबापांच्या मनाला खंतहि वाटत असते.

शाळेंत विविध पार्श्वभूमीचीं मुलें-मुली एकत्र येतात. यामुळें शाळा ही लोकशाहीचें शिक्षण देणारी मोठी शक्ति झाली आहे. कारण येथें मुलांना एकमेकांची संवय होते, समाजांतील आर्थिक-सामाजिक दर्जांतील विषमता विसरूनहि त्यांची केव्हां केव्हां दृढ मैत्री होते. सर्व प्रकारच्या माणसाशीं नांदायची त्यांना संवय लागते. ही संवय हा प्रौढ जीवनाचा आधारच असतो. खेळ आणि अभ्यास या दोन्ही गोष्टी समानता निर्मिणाऱ्या मोठ्या शक्ति आहेत. एकादें मूल विशेष दणकट अथवा हुशार असलें तर दुसऱ्या एकाद्या सामाजिक दृष्ट्या उच्चतर कुटुंबांतल्या विद्यार्थ्याला मागें टाकण्याची संधि शाळेंत अशा मुलाला मिळते. विशेषतः खेळात परदेशांतून वसाहतीसाठीं नवीन आलेल्या नागरिकांचीं मुलें जुन्यांच्या पुढें एकदम जातात.

## लोकशाही आणि शिक्षण

अमेरिकेंतील सर्वांना माहीत आहे कीं अमेरिकेला शिक्षणाचें तत्त्वज्ञान प्रथम व्हर्माँट येथें जन्मलेला जॉन ड्यूई (१८५९-१९५२) यानें दिलें. जॉन ड्यूईला पूर्वींच्या आटोपशीर वसाहतींतलें सहकारी जीवन माहीत होतें, हातांनीं कामें करून माणसें शिकत हेंहि त्याला माहीत होतें. त्याच कल्पना त्यानें आपल्या शिक्षणशास्त्रांत मांडल्या. त्यांचा परिणाम इतका चांगला झाला आहे कीं त्या विचारांचें वजन साऱ्या जगावर आतां पडलें आहे. ड्यूईच्या मतें शाळा हें पुढील आयुष्याच्या तयारीचें साधन नसून जीवनाचा तो एक मध्यवर्ती असा भागच आहे. शाळा ही लहान प्रमाणांत समाजाचीच प्रतिकृति असते. नुसता बौद्धिक अभ्यास करण्यापेक्षां किती तरी अधिक गोष्टी करण्याला मुलांना तेथें शिकविलें पाहिजे. त्यांना दुसऱ्यांनीं शिकविण्यापेक्षां शिकण्याच्या प्रक्रियेंत त्यांनीं स्वतःच भाग घ्यावा. त्यामुळेंच जीवनांतील अनुभव अनुभवण्याची त्यांची तयारी होईल. स्वतः हातानें कामें करूनच मुलें शिकतील.

अर्थात् शाळा ही वर्गाच्या खोलीपुरती मर्यादित राहिली नाहीं. आग विझवण्याच्या खात्याला अथवा पोस्ट ऑफिसला भेट देणें, आपल्या भोवतालच्या जगाचे अनुभव समजून घेण्यासाठीं सहली काढणें, निसर्गसौंदर्याच्या स्थळांना भेटी देणें, या गोष्टी शिक्षणाचा भागच बनल्या. यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलांनीं शिकण्याचे विषय हें महत्त्वाचें नसून मुलें हींच शिक्षणाच्या काळजीचें केंद्र मानलीं जाऊं लागलीं. मुलांना अमुक तास वाचन, लेखन व गणित शिकविण्याऐवजीं लोकशाहींत प्रत्येक मुलाला जें कार्य करायचें असतें त्यासाठीं त्याला समर्थ बनविणें हें शाळेचें मुख्य काम बनलें.

ड्यूईच्या या शिकवणीचा दुरुपयोग व गैरसमजहि झाला. अभ्यासाच्या विषयापेक्षां विद्यार्थ्याला अधिक महत्त्व देणें ही ड्यूईची कल्पना खरोखर निर्दोष होती. पण अल्पसमजाच्या शिक्षकांनीं ड्यूईच्या शिकवणुकीचा विपर्यास केल्यामुळें 'प्रगतिपर शिक्षण' या नांवाखालीं कांहींहि निरर्थक भारूड सांगण्यांत येऊं लागलें. हा अतिरेक वगळून ड्यूईचें मूळचें प्रतिपादन समजून घेतलें तर सतत विकासशील अशी लोकशाही प्राप्त होण्यासाठीं ड्यूईचे शिक्षणविषयक विचार फार सामर्थ्यवान् ठरले आहेत यांत शंकाच नाहीं.

ड्यूईच्या मतें शिक्षण असें असलें पाहिजे कीं आपल्यापुढें असलेला प्रश्न कसा सोडवावा हें त्या मुलाला स्वतःला शिकतां आलें पाहिजे. नेमका प्रश्न कसा विचारावा आणि त्याचें उत्तर कसें मिळवावें हें त्याचें त्याला कळलें पाहिजे. जुन्या पद्धतीचा आशय असा होता कीं, शिक्षकानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर ठरलेलें आहे हें त्यांत गृहीत असे. नव्या पद्धतीप्रमाणें, सर्वच प्रश्नांचीं उत्तरें कांहीं बिनचूक तयार नसतात. त्या प्रश्नांत आपण शिरून, त्यांतल्या संकटांना व अडचणींना स्वतः तोंड देऊन आपण तो प्रश्न सोडविण्याला शिकलें पाहिजे. मग अचूक उत्तर कदाचित् मिळणारहि नाहीं.

सार्वजनिक शाळा पुढील प्रयत्न करते:—तेथें लहान मुलांना आनंदाची अनुभूति व नवनिर्मिति यांबद्दल आस्था निर्माण केली जाते. विद्यार्थ्याला झेपेल अशा वेगानें, त्याच्या कुवतीप्रमाणें प्रगति करूं दिली जाते. शाळा मुलांच्या आरोग्याची तपासणी करते, त्या बाबतींत मुलांच्या ज्या गरजा असतील अथवा त्याच्या ठिकाणीं ज्या उणिवा असतील त्यांकडे आईबापांचें लक्ष शाळा वेधते व आईबापांना उपाययोजना परवडत नसल्यास स्वतः उपाययोजना करते. मुलांना खेळ, व्यायाम व आरोग्याचे नियम शिकवून शाळा विद्यार्थ्यांच्या शरीरसंवर्धनाचें कार्य करते. भौतिक व सामाजिक परिस्थितीचें आकलन विद्यार्थ्याला होईल अशा प्रकारें

विद्यार्थ्यांच्या समजशक्तीचा विकास करते. लोकशाहीबद्दल म्हणजे मुख्यतः अमेरिकन लोकशाहीबद्दल मुलांना नीट समजूत देऊन तीबद्दल त्यांच्या ठिकाणीं उत्साह निर्माण करते. विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं सामाजिक जाणीव उत्पन्न करण्याचा प्रयत्न शाळेंत केला जातो. ही जाणीव प्रौढ वयांत त्या मुलाला कायम राहून त्याला आपल्या समाजाबद्दल निःस्वार्थी आपुलकी वाटूं लागते, आणि समाजाची ऐच्छिकपणें विधायक सेवा करण्याची प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं बळावते. शेती व उद्योगधंदे या व्यवसायांत लागणारी तांत्रिक कारागिरी शाळेंत शिकविली जाते. प्रत्येक विद्यार्थ्याकडे अमेरिकन शाळा वैयक्तिक लक्ष देऊन त्याच्या अडचणी समजून घेतात. शाळा ही त्या वसाहतीचा एक अविच्छेद्य भागच होऊन त्या वसाहतीचें एकत्र जमण्याचें केंद्र होतें. आधुनिक शिक्षणाचें ध्येय व हेतु आईबापांना समजून देण्याचें काम शाळा करते. याशिवाय वाचन, लेखन, गणित, इतिहास, भूगोल, विज्ञान, कला, भाषा वगैरे सर्व शिक्षण शाळा देतातच. एवढा प्रचंड व्याप ज्या शाळांच्या मागें आहे त्या शाळा आपलें उद्दिष्ट संपूर्णपणें पार पाडूं शकत नाहींत यांत नवल कसलें ?

## शाळा कोण चालवितें

अमेरिकन समाजानें शिक्षणासाठीं जेवढा पैसा व मेहनत खर्च केली एवढी जगांत दुसऱ्या कोणींच केली नसेल. एकूण लोकसंख्येचा एकचतुर्थांश भाग नेहमीं कोणत्या ना कोणत्या शिक्षणक्रमांत गुंतलेला असतो. ३ कोटी ७० लक्षांहून अधिक विद्यार्थी १ लक्ष ६५ हजार शाळांत शिकत असून १० लक्षांहून अधिक शिक्षक त्यांना शिकवीत आहेत व या शिक्षणावर नऊशें कोटी डॉलरहून अधिक खर्च येत आहे. लोकसंख्यावाढीबरोबर विद्यार्थिसंख्या वाढत आहे, एवढेंच नव्हे तर हायस्कूल, कॉलेज व पदवीविद्यालय यांत अधिकाधिक विद्यार्थी जात आहेत. अमेरिकेंत १४ ते १७ वर्षें वयाच्या दरम्यानच्या स्त्रीपुरुष विद्यार्थ्यांपैकीं ७५ टक्के विद्यार्थी हायस्कुलांत आहेत. इतकें प्रमाण इतर कोणत्याहि देशांत आढळणार नाहीं. हायस्कूल पदवीधरांपैकीं ४० टक्के विद्यार्थी कॉलेजांत जातात. सामान्यतः वयाच्या सोळा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें आहे व हें शिक्षण मोफत आहे.

प्राथमिक आणि दुय्यम शिक्षणाच्या विद्यार्थ्यांपैकीं १२ टक्के मुलें खाजगी शाळांत जातात. यांतील पुष्कळशा शाळा चर्चमार्फत चालतात. तरीपण अमेरिकेंतलें हायस्कूलशिक्षण फार मोठ्या प्रमाणांत सार्वजनिक नियंत्रणाखालीं आहे. याचें नियंत्रण कसें होतें व व्यवस्था कशी राहते ? फेडरल सरकारमार्फत

अर्थात् शाळा ही वर्गाच्या खोलीपुरती मर्यादित राहिली नाहीं. आग विझवण्याच्या खात्याला अथवा पोस्ट ऑफिसला भेट देणें, आपल्या भोवतालच्या जगाचे अनुभव समजून घेण्यासाठीं सहली काढणें, निसर्गसौंदर्याच्या स्थळांना भेटी देणें, या गोष्टी शिक्षणाचा भागच बनल्या. यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुलांनीं शिकण्याचे विषय हें महत्त्वाचें नसून मुलें हींच शिक्षणाच्या काळजीचें केंद्र मानलीं जाऊं लागलीं. मुलांना अमुक तास वाचन, लेखन व गणित शिकविण्याऐवजीं लोकशाहींत प्रत्येक मुलाला जें कार्य करायचें असतें त्यासाठीं त्याला समर्थ बनविणें हें शाळेचें मुख्य काम बनलें.

ड्यूईच्या या शिकवणीचा दुरुपयोग व गैरसमजहि झाला. अभ्यासाच्या विषयापेक्षां विद्यार्थ्याला अधिक महत्त्व देणें ही ड्यूईची कल्पना खरोखर निर्दोष होती. पण अल्पसमजाच्या शिक्षकांनीं ड्यूईच्या शिकवणुकीचा विपर्यास केल्यामुळें 'प्रगतिपर शिक्षण' या नांवाखालीं कांहींहि निरर्थक भारूड सांगण्यांत येऊं लागलें. हा अतिरेक वगळून ड्यूईचें मूळचें प्रतिपादन समजून घेतलें तर सतत विकासशील अशी लोकशाही प्राप्त होण्यासाठीं ड्यूईचे शिक्षणविषयक विचार फार सामर्थ्यवान् ठरले आहेत यांत शंकाच नाहीं.

ड्यूईच्या मतें शिक्षण असें असलें पाहिजे कीं आपल्यापुढें असलेला प्रश्न कसा सोडवावा हें त्या मुलाला स्वतःला शिकतां आलें पाहिजे. नेमका प्रश्न कसा विचारावा आणि त्याचें उत्तर कसें मिळवावें हें त्याचें त्याला कळलें पाहिजे. जुन्या पद्धतीचा आशय असा होता कीं, शिक्षकानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर ठरलेलें आहे हें त्यांत गृहीत असे. नव्या पद्धतीप्रमाणें, सर्वच प्रश्नांचीं उत्तरें कांहीं बिनचूक तयार नसतात. त्या प्रश्नांत आपण शिरून, त्यांतल्या संकटांना व अडचणींना स्वतः तोंड देऊन आपण तो प्रश्न सोडविण्याला शिकलें पाहिजे. मग अचूक उत्तर कदाचित् मिळणारहि नाहीं.

सार्वजनिक शाळा पुढील प्रयत्न करते:—तेथें लहान मुलांना आनंदाची अनुभूति व नवनिर्मिति यांबद्दल आस्था निर्माण केली जाते. विद्यार्थ्याला झेपेल अशा वेगानें, त्याच्या कुवतीप्रमाणें प्रगति करूं दिली जाते. शाळा मुलांच्या आरोग्याची तपासणी करते, त्या बाबतींत मुलांच्या ज्या गरजा असतील अथवा त्यांच्या ठिकाणीं ज्या उणिवा असतील त्यांकडे आईबापांचें लक्ष शाळा वेधते व आईबापांना उपाययोजना परवडत नसल्यास स्वतः उपाययोजना करते. मुलांना खेळ, व्यायाम व आरोग्याचे नियम शिकवून शाळा विद्यार्थ्यांच्या शरीरसंवर्धनाचें कार्य करते. भौतिक व सामाजिक परिस्थितीचें आकलन विद्यार्थ्याला होईल अशा प्रकारें

विद्यार्थ्यांच्या समजशक्तीचा विकास करते. लोकशाहीबद्दल म्हणजे मुख्यतः अमेरिकन लोकशाहीबद्दल मुलांना नीट समजूत देऊन तीबद्दल त्यांच्या ठिकाणीं उत्साह निर्माण करते. विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं सामाजिक जाणीव उत्पन्न करण्याचा प्रयत्न शाळेंत केला जातो. ही जाणीव प्रौढ वयांत त्या मुलाला कायम राहून त्याला आपल्या समाजाबद्दल निःस्वार्थी आपुलकी वाटूं लागते, आणि समाजाची ऐच्छिकपणें विधायक सेवा करण्याची प्रवृत्ति त्याच्या ठिकाणीं बळावते. शेती व उद्योगधंदे या व्यवसायांत लागणारी तांत्रिक कारागिरी शाळेंत शिकविली जाते. प्रत्येक विद्यार्थ्याकडे अमेरिकन शाळा वैयक्तिक लक्ष देऊन त्याच्या अडचणी समजून घेतात. शाळा ही त्या वसाहतीचा एक अविच्छेद्य भागच होऊन त्या वसाहतीचें एकत्र जमण्याचें केंद्र होतें. आधुनिक शिक्षणाचें ध्येय व हेतु आईबापांना समजून देण्याचें काम शाळा करते. याशिवाय वाचन, लेखन, गणित, इतिहास, भूगोल, विज्ञान, कला, भाषा वगैरे सर्व शिक्षण शाळा देतातच. एवढा प्रचंड व्याप ज्या शाळांच्या मागें आहे त्या शाळा आपलें उद्दिष्ट संपूर्णपणें पार पाडूं शकत नाहींत यांत नवल कसलें ?

## शाळा कोण चालवितें

अमेरिकन समाजानें शिक्षणासाठीं जेवढा पैसा व मेहनत खर्च केली एवढी जगांत दुसऱ्या कोणींच केली नसेल. एकूण लोकसंख्येचा एकचतुर्थांश भाग नेहमीं कोणत्या ना कोणत्या शिक्षणक्रमांत गुंतलेला असतो. ३ कोटी ७० लक्षांहून अधिक विद्यार्थी १ लक्ष ६५ हजार शाळांत शिकत असून १० लक्षांहून अधिक शिक्षक त्यांना शिकवीत आहेत व या शिक्षणावर नऊशें कोटी डॉलरहून अधिक खर्च येत आहे. लोकसंख्यावाढीबरोबर विद्यार्थिसंख्या वाढत आहे, एवढेंच नव्हे तर हायस्कूल, कॉलेज व पदवीविद्यालय यांत अधिकाधिक विद्यार्थी जात आहेत. अमेरिकेंत १४ ते १७ वर्षें वयाच्या दरम्यानच्या स्त्रीपुरुष विद्यार्थ्यांपैकीं ७५ टक्के विद्यार्थी हायस्कुलांत आहेत. इतकें प्रमाण इतर कोणत्याहि देशांत आढळणार नाहीं. हायस्कूल पदवीधरांपैकीं ४० टक्के विद्यार्थी कॉलेजांत जातात. सामान्यतः वयाच्या सोळा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचें आहे व हें शिक्षण मोफत आहे.

प्राथमिक आणि दुय्यम शिक्षणाच्या विद्यार्थ्यांपैकीं १२ टक्के मुलें खाजगी शाळांत जातात. यांतील पुष्कळशा शाळा चर्चमार्फत चालतात. तरीपण अमेरिकेंतलें हायस्कूलशिक्षण फार मोठ्या प्रमाणांत सार्वजनिक नियंत्रणाखालीं आहे. याचें नियंत्रण कसें होतें व व्यवस्था कशी राहते ? फेडरल सरकारमार्फत

हें नियंत्रण होत नाहीं. शिक्षणसंस्थांच्या संयोगाचें प्रचंड काम करणारें राष्ट्रीय मंत्रिमंडळ नाहींच. अमेरिकन सरकारची जी शिक्षणकचेरी आहे ती आरोग्य, शिक्षण व लोककल्याण या मोठ्या खात्याचा एक भाग आहे. या खात्यामार्फत राज्यसरकारांना देण्याच्या देणग्यांचा कारभार चालत असून शिक्षणविषयक संशोधनहि चालतें. सार्वजनिक शिक्षणावर खर्च होणाऱ्या पैशापैकीं फक्त ४ टक्के पैसा संघसरकार देतें.

अमेरिकेंत ४८ राज्यें असून तितक्या भिन्न भिन्न पद्धति शाळांसंबंधानें आहेत. (कोलंबिया जिल्हा, हवाई व अलास्का यांचा समावेश केल्यास ५१ पद्धति होतील.) कारण घटनेनें शिक्षण हें राज्यसरकारांचा विषय केलें आहे म्हणजे तें "खास लोकांवरच" सोपविलें आहे. अमेरिकेंत जवळ जवळ साठ हजार स्कूल डिस्ट्रिक्ट्स असून तितके शाळांचे प्रकार आहेत असें म्हणणें हेंच अधिक बरोबर होईल. कारण जरी राज्यसरकारांनीं नियंत्रणाची जबाबदारी निरनिराळ्या प्रमाणांत सर्व शाळांच्या बाबतींत घेतली आहे तरी पण स्कूलबोर्ड निवडणारे आईबाप व इतर मतदार यांनाच शाळासंबंधींचे बहुतेक अधिकार दिले आहेत. शाळेच्या खर्चासाठीं लागणारा पैसा हे लोक स्वतःवर कर लादून उभारतात. पालक-शिक्षक संघटना स्थापल्या जातात, त्यायोगें घर आणि शाळा यांमधील विरोध नाहींसा केला जाऊन, शाळांसाठीं कराव्या लागणाऱ्या जादा खर्चासाठीं, विशेष चिकित्सक नागरिक कर देण्यास तयार नसल्यानें, तो पैसा ही संघटना मिळवते. शाळेला लागणाऱ्या खर्चापैकीं सरासरीं ६० टक्के पैसा स्थानिक करानें उभारला जातो. बाकीचे ४० टक्के प्रातीवरील कर, गॅसोलिन, दारू यांवरील कर व इतर कर यांतून राज्यसरकार देतें.

राज्यसरकार शिक्षणाच्या खर्चासाठीं जी ४० टक्के मदत देतें तीमुळें लोकल-बोर्डाला मार्गदर्शन करण्याचा अधिकार राज्यसरकारला मिळतो. तरीपण 'राज्य-सरकारनें उभारलेल्या बहुतेक संघटना पूर्णपणें विकेंद्रित आहेत. त्यामुळें प्रत्येक वसाहतीला आपल्या गरजांप्रमाणें वागतां येतें. ग्रामीण विभागांत स्वाभाविकच शेतकरी स्कूलबोर्डावर निवडून येतात. शहर विभागांत धंदेवाले व अलीकडे मजूरहि निवडून येतात. स्त्रिया पुष्कळदां निवडल्या जातात. मतदारांच्या मतांचा प्रभाव प्रतिनिधींवर पडत असल्यानें शाळांत सुखसोयी वाढविण्यासाठीं नवीन कर बसविण्याला प्रतिनिधि नाराज असण्याचा संभव असतो अथवा नवीन शाळेच्या इमारतीसाठीं कर्ज उभारण्याला ते तयार नसतात. पण या प्रतिनिधींना आपल्या समाजाची गरज भागविण्याची इच्छा असल्यानें स्वेच्छेनें ते आपल्या

समाजास नव्या शाळेसाठीं इमारतीची गरज अथवा शिक्षकांचे पगार वाढविण्याची गरज समाजाला पटवितात व पैसा उभारतात.

राज्यसरकारचा शिक्षणकमिशनर स्कूलबोर्डाला असें असें करा असे नुसते हुकूम न करतां त्यांना मार्गदर्शन करतो व त्यांचीं आर्जवें करतो. मात्र रोजच्या आखीव कारभारांत, शिक्षकांना शिकविण्याच्या कामीं व इतर मार्गदर्शनाच्या बाबतींत स्कूलबोर्डाला राज्यसरकारची मदत व हुकमत स्वागतार्हच वाटते. लोकल स्कूलबोर्डाला इतके अधिकार देण्यानें शिक्षण अद्ययावत् प्रगतीचें होणार नाहीं असा आक्षेप कदाचित् घेण्यांत येईल. पण स्थानिक शाळा अखिल-अमेरिकन राज्य अथवा तें तें घटक राज्य स्थापन होण्यापूर्वीच्या असून आपल्या मुलांना शिकवावें कसें हें ठरविण्याचा त्या त्या वसाहतीचा हक्क हा काळजीपूर्वक संभाळला जातो. शिक्षणाची कोणती पद्धति चांगली ? शिक्षणकमिशनर स्वतः जेथें शिकला त्या शिक्षक-कॉलेजानें केलेली कीं त्या त्या वसाहतींतल्या नागरिकांना आपल्या मुलांना ज्या पद्धतीनें शिकवावेंसें वाटतें ती ?

अलीकडे या दोन मार्गांचा समन्वय करण्यांत आला आहे. शाळेचे अभ्यासक्रम ठरविणें, शाळेचे इतर प्रश्न सोडविणें इत्यादिसाठीं ज्या कमिट्या नेमण्यांत येतात त्या कमिट्यांवर काम करण्यास पालकांना उत्तेजन देण्यांत येऊन शाळेसंबंधींचे निर्णय ठरविण्यांत पालकांना भाग घेऊं दिला जातो. प्रत्येक वसाहतीची शाळेची पद्धति वेगळी असूं शकते. न्यूयॉर्कमधील स्कार्सडेल येथील हायस्कूलचीं सर्व मुलें कॉलेजांत जातात. यामुळें त्या हायस्कुलांतच कॉलेजच्या पूर्वतयारीचा अभ्यास करून घेण्यावर भर असतो. ग्रामीण भागांत जेथें बहुतेक विद्यार्थी शिक्षण संपल्यावर शेतीकडे वळणारे असतात तेथें विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध शेती, त्यांच्या भोवतालची परिस्थिति याचें शिक्षण हायस्कुलांतच देण्यांत येतें. मुलींना शरीरपोषणशास्त्र, मुलांची जोपासना, घरसंसार वगैरे गोष्टी हायस्कुलांत शिकविल्या जातात.

## शाळा आणि विद्यार्थ्यांचें व्यक्तित्व

प्राथमिक शाळेंत मुलामुलींचें शिक्षण सारखेंच असतें. पुढें पुढें विषय बदलण्याची पद्धत असते. (अभ्यासक्रमाचीं वर्षें बदलण्याच्या पद्धति अनेक आहेत. सामान्यः किंडरगार्टन शिक्षण वयाच्या पांचव्या वर्षी सुरू होतें. प्राथमिक शाळेच्या सहा इयत्ता असतात. सहाव्या वर्षी हें शिक्षण सुरू होतें. नंतर तीन वर्षें ज्युनिअर हायस्कूल व तीन वर्षें सीनिअर हायस्कूलचीं होतात याच्या शेवटीं म्हणजे १८ वर्षी हायस्कूलची पदवीपरीक्षा होते.)

शाळा ही खरोखर प्रयोगशाळाच झाली आहे. तेथें विद्यार्थी सामुदायिक चर्चा व सहकार्य या मार्गानें अभ्यास करतात. तज्ज्ञ शिक्षकांचें मार्गदर्शन त्यांना मिळतें. वस्तुस्थिति नीट जुळवून अनुमानें कशीं काढावीं हें त्यांना सांगण्यांत येतें. या नव्या शिक्षणपद्धतीमुळें शिक्षकाची पात्रता वाढण्याची गरज उत्पन्न झाली आहे. शिक्षणपद्धतींतल्या अगदीं ताज्या सुधारणा कळून घेण्यासाठीं शाळेच्या वर्षांत शिक्षिका अनेक परिषदांना हजर राहते, नॅशनल एज्युकेशन असोशिएशनची सभासद होते. आपल्या खास विषयाच्या शिक्षकांच्या संघटनेचीहि सभासद होते. वर्षांतील मोठ्या सुटींतले सहा ते आठ आठवडे उन्हाळ्याच्या शाळेंत जाते.

शाळेंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत चढाओढीचें महत्त्व कमी करून गटांच्या सहकार्याला अधिक महत्त्व देण्यांत येतें. वैयक्तिक भेदांचेंहि महत्त्व कमी करण्यांत येतें. त्याचबरोबर प्रत्येक विद्यार्थी ही एक पृथक् व्यक्ति हें लक्षांत घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष पुरविण्यासाठीं शाळांतून स्वतंत्र खातीं निघत आहेत. तेथें प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनःस्थितीचा स्वतंत्र अभ्यास केला जातो, त्याची खास मुलाखत घेऊन त्याचे वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्न सोडविले जातात. त्याचें शारीरिक आरोग्य, शाळेंतील प्रगति, त्याच्या आयुष्यांतील व्यवसायाची आणि त्याला योग्य अशा कॉलेजाची अथवा धंदाशाळेची निवड या सर्व बाबतींत विद्यार्थ्यांस मदत करण्यांत येते.

## धंदेशिक्षण

अमेरिकन लोक व्यावहारिक दृष्टीचे असल्यानें धंदेशिक्षणाला फार पूर्वीपासून त्यांनीं महत्त्व दिलें आहे. पूर्वी हायस्कुलांत कॉलेजशिक्षणाची पूर्वतयारी केली जात असे. पण अलीकडे लाकूडकाम, धातुकाम, लघुलिपी, हिशेब, वृत्त-व्यवसाय, प्रापंचिक अर्थशास्त्र, शेती वगैरे विषयहि हायस्कुलांत शिकवितात. फेडरल सरकारहि कांहीं धंदेशिक्षणाला साहाय्य देतें. तो अभ्यासक्रम हायस्कुलांत शिकविण्यांत येत असून १४ वर्षांवरील मुलामुलींना तें शिक्षण घेतां येतें.

हायस्कुलांत शेतीचें शिक्षण घेणाऱ्या एका मुलाचें कर्तृत्व येथें नमूद करण्यासारखें आहे. त्यानें शेतीशिक्षणाचा अभ्यासक्रम स्वीकारल्यानंतर आपल्या बापाच्या शेताची पाहणी करून यांत काय होऊं शकेल याचा अजमास घेतला. नंतर आपण शेतांत जें धान्य पिकवूं शकूं त्याला बाजार कसा, किती, कोठें आहे याची माहिती मिळविली, नंतर त्यानें डुकरांची निपज करण्याचा कार्यक्रम हातीं

घेतला. दर सहा महिन्यांना दोन हजार पौंड वजनाचीं डुकरें निपजविणें याप्रमाणें चार वर्षेंपर्यंत त्यानें हा कार्यक्रम यशस्वी केला. नंतर त्यानें धान्य आणि शेतींत इतर शक्य असणाऱ्या व बाजारांत मागणी असणाऱ्या वस्तु पिकविण्याचें ठरविलें. शेवटीं त्यानें स्वतः एक जमीन घेतली आणि बापाशीं भागीदारी पत्करली. अशा प्रकारें सर्व वेळ शेतीशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं 'फ्यूचर फार्मर्स ऑफ अमेरिका' नांवाची संघटना काढली असून ते काटकसर व सार्वजनिक सेवा याविषयींच्या संवयी लावून घेतात. यामुळें ग्रामीण भागाचें नेतृत्व करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येते.

हायस्कुलांत मध्येंच शाळा सोडणाऱ्या मुलांचा प्रश्न या धंदेशिक्षणानें सुटतो. हायस्कुलांत जाणाऱ्या मुलांची संख्या साऱ्या जगांत अमेरिकेंतच अधिक आहे. तरी पण मनाचा कमकुवतपणा, हजेरीसंबंधींच्या कायद्याची ढिली बजावणी यामुळें एक-चतुर्थांश मुलें हायस्कूलशिक्षण मध्येंच सोडतात. कांहीं जण अभ्यासाला कंटाळून शाळा सोडतात. कांहींना आठवड्याच्या पगाराचा चेक, स्वातंत्र्य, नवे कपडे, मोटार या सर्व प्रलोभनांमुळें नोकरीचा मोह वाटून तीं शाळा सोडतात. विद्यार्थिदशेंतून यशाचा मार्ग लाभावा यासाठीं गरीब पण हुशार विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे कार्यक्रम देऊन शाळेंत राहण्याला उत्तेजन देण्यांत येतें. नोकरीवर असणाऱ्यांनाहि अधिक शिक्षण देण्याच्या योजना असून त्यामुळें कामगाराला आपली कारागिरी वाढवितां येते. आपणाला नोकरी देणाऱ्या कंपनीनेंच आपल्या अधिक शिक्षणाची सोय केली आहे ही गोष्ट कामगाराच्या लक्षांत आली म्हणजे ही अर्थसंघटना आपली आकांक्षा पूर्ण करणारी आहे असा विश्वास कामगाराला वाटूं लागतो.

## उच्चशिक्षण

प्राथमिक शाळा व हायस्कूल्स यांना याप्रमाणें जास्तींत जास्त स्थानिक लोकशाहीचें नियंत्रण मिळतें व राज्यशिक्षणखातें, शिक्षणपरिषदा, वगैरेंचें वजन त्यांच्यावर पडत असतें हें आपण पाहिलें. पण उच्च शिक्षणांत प्रत्येक मोठें विद्यापीठ अथवा ग्रामीण कॉलेज हीं सर्वथैव स्वतंत्र असून आपलीं शिक्षणविषयक आकर्षणें त्या संस्था स्वतःच ठरवितात. उत्तम विद्यार्थी मिळविण्यासाठीं त्यांच्यांत चढाओढ चालत असून विद्यार्थ्यांना नवें नवें आकर्षण देण्यासाठीं या संस्था आपले कार्यक्रम वरचेवर बदलतात, शिक्षणाचें एकादें नवें तत्त्व शोधतात, विद्यार्थ्यांची एकादी नवी सोय करतात अथवा एकादें वैशिष्ट्य

शाळा ही खरोखर प्रयोगशाळाच झाली आहे. तेथें विद्यार्थी सामुदायिक चर्चा व सहकार्य या मार्गानें अभ्यास करतात. तज्ज्ञ शिक्षकांचें मार्गदर्शन त्यांना मिळतें. वस्तुस्थिति नीट जुळवून अनुमानें कशीं काढावीं हें त्यांना सांगण्यांत येतें. या नव्या शिक्षणपद्धतीमुळें शिक्षकाची पात्रता वाढण्याची गरज उत्पन्न झाली आहे. शिक्षणपद्धतींतल्या अगदीं ताज्या सुधारणा कळून घेण्यासाठीं शाळेच्या वर्षांत शिक्षिका अनेक परिषदांना हजर राहते, नॅशनल एज्युकेशन असोशिएशनची सभासद होते. आपल्या खास विषयाच्या शिक्षकांच्या संघटनेचीहि सभासद होते. वर्षांतील मोठ्या सुटींतले सहा ते आठ आठवडे उन्हाळ्याच्या शाळेंत जाते.

शाळेंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत चढाओढीचें महत्त्व कमी करून गटांच्या सहकार्याला अधिक महत्त्व देण्यांत येतें. वैयक्तिक भेदांचेंहि महत्त्व कमी करण्यांत येतें. त्याचबरोबर प्रत्येक विद्यार्थी ही एक पृथक् व्यक्ति हें लक्षांत घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष पुरविण्यासाठीं शाळांतून स्वतंत्र खातीं नियत आहेत. तेथें प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनःस्थितीचा स्वतंत्र अभ्यास केला जातो, त्याची खास मुलाखत घेऊन त्याचे वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्न सोडविले जातात. त्याचें शारीरिक आरोग्य, शाळेंतील प्रगति, त्याच्या आयुष्यांतील व्यवसायाची आणि त्याला योग्य अशा कॉलेजाची अथवा धंदाशाळेची निवड या सर्व बाबतींत विद्यार्थ्यास मदत करण्यांत येते.

## धंदेशिक्षण

अमेरिकन लोक व्यावहारिक दृष्टीचे असल्यानें धंदेशिक्षणाला फार पूर्वींपासून त्यांनीं महत्त्व दिलें आहे. पूर्वीं हायस्कुलांत कॉलेजशिक्षणाची पूर्वतयारी केली जात असे. पण अलीकडे लाकूडकाम, धातुकाम, लघुलिपी, हिशेब, वृत्त-व्यवसाय, प्रापंचिक अर्थशास्त्र, शेती वगैरे विषयहि हायस्कुलांत शिकवितात. फेडरल सरकारहि कांहीं धंदेशिक्षणाला साहाय्य देतें. तो अभ्यासक्रम हायस्कुलांत शिकविण्यांत येत असून १४ वर्षांवरील मुलामुलींना तें शिक्षण घेतां येतें.

हायस्कुलांत शेतीचें शिक्षण घेणाऱ्या एका मुलाचें कर्तृत्व येथें नमूद करण्यासारखें आहे. त्यानें शेतीशिक्षणाचा अभ्यासक्रम स्वीकारल्यानंतर आपल्या बापाच्या शेताची पाहणी करून यांत काय होऊं शकेल याचा अजमास घेतला. नंतर आपण शेतांत जें धान्य पिकवूं शकूं त्याला बाजार कसा, किती, कोठें आहे याची माहिती मिळविली, नंतर त्यानें डुकरांची निपज करण्याचा कार्यक्रम हातीं

घेतला. दर सहा महिन्यांना दोन हजार पौंड वजनाचीं डुकरें निपजविणें याप्रमाणें चार वर्षेंपर्यंत त्यानें हा कार्यक्रम यशस्वी केला. नंतर त्यानें धान्य आणि शेतींत इतर शक्य असणाऱ्या व बाजारांत मागणी असणाऱ्या वस्तु पिकविण्याचें ठरविलें. शेवटीं त्यानें स्वतः एक जमीन घेतली आणि बापाशीं भागीदारी पत्करली. अशा प्रकारें सर्व वेळ शेतीशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं 'फ्यूचर फार्मर्स ऑफ अमेरिका' नांवाची संघटना काढली असून ते काटकसर व सार्वजनिक सेवा याविषयींच्या संवयी लावून घेतात. यामुळें ग्रामीण भागाचें नेतृत्व करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येते.

हायस्कुलांत मध्येंच शाळा सोडणाऱ्या मुलांचा प्रश्न या धंदेशिक्षणानें सुटतो. हायस्कुलांत जाणाऱ्या मुलांची संख्या साऱ्या जगांत अमेरिकेंतच अधिक आहे. तरी पण मनाचा कमकुवतपणा, हजेरीसंबंधींच्या कायद्याची ढिली बजावणी यामुळें एक-चतुर्थांश मुलें हायस्कूलशिक्षण मध्येंच सोडतात. कांहीं जण अभ्यासाला कंटाळून शाळा सोडतात. कांहींना आठवड्याच्या पगाराचा चेक, स्वातंत्र्य, नवे कपडे, मोटार या सर्व प्रलोभनांमुळें नोकरीचा मोह वाटून तीं शाळा सोडतात. विद्यार्थिदशेंतून यशाचा मार्ग लाभावा यासाठीं गरीब पण हुशार विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे कार्यक्रम देऊन शाळेंत राहण्याला उत्तेजन देण्यांत येतें. नोकरीवर असणाऱ्यांनाहि अधिक शिक्षण देण्याच्या योजना असून त्यामुळें कामगाराला आपली कारागिरी वाढवितां येते. आपणाला नोकरी देणाऱ्या कंपनीनेंच आपल्या अधिक शिक्षणाची सोय केली आहे ही गोष्ट कामगाराच्या लक्षांत आली म्हणजे ही अर्थसंघटना आपली आकांक्षा पूर्ण करणारी आहे असा विश्वास कामगाराला वाटूं लागतो.

## उच्चशिक्षण

प्राथमिक शाळा व हायस्कूल्स यांना याप्रमाणें जास्तींत जास्त स्थानिक लोकशाहीचें नियंत्रण मिळतें व राज्यशिक्षणखातें, शिक्षणपरिषदा, वगैरेंचें वजन त्यांच्यावर पडत असतें हें आपण पाहिलें. पण उच्च शिक्षणांत प्रत्येक मोठें विद्यापीठ अथवा ग्रामीण कॉलेज हीं सर्वथैव स्वतंत्र असून आपलीं शिक्षणविषयक आकर्षणें त्या संस्था स्वतःच ठरवितात. उत्तम विद्यार्थी मिळविण्यासाठीं त्यांच्यांत चढाओढ चालत असून विद्यार्थ्यांना नवें नवें आकर्षण देण्यासाठीं या संस्था आपले कार्यक्रम वरचेवर बदलतात, शिक्षणाचें एकादें नवें तत्त्व शोधतात, विद्यार्थ्यांची एकादी नवी सोय करतात अथवा एकादें वैशिष्टय

निर्माण करून इतर संस्थांपेक्षां आपण श्रेष्ठ आहों असें दाखवितात. एकाद्या संस्थेंत अमुक अभिजात वाङ्मयाचा अभ्यास करून घेण्यांत येत असून शहाणपणाचा तो अचूक मार्ग होय असें सांगितलें जातें. दुसरी एकादी संस्था आलटून पालटून रोजगारी देते व अभ्यासहि करून घेते. कांहीं कीर्तिमान् संस्था अशा आहेत कीं त्यांची कीर्ति मुख्यतः त्यांच्या फुटबॉल टीमवरून त्यांनीं मिळविली आहे.

सर्व कॉलेजांचा अथवा विद्यापीठांचा अमेरिकेंत नमुना असा नाहींच. उच्च शिक्षण देणाऱ्या सुमारें दोन हजार संस्था अमेरिकेंत आहेत. त्यांत एकासारखी दुसरी नसून सर्वच आपापल्या परीनें अगदीं वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. या संस्थांत हल्लीं ३० लक्ष विद्यार्थी शिकतात. प्रेसिडेंट्स कमिशनच्या मतें अमेरिकन लोकसंख्येपैकीं एक तृतीयांश लोकसंख्येला संपूर्ण बौद्धिक अथवा धंदेविषयक शिक्षण घेण्याची पात्रता आहे. म्हणून उच्च शिक्षणांतल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याचें उद्दिष्ट या कमिशननें अमेरिकेपुढें ठेवलें असून १९६० सालीं ४६ लक्ष विद्यार्थी हायस्कूल ओलांडून पुढें जावे अशी या कमिशनची अपेक्षा आहे. पण आजहि अमेरिकेचें कॉलेजविद्यार्थ्यांचें प्रमाण जगांतल्या इतर राष्ट्रांपेक्षां अधिक आहे. युरोपांत २० हायस्कूल पदवीधरांपैकीं एक कॉलेजांत जातो तर अमेरिकेंत चार हायस्कूल पदवीधरांपैकीं एक कॉलेजांत जातो.

अमेरिकेबाहेरच्या लोकांना वाटतें कीं अमेरिकेंत दोन हजार उच्च शिक्षण संस्थांतल्या फक्त दोनतीन मोठ्या संस्था इतर सर्वांपेक्षां अधिक चांगलें शिक्षण देतात. पण हा समज खरा नाहीं. अमेरिका देश विस्तीर्ण, त्यांत अनेक प्रदेश व राज्यें असून विविधतेवर अमेरिकनांचा विश्वास फार. यामुळें आपापल्या पद्धतीनें उत्तम शिक्षण देणारीं केंद्रें अमेरिकेंत पुष्कळच आहेत. पुष्कळदां शहरापासून दूर ग्रामीण भागांत असलेल्या कॉलेजांत शिक्षण चांगलें मिळतें. अलीकडील पाहणीवरून असें आढळून आलें आहे कीं ५० संस्था भौतिक शास्त्रांचें शिक्षण फार चांगलें देतात, ३९ कॉलेजें लहान आहेत, पण ग्रामीण भागांतील शिक्षणसंस्थांचे जे प्रमुख आहेत त्यांतील ८० टक्के कॉलेजग्रॅज्युएट लहान कॉलेजांतून आलेले आहेत.

एकूण उच्च शिक्षण संस्थांपैकीं दोन तृतीयांश संस्था खाजगी असून त्या देणग्यांवर चालतात. बाकीच्या संस्था राज्यसरकारांच्या अथवा शहर सरकारांच्या आहेत. लोकांकडून कर वसूल करून त्यांचा खर्च केला जातो आणि म्हणून त्यांची फी कमी असते व विद्यार्थ्यांना तें एक आकर्षण असतें. खाजगी संस्थांचा

शिक्षणखर्च सदा वाढत असल्यानें त्यांना सदा फी वाढवावी लागते. कॉर्नेल, सिरॅक्युज वगैरे संस्था अंशतः खाजगी व अंशतः सरकारी आहेत. कांहीं संस्था एकाच क्षेत्रांतलें शिक्षण देतात, तरी पण अनेक शिक्षणशाखा एकाच संस्थेनें चालविण्याची पद्धत पडली आहे. व्हेटरिनरी, नर्सेस-ट्रेनिंग, तत्त्वज्ञान, कायदा, वैद्यक, अभिजात वाङ्मय असे सर्व विषय एकाच विद्यापीठांत शिकविण्यांत अमेरिकन संस्थांना कांहींहि अस्वाभाविक वाटत नाहीं.

कोणत्याहि समाजांतल्या संस्थांना त्या त्या ठिकाणच्या वर्चस्वशाली अशा सामाजिक आर्थिक गटांचा आश्रय मिळवावा लागतो. अमेरिकन कॉलेजें व विद्यापीठें याला अपवाद नाहीत. देणग्यांवर अवलंबून राहणाऱ्या संस्थांना देणग्यांचा प्रवाह ज्यांच्यामुळें चालू राहील अशीं माणसें बोर्डावर घ्यावीं लागतात. सरकारी संस्थांना राजकीय दृष्ट्या बलवान् असणाऱ्यांचा आश्रय मिळवावा लागतो. दोन्ही प्रकारच्या संस्थांना त्यांचे माजी विद्यार्थी हे मोठे आधार असतात. हे विद्यार्थी आपापल्या संस्थांच्या फुटबॉल वगैरेच्या सामन्यांत भाग घेऊन आपला भावनात्मक बंध कायम ठेवतात.

कॉलेजांत तरुणतरुणींना कसलें शिक्षण मिळतें ? अगदीं सरळ शब्दांत सांगायचें तर आधुनिक जगांत विद्येचे भौतिक शास्त्रें, सामाजिक शास्त्रें व ह्युमॅनिटीज हे जे तीन भाग केलेले आहेत त्या तीनहि विभागांचें शिक्षण या शिक्षणसंस्थांत मिळतें. जीवनांतील अनुभव, आनंद व चरितार्थ यांसाठीं वरील तीनहि विद्याशाखात माणूस सुशिक्षित असला पाहिजे यावर अमेरिकनांचें एकमत आहे. मात्र या तीन शाखांचें शिक्षण देतांना, महत्त्व कोणतीला किती द्यायचें, अनुक्रम कोणता ठेवायचा, व पद्धति कोणती स्वीकारायची हें जी ती संस्था ठरविते.

व्याख्यान, चर्चा आणि मार्गदर्शन हे तीनहि मार्ग प्रत्येक संस्था अनुसरते. पण काहीं मोठ्या संस्थांखेरीज इतर मोठ्या संस्थांत, संस्था जेवढी मोठी तितकें वैयक्तिक लक्ष कमी अशी स्थिति आहे. भौतिक शास्त्रासाठीं प्रयोगशाळा, सामाजिक शास्त्रासाठीं मुलाखती, पाहणी व आंकडेवार माहिती आणि ह्युमॅनिटीजसाठीं ऐकणें, पाहणें, हातानें कामें करणें हे मार्ग आतां गृहीतच धरले जातात. यापलीकडे मात्र विविधता अमर्याद असते.

थॉर्स्टीन वेब्लेन यानें अमेरिकन विद्यापीठाबद्दल वाईट मत व्यक्त केलें असून त्यांचे अभ्यासक्रम विद्वत्तेपेक्षां आर्थिक यशाकडे दृष्टि देऊन आंखलेले असतात असें म्हटलें आहे. वेब्लेनची ही टीका कांहीं वर्षांपूर्वीची असून आजहि

ती अंशतः खरी आहे. पण अलीकडे विद्यापीठशिक्षणांत पुष्कळ सुधारणा झाली आहे. निव्वळ व्यावहारिक दृष्टीवर भर देणाऱ्या संस्थाहि आतां बौद्धिक शिक्षणावर भर देत आहेत. वैद्यकीय शास्त्रांतील विद्यार्थ्यांसाठीं इतर कांहीं शास्त्रांचें स्थूल शिक्षण हवें हें त्या संस्थांना पटलें आहे. औद्योगिक व एंजिनीअरिंग कॉलेजें आपल्या विद्यार्थ्यांना वाङ्मय व समाजशास्त्र यांचा अभ्यास सक्रिय करण्याची संधि देत असून त्यामुळें आपण राहतों त्या जगाचें स्वरूप त्या विद्यार्थ्यांना कळतें व तसें तें कळणें अवश्य आहे हें त्या संस्थांना पटलें आहे. बाजारांत कोणताहि माल जसा गिऱ्हाइकानें आपल्या इच्छेनें खरेदी करावा तसा कॉलेजांतला कोणताहि अभ्यास मुलांचा मुलांनीं निवडावा ही पद्धति आतां मागें पडली असून भौतिक शास्त्रें, सामाजिक शास्त्रें व ह्युमॅनिटीज यांतील मूलभूत तत्त्वांचा अभ्यास आतां सर्वांना सक्तीचा झाला आहे.

कॉलेजांत विद्यार्थी जो अभ्यास करतो त्यांत त्याला बोध आणि रस मिळतो कीं नाहीं हें पाहण्यासाठीं सल्लागारपद्धति अंमलांत आली आहे. कांहीं कॉलेजांत हे सल्लागार व विद्यार्थी यांचा निकट संबंध येत असून दर आठवड्यास त्यांच्या परिषदा भरतात. हायस्कूल शिक्षकाशीं जितका अमेरिकन विद्यार्थ्यांचा निकट संबंध येतो त्यापेक्षां अधिक निकट संबंध कॉलेजशिक्षकाशीं कॉलेज-विद्यार्थ्यांचा येतो हें अमेरिकन विद्यार्थ्याला कळूं लागतें.

कॉलेजविद्यार्थ्यांच्या या खास शिक्षकाशिवाय विशिष्ट विषयांतले अनेक तज्ज्ञ त्या विद्यार्थ्यांच्या दिमतीला असतात. या विद्यार्थ्यांना जितक्या तज्ज्ञांची सेवा मिळते त्याच्या निम्म्यानेंहि मध्ययुगांतल्या एकाद्या राजाची सेवा केली गेली नसेल. कॉलेजचा डीन हा विद्यार्थ्यांचा मुख्य सेवक. तो त्यांना बापाच्या जागींच असतो. तो कठोरपणा व सौम्यता या दोन्ही गुणांत आदर्श असतो. मुलांनीं चुका केल्या तर तो शासन करतोच पण आपणहि विद्यार्थिदशेंत अशा चुका करीत होतों याची आपणास जाणीव आहे हें तो मुलांना दर्शवितो. या डीनचें काम फार अवघड असतें. बहुतेक लहान कॉलेजांत व कांहीं मोठ्या कॉलेजांतहि डीन प्रत्येक विद्यार्थ्याला नांवानें ओळखण्याचा हिय्या धरतो. शिवाय तो स्वतः एकाद्या विषयाचा तज्ज्ञ असतो, आणि ते विषय तो शिकवतोहि. यामुळें कॉलेज चालवणें व शिकवणें या दोन कामांत पुष्कळदां विरोध येतो. एक प्रख्यात मत्स्यशास्त्रज्ञ एका कॉलेजाचा डीन होता. "तुमचें या विद्यार्थ्यांशीं कसें काय जमतें?" असा प्रश्न त्याला विचारण्यांत आला असतां तो म्हणाला, "पोरांच्याशीं छान जमतें, पण पोरं पाहिलीं कीं मी माशाला विसरतों, माझी मुख्य विद्याच गमावतों."

## स्त्रिया आणि शिक्षण

कॉलेजजीवनांतला महत्त्वाचा विषय स्त्री-विद्यार्थी हा असतो. पूर्वप्रदेशाखेरीज इतरत्र पदवीपूर्व शिक्षणाचीं कॉलेजें सहशिक्षणाचीं आहेत. मुलगे व मुली एकाच वर्गांत बसतात, एकाच टेबलावर जेवतात, त्यांचीं अभ्यासाचीं पुस्तकें एकच असतात, दोघांचा उत्साह सारखाच असतो, हिरव्या गवतावर पडून गप्पा मारतात, एकमेकांच्या 'तारखा' ठरवून घेतात. ज्या समाजांत आपल्या गोत्राबाहेर लग्न करणें अवश्य असतें पण अशीं लग्नें जमविण्याची कांहीं सोय नसते अशा समाजांतल्या विद्यार्थ्यांना कॉलेजांची या कामीं मदत होते. कॉलेजांचें तें महत्त्वाचें कामच असतें. तेथें अनेक संभाव्य भागीदाराशीं संबंध येतो, एकमेकाशीं स्त्रीपुरुषांना आपापले अनुभव व मनीषा सांगण्याची संधि मिळते आणि मग आपल्या योग्य जोडीदार कोण असू शकेल याचा अंदाज तेथें त्यांना बांधतां येतो. अलीकडे पुष्कळ विद्यार्थी कॉलेजांत असतांनाच लग्नें करतात. त्यामुळें अभ्यासाला व्यत्यय आणणारा मनावरचा ताण कमी होऊन शारीरगुणानुसार परिपक्व झालेलें आपलें जीवन ते अनुभवूं लागतात. युद्धामुळें चार चार वर्षें उशिरां विद्यार्थी कॉलेजांत येऊं लागले आणि त्यामुळें कॉलेजांतच विवाह करण्याची ही रूढि पडली. ती तशीच पुढें चालू राहिलेली असून हल्लीं १६ टक्के पदवीपूर्व विद्यार्थी विवाहित असतात. पण कांहीं कॉलेजांना व कांहीं आईबापांना अजून ही प्रथा पसंत नाहीं.

कॉलेजविद्यार्थिनीला अभ्यासक्रम निवडणें फार अवघड असतें. कारण शिकलेल्या धंद्याचा व्यवसाय कांहीं वर्षें केल्यानंतर पुढें पत्नी, माता अथवा समाजकार्यकर्त्री म्हणून ती आपलें आयुष्य घालविणार असते. यामुळें तिला दोन जीवनक्रमांचें शिक्षण घ्यावें लागतें. ती जो व्यवसाय शिकते तोच तिचा हुंडा आणि विमाहि असतो. कारण व्यवसाय शिकलेल्या मुलीला नवरा अधिक चांगला मिळतो, उलट दुर्दैवानें नवरा तिला मिळवतां आला नाहीं तर तिला दारिद्य्र व परावलंबन पत्करावें लागत नाहीं. कारण तिला चांगली नोकरी मिळूं शकते.

म्हणून अमुक एक व्यवसाय निवडण्याचें ठरविल्यावर ती त्याचा अभ्यास करते. पुष्कळ स्त्रिया शिक्षणशास्त्र हा विषय घेतात. कारण सार्वजनिक शाळांत दर चार शिक्षकांत तीन स्त्रिया असतात. इतरहि अनेक विषय घेणाऱ्या स्त्रिया असतात. स्त्रीला म्हणून अमुक एका विषयाची बंदी नसते. पण सर्ववरिष्ठ अशा नोकऱ्या स्त्रियांना मिळणें फार अवघड पडतें. पुरुषांच्या बरोबरीनें पगारहि

स्त्रियांना क्वचितच मिळतो. स्त्रीला माता व्हायचें असल्यानें मानसशास्त्र, बालशिक्षण, कांहीं कॉलेजांत प्रापंचिक अर्थशास्त्र वगैरे विषय स्त्रिया घेतात. कॉलेजातल्या राजकारणांतहि स्त्रीविद्यार्थिनी आपल्या पुरुषमित्रांइतक्याच उत्साहानें भाग घेते. कारण पुढील आयुष्यांत तिलाहि मित्र मिळवायचे असतात आणि निवडणुकांत आपलें वजन पाडायचें असतें.

## पदवीपरीक्षेचा अभ्यास

हायस्कुलांतून कॉलेजांत जाणें हें जसें एकदम फार मोठें स्थित्यंतर असतें, तसेंच पदवीपूर्व कॉलेजांतून पदवीउत्तर 'शाळेंत' जाणें हेंहि एकदम फार मोठें स्थित्यंतर असतें. पदवी घेतलेले असे २ लक्ष ७८ हजार विद्यार्थी पदवीनंतरचें शिक्षण घेत असून कायदा, वैद्यक, तत्त्वज्ञान, राज्यकारभारशास्त्र वगैरे विद्याक्षेत्रांत मोठ्या चढाओढीनें पुढें येण्यासाठीं झटत आहेत. पदवीनतरच्या या 'शाळेंत' प्रवेश मिळण्यासाठींहि त्यांना स्पर्धा करावी लागली असून आपण जर झटून अभ्यास केला नाहीं तर आपणांस शाळेंतून हाकललें जाईल ही त्यांना भीति असते.

म्हणून आतां विद्यार्थ्यांतल्या राजकीय गप्पा, त्यांचे छंद, व्यायाम, खेळ या सर्वांना फाटा मिळतो. पूर्वीच्या वर्षी कॉलेजांत आल्यावर जितक्या उत्साहानें या गोष्टी त्यानें घेतल्या तितक्याच उत्साहानें तो त्या सोडतो. आतां तो खोलींत सोबती न घेतां एकटा राहतो. लेक्चर्स अथवा परिसंवाद नसतील तेव्हां पुस्तकालयांत अथवा प्रयोगशाळेंत तो काम करीत बसतो, आणि वेळांत वेळ काढून रात्रीं जागून आपल्या जाड्या जाड्या व फार किंमतीच्या पुस्तकांत डोकें खुपसून बसलेला असतो. मधून मधून तो सिनेमाला, जलशाला जात नाहीं असें नव्हे, एकाद्या मुलीबरोबर त्याची 'तारीख'हि लागलेली असते, पण अभ्यास ही मुख्य बाब असते.

पदवीनंतरच्या 'शाळें'तले प्रोफेसर्स विद्यार्थ्यांकडून इतक्या पुष्कळ वाचनाची अपेक्षा करतात, इतकीं पुष्कळ लेक्चर्स विद्यार्थ्यांना ऐकायला लावतात, इतक्या परीक्षा घेतात, संशोधनाचें लिखाण इतकें पुष्कळ करायला लावतात, विद्यार्थ्यांच्या निबंधांची चर्चा जेथें होते ते परिसंवाद इतके विद्वत्तापूर्ण असतात कीं हें सर्व पाहून परदेशी पाहुणे चकित होतात.

एक वर्ष, कदाचित् दोन वर्षें, असा एकतानतेनें व झटून अभ्यास केल्यानंतर परंगात' (मास्टर) पदवी मिळते. डॉक्टरेट मिळविण्याला तीन वर्षें लागतात.

पण त्यासाठीं जो प्रबंध लिहावा लागतो तो लिहिण्याला पुष्कळ विद्यार्थी बराच अधिक काळ घेतात. मेडिकल डॉक्टरांना तर कित्येक वर्षं हॉस्पिटलमध्यें राहून उमेदवारी करावी लागते.

हायस्कूलमधून कॉलेजांत एकदम मोठें स्थित्यंतर आणि पुन्हा कॉलेजांतून पदवीनंतरच्या 'शाळे'त पुन्हा मोठें स्थित्यंतर अशी अमेरिकन शिक्षणाची योजना कां केलेली आहे? याचें कारण असें दिसतें कीं हायस्कुलांत जणूं चमच्यानें दूध पाजावें इतकी मुलांची जी काळजी घेतली जाते तिचे दुष्परिणाम टळावे म्हणून कॉलेजांत मुलांना एकदम खूप मोकाट सोडलें जातें. कारण या दुसऱ्या अवस्थेंत मुलें सामाजिक व कौटुंबिक बंधनांतून पूर्ण बाहेर पडतात. नंतर पुढल्या अवस्थेंत त्यांना एकदम बौद्धिक स्वातंत्र्य दिलें जाऊन बौद्धिक जबाबदारीहि त्यांच्यावर येऊन पडते. त्या अवघड विद्येच्या जगांत त्यानें बुडावें अथवा तरावें, त्या झगड्यांत यशस्वी व्हावें अथवा पराभूत व्हावें, त्याचा तो जबाबदार असतो. त्याला डार्विननें अडवलें तर स्पेन्सरच्या मदतीनें त्यानें आपली सुटका करून घ्यावी.

या पदवीनंतरच्या शिक्षणक्रमांत कांहीं दोष आहेत. एकाच लहानशा क्षेत्रांत अकालीं अतितज्ज्ञता अपेक्षिली जाते. संशोधन यांत्रिक होतें. लिहिलेल्या प्रबंधांत प्रतिभा कमी दिसून येऊन तींत यान्त्रिकीपणाच फार दिसतो. पुस्तकांचे ढीगचे ढीग वाचावे लागतात पण खोल विचार कशाचाच होत नाहीं. कॉलेजांत प्राध्यापक होण्यासाठीं डॉक्टरेटची फार गरज असते. पण डॉक्टरेटसाठीं केलेल्या प्रयत्नांत शिक्षकाचे गुण अंगीं मुळींच येत नाहींत. डॉक्टरेटच्या प्रयत्नांत संशोधनाची आवड उत्पन्न होते, शिकविण्याची इच्छा मुळींच उत्पन्न होत नाहीं. डॉक्टरेटमधून जर चांगले शिक्षक निघालेच तर डॉक्टरेटचा तो गुण नसून त्या त्या शिक्षकाचाच तो अंगभूत गुण असतो.

## लोकशिक्षण

प्रेसिडेंट्स कमिशनच्या मतें विद्यापीठांनीं ज्ञानाचें आपलें कार्य आणखी व्यापक केलें पाहिजे. सबंध लोकसंख्येला झेपेल इतकें शिक्षण घेतां यावें अशीं साधनें विद्यापीठांनीं पुरवलीं पाहिजेत. कांहीं राज्यांतील मोठीं विद्यापीठें हें काय करूं लागलींहि आहेत. टेलिव्हिजनवर टपालानें, त्या त्या राज्यांत गावोगांव वर्ग भरवून व निरनिराळ्या चर्चापीठांना, अभ्यासमंडळांना उत्तेजन व साधनें पुरवून विद्यापीठें आपले अभ्यासक्रम जनतेपर्यंत पोंचविण्याची व्यवस्था करतात.

बहिःशाल शिक्षणासाठीं सुमारें ८ लक्ष विद्यार्थी नोंदलेले असून, पत्रव्यवहार व नफ्यावांचून चाललेला टेलिव्हिजन या साधनानें ३ कोटि लोक विद्यापीठांचें शिक्षण घेत आहेत.

प्रौढशिक्षणाची चळवळ तर एकाद्या फुललेल्या झाडाप्रमाणें देशभर बहरली आहे. १८२६ सालीं जोशिया होल्ब्रूक यांनें लिसिअम चळवळ नांवाची लोक-शिक्षणाची चळवळ सुरू केली. तेव्हांपासून शिक्षण हा एक सतत चालू असणारा संस्कार मानला पाहिजे या श्रद्धेचा अमेरिकन मनावर दृढ संस्कार झाला आहे. १८७४ सालीं 'शाउटाउका' ही लोकशिक्षणाची चळवळ निघाली. ती १९०४ पर्यंत इतकी वाढली कीं त्या संस्थेच्या तुकड्या साऱ्या देशभर प्रवास करूं लागल्या. अचानक एकाद्या रात्रीं एकाद्या मोकळ्या जागीं तंबू पडे, तेथें उघड्या-वर उन्हाळ्याचे वर्ग सुरू होत आणि श्रोत्यांना व्याख्यानें, गायनवादन, वाचन, प्रवासवर्णनें यांचा लाभ मिळत असे.

हल्लीं प्रौढशिक्षण निरनिराळ्या गांवांतल्या सार्वजनिक शाळेंत दिलें जातें. रात्रीं शाळा मोकळ्या असतात आणि शाळेंतल्या शिक्षणाच्या सोयी व साधनें प्रौढांना उपयोगी आणतां येतात. या शाळा संध्याकाळीं, रात्रीं भरतात. ३० लक्षांहून अधिक प्रौढ विद्यार्थी या वर्गासाठीं नोंदलेले असून या वर्गांत सतारवादनापासून गणितशास्त्रापर्यंत, धातुकामापासून स्पॅनिश भाषेपर्यंत सर्व कांहीं शिकविलें जातें.

सर्व प्रकारच्या संस्था निरनिराळे शैक्षणिक कार्यक्रम करतात. वाय्. एम्. सी. ए., वाय. डब्ल्यू. सी. ए., कामकरीसंघ, शेतकरीसंघ, तसेंच व्याख्यानें देणें, महान् ग्रंथ वाचणें, आंतरराष्ट्रीय विषयांची चर्चा करणें इत्यादि विविध कामांसाठीं स्थापलेल्या खास संघटना, अशा सर्वांमार्फत विविध शैक्षणिक कार्यक्रम होतात. शेतीखात्याच्या ज्ञानविस्तार शाखेतर्फे सत्तर लक्ष ग्रामीण लोकांना शेतीविषयक वाङ्मय पुरविलें जातें व प्रयोग दाखविले जातात. त्यांना शेतीसुधारणेचे प्रयोग दाखविले जातात. सभांतून शेतीविषयक प्रश्न शेतकऱ्यांना समजून दिले जातात. शेतकरी ४ एच क्लबांचे सभासद होतात (**हॅंड** म्हणजे हात, **हार्ट** म्हणजे हृदय, **होम** म्हणजे घर, **हेल्थ** म्हणजे आरोग्य या चार इंग्रजी शब्दांचा आद्यवर्ण **एच** हा आहे त्यावरून ४ एच क्लब हें नांव या संस्थांना दिलेलें आहे.) या क्लबांमार्फत खेड्यांना करमणुकीचीं साधनें आणि शेती सुधारण्याच्या योजनाहि पुरविल्या जातात. खेड्यापाड्यांत फिरतीं वाचनालयें जातात. ढकलगाड्यांवरून शेतकऱ्यांसाठीं अगदीं नवीं पुस्तकें, जुनें अभिजात वाङ्मय वगैरे पुरवलें जातें.

सार्वजनिक ग्रंथालयें सात हजार असून त्या स्वतंत्रपणें शिक्षण संस्थाच आहेत.

या ग्रंथालयांतून घरीं नेण्यासाठीं पुस्तकें देतातच, शिवाय वाचकांना हवे असणारे विचार व माहिती वाचकांनीं शोधावी कोठें, याबाबत मार्गदर्शन करतात, विशिष्ट ग्रंथावर व्याख्यानें देववितात, मुलांसाठीं गोष्टींचे तास ठेवतात, चर्चामंडळें करवितात, ध्वनिमुद्रिका भाड्यानें देतात, सिनेमा दाखवितात, वाचनीय ग्रंथांच्या यात्रा भरवितात, क्लबांचे कार्यक्रम ठरविणाऱ्या अधिकाऱ्यांना मदत करतात, आंधळ्यांना वाचतां येणाऱ्या टपोऱ्या छापांतलें वाङ्मय पुरवितात, ग्रंथालयांतील सभांच्या खोल्या सांस्कृतिक कार्यक्रमांना देतात, स्थानिक इतिहास, वंशावळी, कला वगैरे संबंधींचें संदर्भसाहित्य ठेवून तें लोकांना वापरायला देतात.

अमेरिकेंतल्या प्रौढशिक्षणाचा एक पायाभूत असा भाग हा असतो कीं परदेशांतून अमेरिकेंत वसाहतीसाठीं आलेल्यांना 'अमेरिकन' बनविण्याचा तो कार्यक्रम असतो. फार मोठ्या संख्येनें विदेशी लोक अमेरिकेंत येऊं लागले तेव्हांपासून हा कार्यक्रम सुरू झाला असून अमेरिकन जीवनांतल्या सवलती कशा अनुभवाव्या हें त्यांत शिकविण्यांत येतें.

सार्वजनिक शाळेंत सायंकाळीं भरणाऱ्या वर्गांत इंग्लिश भाषा, अमेरिकन इतिहास, भूगोल, राज्यकारभार वगैरे विषयांचा अभ्यास केला जातो. हे वर्ग ऐच्छिक असतात. पण अनेक शाळा म्हणजे काय हें येथें पहिल्यानेंच माहीत होतें. ज्ञान मिळविण्याचा हक्क म्हणजेच लोकशाही हें सत्य त्यांना येथें कळतें.

इतक्या व्यापक सोयी शिक्षणासाठीं असूनहि शिक्षण मिळण्याचा लोकशाही हक्क सर्वांना मिळावा या बाबतींत अमेरिकेला अपयशच आलें आहे. कारण निरनिराळ्या शिक्षणाच्या सोयींबाबत विषमता आहे. कांहीं राज्यांत शाळांची पद्धति फार चांगली आहे तशी इतरत्र मुळींच नाहीं. दक्षिण प्रदेशांत निग्रोंच्या शिक्षणाची फारच गैरसोय आहे. सुप्रीम कोर्टाच्या १९५४ व १९५५ सालच्या निर्णयापूर्वी दक्षिण प्रदेशांत निग्रो आणि गोरे यांच्यासाठीं वेगळ्या शाळा होत्या. आतां अशा वेगळ्या शाळा कायदेशीर नाहींत. पण या विभक्त शाळा बंद करण्यासाठीं दीर्घकाल व दुःखदायी प्रयत्न करावा लागेल.

## लोकशाहीप्रधान राष्ट्रांचें शिक्षण

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत विशेष हुरूप वाटण्यासारखी गोष्ट शिक्षणाच्या क्षेत्रांत अमेरिकेंत घडली आहे ती म्हणजे आंतरराष्ट्रीय शिक्षणाची आलेली मोठी लाट ही होय. २५ हजार विदेशी विद्यार्थी आणि १५ हजार विशिष्ट विषयांचे अभ्यासक अमेरिकेंत अभ्यास करीत असून सुमारें १० हजार

अमेरिकन परदेशांत शिकत आहेत. फुलब्राइट कायदा, स्मिथमुंड्ट कायदा, एज्युकेशनल एक्स्चेंज ॲक्ट व इतर अनेक कायदे यांनीं फेडरल सरकारची मदत आंतरराष्ट्रीय विद्यविनिमयाच्या कार्यास दिली असून जगाच्या इतिहासांत याबाबत एवढा मोठा कार्यक्रम अन्यत्र नाहीं. इन्स्टिटयूट ऑफ इंटरनॅशनल एज्युकेशन ही एक ऐच्छिक संस्था आहे. ती अमेरिकन व विदेशी लोकांना अभ्यासाच्या योजना पुरविते. कालेजें व विद्यापीठें विदेशी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिपा देतात. त्यामुळें शिक्षणाचा खर्च भागतो.

या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवघेवीच्या कार्यात कॉलेजें व विद्यापीठें भाग घेतात त्याचप्रमाणें हायस्कुलांतील तरुण, कामगार, धंदे व शेती यांचे प्रतिनिधि, निरनिराळ्या यांत्रिक व शास्त्रीय क्षेत्रांतले तज्ज्ञ हेहि भाग घेतात. फेडरल सरकारच्या शिक्षण खात्यानें शिक्षक, पुढारी व तज्ज्ञ यांच्यासाठीं खास कार्यक्रम चालू केलेले असून सुमारें ८ हजार लोक त्याचा फायदा घेत आहेत. परदेशांच्या सार्वजनिक शाळांत शिकण्यासाठीं अमेरिकनांना पाठविलें जातें व अमेरिकेंतल्या लहान गांवांत शिक्षण घेण्यासाठीं परदेशीय येतात. तीन हजार लोक या देवघेवींत आले गेले आहेत. फेडरल सरकारमार्फत जगांतील शैक्षणिक प्रवृत्तींची माहिती मिळवून तीहि पुरविली जाते.

हल्लीं बहुतेक कॉलेजात परदेशीं विद्यार्थी असतात व तेथें जाऊन आसपासचीं माणसें त्या विद्यार्थ्यांपासून त्याच्या त्याच्या देशाविषयीं अधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतात. अमेरिकेंत मोठ्या शहरापासून वा किनाऱ्यापासून दूर असलेल्या एखाद्या लहान शहराला यामुळें एकदम दुसऱ्या दूरच्या देशाची अधिक माहिती मिळते. परदेशी विद्यार्थ्यांनाहि या देशांतल्या लोकांचा परिचय वाढून आपणांस दुसरें घर मिळालें असेंच वाटतें. अशा विद्यार्थ्यांसाठीं उन्हाळ्यांतले वर्ग चालविण्यांत येतात. तेथें त्याना भाषेची उजळणी करतां येते, अमेरिकन जीवनावर व्याख्यानें ऐकता येतात, अमेरिकन विद्यार्थ्यांशीं चर्चामंडळांत भाग घेतां येतो आणि आसपासच्या समाजाच्या जीवनाशीं समरस होतां येतें.

अमेरिकेची शिक्षणावर अतिशय श्रद्धा आहे. अमेरिका असें मानते कीं माणसाला ज्ञानलालसा असून चांगलें काय तें समजून घेणें व तसें वागणें हें माणसाला हवें असतें, ज्ञानानें माणसाचे प्रश्न समजतात, अडचणी निवारतां येतात, आणि आपल्या उद्दिष्टाच्या आड येणारे दुराचारहि ज्ञानानें दूर करतां येतात. अमेरिकेनें आपलें हें शिक्षणविषयक मत जसें स्वदेशाच्या उभारणींत

वापरलें तसेंच तें आंतरराष्ट्रीय व्यवहारांतहि अमेरिका वापरते. अमेरिकन शाळेचें वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रयोग व स्थानिक नियंत्रण या दोन गोष्टी होत. तेंच तत्त्व आंतरराष्ट्रीय व्यवहारालाहि लावून नियंत्रण न करतां सहकार्य आणि विविधतेंतहि सलोखा आपण साधूं शकतों असें अमेरिका मानते. पण विविधता असूनहि सलोखा राहण्यासाठीं कल्पनांची सतत देवघेव हवी असते. शिक्षणांत जो नवा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन अमेरिकेंत निर्माण झाला आहे त्यानें ही देवघेव होत राहील.

अमेरिका सध्यां सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या मध्यप्रवाहांत असून अमेरिकन इतिहासांतला हा विशेष हुरूपाचा काल आहे. सांस्कृतिक ऱ्हासाचा पुरावा कोठें दिसत असला तरी वरील वस्तुस्थिति त्यानें मुळींच बाधित होत नाहीं. पूर्वी सुसंस्कृति ही फक्त वरिष्ठ वर्गाचीच ठेव असे, पण आतां ती परिस्थिति राहिली नाहीं. आतां सुसंस्कृति सर्वांना मिळत आहे. याचे परिणाम काय होतात ते पुढें एका प्रकरणांत येणार आहे.

'बुद्धिवादी' हा शब्द वापरण्याचा अमेरिकनांना नेहमीं संकोच वाटतो. समाज हा भंगलेला असून समाजांत वर्गकलह असतो हें सांगण्यासाठीं मार्क्सनें हा शब्द वापरला. त्यांत वर्गश्रेष्ठत्वाची कल्पना आहे. पण ती अमेरिकनांना मान्य नाहीं. तरीपण नवीन कल्पना मांडणाऱ्याला अमेरिकेंत पूर्वी केव्हांहिपेक्षां आज अधिक मान देतात. राज्यकारभारांत निवळ अजमासावर कांहीं गोष्टी केल्या जात. पण आतां तत्त्ववेत्ते, अर्थशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ हे सर्वजण एक राज्यशास्त्र बनवीत असून आतां अजमासाऐवजीं शास्त्राला महत्त्व येत आहे. अमेरिकन हे प्रचंड प्रमाणांत मध्यमवर्गीयच आहेत. त्यांना विद्या आणि शास्त्रीय पद्धति यशदायी असतात हें कळून आलें असून विद्या व शास्त्र यांना ते मान देऊं लागले आहेत आणि यशस्वी जीवनाला त्यांची गरज आहे ही गोष्ट ते मान्य करीत आहेत. ज्ञान ही शक्ति असून आता सर्वविध्वंसी शक्ति प्राप्त होण्याइतकें ज्ञान वाढलें आहे, त्याबरोबरच हें जग आतां वांचवावें कसें हें कळण्याला आणखी ज्ञान मिळविण्याची प्रेरणाहि आजवरच्या ज्ञानानें दिली आहे.

अमर्याद क्षितिजांचें जग हें अमेरिकनांचें सनातन स्वप्न आहे. यंत्रशास्त्रानें अशा जगाचा दरवाजा खुला केला आहे. आपल्याच पिढींत हें स्वप्न सत्यसृष्टींत येणार हें पाहून कांहींसे आश्चर्यचकित होत्साते अमेरिकन लोक थोडेसे सावधपणें त्या दाराच्या उंबरठा चढत आहेत. आणि मार्गदर्शनासाठीं ते शिक्षक, शास्त्रज्ञ व

कलावंत यांच्या साहाय्याची अपेक्षा करीत आहेत. शाळांच्या आजच्या विशिष्ट पद्धतींत विद्यार्थ्यांचा एवढा मोठा महापूर आला आहे कीं शाळांच्या आजच्या पद्धतींचा पायाच उखडला जाणार नाहीं ना अशी भीति वाटते. पण याच क्रमांत सबंध अमेरिकन समाजाला एक शैक्षणिक अनुभव जो मिळणार आहे त्यामुळें आतां शिक्षणाकडून अमेरिका मागें वळणार नाहीं.

## प्रकरण नववें

# राजकारण

अमेरिकन राजकारण व राजकीय पक्ष हे तत्त्वावर आधारलेले नसून हित-संबंधावर आधारलेले आहेत. अमेरिकेंतले प्रमुख राजकीय पक्ष हे 'लिबरल' आहेत अथवा 'कॉन्झर्व्हेटिव्ह' आहेत असें त्यांचें वर्गीकरण हें चुकीचेंच आहे, ते दोन्ही प्रकारचे आहेत अथवा कोणत्याच प्रकारचे नाहींत. इंग्लंडसारख्या देशांत पक्षनांवाला जो ऐतिहासिक अर्थ असतो तो अमेरिकेंतील राजकीय पक्षांच्या नांवाला मुळींच नाहीं. अमेरिकेंतले राजकीय पक्ष अनेक हितसंबंधांचीं जुडगीं असतात. पुन्हा पुन्हा हे हितसंबंध अलग होतात व नवे त्यांच्या जागीं येतात. उद्योगधंदेवाले व मजूर यांमध्यें कलह आहे हें म्हणणें बिनचूक नव्हे. कारण धंदेवाल्यांत परस्परविरोधी गट असतात आणि मजुरांतहि परस्परविरोधी गट असतात. कांहीं लहान धंदेवाले व मोठे धंदेवाले यांचेमध्यें हितविरोध असतो. कांहीं धंद्यांना जकातीचे दर जास्त असणें हिताचें असतें तर कांहींना कमी असणें हिताचें असतें. धंदे व मजूर या दोघांनाहि उत्पादनवाढ हवी असते. पण मजुरासंबंधींच्या कायद्याबाबत त्यांचा मतभेद असतो.

याचा परिणाम असा होतो कीं उत्पादन संघटनेंतच विरोध आणि कलह उत्पन्न होऊन राहतात व सर्व संघटना गुंतागुंतीची होते. या अंतर्गत हमरीतुमरी-मुळें आम्ही अमेरिकन टणक व पिळदार मनोवृत्तीचे होतों. एकमेकास आपली शक्ति दाखविणें, दमदाटी देणें, तडजोड करणें, दिरंगाई करणें, गोंगाट करणें, फाजील मागण्या करणें व त्यासाठीं आरडाओरडा करून आपली अवश्य ती मागणी पदरांत पाडून घेतांना आपण खूप स्वार्थत्यागास तयार झालों असा आव आणणें, अशा गोष्टींत आपल्यांतील अंतःकलहामुळेंच आम्ही तरबेज होतों. सॅम्युअल लुबेल म्हणतो त्याप्रमाणें आम्ही आपसांत लढून एकजूट होतों यांतच

आमच्या लोकशाहीचें सामर्थ्य आहे. या पद्धतीनें वाढत्या लोकसंख्येचें वाढतें हित साधतें असा अनुभव आहे.

राजकीय पुढाऱ्याचें मुख्य काम या परस्परविरोधी हितसंबंधांचें स्वरूप समजून घेऊन व त्यांचा संयोग घडवून कुणाला फाजील सवलती मिळूं न देतां सर्वांचें समाधान घडवून आणणें हें आहे. विदेशी निरीक्षकाला आमच्या राजकीय जीवनांत तत्त्वज्ञानच नाहीं असें वाटतें. याचें कारण त्या त्या परदेशांतील लोकांच्या पक्क्या तत्त्वनिष्ठ भूमिका असतात याची त्यांना संवय लागलेली आहे. विशिष्ट बांधीव योजनांनीं प्रश्न सुटतात अशी त्या त्या देशांत लखोटबंद विचारसरणी असते. अमेरिकनांचें मत असें आहे कीं प्रत्येक प्रश्न हा आपल्यापरी वैशिष्ट्यपूर्ण असतो, त्याचें वैशिष्ट्य लक्षांत घेऊन त्याला योग्य अशा प्रकारेंच तो सोडविला पाहिजे. कारण त्या त्या प्रश्नात त्याच्या सोडवणुकीचें बीज असून योग्य प्रकारें हाताळल्यास त्यांतून समाधकारक उत्तर मिळतें.

पण अमेरिकेच्या राजकारणपद्धतींत तत्त्वज्ञान नाहीं असें दिसत असलें तरी सुद्धां त्या पद्धतीमागें कांहीं मूलभूत सिद्धान्त आहेत असें अमेरिकन लोक गृहीत धरून चालतात. हे सिद्धात असे :—

(१) अमेरिकन सरकार हें लोकांचें, लोकांसाठीं, लोकांनीं चालविलेलें सरकार आहे. त्या सरकारला प्राप्त होणारी सत्ता लोकांपासून मिळते व लोकांच्याच हातीं राहते. वेळोवेळीं लोक ती सत्ता निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या हवालीं करतात आणि घटना बदलण्याच्या आपल्या अधिकाराअन्वयें सत्तेचे नियम बदलतात.

(२) ही सत्ता कोणत्याहि अतिपवित्र व अपरिवर्तनीय अशा शब्दप्रामाण्यांतून निर्माण होत नाहीं, तर बुद्धिवादांतून निर्माण होते. हा बुद्धिवाद अमुक एका ध्येय-वादावर अथवा तत्त्वावर भरंवसा न ठेवतां नवी नवी परिस्थिति जशी राहील तसें तिच्याशीं जमतें घेणारा आहे. "अमेरिकेंत सोशॅलिझम् गुप्तपणें सरपटत सरपटत येत आहे" अशी तक्रार अमेरिकन लोक सदा करीत असतात. पण कोणताहि अडलेला प्रश्न सोडवितांना ते सोशॅलिस्ट, कॅपिटॅलिस्ट, कोऑपरेटिव्ह अथवा हुकुमशाही अशा कोणत्याहि मार्गाचा जरुरीप्रमाणें अवलंब करण्यास भीत नाहींत.

(३) सार्वजनिक व्यवहारांत लोकांचा नैतिक निर्णय हा सर्वांत अधिक मार्ग-दर्शक ठरतो, अशी अमेरिकनांची श्रद्धा आहे. ही श्रद्धा कांहींशी ध्येयवादि-त्वाची द्योतक आहे. पण अलीकडे लोकमताचे अंदाज (ओपीनिअन पोल) जे घेतले जातात त्यावरून ही श्रद्धा खरी ठरली आहे. पुष्कळदां कॉंग्रेसमधील लोकप्रतिनिधींच्याहि पुढें लोकमत गेलें असल्याचें त्यांत दिसून येतें.

(४) सरकार हें हवेंच. पण ती एक आपत्तीच आहे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. सरकार हें सदा आपलें क्षेत्र वाढवीत राहणार, म्हणून त्याच्याशीं सदा लढलें पाहिजे व त्याचें सतत नियंत्रण केलें पाहिजे. आपापल्या स्थानिक पातळीवर लोक आपल्या हिताच्या गोष्टी जितक्या स्वतां स्वेच्छेनें करतील तितकी सरकारची सत्ता कमी भयानक होईल. "समाज हा माणसांच्या सद्गुणांनीं निर्माण होतो तर सरकार हें माणसांच्या दुर्गुणांनीं निर्माण होतें." हें टॉम पेनचें मत आम्हांला मान्य आहे. 'स्थानिक' व 'ऐच्छिक' यावर आम्ही जो भर देतों त्याचा खरा हेतु 'सामाजिक' विषयाला 'राजकीय' स्वरूप येऊं नये हा असतो.

(५) अनेकांनीं एकमेकासारखें वागणें हें आम्हांला बरें वाटतें. पण जुन्या सारखेपणाविरुद्ध बंड करून आम्ही नवा सारखेपणा निर्माण करीत असतो. आज सरकारचें कर्तव्य म्हणून गृहीत धरली जाणारी प्रत्येक बाब एका काळीं एकांतिक जहाल अशी मागणी मानली गेली होती. बालमजुरांविषयींचे कायदे, चढत्या श्रेणीचा प्राप्तीवरील कर, अँटी ट्रस्ट कायदे, बेकारविमा, वगैरे गोष्टी या जातीचीं उदाहरणें होत. रस्त्यावर गाड्या हाकणाऱ्याला रोज फक्त १२ तास काम असावें ही मागणी थिओडोर रूझवेल्टला फार जहाल मागणी वाटली होती. अमुक एक कार्यक्रम आमची प्रस्तुत गरज भागवितो असें दिसलें कीं आम्ही त्याच्या तात्त्विक भूमिकेचा विचार न करतां तो स्वीकारतों. धंदे, मजूर, शेतीचें उत्पन्न, कामाचे तास व मजुरीचे दर, चलनफुगवट, आंतरराष्ट्रीय तह वगैरेच्या नियंत्रणासाठीं उपाय शोधतांना त्या त्या उपायांच्या तात्त्विक भूमिकेपेक्षां परिणामकारकतेकडे आम्ही अधिक लक्ष देतों.

(६) स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यानें आम्हांला जन्मतःच समानतेचें आश्वासन दिलें व राज्यघटनेनें तें आश्वासन पूर्ण केलें आहे. म्हणून अमेरिकनांना वर्गलढा कधीं लढावा लागलाच नाहीं. अमेरिकेच्या तत्त्वज्ञानांत भाजलेल्या विटांसारखे घट्ट वर्ग बसतच नाहींत. जादा सवलती जेथें दिसतात तेथें त्या आहेत हें अमेरिकन लोक मान्य करतात, पण त्यांना त्या सवलतींची भीति वाटत नसून चढाओढीला तें आव्हान आहे असें ते मानतात. 'श्रीमंतांचे वाडे आज ना उद्यां जर आपणाला राहायला मिळणार आहेत तर मग ते पाडतां काय म्हणून?' या दृष्टिकोनामुळें, ज्यांना विशेष सवलती आहेत त्यांच्या त्या सवलती सर्वांनाच उपलब्ध होतील अशा प्रकारें सुधारणा घडवून आणली जाते. सामाजिक क्रांतीच्या ऐवजीं आम्ही विकास घडवून आणतों. ही सुखानें प्रगति करणें आम्हांला शक्य होते याचें कारण येथील विपुल साधनसंपत्ति आणि आमची मानवसंपत्ति.

सुदैवानें आमचा स्वभाव एका विशिष्ट प्रकारचा झाला आहे. आम्ही ऐच्छिकपणें संघटना करतों आणि हिंमतीनें काम करतों, यामुळें जुनें उद्‌वस्त करून आरंभापासून नवें न उभारता जुन्याच्या पायावर नवें उभारून आम्ही सामाजिक प्रगतीचा प्रत्येक टप्पा गांठत असतों.

यामुळें अमेरिकेंत लढे आणि क्षोभ यांचे प्रसंग येत असूनसुद्धां आमच्या राजकीय जीवनाखालून स्नेहाचा एक प्रवाह वाहत असतो. गव्हर्नर लहान शहरांत येतो आणि भाषण करतो त्यांत तो म्हणतो, "तुमच्या-माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या दृष्टीनें परिस्थिति चांगली झाली पाहिजे." तो स्वतांला सामान्य माणूस असें कसें मानतो? तो हें मनापासून बोलत असतो. हें स्वाभाविकच आहे. तो कदाचित् परदेशांत जन्मलेला असतो. त्याचा बाप इथें वसाहतीस आला. त्याच्याबरोबर हा येथें आला. तेथून मग तो आर्थिक शिडीनें वर चढला व नंतर राजकीय शिडीनेंहि वर वर चढला. मग आपणहि सामान्य माणसांतले आहों ही आठवण तो कशी विसरेल?

आम्ही भांडतों तेव्हांहि भांडणांतल्या विरोधी पक्षांत मुख्य मुद्द्याबाबत मतैक्य असतें. आम्ही समान आहों या मुद्द्याबाबत एकमत असतें. फक्त ही समानता कशाबाबत आहे एवढा मतभेदाचा मुद्दा असतो. मार्क्सनें प्रतिपादलेला वर्गकलह हा एक (कम्युनिस्टांच्या) हाडीं मुरलेला भ्रम आहे ही गोष्ट आम्हांला पूर्णपणें स्पष्ट झालेली आहे. हा संभ्रम हें समाजव्यवस्थेचें रास्त वर्णन होय असें सरळ बुद्धीचीं माणसें कसें मानतात हें आम्हांला कळत नाहीं. माणसें समान आहेत याबाबत सर्वमान्यता, सतत झगडा आणि या झगड्यासाठीं वरचेवर सोबती बदलणें, हा आमच्या प्रत्येक अडचणीच्या निवारणाचा उत्कृष्ट मार्ग असतो. हाच मार्ग इतरांनींहि कां अनुसरूं नये हें आम्हांला कळत नाहीं.

(७) सत्ता ही भयानकच असते, ती स्थान, ग्राम, राज्य, संघ अशा निरनिराळ्या विभागांत विभागली जाणें, अनेक ऐच्छिक संघटनांत, अनेक राजकीय पक्षांत विभागली जाणें हें श्रेयस्कर होय. शक्य तेथें सार्वजनिक कार्य हें ऐच्छिक व निर्वेतन असावें. खुद्द सरकारांतहि जागोजाग ताण आणि तोल लावून सत्तेची आणखी विभागणी केलेली आहे.

लिंकननें म्हटलें आहे, "जनतेला जी गोष्ट घडून यावी असें वाटतें, पण स्वतां जी गोष्ट जनता मुळींच करूं शकत नाहीं अथवा एकेकट्यानें व्यक्ति या नात्यानें जरूर इतक्या चांगल्या प्रकारें करतां येत नाहीं अशी गोष्ट घडवून आणणें हें सरकारचें कर्तव्य असतें." बहुधा सार्‍या अमेरिकनांची सरकारबद्दल हीच वृत्ति आहे.

## राजकीय पक्ष

राज्यघटनेंत राजकीय पक्षांना स्थान नाहीं. म्हणून सदर पक्षांना आपले नियम आपणच करावे लागले. हे नियम सरकारी कायद्यांशीं सुसंगत असावे लागतात. (संघसरकारनें निवडणुकीसाठीं केलेले जे कायदे असतात त्यांचाहि पक्ष-संघटनांशीं थोडाफार संबंध येतोच.) पक्षसंघटनांची जी पद्धति बनली आहे ती अगदीं ढिली आहे. उदाहरणार्थ, पक्षाचा सभासद कोण म्हणावयाचा? एकूण मतदारांपैकीं ७० टक्के लोक कोणत्या ना कोणत्या पक्षाचे सदस्य असतात. पण पक्षसदस्य म्हणून ते काय करतात? बहुतेक जण प्राथमिक व सार्वत्रिक निवडणुकींत मतें देतात, कदाचित् स्थानिक कचेरीसाठीं उमेदवार निवडतांना पुढाऱ्यांच्या सभेला हजर राहतात, अथवा अध्यक्षनिवडणुकीसाठीं माजलेल्या धामधुमींत राजकीय मेळाव्याला हजर राहतात, याहून पक्षसदस्य कांहींहि काम करीत नाहींत.

सरकार या संस्थेचे घटक जसे खालून वर रचलेले असतात तसेच पक्षहि खालून वर संघटित होत आलेले असतात. प्रत्येक स्थानिक पक्षघटक आपला आपण स्थापन झालेला असतो. तोच आपली कमिटी केवढी असावी हें ठरवितो, स्थानिक कचेरीचे पदाधिकारी कोण असावे तें आपण ठरवून त्यांना निवडून आणतो.

प्रत्येक पातळीवर वरच्या पातळीवरून कोणतेहि आदेश न घेतां आपापल्या क्षेत्रांतला व्यवहार आपणच उरकण्याला प्रत्येक पक्षशाखेला मोकळीक आहे. प्रत्येक राज्यप्रदेशांतील पक्षशाखेला आपले नियम आपणच बनवितां येतात. गव्हर्नरपद, कॉंग्रेसचें सदस्यत्व अथवा इतर पदाधिकार यासाठीं उमेदवार त्या त्या राज्यांतील पक्षशाखा स्वतंत्रपणें निवडतात. पक्षांच्या राष्ट्रीय कार्यकारिणीला राज्यशाखांवर शिस्त चालविण्याचे अधिकार नसतात. कॉंग्रेससदस्यत्वासाठीं कोण उमेदवार घ्यावे हें अध्यक्ष ठरवूं शकत नाहीं. रूझवेल्टनें १९३८ सालीं असा प्रयत्न केला पण तो फसला. राष्ट्रपतीच्या पक्षांतले पण त्याच्या धोरणाला विरोधी असेहि उमेदवार कॉंग्रेसच्या निवडणुकीला त्या पक्षातर्फे उभे राहून निवडून येतात.

अमुक एक माणसाला पक्षांतून काढून टाकलें असें कधींच होत नाहीं. पक्षांतून कोणालाहि काढून न टाकतां सर्वांना संभाळून घ्यायचें हें अमेरिकन पक्षाचें लक्षण आहे. प्रत्येक पक्ष ही अनेक भिन्नहितसंबंधीयांची मोठी मोट असते. फक्त निवडणुकीसाठीं हे हितसंबंध एका पक्षांत येतात. राष्ट्रपतिपद आपल्या पक्षाकडे

आणणें हें फार मोठें वैभव मानलें जातें मतदार हे मजूर अथवा शेतकरी, कॅथॉलिक अथवा प्रॉटेस्टंट, निग्रो अथवा इतर वंशाचे, उत्तरीय अथवा दाक्षिणात्य, मध्यपश्चिमेंतलें अथवा दूरपश्चिमेंतलें, आर्थिक धंदेवाले अथवा बौद्धिक व्यवसायवाले, श्रीमंत अथवा गरीब, लिबरल अथवा कॉंझर्वेटिव्ह, आंतरराष्ट्रीय अथवा राष्ट्रीय मनोवृत्तीचे, असे परस्परविरुद्ध भूमिकांचे असतात. प्रत्येक प्रमुख पक्षाला या प्रत्येक गटांपैकीं कांहींना तरी आपली भूमिका पटवावी लागते.

लोकांच्या प्रत्येक पक्षांकडून पुढीलप्रमाणें परस्परविरोधी अपेक्षा असतात. त्या त्या पक्षाच्या सरकारनें अमेरिकेला युद्धापासून दूर राखलें पाहिजे, त्याचबरोबर युद्ध आलेंच तर तें जिंकण्याची तयारी ठेवली पाहिजे, मतदारांचें हित अधिकाधिक केलें पाहिजे, त्याचबरोबर कर कमी करण्याचें आश्वासन दिलें पाहिजे, अर्थसंघटना तेजींत ठेवली पाहिजे पण चलन फुगवट टाळली पाहिजे, शेती-धंद्यांचा नफा टिकविला पाहिजे पण अन्नधान्याच्या किंमती वाढवितां कामा नये, कम्युनिझम व उलथापालथ दडपली पाहिजे पण नागरिकस्वातंत्र्य कायम टिकविलें पाहिजे, आणि या सर्व गोष्टी प्रत्येक पक्षानें दुसऱ्या कोणत्याहि पक्षापेक्षां अधिक चांगल्या केल्या पाहिजेत. अर्थात् या बाबतींत आश्वासनें देणें हा प्रत्येक पक्षाच्या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग असतो.

पण मग या पक्षाच्या कार्यक्रमांत फरक असतो तरी कोणता? डी टॉकेव्हिलच्या मतें, एक पक्ष लोकांची सत्ता मर्यादित करूं पाहतो तर दुसरा ती अधिक विस्तृत करूं पाहतो इतकेंच. अमुक एक पक्ष मजुरांची बाजू घेणारा आहे व दुसरा तसा नाहीं हें म्हणणें बरोबर नव्हे. कमी मिळकतीच्या लोकांचा ओढा त्यांतल्या त्यांत डेमोक्रॅटिक पक्षाकडे असतो हें खरें आहे. पण कामगार संघटनांनीं अमुक एक पक्षास मतें द्या असा संघटित आदेश दिला तरी वैयक्तिक कामगार अशीं गटांनीं मतें देतात असें आढळून येत नाहीं. कामगार अथवा इतर कोणतेहि आर्थिक गट परस्परविरोधी अशा दोन्ही पक्षांकडून मतासाठीं आर्जवें करून घेण्याला शिकले आहेत.

मतदाराना सामान्यतः वाटतें कीं डेमोक्रॅट्सना नियंत्रणें अधिक हवीं असून ते सरकारी खर्च वाढवितात, तर रिपब्लिकनांना नियंत्रणें कमी हवीं असून अधिक काटकसर हवी असते. (पण हा सुटसुटीत वाटणारा फरक अलीकडील बजेटांनीं खोटा पाडला आहे.) मंदीची भीति वाटूं लागली कीं डेमोक्रॅटांना अनुकूल काल येतो तर आर्थिक भरभराटीचा काल आला कीं रिपब्लिकनांची लोकप्रियता वाढते. मतदार हा कामगार, आर्थिक धंदेवाला अथवा बौद्धिक व्यवसायांतला अथवा

शेतकरी, कोणीहि असो, आर्थिक तेजीमंदीबद्दलची त्याची ही प्रवृत्ति सारखीच असते. रिपब्लिकन हे उत्पादनवाढीवर भर देतात, डेमोक्रॅट्स हे धनाच्या वांटणीवर भर देतात. तरी पण प्रत्येक पक्षाला निवडणूक जिंकण्यासाठीं मध्यम व कमी मिळकतीच्या लोकांचीं मतें जास्तींत जास्त प्रमाणांत मिळवावीं लागतात. म्हणून या पक्षांचे मतभेद तत्त्वावर नसून तपशिलावर होतात. दोन्ही पक्ष 'न्यू डील' पद्धतीचे कायदे हवे म्हणणारे असून प्रत्येक पक्षांत आतां लिबरलांचें वर्चस्व आहे.

अमेरिकेंतील पक्षांना विशिष्ट ध्येयनिष्ठा नसल्यानेंच त्यांच्या ठिकाणीं स्थैर्य आहे. त्यामुळेंच दक्षिण प्रदेशांतले कॉंझर्वेटिव्ह डेमोक्रॅट्स व उत्तरेंतलें लिबरल हे एकाच पक्षाचे राहूं शकतात आणि तरीहि एकाद्या मुद्द्यावर आपापला पक्ष सोडून कॉंझर्व्हेटिव्ह रिपब्लिकनांच्या बाजूनें मत देऊं शकतात. शिवाय अमेरिकेची पद्धति ही विभिन्नांचा अन्वय बसविणारी आहे. ध्येयवाद हे मध्ययुगीन किल्ल्यासारखे अथवा फ्रान्सच्या मॅजिनो लाइनसारखे असतात. त्या युद्धभूमिकाच असतात. पण अमेरिकन पक्षपद्धति प्रवाही आहे. तिच्या स्वरूपांत नेहमीं बदल होतात, भोवतालच्या परिस्थितींत होणाऱ्या बदलाचा परिणाम त्या पक्षपद्धतीवर होतो. अमेरिकन पक्ष हे जग कसें असावें यासंबंधींच्या तत्त्वज्ञान्यांच्या स्वप्नासारखे नसून लोकांच्या आकांक्षांचे ते आरसे असतात.

अमेरिकन राजकारणांत एकांतिक डावे अथवा एकांतिक उजवे पक्ष कां नाहींत? याचें कारण कोणत्याहि एका टोकाचे मतदार जवळजवळ नाहींतच. सामाजिक दृष्टीनें अमेरिकेनें वर्गभेद नाहींसे तरी केले आहेत अथवा त्यांची उपेक्षा तरी केली आहे. शिवाय अमेरिकन अर्थसंघटनेचे फायदे अधिकाधिक लोकांना मिळत राहिले आहेत.

अमेरिकन मुत्सद्दी ध्येयवादाची फिकीर करीत नाहींत. मत देणारी जी जनता तिच्या मनाच्या कलाकडे ते पाहतात. शहरांत त्या त्या पक्षांच्या ज्या प्रचंड निवडणूकयंत्रणा असतात त्या राष्ट्रीय पक्षांची पर्वा करीत नाहीत. शहरांतील गरिबांचे—बहुधा परदेशांतून वसाहतीसाठीं येणाऱ्या वांशिक अल्पसंख्यांचें—हित साधून त्यांनीं आपलें सामर्थ्य वाढविलेलें असतें. कदाचित् त्यांनीं अल्पसंख्यांची सामाजिक विघटना थांबविली असेल तर तें त्या अल्पसंख्यांचें महत्त्वाचें हित होय. पण याबरोबरच शहरांतल्या या पक्षयंत्रणांनीं शहरी गुन्हेगार टोळ्यांच्या गुप्त संघटनाशीं संबंध ठेवून दुष्कर्महि केलें आहे. सामाजिक दुर्गुणाचा धंदा करणारे, पोलिसांनीं आपल्या वाटेस जाऊं नये म्हणून त्यांना हप्ते देणारे,

दुकानें लुटलीं जाऊं नयेत म्हणून त्यांना 'संरक्षण' देण्यासाठीं दुकानदाराकडून हप्ते घेणारे व असे हप्ते न देणाऱ्यांचीं दुकानें फोडणारे, राजकीय पुढाऱ्यावर कांहींतरी आळ आणून तो जाहीर करण्याची धमकी पुढाऱ्यांना देणारे, असे अनेक फुकटखाऊ गुंड व गुन्हेगार शहरांतील या बड्या पक्षयंत्रणेवर पोसले जातात, हा मात्र या शहरी पक्षयंत्रणेचा मोठा दोष असतो. राष्ट्रभर पसरलेली पक्षसंघटना शहरांतल्या शाखेच्या या दुष्कर्मांबद्दल त्या शाखेचें पारिपत्य करूं शकत नाहीं. कारण शहरी शाखा या राष्ट्रीय पक्षसंघटनेच्या मदतीवर अवलंबून नसतात. संघसरकारच्या कांहीं जागा या शहरी संघटनेंतल्या लोकांना हव्या असतात. पण ज्या कॉंग्रेसउमेदवारांना शहरी पक्ष संघटनेचा पाठिंबा हवा असतो त्यांना संघसरकारच्या कांहीं महत्त्वाच्या जागा शहरी संघटनेच्या पदरांत टाकाव्याच लागतात.

हा साचा बदलतो आहे का? तो बदलतो आहे असें वाटतें. सामाजिक सुरक्षितता आतां निःपक्षपातीपणानें व अगदीं सार्वत्रिकपणें वांटली जात आहे. यामुळें अमुक एका बड्या माणसाच्या प्रासंगिक मेहरबानीचें महत्त्व कोणास वाटत नाहींसें झालें आहे. या समाजकल्याणक्षेत्रावर बड्या लोकांचें वर्चस्व मुळींच राहत नाहीं. शिक्षण वाढतें आहे, राहणीचें मान वाढतें आहे, शहरांतील गर्दींतून माणसें उपनगरांत जात आहेत, यामुळें शहरांतील पक्षयंत्रणेचें सामर्थ्य घटत चाललें आहे.

## अध्यक्षपदाचा उमेदवार निवडणें

प्रत्येक पक्षाची कन्व्हेन्शन (पक्षपरिषद) ही पूर्वीं लोकांच्या दृष्टिपथापलीकडे असून लोकांना तीसंबंधानें एक गूढ कुतूहल असे. आतां ही कन्व्हेन्शन टेलिव्हिजनमुळें प्रत्येक घरांत शिरली आहे. याचा कन्व्हेन्शनवर परिणाम होतो व लोकांवरहि होतो. कौटुंबिक बैठकींत राजकारणाची चर्चा होऊं लागते व उमेदवार निवडण्याच्या कन्व्हेन्शनच्या कामांत प्रत्येक मतदार भाग घेऊं लागतो, यामुळें राजकीय सोयीगैरसोयीच्या दृष्टिकोनावर लोकांच्या आवडीनिवडीचा परिणाम होतो आणि मतदारालाहि राजकीय कार्यपद्धतीची माहिती झाल्यानें अधिक जाणतेपणानें तो मतदान करतो.

राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निवडण्यासाठीं प्रत्येक पक्षाची ही जी 'सर्कस' भरते तें एक चमत्कारिक दृश्य असतें. तींत निवडणुकीचें आधुनिक तंत्र असतेंच, त्याचबरोबर रानटी टोळ्यांचें हें युद्धनृत्य तर नव्हे ना असाहि भास

व्हावा इतक्या विक्षिप्तपणें सभासद मांडतात, एकमेकांच्या गळ्यांत गळा घालतात, बडेजावी भाषणें करतात, सूक्ष्म डावपेच खेळतात. कांहीं वेळ ही सर्कस अगदीं रसाळपणें चाललेली असते तर कांहीं वेळ तिजबद्दलची सर्वांची उत्सुकता अतिशय वाढलेली असते. खरोखर या कन्व्हेन्शनच्या वाक्पीठावरील ही सर्व रंगत अवश्य आहे का ?

या पद्धतीचा एक उपयोग होतो. पक्ष एकजूट ठेवून निवडणूक जिंकूं शकेल असा उमेदवार निवडण्याला लोकमताचा पाठिंबा मिळविण्यासाठीं जें नाट्य हवें असतें तें या पद्धतीनें मिळतें. सिगरेटच्या धुरानें भरलेल्या त्या खोलींत राजकीय सौदेबाजी कशीहि चालत असली तरी लोकांच्या आकांक्षांचा भंग तेथले मुत्सद्दी करूं शकत नाहींत. उमेदवार निवडायचा तो निवडणूक जिंकील असाच असावा लागतो, म्हणून तो लोकांच्या पसंतीचाच निवडावा लागतो. बहुधा तो खूप लोकसंख्या असणाऱ्या राज्यांतला उमेदवार असतो. कारण त्यामुळें त्याला खूप मतांचा पाठिंबा एकदम आरंभालाच मिळतो. पुष्कळदां त्या राज्याचा तो गव्हर्नरहि असतो. पुढें राष्ट्रीय सरकारांत त्याला जे प्रश्न सोडवायचे असतात तसले प्रश्न लहान स्वरूपांत त्यानें तेथें सोडविलेले असतात. आजवरचा प्रत्येक राष्ट्रपतिपदाचा उमेदवार उत्तर युरोपीय वंशांतला प्रॉटेस्टंट पुरुष होता. पण अलीकडे दक्षिण व पूर्व युरोपीय वंशांतलीं माणसें, तसेंच कॅथॉलिक पक्षीय लोक गव्हर्नरपदापर्यंत चढले असून याच क्रमानें राष्ट्रपतिभवनांतहि जातील.

राष्ट्रपतिपद हें फारच मूल्यवान् मानलें जात असल्यानें कन्व्हेन्शनमधला गोंगाट व झगमगाट राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निवडण्यांतच बहुतेक खर्च होतो. त्याच्या बरोबर निवडणुकीस उभा राहणारा त्याचा सोबती उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार हा कन्व्हेन्शनच्या शेवटीं सारे जण दमून घरीं परतण्याच्या तयारींत असतात अशा घाईत निवडला जातो. राष्ट्रपति लिबरल असेल पण उपराष्ट्रपति कॉन्झर्व्हेटिव्ह अथवा त्यांच्या पाठिंब्याचा असूं शकेल. हा विजोडपणा पक्षांतली एकजूट टिकविण्यासाटीं निर्माण करतात. राष्ट्रपति अधिकारावर असतांनाच मेला तर उपराष्ट्रपतीला राष्ट्रपतिपद मिळतें. ती संधि पक्षांतील अल्पसंख्यांना द्यावी असा खेळाडू हेतूहि यांत असतो.

या कन्व्हेन्शनमध्यें ठरावसमितीनें तयार केलेला पक्षाचा कार्यक्रमहि मांडला जातो. तो कार्यक्रम आंखतांना विविध गटांत एवढा लढा होतो कीं, शेवटीं तयार होणारा कार्यक्रम कुणालाहि धक्का लावणारा नाहीं इतका निरुपद्रवी होतो.

हल्लीं राष्ट्रपतिपदाचा उमेदवार हा फार मोठा यशस्वी राजकारणी असल्यानेंहि

भागत नाहीं. तो चाणाक्ष मुत्सद्दी व पक्षांत एकजूट घडवून आणूं शकणारा असावा लागतो. त्याला दुर्दम आत्मविश्वास असूनहि तो नम्र असावा लागतो, आनंदी असूनहि तो मोठा दर्जेवान् असावा लागतो, कळकळीचा असूनहि धूर्त असावा लागतो, माहितगार असावा लागतो, पण अगदीं करवती बुद्धीचा असून चालत नाहीं; त्याच्या ठिकाणीं सहानुभूति असावी लागते, पण तो मऊ असून चालत नाहीं, जगांतील सर्वोच्च आसनावर आणि सामान्य लोकांच्या अंतःकरणांत सारख्याच सहजतेनें बसूं शकणारा असा तो असावा लागतो.

## निवडणुका व निवडणूक मोहिमा

स्थानिक अधिकाऱ्यांच्या निवडणुका दरसाल होतात. काँग्रेसमेन आणि राज्याधिकारी यांच्या निवडणुका दर दोन वर्षांनीं होतात. पण दर चार वर्षांनीं (लीप ईयरला) होणारी निवडणूक ही फार महत्त्वाची असते. लीपईयरमुळें खेळाचा एक दिवस वाढला असेंच जणूं मानून बेसबॉल अथवा एकादें द्वंद्वयुद्ध पाहण्याच्या उत्साहानें ही राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवितात. आपल्या उमेदवारानें निकरानें लढलें पाहिजे अशी लोकांची अपेक्षा असते. राष्ट्रपतिपदाची निवडणूक ही मोठी निष्ठुर, दम उखडणारी लढत असते. इतिहासांत रोमन ग्लॅडिएटर्स आपसांत द्वंद्वयुद्ध करीत आणि त्या द्वंद्वांतून विजयी होणारा टायटन हाच आपला नेता होऊं शकतो असें ते मानीत. अमेरिकेंतील राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीमागें ही विचारसरणी आहे. जय अथवा अपजय त्यांनीं उमदेपणानें स्वीकारला पाहिजे अशी लोकांची अपेक्षा असते.

सर्व अमेरिकनांना राजकीय निवड करण्याची संधि देणारा प्रसंग राष्ट्रपतिपदाची निवडणूक एवढाच आहे. त्यावेळीं राष्ट्रीय स्वरूपाचे प्रश्न वादाच्या रंगणांत येतात, नवे गट बनतात, पुढील चार वर्षांतील नवी हमरीतुमरी व नवी तडजोड यांतून राष्ट्राला एकजुटीनें खास नेऊं शकणारें नवें एकमत यावेळीं तयार होतें. एकेका राज्यांत ज्या उमेदवाराला 'सामान्य लोकांचें बहुमत' (पॉप्युलर व्होट) मिळतें त्या राज्यांतील सर्व 'मतदारमतें' (इलेक्टोरल व्होट) त्याच उमेदवाराला मिळतात, अशी मतदान पद्धति आहे. यामुळें मोठ्या घटकराज्यांत होणारा लढा फार निकराचा असतो.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्याच वर्षी दुसऱ्याहि कांहीं अधिकारपदाचे उमेदवार निवडणूक मोहीम चालवीत असतात. यामुळें पक्षसंघटनांच्या सर्व पातळीवर सर्व देशभर उमेदवारांची प्रचारमोहीम चाललेली असते. ते मतदारांचीं

दारें ठोठावतात, मतदारांच्या बालकांचे मुके घेतात, शाळांच्या, क्लबांच्या, सभांच्या मेळाव्यांच्या अनावरणप्रसंगीं भाषणें करतात. आपण ज्यांना मतें द्यावीं अशी अपेक्षा केली जाते ते उमेदवार आहेत तरी कोण हें पाहण्याची लोकांची इच्छा असते. दोन पक्षांच्या मध्यरेषेवर असणारे मतदार जो उमेदवार आपल्याशीं हस्तांदोलन करील त्याच्या बाजूनें मत देतात. लोक आपसांत जें बोलतात त्याचाहि त्यांच्या मनावर परिणाम होत असतो. पण याहिपेक्षां मतदाराची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमि त्यांच्या मनावर अधिक परिणाम घडविते.

उत्तर प्रदेशांत जुन्या युरोपीय वंशांतले प्रॉटेस्टंट हे बहुधा रिपब्लिकनांना मतें देतात, तर कॅथॉलिक व नवीन वसाहतवाले डेमोक्रॅटांना मतें देतात. निग्रो हे परंपरेनें रिपब्लिकन, पण रूझवेल्टच्या कार्यक्रमामुळें डेमोक्रॅट पक्षाकडे झुकलेले होते; आतां ऐसेनॉरच्या अमदानींत त्यांचे नागरिकहक्क वाढल्यानें कांहीं अंशीं पुन्हा रिपब्लिकन पक्षाकडे वळले आहेत. हल्लीं दोन्ही पक्ष सारख्याच प्रमाणांत अंतर्गत फुटींत सांपडले असून तरंगत्या मतदारांची संख्या फार वाढली आहे, यामुळें निग्रोंच्या मतानें निवडणुकांचा निर्णय ठरण्याचा संभवहि वाढला आहे.

परदेशांतून येणाऱ्या नव्या नव्या वसाहतवाल्यांचीं मुलें हळूहळू प्रगतीची शिडी चढतात, शहरांतल्या गलिच्छ वस्तींतून बाहेर पडून उपनगरांत जातात, आर्थिक धंदेवाले होतात अथवा बौद्धिक व्यवसायांत शिरतात आणि मध्यम वर्गांत मोडूं लागतात. हा मध्यम वर्ग अधिकाधिक दरिद्री होत गेला पाहिजे या मार्क्सच्या सिद्धांताची दखल न घेतां अधिक चांगल्या घरांत राहूं लागतात, अधिक मोठ्या मिळकती कमावतात, आपल्या मुलांना अधिक शिक्षण देतात. हळूहळू प्रथम ते पूर्वेकडील शहरांचें व नंतर राज्यांचें राजकारण आपल्या नियंत्रणाखालीं घेतात. रूझवेल्टच्या अमदानींत यांनीं संघसरकारांत मोठ्या अधिकाराच्या जागाहि कमावल्या होत्या.

दक्षिण प्रदेशांत डेमोक्रॅटिक पक्षाला पाठिंबा देण्याची परंपरा असतां अलीकडे रिपब्लिकनांना पाठिंबा वाढूं लागला. यामुळें बाकीच्या सर्व प्रदेशाप्रमाणें दक्षिणेंतहि दोन्ही पक्षांना सरमिसळ पाठिंबा मिळूं लागेल. पश्चिम व उत्तर प्रदेशांत शेतकऱ्यांचीं मतें न्यूडीलच्या काळांत रिपब्लिकनांकडून डेमोक्रॅट पक्षाकडे झुकूं लागली होती. पण हल्लीं तीं मतें जरी दोन पक्षांत जवळजवळ समान विभागलीं गेलीं आहेत तरी निश्चित झालीं आहेत. कामगारांना अजून डेमोक्रॅट पक्षाबद्दल कृतज्ञता वाटते. पण तेहि मध्यमवर्गीय होत असून मतदानाबाबत मध्यमार्ग अवलंबत आहेत. त्यांचे पुढारी त्यांना डेमोक्रॅट पक्षालाच मतें द्या

असा आदेश देतात तरी ते रिपब्लिकनांना मतें देऊं लागले आहेत. कामगारांची आर्थिक स्थिति सुधारत असल्यानें ते राजकीय दृष्ट्या सावध होत आहेत आणि कामगारसंघटनांना राजकारणांत गैरवाजवी सामर्थ्य मिळूं दिलें जाईल अशी स्वतः कामगारांनाच आतां भीति वाटूं लागली आहे.

मजुरीचे दर वाढत असल्यानें कारखानदार व कामगार यांमधील अंतर कमी होत असल्याचें सर्वत्र दिसून येत आहे. लोकांचें वैभव वाढत असून मध्यम वर्ग जनतेंतील वाढता बहुसंख्य वर्ग झाला आहे. आधुनिक काळांत देशांतील मोठा राष्ट्रीय रस्ता जसा सर्वत्र सारखाच चांगला असतो त्याप्रमाणें समाजजीवनांतला सर्व रस्ता सर्वत्र सारखाच चांगला असून समाजरस्त्याच्या कडेला आतां गटारें राहिलींच नाहींत.

डेमोक्रॅट व रिपब्लिकन हे दोन पक्ष आमच्या इतिहासाबरोबरच वाढले आहेत. आमचे भिन्न भिन्न धर्म, वंश, धंदे, भूगोल यांमुळेंहि आमची मूल्यपद्धति खोल रुजलेली आहे. दर चार वर्षांनंतर जी राष्ट्रपतिपदाची निवडणूक होते तिचा मुख्य उपयोग हा आहे कीं धंदे, प्रदेश, वंश वगैरे कितीहि बाबतींत जरी आमचे भेद असले तरी मूलतत्त्वाबाबत आम्ही दृढतेनें एकजूट आहों याची आठवण ही निवडणूक आम्हांला करून देते. निवडणुकीचा लढा जो प्रचंड प्रमाणावर होतो त्यामुळें युक्तिवाद करण्याचें व मतभेदाचें स्वातंत्र्य आम्हांस आहे हें सिद्ध होतें. त्या निवडणुकीचा धडाका जो दिसतो त्यामुळें आमची विविधता व भव्यता सिद्ध होते. निवडणुकींत जी उष्णता निर्माण होते तीवरून परकी कल्पनांना आव्हान देऊन त्यांना ठोकून काढण्याचें सामर्थ्य आमच्यांत आहे हें दिसून येतें. प्रत्येक पक्ष दुसऱ्याशीं इतक्या निकरानें लढतो कीं जणूं कांहीं तो दुसरा पक्ष आमच्या प्रजासत्ताकाचा पायाच उखडतो आहे अशी प्रत्येक पक्षाला भीति वाटते. यावरून आमच्या पसंतीच्या जीवनपद्धतीला जर धोका उत्पन्न झाला तर आम्ही त्या पद्धतीच्या रक्षणासाटीं लढायला सिद्ध होऊं अशी हमी मिळते.

निवडणुकीची मोहीम संपली आणि अमुक उमेदवार विजयी होणार एवढें निश्चितपणें कळण्याइतकीं मतें मोजून झालीं म्हणजे ज्या उमेदवाराचा पराभव झालेला असतो तो देशांतील जनतेपुढें उभा राहून विजेत्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचें आश्वासन देतो. हा विजेता आतां पराभूताचा ‘ शत्रु ’ राहत नसून अचानकपणें तो राष्ट्ररक्षक बनतो. मध्ययुगांतील राक्षसाचें राजकन्येनें चुंबन घेतांच तो जसा सरदार बनत असे त्याप्रमाणें बहुमतानें माळ घातलेला आक्रमक राक्षस आतां अचानक राष्ट्ररक्षक बनतो. १९५६ सालीं राष्ट्रपतिपदाची निवडणूक

आपण हरलों असें ॲडलाय स्टीव्हन्सन याला कळतांच तो म्हणाला, "ज्या कारणांनीं आमच्यांत मतभेद होतो त्या कारणांपेक्षां ज्या कारणांनीं आम्ही एकजूट राहतों तीं कारणें अधिक खोल आहेत. आज रात्रीं आपण रिपब्लिकन किंवा डेमोक्रॅट्स राहिलों नसून आपण सर्व अमेरिकन आहों." याप्रमाणें निवडणुकीचा लढा संपतांच आम्ही जखमा बांधतों, युद्धांतील पडापडीनें माजलेलें गदळ काढून टाकतों, एकजूट होतो आणि पुन्हा आमच्या धंद्याला लागतो.

## घटकराज्यें व राज्यघटना

आमचें संघराज्य स्थापन होण्यापूर्वी व्हरमॉट व मूळचीं १३ राज्यें अशीं एकूण १४ राज्यें होतीं. व्हरमॉट, टेक्सस व कॅलिफोर्निया हीं राज्यें संघराज्यांत येण्यापूर्वीं स्वतंत्रसत्ताक राज्यें होतीं. मूळच्या तेरा राज्यांनीं राज्यघटनेवर सह्या केल्या त्यापूर्वीचा त्यांचा १८० वर्षांचा इतिहास आहे. या १८० वर्षांत या १३ राज्यांनीं प्रांतिक असेंब्लीमार्फत आपापला कारभार केला. गव्हर्नर ब्रिटिश राजानें नेमलेला असे व प्रत्येक असेंब्लीचें त्याच्याशीं पुष्कळदां निकराचें भांडण होई. कधीं कधीं ब्रिटनचा मुळींच हस्तक्षेप होत नसे. या असेंब्लींत तेरा राज्यांना राज्यकारभाराचें शिक्षण चांगलें मिळालें व तें त्यांनीं घेतलेंहि चांगल्या प्रकारें. जेफर्सन, पॅट्रिक हेन्री, जॉन ॲडॅम्स यांजसारखे थोर मुत्सद्दी याच अनुभवांतून निर्माण झाले.

घटक राज्यांनीं संघसरकार जन्माला घातलें या नात्यानें संघसरकार हें घटक राज्यांचेंच अपत्य होय. एकादा वाढत्या शक्तीचा मुलगा आपली शक्ति वापरावी कशी हें कळत नसतांहि ती वापरीत सुटतो आणि आईबापांना तें पाहून त्याच्या भवितव्याची भीति वाटत असते, व मुलाच्या त्या दांडगाईच्या वर्तनाबद्दल तीं नाराज असतात असें घटकराज्यांना संघराज्याच्या वर्तनाबद्दल वाटत असतें. मुलगा आईबापांपेक्षां बडा व अधिक सामर्थ्यवान् होतो खरा, पण त्याला आईबापांबद्दल योग्य आदर दाखवावासें वाटत नाहीं. तो आईबापांवर देणग्यांचा वर्षाव करतो पण त्यांनीं आपल्या हुकुमतींत वागावें असें त्याला वाटत असतें.

राज्यसरकारांचें महत्त्व एकीकडून बलवान् मध्यसरकारानें नाहींसें केलें असून दुसरीकडून वाढत्या शहरांनींहि नाहींसें केलें असल्यानें घटकसरकारांना आतां पूर्वीचें महत्त्व उरलें नाहीं. पण फेडरल सरकारला न दिलेले सर्व अधिकार राज्यसरकारांचे कायम असतात. मतदानाचा हक्क नागरिकांना संघसरकाराकडून फारसा मिळत नसून राज्यसरकाराकडूनच मिळतो. नागरिकांना ज्या अनेक

प्रकारच्या निष्ठा हव्या असतात त्यांत राज्यसरकारबद्दलची निष्ठा ही एक प्रमुख निष्ठा आहे. ही निष्ठा खरीखुरी आणि बलवान् असण्याचा पुष्कळ संभव असतो. कारण राज्यप्रदेशांत नागरिकाचा जन्म झालेला असून तेथें त्याची कौटुंबिक परंपरा असते, अथवा अधिक चांगला प्रदेश या दृष्टीनें त्यानें नवी मातृभूमि म्हणून त्या प्रदेशाचा स्वीकार केलेला असतो अथवा तेथल्या कारभारांत गुंतून राहिल्यामुळें त्याला आपुलकी वाटूं लागलेली असते.

राज्यकायदेमंडळें दर दोन वर्षांतून एकदां फक्त कांहीं थोडे महिने भरतात. यामुळें तेथें येणारे प्रतिनिधि बाकीच्या काळांत दुसरा उद्योग करणारे असतात व त्यांना कायदेमंडळास हजर राहण्यासाठीं जरूर तेवढ्या खर्चापलीकडे वेतन वगैरे कांहींहि दिलें जात नाहीं. या पद्धतीमुळें लांचलुचपतीला उत्तेजन मिळतें. कायदे-मंडळाचा एकादा सदस्य असें एकादें बिल तयार करील कीं त्यामुळें एकादा धंदा खूप खर्चांत येईल. आणि मग तो सदस्य तें बिल परत घेण्याच्या आश्वासनानें लांच मिळवूं शकेल. पण हल्लीं राज्यांच्या राजधानींतल्या बातम्यांना प्रसिद्धि खूप मिळते, डायरेक्टर ऑफ इंटर्नल रेव्हिन्यू या अधिकाऱ्याला आपली सारी प्राप्ति कळवावी लागते आणि लाचारीदाखल खटले होण्याची भीति असते. यामुळें सद्गुण वाढला नसला तरी सावधपणा वाढला आहे.

शाळांचा व शिक्षणाचा दर्जा ठरविणें, रस्ते बांधणें, कोर्टें, तुरुंग, सुधारणागृहें चालविणें, अंधगृहें, वेड्यांचीं इस्पितळें चालविणें, वृद्ध व बेकार यांचे भत्ते वांटणें, रोजगार नोंदकचेऱ्या चालविणें, गांवांत पोलीस व मोठ्या रस्त्यावर पहारे ठेवणें, सरकारी बागा, विद्यापीठें, ग्रंथालयें चालविणें, प्रवासी व नवीन धंदेवाले यांना आकर्षण उत्पन्न करणें, वीज वगैरे लोकोपयोगी सोयींचे दर ठरविणें, हीं व आणखी कितीतरी महत्त्वाचीं कामें राज्यसरकारें करतात. न्यूयॉर्कसारख्या मोठ्या राज्याचें बजेट बरेंच मोठें असतें आणि एक परराष्ट्र-संबंध सोडला तर असें राज्य लोकहिताचीं इतकीं कामें करतें कीं जगांतील अनेक स्वतंत्र राष्ट्रांनाहि तीं कामें करतां येत नाहींत.

सर्व राज्यसरकारांचें एक कौन्सिल असतें. तें राज्याराज्यामधील चढाओढ व गोंधळ नाहींसा करून परस्पर सहकार्य व सुव्यवस्था निर्माण करतें. हें कौन्सिल सर्व राज्यांतली शिक्षणपद्धति, मानसिक सुधारसंस्था व इस्पितळें, मोठ्या रस्त्यावरील सुरक्षितता, सरकारांची पुनर्घटना इत्यादि गोष्टींचा अभ्यास करतें. नद्यांचें नियंत्रण, जंगल वगैरेचें संरक्षण, शारीरिक दृष्ट्या असमर्थांना मदत करण्याबाबत सहकार्य, गुन्ह्यांचें नियंत्रण, रस्ते बांधणें वगैरेबाबत राज्या-राज्यांत

करार घडवून आणण्याचें काम इत्यादि कामें हें कौन्सिल करतें. संघसरकारशीं करावयाच्या सहकार्याबाबत कार्यक्रमांचें संयोजन करणें हें कार्य या कौन्सिलकडे असून सर्व देशभर नागरिक संरक्षण योजना उभारण्याची फार मोठी कामगिरी या कौन्सिलनें केली आहे. गव्हर्नरांची कॉन्फरन्स व राज्यसरकारचे इतर अधिकारी याच्या सहकार्यानें हें कौन्सिल काम करतें.

संघसरकारला लोकांवर कर बसविण्याचे अधिकार राज्यसरकारपेक्षां अधिक आहेत यामुळें लोकहिताच्या अनेक कार्यक्रमांना संघसरकारचा पैसा मिळतो व बजावणीचें काम राज्यसरकाराकडे सोपविलें जातें. या पद्धतीमुळें श्रीमान् राज्यांकडून अधिक पैसा घेऊन तो गरीब राज्यांवर खर्च केला जातो यामुळें राज्याराज्यांत समता निर्माण होत असून हा संघ सरकारचा अधिकार हें फार महत्त्वाचें समतानिर्मिति चक्र आहे. संघसरकारच्या उत्पन्नांतून बेकारभत्ता, रस्ते बांधणें, धंदेवाईक शिक्षण, शाळांच्या इमारती आणि इतर अनेक लोकहिताच्या योजना यांना पैसा मिळतो.

संघसरकारचे अधिकार राज्यघटनेनें स्पष्टपणें ठरवून दिलेले असून बाकीचे सर्व अधिकार राज्यसरकाराकडे अथवा लोकांकडे सोपविलेले आहेत. ही पद्धति बदलावी असें आतां कोणाला वाटत नाहीं. कारण राज्यघटना जरी अगदीं घट्ट व आंखीव आहे तरी पण तिचा अर्थ करण्यांत लवचिकपणा पाळला जातो. संघ सरकारच्या लोकांच्या किती प्रकारच्या सोयी करणें जरूर पडेल याची घटना-निर्मात्यांना मुळींच कल्पना नव्हती. पण रेल्वेच्या नियंत्रणापासून देशव्यापी पेन्शन योजनांपर्यंत लोकांच्या सर्व सुखसोयी संघसरकारच्या सर्वसमावेशक छत्राखालीं आल्या आहेत.

अमेरिकन लोकांची श्रद्धा अशी आहे कीं अमेरिकन घटनेच्या निर्मात्यांनीं सर्व भावी संकटांना तोंड देतां येण्याची तजवीज अमेरिकन राज्यघटनेंत केली आहे. या घटनेचा योग्य प्रकारें म्हणजे लवचिकपणानें अर्थ केला व क्वचित् प्रसंगीं त्या घटनेंत दुरुस्ती केली तर वेळोवेळच्या सर्व गरजा ही घटना भागवील. ही घटना सर्वस्वीं बदलण्याची इच्छा बाळगणें हा वेडेपणा अथवा नास्तिकपणा होय असें आम्ही मानतों. ही घटना म्हणजे राजकीय शहाणपणाचा अखेरचा शब्द होय असें आमचें मत आहे.

या राज्यघटनेला एवढा मान आम्ही कां देतों? आमची ही घटना स्पष्ट स्वरूपाची आहे. तो लिहून काढलेला दस्तैवज आहे. ती लवचिक असून नव्या परिस्थितीला जरूर इतकें जमतें घेण्याइतकी ती ताणतां येते. अत्यंत विभिन्न

अशा जनतेंत एकता निर्माण करण्याची जादूची शक्ति तिच्या अंगीं आहे. १७० वर्षांच्या अनुभवानें या राज्यघटनेची कार्यक्षमता सिद्ध केली आहे. एखाद्या वर्गीय सवलतीचा टोरी पुरस्कर्ता या घटनेच्या आधारानें बोलतो. सामाजिक उलथापालथीच्या आरोपावर खटला झालेला आरोपी लोखंडी चिलखताप्रमाणें या घटनेपासून संरक्षण मिळवितो. आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्य या घटनेनेंच दिलें हें शाळकरी मुलांनाहि माहीत असतें. वसाहतीसाठीं परदेशांतून येणाऱ्यांना आपणास नागरिकत्वाच्या सवलती देणारी सनद अशी ही राज्यघटना आहे असें वाटतें. साऱ्या जगभर संताप, तणातणी, उलथापालथी चालू असतां आमच्या पायाखालीं ही राज्यघटना मजबूत राहिली आहे. फॅसिझम् अथवा कम्युनिझम् यांनीं जगांतल्या इतर राष्ट्रांत माणसांचे जन्मसिद्ध हक्क काढून घेतले असतां अमेरिकन घटनेनें ते संभाळले आहेत, इतकेंच नव्हे तर आमची घटना कायम असेपर्यंत हे हक्क आमचे आम्हांला राहतील अशी या घटनेची आम्हांला हमीहि आहे. कार्यकारी सत्ता, कायदेकारी सत्ता व न्यायदायी सत्ता या सरकारच्या तीन शाखांत राज्यघटनेनें राज्यकारभारांतले ताण व तोल विभागून टाकले असल्यानें व्यक्तिस्वातंत्र्य व सुव्यवस्था यांचा अन्वय बसविण्याचा प्राचीन काळापासूनचा अवघड प्रश्न सोडविला जातो. त्याचप्रमाणें न्यायखात्यामार्फत फेरतपासणी करण्याचा जो न्यायकोर्टाला अधिकार आहे त्यामुळें जज्जांना आपलीं मतें कायद्याऐवजीं घटनेस अनुसरून बनवितां येतात.

अमेरिकन राज्यघटनेचा एक विशेष गुण असा आहे कीं राज्यसरकारांना आपापल्या नागरिकांवर जेवढा अधिकार आहे तेवढा सर्व अधिकार राज्यांच्या पासून स्वतंत्रपणें संघसरकारलाहि देशांतल्या सर्व नागरिकांबाबत आहे. लोकांच्या हातांतलें राजकीय साधन या दृष्टीनें संघसरकारच्या या अधिकाराला फार महत्त्व आहे. शिवाय सुप्रीम कोर्टामार्फत राज्याराज्यांतील वादांचे निर्णय ठरविण्याची सोयहि घटनेनें केली आहे.

प्रकरण दहावें

# राजकारणाचें नाटक

अमेरिकन राष्ट्रीय राजकारणाच्या या महानाटकांत काँग्रेस, राष्ट्रपति आणि असंख्य विविध हितसंबंध यांच्या प्रमुख भूमिका असतात. हे हितसंबंध इतके विविध असतात कीं माणूस घोटाळ्यांत पडतो. यापैकीं काँग्रेसवर सर्व बाजूंनीं जेवढा टीकेचा मारा होतो इतका दुसऱ्या कोणावरहि होत नाहीं. राष्ट्रपतीनें 'मंजूर करा' म्हणून विनंती केलेल्या योजना जर काँग्रेसनें तत्परतेनें मंजूर केल्या तर काँग्रेस ही राष्ट्रपतीचा फक्त रबरी शिक्का आहे अशी टीका होते. जर त्या योजनांबाबत दिरंगाई केली तर काँग्रेस ही 'नाकर्ती' आहे अशी टीका होते.

काँग्रेस जें कांहीं करते त्याची जबाबदारी अमक्या एकावर पडत नाहीं असेंच दिसतें. राष्ट्रपति काँग्रेसचें नियंत्रण करूं शकत नाहीं. कारण त्याच्या पक्षाला काँग्रेसमध्यें बहुमत असतें तेव्हांहि त्याचा पक्ष अनेक अल्पमतवाल्यांचा बनलेला असून त्यांतले कांहींजण अध्यक्षाच्या कार्यक्रमाला विरोधी असतातच. काँग्रेसमधील पक्ष व्यक्तिशः पक्षसदस्यावर आपला अमल चालू शकत नाहीं असें खऱ्या अर्थानें म्हणूं शकतात. सदस्य म्हणतात कीं आपल्या मतदारांच्या इच्छेप्रमाणें आपणांस मतदान करावें लागतें नाहींतर निवडणुकींत पराभव खावा लागेल. मतदारांचीं प्रतिनिधींवर येणारीं दडपणें असंख्य इतकेंच नव्हे तर परस्परविरोधीहि असतात. यामुळें ज्या खेळाचे नियम नेहमीं बदलले जातात अशा खेळांत खेळणाऱ्याची जी स्थिति होते ती काँग्रेससदस्याची असते. नेहमीं बदलल्या जाणाऱ्या सापळ्यांत उंदीर जसा घोटाळून जातो तसा नेहमीं बदलणाऱ्या लोकमतापुढें काँग्रेसमनहि घोटाळून जातो. काँग्रेसमेन आपल्या मतदारांना वादाचा मुद्दा नीट समजून सांगून शहाणपणाचे कायदे घडवून आणूं शकतात व तसें ते करतातहि. पण मतदाराचा वैयक्तिक स्वार्थ व्यापक हिताच्या

मतदाराला व्यापक हित दिसूं न देतां आंधळा करून टाकतो. परदेशांना मदत अथवा नागरिक हक्कांचें नियंत्रण इत्यादिविषयक कायदे मतदारांच्या वैयक्तिक हितास बाधक असले तर केवळ स्वार्थामुळें, व्यापक हितसंबंधाकडे डोळेझाक करून मतदार त्याला आपला विरोध कायम ठेवतात काँग्रेस ही मतदारांच्या मताचा आरसा असते आणि 'लोकांना जें सरकार मिळतें तें त्यांच्या लायकीप्रमाणें मिळतें' हा सिद्धांत यामुळें सिद्ध होतो.

पण काँग्रेस हा कांहींसा विकृत प्रतिबिंब देणारा आरसा आहे. कारण नेव्हाडा राज्याची लोकसंख्या १ लक्ष ६० हजार असून नेव्हाडाचे दोन प्रतिनिधि सीनेटमध्यें बसतात आणि न्यूयॉर्क राज्याची लोकसंख्या १ कोटि ४८ लक्ष असूनहि त्याचे दोन प्रतिनिधीच सीनेटमध्यें बसतात राज्यें हीं स्वयंसत्ताक असल्यानें तीं लहानमोठीं सारीं सारख्या दर्जाचीं मानलीं जातात याचें हें द्योतक आहे. पण लोकप्रतिनिधि सभेंतहि विषमता आहेच. कारण राज्यकायदेमंडळें काँग्रेसचे मतदारसंघ ठरवितात आणि राज्यकायदेमंडळें ग्रामीण भागास पक्षपात दाखवीत असल्यानें शहरांतील मतदार संघांत ग्रामीण भागाहून मतदार अधिक व प्रतिनिधि कमी असतात.

अमेरिकन राजकीय पद्धतींत जागोजाग अंतर्गत तेढ निर्माण केलेली आहे. सरकारच्या शाखांत परस्परतेढ असते, राजकीय पक्षापक्षांत असते,' एकेका पक्षांतील गटांत असते, काँग्रेस व राष्ट्रपति या दोघांत तेढ असते. काँग्रेस आणि राज्यकारभारांचीं खातीं, काँग्रेसच्या विविध कमिट्या यांमध्येंहि तेढ असते. दडपण आणणाऱ्या गटाकडून काँग्रेसवाले हैराण केले जातात. त्याना त्यांचे मतदार नेहमीं भेटायला येतात, त्याच्यापुढें काँग्रेसमनांना मान लववावी लागते; कमिट्यांच्या सभांना एकसारखें हजर राहावें लागतें, वृत्तपत्रप्रतिनिधींनीं त्यांना घेरलेलें असतें आणि डोंगराएवढे कागदपत्र वाचायचे पडलेले असतात.

पुष्कळ काँग्रेसमेन मोठे कायदेपंडित असून एकाद्या कायद्याकडे सामाजिक दृष्टीनें न पाहतां निव्वळ कायद्याच्या दृष्टीनें पाहतात. तरी पण हल्लीं कायद्यांतहि सामाजिक दृष्टिकोन बळावत असून कायद्याच्या विद्यार्थ्यांनाहि सामाजिक दृष्टिकोन अवश्य वाटूं लागला आहे.

या सर्व कारणांमुळें शिक्षणाला साहाय्य, नागरिक हक्क, अमेरिकेंत येणारे परदेशीय वसाहतवाले, इत्यादिविषयक राष्ट्रीय हिताचे कायदे करतांना आमच्या जागतिक दर्जाला साजेसें वागणें फार अवघड जातें स्थानिक हिताचे कायदे भरकन् पास करून घेतले जाऊं शकतात. दरसाल काँग्रेसच्या सुपांत (हॉपर) दहा हजार बिलें पडतात. त्यांतील पुष्कळ बिलें मंजूर होण्याची मुळींच आशा नसते.

पण स्थानिक लोकमताची समजूत काढण्यासाठीं ही सर्व कार्यपद्धति दिरंगाईची, किचकट आणि स्थानिक हितदृष्टीनें वागणारी झाली आहे. तरी पण तिचेहि कांहीं फायदे आहेत. काँग्रेसवर कोणाहि एका गटाचें नियंत्रण चालत नाहीं. आणि काँग्रेस लोकमताला प्रतिसाद देते.

लोकप्रतिनिधिसभेंतील परिणामकारक असें राजकीय नेतृत्व सभापति व बहुमताचा पुढारी या दोघांच्या हातीं असतें. सिनेटमध्यें अनुक्रमें या दोन जागांवर जे पदाधिकारी असतात त्यांच्यापेक्षां लोकप्रतिनिधिसभेंतल्या या दोन जागांवरील पदाधिकाऱ्यांची शक्ति मोठी असते. पण काँग्रेसपुढें बिलें कोणतीं यावीं याविषयींचे नियम बहुशीं समितीच ठरविते. यापलीकडे सत्ता आणखी किती विभागली जाते हें सांगतां येणार नाहीं. कारण सत्ता अंशतः कमिटीपद्धतींतून व अंशतः राजकीय पक्षांतून निर्माण होते. काँग्रेसच्या व्यासपीठावर जीं भाषणें होतात तो काँग्रेसच्या कार्यांतला अगदीं कमी महत्त्वाचा भाग होय. त्याचा मतदानावर कांहींहि परिणाम होत नसल्यानें त्याला वादविवादापेक्षां भाषणबाजीपुरतेंच महत्त्व येतें. काँग्रेसच्या रेकॉर्डांत तीं भाषणें येतात व त्यांतून पुनर्मुद्रित होऊन तीं लोकांपर्यंत पोंचतात एवढेंच महत्त्व त्यांना असतें. एक रशियन पाहुणा म्हणाला, "तुमची काँग्रेस किती चमत्कारिक आहे! एकादा माणूस बोलायला उभा राहतो पण कांहींच महत्त्वाचें सांगत नाहीं. त्याच्या बोलण्याकडे कोणाचें लक्षहि नसतें आणि तरीहि शेवटीं सर्वजण मतभेद व्यक्त करतात."

सिनेटमध्यें मात्र मन वळविण्याच्या युक्तिवादाला महत्त्व असून तेथील वादविवाद मनावेधक होतात. सिनेटमध्यें सौजन्याची एक विशिष्ट परंपरा असल्यानें तेथल्या भाषणांना एक विशिष्ट रुबाब असतो. हें सौजन्य एका टोकाला हार्दिक स्नेहापासून दुसऱ्या टोकाला सभ्यतापूर्ण व विनोदयुक्त अपमान अथवा गोड शब्दांतला फटकारा मारण्यापर्यंत कोणत्याहि प्रकारचें असूं शकतें. "अमेरिकन सिनेट हें जगांतील सर्वांत यशस्वी असें सभागृह होय" असें मत हॅरोल्ड लास्कीनें व्यक्त केलें होतें.

काँग्रेसचें खरें काम कमिट्यांतून चालतें. प्रत्येक बिल त्या विषयाच्या कमिटीकडे सोपविलें जातें. तेथें त्या बिलावर खूप मेहनत केली जाते. त्या त्या विषयांतले तज्ज्ञहि मदतीला घेतले जातात. कमिटींतून बिल लोकप्रतिनिधिसभेपुढें आलें म्हणजे सामान्यतः त्यांत महत्त्वाचे बदल होत नाहींत. सिनेटमध्यें मात्र महत्त्वाचे बदल होऊं शकतात. प्रत्येक कमिटी आपापल्या परी इतकी बलवान् असते कीं ती स्वतः लहानसें कायदेमंडळच असते. तिला न आवडणारें

बिल ती ठार करून टाकते. कमिटीच्या अध्यक्षाला एकादें बिल नको असल्यास तो त्या बिलासंबंधींचें कामकाज कित्येक महिने अथवा वर्षोगणती थबकून ठेवूं शकतो. कमिटीचें अध्यक्षपद सर्वांत जुन्या सभासदाकडे जातें, यामुळें जुन्या काळीं वसाहत होऊन स्थिर झालेल्या प्रदेशांतल्या व बहुधा कॉझर्व्हेटिव्ह प्रदेशांतल्या सभासदांकडे हें महत्त्वाचें काम जातें. जास्तींत जास्त जुने सभासद विशेष महत्त्वाच्या कमिट्यांवर सामान्य सभासद म्हणूनहि घेतले जातात आणि त्यांना नीट प्रकारें करतां येईल त्याहून अधिक काम त्यांच्यावर पडतें.

कमिट्यांच्या कार्यकारी बैठकी जशा भरतात तशाच त्या त्या बिलाचा पुरस्कार करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांच्या अथवा त्या बिलाशीं ज्यांचे हितसंबंध आहेत अशा लोकांच्या साक्षी घेण्यासाठींहि कमिट्यांच्या बैठका भरतात. येथेंहि कमिटीचा अध्यक्ष आपल्या धोरणानुसार वागून बिलाच्या निर्णयाबाबत पुष्कळ वजन आणूं शकतो. या साक्षी माहितीपेक्षां मतप्रचाराच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असतात. कारण वृत्तपत्रांत त्या बातम्या म्हणून झळकतात. जे साक्षी देतात त्यांना आपल्या मताचा प्रसार करण्याला ही संधि मिळते. तसेंच या साक्षींमुळें परस्परविरुद्ध मतें एकमेकांसमोर येऊन तडजोड होण्याला अनुकूलता निर्माण होते.

एकाद्या बिलाला कायद्याचें स्वरूप येण्यापूर्वीं तें दोन्ही सभागृहांपुढें यावें लागतें व दोन्ही सभागृहांत आपसांत असलेले मतभेद दूर व्हावे लागतात. खर्चाच्या अथवा दुसऱ्या कसल्या महत्त्वाच्या बाबतींत मतभेद फार मोठा असला तर तडजोड करणें फार कठिण होतें.

## लोकमताचा अभाव

कायदा करण्याच्या प्रत्येक टप्प्यावर, कोणताहि निर्णय घेण्यासाठीं लोकमताचा पाठिंबा असावा लागतो. हें लोकमत जागृत व संघटित करण्यासाठीं असंख्य व विविध संघटना आणि पद्धति असतात. सरकारची कृपा संपादण्याच्या कारवाया एका गटानें सुरू केल्या कीं तावडतोब प्रतिस्पर्धी गट पुढें येतात, मजूर, धंदेवाले, शेतकरी, प्रोफेसर्स, व्यापारी, माजी युद्धसैनिक, वांशिक अल्पसंख्य, भिन्नभिन्न धर्मांचे पुरस्कर्ते, नागरिक हक्कांचे पुरस्कर्ते, आंतरराष्ट्रीय व्यापारी, वगैरे विविध हितसंबंधांच्या संघटना याप्रमाणें निर्माण होतात व कॉंग्रेसच्या सभासदांवर वजन आणण्यासाठीं आपापले गट (लॉबी) ते स्थापन करतात.

अशा प्रकारें आपापल्या संघटनांमार्फत नागरिक हे सरकारवर व कायदे करण्याच्या कामकाजावर सतत वजन आणीत असतात. म्हणूनच निवडणुकांचें

महत्त्व मतदारांना फारसें वाटत नाहीं व निवडणुकांमध्यें अगदीं लज्जास्पद वाटण्याइतकें कमी मतदान होतें. (गेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत ७७ टक्के रजिस्टर्ड मतदारांनीं अथवा मतें देण्याच्या वयांत असलेल्या ६० टक्के मतदारांनीं मतें दिलीं. निरनिराळ्या हितसंबंधांच्या संघटना ज्या असतात त्यांच्या सभासदांवर त्या हितसंबंधांतल्या बड्या लोकांच्या मतांचाच प्रभाव फार पडतो हें खरें, पण या संघटना लोकशाही पद्धतीनें आपलीं कामें करतात. आपल्या सभासदांचीं मतें अजमावून तीं वर पाठवितात व त्याच्या आधारावर वरलीं धोरणें आंखलीं जावीं याची काळजी घेतात. या संघटनांच्या राष्ट्रीय कमिट्यांच्या सभांना हजर राहणें हें धनवंतांनाच परवडतें, यामुळें तेच लोक बलस्थानावर जाऊन आपणास अनुकूल असे निर्णय कांहीं प्रमाणांत साधून घेतात असें मात्र घडतें.

या संघटनांतच, विशेषतः त्या राष्ट्रीय पातळीवर संघटित झाल्या असल्यास, परस्परविरोधी हितसंबंध एकत्र आलेले असतात. यामुळें त्यांचें स्वयंनियंत्रणच होतें. उदाहरणार्थ अमेरिकेंत तेवीसशें चेंबर्स ऑफ् कॉमर्स असून उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत, मोठ्या शहरांत व लहान शहरांत एकाद्या अगदीं लहान क्षेत्रांतहि, अशा सर्वत्र या चेंबर्स विखुरल्या आहेत. यांतील धंदेवाले व व्यापारी यांच्यांत विरोध येऊन तेथें तेथें तडजोडी कराव्या लागतात. पुष्कळदां एकाद्या गटावर इतकीं अनेक विरोधी दडपणें येतात कीं आपल्या सभासदांच्या हितसंबंधास बाधक असें बिल तहकूब करण्याहून अधिक कांहींहि करणें त्यांना अशक्य होतें. परस्परविरोधी गटांचे खटपटे गट (लॉबीज्) एकमेकांच्या हालचालीवर पाळत ठेवतात व मग कोणालाच गैरफायदा मिळवितां येत नाहीं. राजकीय सत्तेचे याप्रमाणें लहान लहान तुकडे झाले आहेत, अनेक गटांत ती विभागली गेली आहे. कायदेमंडळानें या सर्व गटांशीं बोलणें करावें लागतें, सर्वांचें समाधान करावें लागतें. हितसंबंधी गटहि, एकसंध नसून, विविध लहान लहान हितसंबंधी गटांची मोळी असतात. यामुळें त्याचें मतदान परस्परविरोधी पडून अमुक एक पारडें मोठ्या गटामुळें जड होऊं शकत नाहीं.

पण दडपणें आणणाऱ्या गटांचे दडपणें आणण्याचे प्रकार विविध असतात. रेडिओ, टेलिव्हिजन, वृत्तपत्रें हे मार्ग वापरून आपल्या विचाराकडे ते लोकांचें लक्ष वेधून घेतात. या प्रचारांत आपलीच भूमिका न्याय्य व सयुक्तिक आहे असें पुनः पुनः ठासून सांगतात, प्रचंड लोकसंख्येचा या भूमिकेला पाठिंबा असल्यानें ती यशस्वी होणारच असें सांगत सुटतात. घोषणा, तोंडी कुजबूज, अनेक सह्यांचे अर्ज, पत्रें व तारा या मार्गांनीं कॉंग्रेसमधील विरोधकांवर हल्ले

यांचा धूमधडाक उपयोग केला जातो. प्रतिष्ठित लोकांविरुद्ध खऱ्याखोट्या कंड्या उठविण्यासहि ते कमी करीत नाहींत. एकाद्या गटाचा कॉंग्रेस, राष्ट्रपति, राज्यकायदेमंडळ येथपर्यंत हात पोंचू शकतो कीं काय ही गोष्टहि फार महत्त्वाची असते. एकाद्या राष्ट्रीय संघटनेला ज्या कायद्याबद्दल आपुलकी असेल त्या कायद्याच्या कमिटीचे अध्यक्ष व इतर सभासद यांच्याशीं स्नेहसंबंध ठेवण्यासाठीं ही संघटना अतोनात झटते. हे स्नेहसंबंध 'गाठीभेटी'नें मिळविले जातात, त्यांना मेजवान्या देण्यांत येतात, त्या कमिटीचा एकादा सभासद ज्या वकील कंपनींतला असेल त्या वकील कंपनीला कांहीं तरी कायद्याचें काम देऊन त्याला वश करून घेतलें जातें; कधीं कधीं कायदेशीरपेक्षां कमी दर्जाचे मार्ग, ते पचूं शकतील अशी खात्री असल्यास, वापरले जातात.

केव्हां केव्हां कायदेमंडळाचा एकादा सभासद एखाद्या गटाशीं हितसंबंधानेंच बांधलेला असतो. त्याचा धंदा, प्रादेशिक हितसंबंध, सामाजिक दर्जा, मैत्री व सर्वसामान्य विचारसरणी या सर्व कारणांमुळें त्याचा त्या गटाकडे कल असतो.

दडपणें आणणारे हे गट म्हणजे सामाजिक संकटें होत असें मानलें जातें. पण प्रामाणिकपणें सर्व परिस्थितीचें पृथक्करण केलें असतां दिसून येईल कीं, हें अनेक संघटनांचें गुंतागुंतीचें जाळें, हजारों विविध हितसंबंधांच्या रक्षणासाठीं दक्ष असणाऱ्या संघटनांचें असतें. यामुळें हवामान खात्याच्या माणसाला बॅरॉमिटर व अनिमॉमीटर पाहून हवामान कळतें त्याप्रमाणें कायदेमंडळाच्या सभासदाला या संघटनांमार्फत एकंदर लोकमत कळतें सरकारकडून सतत चालू असलेला प्रचंड खर्च, धंद्यांचें विशिष्टीकरण आणि भरभराट टिकविण्याची जबाबदारी सरकारची आहे हा सिद्धांत, या तीन कारणांमुळें राजकीय व आर्थिक अंगें गुंतावलीं जातात आणि सर्व बाजूंनीं येणारीं हीं दडपणें आर्थिक व राजकीय गाडा चालू ठेवण्याला कारण होतात.

रूझवेल्टनें शेती व उद्योगधंदे, श्रम आणि भांडवल, धनोत्पादन व धनोपयोग यांत समानता निर्माण केली, तेव्हांपासून श्रम, भांडवल व शेती यांनीं सारखेंच दडपण अर्थसंघटनेवर पाडलें आहे. या दडपणवाल्या गटाकडून ज्यांचें प्रतिनिधित्व केलें जात नाहीं असें लोकसंख्येंतले अनेक लहान विभाग बाजूस राहतात. परीटघडी मध्यम वर्ग, स्थलांतर करणारा कामगार वर्ग, अगदीं पोटापुरतें उत्पन्न असणारा शेतकरी हे ते विभाग होत. याना संघटना उभारण्याला अवश्य अशीं साधनें अथवा नेतृ व कांहींच मिळत नाहीं. पण संघटनेचा मार्ग सर्वांना खुला असून अनुभव असा आहे कीं स्वहिताबद्दल पुरेशी जाणीव झाली म्हणजे हे वर्गहि संघटना करतीलच.

सरकारला आर्थिक गटाशीं वाढते संबंध ठेवतां यावे यासाठीं सरकारच ऐच्छिक संघटनांना उत्तेजन देत आहे. याचें ठळक उदाहरण म्हणजे 'फार्म ब्यूरो' हें आहे. शेती खात्यानें उत्तेजन दिल्यामुळेंच ही संघटना निर्माण झाली. आतां शेतीविकासाच्या कार्यांत हा ब्यूरो इतका पुढें गेला आहे कीं सरकार व ब्यूरो यांमधील व्यवच्छेदक रेषा पुसूनच गेली आहे.

लोकमतदर्शन (ओपीनियन पोल) हें एक लोकमत अजमावण्याचें महत्त्वाचें साधन आहे. हल्लीं हें साधन इतकें कार्यक्षम झालें आहे कीं अमुक एका मुद्द्यावर लोकांना काय वाटतें तें बऱ्याच अचूकपणें त्यामुळें कळतें. जे मुळींच विचार करीत नाहींत असे लोक किती टक्के आहेत हेंहि यावरून कळतें. ही योजना मोठी आकर्षक असून लोकांचें मत तर तिनें बिनचूक कळतेंच, पण शिवाय, विशेषतः निवडणूकमोहिमांत, नवे प्रश्नहि लोकमतप्रदर्शनांतून निर्माण होतात. मतदारांत फार मोठी संख्या स्वतंत्रांची असून, आपण विजयी बाजूकडे असावें ही माणसाची नैसर्गिक इच्छा लक्षांत घेतां हीं मतदानदर्शनें प्रसिद्ध करण्यानें सार्वत्रिक निवडणुकींतील मतांचें पारडें फिरूं शकेल का? अशा 'दर्शनां'त दिसून येणाऱ्या लोकमतावर काँग्रेसमनानें कितीसें विसंबावें? सार्वत्रिक निवडणुकींत मतदान होण्यापूर्वी पुन्हा लोकमत बदललें नसेल कशावरून?

'चौकशी' हा एक वस्तुस्थिति शोधण्याचा काँग्रेसचा नाट्यपूर्ण मार्ग आहे. वस्तुस्थिति समजून घेणें हा या चौकशीचा जाहीर झालेला हेतु असला तरी एकादें संकट, आणीबाणीची परिस्थिति अथवा एकाद्या कमिटींतील ठळक व्यक्ति यांकडे लक्ष वेधणें हा खरा हेतु या चौकशीमागें असतो. या चौकशींत पुष्कळदां वाह्यात्, लज्जास्पद, अन्याय्य घटनाहि घडल्या आहेत. कित्येक आठवडे काँग्रेस व सारा देश यांना या घटनांनीं अस्वस्थ करून टाकलें आहे. पण एकंदरीनें अशा चौकशीकमिट्या जें काम करतात तें उपयुक्त व लोकहिताचें ठरतें.

आम्ही आमच्या समाजाकडून, शिक्षणपद्धतीकडून, आर्थिक संघटनेकडून अशक्य गोष्टींची अपेक्षा करतों, तशाच काँग्रेसकडूनहि अशक्य गोष्टी मागत असतों. मग आमची निराशा होते यांत आश्चर्य कसलें? उलट पुष्कळदां आमच्या इच्छा सफळ होतात हेंच आश्चर्य होय. आमची अपेक्षा असते कीं आमच्या काँग्रेसमनानें आमच्यासाठीं काम करीत राहावें, आमच्या पत्रांना उत्तरें धाडावीं, आमच्या लहानमान मागण्या पूर्ण कराव्या, आणि शिवाय काँग्रेसमध्यें व कमिट्यांच्या बैठकींना हजर असावें, वृत्तपत्रांशीं व आपल्या राहत्या गावाशीं संबंध ठेवावा, आम्ही बोलावूं तेव्हां परत येऊन एकादें व्याख्यान

द्यावें, बिलांचा ढिगारा तत्परतेनें अभ्यासावा, चौकशी समितीपुढील पुरावा अभ्यासावा, इतर जें सर्व साहित्य महापुराप्रमाणें त्याच्याकडे येते तेंहि त्यानें अभ्यासावें आणि इतकें सर्व केल्यावरहि विचारपूर्वक कायदे करण्याइतकी फुरसत त्याला उरावी.

काँग्रेसवर टीका करीत चकाट्या पिटणें हा आमचा घरगुती बैठा खेळ असून इतका आकर्षक खेळ दुसरा नाहींच. आम्ही या काँग्रेसचे बाप आणि आमचेंच हें पोर आमचें ऐकत नाहीं म्हणून आम्ही त्याच्यावर तुटून पडतों. पण तो पोरगा आमचें ऐकत नाहीं तें आमच्याच हितासाठीं. तो म्हणजे आम्हीच नव्हे का? आपण त्याला केला तसा तो झाला. आम्ही ज्यावेळीं काँग्रेसवर टीका करतों त्यावेळीं आम्ही आमचाच दोष स्वतःपुढें धरून त्यावर हल्ला करीत असतों. म्हणून काँग्रेसच्या प्रत्येक वर्तनांत आमचाच संबंध आहे असें आम्हांला वाटतें. आंतून विभिन्न असणाऱ्या समाजांतील मतभेद व विरोध काँग्रेसमध्यें एकत्र येतात व तेथें त्यांचें द्वंद्व होऊन जातें. पाप व त्याचें निराकरण याचें नाटक काँग्रेसमध्यें होत असतें. त्यांत जनतेचाहि भाग असतो. आणि काँग्रेसचें अधिवेशन हा अमेरिकन लोकांच्या त्या नाटकांतला एकेक अंक असतो. पडदा उघडून नाटक सुरू झाल्यापासून पेचप्रसंग व शेवटीं उकल येथपर्यंत तें कसें रंगतें हें पाहण्याइतका धीरच आम्हांला नसतो.

## राष्ट्रपतिपद

अमेरिकेचें राष्ट्रपतिपद हें साऱ्या जगांत अत्यंत सामर्थ्यवान् असें अधिकारपद होय ही गोष्ट आतां जगभर अनेकदां सांगितलेली व कांहींशी निरर्थकहि झालेली आहे. पहिल्यानें ही एक परस्परविरोधी घटना वाटते. जें राष्ट्र लोकशाही बहुमोल मानतें तेंच राष्ट्र आपल्या पुढाऱ्याला इतके पुष्कळ अधिकार देतें हें आश्चर्य नव्हे काय? पण वस्तुस्थिति अशी आहे कीं हे जे अधिकार राष्ट्रपतीला दिले आहेत ते लोकांवरील जबाबदारी राष्ट्रपतीवर ढकलण्यासाटीं नसून ते अधिकार हीं राष्ट्राच्या सामर्थ्याचींच कार्यें आहेत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या एकांतिक पुरस्कर्त्यांच्या संशयांचें समाधान करतां येईल इतकीं नियंत्रणें राष्ट्रपतींवर असून अतिशय सरळ अशा राष्ट्रपतीलाहि तीं नियंत्रणें जाचक होतील इतकीं तीं तीक्ष्ण व पुष्कळ आहेत.

राष्ट्रपति हा इतर माणसांसारखाच मर्त्य माणूस असून तो प्रथम, सर्व लोकांचा सर्व लोकांनीं निवडलेला सेवक असतो. तो संघराज्याचा अधिपति

असतो. पार्लमेंटरी पद्धतींत राजा अथवा अध्यक्ष हा सरकारचा औपचारिक प्रमुख असतो तसा अमेरिकन राष्ट्रपति हा अमेरिकन सरकारचा औपचारिक प्रमुख असतो. प्रमुख कार्यकारी अधिकारी या नात्यानें तो सरकार चालवितो. प्रमुख मुत्सद्दी या नात्यानें तो परराष्ट्रसंबंधांचा प्रमुख नियंता असतो. (पण परराष्ट्रविषयक धोरणें व आंतरराष्ट्रीय तह घडवून आणण्यासाठीं त्याला काँग्रेसवर विशेषतः सिनेटवर अवलंबून राहावें लागतें.) तो सशस्त्र दळांचा सरसेनापति असतो. तो कायद्याचीं बिलें काँग्रेसपुढें आणतो, काँग्रेसला त्यासंबंधानें शिफारस करतो आणि काँग्रेसमधून तीं बिलें मंजूर करून घेण्यासाठीं आपली शक्ति खर्च करतो. तो आपल्या पक्षाचा पुढारी असतो. आपल्या पक्षांतील अंतर्विरोधांत सलोखा करणें आणि त्याला व त्याच्या पक्षाला निवडणाऱ्या लोकांना जी दिशा पसंत असेल त्या दिशेनें नेणें हें त्याचें कर्तव्य असतें. तो लोकांचा आवाज असतो. एकदां लोकांचा विश्वास व पाठिंबा त्यानें मिळविल्यावर त्याच्याइतकें सामर्थ्य कोणाचेंच नसतें. राष्ट्राच्या एकाद्या विभागातर्फे नव्हे तर साऱ्या देशातर्फे बोलण्याचा अधिकार त्याला एकट्यालाच असतो.

एकादा संप, दंगल, अथवा नैसर्गिक आपत्ति यांमुळें राष्ट्राला अंतर्गत धोका उद्भवतो, त्यावेळीं राष्ट्रपति हाच शांततारक्षक असतो. तो अमेरिकेच्या वैभवाचा रखवालदार असतो. आमची अर्थसंघटना निरोगी राखण्यासाठीं जरूर ते अधिकार त्याला दिलेले असतात. आणि हंगरींत १९५६ सालीं जें साम्राज्यवादी आक्रमण झालें आणि मूलभूत मानवी हक्कांची जी पाशवी पायमल्ली झाली तशा संकटापासून बचाव करण्यासाठीं एकत्र आलेल्या स्वतंत्र राष्ट्रांचा तो पुढारी असतो.

त्याच्या अनेक कर्तव्यांत राष्ट्रीय बजेट तयार करणें, तें काँग्रेसपुढें मांडणें, राष्ट्रीय संकट निर्माण करतील अशी भीति वाटणाऱ्या कामगारविषयक वादांत हस्तक्षेप करणें, नागरिक हक्कांच्या चालू लढ्यांत ठाम भूमिका घेणें इत्यादि गोष्टी असतात.

अमेरिकन राष्ट्रपतीच्या हातीं इतकी सर्व शक्ति एकवटण्याचा एक परिणाम हा होतो कीं अमेरिकन राष्ट्रपतिविषयक बातमी ही साऱ्या जगांत अतिशय महत्त्वाची बातमी ठरते. वृत्तपत्रें हें जें लोकांपर्यंत पोंचण्याचें फार मोठें साधन त्याचा उपयोग करून राष्ट्रपति आपली भूमिका मजबूत करूं शकतो व आपला कार्यक्रम पुढें रेटूं शकतो. जबाबदार नागरिकांच्या कमिट्या नेमून त्यांच्याकडे नव्या संकल्पित कायद्यासंबंधानें अभ्यासपूर्वक अहवाल सादर करण्याचें काम

तो सोपवितो व त्यामुळें या कमिट्यांनाहि बातमीच्या दृष्टीनें महत्त्व येतें. अधिकारपदावर नेमणुका करण्याची सत्ता चतुराईनें वापरून तो आपला कायद्याचा कार्यक्रम पुढें रेटतो व स्वपक्षांत अधिक एकजूट घडवितो.

विविध आर्थिक हितसंबंधांत समतोल राखून राष्ट्राच्या जिव्हाळ्याच्या गरजा ओळखणें हें राष्ट्रपतीचें काम असतें. राष्ट्राला अधिक चांगल्या शाळा हव्या, कीं नागरिक हक्कांचें अधिक चांगलें रक्षण हवें कीं राष्ट्राच्या संरक्षणाची गरज अधिक निकडीची आहे, हें राष्ट्रपतीनें पाहावयाचें असतें. राष्ट्राच्या रुंद व ऐसपैस आघाडीवर सार्वत्रिक स्वरूपानें त्याला आपला कार्यक्रम चालवावा लागतो. खूप बर्फ पडलेल्या रस्त्यावरील बर्फ अनेक खोऱ्यांनीं व फावड्यांनीं बाजूस सारण्याचा प्रयत्न करून नुसते कांहीं तुकडे बाजूस सारण्याऐवजीं अथवा एकमेकांच्या डोळयांवर बर्फ उडविण्याऐवजीं सबंध रस्ता व्यापणाऱ्या बर्फनांगरानें तो बर्फ काढून टाकणें जसें सोईस्कर असतें, तसा राष्ट्रपतीचा कार्यक्रम असावा लागतो.

राष्ट्रपतीचे पुष्कळसे अधिकार निरंकुश असतात त्यापेक्षां अधिक ते मन वळविण्याचे असतात. लोकशाही राष्ट्रांतील अधिकारपदास साजेशीच ही गोष्ट आहे. राष्ट्रपतीनें कॅांग्रेसच्या एकाद्या निर्णयास नकार (व्हीटो) दिला तर कॅांग्रेसच्या दोन तृतीयांश बहुमतानें तो नकार निष्फळ करतां येतो. आणखीहि पुष्कळ मर्यादा राष्ट्रपतीच्या अधिकारावर घातलेल्या असतात. निरनिराळ्या ब्यूरोंचे प्रमुख राष्ट्रपति आपल्या पदावर येण्यापूर्वी तेथें असतात व त्याची मुदत संपल्यावरहि ते तेथें राहतात. ते कॅांग्रेसशीं येणाऱ्या त्यांच्या संबंधांचा उपयोग करून राष्ट्रपतीचे बेत हाणून पाडूं शकतात. सरकारांत आणि सरकाराभोवतीं सतत कार्य करीत असणाऱ्या आर्थिक व नागरी संघटनांचें जें बळकट जाळें असतें त्याचीहि दखल राष्ट्रपतीला घ्यावी लागते. आपल्या परदेशीय मित्रराष्ट्रांवर आपल्या कृतीचे परिणाम काय होतात हेंहि त्याला पाहावें लागतें. आणि जरी आपल्या बाजूनें अनेकवार तो लोकमत वळवूं शकतो तरी अखेर लोकमतानुसारच त्याला वागावें लागतें.

या राष्ट्रपतीला लगामांत ठेवण्यासाठीं जी संघटना आपली प्रचंड हिंमत आणि राजकीय चातुर्य वेचते ती संघटना म्हणजे कॅांग्रेस हीच होय. त्या कॅांग्रेसमध्येंच त्याचे विरोधक असतात व तरीहि तोच तिचा पुढारी मानला जातो. जगांत फक्त अमेरिकेंतच असें कायदेमंडळ आहे कीं ज्याचें मन वळविण्याचा अथवा ज्याचें नियंत्रण करण्याचा अधिकार राष्ट्राच्या मुख्य कार्यकारी सत्तेला नाहीं. उलट राष्ट्रपतीवर खटला करून त्याला काढून टाकतां येईल असा कांहीं अपराध त्यानें

केल्याशिवाय त्याला अधिकारपदावरून काढून टाकण्याचा अधिकारहि त्या कॉंग्रेसला नाहीं. आजवर अमेरिकन राष्ट्रपतीविरुद्ध यशस्वी खटला झालाच नाहीं. एकदां प्रयत्न झाला पण तो फसला.

राष्ट्रपति आणि कॉंग्रेस सार्वराष्ट्रीय जीवनाला वेढून टाकणाऱ्या या राजकीय नाटकांत आपापल्या भूमिका चांगल्या प्रकारें करतात. राष्ट्रपति हा आमचा पिता व पुढारी असतो. आमच्या हिताचें काय आहे हें तो जाणतो. आम्ही त्याला मान देऊन त्याचे अनुयायी होतों अथवा त्याचा द्वेष करून त्याचा आदेश झुगारून देतों. कॉंग्रेस ही लोकांचें अंतर्मन व्यक्त करते. राष्ट्रपतिरूपी बाप, त्याची सत्ता, त्याची जबाबदारी, त्याची सुव्यवस्था याबद्दल लोकांच्या अंतर्मनांतला द्वेष कॉंग्रेस व्यक्त करते. आपल्या बेजबाबदारीनें आपला अधिकार व्यक्त करणारें मूल म्हणजे ही आमची कॉंग्रेस. बापाचा अधिकार धुडकावून लावून ती त्याला शासन करतेच, त्याचबरोबर त्या बापाचा अधिकार कॉंग्रेसला हवाहि असतो.

राष्ट्रपतिपदासंबंधानें आमच्या ज्या कल्पना आहेत त्या आजवर सर्व राष्ट्रपतींनीं पूर्ण केल्या आहेत. वॉशिंग्टन हा उमदा होता व आपण उत्तम परंपरा घातल्या पाहिजेत याची त्याला जाणीव होती. स्वतंत्र शेतकरी आणि कारागीर हा आमच्या लोकशाहीचा आधार होय अशी जेफर्सनची कल्पना होती. जॅक्सननें पश्चिमेकडला नवा झोंबरा वारा राष्ट्रपतिगृहांत आणला. टेडी रूझवेल्ट हा सामर्थ्यवान् व दांडगेश्वर असून त्यानें राष्ट्रांत नवा उत्साह आणला. हॅरी ट्रुमन अगदीं साधा माणूस, पण नम्रता आणि कष्ट यांच्या बळावर एका मोठ्या पदासाठीं अवश्य असणारे सारे गुण त्यानें दाखविले व बऱ्या गोष्टी मोठ्या उमदेपणानें त्यानें केल्या. अगदीं साधा माणूसहि एवढी जबाबदारी पडली कीं एवढा मोठा होतो अशी आमची परंपरागत गूढश्रद्धा आहेच.

पण या सर्वांपेक्षां लिंकन श्रेष्ठ. त्यानें आमच्या लोकशाहींतला खरा अर्थ आपल्या चरित्रानें प्रकट केला. दरिद्री व विनम्र, स्वतःच्या बळावरच बहुंशीं शिकलेला; केवळ स्वतःच्या प्रयत्नानें त्या उच्च पदावर तो चढला, आणि तेंहि अशा वेळीं कीं जेव्हां संघराज्यच मोडण्याचा धोका उत्पन्न झाला होता. संघ-राज्याचा पुनर्जन्म घडवून आणणें व गुलामगिरीचा मोक्ष करणें हें कर्तृत्व त्याच्या भाग्यांत होतें. 'कुणाबद्दल दुष्टबुद्धि न बाळगतां, सर्वांबद्दल प्रेम ठेवून' त्यानें तें तडीस नेलें. त्याच्या या निष्ठेसाठीं तो हुतात्मा झाला. उत्तर व दक्षिण यांच्यांत कलह होऊन जो रक्तपात झाला त्याच्या शेवटीं लिंकनचें बलिदान झालें व अमेरिकेनें आपल्या पापाचें प्रायश्चित्त घेतलें. लिंकनची छाया अजून आमच्या डोकीवर

घोटाळते आहे. आमच्यांतील कलहामुळें तिला खेद होतो, हळूहळू आम्ही जवळजवळ येत असून आमच्यांत बंधुभाव उत्पन्न होत आहे याबद्दल ती आशापूर्ण आहे. यासाठींच लिंकननें आपली सर्व निष्ठा अर्पण केली. जनतेंतले कलह, जनतेच्या आकांक्षा आणि अखेर निर्णायक व स्पष्ट विजय मिळण्याचा विश्वास या गोष्टी ज्या महापुरुषाच्या जीवनांत नाट्यपूर्णतेनें एकवटलेल्या असतात असा लिंकनसारखा सामान्य जनतेचा विभूतिपुरुष लाभण्याचें भाग्य एकाद्या राष्ट्रालाच लाभतें.

## कारभाऱ्यांचें जाळें

जेफर्सनच्या काळीं तो आपलीं पत्रें स्वतः लिहून मग त्यानेंच संशोधिलेल्या एका पद्धतीनें त्याच्या प्रती करीत असे. आतां ही पद्धति बदलली आहे. राष्ट्रपतीला आतां दहाबारा मदतनीस असतात. राष्ट्रपतीवर अनेक जबाबदाऱ्या असतात, त्या प्रत्येकींतील तज्ज्ञ यांत असतात. शिवाय तीनशें माणसें कचेरीसाठीं असतात. राष्ट्रीय संरक्षण कौन्सिल, आर्थिक कौन्सिल, डिफेन्स मॉबिलायझेशन कचेरी, बजेट ब्यूरो, अशीं अनेक मंडळें राष्ट्रपतीला सल्ला देण्यासाठीं असतात. स्टेट, ट्रेझरी पोस्ट ऑफिस वगैरे दहा खात्यांचे दहा सेक्रेटरी राष्ट्रपति नेमतो. ते दहाजण मिळून त्याचें कॅबिनेट बनतें. कॅबिनेटचे सभासद कायदेमंडळाचे सदस्य असत नाहींत. (पार्लमेंटरी पद्धतींत कॅबिनेट हें पार्लमेंटांतील बहुमतवाल्या पक्षाच्या सभासदांचें असतें.) कॅबिनेटचे सभासद नेमतांना प्रदेश, धर्म व राजकीय महत्त्वाचे आर्थिक हितसंबंध इत्यादि गोष्टी विचारांत घेतल्या जातात.

कॅबिनेटला राज्यघटनेंत स्थान नाहीं. त्याला सामुदायिक जबाबदारी नाहीं. यांत राजकीय अनुभव फारसा नसलेलीं माणसें घेतलीं जातात. पण शेती, मजूर, व्यापार वगैरे क्षेत्रांतले तज्ज्ञ घेतले जाऊं शकतात. राजकीय दृष्ट्या कॅबिनेट-मधील जागेवरून कोठें वर चढतां येईल असा मुळींच संभव नसतो. एका दृष्टीनें हें चांगलें आहे. कारण कोणत्याहि वरच्या जागेवर दृष्टि न ठेवतां सदर अधिकारी आपलें काम एकताननेनें करूं शकतो.

लिंकननें एक दिवस आपल्या कॅबिनेटला एक सूचना केली. पण सर्व सदस्यांनीं एकमतानें तिला विरोध केला. तेव्हां लिंकन म्हणाला "सातजणांचा नकार व एक होकार, ठीक होकाराचा विजय असो." कॅबिनेटला सामुदायिक सामर्थ्य कांहींहि नाहीं हें या कथेवरून कळतें. पण आपापल्या खात्याचे व्यवस्थापक या नात्यानें कॅबिनेट सदस्यांची जबाबदारी फार मोठी असते.

या कचेऱ्यांखेरीज सिव्हिल सर्व्हिस कमिशन, व्यापार व धंदे, राज्याराज्यांतील व्यापार, दळणवळण, सरकारी रोखे वगैरेच्या नियंत्रणासाठीं कमिशन्स असतात. शिवाय फेडरल रिझर्व्ह बोर्ड या संघटनेचें काम सर्व अर्थसंघटनेचा तोल राखणें हें होय. १९५३ सालीं आरोग्य, शिक्षण व लोककल्याण हें खातें सुरू करण्यांत आलें असून त्या खात्यांचीं विशिष्ट कामें असतात. शिवाय सरकारी छापखान्याची कचेरीहि राष्ट्रपतीच्या अधिकाराखालीं असते. सरकारी रिपोर्ट व इतर दस्तऐवज तेथें छापले जातात, इतकेंच नव्हे तर सामान्य नागरिकांसाठीं लहान मुलांच्या जोपासनेपासून मधुमक्षिकापालनापर्यंत विविध लोकोपयोगी माहिती देणारीं पुस्तकें या छापखान्यांत छापलीं जातात.

टेनेसी व्हॅली ऑथॉरिटी ही संघटना अंशतः सरकारी अंशतः व्यापारी अशी आहे. पण साऱ्या जगभर उदार लोकशाहीचें फार मोठें यश असा या संघटनेचा गौरव होतो. (खुद्द अमेरिकेंत मात्र असा गौरव होत नसून तेथें विरोधी टीका खूप ऐकूं येते.) टेनेसी व्हॅली योजनेंत जमीन आणि जंगल, माती आणि पाणी यांचें रक्षण करण्यांत येत असून, यंत्रसंचालन शक्ति, नौकानयन, करमणुकीचीं साधनें इतक्या गोष्टी यांत उपलब्ध झाल्या आहेत. टेनेसी व्हॅली योजनेनें घडविलेली एक अगदीं नवी गोष्ट म्हणजे प्रादेशिक विकासाची एक नवीच कल्पना येथें अमलांत आली ही होय. यांत अगदीं बाद झालेला प्रदेश पुन्हा ऊर्जित अवस्थेस आला, राजकारण व शास्त्र यांची यांत जोड घालण्यांत आली, आणि तरीहि वरून खालीं हुकुम सोडून हें काम चालत नाहीं तर सर्वथैव लोकांच्या सहकार्यावर चालतें.

आपलें सरकार कार्यक्षम नाहीं अशी कुरकुर करीत राहण्याची अमेरिकनांना एक खोडच लागली आहे. आणि फार मोठ्या संघटनेंत नालायक लोक असतातहि. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं मुख्यतः दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत पुष्कळसे फेडरल ब्यूरो धंद्यांच्या अगदीं आजतागायत पद्धतीनें चालविले जात असून त्यांच्या पद्धति आतां कांहीं धंदेवाल्यांनींहि स्वीकारल्या आहेत. शिवाय सरकारचें प्रत्येक खातें व एजन्सी या संघटना अस्ताव्यस्त पसरलेल्या कॉंग्रेसशीं संबंधित हितसंबंधी गटाशीं आणि अगदीं तळांतल्या व्यक्तीशींहि आपले संबंध वाढवितात.

उपराष्ट्रपतिपदाचें वर्णन करायचें उरलें. या पदासंबंधानें वुड्रो विल्सन म्हणतो, "या पदाचें वर्णन करतांना मुख्य घोटाळा होतो तो हा कीं या पदाविषयीं किती थोडें बोलतां येतें हें सांगतांनाच त्या पदाचें वर्णन सांगून संपतें." या पदाचें

महत्त्व वाढवण्यासाठीं अलीकडील राष्ट्रपतींनीं फार निकरानें प्रयत्न केले. हल्लींचा उपराष्ट्रपति निक्सन यानें परराष्ट्रांत स्नेहभाव वाढविणारा वकील, स्वागताधिकारी, अनेक महत्त्वाच्या कमिट्यांचा अध्यक्ष इत्यादि कामें उचलून अध्यक्षाचीं कांहीं कामें आपल्या अंगावर घेतलीं आहेत.

## न्यायकोर्टें व नागरिकस्वातंत्र्य

अमेरिकन बुद्धिमत्तेचें एक वैशिष्ट्य अमेरिकन न्यायपद्धतींत दिसून येतें तें असें कीं तेथें राज्यसरकारांचीं कोर्टें आहेत त्याबरोबरच राज्यसरकारांच्या कोर्टांपासून स्वतंत्र अशीं फेडरल कोर्टेंहि आहेत. राज्यघटना व फेडरल कायदे यांतून निर्माण होणारे खटले या कोर्टांपुढें चालतात. प्रत्येक नागरिकांवर दोन्ही कोर्टांचा अंमल चालत असून लोकांना दोन्हींत दाद मागतां येते.

फेडरल न्यायसंघटनेंत सुप्रीम कोर्ट (एक सरन्यायाधीश आणि आठ साहाय्यक न्यायाधीश), दहा फिरतीं अपील कोर्टें आणि सुमारें १० डिस्ट्रिक्ट कोर्टें असतात. राज्याराज्यांत जर भांडणें असलीं अथवा एका राज्यांतल्या नागरिकाला दुसऱ्या राज्यांतल्या नागरिकांविरुद्ध जर खटला करायचा असला तर तो फेडरल कोर्टांत करतां येतो. या कोर्टांकडून एक महत्त्वाचें काम होतें तें हें कीं फेडरल कायद्याचा अर्थ करणें, त्या कायद्याचा वापर करणें आणि अधिकारातिक्रम कायदे-मंडळानें केला कीं कार्यकारी सत्तेनें केला हें ठरविणें या महत्त्वाच्या गोष्टींचा निर्णय या फेडरल कोर्टसंघटनेंतून होतो.

सुप्रीम कोर्टाचें बहुधा सर्वांत महत्त्वाचें काम म्हणजे राज्यघटनेचा अर्थ व्यापकपणें करून बदललेल्या काळाला राज्यघटना उपयोगीं लावणें हें. या युक्तीनें आमच्या स्थिर सरकारचा आधार अशी जी राज्यघटना तिचा आम्ही मान राखतों. त्याचबरोबर त्या राज्यघटनेच्या नौकेचा नांगर स्थिर ठेवून आम्ही काळाच्या लाटाबरोबर तिला झोके खाऊं देतों. चालू शतकांत राज्यघटनेचा अर्थ लावतांना सरकारची सामाजिक जबाबदारी वाढविण्याकडे व मानवी हक्कांच्या विस्ताराकडे सुप्रीम कोर्टानें आपला कल दाखविला आहे. त्याचें उत्तम उदाहरण म्हणजे सुप्रीम कोर्टानें निग्रो आणि गोरे यांना सार्वजनिक शाळा व सार्वजनिक वाहनें यांत वेगळें बसविण्यास मनाई केली हें होय. १९५४ सालीं सुप्रीम कोर्टानें निर्णय दिला कीं "सार्वजनिक शिक्षणांत 'पृथक् पण समान' या तत्त्वाला मुळींच जागा नाहीं. शिक्षणाच्या सोयी पृथक् करणें हीच विषमता होय." याबाबत जेथें कलह होतात त्या प्रदेशांना खूप प्रसिद्धि मिळते. पण शेकडों शाळांचें एकीकरण कांहींहि तक्रार

न करतां झालें आहे. कांहीं राज्यें एकीकरण टाळण्यासाठीं कायद्याचे डावपेच खेळतात, पण एकंदरीनें एकीकरणाकडे प्रवृत्ति वाढत आहे.

अलीकडे एक पाहणी सतत दोन वर्षें करण्यांत आली, तींत असें आढळून आलें कीं दोन हजार उदाहरणांत जीवनाच्या सर्व क्षेत्रांत वांशिक निर्बंध सर्वथैव दूर सारण्यांत आले आहेत. हें संशोधन एका दाक्षिणात्य पंडितानें केलें. तो म्हणतो, "दक्षिणेंत विभक्ततेचा सणंग प्रदेश असा हल्लीं राहिलेला नाहीं... विभक्तीकरण नष्ट होणारच नाहीं असा जो समज आहे तो पुराव्यानें साफ खोटा पाडला आहे." या पाहणींत आढळून आलेलें एकीकरण अथवा निर्विभक्तीकरण (डीसेग्रिगेशन) वगैरे, सार्वजनिक आरोग्य, खाजगी धंदे, सार्वजनिक वाहतूक व राहण्याचीं घरें इत्यादि बाबतींत आढळून आलें. यांत निग्रोंना मुक्तद्वार केलेल्या १६४ कॉलेजांचा व विद्यापीठांचाहि समावेश होतो. अनेक निग्रोंना निवडणुकीनें अथवा नेमणुकीनें सरकारी अधिकाराच्या जागा मिळाल्या होत्या. लुइसिआना राज्यांत १९४८ सालीं निग्रो मतदार १,६७२ होते ते १९५२ मध्यें १०८,७२४ झाले. अशीच वाढ इतर अनेक ठिकाणीं होत आहे. कु-क्लक्स-क्लॅन ही संघटना निग्रोंचें वर्चस्व वाढूं नये म्हणून कोणतेहि भलेबुरे उपाय योजावे यासाठीं निघाली. पण आतां फ्लोरिडांतील या संघटनेंत निग्रोंनाहि सभासद होण्याची परवानगी मिळाली आहे.

दारिद्र्य, अज्ञान, आजार, सुसंधीचा अभाव या गोष्टींमुळें निग्रो दडपले गेले होते. या गोष्टींचें दुष्टचक्र तोडण्याचा निकराचा प्रयत्न केला जात आहे. पुष्कळ गोऱ्या लोकांचें विचार न करतां बनलेलें असें मत होतें कीं निग्रोंचा मागसलेपणा प्राणिशास्त्रानुसार आहे. सुसंधीचा अभाव व दरिद्री राहणी यामुळें निग्रोंत आजार व गुन्हेगारी वाढते हें या गोऱ्यांना पटत नसे. पुष्कळ दरिद्री व हताश गोऱ्या लोकांना आपल्या दुःस्थितीचें कारण हा निग्रो आहे असें मानल्यानें मनाला समाधान वाटे आणि राजकीय मुत्सद्दीहि मतें मिळविण्यासाठीं या लोकांच्या समजुतींना उत्तेजन देत, पुष्कळदां पोलिस व कोर्टें निग्रोंना धमक्या देत, व्यापारी निग्रोंना लुटत असे आणि निग्रोंची दुःखी परिस्थिति अथवा त्यांच्यावर होणारे अन्याय यांना वृत्तपत्रें प्रसिद्धि देत नसत.

पण पूर्वीं 'लिंचिंग' म्हणजे छळून, टोचून क्रूरपणें ठार मारणें हा जो प्रकार असे त्याचा आतां वृत्तपत्रें स्पष्टपणें निषेध करूं लागलीं आहेत. पूर्वीं वसाहत-क्षेत्र वाढविलें जात असतां सरहद्दीवर ज्या लढाया होत त्या काळीं हा लिंचिंगचा प्रकार रूढ झाला आणि त्या काळीं निग्रोंप्रमाणें गोऱ्यांनाहि लिंचिंग केलें जात

असे. १९५१ पासून लिंचिंग अजिबात बंद झालेलें दिसतें. धमकावण्याचे व इतर क्रूरतेचे प्रकार मात्र चालू आहेत.

नागरिकस्वातंत्र्य चळवळींचा एक भाग म्हणून एक 'स्वातंत्र्यनिष्ठेचा कार्यक्रम' अमलांत आला असून त्यानें मात्र स्वातंत्र्यरक्षणाऐवजीं स्वातंत्र्यावर संकट येत आहे. कम्युनिस्टांच्या हुकुमशाही साम्राज्यवादाच्या धोक्याविरुद्ध ही चळवळ निघाली. पण तीसाठीं स्थापन झालेल्या सब्व्हर्सिव्ह ॲक्टिव्हिटीज कंट्रोल बोर्डाला असे अधिकार देण्यांत आले होते कीं त्यांचा दुरुपयोग ज्यांच्याबाबत झाला अशा कामगारांच्या नोकऱ्या जातील आणि दुसरीकडे त्यांना रोजगारी मिळणें अशक्य होईल. याविषयींच्या कायद्यानें कोणत्याहि संघटनेची अचानक चौकशी होण्याचा धोका निर्माण झाल्यामुळें ऐच्छिक संघटनांत माणसें येत नाहींत. म्हणून यामुळें ऐच्छिक संघटनांना धोका निर्माण झाला आहे. या चौकशींतून गेल्या पाच वर्षांत ४० हजार पृष्ठें भरतील एवढा पुरावा सामाजिक उलथापालथ करूं पाहणाऱ्या संघटनांविरुद्ध गोळा झाला आहे. पण त्यावर अखेर अंमलबजावणी कांहींच झाली नाहीं. खरोखरच आमच्या समाजपद्धतीला जर धोका उत्पन्न झालेला असेलच तर या तपासणीनें त्याचा शोध लागलेला नाहीं. पण त्यासाठीं प्रयत्नच झाला नाहीं असें मात्र नव्हे.

अमेरिकेंतील कम्युनिस्टांबाबतची भीति आतां नाहींशी झाली आहे. बहुतेक लोकांना स्पष्टपणें कळून चुकलें आहे कीं आपण अमेरिकन हे एकजूट झालेले लोक आहों, धोकादायक असे कम्युनिस्ट येथें असलेच तर त्यांची संख्या थोडी आहे. तरीहि आपण सावध असलें पाहिजेच, पण आमचें अंतर्गत सामर्थ्य व जगाचें आपणाकडे येणारें नैतिक नेतृत्व यांचा पाया आपलें नागरिकस्वातंत्र्य हाच राहिला पाहिजे आणि विदेशी हुकुमशाहीशीं लढा देतांना आपली भूमिका आपण टिकविली पाहिजे. नागरिकस्वातंत्र्याचे आपले हक्क रक्षिण्यासाठीं आम्ही अमेरिकन्स ऐच्छिक संघटनांची मदत घेतों. हें कार्य अनेक संघटना करीत असतात. त्यांपैकीं फक्त लिबर्टीज् यूनियन ही संघटना फार प्रसिद्ध आहे. भिन्न मत मांडणाऱ्या अशा कोणाच्या भाषणस्वातंत्र्यावर गदा येत असेल, कोणाला अल्पसंख्य म्हणून कोणी रोजगार नाकारीत असेल अथवा कोणाला मताधिकार नाकारला जात असेल अथवा कामगारांना संघटना करण्याचा अधिकार नाकारला जात असेल तर अशा सर्व अडथळ्यांविरुद्ध या व्यक्तिस्वातंत्र्यवादी संघटना सदा लढा चालू ठेवितात. 'लीगल एड सोसायटीज्' या साऱ्या देशभर पसरलेल्या असून ज्यांना वकिलाचा खर्च परवडत नसेल त्यांना मोफत वकील देतात. त्यामुळें कायद्याचा सल्ला

मिळाला नाहीं म्हणून दावा हरलों असें कोणालाहि म्हणावें लागत नाहीं.

तेव्हां अशा या लोकशाहीप्रधान अमेरिकन सरकारचीं खास वैशिष्ट्यें कोणतीं ?

पहिलें वैशिष्ट्यें हें कीं आम्हांला जी स्थानिक स्वायत्तता हवी असते, आमचा स्थानिक कारभार जो आम्हांला स्थानिक लोकांनीं चालवायला हवा असतो त्यावर राज्यव्यवस्थेनें आजवर नेहमींच विशेष भर दिला आहे. लोकांच्या हातीं लोकांचा कारभार राहतो हा या व्यवस्थेचा गुण होय. पण आंतरराष्ट्रीय संकटाचे काळीं याच गुणामुळें धोका येण्याचाहि संभव असतो. कारण स्थानिक महत्त्वाच्या प्रश्नामुळें आंतरराष्ट्रीय प्रश्नाकडे आमचें दुर्लक्ष होऊं शकतें.

आमचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे ऐच्छिक संघटनांना सरकारानें दिलेलें महत्त्व. सरकारी कामकाजाबद्दल या संघटना ईर्षा उत्पन्न करतात व मार्गदर्शनहि करतात, कायदेमंडळाचे सदस्य व कायदेविषयक कामकाज यावर आपला प्रभाव पाडतात, सरकारच्या दोन खात्यांचे संबंध जोडतात, इतर देशांत सरकारच करील अशीं किती तरी कामें या देशांत या संघटना करतात. हल्लींचें युग असें आहे कीं पुष्कळसे सरकारी निर्णय सामान्य माणसाच्या टप्प्यापलीकडे असतात, अनेक निर्णय राजकीय क्षेत्रांतून राज्यकारभारक्षेत्राकडे सोपविलेले असतात. यामुळें नोकरशाहीचें वर्चस्व वाढतें आणि सरकारच्या प्रचंडपणामुळें व गुंतागुंतीमुळें सामान्य माणसाकडून सरकार दूर जातें. अशा परिस्थितींत सामान्य माणसाचा हात सरकारपर्यंत पोंचविण्याचें काम या ऐच्छिक संघटना करीत असतात.

आमच्या लोकशाहीचें तिसरें वैशिष्ट्य म्हणजे सरकार व सरकारचीं कामें यांजवर सतत इतकेंच नव्हे तर क्रूरपणें चाललेली टीका. वृत्तपत्रें, समाजांतील ठळक व्यक्ति, रस्त्यारस्त्यांच्या कोपऱ्यावरचे वक्ते, कॉंग्रेसमेन, ऐच्छिक संस्था आणि अर्थात् परदेशी पाहुणेहि या टीकाकार्यांत भाग घेत असतात. वयांत आलेल्या सर्वांना (गुलामांना वगळून) मताधिकार, वृत्तपत्रांचें स्वातंत्र्य, धर्म व राजकारण यांचें विभक्तीकरण, क्रूर शिक्षांना बंदी, सार्वत्रिक मोफत शिक्षण, तुरुंगसुधारणा, मोफत ग्रंथालयें या सर्व बाबतींत अमेरिकेनें साऱ्या जगांत पहिल्यानें पुढें पाऊल टाकलें आहे.

या लोकशाहीचें चौथें वैशिष्ट्य, अमेरिकन सरकार हें वरिष्ठ वर्गासाठीं न चालतां मुख्यत्वें सामान्य जनासाठीं चालतें हें होय. यामुळें, डी टॉकेव्हिल म्हणतो, अमेरिकन समाज दीन दर्जाचा वाटतो पण त्यांत न्याय जास्त असतो.

आमचें पांचवें वैशिष्ट्य म्हणजे, लोकांच्या आकांक्षा अमलांत आणण्याचें

सामर्थ्य हा आमच्या सरकारचा आधार आहे हें होय. सरकार हें थंडपणें व बोजडपणें चालतें. कारण ज्या लोकमतानुसार तें चालायचें तें लोकमतच अनेक पृथक् पृथक् व परस्परविरोधी इच्छांचें बनलेलें असतें. आमच्या येथें सर्वंकष व प्रचंड योजना असत नाहींत. कारण अशा योजना अगदीं वटहुकुमशाही प्रवृत्तीच्या असतात अशी अमेरिकनांना फार मोठी भीति वाटत असते. आमच्या योजना तुकड्यातुकड्यांनीं अनुभवाच्या मार्गानें गरज लागेल तशा आम्ही अमलांत आणतों.

आमचें सहावें व शेवटचें वैशिष्ट्य म्हणजे आमचें सरकार धंदे व व्यापार यांच्या आधारावर चालतें हें होय. हा गुण नसून अगदीं विशेष असा हा दोषच आहे असें कांहीं लोक म्हणतात. पण नांव घेण्यासारखी कोणतीहि संस्कृति भरीव अशा आर्थिक पायावरच वसविलेली असते. केवळ लूटमार करायची नसेल तर दुसरा कोणता पाया घेतां येईल ? हुकुमशाही राज्यपद्धति या कोणत्या ना कोणत्या लुटीवरच आधारलेल्या असतात. त्या पद्धतींत कामगारांना गुलामाप्रमाणें राबवतात, जिंकलेल्या प्रदेशांतले कारखाने मोडून आपल्या प्रदेशांत घेऊन जातात, ज्या वर्गांवर साऱ्या दोषांचें व गुन्ह्यांचें खापर फोडायचें असे हुकुमशाही राज्यकर्ते ठरवितात त्या वर्गाची सर्व संपत्ति हिरावून घेतात. लोकशाही समाजांत खाजगी मालकी हा संरक्षणार्ह हक्क आहे असें मानलें जातें. लोकशाही सरकार मोठीं उत्पन्नें व नफे यांवर भारी कर बसवतील, पण लोकशाही सरकार ज्यांतून नफा उत्पन्न होतो तो भांडवलाचा झरा बंद करणार नाहीं. कारण लोकशाही सरकारला संपत्ति हेंच संकट असें वाटत नसून संपत्ति हेंच सामर्थ्य आहे व त्यापासूनच इतर फायदे मिळतात असें लोकशाही सरकार मानतें. जे फायदे मिळणें हा लोकांचा हक्क आहे असें लोकशाही सरकार मानतें ते फायदे लोकांना देणें हें धनवान् व धनोत्पादनसमर्थ अशा देशालाच शक्य आहे.

म्हणून अमेरिकेंत अर्थकारण व राजकारण हीं एकाच दोरींत विणलीं आहेत. सरकारनें आर्थिक नियंत्रणें जारी केलीं अथवा भारी कर लादले कीं प्रत्येक बडा आर्थिक गट 'खून' 'खून' म्हणून ओरडतो. पण अखेर असा प्रत्येक गट सरकारकडून सेवा घेतो व संरक्षणहि घेतो.

ही आमची अर्थसंघटना चालते कशी ?

प्रकरण अकरावें

# विपुलतेचें जीवन

आम्ही क्रांतिकालांत राहत आहों. आमच्या या कालखंडाकडे तौलनिक दृष्टीनें पाहिलें असतां असें दिसून येईल कीं आमचें धनोत्पादन व धनोपयोग हीं दोन्ही एका नव्या पातळीला पोंचलीं आहेत. कारण आमच्या पहिल्या क्रांतीनें राजकीय लोकशाहींत आर्थिक लोकशाहीचीं तत्त्वें जितकीं दृढमूल करण्याचें आश्वासन दिलें होतें तितकीं आर्थिक लोकशाहीचीं तत्त्वें आतां दृढमूल झालीं आहेत. (तीं अजून पूर्णपणें पदरांत पडलीं नाहींत हें मात्र खरें आहे.)

जगांतील लोकसंख्येंतले फक्त ७ टक्के लोक अमेरिकेंत आहेत. पण जगांतील एकूण माल आणि सोयी यांतील ४० टक्के उत्पादन अमेरिकेंत होतें. अमेरिकेच्या राष्ट्रीय उत्पादनास लोकसंख्येनें भागलें असतां युरोपांतील सर्वाधिक उत्पादक राष्ट्रांच्या दुप्पट व इंडोनेशियाच्या दसपट उत्पादन अमेरिका करते असें दिसून येईल. १८९०-१९०० या काळाशीं तुलना करतां १९४०-५० या काळांतील एकूण धनोत्पादन त्याच्या पांचपट झालें. हा वेग वाढत असून लोकांना अधिकाधिक धन व सोयी उपलब्ध होत आहेत व त्या खरेदी करण्यासाठीं त्यांना वाढत्या मिळकतीहि मिळत आहेत. गेल्या ऐशीं वर्षांत प्रत्येक श्रममापावर (पर यूनिट ऑफ् लेबर) दरसाल दोन टक्के उत्पादन वाढत आहे.

१८२० ते १९३० या काळांत दरमाणशीं संचालनशक्तीचा पुरवठा चाळीसपट वाढविण्यांत आला. १९१० सालीं एकूण उपलब्ध श्रमशक्तीच्या २१ टक्के मजूर कामावर होते, तर १९४० सालीं हें प्रमाण ११ टक्क्यांवर आलें. अधिकाधिक मालाच्या निर्मितीस कमी कमी मानवी श्रम लागूं लागले.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत अमेरिकेंत तेवीस हजार तीनशें कोटि डॉलर इतकें भांडवल अमेरिकेनें धंद्यांत घातलें असून कारखान्यांची उत्पादन-

शक्ति दुप्पट झाली आहे. पोलाद कारखानदार व वीज कारखानदार यांनीं नव्या गरजा भागविण्यासाठीं आपलें उत्पादन वाढविण्याचें काम चालू ठेविलें आहे. शेतीक्षेत्रांत उत्पादनवाढीचा वेग केवळ चमत्कार ठरला आहे. १८२० सालीं देशांतील लोकसंख्येला लागणारें अन्न पिकविण्यासाठीं ७२ टक्के श्रमजीवी लोक राबत. १९५० सालीं फक्त ११ टक्के श्रमजीवी लोक शेती करीत असून सर्व अमेरिकेला लागणारें अन्न पिकवितात.

शास्त्र व तंत्र यांत झालेल्या क्रांतीमुळें माल्थसचीं ठाम भविष्यें खोटीं ठरलीं आहेत. कारण जमीन, श्रम व भांडवल यांचें उत्पादनसामर्थ्य वाढलें असून संततिनियमनाचीं साधीं व परिणामकारक साधनें उपलब्ध झालीं आहेत. उपासमार व रोगराई यांचें नियंत्रण करण्याचें सामर्थ्य माणसाच्या अंगीं इतिहासांत पहिल्यानेंच येत आहे.

कोणतीहि अर्थसंघटना नैसर्गिक संपत्ति, मजूर व भांडवल या तीन मूलभूत गोष्टींवर अवलंबून असते. अमेरिकेचें वैभव हें तेथल्या अफाट धनसाधनांमुळें सहजगत्या वाढलें असा एक समज आहे. पण धनसाधनांची लोकसंख्येशीं तुलना करतां अमेरिकेचीं धनसाधनें रशियापेक्षां अथवा युरोपीय राष्ट्रें व त्यांचे अंकित प्रदेश यांतील धनसाधनांपेक्षां अधिक नाहींत. १९३०-४० या अनर्थकारी काळांत आमचें उत्पादन घटून गरजेपेक्षां कमी झालें व आम्ही टंचाईत दिवस काढले. आज आमचें वैभव वाढलें असलें तरी धनसाधनें त्या वेळेपेक्षां अधिक नाहींत.

म्हणून अमेरिकेचें हल्लींचें जें उत्पादनप्रमाण आहे तें कांहीं केवळ धनसाधनांमुळेंच वाढलें आहे असें म्हणतां येत नाहीं. न्यू इंग्लंड प्रदेश हा या देशांत धनसाधनांच्या बाबतींत जास्तींत जास्त दरिद्री आहे. पण एकोणिसाव्या शतकांत उद्योगधंदे वाढवून हा प्रदेश सर्व देशांत अधिक धनवान् झाला. उलट दक्षिण प्रदेश धनसाधनसंपन्न असतांहि गुलाम मजूरांकरवीं केवळ कच्चा माल पिकवून दरिद्री राहिला. स्पॅनिश लोक दोन्ही अमेरिका खंडांच्या भूगोलार्धावर हिंडले, पण त्यांना उत्साहपूर्ण व धनोत्पादनक्षम असें राष्ट्र निर्मितां आलें नाहीं. धनसाधनें तर हवींतच, पण त्यांच्या इतकाच मानवी साहसवृत्तीचाहि उपयोग अमेरिकन वैभव जोमानें वाढण्याला झाला. 'टॅकोनाइट' हें अत्यंत निरुपयोगी वाटणारें अगदीं हलक्या दर्जाचें खनिज द्रव्यहि माणसांनीं उपयोगांत आणलें. यावरून माणसाची शोधक बुद्धि धनसाधनें निर्माणहि कशी करूं शकते हें दिसून येतें.

वसाहतीसाठीं येथें आलेल्या परदेशीयांनीं येथें मनुष्यशक्तीचा पुरवठा केला; तरी पण श्रमशक्तीची या देशांत नेहमीं टंचाईच असे. भांडवलाचीहि टंचाई असे. भांडवलहि परदेशांतून आणावें लागलें. श्रमशक्तीची टंचाई व मजुरीचे वाढते दर यामुळें भांडवलाचें प्रमाण वाढविणें, यंत्रें वाढविणें अवश्य झालें. नफ्यांचें भांडवल करून त्यांतून उत्पादक यंत्रसामुग्री निर्मिण्यांत आली. संशोधक प्रवृत्तीनें अधिकाधिक उत्पादनक्षम अशीं यंत्रें निर्माण केलीं. आतां आम्ही भांडवल वाढवितों त्या प्रमाणांत मजुरांची संख्या कमी न करतां कामाचे तास कमी करतों.

## विपुलतेची अर्थरचना

अमेरिकन उत्पादनसंघटनेचें वेगळेपण ती सदा सर्वांगांनीं वाढत असते यांत आहे. एकूण उत्पादनांत वाढ, वस्तूंच्या संख्येंत व विविधतेंत वाढ, उत्पादनाच्या पद्धतींत, मजूराच्या दरडोई उत्पादनांत आणि उत्पादकाच्या खरेदी-शक्तींत वाढ अशी ही सर्वांगीण वाढ अमेरिकन उत्पादनपद्धतींत होत आहे.

अमेरिकेला युरोपप्रमाणेंच हळूहळू सुरवात करतां आली. पण अमेरिकेनें उत्पादनाच्या वेगांत जगाला मागें टाकलें याचें कारण अमेरिकन राजकीय प्रवृत्ति टंचाई टिकविण्याऐवजीं विपुलता निर्मिण्याकडे होती हें होय. अमेरिकन नागरिकांनीं मोठ्या हिंमतीनें व निष्ठुरपणेंहि धनसाधनें जीं उत्पादनाच्या कामीं लावलीं तीं मूठभर वरिष्ठ व सवलतदार वर्गाच्या हितासाठीं नव्हे तर (जरी बड्या उद्योगपतींच्या काळांत सवलतदारवर्ग व विषमता पुष्कळ होती तरी) सर्व जनतेच्या उपयोगासाठीं लावलीं.

अमेरिकेचें उत्पादनकार्य जें चालू राहिलें त्यामागें आणखीहि कांहीं ठाम समजुती होत्या. असें मानलें जात होतें कीं उत्पादन हें हजारों वेगवेगळ्या साहसी उत्पादकांचे हातींच राहिलें पाहिजे व बाजाराच्या चंचल मागणीबरोबर त्यानें हेलकावेहि खाल्ले पाहिजेत, त्याचबरोबर उत्पादनकार्यावर नजर ठेवून त्याला जरूर तेव्हां हुरूप चढविणें अथवा लगाम खेचणें ही जबाबदारी सरकारची आहे. असेंहि मानलें जात होतें कीं सरकारला कर बसविण्याचा हक्क असला तरी खाजगी मिळकत काढून घेण्याचा हक्क सरकारला नाहीं, व्यक्ति अथवा व्यक्तिसंघ यांनीं माल व सोयी यांसाठीं अनिर्बंधपणें एकमेकाशीं करार करावे आणि अर्थसंघटना निरोगी ठेवण्यासाठीं श्रम, शेती आणि व्यक्तिसंघ (कॉर्पोरेशन्स) यांच्यांत समतोल राखण्याची सर्कस मात्र सरकारनेंच केली पाहिजे.

कदाचित् आणखी एक गोष्ट या सर्वांपेक्षां अधिक महत्त्वाची आहे. अमेरिकनांचें नेहमीं असें मत आहे कीं संपत्ति ही वर्धमान आहे. ती सांठविण्यापेक्षां अधिकाधिक उत्पादनासाठीं खर्चली पाहिजे. अनुभवानें अमेरिकनांना शिकविलें आहे कीं भांडवल व श्रम यांनीं आपापसांत द्वंद्व खेळण्यापेक्षां आपसांत उत्पादक सहकार्य केलें तर भोवतालच्या परिस्थितींतून ते अधिक धन निर्मू शकतील. आर्थिक हक्कदारीला मागें खेचण्यासाठीं आम्ही शेरमन कायद्यासारखे कायदे करतों अथवा अनर्थ कोसळण्याइतके भाव कोसळतील तर ते टाळण्यासाठीं कायदे (कमॉडिटी क्रेडिट कॉर्पोरेशन) करतों, मजूर संघटनांना उत्तेजन देण्यासाठीं आम्ही वॅग्नर ॲक्टसारखे कायदे करतों अथवा कामगारसंघटनांच्या शक्तीला लगाम घालण्यासाठीं टॅफ्ट-हार्टले कायद्यासारखे कायदे करतों. परिस्थितीस अवश्य असेल त्याप्रमाणें वरीलपैकीं एक अथवा अनेक धोरणें आम्ही अवलंबतों. आम्ही टेनेसी व्हॅली ऑथॉरिटी ही निमसरकारी संघटना उभारली, सरकारला पोस्ट ऑफिस चालवायला देतों, पण पश्चिम भागांत रेल्वे बांधण्यासाठीं लक्षावधि एकर जमीन आम्हीं खाजगी धंदेवाल्यांना दिली. आम्ही आर्थिक हक्कदारीला विरोधी आहों; तरी पण टेलिग्राफ व टेलिफोन या सोयी खाजगी कॉर्पोरेशन्सकडे दिल्या आहेत; मात्र लोकहिताच्या दृष्टीनें त्यांचें नियंत्रण होतें. रेल्वे व विमानें यांचेंहि असेंच नियंत्रण होतें.

अमेरिकन अर्थसंघटना ही एकाद्या प्राचीन पेहरावासारखी आहे असें म्हणण्याची फॅशन पडली आहे. अमेरिकन अर्थसंघटना ही ॲडम स्मिथ व रिकार्डो यांच्या शिकवणीचा अवशेष आहे असें मानण्यांत येतें. पण फ्रेडरिक लेविस ॲलन हा अर्थशास्त्रज्ञ म्हणतो, “आमची अर्थसंघटना समाजवादाच्याहि पुढें गेली असून तींत सरकारी नियंत्रण व खाजगी कर्तृत्व यांचा संयोग करण्यांत आला आहे. निव्वळ खाजगी मालकी अथवा निव्वळ समाजवाद यांपेक्षां ही संयुक्त संघटना आम्हांला अधिक हितकर ठरली आहे. आम्ही भांडवलाचें राष्ट्रीयीकरण न करतां धनाच्या वांटणीचें समाजीकरण केलें आहे. कामगारांचीं वेतनें वाढवून व मोठ्या मिळकतीवर कर बसवून आम्ही ही गोष्ट घडवून आणतां. आमचा समाजवाद हा सोन्याचीं अंडीं घालणारी हंसी मारून खाऊन टाकण्याचा नाहीं. तिनें अधिकाधिक अंडीं द्यावीं अशी आमची योजना असते.

अमेरिकन धंद्यांच्या पद्धतीनें चढाओढयुक्त सहकार्य हें नवें तत्त्व शोधून काढलें आहे. एकाच उत्पादनक्षेत्रांतले धंदेवाले धंद्याच्या बहुमोल कल्पना एकमेकांना देतात, धंद्यांतील रहस्यें, शोध एकमेकांना सांगतात आणि मग

बाहेर जाऊन गिऱ्हाईक मिळविण्याबाबत चढाओढ करतात. या स्पर्धापद्धतींत कांहीं लहान उत्पादक मात्र ठार झाले आहेत.

आमची ही अर्थसंघटना कार्यक्षमतेनें चालावी यासाठीं कांहीं सोयी अत्यवश्य असून त्या उपलब्ध असणार असें आम्ही गृहीत धरून चालतों. कायदेशीर हक्क असणारें नागरिकत्व आणि कायद्याची बजावणी करणारें सरकार यांनीं, दोन पक्षांत झालेल्या करारांची बजावणी होईल अशी हमी मिळाली पाहिजे. आमच्या देशांत मजबूत पायावर आधारलेली चलनपद्धति आणि बँकिंग पद्धति असून तीमुळें पैशाची उसनवारी आणि देवघेव ही अगदीं साधी बाब ठरली पाहिजे. सकाळीं वेळेवर कामावर हजर होऊन संध्याकाळीं शीळ होईतों कामावर राहणारे कामगार असले पाहिजेत. जगांतल्या इतर राष्ट्रांत या गोष्टी अगदीं गृहीत धरण्याइतक्या उपलब्ध नाहींत. पण अमेरिकेंत आम्हांला त्या उपलब्ध आहेत. प्रचंड उत्पादनपद्धतीचे फायदे आम्हांला बऱ्याच काळापासून माहीत आहेत. पण प्रचंड उत्पादनाचें सबंध चक्र अमलांत आणण्याचें श्रेय हेन्री फोर्डला आहे. माल अगदीं माफक किंमतीचा असतो आणि म्हणून लक्षावधि लोकांना खरेदी करतां येतो. हा माल भारी पगाराच्या मजुरांनीं निर्मिलेला असतो. हे भारी पगार प्रचंड उत्पादनपद्धतीमुळें मिळतात व त्यामुळें प्रचंड प्रमाणांत खरेदीशक्तीहि वाढली जाते. सारांश, माफक किंमती, वाढतें उत्पादन, भारी मजुरी, भारी नफे आणि वाढता बाजार असें हें विपुलतेचें सदा फिरणारें चक्र आहे.

अशा कार्यक्रमामुळें प्रचंड प्रमाणावरील कॉर्पोरेशन्स जन्मास आल्या. त्यामुळें किंमतीऐवजीं मालांत चढाओढ चालू झाली. फोर्ड, शेवरोलेट व प्लायमाउथ या गाड्यांच्या किंमतींत फार थोडा फरक असतो. गिऱ्हाईक निवड करतांना त्या त्या गाडीच्या यांत्रिक गुणावरून अथवा मोटारगाडीवरील रेखा व रंग या संबंधींच्या आपल्या पत्नीच्या आवडीवरून निवड करतो. बडे धंदेवाले आपसांत युद्धें करीत असतात. ॲल्युमिनियमवाला स्टेनलेस पोलादवाल्याशीं टक्कर देत असतो. पोलादाच्या किंमती उतरल्या नाहींत तर आपण पोलाद उत्पादनाचा व्यवसाय हातीं घेऊं असें जनरल मोटर्स कंपनी म्हणत असते.

पण यामुळें अखेर आर्थिक उत्पादनांत हक्कदारी येईल काय? 'नाहीं' असें यावर इतिहासाचें उत्तर आहे. आर्थिक हक्कदारी ही अमेरिकेला नैतिक दृष्ट्या त्याज्य वाटते. यू. एस्. स्टील व स्टँडर्ड ऑइल कंपन्यांनीं एका काळीं हक्कदारीचा जो धाक निर्माण केला होता, तो फार पूर्वींच नाहींसा झाला आहे, आणि आतां

कोणालहि, मोठमोठ्या कॉर्पोरेशन्सनाहि, हक्कदारी मिळाली तरी नकोशी वाटते. चढाओढीमुळें प्रगति होते हें त्यांना पटलें आहे. हक्कदारी म्हटली कीं तेथें सरकारी नियंत्रण येतेंच आणि मग सरकारच्या हुकुमशाहींत निर्बुद्धपणें चालणारी अर्थसंघटना व ९८ लक्ष कर्तबगार केंद्रांत विखुरलेली अर्थसंघटना या दोहोंच्या चढाओढींत दुसरीच टिकेल हें धंदेवाला जाणून असतो.

पोलाद, मोटारी तेल यांवर चार ते आठ कॉर्पोरेशन्सचें प्रभुत्व आहे. तरी पण त्या धंद्यांतहि अजून अनेक लहान कंपन्यांना भरभराटीला जागा आहे. सर्वांत मोठ्या अशा चार पोलाद कंपन्यांनीं दोनतृतीयांश पोलाद धंदा अडविला आहे. पण बाकीच्या एकतृतीयांश क्षेत्रांत ऐशीं लहान कंपन्या स्पर्धा करीत आहेत. पेट्रोलच्या धंद्यांतील पांच बड्या धंदेवाल्यांनीं त्या धंद्यांतलें तीनपंचमांश क्षेत्र व्यापलें आहे. पण बाकीच्या दोनपंचमांशांत पांचशें लहान धंदेवाले चढाओढ करीत आहेत. मोठ्या राक्षसांना बाजार खाऊन टाकतां येऊं नये या दृष्टीनें हे लहान धंदेवाले बाजाराचा तोल संभाळण्याला उपयोगीं पडतात. मालांच्या प्रचंड दुकानांच्या सांखळ्या अमल्यानें धंदेवाल्यांना किंमती कमी ठेवाव्या लागतात. मोठ्या धंद्याचें पारडें जड झालें तर प्रचंड कामगारसंघटना तें उलट्या बाजूनें खेचतात व दोन्ही पक्षांत समतोल साधून सामुदायिक करारांचें सामर्थ्य सिद्ध करतात. एरवीं कामगार हा कारखानदाराचा मिंधा झाला असता.

अमेरिकन अर्थसंघटनेंत मोठ्या कॉर्पोरेशन्स या पायाभूत आहेत ही गोष्ट सर्वमान्य आहे. कांहीं टीकाकारांना या कॉर्पोरेशन्सचें महत्त्व वाटत नाहीं हें खरें. पण या कॉर्पोरेशन्सनीं माल पुष्कळ व विविध पुरवून आपली श्रेष्ठ कर्तबगारी सिद्ध केली आहे. माल सुधारणें व त्याचें उत्पादन वाढविणें यासाठीं या कॉर्पोरेशन्सना सतत संशोधन चालू ठेवतां येतें. बहुधा लहान कारखानदारांपेक्षां मोठे कारखानदार हेच कामगारांच्या हिताच्या गोष्टी अधिक करतात व कामगार-कारखानदार संबंध अधिक चांगले ठेवतात.

अमेरिकन समाजपद्धतीप्रमाणें अमेरिकन अर्थपद्धतीहि बहुविध, प्रायोगिक व वास्तवमार्गी आहे. यामुळें ही समाजपद्धति व अर्थपद्धति यांचें साध्या भाषेंत वर्णन करतां येत नाहीं. आम्ही खाजगी धंद्यांचा पुरस्कार मोठ्या गोंगाटानें करतों. पण कर्जें, आर्थिक हक्कदारी, शेतीमालाच्या किंमती वगैरे बाबींवर कांहींना कांहीं नियंत्रण असावें अशी आमची मागणी असते. विरोधी हितसंबंध अथवा विरोधी मागण्या असतील तेथें सरकारनें प्रत्येक वेळीं अमुक प्रकारें पाऊल टाकून मध्यस्थी केली पाहिजे असें आमचें म्हणणें असतें. सारांश, सर्व अर्थ-

संघटनेंत समतोल राहून सर्वांचें हित व्हावें आणि उत्पादनांत जास्तींत जास्त कार्यक्षमता राहावी म्हणजे लोकांना उपयोगी वस्तु अधिकाधिक मिळतील हें आमच्या अर्थसंघटनेचें उद्दिष्ट असतें.

## उत्पादनक्षमता

अमेरिकेला घरचा फार मोठा खुला बाजार आहे. कांहीं अंशीं, आयात मालावर जकाती बसविलेल्या आहेत म्हणून व अंशतः परदेशाच्या मालाला वाहतुकीचा खर्च पडून तो अमेरिकेंत महाग पडतो म्हणून, अमेरिकेच्या मालाला स्वदेशी बाजारांत संरक्षण मिळतें. अमेरिकेंतील राज्याराज्यांत जकातीचे अडसर नसून सर्व देशभर सुकर वाहतुकीचें जाळें भराभर पसरत आहे. यामुळें धंदेवाल्यांना स्वदेशी बाजारासाठींच खूप माल काढणें शक्य होत असून एकेका उत्पादनांत खास कार्यक्षमता वाढवितां येत असल्यानें सर्व लोकांना माल खरेदी करतां येईल एवढ्या मर्यादेपर्यंत किंमती उतरवितां येत आहेत.

अमेरिकन लोक खुल्या बाजाराचा नेहमीं पुरस्कार करतात. पण ही नुसती भावना असून वस्तुस्थिति याउलट आहे. अमेरिकेंतील सर्व उत्पादकांना सारखें गिऱ्हाईक मिळालें पाहिजे म्हणून बाहेरच्या ज्या मालाशीं चढाओढ जाचक होत असेल अशा मालाच्या आयातीवर मर्यादा घालण्याचा त्यांचा आग्रह असतोच. परदेशांशीं चढाओढ झाल्यास जे धंदे मरतील अशांना संरक्षण, सामाजिक विमा व किमान रोजगारीची मर्यादा या द्वारें कामगारांना संरक्षण, शेतकऱ्यांना मालकिंमतीबाबत मदत देऊन संरक्षण, शुद्ध अन्न व औषधें यासाठीं कायदे करून गिऱ्हाइकांना संरक्षण, चलनफुगवट टाळण्यासाठीं पतनियंत्रण, सर्व जनतेला संरक्षण व सुखसोयी देणारा फेडरल सरकारचा कार्यक्रम पार पाडण्यासाठीं पैसा हवा म्हणून मोठ्या प्रातीवर वाढता कर, संघटित कामगारांना सामुदायिक कराराचा हक्क, वाहतूक व इतर सोयींच्या दरांचें नियंत्रण, विमानवाहतुकीचें नियंत्रण, पैसे गुंतविणाऱ्यांचे हितसंबंध रक्षिण्यासाठीं रोखेबाजाराचें नियंत्रण, हीं व आणखी कितीतरी अधिक नियंत्रणें सरकारनें धंदे व बाजार यांचें नियमन करण्यासाठीं अमलांत आणावीं अशी लोकांची मागणी असते अथवा त्यासाठीं लोकांची संमति मिळाली आहे. अनेक मार्गांनीं हे सर्व निर्बंध आमची अर्थसंघटना मजबूत होण्याला कारण झाले आहेत. तरी पण एक प्रश्न उरतो तो हा कीं अमेरिकन पद्धतींत इतकी उत्पादनशक्तीची वाढ कशामुळें झाली ?

टॉने व इतर अनेक लेखकांनीं दाखविलें आहे कीं प्रॉटेस्टंटांच्या धर्मतत्त्वानें, उत्पादनसामर्थ्य हा ईश्वरी प्रसाद आहे व माणसानें धनोत्पादनासाठीं जिवापाड मेहनत केली पाहिजे, अशी प्रेरणा दिली. डी टॉकेव्हिल म्हणतो त्याप्रमाणें परिस्थितीची समानता आणि वर्गपद्धतीचा अभाव यांमुळें लोकांना व्यापार व उद्योगधंदे यांत शिरण्याला उत्तेजन मिळालें. ब्रिटनपासून स्वातंत्र्य मिळाल्यानें अमेरिकेंत धंदे काढण्याला फार जोराची अनुकूलता मिळाली. पश्चिम प्रदेशांत आमच्या वसाहती वाढूं लागल्या व लोकसंख्या वाढूं लागली यामुळें मालाची मागणीहि वाढली.

कार्यक्षमता वाढविण्याबाबत अगदीं स्तोम माजलें, कारखान्यांत तज्ज्ञ लोक घड्याळाबरोबर कामें करून घेऊं लागले, नवीं नवीं यंत्रें आलीं व प्रत्येक माणसाचें काम फक्त कांहीं थोड्या हालचालीपुरतें मर्यादित झालें. या दिशेनें उत्पादन इतकें पुढें गेलें कीं आतां वैचारिक झोपाळ्याचा झोका मागें येत आहे. प्रत्येक मालावर मजुरानें कांहीं थोडे तरी संस्कार केले पाहिजेत म्हणजे आपण तो माल तयार केला असा अभिमान त्याला वाटेल अशा तजविजी आतां करण्यांत येत आहेत. पण कार्यक्षमता वाढविण्याच्या हव्यासानें पूर्वीं कामाची जागा, कामांचा क्रम व कामांच्या पद्धति यांतील अव्यवस्थेमुळें नासाडी फार होत असे ही गोष्ट लक्षांत आणून दिली एवढें खास.

मालांचे आकार व रूप यांना प्रमाणबद्ध केल्यामुळें कोट्यवधि डॉलर्सची बचत झाली. चाळीस प्रकारच्या रुग्णालयीन खाटा पूर्वीं असत. पण आतां एकदोन प्रकारांत त्या बसविण्यांत आल्या आहेत. मोटारनिर्मात्यांनीं कांहीं थोडे सांगाड्यांचे, चौकटींचे, एंजिनांचे प्रकार तयार केले व ते थोडथोड्या फरकानें अनेक गाड्यांसाठीं वापरतां येऊं लागले.

उत्पादनखर्च काढणें, आंकडेवार माहितीसाठीं संशोधन करणें, निरनिराळ्या कामांचें पृथक्करण करणें, धंद्यासंबंधानें अंदाज बांधणें, साहित्यसाठ्याचें नियंत्रण करणें, माल साठविण्याच्या वखारी सुधारणें, मालाची जलद वाहतूक करणें यांपैकीं प्रत्येक गोष्टीनें उत्पादनक्षमता अधिकाधिक वाढत गेली.

मजुरांची मजुरी वाढवावी पण तरीहि उत्पादनाचा खर्च कमी करावा हें उत्कृष्ट उत्पादनक्षमतेचें ठळक लक्षण. ही गोष्ट अमेरिकन कारखानदार साधूं शकले. कार्यक्षमतावाढीची दुसरी कसोटी ही कीं रशियांत चार कामगारांवर एक वरिष्ठ अधिकारी लागत असेल तर अमेरिकेंत सात कामगारांवर एक वरिष्ठ लागतो.

कार्यक्षमता वाढविण्याच्या जुन्या पद्धतींत कामगारामागें कामाचा वेग वाढविण्याचा तगादा असे, पण आतां कामगाराला काम करतांना अधिक सुख व समाधान वाटूनहि मालाची निपज वाढते. साऱ्या देशभर कारखान्यांत व कचेऱ्यांत, एका खास तजविजीनें संगीत ऐकविण्यांत येतें आणि मानसशास्त्रानुसार कोणत्या वेळीं कोणते स्वर गोड लागतात याचा विचार करून ते स्वर चालू ठेवण्यांत येतात. पाच कोटि कामगार एका संगीत संघटनेचें संगीत ऐकत आहेत. यामुळें कामगारांचा ताण व शीण कमी झाला असून मोडतोड व अपघात यांचें प्रमाण घटलें आहे. कारखानदारांना आपल्या जमाखर्चांवरून याचा पडताळा येतो.

कारखान्यांतील यंत्रांना आणि भिंतींना विशिष्ट रंग लावल्यासहि कार्यक्षमता वाढते असें आढळून आलें आहे. कांहीं ठिकाणीं रंग कोणते लावावे हें ठरविण्यासाठीं कामगारांचें मतदान होतें. एका रिफाइनरीनें आपल्या यंत्रांना लाल, फिक्का व नारिंगी रंग लावला, लाल व निळा आपल्या टॉवर्सना लावला आणि पिंगट निळा ढकलगाड्यांना लावला.

योग्य प्रकाश, हवेचें नियंत्रण, आवाज बंद करणें इत्यादींचेहि फायदे दिसून आले आहेत. योग्य प्रकारें तयार केलेल्या आरामशीर खुर्च्यांनीं उत्पादनक्षमता १० टक्के वाढते. मनाला तरतरी आणणारें कचेरीचें दर्शन आधुनिक पद्धतीच्या खुर्च्याटेबलांनीं व इतर आधुनिक साहित्यानें, यंत्रांनीं व विशिष्ट रचनेनें निर्माण होत असून त्यांत काम सुकर होतें आणि माल-उत्पादनाचा वेळ दोन दिवसांपासून दोन तासांइतकाहि घटू शकतो. एक सुखी कारखानदार म्हणतो, "माझे कामगार अधिक चांगलें काम करतात, इतकेंच नव्हे तर ते पोषाख अधिक चांगला करतात, अधिक चांगलें बोलतात व अधिक ताठ चालतातहि." मुलींना अशा कारखान्यांत पगार कमी मिळाला तरी तेथें काम करायला आवडतें.

इकडे उत्पादनक्षमता वाढविण्यासाठीं नवें संशोधन चालू असतें व नवे-नवे चमत्कार घडतात, म्हणजे नवे-नवे शोध लागतात. दरसाल दोनशेंसाठ कोटि डॉलर्स एवढा खर्च संशोधनावर चालू आहे. जनरल मोटर्स कंपनीची एक प्रॉडक्शन लाइन आहे. तींत माणूस नसून यंत्रेंच आहेत व तेथें दर तासाला मोटारींचे दोन हजार पिस्टन्स तयार होतात. एका काचकंपनीची ग्लास फुंकण्याचीं १४ राक्षसी यंत्रें आहेत. त्यांनीं अमेरिकेंतले ९० टक्के दिव्यांचे बल्ब तयार होतात आणि इलेक्ट्रॉनिक ट्यूबकरितां लागणारी सारी काच येथें तयार होते. या प्रत्येक यंत्राला एकेकच कामगार तें चालविण्याला लागतो. तरी

पण चाळीस वर्षांपूर्वी काचधंद्यांत जेवढे कामगार होते त्याच्या दिढी कामगार आज काचधंद्यांत आहेत.

पूर्वी माणसाला उद्भिज्ज, खनिज वगैरे द्रव्यें जशींच्या तशीं कांहीं तरी कामासाठीं वापरावीं लागत. आतां त्यापासून माणसाला किती तरी सुख देणाऱ्या व त्याचीं कामें करणाऱ्या वस्तु संशोधनामुळें करतां येत आहेत. पूर्वी शास्त्रीय संशोधनावर रचलेल्या कादंबऱ्यांतून शास्त्रीय चमत्कार वर्णिले असत. आज ते खरे होत आहेत. प्रचंड रासायनिक कारखान्यांतून शेतीचीं खतें, सिंथेटिक रबर, छापखान्याची शाई वगैरे वस्तु नदीप्रवाहाप्रमाणें बाहेर येत आहेत. प्लॅस्टिक धंद्याचा कच्चा माल असाच विपुल तयार होत असून त्या प्लॅस्टिकच्या आतां शेकडों वस्तु तयार होत आहेत.

रसायनशास्त्रज्ञ व वैज्ञानिक यांनीं आतांपर्यंत चमत्कार केलेच आहेत. आतां रसायनशास्त्रज्ञ, विज्ञानशास्त्रज्ञ आणि प्राणिशास्त्रज्ञ हे परस्परसाहाय्यानें अनेक नवे कारखाने नव्या मालाचे काढतील व निसर्ग ज्याप्रमाणें प्रकाश, हवा, पाणी यांच्या साहाय्यानें अन्न तयार करतो तसें अन्नहि कारखान्यांत तयार करतील असा संभव उत्पन्न झाला आहे,

कचेऱ्यांच्या कामांतहि क्रांति होत आहे. एका कांहींतरी सार्वजनिक सोय निर्माण करणाऱ्या कंपनीचें गिऱ्हाईक वीस लक्ष असून तिनें हिशेब करण्याचें एक विजेचें यंत्र सुरू केलें आहे. २७० माणसें तें चालविण्याला लागतात. पूर्वी पांचशें माणसें जें काम आठवड्यांत करीत तें काम हें यंत्र आतां दोन दिवसांत करतें. दुसरें एक यंत्र अनेक तक्रारी व चौकशांना त्या त्या गरजेनुसार ठरविण्यांत आलेलीं छापील उत्तरें देतें.

कारखान्यांतून हल्लीं अशीं यंत्रें वापरांत आहेत कीं तीं कच्चा माल घेऊन पुढील कार्याला लावतात, चूक होते आहे कीं काय तें पाहतात, तयार होण्याचा माल विशिष्ट संस्कारांतून जात असतां होणाऱ्या चुका त्या यंत्रांत दुरुस्त होतात, चूक दुरुस्त होईपर्यंतच्या वेळेपुरतें संस्कारकार्य थांबवून पुन्हा तें कार्य तीं यंत्रें सुरू करतात, तयार झालेला माल कसा झाला आहे त्याचें परीक्षण करतात, वाईट माल फेकून देतात, तयार माल मोजतात आणि मालाच्या निर्मितींतला कोणता भाग त्या विजेच्या ‘ मेंदू ’ कडे सोपविला आहे याचें त्याला ‘ स्मरण ’ असतें.

माणसाच्या हस्तक्षेपावांचून आपोआप व सतत माल तयार होण्याच्या प्रक्रियेनें अनेक धंद्यांत फार मोठी क्रांति झाली आहे. तरी पण आपोआपपणाचा

हा नुसता आरंभ आहे. आज राहणी खर्चाचें इतर प्रमाण ९१ टक्क्यांनीं वाढलेलें असतां, यांत्रिक आपोआपपणामुळें विजेचा खर्च मात्र १९३९ च्या पातळीवरच अजून आहे.

कांहीं निरीक्षकांना वाटतें कीं डिक्टेटिंग मशीन्समुळें स्टेनोग्राफर्स निकामी झाले, हिशेबाच्या यंत्रांमुळें हिशेबनीस निकामी झाले, ग्लास ब्लोअर्स, कॅबिनेट मेकर्स वगैरेमुळें ते ते कारागीर निकामी झाले ही खरोखर आपत्तीच होय. पण दुसऱ्या लोकांच्या मतें एंजीनिअर्स व टेक्निशिअन्स यांची मागणी कमी होत नसून वाढती आहे आणि पाठीला कळा लावणारे अथवा दुखणीं आणणारे श्रम नाहींसे होऊन कामाचे तास कमी झाले आणि सांस्कृतिक उद्योगाला अधिक वेळ मिळाला हा मानव जातीचा फायदाच होत आहे.

## कॉर्पोरेशन्स

या जोमपूर्ण अर्थसंघटनेला जोम मिळतो तो कॉर्पोरेशन्सपासून मिळतो. अमेरिकनांच्या कानांत कॉर्पोरेशन हा शब्द अजून अपशकुनी या स्मृतींतच घुमतो आहे. अनियंत्रित व लोभी कॉर्पोरेशन्सनीं आर्थिक क्षेत्रांत हक्कदाऱ्या निर्माण केल्या, एकाच वेळीं एकीकडे अफाट वैभव व दुसरीकडे अफाट दारिद्य निर्मिलें, गुन्हेगारीचे आर्थिक व्यवहार व लाचलुचपतीचें राजकारण त्यामुळेंच जन्माला आलें. पण आज काळ कितीतरी पालटला आहे. अलीकडे कॉर्पोरेशन्स आपल्या सत्कीर्तीला अगदीं हळवेपणानें जपतात, आपली बाजू जनतेला पटवून देण्यासाठीं जनतासंबंध अधिकारी नेमतात, आपले कारखाने पाहण्यासाठीं पाहुण्यांना भेटीला बोलावतात, घाऊक व्यापाऱ्यांकडून अथवा शाळकरी मुलांकडूनहि विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचीं उत्तरें देतात, आणि आपल्या नोकरांना सार्वजनिक कामांत भाग घेण्याला उत्तेजन देतात.

तरीपण अजूनपर्यंत रोजगारदात्यांत प्रचंड कॉर्पोरेशन्सचा समावेश करूनहि प्रचंड बहुसंख्य रोजगारदाते अजून संख्येनें थोडेच आहेत. ९० टक्के कारखानदार प्रत्येकीं ३१ पेक्षां कमी कामगारांना कामावर ठेवतात. पण अगदीं शिखरावरचे पांच बडे कारखानदार ७० टक्के मजूर कामावर नेमतात. निरनिराळ्या उद्योगधंद्यांत सुमारें वीस लक्ष स्वतंत्र धंदेवाले व भागीदार आहेत तर फक्त पाच लक्ष कॉर्पोरेशन्स आहेत. पण यांपैकीं फक्त दोनशें कॉर्पोरेशन्सच्या हातीं एकूण धंद्यापैकीं निम्मे धंदे आहेत. अशी भीति वाटते कीं धंदे एकमेकांत विलीन करून अथवा निरनिराळ्या कॉर्पोरेशन्सवर तेच डायरेक्टर ठेवून अथवा

कॉर्पोरेशन्सनीं एकमेकांचे शेअर्स खरीदून या राक्षसी कॉर्पोरेशन्स भयंकर मोठ्याहि बनविल्या जातील, समाजावर त्या संकट आणतील.

या कॉर्पोरेशन्स शाळा व चर्चेस यांच्याप्रमाणें सामाजिक संस्थाच आहेत. कारण शाळा व चर्चेस यांच्या व्यवहाराचा समाजाच्या मनावर व राहणीवर परिणाम होतो तसाच या कॉर्पोरेशन्सचाहि होतो. किंबहुना शाळांत काय शिकवावें आणि चर्चेसमध्यें काय उपदेशावें हें ठरविण्यावरहि कॉर्पोरेशन्सचें वजन पडतें. कारण धंद्यानें, विशेषतः कॉर्पोरेशन्सनीं, बनविलेला जो मनाचा साचा तोच समाजांत पसरत असतो.

हे कॉर्पोरेशन्सरूपी राक्षस कुणाच्या नियंत्रणांत असतात, कुणाच्या मालकींत असतात, त्यांचा फायदा मिळतो कुणाला?

पुष्कळांचे बाबतींत मालकी पुष्कळ व्यापक प्रमाणावर वांटलेली असते, आणि कामगारांपेक्षां भागीदार जास्त असणें ही गोष्ट अनेक कॉर्पोरेशन्सच्या बाबतींत घडलेली आहे. डु पाँटचे १ लक्ष ६६ हजार भागीदार तर फक्त ८९ हजार कामगार आहेत. जनरल मोटर्सची ही संख्या अनुक्रमें ६ लक्ष ५६ हजार व ५ लक्ष १४ हजार आहे. (शिवाय ८८ हजार नोकर परदेशांत). जनरल इलेक्ट्रिकची ही संख्या २ लक्ष ९६ हजार व २ लक्ष १० हजार आहे. ८० ते ९० लक्ष अमेरिकन नागरिक निरनिराळ्या कॉर्पोरेशन्सचे भागीदार असून ते जुन्या अर्थानें बडे भांडवलवाले नव्हेत तर अगदीं लहान माणसें आहेत.

याचा परिणाम असा होतो कीं मोठ्या कॉर्पोरेशन्सचे मालक सर्व देशभर पसरलेले असल्यानें त्यांचा कंपनीवर ताबा राहत नाहीं. ताबा राहतो शिखरावर बसणाऱ्या व्यवस्थापकांच्या व डायरेक्टर बोर्डाच्या हातांत. तरी पण भागीदारांच्या वार्षिक सभेंत भागीदार बराच उपद्रव देऊं शकतात व देतातहि. यामुळें अधिकारी लोक भागीदारांच्या हिताला जपत असतात. आर्थिक लोकशाही प्रसार पावत आहे अशा काळांत, मॅनेजरांना आतां माहीत झालें आहे कीं नव्या समाजधोरणाकडे आपण जबाबदारीच्या भावनेनें पाहिलें पाहिजे नाहींतर सरकार लगाम खेचल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून मॅनेजर लोक पुढीलप्रमाणें पंचविध जबाबदारी पत्करतातः (१) भागीदारांना नफ्याचा योग्य वांटा मिळाला पाहिजे; (२) कामगारांची उत्पादनशक्ति वाढेल त्या प्रमाणांत त्यांना वाढती मजुरी दिली पाहिजे; (३) लोकांना अधिक चांगला माल कमी किंमतीला दिला पाहिजे; (४) आणि लोकांच्या हितासाठीं खर्चण्याला सरकारला पैसा हवा म्हणून नफ्यांतला पुष्कळसा वांटा सरकारला दिला पाहिजे; (५) पांचवी जबाबदारी म्हणजे उत्पादक

कारखाना झीजफूट भरून काढण्यानें कायम ठेवून तो वाढविण्याची. तो कायम ठेवून व वाढवून त्याची उत्पादनशक्ति वाढली म्हणजे वरील चारहि जबाबदाऱ्यांसाठीं अधिक पैसा मिळतो.

कोणींहि योजना न करतां आपोआप एक गोष्ट घडत आली आहे. या मोठ्या कॉर्पोरेशन्स केवळ बड्या आर्थिक संघटनाच नव्हेत तर बड्या सामाजिक व राजकीय संघटनाहि होऊन बसल्या आहेत. वाढत्या प्रमाणांत सरकारसारखाच विचार व आचरण त्या करूं लागल्या आहेत. त्यांचा आकार, त्यांचा किचकटपणा, अंगोपांगांच्या संयोगाचे त्यांना सोडवावे लागणारे प्रश्न, समाजावर त्यांच्या निर्णयाचा होणारा परिणाम या सर्वांमुळें या कॉर्पोरेशन्स हीं लहान लहान सरकारेंच झालीं आहेत व तीं फारशीं लहानहि नाहींत.

कांहींना हा प्रचंडपणा आवडतो, कांहींना त्याची धास्ती वाटते. डेव्हिड लिलिएंथॉल हा एक अमेरिकेंतील प्रख्यात थोर पुरुष आहे. तो केवळ प्रचंडपणा हेंच संकट होय असें मानायला तयार नाहीं. कॉर्पोरेशन्स केल्यानें जर उत्पादनशक्ति वाढते तर कॉर्पोरेशन्स होणें हें अपरिहार्य आहे. त्यामुळें गिऱ्हाइकांना अधिक व विविध माल मिळतो. या कॉर्पोरेशन्स एकमेकींशीं चढाओढ करतात, बड्या कामगारसंघटना व सरकार त्यांचेवर दबाव आणतात यामुळें त्या कॉर्पोरेशन्स पूर्णपणें लगामांत राहतात. सी. राइट मिल्स याच्या मतें कॉर्पोरेशन्स समाजाची पिळणूक करीत नाहींत हें खरें, पण जाहिरातींनीं व समाजानें कसें वागावें यासंबंधानें सूचना देऊन समाजावर प्रभुत्व गाजवितातच व समाजावर आपली इच्छा लादतातच. पण कामगारसंघटना, चर्चेस व इतर अशाच संघटना कॉर्पोरेशन्सची जाहिरातबाजी हाणून पाडीत असतात, ही गोष्ट सी. राइट मिल्स लक्षांत घेत नाहीं.

मोठ्या कॉर्पोरेशन्सच्या बाबतींत जे निराशावादी आहेत ते या कॉर्पोरेशन्स आपल्या प्रचंड आर्थिक शक्तीनें लहान धंद्यांना नष्ट करतात अशी तक्रार मांडतात. पण एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या भागांतल्या कॉर्पोरेशन्स ज्या अगदीं बेजबाबदार व लुटारू होत्या त्या मानानें आजच्या कॉर्पोरेशन्स किती सुधारलेल्या आहेत ही गोष्ट हे निराशावादी टीकाकार तौलनिक दृष्टीनें पाहात नाहींत.

लक्षावधि लहान धंदेवाल्यांना अजूनहि अमेरिकन अर्थसंघटनेंत पुष्कळ स्थान आहे. लहान अथवा मध्यम शहरांतील जीवन अजूनहि तेथील बौद्धिक व्यवसायवाले, व्यापारी, लोकांच्या सुखसोयी करणारे, लहान धंदेवाले इत्यादि वर्गांनीं घडविलें जात असून हे नागरिक व त्यांच्या बायका अजूनहि फुरसतीच्या

वेळांत लोकसेवा करतात व त्यामुळें त्या शहरांचें आरोग्य व कल्याण साधतें. फार मोठ्या धंद्यांच्या लहान शहरांतील शाखांचे मॅनेजर त्या शहरांत स्थायिक नसतात आणि त्या लहान शहरांत राहणारे व्यापारी धंदेवाले हेच त्या गांवाचे पुढारी होतात. या स्थायिक लोकांना हंगामी राहणाऱ्या बड्या धंदेवाल्यांच्या चैनीच्या खोडी लागत असतील, पण या हंगामी बड्यांनाहि त्या त्या लहान शहरांतील प्रतिष्ठितांकडून मिळणाऱ्या सामाजिक मानमान्यतेवर अवलंबून राहावें लागतें. अशा प्रकारें या सर्व शक्ति उलटसुलट कार्यान्वित होत असतात.

"लोकांचे हितसंबंध बहुविध असतात. त्या सर्वांचें समाधान केल्यावांचून कोणताहि धंदा यशस्वी होऊं शकत नाहीं," असें डु पॉंट कंपनीचा क्रॉफोल्ड ग्रीनवॉल्ट म्हणतो. त्याच्या मतें "धंद्याचा विकास होऊं लागला म्हणजे धोरणें ठरविण्याचें काम अधिक माणसांकडे सोपवावें लागतें. त्यामुळें त्या त्या कालस्थलाच्या अनुबंधांत लोकांचें जें हित असतें त्याचें प्रतिबिंब धंद्याच्या संचालनांत पडल्यावांचून राहत नाहीं."

ग्रीनवॉल्टचा धंदा फार मोठा असून त्यामुळें त्याची एकंदर रासायनिक धंद्यावर पकड मोठी असल्यानें अँटीट्रस्ट कायद्यांचा काच त्याच्या धंद्याला फार असे. पण ग्रीनवॉल्टनें आपल्या प्रतिस्पर्ध्यांना चिरडून न टाकतां धंदा करण्यास उत्तेजन दिलें आहे. डु पॉंट कंपनी प्रतिस्पर्ध्याला कारखाना बांधून देऊन धंदा सुरू करण्याला तंत्रज्ञाची मदत देते. आर्थिक हक्कदारीच्या मनोवृत्तीपासून ही मनोवृत्ति कितीतरी भिन्न नाहीं का ?

मोठ्या कॉर्पोरेशन्स लहान कंपन्यांना आपल्यांत सामील करून अथवा उत्पादनाचीं नवीं क्षेत्रें सुरू करून आपल्या उत्पादनकार्यांत विविधता आणतात अशी एक नवी प्रवृत्ति हल्लीं अगदीं प्रातिनिधिक झाली आहे. जनरल इलेक्ट्रिक कॉर्पोरेशन ही विजेसंबंधानें कल्पना करितां येईल इतक्या क्षेत्रांतला माल करतेच, पण आतां जेट एंजिन्स आणि एअरकंडिशनिंग इक्विपमेंटहि करीत असून अलीकडे ॲटॉमिक शक्तीच्या क्षेत्रांतहि तिनें पाऊल टाकलें आहे. हल्लीं थोड्या काळांत खूप नफा मिळविण्याची प्रवृत्ति कॉर्पोरेशन्समध्यें नसून सतत धंदा चालू राहावा अशीं धोरणें अवलंबण्याची प्रवृत्ति वाढते आहे. यामुळें सरासरी नफा चार टक्क्यांच्याहि खालीं असतो.

नफ्यावर फेडरल कर फार असल्यानें आपल्या मिळकतींतला कांहीं भाग लोककल्याणाला देऊन टाकण्याइतकें औदार्य कांहीं धंदेवाल्यांचे ठिकाणीं आलें आहे, चलनफुगवटीनें अनेक कॉलेजें व विद्यापीठें दरिद्री झालीं. पण

भावी धंदेवाले हे कॉलेजें व विद्यापीठें यांतून शिकून तयार होऊन आले पाहिजेत ही गोष्ट धंदेवाल्यांना आतां पटली असून, धंदेवाले उच्च शिक्षणासाठीं अधिकाधिक देणग्या देत आहेत.

ही दानशूरता अशा प्रकारें उच्च स्वार्थदृष्टीचीच द्योतक आहे हें खरेंच. पण कॉर्पोरेशन्सचें जें स्वरूप त्यामुळें लोकांच्या मनावर उमटतें त्याबद्दल लोकांना अधिकाधिक आपुलकी वाटूं लागते हेंहि तितकेंच खरें आहे. कारण या कॉर्पोरेशन्स अधिक परोपकारी, सार्वजनिक दृष्टि असणाऱ्या, माल आणि मजुरी दोन्हींचीहि वाढ करणाऱ्या आहेत (व यावरच अमेरिकेचें वैभव अवलंबून आहे) अशी लोकांची या कॉर्पोरेशन्सबद्दल खात्री पटूं लागते.

जुन्या नव्या भांडवलवाल्यातील विरोधाचें उदाहरण हेन्री फोर्ड व त्याचा नातू दुसरा हेन्री यांचें आहे. आजोबानें आपला प्रचंड धंदा आपल्या कुटुंबातच ठेवला, कामगारांना पगार मोठमोठे देऊं केले, पण वरचेवर कामगारांना खालच्या दर्जावर ढकलून अथवा काढून टाकून कोणाला ती उच्च पगारश्रेणी मिळूंच दिली नाहीं. त्याला नेहमीं शरीररक्षक ठेवावे लागत आणि आपल्या संघटनेंत कारस्थानें व परस्परमत्सर वाढवून त्यानें धंदा टिकवून धरला. पण आतां त्याचा नातू दुसरा हेन्री यानें मजुरांना पाशवी कडकपणानें वागविण्याची पद्धति बंद केली असून मालक-कामगार संबंध त्याच्या कारखान्यांत हल्लीं अत्यंत शांततेचे आहेत. तो संयुक्त राष्ट्रसंघटनेंत अमेरिकेचा प्रतिनिधि असून धंदा व सार्वजनिक कार्य यांची त्यानें जोड घातली आहे. 'फोर्ड फौंडेशन'करतां त्याच्या आजोबानें जो पैसा ठेवला त्यांतून त्यानें संशोधनाच्या व्यापक कार्याला उत्तेजन दिलें आहे.

अर्थात् हा दुसरा हेन्री फोर्ड संपत्ति व लौकिक यांतच जन्मला असल्यानें तो अपवादात्मक आहे. पण नऊ हजार धंदेवाल्यांच्या चरित्राची पाहणी करतां असें आढळून आलें आहे कीं, आपल्या कर्तबगारीखेरीज कांहींहि अधिक भांडवल जवळ नसलेला तरुण आजवर धंद्याला लागला तर धंद्यांतील उच्च अशा कार्यकारी पदावर शेवटीं चढून जाण्याला त्याच्या बापाच्या आज्याच्या वेळेपेक्षां आज पुष्कळच अधिक संधि आहे. आणि बड्या धंद्यांतच ही संधि जास्तींत जास्त मिळते. मजुरांचे मुलगे मॅनेजराच्या गटांत येण्याचा संभव गेल्या पन्नास वर्षांत दुप्पट वाढला आहे. पण धंद्याला उपयुक्त अशी कॉलेजची पदवी ही यशाची फार मोठी हमी होय. कारखानदारांच्या जांवयापेक्षांहि पदवीधराला बढती अधिक मिळते.

धंद्यांत यशस्वी होणारा माणूस कसा असतो? त्याच्या भावनांवर त्याचा

ताब्रा असतो. आईबापांवर तो अवलंबून राहत नाहीं. अपयशाची भीति तो सदा बाळगतो व तें टाळण्यासाठीं झटतो. आपल्या वरिष्ठांशीं तो एकरूप राहतो. तो लोकांत फिरतो, लोकांच्याबरोबर कामें करण्यांत आनंद मानतो, सदा कामांत आहों ही मनःस्थिति त्याला आवडते, आपल्यासाठीं काम करण्यांत लोकांना आनंद कसा वाटायला लावावा हें त्याला माहीत असतें, आणि आपल्या अंगच्या कल्पनाशक्तीचा उपयोग कंपनी, कंपनीचा माल व कंपनीचीं धोरणें यांच्या प्रगतीच्या कामीं वापरण्याची तीव्र इच्छा त्याला असते. तो बुद्धिवादी असतो त्यापेक्षां तो अधिक बुद्धिवान् असतो.

हल्लींच्या बड्या धंदेवाल्यांनीं स्वतःचा लहान धंदा क्वचितच स्वतः चालविलेला असतो. कंपनीच्या शेअर्सपैकीं अल्पसंख्य शेअर्स खरेदी करून कंपन्या ते चालवतात. धंदेचालकांतील ७२ टक्के सर्व श्रेष्ठ लोक याच जातीचे धंदेवाले आहेत. यांतील फक्त कांहीं थोडे लोकच दूरगामी निर्णय ठरवितात. शिखरावर कांहीं माणसें अशीं असतात कीं तीं चटकन् धंद्यांतून सरकारांत जातात अथवा लष्करी नोकरींतून धंद्यांत येतात. त्यांच्या निर्णयांचे बरेवाईट परिणाम साऱ्या देशावर होत असतात. पण हीं माणसें नेहमीं मनसोक्त वागूं शकतील असें मानणें म्हणजे लोकमत व इतर नियंत्रक दडपणें यांचें महत्त्व कमी मानण्यासारखें आहे. सरकारवर जेवढी प्रचंड जबाबदारी असते तेवढी जबाबदारी बड्या धंद्यानें बडा होणाऱ्यावर येते. सरकारप्रमाणेंच नेतृत्वाची अथवा दडपणाची त्याची शक्ति मर्यादित असते. लोकमत हेंच अखेर निर्णायक ठरतें.

हल्लीं व्यवस्थापक मंडळांतील लोकांवर एक गंभीर आरोप करण्यांत येतो तो असा कीं ते वैयक्तिक मूल्यें विसरतात व गटांत विलीन होतात. पुढाऱ्याच्या जागीं कमिटी आली आहे, गटांनीं निर्णय घेतले जातात व वैयक्तिक निर्णयशक्तीला वाव राहत नाहीं अशी ही तक्रार आहे. पण या टीकेंत एक गोष्ट लक्षांत घेतली जात नाहीं ती ही कीं व्यक्ति व व्यक्तिसमूह हीं मानवी व्यक्तित्वाचीं परस्परपूरक अंगें आहेत. हल्लीं व्यक्तीपेक्षां गटाला फाजील अधिक महत्त्व दिलें जात आहे हें खरें. पण पूर्वीं प्रशंसिल्या गेलेल्या खडबडीत व्यक्तित्वापेक्षां आजच्या या व्यक्तिसमूहांत अधिक गुण आहेत व आज त्यावर भर देण्यांत जो अतिरेक होतो तो कालांतरानें नाहींसा होईल.

एक गोष्ट खरी कीं पूर्वीं बडे धंदेवाले स्वतः बसल्या बैठकीला जे निर्णय घेत त्याचे जागीं अनेक क्षेत्रांत तज्ज्ञांचे निर्णय येऊं लागले आहेत. या फरका-बरोबरच दुसराहि एक फरक घडून आला आहे तो हा कीं आतां चढाओढीनें

दुसऱ्याला मागें रेटून पुढें जाण्याऐवजीं दुसऱ्याला बरोबर घेऊन जाण्याची प्रवृत्ति वाढली आहे. अथवा आतां जर दुसऱ्याच्या पुढें जायचें असलें तर प्रतिस्पर्ध्यांना पायाखालीं न तुडवतां बरोबर घेऊन जावें लागतें असें म्हणतां येईल.

हल्लीं व्यवस्थापकांना आपला कारखाना हा लोकांना आवडावा असें वाटतें. आपल्या कचेऱ्या व दुकानें आकर्षक असावीं, जाहिरातदारांना व गिऱ्हाइकांना आपला माल प्रशंसनीय वाटावा असें हल्लींच्या व्यवस्थापकांना वाटतें. लोकांना आवडणारे रेडिओ व टेलिव्हिजन प्रोग्रॅम्स, मालक व कामगार यांच्यांत स्नेहाचे संबंध, समाजांत आपणाकडे येऊं शकणारें नेतृत्व, आधुनिक यंत्रें व साधनें यांचा वापर आणि योग्य प्रमाणांत नफा, स्नेहभावाचीं पत्रें व कंपनीच्या कामाचे रिपोर्ट यांनीं खूष ठेवण्यांत आलेले भागीदार या गोष्टींची आवड वाटण्याइतका व्यवस्थापकवर्गाचा दृष्टिकोन सुधारला आहे.

यासाठीं आपल्या कामांत वाकबगार असा व्यवस्थापकवर्ग असावा लागतो आणि धंद्यांचा कारभार या दृष्टीनें शिकविल्या जाणाऱ्या विद्यालयांतूनच असे मॅनेजर मिळूं शकतात. अशा शाळांतील पदवीधर मिळविण्यासाठीं धंदेवाल्यांची आपसांत चढाओढ चालते. सामाजिक जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडणें हें नवें ध्येय कॉर्पोरेशन्सनीं व्यापक प्रमाणावर स्वीकारलें आहे.

प्रकरण बारावें

# वांटणीप्रधान अर्थसंघटना

अमेरिकेची अर्थसंघटना 'धनोपभोगप्रधान' आहे असें मत थॉर्नस्टीन वेब्लेन यानें व्यक्त केलें आहे. यावर खरोखर असें म्हणतां येईल कीं, आजचें युग विपुलतेचें असल्यानें अधिकांत अधिक लोकांना धन वांटणें हें आमच्या अर्थसंघटनेचें फार ठळक वैशिष्ट्य झालें आहे. या बाबतींत अधिक चांगली परिस्थिति येऊं शकेल हें खरें, तरीपण कामगारांना पूर्वी उत्पन्न धनाचा वांटा जेवढा मिळत असे त्यापेक्षां बराच अधिक मोठा वांटा हल्लीं मिळतो आणि त्यासाठीं त्यांना पूर्वीपेक्षां पुष्कळच कमी वेळ काम करावें लागतें.

येथें एक चमत्कारिक प्रश्न उत्पन्न होतो. आज हे कामगार अधिक फुरसत मागत आहेत आणि ती मिळाल्यास आपण ती फुरसत कशी कशी घालवूं हें मोठ्या आशाळभूतपणें सांगत आहेत. पण या कामगारांचें काम, समजा, आणखी कमी झालें व कारखान्यांत कामगारांना फारच थोडें राहावें लागलें तर ? तर मग आपला तो पूर्वीचा कारखाना, तेथला तो सामाजिक गोडवा, तेथल्या त्या रंगीत भिंती व यंत्रें, तेथला तो उत्तम रंग, कॉफीची सुटी, आरामशीर खुर्च्या याबद्दलच्या आठवणीहि त्यांना त्या वेळीं अशाच आशाळभूतपणानें होतील काय ? पुढील काळांत यंत्रांची फारच वाढ होऊन आठवड्यांतून दहा-बारा तासच काम करावें लागेल त्यावेळीं आपण आठवड्यांतील तीस अथवा चाळीस तासहि मोठ्या तालबद्ध कामांत घालवीत होतों असें मोठ्या अभिमानानें हे लोक आपल्या मुलाबाळांना सांगतील काय ?

हल्लीं कामगाराला मिळणाऱ्या कामापासून इतर अनेक गोष्टींचा लाभ होतो प्रत्येक कामाबरोबर त्याचा दर्जा असतो व काम हें सामाजिक दर्जा मिळविण्याचें साधन बनतें. कामामुळें माणसामाणसाचे स्नेह व तज्जन्य आनंद मिळतो. (कधीं

कधीं त्यांतूनच मनोभंगहि होतो.) एकाच कामांतील कामगारांना एकमेकांच्या सहवासाची संधि मिळते, स्नेह वाढतो, त्या कामांत कामगाराला कौशल्य वापरण्याला संधि मिळून त्यामुळेंहि कामगारांना समाधान लाभतें.

येथें लोकसंख्या वाढते आहे आणि कामहि वाढतें आहे. देशांतील उत्पादक श्रमशक्तींत ५ लक्ष कामगारांची भर दरसाल पडत आहे. शेतीबाहेरच्या कामगारांपैकीं फक्त सुमारें एकतृतीयांश कामगार कारखान्यांत आहेत. आणखी एक तृतीयांश वाहतूक, मालविक्री, बँका, दळणवळण वगैरे उद्योगांत आहेत. उरलेले एकतृतीयांश खाणी, जंगल, मच्छीमारी, बांधकाम, सरकारी नोकऱ्या व बौद्धिक व्यवसाय यांत आहेत. मालाच्या उत्पादनांत एकूण जी श्रमशक्ति खर्चिली जाते तीपैकीं फक्त एक चतुर्थांशाहूनहि कमी शक्ति मानवी आहे. यंत्रें माणसांची उत्पादनशक्ति वाढवीत आहेत व त्याबरोबरच उत्पादनांतील मानवी श्रमप्रमाण सतत कमी कमी होत आहे. अमेरिकेसमोर आतां अधिक उत्पादन कसें करूं हा प्रश्न नसून अधिक धनोपभोग घेऊं कसा हा प्रश्न आहे. धन अधिकाधिक उपभोगण्यावर हा जोर भर दिला जात आहे त्याचा परिणाम सर्व समाजावर होत आहे.

माल उत्पादनांत माणसांची संख्या कमी कमी होत असतां नोकऱ्यांतील स्त्रियांची संख्या मात्र वाढत आहे. १९५० सालीं नागरी नोकऱ्यांत स्त्रियांची संख्या ३० टक्के होती. यांत्रिक विकासामुळें कारखान्यांतील कामाचे तास कमी होत गेल्यास विवाहित स्त्रिया नवऱ्यांनीं आपल्याइतकें घरकाम करावें अशी अपेक्षा करतील काय? कीं या स्त्रिया स्वतःच कारखान्यांतलीं कामें सोडून देतील? यांपैकीं कांहींहि घडलें तरी यंत्रविकासाचा परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होणार असा त्याचा अर्थ आहे.

देशांतील अनेक रोजगारांत स्त्रिया असल्या तरी त्यांनीं कमी पगाराच्या नोकऱ्या घ्याव्या अशी अपेक्षा असते. पण स्त्रियांना अधिकाधिक मान्यता मिळत आहे. यंत्रानें माणसांच्या धर्मांचें महत्त्व जसजसें कमी होत जाईल तसतसा स्त्रियांचा कारखान्यांतला कार्यभाग वाढत जाईल व पुरुषाशीं त्या क्षेत्रांत त्यांना समानता मिळेल. अनेक व्यवसायांत स्त्रियांना उच्च दर्जा मिळालाच आहे. शिक्षण हें तर बहुंशीं व वैशिष्ट्यपूर्ण रीतीनें स्त्रियांवरच सोपविलेलें असून ऑफिस 'गृहिणी'—कीं जिच्यावांचून ऑफिसांतील मुख्याधिकाऱ्याचें कांहींच काम होत नाहीं—ही कचेऱ्यांतून अत्यवश्य मानली गेलेली भूमिका स्त्रियाच करीत आहेत.

दुसऱ्या महायुद्धानें ज्याप्रमाणें स्त्रियांना उद्योगधंद्यांत आपलें कर्तृत्व

गाजविण्याची संधि मिळाली तसाच निग्रोनाहि दुसऱ्या महायुद्धाचा फायदा झाला. युद्ध संपलें त्यावेळीं सामाजिक सुरक्षिततेचें तत्त्व ज्या धंद्यांना लागू आहे अशा धंद्यांतील ९·७ टक्के जागा निग्रोंना मिळाल्या असून एकंदर लोकसंख्येंत निग्रोंचें प्रमाणहि ९·७ टक्केच आहे. दक्षिण प्रदेशांतून अनेक निग्रो अधिक चांगली संधि बाहेर मिळते म्हणून बाहेर गेले आणि दक्षिणेबाहेरच्या १५ राज्यांत गेल्या पांच वर्षांत वर उल्लेखिलेल्या धंद्यांत निग्रोंचें प्रमाण दुप्पट झालें.

मानवी श्रम जेथें फार भारी पडतात अशा सर्व क्षेत्रांत यंत्रें आणून एकंदर श्रमशक्तीचा दर्जा वाढविण्यांत आला आहे. आतां तीं यंत्रें चालविण्यासाठीं कमीअधिक कौशल्ययुक्त कारागीर लागतात. युरोपीय निरीक्षकांना अमेरिकन धंद्यांत तीन वैशिष्ट्यें दिसतात. त्यांतलें माणसांच्या जागीं यंत्रें आणणें हें पहिलें वैशिष्ट्य होय. दुसरीं दोन वैशिष्ट्यें म्हणजे कारखान्याच्या व्यवस्थापकाचें काम हें आतां एक समाजकल्याणकार्य बनलें आहे हें एक आणि कंपन्यांची भागीदारी खूप दूरवर व असंख्य भागीदारांत वांटली गेल्यामुळें मालक हा व्यवस्थाखात्यांतून निघूनच गेला ही दुसरी.

कार्ल मार्क्सनें भांडवलशाहीसंबंधानें जीं भकास भविष्यें वर्तविलीं होतीं तीं सर्व उलटीं झालीं. कामगारांचें राहणीचें मान वाढत आहे, त्यांचे कामाचे तास कमी होत आहेत, लोकांना मिळणारी मिळकत अधिक समान प्रमाणांत वांटली जात आहे. मार्क्सच्या अपेक्षेविरुद्ध घडणारी आणखी एक गोष्ट म्हणजे वासाहतिक साम्राज्यें मोडत चाललीं आहेत अथवा साम्राज्यकर्ते राजीखुषीनें तीं साम्राज्यें सोडून देत आहेत आणि शेतकऱ्याची पिळणूक होण्याऐवजीं शेतीला मदत केली जात आहे. कामाचे तास कमी होण्यानें झालेलें नुकसान यंत्रांची उत्पादनशक्ति जास्त असल्यानें व दीर्घ कालापेक्षां थोडा काल काम करण्यांत कामगार अधिक वेगानें व अधिक बिनचूकपणें काम करतो यामुळें भरून निघत आहे.

कामाचे तास कमी होत असतां मजुरीचे दर वाढत आहेत. पूर्ण रोजगारीवर असलेल्या सर्व पुरुषांचें रोजगारीचें सरासरी मान दरसाल बेचाळीसशें डॉलर व स्त्रियांचें सत्तावीसशें डॉलर या आश्चर्यकारक वाटण्याइतक्या उच्च पातळीवर गेलें आहे. कामगारांच्या हिश्शाला जाणारें राष्ट्रीय उत्पन्नाचें प्रमाण वाढतें आहे. दर तासास दरमाणशीं उत्पादन २ टक्यांनीं वाढत असून त्याच प्रमाणांत खरेदीशक्ति वाढत आहे आणि ही खरेदीशक्ति अधिक व्यापक प्रमाणांत वाटली जात आहे. कामगारांना आपल्या संघटनांमार्फत सामुदायिक करार करतां यावे, कामावर

जाणाऱ्या बायकामुलांना संरक्षण मिळावें, कामाचे किमान तास आणि मजुरांना किमान मजुरी ठरविली जावी, सेवानिवृत्त कामगारांना अथवा मृत कामगारांच्या अवलंबितांना पेन्शन दिली जावी, बेकारांची काळजी घेतली जावी, कामगारांना धंद्यांचें शिक्षण मिळावें, कामावर असतांना कामगारांना संरक्षण मिळावें, कामावर असतां इजा झाल्यास त्याबद्दल भरपाई मिळावी इत्यादींसाठीं सरकारनें अनेक कायदे केले असून कामगारांना उत्पन्न धनाचा न्याय्य वांटा मिळावा यासाठीं वाटाघाटी करतां याव्या याच हेतूनें हे कायदे केलेले आहेत.

अमेरिकेंतील कामगारसंघटनांची चळवळ ही साऱ्या जगांत सर्वांत मोठी असून वरीलपैकीं सर्व नव्हे तरी बरेचसे फायदे त्या संघटनांनीं मालकवर्गाशीं झगडून मिळविले आहेत. सुमारें १ कोटी ८० लक्ष स्त्रीपुरुष कामगार म्हणजे बिगरशेती कामगारांपैकीं एकतृतीयांश कामगार संघटनांमध्यें आहेत. एका काळीं मालक वर्गानें या कामगारसंघटनांशीं निकराचा लढा दिला. आतां मात्र लढ्याची जागा दोन समान पक्षांतल्या वाटाघाटींनीं घेतली असून या वाटाघाटी जरी हल्लीं अगदीं अटीतटीनें होतात तरी त्या सौजन्यानें होतात. या वाटाघाटी पुष्कळदां एकेका सबंध धंद्याबाबत होतात. मात्र एकेका भौगोलिक क्षेत्रांतला तो सबंध धंदा त्या वाटाघाटींनीं व्यापलेला असतो.

१९५५ सालीं अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर व कॉंग्रेस ऑफ इंडस्ट्रिअल ऑर्गनायझेशन या दोन प्रचंड कामगार संघटना एकमेकींत विलीन झाल्या. तेव्हां कामगारांची फार मोठी बहुसंख्या एकाच प्रकारच्या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं संघटित झाली आहे. सामान्यतः कामगार हा आपल्या सर्व धंद्याच्या राष्ट्रीय संघटनेंतील 'स्थानिक' शाखेचा सदस्य असतो; उदाहरणार्थ 'युनायटेड ऑटोमोबाइल वर्क्स' ही अशी मोटारधंद्यांतल्या अनेक विभागांतल्या कामगारांची अखिल राष्ट्रीय संघटना आहे, लिथोग्राफर्स यूनिअन हीहि लिथोग्राफींतल्या निरनिराळ्या विभागांतील कामगारांची सार्वराष्ट्रीय संघटना आहे. एकेका धंद्याच्या अशा 'स्थानिक' संघटना साऱ्या देशभर पसरल्या असून यांची संख्या सत्तर हजारांवर आहे. अमेरिकेंतील घटक राज्यें जशीं स्वायत्त आहेत अथवा राष्ट्रव्यापी पक्षांच्या संघटना जशा स्वायत्त आहेत त्याचप्रमाणें एकेका धंद्यांतल्या स्वायत्त संघटनांनीं मिळून बनणारी त्या धंद्यांतली सार्वराष्ट्रीय संघटनाहि स्वायत्त असते. मध्यसत्तेचें नियंत्रण अमेरिकनांना राजकारणाप्रमाणें इतर क्षेत्रांतहि नकोसेंच वाटतें. 'फेडरॅलिझम'चें तत्त्व अमेरिकनांना सर्व क्षेत्रात सारखेंच प्रिय आहे.

कामगार संघटनांचें मुख्य काम सामुदायिक करार करणें हें असतें. वाटाघाटींतले प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणें असतातः (१) कराराचें स्वरूप, त्याचा काल व त्यानंतर तो पुढें चालू ठेवण्याची तरतूद; संप आणि कुलुप टाळण्याचीहि तरतूद; (२) कामगारसंघटना आणि कारखानाव्यवस्थापक मंडळ यांचे हक्क, कामगारसघटनांना मान्यता आणि कामगारांना रोजगारीवर नेमतांना त्याबाबत कामगारसंघटनेचा हक्क; (३) नुकसानभरपाई, रोजगारीचे दर, वाढीचे दर, पेन्शन, आरोग्य फंड, पगारी सुट्या यांसारख्या पुरवणी सवलती; (४) नोकरीची मुदत, बढती, नोकरींतून कमी करणें, फिरून कामावर घेणें; (५) कारखान्यांत कामावर असतावेळीं आरोग्य, सुरक्षितता, कामाचा वेग, कामाचे रोजचे तास व आठवड्याचे दिवस.

कामगारसंघटनांना जाहीरपणें मान्यता देण्याचा हा प्रकार अगदीं अलीकडला असून मालकवर्ग त्यासंबंधानें तक्रार करतो. परंतु कामगारांना देण्यांत येणारी मान्यता ही आतां अमेरिकन जीवनाचा एक भागच होऊन राहिली आहे. पण कामगारांना मिळालेली ही नवी शक्ति वापरतांना ते असे फायदे मागतील कीं त्यामुळें चलनफुगवट होईल अशी भीति वाटते. त्याचप्रमाणें कामगारसघटनांच्या शक्तीपुढें नमतें घेतांना मालकवर्गांचा जो उत्पादनखर्च वाढेल तो ते सामान्य नागरिकांकडून (वाढीव किंमतींनीं) वसूल करतील हीहि भीति आहेच.

कामगारसंघटनेंतील कामगारांचें कल्याण हें मालकवर्ग व सामान्य जनता यांच्या कल्याणाशीं जुगलेलें असतें ही गोष्ट आतां पुष्कळ कामगारसंघटनांना पटलेली आहे. 'उदाहरणार्थ ॲमलगमेटेड क्लोदिंग वर्कर्स यूनिअन' ही कामगार-संघटना कारखान्यांतील कामाचें सातत्य ठेवणें, उत्पादनाचीं प्रमाणें ठरविणें, माणसांनीं हातांनीं करावयाच्या कामासाठीं यंत्रें लावणें, एका ठिकाणीं कमी केलेले कामगार दुसरीकडे कामाला लावणें, भांडवलासाठीं कारखान्याला कर्जें देणें इतक्या बाबींत मालकांना साहाय्य करते. दि इंटरनॅशनल लेडीज् गार्मेंट्स यूनिअन या कामगार संघटनेचें स्वतांचे एंजिनिअर्स आहेत. ते उत्पादनशक्ति वाढविण्यासाठीं मालकांना साहाय्य करतात. सर्वांत अधिक यशस्वी झालेल्या कामगारसंघटनांना हें माहीत आहे कीं मजुरीचे दर वाढवून कामगारांचे इतर अनेक फायदे वाढविण्याचा मार्ग उत्पादनशक्ति वाढविणें हाच आहे. म्हणून उत्पादनवाढीला साहाय्य करून वाढलेल्या उत्पादनांतील योग्य वांटा कामगारांना मिळाला कीं नाहीं याची या संघटना काळजी घेतात. कामगारांना आपल्या मागण्या योग्य आहेत कीं नाहीत हें ठरवितां येण्यासाठीं कंपनीचे कागदपत्र पाहायला मिळावे असें वॉल्टर रूथर यांजसारख्या कामगारपुढाऱ्यांचें

मत आहे. देशाची आर्थिक प्रगति झाली म्हणजे तींतूनच कामगारांनीं आपले सामाजिक फायदे मिळवावे असें हे पुढारी प्रतिपादतात.

कामगारांना हेंहि कळून चुकलें आहे कीं सरकारची मदत घेण्यापेक्षां स्वतःच संघटितपणें कारखानदारांशीं वाटाघाटी करणें हें अधिक हितकर असतें. जरी कामगार-संघटनांच्या राजकीय कमिट्या असतात, आपणाशीं स्नेह ठेवणाऱ्या कॉंग्रेसमनाला निवडून आणण्यासाठीं जरी कामगार-संघटना खटपट करतात तरीपण कामगार-संघटनांत राजकीय मनोवृत्ति कमी असून त्या धंद्याच्या दृष्टीनेंच आपले व्यवहार चालवितात.

या पद्धतीनें कामगारांचें कल्याणच झालें आहे. कामगार-संघटनांमार्फतच माणसें कामावर घेण्याचें तत्त्व बड्या धंदेवाल्यांकडून कामगार-संघटनांनीं १९४१ सालीं मान्य करून घेतलें, आरोग्याचे व लोककल्याणाचे कार्यक्रम १९४६ सालीं मिळविले, सामाजिक सुरक्षिततेबरोबरच पेन्शनचा हक्क १९४९ सालीं कामगार-संघटनांनीं मान्य करून घेतला, राहणीखर्चाच्या प्रमाणांत पगाराचे दर हें तत्त्व १९५० सालीं त्यांना मिळालें, फेडरल योजनेंत बेकारीचा भत्ता आहे त्याशिवाय कारखानदारांकडूनहि बेकारीचा भत्ता १९५५ सालीं कामगार-संघटनांनीं मिळविला. कामगारांचें कल्याण ही कारखान्याच्या व्यवस्थापकांची जबाबदारी होय हें तत्त्व कामगार-संघटनांनीं आतां मान्य करून घेतलें आहे.

आतां स्वतः कामगारसंघटना याच बड्या भांडवलदार झाल्या आहेत. कारण त्यांनीं मोठमोठ्या रकमा सुरक्षित सरकारी रोख्यांत गुंतविल्या आहेत. युनाइटेड ऑटोमोबाइल वर्कर्स या एकट्या संघटनेनें चार कोटि डॉलर्सचे सरकारी रोखे घेतले आहेत. ए. एफ्. एल्. सी. आय्. ओ. या संघटनेच्या मध्यवर्ती कचेरीचें दरसालचें बजेट ८० लक्ष डॉलर्सचें आहे. या संघटना आपल्या पुढाऱ्यांना चांगले पगार देतात. जॉर्ज मीनी हा ए. एफ्. एल्. सी. आय्. ओ. (अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर व कॉंग्रेस ऑफ इंडस्ट्रिअल ऑर्गनायझेशन या दोन संघटनांची जोड-संघटना) अध्यक्ष असून त्याला ३५ हजार डॉलर्स पगार आहे. कांहीं सार्वराष्ट्रीय संघटनांच्या प्रमुखांना याहूनहि अधिक मोठे पगार मिळतात. स्टील वर्कर्स यूनिअनचा अध्यक्ष डेव्हिड मॅक्डोनाल्ड याला ४० हजार डॉलर्स पगार मिळतो.

कामगार-संघटनांची चळवळ प्रथम सरकारच्या स्नेहभावपूर्ण पाठिंब्यानें वाढली. पुढें स्वतः पुढाऱ्यांनीं आपली शक्ति योग्य प्रकारें वापरून कामगार-संघटनेचीच चळवळ अधिक बलवान् केली. आतां कामगार-संघटना या मालकवर्गाच्या

विरुद्ध आपलें वजन टाकीत असल्यानें श्रमाचें फळ जास्तींत जास्त लोकांना मिळण्याला त्यांची मदत होते. त्यामुळें अमेरिकन अर्थसंघटना निरोगी व जोमदार राहते.

कामगार-संघटना आणि कारखाना-व्यवस्थापक यांच्यांत एकाद्या कराराबाबतच्या वाटाघाटी जर अपयशी ठरल्या तर फेडरल मीडिएशन अँड कन्सीलिएशन सर्व्हिस ही सरकारी संघटना दोन्ही पक्षांच्या संमतीनें मदतीसाठीं बोलावतां येते. ज्यांतून संप निघाले असते असे हजारों वाद दरसाल ही संघटना मिटवते. सामुदायिक कराराच्या पद्धति ठरविणें, त्या बाबतींतील अन्याय्य व्यवहार टाळणें, कामगारांच्या मतदानावर देखरेख करणें, यासारख्या बाबींत लेबर रिलेशन्स बोर्ड, बोलावलें असतां, मदतीला येतें. या सर्व कारणांनीं संप आतां वरचेवर होत नाहींत आणि होतात तेव्हांहि वातावरण फार चांगलें असतें. संपांत १९३०-४० च्या कालांतील रक्तपाताचीं व मालाच्या विध्वंसाचीं युद्धें होत नाहींत. १९५६च्या पोलादसंपांत कामगारांनीं भट्ट्यांचें नुकसान काळजीपूर्वक टाळलें. कांहीं समंजस कामगारांनीं कंपनीच्या मालमत्तेचें रक्षण करण्यासाठीं दरवाजे घट्ट मिटून धरले. दुसऱ्या कांहीं कामगारांनीं मालकाकडून पगारी रजा घेऊन आपल्या कुटुंबासह चांगल्या हवेच्या ठिकाणीं संपाची सुटी घालविली.

कारखान्यांत जुने मालक-व्यवस्थापक नाहींसे होऊन त्यांच्या जागीं ज्याप्रमाणें धंदेवाईक व तज्ज्ञ व्यवस्थापक आले त्याप्रमाणें कामगारांत क्षोभ माजविणारे व अशिक्षित कामगारपुढारी जाऊन त्यांची जागा आतां धंदेवाईक कामगार-पुढाऱ्यांनीं—यांत वकील, अर्थशास्त्रज्ञ, पुढारी, शिक्षक असे अनेक उच्च श्रेणींतले लोकहि आहेत—घेतली आहे. कामगार-चळवळीमार्फत सहारों वृत्तपत्रें व नियतकालिकें प्रसिद्ध होतात. ज्यांना कामगार-संघटनेची चळवळ हेंच चरितार्थाचें साधन बनवायचें आहे अशांना शिक्षण देण्यासाठीं इंटरनॅशनल लेडीज गार्मेंट्स वर्कर्स यूनिअन या संस्थेनें एक पूर्णवेळ शाळा स्थापली आहे. विस्कॉन्सिन विद्यापीठामार्फत कामगारांसाठीं एक उन्हाळ्याचा वर्ग चालतो, त्यांत बहुमोल असें अनुभवात्मक शिक्षण मिळतें. कारखान्यांचे व्यवस्थापक ज्याप्रमाणें सामाजिक कार्यांत भाग घेतात त्याप्रमाणें कामगार-संघटनाहि सामाजिक कार्य करतात. कामगार-संघटनेंतील माणसें सिव्हिक बोर्डांत निवडून येतात आणि सार्वजनिक कामाला अवश्य असे फंड जमविण्याचेंहि कार्य करतात.

कामगार-संघटनांना मोठी शक्ति प्राप्त झाल्यामुळें अनेक अडचणीहि निर्माण झाल्या आहेत. मोठ्या धंद्यांत सामुदायिक करार होऊं लागल्यानें किंमती,

रोजगारी, व धंदा कोठें उभारावा यासंबंधींचा निर्णय, इत्यादि अर्थसंघटनेंतील महत्त्वाच्या बाबींवर या करारांचा परिणाम होतो. संघटनाचे पुढारी मतदान-संख्येवर आपला ताबा ठेवण्यासाठीं संपांचा उपयोग करतात, संघटनेच्या सभासदांवर भारी फी लादतात, सत्ताधारी गटाच्या हुकुमशाहीला विरोध करणाऱ्यांना नोकरींतून हाकलू शकतात.

कांहीं कामगार-संघटनांत पुढाऱ्यांची हुकुमशाही व लोकशाहीची गळचेपी इतक्या थराला पोंचली आहे कीं तो साऱ्या राष्ट्राच्या बदनामीचा विषय झाला आहे. म्युझिसिअन्स यूनिअन व टीम्स्टर्स यूनिअन हीं या प्रकाराचीं उदाहरणें आहेत. इंटरनॅशनल लाँग शोअरमेन्स असोसिएशन ही संघटना तर इतकी डोईजड झाली कीं ए. एफ्. एल्. सी. आय्. ओ. ही मध्यवती संघटना तिला शिस्त लावूं शकेना, तेव्हां लाँग शोअरमेन्स असोसिएशनला मध्यवर्ती संघटनेंतून हाकून लावावें लागलें. फार मोठ्या शहरांत बांधकाम-धंद्यांत बांधकाम-काँट्रॅक्टर्स आणि बांधकाम मजूर संघटना यांच्या संगनमतानें एक फार मोठी फसवेगिरी चालू असते. या कंत्राटदाराच्या हातीं धंद्याची हक्कदारी आली आहे. कामगार-संघटना अधिक सभासद घेत नाहींत, कामाचा वेग दोघाच्या संगनमतानें कमी करण्यांत येतो, नियंत्रक कायद्यांना उत्तेजन देण्यांत येतें, बांधकामात नव्या कल्पनांना मज्जाव करण्यांत येतो, किंमती उच्च पातळीवर ठेवण्यांत येतात आणि यामुळें एकंदर अर्थसंघटनेंत बांधकामाचा धंदा अतिशय मागें राहतो. कामगारसंघ व फसवे कंत्राटदार यांमधील हीं कारस्थानें आताच चव्हाट्यावर आलीं आहेत.

तरीपण आधुनिक कामगार-चळवळ ही कामगाराला संरक्षणाची जी गरज आहे तींतून निघाली व तें काम तीं करते आहे खास. कामगाराचा रोजगार हें एकच एक त्याचें चरितार्थाचें साधन असून तो रोजगार गेल्यास कामगार अगदीं अधातरीच होतो. या संकटांत संघटनाशक्ति त्याच्या मदतीला येते. या पराधीन कामगाराची बाजू माडणें व त्याचा बचाव करणें हीं कामें कामगार-संघटना करतात. पण अजून एकदर कामगारापैकीं फक्त एकतृतीयांशाहून कमी कामगार संघटित झालेले आहेत. दक्षिण प्रदेश, रासायनिक धंदे, ऑफिसनोकरवर्ग यांत अजून पुरेशी कामगार-संघटना झालेली नाहीं. पण हीं क्षेत्रें व्यापण्यासाठीं कामगार संघटना जोरदार तयारी करीत आहेत.

दुसऱ्या महायुद्धानतर अमेरिकन कामगार-संघटनांनीं आंतरराष्ट्रीय कामगार संघटनाकार्याला जी चालना दिली तीवरून अमेरिकन कामगार संघटना या सामाजिक संस्था या नात्यानें परिपक्व झाल्या आहेत हें सिद्ध होतें. ए. एफ्.

विरुद्ध आपलें वजन टाकीत असल्यानें श्रमाचें फळ जास्तींत जास्त लोकांना मिळण्याला त्यांची मदत होते. त्यामुळें अमेरिकन अर्थसंघटना निरोगी व जोमदार राहते.

कामगार-संघटना आणि कारखाना-व्यवस्थापक यांच्यांत एकाद्या कराराबाबतच्या वाटाघाटी जर अपयशी ठरल्या तर फेडरल मीडिएशन अँड कन्सीलिएशन सर्व्हिस ही सरकारी संघटना दोन्ही पक्षांच्या संमतीनें मदतीसाठीं बोलावतां येते. ज्यांतून संप निघाले असते असे हजारों वाद दरसाल ही संघटना मिटवते. सामुदायिक कराराच्या पद्धति ठरविणें, त्या बाबतींतील अन्याय्य व्यवहार टाळणें, कामगारांच्या मतदानावर देखरेख करणें, यासारख्या बाबींत लेबर रिलेशन्स बोर्ड, बोलावलें असतां, मदतीला येतें. या सर्व कारणांनीं संप आतां वरचेवर होत नाहींत आणि होतात तेव्हांहि वातावरण फार चांगलें असतें. संपांत १९३०-४० च्या कालांतील रक्तपाताचीं व मालाच्या विध्वंसाचीं युद्धें होत नाहींत. १९५६च्या पोलादसंपांत कामगारांनीं भट्ट्यांचें नुकसान काळजीपूर्वक टाळलें. कांहीं समंजस कामगारांनीं कंपनीच्या मालमत्तेचें रक्षण करण्यासाठीं दरवाजे घट्ट मिटून धरले. दुसऱ्या कांहीं कामगारांनीं मालकाकडून पगारी रजा घेऊन आपल्या कुटुंबासह चांगल्या हवेच्या ठिकाणीं संपाची सुटी घालविली.

कारखान्यांत जुने मालक-व्यवस्थापक नाहींसे होऊन त्यांच्या जागीं ज्याप्रमाणें धंदेवाईक व तज्ज्ञ व्यवस्थापक आले त्याप्रमाणें कामगारांत क्षोभ माजविणारे व अशिक्षित कामगारपुढारी जाऊन त्यांची जागा आतां धंदेवाईक कामगार-पुढाऱ्यांनीं—यांत वकील, अर्थशास्त्रज्ञ, पुढारी, शिक्षक असे अनेक उच्च श्रेणींतले लोकहि आहेत—घेतली आहे. कामगार-चळवळीमार्फत सहाशें वृत्तपत्रें व नियतकालिकें प्रसिद्ध होतात. ज्यांना कामगार-संघटनेची चळवळ हेंच चरितार्थाचें साधन बनवायचें आहे अशांना शिक्षण देण्यासाठीं इंटरनॅशनल लेडीज गार्मेंट्स वर्कर्स यूनिअन या संस्थेनें एक पूर्णवेळ शाळा स्थापली आहे. विस्कॉन्सिन विद्यापीठामार्फत कामगारांसाठीं एक उन्हाळ्याचा वर्ग चालतो, त्यांत बहुमोल असें अनुभवात्मक शिक्षण मिळतें. कारखान्यांचे व्यवस्थापक ज्याप्रमाणें सामाजिक कार्यांत भाग घेतात त्याप्रमाणें कामगार-संघटनाहि सामाजिक कार्य करतात. कामगार-संघटनेंतील माणसें सिव्हिक बोर्डांत निवडून येतात आणि सार्वजनिक कामाला अवश्य असे फंड जमविण्याचेंहि कार्य करतात.

कामगार-संघटनांना मोठी शक्ति प्राप्त झाल्यामुळें अनेक अडचणीहि निर्माण झाल्या आहेत. मोठ्या धंद्यांत सामुदायिक करार होऊं लागल्यानें किंमती,

रोजगारी, व धंदा कोठें उभारावा यासंबंधींचा निर्णय, इत्यादि अर्थसंघटनेंतील महत्त्वाच्या बाबींवर या करारांचा परिणाम होतो. संघटनाचे पुढारी मतदान-संख्येवर आपला ताबा ठेवण्यासाठीं संपांचा उपयोग करतात, संघटनेच्या सभासदांवर भारी फी लादतात, सत्ताधारी गटाच्या हुकुमशाहीला विरोध करणाऱ्यांना नोकरींतून हाकलू शकतात.

कांहीं कामगार-संघटनांत पुढाऱ्यांची हुकुमशाही व लोकशाहीची गळचेपी इतक्या थराला पोंचली आहे कीं तो साऱ्या राष्ट्राच्या बदनामीचा विषय झाला आहे. म्युझिसिअन्स यूनिअन व टीम्स्टर्स यूनिअन हीं या प्रकाराचीं उदाहरणें आहेत. इंटरनॅशनल लाँग शोअरमेन्स असोसिएशन ही संघटना तर इतकी डोईजड झाली कीं ए. एफ्. एल्. सी. आय्. ओ. ही मध्यवती संघटना तिला शिस्त लावूं शकेना, तेव्हां लाँग शोअरमेन्स असोसिएशनला मध्यवर्ती संघटनेंतून हाकून लावावें लागलें. फार मोठ्या शहरांत बांधकाम-धंद्यांत बांधकाम-कॉंट्रॅक्टर्स आणि बांधकाम मजूर संघटना यांच्या संगनमतानें एक फार मोठी फसवेगिरी चालू असते. या कंत्राटदाराच्या हातीं धंद्याची हक्कदारी आली आहे. कामगार-संघटना अधिक सभासद घेत नाहींत, कामाचा वेग दोघाच्या संगनमतानें कमी करण्यांत येतो, नियंत्रक कायद्याना उत्तेजन देण्यांत येतें, बांधकामात नव्या कल्पनांना मज्जाव करण्यांत येतो, किंमती उच्च पातळीवर ठेवण्यांत येतात आणि यामुळें एकंदर अर्थसंघटनेंत बांधकामाचा धंदा अतिशय मागें राहतो. कामगारसंघ व फसवे कंत्राटदार यांमधील हीं कारस्थानें आतांच चव्हाट्यावर आलीं आहेत.

तरीपण आधुनिक कामगार-चळवळ ही कामगाराला संरक्षणाची जी गरज आहे तींतून निघाली व तें काम ती करते आहे खास. कामगाराचा रोजगार हें एकच एक त्याचें चरितार्थाचें साधन असून तो रोजगार गेल्यास कामगार अगदीं अधातरीच होतो. या संकटांत संघटनाशक्ति त्याच्या मदतीला येते. या पराधीन कामगाराची बाजू माडणें व त्याचा बचाव करणें हीं कामें कामगार-संघटना करतात. पण अजून एकदर कामगारापैकीं फक्त एकतृतीयांशाहून कमी कामगार संघटित झालेले आहेत. दक्षिण प्रदेश, रासायनिक धंदे, ऑफिसनोकरवर्ग यांत अजून पुरेशी कामगार-संघटना झालेली नाहीं. पण हीं क्षेत्रें व्यापण्यासाठीं कामगार संघटना जोरदार तयारी करीत आहेत.

दुसऱ्या महायुद्धानतर अमेरिकन कामगार-संघटनानीं आंतरराष्ट्रीय कामगार संघटनाकार्याला जी चालना दिली तीवरून अमेरिकन कामगार संघटना या सामाजिक संस्था या नात्यानें परिपक्व झाल्या आहेत हें सिद्ध होतें. ए. एफ्.

एल्. सी. आय्. ओ. ही अमेरिकन कामगारांची मध्यवर्ती संस्था परदेशच्या कामगार-संघटनाशीं आपले संबंध ठेवण्याबाबत अडीच लक्ष डॉलर खर्च करते. या संस्थेमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या ट्रेड युनिअन जर्नल्सच्या विदेशी आवृत्त्या काढण्यांत येतात, ब्रुसेल्समध्यें युरोपसाठीं एक कायमचा ब्यूरो चालविला जातो, आणि जगांतील सर्व कामगारासाठीं वाढतें राहणीमान व संघटनास्वातंत्र्याचा हक्क यांचा पुरस्कार केला जातो. परदेशांतून येणारे कामगार पुढारी अमेरिकन संघटनांचे पाहुणे म्हणून येतात आणि अमेरिकन पद्धति चालते कशी हें स्वतः पाहून जातात.

लेबर रिलेशन्स इन्स्टिटयूट या संस्थेनें चोवीस कारखान्यांतील कामगारांच्या फोरमेनना "तुमच्या कामगारांना कोणत्या गोष्टी विशेष मूल्यवान् वाटतात" असा प्रश्न विचारला होता. "चांगले पगार यांना पहिला क्रमांक आणि नोकरीची सुरक्षितता दुसरा क्रमांक" असें उत्तर त्या फोरमेननीं दिलें, पण व्यक्तिशः कामगारांनीं दिलेल्या उत्तरांत "इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां आपणांस स्वतंत्र-नागरिकाच्या दर्जानें वागविलें जावें ही गोष्ट विशेष मोलाची होय" असें त्यांनीं सांगितल्याचें आढळून आलें.

स्टॅंडर्ड ऑइल कंपनीच्या एका अधिकाऱ्याला कामगारांच्या ठिकाणीं अगदीं हाडीं मुरलेला असंतोष आहे असें आढळून आलें तेव्हां कंपनीच्या अध्यक्षानें कंपनीच्या कांहीं अडचणी कामगारांपुढें मांडण्यास सुरवात केली. त्याबरोबर कामगारांनीं ताबडतोब सहकारवृत्ति दाखविली. आपणाला विश्वासांत न घेतां उपेक्षेनें वागविलें जातें या समजुतीनें कामगारांत मुख्यतः तो असंतोष माजला होता.

कामगारांना उत्पादनशक्ति वाढविण्याबाबतचे निर्णय ठरविण्यांत व त्यामुळें मिळणाऱ्या नफ्यांत भागीदारी द्यावी ही गोष्ट फार महत्त्वाची आहे असें मत जोसेफ स्कॅलन यानें मांडलें आहे. अनेक महत्त्वाच्या कारखानदारांनीं त्याच्या योजना स्वीकारल्या आहेत. एकादा कामगार जेव्हां आपल्या कामाशीं सात्म्य पावतो त्यावेळीं बाहेरच्या कोणाच्या हुकुमापेक्षां अंतःस्फूर्तीनें अधिक काम करतो. तो आपण केवळ यंत्राच्या दात्यासारखे आहों असें मानीत नसून आपण एका टीमचे घटक आहों असें मानतो.

एका फ्रेंच तरुणीनें अलीकडे १० अमेरिकन कारखाने पाहिले व तेथील कार्यक्षमता पाहून तिनें आश्चर्य व्यक्त केलें. त्या कारखान्यांतील स्वच्छता, तेथील आरामाच्या सायी, माणसें व यंत्रें यांचें चालणारें नियमित सहकार्य (८७ मिनिटांत एक सबंध मोटार त्या कामगारांनीं जोडली), सर्व वस्तु सोयीस्करपणें

हाताशीं ठेवलेल्या असल्यामुळें कामगारांच्या कामांत आलेली सहजता, हें सर्व पाहून तिला नवल वाटलें. (आपणाला पाहायला आलेली सुंदर तरुणी निरखून पाहायलाहि कामगारांना वेळ मिळत होताच!) कारखान्यांत नळींतून ऐकविलें जाणारें संगीत, रात्रीं अभ्यास करणाऱ्या कामगारांना दिली जाणारी पैशाची मदत, वर्गकलहाचा संपूर्ण अभाव, कामगार व व्यवस्थापक यांनीं एकमेकास एकेरी संबोधणें, कारखान्यांत एकमेकांचे असणारे खेळीमेळीचे व समानतेचे संबंध हें सर्व त्या फ्रेंच तरुणीला फार आवडलें.

अमेरिकन धंद्यांतील 'सूचनापेटी' त्या तरुणीच्या नजरेस कदाचित् पडली नसेल. पण ती फार महत्त्वाची आहे. अमेरिकेंत या 'सूचनापेटी' ला फार महत्त्वाचें स्थान असून त्यासाठीं 'नॅशनल असोसिएशन ऑफ सजेशन्स सिस्टिम' ही संस्था काम करते. तिचे आठशें सदस्य आहेत. दरसाल येणाऱ्या सूचनांपैकीं दहा लक्ष सूचनांचा अहवाल ते देतात, त्यांतल्या अडीच लक्षाहून अधिक उपयोगांत आणल्या जातात, ७० लक्ष डॉलर एवढी रक्कम उपयुक्त व व्यवहार्य सूचना देणाऱ्या कामगारांत वांटली जाते आणि त्या सूचनांमुळें या रकमेपेक्षां कितीतरी अधिक किंमतीची बचत होते. उदाहरणार्थ, जनरल मोटर्स कंपनीनें कामगारांच्या ५४ हजार सूचना अमलांत आणल्या व त्यासाठीं ३२ लक्ष ३० हजार डॉलर्स एवढी रक्कम कामगारांना बक्षीस दिली.

"मालकानें सूचनावही उघडतांच 'मरून जा' अशी सूचना त्याला आढळली" अशी एक जुनी विनोदी कोटि कामगारांत पूर्वी रूढ असे. पण आतां असला विनोद कोणाला आवडत नाहीं. "पॉलिशिंग मशीनच्या पट्ट्याला जर हाताच्या नखावर चोळतात तें पॉलिश चोळलें तर त्या पट्ट्याला तिढा पडत नाहीं" अशी सूचना एका मुलीनें संशोधनपूर्वक केली असतां त्या शोधाबद्दल तिला ६ हजार ५९२ डॉलर्स बक्षिस मिळाले. तेव्हां आतां 'सूचनापेटी' हा कुचेष्टेचा विषय होऊंच शकणार नाहीं.

कांहीं कारखानदारांनीं कामगारांना नफ्याचा वांटा देण्याच्या योजना अमलांत आणल्या आहेत, तर दुसऱ्यांनीं कामगाराला आपल्या कामाबद्दल बौद्धिक आनंद व हौस वाटावी अशा योजना अवलंबल्या आहेत. कामगाराला आपलें काम हें एका मोठ्या कामाचाच भाग कसा आहे हें समजून देण्यांत येतें, प्रत्येकानें आपण एका टीमचा घटक आहों या भावनेनें काम केलें पाहिजे हें कामगारांच्या मनावर बिंबविण्यांत येतें, एका कारखान्यातील कामगाराचें आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता; विश्रांति या सर्व बाबतींत कामगारांना पूर्ण स्वायत्तता देण्यांत येते.

जनरल मोटर्स कंपनींतील करमणूकविभाग कामगार स्वतः चालवीत व त्यामुळें कामगारांना आपल्या कामांत समाधान वाटे असें आढळून आलें.

## सफेत-कॉलर वर्ग

कामगारांचें हित त्यांच्या संघटना पाहतात, पण परीटघडी कपड्यांच्या (व्हाइटकॉलर) कारकून वर्गाचें हित कोण सांभाळतो! १८७० पासून १९४० च्या सत्तर वर्षांत कारखान्यातील या वर्गाची संख्या १२ टक्क्यांपासून ४० टक्क्यांपर्यंत वाढली. विक्रेत व शिक्षक हे मोठे गटहि या वर्गातलेच होत. कामगाराचें वेतन इतकें वाढलें आहे कीं पुष्कळ कामगार कारकुनापेक्षां अधिक पैसा साचवितात. हिशेब व लघुलेखन ही या सफेत कपडेवाल्यांची महत्त्वाची कारागिरी. पण हिशेबांचीं यंत्रें आणि रेकॉर्डिंग मशीन्स यांनीं त्या कारागिरीचा भाव अगदीं पाडून टाकला आहे. कित्येक बौद्धिक कामगार, विशेषतः वकील, धंदेवाल्यांचे नोकर झाले आहेत. बुद्धिजीवी वर्गाची परिस्थिति अमेरिकेंत कशी आहे? सी. व्हाइट मिल्स म्हणतो, "युरोपांत इतके पुष्कळ बुद्धिजीवी लोक आहेत कीं त्यातील पुष्कळाना दीर्घकाल बेकार राहावें लागतें आणि ज्या परिस्थितींत त्यांना हे दिवस कंठावे लागतात तीमुळें त्यांचा सर्वस्वीं मनोभंग होतो. अमेरिकेंत इतके पुष्कळ बुद्धिजीवी लोक नाहींतच." पण मिल्सच्या मतें या बुद्धिजीवी वर्गावर औद्योगीकरणाचा परिणाम फार वाईट झाला आहे. त्यांचा दर्जा खालावला, त्यांच्या कामांत यंत्रें घुसल्यामुळें त्यांच्या कामाला कमीपणा आला, बड्या बड्या कॉर्पोरेशन्सवर त्यांचें जीवन अवलंबून राहूं लागलें, त्यांना स्वतंत्र कर्तृत्वाला वाव राहिला नाहीं आणि भविष्यकाळासंबंधानें ते सचिंत झाले आहेत. पण यंत्राबद्दल ही तक्रार करून यान्त्रिकीकरणाचें चाक उलटें फिरवितां येणार नाहीं. आज यंत्रामुळें वाढलेली उत्पादनशक्ति सर्वांच्या हिताकडे कशी लावावी, ज्याची जेवढी बौद्धिक कुवत असेल तितकें शिक्षण प्रत्येकाला घेता येईल अशी परिस्थिति फुरसतीचा योग्य उपयोग करून कशी निर्मावी, कामगाराप्रमाणें या बुद्धिजीवी लोकांच्याहि संघटना स्थापून त्यांचें बळ कसें वाढवावें इत्यादि गोष्टींचा विचार झाला पाहिजे.

## धंदे कोणाच्या मालकीचे

अमेरिकेची उत्पादक व विकासी अर्थसंघटना ज्यांवर अवलंबून आहे ते धंदे कोणाच्या मालकीचे आहेत? अमेरिकेंत धंद्याचे शेअर्स ८६ लक्ष लोकांनीं

खरीदलेले आहेत. यांतील निम्म्याहून थोड्या अधिक स्त्रिया आहेत. सर्व भागीदारांत ३४ टक्के गृहिणी आहेत. या सर्व भागीदारांचें सरासरी वय ४८ वर्षें असून तो वर्ग २५ हजार लोकवस्तीच्या शहरांत राहतो. त्याचें वार्षिक कौटुंबिक उत्पन्न साडेसात हजार डॉलर्सपेक्षां थोडें कमी आहे. यांपैकीं १० लक्ष लोकांची वार्षिक मिळकत ३ लक्ष डॉलरहून थोडी कमी आहे. दर बारा प्रौढांतल्या एकानें एकाद्या सार्वजनिक कॉर्पोरेशनचे शेअर्स घेतले आहेत. बाकीच्यापैकीं १५ लक्षांनीं खाजगी कंपन्यांचे शेअर्स घेतलेले आहेत. १० कोटि लोकांनीं विमे उतरले अथवा पेन्शन फंडाचे ते सभासद झाले यामुळें ते त्या त्या कंपन्यांचे अप्रत्यक्ष मालकच आहेत.

धंद्यांत पैसा गुंतविणें ही बाब इतकी लोकप्रिय झाली आहे कीं कोणता शेअर चांगला हें ठरविण्याचीं तत्त्वें कोणतीं याविषयीं शेअरब्रोकर लोक व्याख्यानें देत असतात. इन्व्हेस्टमेंट क्लब्स स्थापन झालेले असून थोडी बचत करूं शकणारे लोक आपला पैसा एकत्र करतात व शेअर खरेदी करतात. न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजची एक मासिक भांडवल गुंतवणुकीची योजना आहे. अशा आणखी अनेक योजना आहेत. अमेरिकन टेलिफोन-टेलिग्राफ कंपनीचे अडीच लक्ष कामगार भागीदार–मालक आहेत तर सोकॉनी मॉबिल्स कंपनीच्या कामगारांपैकीं ८८ टक्के कामगारांनीं त्या कंपनीचे शेअर्स खरीदले आहेत.

यू. एस्. स्टील कंपनीचा बेंजामिन फेअरलेस म्हणतो, "समजा कामगारच कंपनीचे मालक झाले तर काय होईल? कुणीहि काम सोडून जाणार नाहीं. कारण मालकच संप कसा करील?"

कारखान्यांची मालकी कामगारांच्या हातीं लवकर येण्याचा संभव नाहीं हें मात्र खरें आहे. कारण लहान लोक अधिकाधिक प्रमाणांत कंपन्यांचे शेअर्स घेत असले तरी त्यांची एकूण शेअर्सची संख्या लहान असते आणि फार थोड्या लोकांच्या हातीं पुष्कळ शेअर्स असतात. सामर्थ्यवान् अशा प्रसिद्ध कंपन्या थोडे थोडे शेअर्स घेणारे लहान लोक मिळविण्यासाठीं खटपट करतात. गरीबांनाहि आकर्षण वाटेल इतक्या लहान किंमतींचे शेअर्स काढतात. वार्षिक अहवाल चार रंगांत सुंदर छापतात. सामान्य माणसालाहि कंपनीच्या प्रश्नांची कल्पना चांगली यावी अशा प्रकारें ते अहवाल लिहिलेले असतात. भागीदारांच्या वार्षिक सभा भरवितात त्या अगदीं वनभोजनासारख्या असतात. या सभांमध्यें सामान्य भागीदारानेंहि मांडलेली एकादी तक्रार दरसाल दीड लक्ष डॉलर्स मिळविणारा कंपनीचा अध्यक्ष शांतपणें ऐकून घेतो. हा भागीदार केव्हां केव्हां त्याच कंपनीचा सामान्य

कामगार असून आतां कंपनीच्या अध्यक्षाला कंपनीच्या व्यवहाराबाबत खुलासा विचारीत असतो.

कंपनीचा कामगार व कंपनीचा भागीदार, आणि गिऱ्हाईक इत्यादि वर्गांमधील ठळक विभाजक रेषा हल्लीं पुसून जात आहेत. भागीदारांना नफ्याचे चेक्स येतात त्याबरोबरच कंपनीच्या मालाचीं वर्णनपत्रकें येतात, आणि तो माल स्वतः खरीदून व मित्रांना त्यांची शिफारस करून आपल्या कंपनीचा नफा वाढवा अशी विनंती त्या पत्रकांत केलेली असते. जेथें कंपन्यांची मालकी इतकी विस्तृतपणें पसरलेली आहे त्या अर्थसंघटनेचें स्वरूप काय? धंदे राष्ट्रीय मालकीचे केले तर राजकीय व आर्थिक सत्ता एकाच हातीं येते. अमेरिकेंत असें न करतां मालकीहक्क व्यापक प्रमाणावर वांटला जातो. तो अनेक व्यक्तींच्या हातीं गेल्यामुळें मालकीहक्काचें आपोआपच लोकशाहीकरण होतें.

अलीकडे शेअरबाजार अगदीं निर्दोष झाल्यामुळें लहान बचतवाल्याला भांडवल गुंतविण्यास उत्तेजन मिळतें. नियमितपणें नफावांटणी होत असते. आणि वीस वर्षांत पैशाची खरेदीशक्ति निम्मी झालेली असली तरी शेअर्सच्या किंमती तिप्पट झाल्या आहेत यामुळेंहि लहान बचतवाल्याला आकर्षण वाटतें. या भांडवल-गुंतवणुकीच्या प्रवृत्तीमुळें चलनफुगवटीला अटकाव होतो. पार्क ॲव्हेन्यूमधील मोलकरणीनें युद्धाच्या आरंभीं गुंतविलेल्या ४ हजार डॉलर्सचे आतां ४० हजार डॉलर्स झाले आणि बूट पॉलिशवाल्याचा एक स्टॉक ८० हजार डॉलरपर्यंत गेला. अशा लोकांना कंपन्यांच्या शेअर्समध्यें पैसे गुंतविण्यानें देशाच्या वाढत्या उत्पादनशक्तींत आपण भागीदार होतों हें कळून येतें.

या लहान भागीदारांच्या भांडवलानें वॉल स्ट्रीट हा जो अमेरिकेचा रोखेबाजार त्याचें रूप पार बदलून गेलें असून त्याचें वजन कमी झालें आहे. आतां मोठमोठ्या कॉर्पोरेशन्स या भांडवलासाठीं वॉल स्ट्रीटमधील बड्या भांडवलदारांकडे जात नाहींत. आपल्या नफ्यांतील ६० टक्याइतका भाग (३५-४० वर्षांपूर्वीच्या दुप्पट) पुन्हा भांडवलांत घालतात किंवा आपल्या भागीदारांना डिबेंचर्स विकतात. मॉर्गनसारख्या प्रचंड भांडवलदार घराण्याचें खेळतें भांडवल ६६ कोटि ७० लक्ष डॉलर्स असतां जनरल मोटर्सचें खेळतें भांडवल २१८ कोटि ३० लक्ष डॉलर्स आहे.

## कमाई करणें व खर्चणें

या कारखानदारीचा माल विकून वापरला गेला नाहीं तर सारें भांडवल व उत्पादन व्यर्थच होय. इतर ठिकाणच्या व अमेरिकेंतल्या अर्थसंघटनांत फरक

हा आहे कीं अमेरिकेंत आतां उत्पादन कसें होईल ही काळजी करावी लागत नाहीं. माल जितक्या लवकर तयार होईल तितक्या लवकर तो खरीदला जाऊन वापरून संपेल कीं नाहीं याची खात्री करून घ्यावी लागते. अमेरिकन अर्थ-संघटनेंत पैसा व पत दोन्ही पुष्कळ उत्पन्न होत असल्यानें लोक जो खर्च करीत असतात तो त्यांच्या मिळकतीपासून स्वतंत्रपणें करीत असतात. जितका पैसा खर्चावा तितका तो अधिक मिळतो अशी ही अर्थसंघटना आहे. कारण लोकांनीं खर्च जास्त केला कीं रोजगारी वाढते. म्हणून किंमती हप्त्यांनीं देऊन माल खरेदी करण्याला उत्तेजन दिलें जातें. ही हप्तेबंदीची उधारी आटोक्याबाहेर गेली असें वाटलें तर फेडरल रिझर्व्ह बोर्ड कर्जें देण्यावर तात्रडतोब निर्बंध घालतें. पण लोक इतका पुष्कळ खर्च करतात तरी देशांतील ५० टक्के कुटुंबांना हप्ते-बंदीचीं कर्जें नसून १९५६ सालीं गिऱ्हाइकांनीं केलेली बचत दोन हजार कोटि डॉलर्स एवढी होती.

लोकांना माल वापरण्याला उत्तेजन देण्यासाठीं शक्य त्या सर्व युक्त्या योजतात. नवीन नवीन माल लोकांपुढें नेहमीं मांडला जातो. गिऱ्हाईक हें नावीन्यप्रिय असल्यानें त्यांना निरनिराळे पर्याय दाखविले जातात. एकादा डोकेबाज कारखानदार एकादे वेळीं असा माल काढतो कीं गिऱ्हाईक तोच माल घेऊन जुना माल टाकून देतें. एकाद्या नव्या रेफ्रिजरेटरचा रंग भिंतीच्या रंगाला जमणारा असला अथवा रेफ्रिजरेटरमधील शेल्फ फिरतें असलें व थंडगार पाण्याची तोटी आंत असली तर गिऱ्हाईक हा रेफ्रिजरेटर घेऊन जुना टाकून देतें.

गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं चालणाऱ्या चढाओढीमुळें पुष्कळदां किंमती उतरतात व मालाची सुधारणा केली जाते. १९२२ सालीं इलेक्ट्रिक रेफ्रिजरेटर दर क्युबिक फुटास ७८ डॉलर्स या दरानें मिळे. १९५५ सालीं ही किंमत ३४ डॉलर्सपर्यंत खालीं आली आहे. नवा रेफ्रिजरेटर हा जुन्यापेक्षां अधिक चांगलाहि आहे. रेडिओच्या किंमती इतक्या माफक आहेत कीं रेडिओ नसणारीं घरें फक्त शेकडा ३ इतकींच आहेत.

ब्यूरो ऑफ लेबर स्टॅटिस्टिक्स या संस्थेनें कमी मिळकतीच्या कामगारांचें राहणीमान ठरविण्याच्या ज्या वस्तूंची यादी दिली आहे तींत पूर्वीं नसलेल्या रेडिओ, विजेचें शिवण्याचें यंत्र, इतर यांत्रिक साधनें, गोठवलेलें अन्न, विजेचे टोस्टर्स, टेलिव्हिजन इत्यादि वस्तु आल्या आहेत.

बाजाराचें क्षेत्र वाढत असल्यानें वर्गभेद मोडून गेले आहेत. बहुधा सर्वचजण तयार कपडे वापरतात. नळ दुरुस्त करणारा कामगार व पोलाद कारखान्यांतला

कामगार हे एकाद्या डॉक्टरासारखा अथवा लखोपतीसारखा पोषाख करतात. श्रीमंत व गरीब एकाच जातीच्या सिगरेटी ओढतात, एकाच प्रकारचें पाकिटबंद अन्न घेतात, एकाच प्रकारचीं नियतकालिकें वाचतात, एकाच प्रकारच्या सिनेमाला जातात, आगगाडीच्या सारख्याच डब्यांतून प्रवास करतात, विजेचें साहित्यहि सारखेंच खरेदी करतात.

उत्पन्नेंहि सारखीं सारखीं होत आहेत. खाजगी मालकीची अर्थसंघटना परिपक्व होऊं लागली कीं तींतहि सारखेपणाची प्रवृत्ति बळावतेच. १९३५ ते १९५० या काळांत दर पांच कुटुंबांत जें सर्वांत गरीब कुटुंब होतें त्याचें वस्तुस्वरूपांतलें उत्पन्न, कर वजा जातां, ४२ टक्क्यांनीं वाढलें, उलट शिखराकडल्या ६ टक्के लोकांचें वस्तुस्वरूपांतलें उत्पन्न थोडेंसें घटलेंच. लहान धंद्यांत काम करणाऱ्या दर पांच कुटुंबांतील एका कुटुंबाला दरसाल प्राप्ति ७ हजार डॉलरहून अधिक आहे तर डॉक्टरी, वकिली, तंत्रविद्या यांत काम करणाऱ्या कुटुंबांतील दर सहा कुटुंबांतील एका कुटुंबाला ७ हजार डॉलर्सहून अधिक वार्षिक मिळकत आहे. यामुळें वर्गावर्गांतील विभाजक रेषा पुसल्या जात आहेत, निवळ मालकी हक्कावर मिळणारें उत्पन्न कमी होत असून कामगारांच्या कामाचें उत्पन्न वाढत आहे. सर्व प्रकारचे खास धंदे वाढत आहेत व एकच प्रकारचे अनेकांना करावें लागणारें काम कमी होत आहे.

तीन कोटि ६० लक्ष लोकांनीं विमे उतरले आहेत. ३ कोटि लोकांनीं बँकांत सेव्हिंग खातीं उघडलीं आहेत, ४० लक्ष कुटुंबें मालकीच्या घरांत राहतात. लहान मुलांना संभाळणाऱ्या लक्षावधि दायांनीं १९५६ सालीं जवळजवळ १०० कोटि डॉलर्स मिळविले. आपोआप धुण्याचें यंत्र, व्हॅक्युअम क्लीनर्स, गोठवलेलें अन्न, इत्यादींमुळें घरांतलीं कामें कमी झालीं आहेत. यामुळें पूर्वीं जे नोकर ठेवीत ते आतां ठेवीत नाहींत. जे नोकर न ठेवतां घरींच कामें करीत त्यांच्यावरचा कामाचा भार हलका झाला आहे. शेतकरी स्त्रियांना पूर्वीं पाणी पंपानें काढावें लागे अथवा वाहून न्यावें लागे, धुणें, घासणें, स्वच्छ करणें या गोष्टी पूर्वीं हातांनीं कराव्या लागत. भाजीपाला, मांस डब्यांत बंद करून ठेवावें लागे. पण आतां हाताऐवजीं यंत्रानें सारीं कामें आपोआप होतात आणि मांस व भाजीपाला गारवून ठेवतां येत असल्यानें डब्यांत बंद करावा लागत नाहीं.

## माल विकण्याचे उपाय

उत्पन्न होणाऱ्या मालाचा भराभर खप होण्यावरच जी अर्थसंघटना अवलंबून आहे ती गिऱ्हाइकासाठीं वाट पाहत स्वस्थ बसूं शकत नाहीं. म्हणून दारिद्र्यांत

अवश्य असणाऱ्या काटकसरीच्या व बचतीच्या मनोवृत्तींतून लोकांना बाहेर काढून 'खर्च करा' व श्रीमंत व्हा' या नव्या मनोवृत्तींत लोकांना आणायचें असेल तर विदेशीयांना आणि आम्हांलाहि मनस्ताप देणाऱ्या क्रूर जाहिरात-बाजीची आवश्यकता आहेच. जाहिरातींना मानसशास्त्र, लोकमतपाहणी, बाजार-पाहणी इत्यादींची मदत दिल्यास लोकांच्या ठिकाणीं माल खरीदण्याची इच्छा होते, संकोची अथवा बेफिकीर लोकांना माल खरेदी करावासें वाटूं लागतें, धनोपभोगाचें शिक्षण लोकांना मिळतें.

कोणी म्हणेल कीं जाहिरातींवर उधळला जाणारा पैसा अत्यंत अवश्य अशा शाळा, रस्ते, हॉस्पिटलें यावर कां खर्चूं नये? ही टीका लक्षांत घेऊनच ॲडव्हर्टाइझिंग कौन्सिल या ऐच्छिक संघटनेनें आपली जाहिरातीची व लोकांपर्यंत पोंचण्याची शक्ति समाजकार्यासाठीं दिली आहे. शाळा आणि शिक्षक यांचा देशाला तुटवडा कोठें, किती आहे ही माहिती या संस्थेमार्फत प्रसिद्ध केली जाते. ही माहिती मिळाल्यावर त्या त्या ठिकाणचे ऐच्छिक गट अमेरिकेच्या पद्धतीनें स्वेच्छेनें ती तूट भरून काढण्यासाठीं झटतात.

जाहिरातबाजींत जो एक शिसारी आणणारा दोष आहे तो आणखी एका मार्गानें दूर केला जातो. डु पॉंट कंपनी रेडिओवर व टेलिव्हिजनवर अमेरिकन इतिहासावर आधारलेलीं नाटकें दाखविते. ती आपल्या मालाची जाहिरात करीत नाहीं. 'रासायनिक मार्गांनीं जीवन सुधारणारा माल तयार करणारी संस्था' एवढें आपलें फक्त वर्णन करतें. टेक्सस कंपनी दर आठवड्यास एकेक नाटक दुपारीं दाखवते आणि आपल्या मालाचा उल्लेखहि करीत नाहीं.

जाहिराती अत्यंत वाह्यात असण्यापासून अत्यंत रसिकतापूर्ण आणि सामाजिक दृष्टिकोनाच्या येथपर्यंत सर्व प्रकारच्या असतात. ती आतां एक सामाजिक बाबच झाली आहे. जाहिरातबाजींत जो एक रानटी क्रूरपणा आहे तो गिऱ्हाइकाचा पैसा मिळविण्याच्या चढाओढींतून निर्माण झाला आहे. तसेंच उत्पादनसंघटना प्रचंड असून ती सतत चालू ठेवण्यासाठीं गिऱ्हाईक मिळवण्याकरितां जीव जो सदा कासावीस करावा लागतो त्यामुळेंहि जाहिरातबाजीला महत्त्व आलें आहे.

याच गरजेमुळें गिऱ्हाइकाला खूष ठेवण्याचा प्रयत्न येथें इतका होतो कीं विदेशी पाहुण्यांना आश्चर्य वाटतें. टपालांनीं मागणी स्वीकारणारीं दुकानें व डिपार्टमेंट स्टोअर्स मुळींच तक्रार न करतां परत केलेला माल घेतात. स्नेहभाव, सौजन्य व गिऱ्हाइकाला मदत करण्याची खरी बुद्धि हे गुण विक्रेत्यांना अभ्यासक्रम आंखून शिकविले जातात. माल प्रमाणबद्ध झाले आहेत, मालांच्या विशिष्ट

प्रकारांना विशिष्ट नांवें दिलीं आहेत, त्यामुळें मालाबद्दल गिऱ्हाइकाला विश्वास वाटतो. हप्त्यांनीं किंमत देऊन माल खरेदी करणें, टेलिफोननें मालाची मागणी करणें, दारोदार विक्रेत्यांनीं जाऊन माल विकणें, माल घरपोंच देणें इत्यादीमुळें गिऱ्हाइकाला पैसा खर्चणें सोपें होतें. पैसा खर्चण्याच्या गिऱ्हाइकाच्या खुषीवर राष्ट्राचें आर्थिक आरोग्य अवलंबून असतें.

## चिंता आणि भीति

अशा या भरभराटणाऱ्या अर्थसंघटनेंत कोठें कोठें चिंतेच्या व संशयाच्याहि जागा आहेत. आजची ही प्रगति निरोगीपणानें कशी चालू राहील? खरोखर निःशस्त्रीकरण होऊन दरसाल होणारा ४ सहस्र कोटि डॉलर्स एवढा लष्करी खर्च जर कमी करावा लागला तर आमच्या अर्थसंघटनेचें काय होईल? आज ज्या साधनांचा आपण खूप वापर करीत आहों तो त्यांचा वापर कमी झाल्यास त्यांचें आपण काय करूं? चलनी व जमाबंदीचे जे उपाय फार मोठी आर्थिक मंदी आली असतां ती टाळण्यासाठीं वापरतां येतात ते वापरण्याचें धैर्य आम्ही दाखवूं काय? कीं त्या बाबतींत फार थोडी उपाययोजना फार उशिरां करूं? आमच्या उत्पादनशक्तीचीं फळें अधिकाधिक व्यापक करून अजूनहि कोठें कोठें असलेलें दारिद्य आपणाला नष्ट करतां येईल काय? शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्यासाठीं आपण काय करूं? हल्लीं चलनफुगवटीची जी प्रवृत्ति वाढते आहे ती धोका वाटण्याइतक्या उंचीवर जाईल काय? आपण तिचें नियंत्रण कसें करूं?

वरीलसारखे कांहीं प्रश्न या अर्थसंघटनेपुढें आहेत. त्यांपैकीं चलनफुगवटीचें संकट हें विद्यमान व स्पष्ट आहे. मालाला मागणी फार मोठी आहे तोंवर कारखानदार व कामगार दोघांनाहि वाढता उत्पादनखर्च गिऱ्हाइकाच्या अंगावर ढकलतां येतो. सरकारनें किंमतींचें नियंत्रण करणें हा एकच उपाय भरकटणाऱ्या किंमतींना आवरण्याला आहे. अमेरिकन अर्थसंघटनेंत घरांचा प्रश्न हा एक बिकट प्रश्न आहे. शहरांत व खेड्यांत गलिच्छ वस्त्या पुष्कळ असून त्यांत खूपच लोक राहतात. घरमालकांना भाडें खूप मिळत असल्यानें त्यांना या गलिच्छ वस्त्या फायद्यांत पडतात. त्या दुरुस्त करण्याचा कार्यक्रम एवढा प्रचंड आहे कीं एकतर सरकारनें तो घेतला पाहिजे अथवा तेथें राहणाऱ्या लोकांनीं आपला पैसा एकत्र करून सुधारणा केली पाहिजे.

संघसरकारनें शहरांचें सहकार्य घेऊन ७५० शहरी केंद्रांत गलिच्छ वस्त्या चांगल्या करण्याचें कार्य सुरू केलें आहे. थोड्या उत्पन्नाच्या कुटुंबांनाच या

नव्या घरांत जातां येतें. कुटुंबाच्या मिळकतीच्या पंचमांश भाडें असून कुटुंब लहान-मोठें असेल त्या मानानें जागा लहान-मोठी मिळते. त्यामुळें गर्दी कमी होऊन नव्या गलिच्छ वस्त्या निर्माण होण्याचें टळतें. शिकागोंत पूर्वीच्या तीन योजना आहेत, त्यांतले चार-पंचमांश भाडेकरू नव्या अधिक चांगल्या व मालकीच्या जागांत गेले आहेत. या घरबांधणीयोजनेंत मालकीचीं घरें मिळत असून त्या कुटुंबाचें राहणीमानहि उंचावतें.

उद्योगधंद्यांचा माल वाढून कामगारांचें वैभव वाढलें. पण शेतीचें उत्पन्न ज्या प्रमाणांत वाढलें त्या प्रमाणांत शेतकऱ्यांचें उत्पन्न कमी वाढलें. याचें कारण असें आहे कीं उद्योगधंद्याचा माल खरेदी किती करावा याला मर्यादा कांहींहि नाहीं. पण आपण जें खातों तें अमुक इतकेंच खातों, अधिक खाऊं शकत नाहीं. शेतींत यंत्रें व शास्त्र यांचा उपयोग होऊन शेतकऱ्यांची उत्पादनशक्ति इतकी वाढली आहे कीं खाण्याच्या संवयी सुधारल्या, अधिक प्रोटीन व अधिक ताजें अन्न खाण्याची पद्धत पाडली व लोकसंख्या वाढती आहे तरीसुद्धां वाढतें अन्न आम्ही सर्व संपवूं शकणार नाहीं. परदेशांत जेथें अन्नाची तूट येते तेथें अमेरिकेंतून अन्नपुरवठा करण्याचे कार्यक्रम आहेत, स्वदेशांतच जेथें लोक गरीब आहेत तेथें त्यांना कमी किमतीला अथवा मोफत धान्य पुरविण्याचे कार्यक्रम अवलंबिलेले आहेत, शाळा, इतर सार्वजनिक संस्था यांना अन्न पुरविण्याचे कार्यक्रम अमलांत येत आहेत, पण तरीहि बाजारांत येणारें वाढीव अन्न संपत नाहीं. संघसरकारनें धान्यकिंमतींना सब्सिडी देण्यानें वाढीव धान्याचा प्रश्न अधिकच बिकट होतो. शेतकऱ्यानें धान्यासाठीं कमी एकर जमीन वापरावी म्हणून त्याला बक्षिसें दिलीं तर तेवढ्या एकरांतहि तो खूप धान्य पिकवतो. अमेरिकन शेतींत विविधता इतकी आहे कीं कोणत्याहि एका कार्यक्रमानें त्या शेतीच्या गरजा भागत नाहींत.

शेतकरी परस्परसहकारानें व्यवहार करतात त्यांतून त्यांना लागणाऱ्या मालांतला १२ टक्के माल घाऊक किंमतीला मिळतो. बाजारांत मालविक्रीहि ते सहकाराच्या बळावर किफायतीनें करतात. ग्रेंज व फार्म ब्यूरो यांसारख्या ऐच्छिक संघटनांनीं शेतकऱ्यांत सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रम स्थानिक पातळीवर सुरू केले आहेत. त्यामुळें राज्यसरकारांच्या व संघसरकारांच्या राजधान्यांत शेतकऱ्यांची राजकीय शक्ति वाढली आहे. संघसरकारकडून जमीनसंरक्षण, ग्रामीण भागांत वीज नेणें, पिकांचा विमा, पाटबंधाऱ्याचीं कामें, शेतीसंशोधन, माहितीपत्रकें, विस्तारअधिकाऱ्यांच्या शेतांना भेटी, कर्जयोजना वगैरे सर्व

बाबतींत जें साहाय्य शेतकऱ्याला मिळतें त्यामुळें अमेरिकन समाजांत शेतकरी सर्वांत अधिक फायदा सरकारकडून मिळविणारा ठरला आहे.

तरीपण एकूण अर्थसंघटनेच्या भरभराटीशीं तुलना करतां शेतकऱ्याची मिळकत कमीच पडते. धान्यकिंमतीबाबत सरकारकडून जी मदत मिळते तिचा फायदा खूप जमिनींचे मालक असणारे मोठे शेतकरी आणि कॉर्पोरेशन्स यांनाच मिळतो. पण त्यांना खरोखर अशा मदतीची मुळींच गरज नसते. ज्यांना ही मदत पोंचतच नाहीं असें सुमारें पंधरा लक्ष शेतकरी असून त्यांना आपलीं पिकें विकण्यासाठीं दक्षिणेंतून उत्तरेकडे जावें लागतें. यामुळें वर्षांतून कांहीं काळ ते फेरिस्तेच असतात. पाठ मोडून जाईल एवढें काम करावें, गलिच्छ घरांत राहावें, अनारोग्यकारक परिस्थितींत काम करावें, औषधमदतहि योग्य अशी मिळू नये, असा त्यांचा भोगवटा असतो. राहणीच्या अस्थिरतेमुळें अमुक ठिकाणीं गटानें राहून मतदानसामर्थ्य गाजवितां येत नाहीं, सांघिक वसाहतीचे फायदे मिळवितां येत नाहींत अथवा मुलांना सलग शिक्षणहि देतां येत नाहीं.

आयोवा स्टेट कॉलेजांतील शेतीच्या अर्थशास्त्राचा प्राध्यापक जिऑफ्रे शेपर्ड म्हणतो, "शेतकऱ्याची मिळकत वाढावी म्हणून शेतीमालाच्या किंमतीला जी मदत दिली जाते ती थांबवावी, तरच गरजेहून अधिक होणारें उत्पादन घटविणें शक्य होईल." शेपर्डच्या मतें शेतकऱ्यांत जननसंख्या फार असल्यानें दरसाल पांच लक्ष शेतकरी शेतींत नवीन येतात व अर्थात् मग शेतकऱ्यांना शेतीपासून होणारी मिळकत दर-डोई कमी पडते. गहूं पिकविणारा अथवा दूधधंदा करणारा शेतकरी सरासरीनें जेमतेम दोन हजार डॉलर निवळ उत्पन्न मिळवितो. ही मिळकत जर वाढवायची असेल तर एकर कमी न करतां शेतीवरचीं माणसें कमी केलीं पाहिजेत आणि मग दर माणशीं उत्पादन वाढविलें पाहिजे. पण यामुळें शेतकऱ्यांचीं मतें कमी होतील. म्हणून ज्यांना शेतकऱ्यांचीं मतें मिळवायचीं असतात त्यांना त्या मतांची संख्या कमी व्हायला नको असल्यानें शेपर्डचा विचार ते मान्य करीत नाहींत. दुसरे कांहीं लोक अशा मताचे आहेत कीं शेती नुसता व्यवसाय नसून तो एक जीवनप्रकार आहे, ज्याला शेती हवी त्याला ती करायला मिळाली पाहिजे असें ते मानतात. सारांश ग्रामीण जीवनाबद्दल प्रीति आणि तेंच जीवन श्रेष्ठ आहे ही श्रद्धा या दोन्ही गोष्टी सद्यःस्थितीचीं फार बलवान् कारणें होत.

## विदेशी व्यापार

अमेरिका जगांतील एकंदर मालापैकीं ४० टक्के माल निर्मिते, पण जगांतल्या

फक्त १० टक्के व्यापारच अमेरिकेकडे आहे. परदेशांना जकातींत सवलती देऊन, देणग्या व कर्जे देऊन जगांतलें उत्पादन व व्यापार पुनः पूर्वस्थितीला आणण्याच्या कामीं इतर राष्ट्रांबरोबरच अमेरिकेनेंहि हातभार लावला आहे. अमेरिकेनें बाहेरच्या जगांत प्रादेशिक आर्थिक विकासाला उत्तेजन दिलें असून त्यांत यश पुष्कळ मिळविलें आहे, परराष्ट्रांशीं देवघेवीचे व्यापारी करार अमेरिकेनें केले असून इंटरनॅशनल बँक ऑफ् रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट व इंटरनॅशनल मोनेटरी फंड या संघटना स्थापण्याचे कामीं अमेरिकेनें पुढाकार घेतला आहे. १९३०-३३ मध्यें आमच्या आयात जकातीचे दर ५३ टक्के होते. पण आंतरराष्ट्रीय व्यापारी करारांनीं हे दर १९५१ सालापर्यंत १५ टक्क्याइतके खालीं आणले आहेत. दीर्घकालपर्यंत उंच जकातींची सवय अमेरिकेला झालेली असल्यानें जकात उतरविण्याबाबत अमेरिकेनें केलेली ही प्रगति प्रशंसनीयच म्हटली पाहिजे. विदेशी मालाच्या आयातीनें ज्या धंद्यावर प्रतिकूल परिणाम होतात ते धंदे सरकारनें जकातीचे दर उंच करावे म्हणून सरकारवर दडपण आणीत आहेत. विदेशी मालाशीं होणाऱ्या चढाओढींत अमेरिकन धंदे संकटांत येऊन त्या धंद्यांत काम करणाऱ्या स्त्रीपुरुषांची रोजगारी संकटांत येते. यामुळें अशा कामगारांचीं मतें मिळवायचीं तर जकाती उंचावण्याबाबतचें दडपण कॉंग्रेसमनांना पत्करावें लागतें.

अमेरिका आपल्या खाणींतील तांबें, जस्त, कथील, पेट्रोल वगैरे द्रव्यें भराभर संपवीत आहे. या खाणी संपल्या म्हणजे एकदम या वस्तूंचा तुटवडा पडेल. यासाठीं अमेरिकन खाणींतून आजच्या ५० टक्केच माल काढावा व बाहेरून ५० टक्के खरीदावा अशी एक सूचना आहे. पण पुन्हा स्थानिक हितसंबंधीयांचा विरोध होतो. अर्ध्या खाणी बंद पडल्यास बेकारांची व त्यांच्या वसाहतींची काय अवस्था होईल ?

अमेरिकेची उत्पादनशक्ति, राहणीचें मान व मजुरी बाकीच्या जगापेक्षां अधिक आहे तोंवर बाकीच्या जगाशीं वागतांना आम्हांला अडचणी येणारच. आमच्या ठिकाणच्या औदार्याबद्दलहि आमच्या मनाला रुखरुख वाटते. परदेशांत आमच्या औदार्याचें समर्थन करतांना आम्ही सबबी सांगतों आणि स्वदेशांत या औदार्याचें समर्थन करतांना आम्ही ढोंग करून म्हणतों कीं "आम्ही जें देतों तें हात आंखडूनच देतों आणि तेंहि कांहीं तरी लष्करी फायद्यावांचून आम्ही देत नाहीं." तरीपण जगांत इतरत्र उत्पादनशक्ति वाढल्यास तें अमेरिकेच्याहि फायद्याचें आहे. ही गोष्ट आम्हांला स्पष्टपणें दिसतेंच.

## सरकार व अर्थव्यवहार

अर्थसंघटना वैभवांत राहावी या दृष्टीनें सरकारनें तिचें नियंत्रण केलें पाहिजे ही कल्पना अमेरिकेला अगदीं नवी आहे. सरकार हें परस्परविरोधी हितसंबंधांत मध्यस्थी करतें आणि सरकार खर्चहि खूप करतें या दृष्टीनें सरकार हा अर्थ-संघटनेंतला मोठा बलशाली घटक ठरतो. मोठ्या कॉर्पोरेशन्सच्या नफ्यापैकीं ३८ टक्के सरकारकडे कर-रूपानें जातो. तसेंच कॉर्पोरेशन्सच्या भागीदारांना मिळणाऱ्या नफ्यांतला कांहीं भागहि सरकारकडे कररूपानें जातोच.

आम्ही आमच्या हयातींतच एक गोष्ट पाहिली आहे कीं अमेरिकन भांडवलाचें राष्ट्रीयीकरण होत असून ही एक क्रांतिच होत आहे. अमेरिकन भांडवलशाहीची प्रचंड शक्ति, निवड व प्रयोग यांचें स्वातंत्र्य शाबूत ठेवून, ती भांडवलशाही कामास लावली जात आहे. ज्याप्रमाणें विजेचा प्रवाह आपल्या सब-स्टेशनांच्या द्वारा गिऱ्हाइकापर्यंत पोंचतो त्याप्रमाणें अमेरिकन उत्पादनशक्तीचीं फळें, मजूर, धंदेवाले, शेतकरी, अनेक ऐच्छिक संस्था यांमार्फत सामान्य नागरिकांपर्यंत पोचतात. भांडवलशाहीनें सरकारी धोरणाला दीर्घकाल उघड प्रतिकार केल्यानंतर आतां जवळजवळ अमेरिकन भांडवलशाहीनें सरकारशीं तह केला आहे. कोणत्याहि अर्थसंघटनेचा फायदा अमुक वर्गाला व्हायला हवा असला तरी त्यासाठीं तो सर्वांना होणें अवश्य आहे हें तत्त्व अमेरिकन भांडवल-शाहीनें मान्य केलें आहे. धंदेवाले व सरकार, अर्थकारण व राजकारण यांमधील भिंती आतां पाडून टाकण्यांत आल्या आहेत. या गोष्टी आतां समाजव्यवस्थेचीं अंगें असून त्यांचा हेतु लोककल्याण हाच होय असें मानण्यांत येतें. भांडवल-शाहीचें अशा प्रकारें समाजीकरण झाल्यामुळें श्रीमंत व गरीब यांमधील अंतर जितकें कमी झालें आहे तितकें येथें एकादें सोशॅलिस्ट अथवा कम्युनिस्ट राज्य असतें तरी कमी झालें नसतें. इस्टेटकरामुळें प्रचंड कौटुंबिक ईस्टेटींचा शेवटच झाला आहे. आमची ही अर्थपद्धति परिपूर्ण आहे असें मुळींच नव्हे, पण ती सतत व योग्य दिशेनें पुढें पुढें सरत आहे. विपुलता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या दोन गोष्टी आम्हांला अविभाज्य वाटतात. अमेरिकेंत ज्या एका समाज-व्यवस्थेंत त्या आम्हीं संपादिल्या आहेत त्या समाजव्यवस्थेंत व्यक्तिस्वातंत्र्य व ऐच्छिक सहकार्य यांची सांगड घातलेली आहे. या समाजव्यवस्थेंत फेडरल तत्त्व असून उलटसुलट अशा अनेक ताणांत तें सर्व बाजूंनीं खेचलें जात असतें. या समाजव्यवस्थेंत मालकीहक्क व्यापक प्रमाणावर वांटला गेला आहे, कर्तृत्व आणि

निर्णय यांचा अधिकार विस्तीर्ण क्षेत्रांवर पसरलेला आहे आणि या समाजव्यवस्थेंत उत्पन्न होणारें वैभव अधिकाधिक व्यापक क्षेत्रावर वांटलें जातें.

आर्थिक सुबत्तेबद्दल आत्मविश्वास आला असल्यानें अमेरिकन लोक आतां आर्थिकेतर मूल्यांना महत्त्व देऊं लागले आहेत. कवडीकवडी साठविण्याच्या उद्योगाऐवजीं इतर अनेक कर्तृत्वें त्यांना आवडूं लागलीं आहेत. जीवन पुरेसें परिपूर्ण होण्यासाठीं ज्यांना आवश्यक साहित्य थोडेंहि मिळत नाहीं अशांना भौतिक मूल्याचें महत्त्व फार वाटणें हें स्वाभाविक आहे. पण आतां जीवन-साधनांची विपुलता दिसूं लागली असल्यानें आतां अमेरिकनांना इतर मूल्यांचें महत्त्व वाटूं लागलेलें दिसतें. अर्थशास्त्रज्ञ मनुष्यस्वभावाचें वर्णन करतो तेव्हां नफ्याचा हेतु हा मनुष्यस्वभावाचा केंद्रबिंदु असें मानीत असतो. पण आतां इतर हेतूंचाहि मनुष्यस्वभावावर अधिक परिणाम होऊं लागल्याचें दिसत आहे.

भौतिक विपुलता व भौतिकवाद हीं एकच होत असें पुष्कळदां मानण्यांत येतें. अमेरिकेंत भौतिक विपुलता असल्याचें उघडपणें दिसून येतें. खुद्द अमेरिकनांना या भौतिक वैभवाच्या लक्षणांचें जेवढें महत्त्व वाटतें त्यापेक्षां विदेशी पाहुण्यांना तें अधिक वाटतें. आम्हांला आमचीं चकचकीत यंत्रें आवडतात, तीं केव्हां लहान मुलांना चकचकीतपणा आवडतो तशीं आवडतात अथवा केव्हां त्यामुळें काम सुकर होतें म्हणूनहि आवडतात. पण या यंत्रांची दीर्घकालीन फलश्रुति भौतिक लोभापासून आम्हांला अलिप्त करणें हीच आहे. निवळ भौतिकाखेरीज इतर कामांना वेळ द्यावा अशी आपली इच्छा असेल तर या यंत्रामुळेंच तें शक्य होतें.

अजून इतर जगाला माहीतहि नसणाऱ्या कितीतरी प्रश्नांशीं अमेरिकेला झगडावें लागत आहे. वर्गावर्गांतले फरक पुसून गेले आणि प्रचंड बहुसंख्यांना फुरसत व पैसा खर्चण्यासाठीं पुरेसा असला तर संस्कृतीचें काय होतें? यंत्रावर आधारलेल्या अर्थसंघटनेंत माणसाला कोणते संतोष मिळतात, कोणते मनोभंग अनुभवावे लागतात? अर्थोत्पादक अशी ही अर्थसंघटना आर्थिक नव्हेत अशा उद्दिष्टांसाठीं कशी वापरतां येईल? कलेवर या अर्थसंघटनेचा काय परिणाम होईल?

प्रकरण तेरावें

# कला

अमेरिकेंत कला मेल्या आहेत अथवा मरणाच्या पंथाला लागल्या आहेत असा शोध कोणाला तरी नेहमीं लागत असतो. कुणी म्हणतात नाटक मेलें, कुणी म्हणतात काव्य मेलें, कुणी म्हणतात चित्रकला मेली. "अमेरिकेची अभिरुचि अत्याचारी आहे" असें कुणी म्हणतात. "अमेरिकन्स हे सांस्कृतिक दृष्टीनें रानटी आहेत. जें जें कांहीं सुंदर अथवा रसिकतेच्या दृष्टीनें भव्य आहे तें पाहण्याचा डोळा अथवा ऐकण्याचा कान अमेरिकनांना नाहींच." असें नेहमीं सांगण्यांत येतें. पण हे सर्व आरोप अंशतः खरे असले तरी बहुशीं अगदीं असत्य आहेत. अमेरिकन लोक पूर्वीपेक्षां अधिक कलाप्रदर्शनें पाहतात, अधिक पुस्तकें खरीदतात व अधिक वाद्यें वाजवितात. दरसाल १२ हजार ५०० पुस्तकें प्रसिद्ध होतात. २१०० शहरांत क्लासिकल जलसे नेहमीं होतात.

कला व संस्कृति यांच्या क्षेत्रांत मधून मधून कलंक आहेत, नाहीं असें नव्हे. गंभीर रंगचित्रकाराला त्या व्यवसायावर जगतां येत नाहीं. तरुण वादकाला एकट्यानें वाद्य वाजवून त्यावर उपजीविका करतां येत नाहीं. साध्या कागदी कव्हराचीं व म्हणून स्वस्त किंमतीचीं पुस्तकें निघत असूनहि दरमाणशीं पुस्तकावर खर्च कमी केला जातो. अमक्या एका वेळीं इंग्लंडांत ५५ टक्के लोक वाचीत असतात तर अमेरिकेंत फक्त १७ टक्के वाचीत असतात. पण नुकतीच टेलिव्हिजननें एका एफ्. बी. आय्. कथेची प्रशंसा केली तेव्हां एकदम १५ हजार पुस्तकांना मागण्या आल्या.

दरम्यान दुय्यम स्वरूपाची कला फोफावत आहे. कापड आणि भांडीं यावरील आकृत्या सुधारत आहेत. घरांतील खुर्च्याटेबलें वगैरे साहित्य साधें पण निरनिराळ्या उपयोगास जरूर असें होत आहे. अधिकाधिक घरें मोठ्या अभिरुचीनें

बांधलीं जात आहेत, त्यांच्यावरील चित्रकला, रंगरंगोटी, त्यांतील फर्निचर वगैरेंत सदभिरुचि दिसून येत आहे. दर महिन्याला नियतकालिकांतून चांगल्या घरांच्या कल्पना मांडल्या जात आहेत. दुकानांतील मालाचे पुडे, मालाची मांडणी वगैरेवर कलावृत्तीची छाप पडत आहे. पदार्थसंग्रहालयें व कलाकेंद्रें रोज शेकड्यांनीं निघत आहेत. उन्हाळ्यांतील कलाविद्यालयें देशभर स्थापन होत आहेत. कॉलेजांच्या अभ्यासक्रमांत कलांना महत्त्व येऊं लागलें आहे. एकाद्या बौद्धिक धंद्यांत यशस्वी असलेला माणूस उत्तम संगीतज्ञ असल्याचेंहि मधून-मधून ऐकूं येतें.

पण अमेरिकेच्या इतर कोणत्याहि क्षेत्राप्रमाणें कलाक्षेत्रांतहि 'बहुता' (प्लूरॅलिझम) आहे. हल्लीं रेडिओ, सिनेमा, टेलिव्हिजन वगैरेमुळें 'बहुता' नष्ट होऊन सर्वत्र सारखेपणा येण्याचा धोका उद्भवला आहे. अशा वेळीं बहुतेच्या या आग्रहामुळें कलेंत जोम येतो. बहुता हें अमेरिकेचें कलाक्षेत्रांतहि वैशिष्ट्य आहे. 'अमेरिकन कादंबरी अथवा अमेरिकन पेंटिंग' असा कांहीं प्रकार येथें असूंच शकत नाहीं.

गतिमान आणि जवळजवळ वर्गविहीन अशा समाजालाच योग्य असा कांहीं कलाप्रकार आहे काय? डी टॉकेव्हिलच्या मतें अमेरिकेचें वाङ्मय व विचार सहज मिळणारे, सहज वाचतां येणारे असले पाहिजेत. त्यांत तीव्र भावना असल्या पाहिजेत. येथल्या वाङ्मयाची शैली जोमदार पण ढिली, अनपेक्षित व नावीन्यपूर्ण, आनंद देण्यापेक्षां आश्चर्यचकित करणारी, सदभिरुचीचें समाधान करणारी असण्यापेक्षां भावना प्रक्षोभ करणारी असली पाहिजे. डी टॉकेव्हिलचें हें मत रेडिओ, टेलिव्हिजन, सिनेमा यांनींच ज्यांची अभिरुचि बनते त्यांना लागू आहे. पण शिक्षण व सांपत्तिक सुस्थिति यामुळें माणसें जीं भिन्नभिन्न रुचीचीं होतात त्यांच्यांत हा सारखेपणा असणार नाहीं. व्यापारी संस्कृतीमुळें कलेच्या क्षेत्रांतहि केवढा धोका आहे हें डी टॉकेव्हिलनें इशारावजा सांगितलें आहे एवढें फार तर म्हणतां येईल. अतिश्रमापासून माणूस मुक्त झाला म्हणजे तो आपली स्वतंत्र अभिरुचि वाढवील हें डी टॉकेव्हिलच्या लक्षांत आलें नाहीं. अमेरिकन लोक दरसाल दहा कोटि डॉलर्सच्या रेकॉर्ड्स वापरतात आणि त्यांना संगीत कळतें इतकेंच नव्हे तर एका संगीतदिग्दर्शकाची दुसऱ्याशीं ते तुलनाहि करूं शकतात.

वस्तुस्थिति अशी आहे कीं आम्ही लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, वैभव, आराम, यांत्रिकशोधनिपुणत्व या गोष्टी आमच्या म्हणून प्रौढीनें सांगतों, पण

कलेचें युरोप हेंच माहेरघर होय ही गोष्ट मान्य करतों. भूतकाळाकडे पाठ करून आम्ही भविष्याभिमुख झालों त्यावेळींच लाक्षणिक रूपें व कलेचें क्षेत्र यांकडेहि आम्हीं पाठ फिरविली. कलेंत जीवनांतील दुःखभावना असतात. अमेरिका ही नवी भूमि असल्यानें तिच्या भविष्यांत दुःखकथेला जागा नाहीं. आमचें गूढ काव्य म्हणजे वैभवाची आशा हेंच होय. ती आशा सत्यसृष्टींत आणण्याला काव्याहून कांहींतरी अधिक हवें. कुरूपता, दारिद्र्य, अधःपात यांना कलेच्या स्वरूपांत चिरंजीव करण्याऐवजीं प्रत्यक्ष व्यवहारांतून आम्हांला त्यांची हाकलपट्टी करायची होती. म्हणून आम्ही सामाजिक प्रयोग व सामाजिक शास्त्रें यांमागें लागलों. जी हिंमत आणि ईर्ष्या कला निर्मूं शकली असती तिनेंच समाजशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ निर्माण केले. यांतून समाजशास्त्रीय ग्रंथ, समाजकल्याणसंस्था, मानसोपचारकेंद्रें निघालीं.

अमेरिकनांना ज्ञानाची लालसा फार असल्यानें ते कला अथवा काव्य यांपेक्षां वस्तुस्थितीचें स्तोम अधिक माजवितात. अमेरिकनांना परकी लोक निर्बुद्ध म्हणतात याचें कारण असें आहे कीं आम्ही सिद्धांतप्रिय, 'इझम्'प्रिय नसून प्रयोगप्रिय आहों. म्हणूनच कम्युनिझम्, फॅसीझम्, फ्रूसिझम् वगैरेंची डाळ येथें शिजत नाहीं. आमची कार्यपद्धति कलावंताचीच म्हणजे 'अनुभूतिस्पंदन' (रिस्पॉन्स टु एक्पीरिअन्स) हीच आहे. पण कलाप्रयत्नाची परिणति जीवनाच्या स्पष्टीकरणांत होते तर आमच्या प्रयत्नाची परिणति जीवन बदलून टाकण्यांत होते.

आमच्यांत मोठमोठे कवि होऊन गेले व आणखी होतील, तरीपण आमच्या विशिष्ट संस्कृतींत आमच्या वाङ्मयाचा ओढा वृत्तपत्रलेखनाकडेच फार आहे. शास्त्राची गति आज इतकी पुढें गेली आहे कीं कवींनीं अद्भुत म्हणून वर्णिलेल्या गोष्टींपेक्षांहि अधिक अद्भुत गोष्टी आज खऱ्या होत आहेत. वृत्तपत्र-लेखन ही अद्भुततापूर्ण सत्यस्थिति समजून सांगतें. जगांत कुठें काय चाललें आहे हें तुम्हांला समजायला हवें ना? आठवड्याचीं वृत्तपत्रें त्यासाठीं आहेत. जॉन गंथर हा पत्रकार निरनिराळ्या खंडाची राजकीय माहिती तुम्हांला सांगत आहे. कादंबरीकार व नाटककार यांचें लेखनकौशल्य अशा लेखकांच्या लेखणींत आहे. ते लिहितात ते विषय नाटककादंबरीला मागें सारतील एवढे चमत्कृतिपूर्ण असतात. शिवाय वृत्तपत्रांनींहि नाटकेंकादंबऱ्यांचें क्षेत्र व्यापलें असून सामाजिक सद्यःस्थितीसंबंधानें कथा, नाटकें वगैरे नियतकालिकांत येतच असतात. शास्त्र व तंत्र यांच्या विकासामुळें श्रेष्ठ कलाकृतींचा आस्वाद लक्षावधींना देतां येतो. उत्तम गायनाचें रेकॉर्डिंग, टेलिव्हिजनवरील नाटकें, उत्तम चित्रांचीं पुनर्मुद्रितें हें

सर्व कलाप्रेम वाढविणारेंच आहे. कलेची लोकप्रियता वाढविण्याचा हा प्रकार अनेक पाश्चात्य पाहुण्यांना आवडत नाहीं. त्यांच्या मतें जणूं कांहीं कला लोकांपर्यंत जाणें हाच भ्रष्टाकार !

अमेरिकन वाङ्मयासंबंधानें डब्ल्यू. एच्. औडेन म्हणतो, "हें वाङ्मय अत्यंत दुःखपूर्ण आहे. अमेरिकन समाज हताश, निर्वासित व गुन्हेगारांचाच बनला आहे असें त्या वाङ्मयावरून वाटतें. त्यांतले नायक दुःख आणि अनर्थ फक्त सहन करणारे आहेत." याचें कारण असें दिसतें कीं अमेरिकन लेखक अंतःकरणाचे ध्येयवादीच असून ध्येयवादाचा भ्रष्टाकार दिसला कीं चिडतात. गलिच्छ वस्त्यांचीं चित्रें कथांतून लोकांपुढें मांडणें हें हे लेखक आपलें कर्तव्य मानतात. अमेरिकन जीवनांत चढाओढ असून चढाओढींत जो निराशावाद असतो त्यांचेंहि प्रतिबिंब वाङ्मयांत उठतेंच. गार्लंड, ड्रीसर, नोरिस, सिंक्लेअर लेविस, अप्टन सिंक्लेअर, डॉन पॅसॉस, हेमिंग्वे, फॉक्नर, स्टीनबेक यांचें कथावाङ्मय या प्रकारचें आहें. १९२५ ते १९४० या काळांत अमेरिकन कादंबरीचें पश्चिमी जगांत फार वर्चस्व होतें. हेमिंग्वे हा यांत फार प्रभावी ठरला. आधुनिक माणसाला आपल्या जगावर ताबा ठेवतां न येऊन भयंकर परिस्थिति निर्माण झाली आहे हें तो दाखवितो. त्याच्या कादंबरींतील माणसें आपला तोल सुटलेला पाहून भयभीत झालेलीं असतात. त्याच्या नायकांना नैतिक विजय थोडाफार मिळाला तरी भौतिकतः ते पराभूत झालेलेच असतात. विध्वंस व मृत्यु यांचीच छाया त्याच्या वाङ्मयावर आहे. डॉन पॅसॉसनें बेकार व कमी पगाराचे लोक यांचीं करुणापूर्ण शब्दचित्रें काढलीं आहेत. हेमिंग्वेच्या माणसांना लढण्याची संधि मिळते तीहि पॅसॉसच्या माणसांना मिळत नाहीं. ते सदा पराभूत, पूर्ण अवैयक्तिक अशा शहरांत उपेक्षिलेले असतात. विल्यम फॉक्नरनें दक्षिण प्रदेशांतील वांशिक असहिष्णुता, ग्रामीण गलिच्छ वस्त्या यांतील अस्वाभाविकता, अधःपात, अत्याचार यांचीं चित्रें आपल्या कथावाङ्मयांत रेखाटलीं आहेत.

भरभराटीच्या प्रदेशांतील ललित वाङ्मय अधिक उत्साहवर्धक आहे कारण तेथल्या जीवनाचें तें प्रतिबिंब आहे. डोरोथी फिशर, वॉल्टर एडमंड्स, सॅम्युअल ॲडम्स, मार्था ऑस्टेंडो, ए. बी. गुथ्री वगैरे लेखक या जातींतले होत.

अमेरिकन्स हे सर्वच परदेशांतून आले असल्यानें त्यांच्या ललितवाङ्मयांत पूर्व देशांतील अनुभव, अमेरिकेंतले नवे अनुभव वगैरेचें चित्रण असतें. परदेशाशीं आमचा संबंध आल्यामुळें चीन वगैरे परदेशांवर पर्ल बकसारख्यांनीं

ललित वाङ्मय लिहिलें आहे. सर्वच लेखक निराशावादी नसून स्टीनबेकसारखे जीवनांतील झगड्याला महत्त्व देणारे लोकहि आहेत.

दुसऱ्या महायुद्धावर लिहिलेल्या कथांत अनेक वंशांच्या सैनिकांची तुकडी, त्यांचे कलह, तिरस्कृत वंशांतला माणूस शूर ठरणें व कथानकांतील दुर्जन मरून जाणें अथवा त्याचें हृदयपरिवर्तन होणें आणि तुकडींतल्या माणसांत संकटामुळें बंधुभाव निर्माण होणें अशीं कथानकें आहेत. लहान शहरांतील समाजजीवनावर लिहिलेलें ललितवाङ्मय आढळत नाहीं. अमेरिकन जीवन धावतें असल्यानें वाचकांना विचाराच्या व अलंकाराच्या सूक्ष्म छटा कळत नाहींत. म्हणून अमेरिकन वाङ्मय भडक असावें लागतें. काव्य मागें राहण्याचें कारण हेंच. लोकांत ललितवाङ्मय-वाचकांपेक्षां चरित्रग्रंथ, प्रवासवर्णनें वगैरे वाचण्याची आवड वाढत आहे. पातळ कागदांच्या कव्हरांनीं पुस्तकांच्या किंमती उतरल्या असून दरसाल ३० कोटीपर्यंत अशीं पुस्तकें खपतात. हीं पुस्तकें पुस्तकांच्या दुकानांतच नव्हे तर इतर दुकानांतहि मिळतात. गृहिणी वाण्याच्या दुकानांतील खरेदींत पुस्तकेंहि खरेदी करून घरीं घेऊन येतें.

जाझ हें अमेरिकेचें खास संगीत आहे. तें अलीकडील तीनशें वर्षांतलें आहे. जर्मनींत एकदां लुई आर्मस्ट्रॉंगचें जाझ चालू असतां लोक हातांनीं टाळ्या वाजवितांना दमले व त्यांनीं खुर्च्या आपटण्यास सुरुवात केली तेव्हां अखेर खुर्च्या शाबूत राखण्यासाठीं पोलीस बोलवावे लागले, इतकें जाझ हें संगीत लोकप्रिय होणारें आहे. जाझ हें मुख्यतः अमेरिकन निग्रोंनीं वाढविलें. जाझ हें पूर्वीं वेश्यांच्या वस्तींत गाइलें जाई. पण माणसाच्या कलावृत्ति जागृत करण्याचा गुण त्याचे ठिकाणीं आहे असें आढळून आल्यावरून आतां त्याचे सर्वत्र मोठमोठे जलसे होतात. अगदीं नवख्या माणसालाहि वृंदवादनांत जाझ गाइलें वाजविलें जात असतां त्यांतील प्रत्येक वाद्याची गोडी वेगवेगळी चाखतां येते. इतरहि विविध संगीताचा विकास अमेरिकेंत पुष्कळ झाला आहे.

अमेरिकनांना संगीताची गोडी कितीशी आहे? १९५५ सालीं बेसबॉलचीं तिकिटें दीड कोटि लोकांनीं खरीदलीं तर साडेतीन कोटि लोकांनीं जलशांचीं तिकिटें विकत घेतलीं होतीं. सारें जग संगीतावर जेवढा खर्च करतें त्याहून अधिक खर्च एकटी अमेरिका संगीतावर करते. सार्वजनिक वाचनालयांत संगीत ऐकणारांची सोय करतात व पुस्तकाप्रमाणें रेकॉर्ड्सहि घरीं भाड्यानें देतात. कांहीं रेडिओ स्टेशन्स सर्व दिवसभर विविध संगीत चालू ठेवतात. बुक क्लबप्रमाणें रेकॉर्ड-क्लबहि निघालेले आहेत. अकॉर्डिअन व सतार हीं वाद्यें दहा लक्ष

लोकांना वाजवितां येतात. शिशुवर्ग, हायस्कुलें, कॉलेजें वगैरे सर्वत्र संगीत शिकविलें जात असून कॉलेजांत व विद्यापीठांत कांहीं ठिकाणीं शिक्षणक्रमाचा तो एक आवश्यक भाग झाला आहे. संगीतासाठीं उन्हाळ्याचे वर्ग चालतात. पूर्वी युरोपीय संगीत-शिक्षक नेमावे लागत पण आतां दर चार संगीतज्ञांपैकीं तीन अमेरिकन आहेत. फार लोकांना संगीताची गोडी लागली असल्यानें त्याला एक व्यापारीपणा आलेला असून नवीन प्रयोग करण्याची प्रवृत्ति कमी होत आहे. अमेरिकनांना संगीताची विशेष गोडी लागण्याचें कारण त्यांची वाढती फुरसत आणि निव्वळ भौतिक जगापासून मनानें दूर जाण्याची संगीतामुळें मिळत असलेली संधि हें होय. नृत्य हें अमेरिकनांत प्रथमपासून आहे. चर्चमध्येंहि नृत्य होत असे. बदलत्या काळाप्रमाणें त्यांत सुधारणा होत असून बॅले नृत्य अमेरिकेंत हल्लीं फारच लोकप्रिय झालें आहे. रंगचित्रांत फ्रान्सखेरीज इतर कोणत्याहि राष्ट्राशीं अमेरिका बरोबरी करूं शकते.

घरबांधणीच्या बाबतींत अमेरिकन्स हे उपयुक्ततावादी आहेत. १८४० त अमेरिका औद्योगिक युगाच्या उंबरठ्यावर होती. त्यावेळीं होरॅशिओ ग्रीनोह म्हणतो, "सौंदर्य याचा अर्थ मी कांहीं तरी उपयोग असाच करतों." औद्योगिक शहरें वाढूं लागल्यावर निवळ उपयोगाऐवजीं भडक दर्शनाचीं घरें शहरांत बड्या धनिकांनीं बांधलीं. पण पुन्हा घरबांधणीच्या बाबतींत 'शिकागो पंथ' जो उदयास आला तो उपयुक्ततावादीच आहे. आतां घरांत विश्रांति मिळावी, कुटुंबियांसमवेत सुखानें राहतां यावें, फुरसत चांगल्या प्रकारें घालवतां यावी, गटानें खेळतां यावें, बाहेरचें फिरणेंहि घराभोवतीं करतां यावें, इत्यादि दृष्टीनें घरें बांधण्यांत येत आहेत.

प्रकरण चवदावें

# टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्रें

कलेच्या भाववितरणावर (कम्युनिकेशन ऑफ आर्ट) गेल्या प्रकरणांत थोडेंसें बोलल्यानंतर आतां भाववितरणाच्या कलेवर (आर्ट ऑफ कम्युनिकेशन) या प्रकरणांत बोलूं. टी. व्ही. म्हणजे टेलिव्हिजन, रेडिओ, वृत्तपत्रें हीं सांघिक भाववितरणाचीं (मासमीडिआ) साधनें आहेत. हीं साधनें सर्व प्रकारच्या कलेचा उपयोग करतात आणि पुष्कळदां त्यांचा 'माल'हि कलापूर्ण असतो. पण या सांघिक भाववितरणकार्यांत असेहि कांहीं व्यवहार असतात कीं त्यांचा कलेशीं फारसा संबंध नसतो आणि त्यांचा हेतु नवनिर्मिति हा नसून नफेबाजी हा असतो. या सांघिक भाववितरणसाधनांवर म्हणजे टी. व्ही., रेडिओ, वृत्तपत्रें, नियतकालिकें यांवर १९५६ सालीं जाहिरातदारांनीं एक सहस्र कोटि डॉलर्स खर्च केले. सर्वसामान्य लोकांत पसरणारीं ६२६ नियतकालिकें, १७०० दैनिकें, ९ हजार साप्ताहिकें, २९४७ रेडिओ स्टेशन्स, ४६५ टी. व्ही. स्टेशन्स या सर्व वितरणसाधनांचा संसार या जाहिरातींवर चालतो. अर्थात् जाहिरातींत व घोषणांत जाहिरातदाराचा दृष्टिकोन मांडला जातो आणि त्याचा परिणाम वृत्तपत्रांतील लेख, संपादकीय मजकूर व टी. व्ही. वरचीं नाटकें यांवर होतोच. वाचकप्रेक्षकांची करमणूक करूनच जाहिरातदारांचा गिऱ्हाइक मिळविण्याचा प्रयत्न असतो आणि म्हणून सिगरेट अथवा साबण यांचे कारखानदार, जें रेडिओ अथवा टी. व्ही. स्टेशन अत्यंत लोकप्रिय असेल अथवा जें वृत्तपत्र, नियतकालिक जास्तींत जास्त खपाचें असेल त्यालाच पाठबळ देतात. रेडिओ व टी. व्ही. यांचीहि वृत्तपत्राशीं चढाओढ चालते.

जास्तींत जास्त लोक कशानें आकृष्ट होतात ? १ कोटी ३० लक्ष लोकांनीं 'फ्लीडर मॉस' व दीड कोटि लोकांनीं 'ला बोहीम' टी. व्ही. वर पाहिलें.

लॉरेन्स ऑलिव्हिअरची 'रिचर्ड दि थर्ड' ही फिल्म नॅशनल ब्रॉडकास्टिंग कंपनीनें ५ लक्ष डॉलर्स खर्चून देशभर दाखविली तेव्हां दिवसां जमणाऱ्या प्रेक्षकांचा उच्चांक म्हणजे ५ कोटि प्रेक्षक हा गांठला गेला. सिनेमाचा प्रेक्षकगण १२ वर्षें वयाच्या बालिश मनोवृत्तीचा असतो अशी एक हेटाळणी नेहमीं ऐकूं येतें. पण चांगली गोष्ट पाहायला ऐकायला मिळाली तर ती संधि लोक साधणारच.

'फ्लीडर मॉस' अथवा 'रिचर्ड' यांच्यामुळेंच टी. व्ही. चें एवढें आकर्षण आहे असें नव्हे. मग हें आकर्षण कशाचें? कांहीं थोडे दिवस टी. व्ही. सतत पाहिला तर मनावर कित्येक नवीन संस्कार होतात. टी. व्ही. चें सामर्थ्य विविध आणि प्रचंड आहे. एक तर शुद्ध आराम देणारी करमणूक त्यानें मिळते. दूर-दूरच्या गोष्टी अगदीं नजिक व ताबडतोब दिसतात. या गोष्टी मनाकडे सरळ झेप घेतात. टी. व्ही.त विविध मानवी भावनांचा सहजस्पर्श केव्हांहि अनुभवतां येतो. सबंध समाजाची सांस्कृतिक पातळी उंचावण्याची शक्ति त्यांत आहे. टी. व्ही. न्यूयॉर्कमधील यूनोचा देखावा दाखवितो, तो संपतांच एकदम सुएझ कालव्यांत बुडलेल्या जहाजांवर टी. व्ही. उडी घेतो, तेथून पुढली उडी एकदम कॅलिफोर्नियाच्या आगीवर घेतो. आपणहि अशा उड्या मारत आहों असें पाहणाराला भासतें. ज्या लोकांना 'बॅले' हा शब्द काय अर्थाचा आहे हें माहीतहि नव्हतें त्यांना घरीं बसून उत्कृष्ट बॅले पाहायला मिळतो. टी. व्ही. पाहून आपण पोट धरधरून हसतों, भीतीनें आपण कंप पावतों, टी. व्ही. वर येणाऱ्या लोकांच्या जीवनांत आपण जणूं मिसळतों, आपल्या जगाविषयींच्या नव्या ज्ञानानें आपण बांधले जातों, त्या जगाचें रूप आपण पाहतों त्याला स्पर्श करतों, हें सारें जग, या देशांतलें व परदेशांतलें, एक आहे, आपण सारीं माणसें एक आहों हें टी. व्ही. शेकडों मार्गांनीं आपणाला पटवीत असतो.

टेलिव्हिजनमुळें कौटुंबिक जीवनाबद्दल आस्था निर्माण करण्याचा प्रयत्न सतत होत आहे. टी. व्ही. वर येणाऱ्या बड्या लोकांना कौटुंबिक प्रश्न विचारले जातात, मुलांना अनेकदां टी. व्ही. वर आणून त्यांचें कौतुक केलें जातें. घरगुती जीवनावर सोपे विनोद करून विनोद व समजूतदारपणा यांनीं सर्व अडचणी निवारतां येतात हें शिकविलें जातें. टी. व्ही. वर मुलांना अनिर्बंध बोलूं दिलें जातें, यामुळें हे छोटे लोक खरोखर किती धूर्त, गोड व आश्चर्यकारक असतात हें आपल्या लक्षांत येतें.

टी. व्ही. वर हलक्या दर्जाचींहि नाटकें दाखविलीं जातात. पण त्यांतहि स्त्री ही घरांतली नीतिदेवता व पुढारी आहे हें प्रेक्षकाच्या मनावर बिंबवलें जातें.

ज्या समाजांत तरुणतरुणींचीं लग्नें इतरांनीं जमवायचीं नसून ज्यांचीं त्यांनीं जमवायचीं असतात तेथें विवाहाच्या गूढत्वावर भर दिला जाणें स्वाभाविकच आहे. अगदीं परक्याची भेट हें एक खरोखर संकटच. आणि त्यांतहि पतिपत्नी या अगदीं निकटच्या नात्यानें भेटायचें! दुसरें, तें माणूस एकत्र आणि जन्माचें भेटायचें, "तें माणूस कसें असेल बरें? कुणास ठाऊक!" ही भेटीची उत्कंठा व भीति टी. व्ही. वर दाखवून "तरुण तरुणीचा इतका पाठलाग करतो कीं अखेर तीच त्याला पकडते" या म्हणींतल्या मनोवृत्तीचा परिचय टी. व्ही.वर आणून देण्यांत येतो. टी. व्ही. वरील पुष्कळसे नाट्यप्रयोग असेच असतात. आकर्षक, पण कारस्थानी व आपला अधिकार गाजवणारी तरुण नायिका टी. व्ही. वर दाखवितात. तें दृश्य विनोदपूर्ण ठेवण्यांत येतें, पण त्यामागें पुरुषाचें घरांतलें प्रभुत्व ही स्त्री हिसकून तर घेणार नाहीं ना अशी भीति निर्माण करणें हा हेतूहि असतो.

विनोद हा जीवनांतला एक आवश्यक आनंद म्हणून टी. व्ही. वर प्रसारिला जातो. बेनी, सिल्व्हर्स, सीझर, मार्क्स, ॲलन वगैरे विनोदी नट टी. व्ही. वर फार लोकप्रिय आहेत. बहुधा टी. व्ही. वरील दर दुसऱ्या दृश्यांत विनोद दाखविण्यांत येत असून सुसंस्कृति व मनाची निरोगी अवस्था, माणसामाणसांतील भिंती पाडून टाकण्याचें साधन, माणसामाणसांत स्नेह निर्माण करण्याचें साधन, नट आणि प्रेक्षक यांच्यामध्यें आपुलकी निर्मिण्याचें साधन इत्यादि प्रकारांनीं विनोद वापरण्यांत येतो. अमेरिकन जीवनांत स्त्री-पुरुषांत वांशिक, धार्मिक, प्रादेशिक, धंदेविषयक असे अनेक मनस्ताप अनुभवास येत असतात व त्यांचीं चित्रें टी. व्ही. वर जीं दाखवितात त्यांतून मानवी जीवनांतल्या सर्व चिंता गोड स्वभावानें नाहींशा करतां येतात हें शिकविलें जातें. आपणां सर्व विभिन्नांना एकजीव करण्याचें सामर्थ्य विनोद व स्वभावांतील गोडवा यांत आहे अशी शिकवण टी. व्ही. देत असतो. आपणांला अत्यंत भीतिप्रद वाटणारे मनस्ताप टी. व्ही. चव्हाट्यावर मांडून नाहींसे करतो. काय पत्नीशीं तुमचें भांडण झालें आहे? तिच्याबद्दल तुम्हांला जो द्वेष वाटतो त्याची तुम्हांला शरम वाटते ना? 'आय् लव्ह ल्यूसी' हें नाटक तुम्ही टी. व्ही. वर पाहा. त्यांत तुमची पत्नी अधिक तरुण, अधिक आकर्षक झालेली तुम्हांला दिसेल; तिच्या बायकी लबाड्या, जेव्हां तेव्हां नवऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करण्याची तिची खोड, यांची त्या नाटकांत थट्टा करण्यांत आलेली आढळेल आणि मग विवाहित दंपत्यें अशीं भांडायचींच पण त्यांच्या भांडणाखालूनहि प्रेमाचा प्रवाह सतत वाहात

असतो याचा प्रत्यय तुम्हांला टी. व्ही. देईल. जॅक बेनी हा तुमच्यांतला सुप्त चिक्कूपणा तुम्हांला दाखवितो. तें दृश्य पाहताना तुम्ही जें हसतां तें जॅक बेनीच्या अभिनयाला नव्हे तर स्वतःचे जे दोष तुम्ही स्वतः कबूल करीत नाहीं पण जे तुम्हांला त्या दृश्यांत प्रतिबिंबरूपानें दिसतात व पटतात त्यांकडे पाहून तुम्ही हसता. आपल्या राहण्याच्या खोलींत घरगुती भाषेंत, परिचित देखाव्यांत, परिचित माणसें आणून घरगुती भाषेंत टी. व्ही. जिव्हाळा उत्पन्न करीत असल्यामुळें टी. व्ही. हें अगदीं आदर्श विनोदसाधन होऊन बसलें आहे.

अमेरिकेस येणाऱ्या पाहुण्यांची तक्रार असते कीं आमच्यामध्यें दुःखान्त कथांबद्दल आवड नाहीं. ही गोष्ट खरीहि आहे. पण सुखकथांपेक्षां दुःखकथांत खास अधिक चांगलें असें काय आहे ? गुलामगिरी, सामाजिक विषमता, क्रूरता, पिळणूक, बहुसंख्यांची उपासमार यांवर आधारलेल्या संस्कृतींत दुःखकथा ही स्वाभाविक आहे. पण, अमेरिकेंत इतर कांहीं दोष असले तरी अशी दुःखजर्जर संस्कृति अमेरिकेची नाहीं. आमची संस्कृति कर्तृत्व व सुखसंस्थापना यांवर आधारलेली आहे. सार्वत्रिक शिक्षण, भौतिक व सांस्कृतिक कल्याण या गोष्टीं सर्व माणसांच्या आटोक्यांत असतात अशी आमची श्रद्धा आहे. अर्थात् आमची कलात्मक अभिरुचि मजाप्रिय आहे. विनोद हा जीवनमार्ग म्हणून आम्हीं निवडलाच आहे.

टी. व्ही. सत्य घटना नाट्यपूर्णतेनें दाखवितो हें टी. व्ही. चें आणखी एक वैशिष्ट्य होय. अँड्री डोरिया ही बोट कशी बुडाली तें टी. व्ही. वर दाखवितात. तेव्हां त्यांत ती बोट बुडत असतांना घेतलेली फिल्म व फिल्ममध्यें नसलेल्या घटना पुन्हा कॅमेऱ्यासाठीं घडवून तीं दृश्यें, असें सर्व एकत्र सलग जमवून अँड्री डोरिया बुडाल्याची सत्यकथा जशीची तशी समग्र टी. व्ही. वर दाखवितात. कैद्यांच्या स्वाभिमानास आळवून चालविलेल्या एका तुरुंगाचें चित्रण टी. व्ही. वर दाखविलें होतें. त्यांतील साध्या व सत्य अभिनयानें फार खोल संदेश लक्षावधि प्रेक्षकांना दिला, " तुम्हांला जर गुन्हेगार प्रवृत्तीवर विजय मिळवायचा असेल तर निराधाराना आधार द्या " हा संदेश त्यांत होता. शिक्षणासाठीं टी. व्ही. चा उपयोग नुकताच सुरू झाला आहे. तरीहि शैक्षणिक टी. व्ही. ला आतांच पाच कोटीपर्यंत प्रेक्षक मिळू लागले आहेत.

नॅशनल असोसिएशन ऑफ रेडिओ अँड टेलिव्हिजन अँड ब्रॉडकास्टर्स या संस्थेनें टी. व्ही. संबंधानें कांहीं नीतिनियम ठरविले आहेत. त्यांत करमणुकी-बरोबरच माहिती व शिक्षण देणें हेंहि आपलें कर्तव्य आहे व तें आपण पार पाडूं

असें त्या संस्थेनें आश्वासन दिलें आहे. सार्वजनिक उपयोगाची संस्था या नात्यानें आपलें कर्तव्य ही संस्था ओळखत असून अनेक स्थानिक घोषणा व कार्यक्रम यांना ही संस्था मोफत प्रसिद्धि देते. लोकांनीं चर्चमध्यें प्रार्थनेला जावें, कम्युनिटी चेस्टमध्यें मदत टाकावी वगैरे उपदेशास प्रसिद्धि देते, मानसिक आरोग्य, लोककल्याणाचे कार्यक्रम इत्यादींचा प्रचार करते. अमेरिकन सरकारचा स्वतःचा रेडिओ अगर टी. व्ही. नाहीं. सरकार या खाजगी धंदेवाल्या संस्थांवर अवलंबून असतें आणि अशा संस्था सरकारला खास वेळ देतात. (उदाहरणार्थ, सी. बी. एस्. या संस्थेनें सरकारी विमानदळाच्या सहकार्यानें वैमानिक सामर्थ्यावर एक याख्यानमाला गुंफिली व तिजसाठीं १० लक्ष डॉलर्स खर्च केले.) रेडिओ व टी. व्ही. चालविणाऱ्या संस्था उघड उघड व्यापारी संस्था असल्यानें व नफा मिळेल तरच त्या चालणें शक्य असल्यानें त्यांना आर्थिक दृष्टीनें प्रथम विचार करावा लागतो हें स्वाभाविकच आहे. शिवाय सगळेच कार्यक्रम सर्वांनाच आवडावे अशी जरुरीहि नाहीं. टी. व्ही. चा एकादा लहानसा कार्यक्रमहि लोकांना आवडला तर दशलक्षावधि लोक तो ऐकतात. शिवाय बौद्धिक दृष्ट्या चिकित्सक व जिज्ञासू जे असतात अशांचें समाधान करणें हें जेवढें टी. व्ही. चें कर्तव्य आहे तेवढेंच बौद्धिक दृष्ट्या व इतर दृष्टीनेंहि आळशी व उथळ जे असतात अशांचेंहि समाधान करणें हें टी. व्ही. चें कर्तव्य नव्हे काय?

रेडिओ, टी. व्ही., हीं साधनें प्रचंड जनसमाजासाठीं चालणारीं असल्यानें सर्वांत साधारण ग्रहणक्षमता असेल तेथपर्यंतच पोंचण्याची या साधनांची प्रवृत्ति असते हा या साधनांचा दोष खराच. पण यांत एक फायदाहि असतो. विविध अभिरुचि आणि अनुभव असणारीं माणसें ग्राहकांत असल्यानें लोकांत सहिष्णुता उत्पन्न होते. असाहि अनुभव आहे कीं अगदीं सामान्य लोकांत नाटक, बॅले, संगीत यांबाबत अनेक सांस्कृतिक-पावित्र्यवाद्यांपेक्षां फारच अधिक उच्च अभिरुचि असून निवळ व्यापारी दृष्टीनें रेडिओ व टी. व्ही. यांचा दर्जा उंचावण्याची गरज उत्पन्न होते.

टी. व्ही. सुरू झाल्यापासून रेडिओ मागच्या बाकावर ढकलला गेला आहे. पण तरीहि दूर दूर, अगदीं देशाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत पोंचण्याचें साधन तेवढेंच आहे. शिवाय टी. व्ही. वापरतां येत नाहीं अशा जागा व वेळा अनेक असतात, तेथें त्यावेळीं रेडिओच उपयोगी पडतो. ताज्या बातम्यांसाठीं रेडिओच लागतो. घरांतल्या कोणत्याहि खोलींत, कारखान्यांत काम करतांना, हात आणि डोळे काम करीत असतां, कानांनीं रेडिओ ऐकतां येतो. मोटारींत,

समुद्रकिनाऱ्यावर फिरतांना रेडिओ लावतां येतो, खिशांतहि रेडिओ ठेवून ऐकतां येतो.

टी. व्ही. नें सिनेमाला चांगलाच टोला मारला. दर आठवड्याला ९ कोटि प्रेक्षक सिनेमाला जात ते टी. व्ही. मुळें एकदम ५ कोटीवर आले व नंतर साडे पांच कोटीपर्यंत पुन्हा चढले. सिनेमाच्या पिछेहाटीला टी. व्ही. हें एकच कारण नव्हतें पण तें महत्त्वाचें होतें. सिनेमाला जायचें म्हणजे खर्च फार होई. लहान मुलांचीं तिकिटें काढावीं लागत अथवा घरांत मुलांच्यासाठीं मोलकरीण ठेवावी लागे. उघड्या सिनेमा थिएटरांत मोटारी घेऊन जातां येऊं लागलें तेव्हां मुलें लहान असल्यास तीं फुकट नेतां येऊं लागलीं आणि सिनेमा त्यांना नको असल्यास मागल्या सीटवर त्यांना झोपवतां येऊं लागलें.

टी. व्ही. ची आपणास मुळींच पर्वा नाहीं असें ढोंग सिनेनिर्मात्यांनीं कांहीं काल केल्यावर, मग ज्याच्याशीं लढतां येत नाहीं त्याच्याशीं दोस्ती करावी या न्यायानें सिनेनिर्मात्यांनीं टी. व्ही. चीं चित्रें स्वतः काढण्यास सुरवात केली, जुनीं चित्रें ते टी. व्ही. ला देऊं लागले, आपले नटनटी टी. व्ही.ला उसने देऊं लागले, या नटनटींना एक चित्र संपून दुसरें सुरू होण्यापूर्वीं, दरम्यानच्या बेकारींत नवा धंदा मिळूं लागला. सिनेमाचीहि सुधारणा होऊं लागली. चित्रांचे आकार मोठे झाले, त्यांत विविध रंग आले, नटनटींची संख्या अफाट झाली, टी. व्ही. वर दाखवितां येऊं न शकणाऱ्या अशा आणखी अनेक गोष्टी चित्रपटांत दाखवितां येऊं लागल्या. सिनेमा काढता येण्यासाठीं दोनशें-पंचाहत्तर मोठ्या कला आणि हस्तव्यवसायांची जुळणी व्हावी लागते इतका तो प्रचंड व्यवसाय झाला आहे. अमेरिकेंत सिनेमा, स्टुडिओ व सिनेमानिर्माते यांची होलीवुड ही प्रचंड वसाहत असून अमेरिकन सिनेमा या अर्थीं होलिवुड हें नांवच रूढ झालें आहे. अमेरिकन सिनेमा म्हणजे साऱ्या जगभर भौतिक वैभवाच्या व लैंगिक जीवनाच्या आकांक्षांचें स्वप्न झालें आहे. जगांतील सर्व लोकांवर जादूसारखा परिणाम त्यानें केला आहे. अमेरिकन सिनेमा पाहून अमेरिकन लोक हे फक्त गुंड व प्रियकर आहेत असा समज पसरला आहे हें अमेरिकेचें दुर्दैव होय. अमेरिका जगाची करमणूक करते, पण म्हणूनच करमणुकीची वस्तु पाहून तिला अधिक मान दिला जात नाहीं. सिनेमांतले खलनायक मेक्सिकन, अरब वगैरे परवंशीय असत तेव्हां त्याविरुद्ध तक्रारी येऊं लागल्या. म्हणून मग फक्त अमेरिकन खलनायकच पडद्यावर दाखविण्यात येऊं लागले. त्याचा आणखी विपरीत परिणाम झाला. अमेरिकेच्या वाढत्या जागतिक सामर्थ्याबद्दल ज्यांना हेवा वाटतो त्यांना अमेरिका ही गुंड,

छिनाल आहे हें जगासमोर सिद्ध करण्याला हा अमेरिकेच्या तोंडचाच पुरावा मिळाला. तरुणांनीं आईबापांपासून स्वतंत्र व्हावें व स्वतंत्रपणें वागावें या अमेरिकन पद्धतीचीं भडक अतिरंजित चित्रें सिनेमांत येऊन परदेशांत अमेरिकन तरुणतरुणींबद्दल लोकमत वाईट होत गेलें. सिनेमाच्या कथानकांत मानवी जीवनाचें चित्रण विपरीतच होतें. गुन्ह्यांचीं खरीं कारणें गलिच्छ लोकवस्त्या, बेदरकार आईबाप, करमणुकीचा अभाव, लोभमूलक अर्थव्यवस्था इत्यादि गोष्टींमुळें गुन्हेगारी बळावते. पण सिनेमानें गुन्हेगारी जेवढी मनावर ठसते तितका तिचा कार्यकारणभाव मनावर ठसत नाहीं.

अमेरिकन वृत्तव्यवसाय केवढा मोठा आहे? जगांतील वृत्तपत्रकागदापैकीं ६० टक्के कागद अमेरिकन वृत्तपत्रें खातात. अतिशय चमत्कृतिपूर्ण व वाह्यात अशा प्रकारापासून अत्यंत गंभीर अशा प्रकारापर्यंत सर्व प्रकारचा मजकूर त्यांत असतो. 'न्यूयॉर्क डेली न्यूज' या भडक बातम्या देणाऱ्या दैनिकाचा खप ३६ लक्ष ९४ हजार ८५१ आहे. 'न्यूयॉर्क टाइम्स' मध्यें जगांतलें जास्तींत जास्त वृत्त येत असून त्या पत्राच्या रविवारच्या आवृत्तीचा कागद तयार करण्यासाठीं दोनशें एकर जंगल तोडलें जातें. अशा सार्वराष्ट्रीय व जागतिक प्रसाराच्या पत्राखेरीज निवळ स्थानिक खपाचीं व महत्त्वाचीं पत्रें असतात तीं त्या त्या गांवांतील ठळक व्यक्ति, चळवळी यांची माहिती देतात आणि स्थानिक अभिमान व समाजसेवेची भावना टिकविण्यास मदत करतात.

जाहिराती हें वृत्तपत्राचें उत्पन्नाचें मोठें साधन असल्यानें व जास्तींत जास्त खपणाऱ्या वृत्तपत्रालाच जाहिराती मिळत असल्यानें लोकांचा क्षोभ होईल असें लिहून वृत्तपत्रांचा खप वाढवायचा आणि जाहिराती मिळवायच्या हें वृत्तपत्र प्रसाराचें तंत्र होऊन बसलें आहे. खेळ, बड्या लोकांचे सामाजिक प्रश्न, विनोदी चित्रें, पुस्तकांच्या बातम्या, कला, गृहरचना व संसारकार्य, लहानमोठ्या दुरुस्तीचीं कामें इत्यादि मजकुरांनीं वृत्तपत्रें वाचनीय केलीं जातात. मोठमोठ्या वृत्तपत्रांनीं साखळी पत्रें चालविलेलीं असून तीं लहान वृत्रपत्रांना जीवन कठिण करतात. उलट लहान वृत्तपत्रांना लेखक कंपन्यांची चांगली मदत होते. विनोदी व गंभीर, खेळविषयक, वैद्यकविषयक अथवा आरोग्यविषयक लेख व माहिती पुरविणाऱ्या कंपन्या (सिंडिकेट्स) आहेत, त्या थोड्या पैशांत हें सर्व प्रकारचें लिखाण लहान वृत्तपत्रांना पुरवितात, यामुळें बड्या बड्या वृत्तपत्रांशीं चढाओढींत लहान वृत्तपत्रें टिकाव धरून आपापल्या क्षेत्राची सेवा करतात. यंत्रसामग्रीची सुधारणा फारच जलद होत आहे. परदेशांतून येत असलेली तार तशीची तशी यंत्रावर

आपोआप कंपोज होऊन छापली जाऊं लागली आहे. यामुळें बातम्या जलद प्रसिद्ध होण्याबाबत कमालीची प्रगति झाली आहे. असोसिएटेड प्रेस, युनायटेड प्रेस, इंटरनॅशनल न्यूज सर्विस या जगभरच्या बातम्या गोळा करणाऱ्या बड्या वृत्तसंस्था आहेत. पण यांनाहि स्थानिक महत्त्वाच्या बातम्यांसाठीं वृत्तपत्रांच्या कचेऱ्यांवर अवलंबून राहावें लागत असल्यानें वृत्तपत्रें, वृत्तसंस्था व लेख पुरवणाऱ्या कंपन्या यांचें चांगलें सहकार्य चालतें.

सार्वत्रिक प्रसाराचीं पांचशें नियतकालिकें अमेरिकेंत आहेत. त्यांतील ५४ नियतकालिकांचा खप प्रत्येकीं ७ लक्षांपासून ११ लक्षांपर्यंत आहे. 'रीडर्स डायजेस्ट'चा खप जगभर असून तें सर्वच दृष्टींनीं श्रेष्ठ आहे. व्यापारी नियतकालिकें, विद्वत्तायुक्त लेखांचीं मासिकें, साप्ताहिकें, कंपन्यांचीं प्रसिद्धिकें, शाळांचीं पत्रकें, निरनिराळ्या संघटनांचीं पत्रकें या सगळ्या मिळून अमेरिकेंत कागदाचा खप फारच प्रचंड आहे. अत्यंत गंभीर विषयापासून सिनेमा, नट्या व मोठे लोक यांच्या विषयींच्या अत्यंत गलिच्छ कंड्यांपर्यंत सर्व प्रकारच्या विषयांना वाहिलेलीं हीं नियतकालिकें आहेत. जाहिराती हव्यात तर वाचक वर्ग खूप दाखवावा लागतो. मग वाचक मिळविण्यासाठीं घाणेरडा मजकूर छापण्याची अगदीं चढाओढ लागते. पण एकंदरीनें चांगल्या नियतकालिकांचा खपच जास्त असून गटारी पत्रांचा खप त्या मानानें कमीच असतो. वृत्तपत्रें व नियतकालिकें फार वाईट मजकूर छापतात हें विचारी लोकांना कबूल आहे. पण त्यासाठीं वृत्तसेन्सॉरशिपला पाठिंबा मिळत नाहीं. लोक शहाणे झाले म्हणजे गटारी लेखनाला आळा बसेल अशी अमेरिकेची श्रद्धा आहे.

रेडिओ, टेलिव्हिजन, वृत्तपत्रें, नियतकालिकें वगैरेंतून गटार संस्कृतीचा प्रसार होतो त्याचबरोबर या प्रकारावर टीकाहि खूप प्रखर होते. यामुळें बऱ्यावाईट प्रकाराची सतत चाळण होत आहे. अमेरिकन टीका ही सामान्यतः प्रखरच असते. आजवर अमेरिकन कादंबरीकारांनीं प्रखर टीकेनें आमच्या समाजव्यवस्थेचे वाभाडे काढले. आतां दुसरे टीकाकार कादंबरीकारांची खरडपट्टी काढीत आहेत. टीकाकारांच्या या टोलाटोलीमुळें सारी अमेरिकन समाजव्यवस्था गलिच्छ तर बनली नाहीं ना अशी शंका येते. पण टीकाकारांच्या ध्येयवादामुळें ते अधीरपणानें समाजाचीं काळींबेरीं उजेडांत आणतात असा याचा अर्थ असतो. अमेरिकन टीकाकार इंग्लंडांतील वाङ्मयावरहि मार्मिक टीका करतात. फ्रेंच वाङ्मय व फ्रेंच कला यांवर फ्रान्सबाहेर अमेरिकेंतच सर्वोत्कृष्ट टीका होत असल्याची कबुली फ्रेंच साहित्यिक व कलावंतहि देत आहेत.

पण अमेरिकन अभिरुचि सुधारते आहे कीं बिघडते आहे? टी. व्ही. वर पंधरा वर्षांपूर्वीचे जुने चित्रपट आले तेव्हां वरील प्रश्नाचें एक उत्तर मिळालें. पंधरा वर्षांपूर्वी योग्य वाटलेले चित्रपट आज जुनाट वाटूं लागले आहेत. त्यांतले संवाद आतां चमत्कारिक वाटतात, त्यांतला विषय कापसून गेला आहे, त्यांतल्या कल्पना आज अगदींच बावळट वाटतात. टी. व्ही. वर व सिनेमाच्या पडद्यावर येणारीं नवीं चित्रें व हीं जुनीं चित्रें ताडून पाहिल्यास अभिरुचीची प्रगति झाली आहे अशी खात्री होते. जास्तींत जास्त गिऱ्हाईक मिळविण्याच्या चढाओढींत लक्षावधि लोकांच्या आवडीची कदर करण्यांत चित्रपटांचा दर्जा कमी होतो हें खरें. पण त्याचबरोबर सदभिरुचीचें समाधान करणारें चित्रणहि पुष्कळ होत आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. युरोपांत कलाप्रेमी वर्ग लहान असतो व त्याची उच्च अभिरुचि असूं शकते. पण अमेरिकेंत लक्षावधि लोक टी. व्ही. वर, सिनेमांत कलासेवन करतात ती कला मूठभरांच्या कलेइतकी उच्च असणार नाहीं. यामुळें युरोपियनांना अमेरिकन कलाभिरुचि हीन वाटते. पण अमेरिकनांच्या मतें, प्रचंड बहुसंख्य जनतेला आपण कलासेवनाचें साधन व संधि दिली हीच गोष्ट मोठी आहे. आतां लोक याच साधनानें आपली अभिरुचि सुधारत राहतील.

## प्रकरण पंधरावें

# करमणूक

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत दक्षिण पॅसिफिकमधील एकाद्या बेटावर एकटे पडण्याचा ज्यांच्या बाबतींत संभव असेल अशा अमेरिकन सैनिकांना खिशांत एक दोरीचा तुकडा नेहमीं ठेवण्याला शिकविलें जात असे. त्या बेटावरला माणूस संशयानें विरोधी भूमिका घेऊन येतो आहेसें दिसलें कीं त्या सैनिकानें खिशांतली ती दोरी काढून 'मांजराचा पाळणा' खेळूं लागावें अशी त्या सैनिकाला सूचना असे. जगांत कुणालाहि सहज समजेल व मजेदार वाटेल असा हा खेळ आहे. तो सुरू केला कीं बेटावरील तो संशयग्रस्त व शत्रुभावनेनें पुढें येणारा माणूस संशय सोडून विश्वासानें आपणहि त्या खेळांत सामील होई. खेळ हें चिन्ह असें आहे कीं तें वैरभावना नष्ट करतें आणि जेथें उभयपक्षीं भाषासाधर्म्य नाहीं तेथेंहि दोन माणसांना एकत्र आणणारा पूल खेळानें निर्माण होऊं शकतो.

प्राचीन काळचे खेळ व महोत्सव येथपासून आजकालच्या ऑलिंपिक क्रीडामहोत्सवापर्यंत आणि प्राचीन काळच्या मंदिरनृत्यापासून आजकालच्या चौकडी नृत्यापर्यंतचे जे सर्व खेळ माणसांनीं केले त्यांचा हेतु माणसांनीं आपल्या इच्छा व अंतःसंवेदना शारीरिक हालचालींनीं व्यक्त करणें हा होता. कलाप्रदर्शनाप्रमाणें क्रीडाप्रदर्शनानेंहि गोंधळ नष्ट होऊन शिस्त निर्माण होते, संभ्रमाच्या जागीं सुसंगत अर्थ दिसूं लागतो. माणसांची कला ज्या प्रकारची असेल तीवरून त्यांचीं सामाजिक उद्दिष्टें आणि जीवनाच्या सार्थकत्वाची त्यांची कल्पना यांचा उलगडा जसा होतो तसें तेंच काम खेळांनींहि होत असतें.

अमेरिकेंतले खेळ आणि तेथें फुरसतीचा केला जाणारा उपयोग यापासून आपणांला अमेरिकनांसंबंधानें काय बोध होतो? अमेरिकेंतलें चौकडी नृत्य हें युरोपांतील लोकनृत्यापासूनच निर्माण झालें आहे. पण अनेक दृष्टींनीं तें अमेरिकेचं

खास वैशिष्ट्य बनलें आहे. हें चौकडी नृत्य मूळचें ग्रामीण असल्यानें त्याचा सूर ग्रामीणच असतो. चार जोडप्यांचा तो चौक असतो. त्यांत पतिपत्नी हा कौटुंबिक गट व चार कुटुंबांचा सहकार ही सामाजिक कल्पना ध्वनित केलेली असते. अमेरिकेंत ज्यांनीं प्रथम वसाहत केली ते बंदूक व कुऱ्हाड चालविण्यांत चपळ असून त्यांचे विचार व कृति त्या हत्यारांच्या उपयोगांत व्यक्त होत होतीं. चौकडी नृत्याच्या सुंदर आकृतींतहि याच गोष्टी व्यक्त होतात.

चौकडी नृत्य हें माणसाच्या सामाजिक जीवनाचें लहान स्वरूप असतें. समाजव्यवस्थेंत प्रत्येक माणसास अवश्य स्थान असून सर्वांच्या वर्तनांनीं सबंध सामाजिक जीवनांत सौंदर्य कसें निर्माण होतें हें त्या नृत्यानें द्योतविलेलें असतें. चौकडी नृत्यानें खरोखर सबंध अमेरिकन समाजरचनाप्रकारच दाखविला जात असतो. व्यक्तिस्वातंत्र्य, ऐच्छिकता व संघतत्त्व (फेडरेलिझम्) हीं अमेरिकन जीवनाचीं मुख्य तत्त्वें असून नृत्यांत व्यक्तीला महत्त्व आहेच. प्रत्येक व्यक्ति

मारण्यापेक्षां आपल्या तुकडींतील माणसाला वांचविण्यांत अधिक धैर्य दाखवितात याचें हेंच कारण असावें.) बास्केट बॉल हा खेळ मॅसॅच्युसेट्स या राज्यांत स्प्रिंगफील्ड येथें १८९२ पूर्वीं केव्हां तरी सुरू झाला. त्यांत टीमभावनेनें खेळावें लागतें, निर्णय चटकन् करावा लागतो, प्रतिक्रिया जलद असावी लागते, अचानक मिळणारी संधि चटकन वापरावी लागते. फुटबॉलला १८६७ नंतर अमेरिकेंतलें विशिष्ट स्वरूप आलें. त्याला वरील खेळांतले सारे गुण लागतातच. शिवाय शारीरिक दंगामस्ती त्यांत असल्यानें त्याला युद्धाचें स्वरूप येतें.

छंद हें अमेरिकेचें वैशिष्ट्य असून त्यांची संख्या एवढी मोठी आहे कीं त्यांची यादी करणेंहि अशक्य आहे. अमेरिकनांची फुरसत हल्लीं वाढत असून तो वेळ ते छंदांत घालवितात. फुरसत जशी वाढते आहे तसे लोक प्राचीन हातउद्योगाकडे वळत आहेत. आमच्या प्राचीन पूर्वजांना हातानें उद्योग करण्यांत अभिमान वाटे, त्या अभिमानाचें पुनरुज्जीवन, लक्षांत येण्याइतक्या ठळक प्रमाणांत, चालू आहे असें दिसतें. उद्यानक्लब वाढत आहेत. पुष्पप्रदर्शनें पुष्कळ होऊं लागलीं आहेत. तिकिटें व बटनें निरनिराळ्या तऱ्हेचीं गोळा करणें, सुंदर आकृत्या काढून त्यांवर सह्या मिळविणें, घरगुती प्राणी पाळणें असे शोक अनेकांना आहेत. ‘आपल्या हातांनीं अमुक एक वस्तु करा’ हा एक नवा हव्यास सुरू झाला आहे. ज्यांनीं पूर्वीं कधींहि हातांनीं कांहींहि केलें नव्हतें तें आतां आपले हात निरनिराळ्या कृतींसाठीं चालवूं लागले आहेत. या हस्तकलांविषयींचीं पुस्तकें, हत्यारें व इतर साहित्य इत्यादींचा सहाशें कोटि डॉलर्सचा धंदा अमेरिकेंत चालू आहे.

प्रत्येक छंदाच्या माणसांचा एकेक क्लब असतो. माणसें छंदांतून नवे मित्र मिळवितात. पक्षी राहतात कसे हें पाहण्याचा छंद असणारीं माणसें अंधारांत एकाद्या पक्ष्याच्या वस्तीशीं जाऊन पक्ष्यांचें निरीक्षण करीत बसतात. पन्नास वर्षांपूर्वीच्या मोटारी घेऊन व त्या वेळचे कपडे घालून माणसें फिरायला जातात. उच्च संगीताचा व्यासंग करून त्याचा आनंद लुटणारे संघ निघाले आहेत.

नाट्यप्रिय लोक आपापल्या गांवांतील नाट्यगृहांत गर्दी करतात. ज्यांना अभिनय करतां येत नाहीं पण तरीहि नाट्याची सेवा करायची आहे अशांना देखावे, कपडे वगैरे करण्याचीं कामें देतात. खेड्यांतील शाळेचा उपयोग ग्रामसेवाकेंद्रासाठीं करणें ही रूढि बरीच पुरातन आहे. बहुधा रोज रात्रीं हायस्कूलच्या इमारतींत सर्वत्र दिव्यांचा झगमगाट असतो. तेथें त्या वेळीं फर्निचर करायला लोक शिकतात; मुलांच्या सांघिक व्यायामासाठीं शाळा वापरतात, विशीच्या आंतलीं मुलें नृत्य करतात, महान् ग्रंथांचे अभ्यासक चर्चेसाठीं

जमतात. फार मोठ्या शहरांतून ग्रामसेवाकेंद्रासाठीं वेगळ्या इमारती असतात.

पूर्वी शहरांतील तरुणांना करमणुकीच्या कांहींहि सोयी नसत. एकुणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं तरुणांसाठीं क्रीडांगणें करण्यांत येऊं लागलीं. आतां प्रत्येक वस्तीला क्रीडांगण अवश्य आहे असें मानण्यांत येऊं लागलें आहे. एकाद्या गांवांतल्या नागरिकांना क्रीडांगणाचा खर्च झेपत नसला तर स्वयंसेवक एकत्र येतात आणि स्वतःच्या हातांनीं काम करूं लागतात. आतां करमणुकीच्या कामावर भरपगारी सर्व-वेळ कामगार असतात. १९५६ सालीं अशा कामगारांची संख्या ७६ हजार भरली.

हल्लीं उद्यानें विशिष्ट हेतूनें संभाळलीं जातात. मेन राज्यापासून वॉशिंग्टन राज्यापर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशांत जागोजाग अशीं उद्यानें आहेत. मोटाररस्त्यांच्या दोन्ही बाजूंस हीं उद्यानें दिसत असून अमेरिकनांच्या ऐतिहासिक स्मृति त्यांत संभाळल्या आहेत. यलोस्टोन हें फार प्राचीन व विस्तीर्ण उद्यान ३५०० एकर असून तेथें गरम पाण्याचीं कारंजीं, झरे व रंगीत चिखलाचीं उकळतीं तळीं आहेत. सरोवर, जंगल व डोंगर यांचा फार सुंदर देखावा या उद्यानांत दिसतो. त्यामुळें हें उद्यान ही निसर्गाची एक सर्वश्रेष्ठ कलाकृति ठरली आहे. कांहीं उद्यानें व मैदानें संस्मरणीय ऐतिहासिक घटनांचीं म्हणून संभाळण्यांत आलीं आहेत. उदाहरणार्थ लिंकन ज्या झोपडींत जन्मला त्या झोपडीची जागा, गेटिसबर्गचें रणमैदान, व्हर्जिनियांत जेम्सटाउन येथें ब्रिटिशांनीं केलेल्या पहिल्या वसाहतीचें क्षेत्र इत्यादि हीं प्रसिद्ध स्थळें काळजीपूर्वक संभाळलीं जातात.

याशिवाय दीडशें राष्ट्रीय जंगलें लोकांच्या उपयोगासाठीं राखून ठेवण्यांत आलीं आहेत. त्यांत कँप व वनभोजन करण्याच्या ४,४०० जागा असून शिकार, मच्छीमारी, बर्फावरून घसरणें, वनप्रवास, जलक्रीडा वगैरेच्या सोयी या जंगलांत असतात. या जंगलांत थोड्या भाड्यानें जागा मिळते व तेथें जंगलांत लहानसें आरामशीर घरहि बांधतां येतें. जवळजवळ प्रत्येक राज्यांत त्या त्या प्रदेशांतील संस्मरणीय स्थळें, छावण्या टाकण्याचीं उद्यानें वगैरे आहेत.

सुटीच्या दिवसांत मौज करण्यासाठीं अमेरिकनांचे थवेच्या थवे अशा उद्यानांत जातात. त्यांची संख्या कित्येकदां इतकी वाढते कीं त्या त्या उद्यानांत माणसें मावतहि नाहींत. अमेरिकनांना आपलीं ऐतिहासिक स्थळें पाहण्याची जिज्ञासा अतिशय तीव्र असल्यानें तें आपल्या मुलांबाळांना आपल्यापुढें धाडतात. प्लायमाउथ पार्क, जेफर्सन मॉंटीसीलो, डेव्ही क्रॉकेट जेथें लढतां लढतां मेला तें अग्लामो, इत्यादि हीं स्थळें अशा महत्त्वाचीं आहेत. या स्थळांची माहिती

देण्यासाठीं सरकारी मार्गदर्शक असतात. जुन्या इतिहासाबद्दलची आस्था व जुनीं स्मारकें शाबूत करून सुरक्षित ठेवण्याची आवड आजच्या इतकी पूर्वी कधींच नव्हती. ओल्ड सॅलेम पुन्हा बांधण्यांत आलें, नंतर विल्यम्सबर्ग, ओल्ड-स्टार ब्रिज, ओल्ड प्लायमाउथ वगैरे जुनीं ऐतिहासिक स्थळें पुन्हा बांधण्यांत आलीं. हल्लींचीहि आवड अशीच वाढत जाईल तर 'प्राचीन इमारती' युरोपांतल्यापेक्षां अमेरिकेंतच जास्त दिसूं लागतील.

पूर्वी कामगारांना मिळत नसलेली उन्हाळ्याची सुटी ते आतां घेऊं लागले असल्यानें देशाच्या सर्व भागांत आतां उन्हाळ्यांत कामगारकुटुंबें आपापल्या गाड्यांतून हिंडतात. त्यामुळें देशांतील सर्व लोकांचा एकमेकांशीं संबंध येऊं लागला असून विविध ऐतिहासिक स्थळें व देखावे सर्वांना पाहायला मिळतात. मुलांना सुटीवर नेणें ज्या आईबापांना परवडत नाहीं अशांना लहान गांवांतले नागरिक हवाशीर छावण्या बांधून देण्याची व्यवस्था करतात.

सर्वांनीं अशा प्रकारें सर्व देशभर फिरण्याच्या प्रघातामुळें पोषाखाच्या बाबतींत सर्वत्र बराच साधेपणा आला आहे. लांब लांब अंतरावर मोटारींतून जाणें, छावण्यांसाठीं, मच्छीमारीसाठीं, गरम झऱ्यांत स्नान करण्यासाठीं मुक्काम करणें, वर्कशॉपमध्यें काम करणें इत्यादीमुळें लोकांचा पोषाखीपणा कमी झाला असून दोन कुडतीं अंगावर घालावीं व बाह्या मागें सारून काम करावें ही प्रवृत्ति वाढली आहे. स्त्रियाहि कपडे कमी घालतात, अर्ध्या चड्डयांवर प्रवासहि करतात. कांहीं हॉटेलांनीं तर 'जसे आहांत तसेच या' अशा पाट्या लावल्या आहेत.

मित्रामित्रांनीं एकमेकांचें स्वागत करण्यांत अनौपचारिकता पुष्कळच आली आहे. मित्रांना जेवायला बोलवायचें तर नोकरांवांचून मेजवानी करण्यांत येते. अन्न तयार केल्यावर तें भोजनगृहांत आणतात व आपापल्या थाळ्यांत अन्न काढून घेऊन हिंडत फिरत लोक जेवतात. 'शेकोटी सैंपाक'हि केला जातो. स्वतः यजमान एप्रॉन नेसून कोळशाच्या शेगडींत उघड्यावर मांस वगैरे भाजतो व सर्वजण खातात.

बरीच फुरसत असणारीं कुटुंबें एकत्र आनंद अनुभवण्यासाठीं विविध उपाय योजतात. दर घरांत एक खोली श्रमगृह बनविण्याची आतां रूढीच झाली आहे. मानसशास्त्रज्ञांच्या मतें मुलांचा मानसिक विकास करणारीं अशीं खेळणीं मुलांना देण्यांत येतात. मुलें मोठीं होत जातात तसतसें त्यांना शाळेंत न मिळणारें, नृत्य, पिआनो, टेनिस वगैरेचें शिक्षण देण्यासाठीं पाठविण्यांत येतें.

मानसशास्त्राच्या शिकवणुकीमुळें घरांत नवीन आलेला खेळ म्हणजे पतिपत्नींची

प्रेमक्रीडा. जुन्याकाळचा संकोच व भीति नाहींशी झाली असून लैंगिक प्रेम व त्याचा अनुभव हा कौटुंबिक जीवनाचा आधार होय ही गोष्ट मान्य झाली आहे.

सेवानिवृत्तांना करमणुकीची गरज आहे ही गोष्ट नव्यानें मान्य झाली असून त्यांच्या वयाच्या लोकांना एकत्र आणण्यासाठीं अनेक उपाय योजले जात आहेत. 'सीनिअर सिटिझन्स' अथवा 'गोल्डन एज' नांवाच्या वयोवृद्धांच्या संस्था अस्तित्वांत येत आहेत. या संस्थांचे सदस्य चर्चपासून नाचापर्यंत सर्व प्रकारचे कार्यक्रम ठरवितात. सर्व आयुष्यभर चढाओढीच्या धकाधकींत आयुष्य घालविलेले अधिकारी वार्धक्यांत निरपेक्ष समाजसेवा करण्यांत आनंद मानतात. असे लोक स्कूलबोर्ड अथवा इतर सार्वजनिक संस्था यांचीं कामें अंगावर घेतात. ६५ वे वर्षी हल्लीं सेवानिवृत्त व्हावेंच लागतें आणि लोकांची आयुर्मर्यादा वाढत आहे. यामुळें या लोकांची फुरसत समाजसेवेला मिळून, देशाच्या उद्धाराला एक महत्त्वाचें साधन उपलब्ध झालें आहे.

करमणूक सर्वत्र वरीलसारखी विधायक आहे असें मात्र नव्हे. लास वॅगास येथें नेव्हाडा हें शहर जुगाऱ्यांची राजधानी आहे. तेथें अमेरिकन्स व कांहीं परदेशी लोकहि जुगार खेळण्यास येतात. १९५५ सालीं येथें ६ कोटि ३ लक्ष २० हजार डॉलर्स जुगारीवारी उधळले गेले. त्या सालीं दररोज ३,८६१ माणसें पैसे उधळण्याच्या चढाओढींत भाग घेण्यासाठीं या शहरांत आलीं. १९५२ सालीं नुसत्या तंबाकूवर पांचशेंतीस कोटि डॉलर्स अमेरिकेनें खर्च केला. मद्यावर एक हजार कोटि डॉलर्स खर्च झाला.

अमेरिकन लोक या प्रकारें आपल्या फुरसतीचा विविध प्रकारें उपयोग करतात. मजेंत वेळ कसा जाईल याचीच खरोखर त्यांना चिंता लागलेली असते. आपण श्रम करून मिळविलेल्या फलाचा उपभोग घेण्याचा त्यांचा निर्धार असतो. आपण मिळविलेल्या भौतिक संपत्तींतून कांहींतरी अभौतिक आनंद मिळविण्यासाठीं ते धडपडत असतात. जंगलें तोडून वसाहती ज्या निर्धारानें त्यांनीं स्थापल्या त्याच निर्धारानें ते विश्रांति घेत व मौज करीत सुटतात.

इंग्रजींत करमणूक याला 'रिक्रिएशन' हा शब्द आहे. 'रि-क्रिएशन' म्हणजे 'पुनर्निर्मिति' असाहि त्याचा अर्थ होतो व अमेरिकनांची करमणूक ही पुनर्निर्मितीच असते. अमेरिकनांनीं भूतकालांत आपली निर्मितिशक्ति धंदेव्यवसायांत वापरली. उत्पादक श्रम त्यांनीं उत्साहानें केले. श्रम हेंच त्यांचें अन्नोदक होतें. त्यांच्या श्रमांनीं जी विपुल संपत्ति आतां निर्माण झाली आहे ती संपत्ति त्या

विपुलतेमुळें आतां उपभोगून टाकणें अवश्य झालें आहे. धननिर्मितींत कमी वेळ खर्चून धनोपभोगांत अधिक वेळ खर्चण्याची गरज उत्पन्न झाली आहे. आर्थिक परिस्थितींत हा मूलभूत फरक झाला असल्यानें त्यांच्या मनोवृत्तींतहि फरक झाला आहे. एका काळीं अन्नोत्पादक श्रमांत जी नीतिनिष्ठा अमेरिकनांना वाटे ती त्यांना आतां आनंदोपभोगाबाबत वाटत आहे. अर्थात् फुरसत घालविण्याचे अनेक प्रकारहि ते शिकत आहेत.

हस्तव्यवसाय व कला यांना औद्योगिक क्रांतीनें जोराचा तडाखा दिला. पण आतां तंत्र व शास्त्र यांच्या बळावर नाट्यकला दशलक्षावधि लोकांपर्यंत पोंचली असून कला आणि धंदा यांचें मिश्रण झालें आहे, आणि माणसाची उत्पादक क्षेत्रांतली गुलामगिरी यंत्रानें नष्ट केली असल्यानें व माणसांना फुरसत लाभली असल्यानें पुन्हा हस्तकला व हस्तव्यवसाय यांकडे माणूस वळतो आहे. खेळ आणि स्वयंनिर्मिति हा जो माणसांचा प्राचीन आनुवंशिक ठेवा, तो माणसाला एका काळीं गुलाम करणाऱ्या उत्पादनसाधनांनींच त्याला परत दिला आहे. भौतिक शास्त्रांची खरी फलश्रुति ही आहे कीं त्यामुळें माणसाचीं भौतिक साधनें वाढून त्यांच्याच बळावर त्याला अभौतिक आनंद व अभौतिक निर्मितिसामर्थ्य मिळवितां येतें.

अशा या वर्तुळाकार प्रवासानें आपण जर पुन्हा नंदनवनांत आलों तर हा प्रवास व्यर्थ झाला असें म्हणतां येईल काय ?

प्रकरण सोळावें

# भौतिक शास्त्रें व माणूस

अमेरिकन प्रजासत्ताकाचा जन्म बुद्धिप्रधान अशा युगांत झाला. त्यावेळीं शास्त्र आणि शास्त्रीय पद्धति माणसाला नवजीवनाचें आश्वासन देत होती. यामुळें अमेरिकन प्रजासत्ताकानें भौतिक शास्त्रांबद्दल, एक मोठी सामाजिक शक्ति म्हणून आशा बाळगली आहे. बेंजामिन फ्रँकलिनचे प्रयोग आणि थॉमस जेफर्सनचे शोध येथपासून औद्योगिक मालाच्या निर्मितीपर्यंत अमेरिकन जीवनाच्या सबंध संघटनेंत भौतिक शास्त्रांना महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे. भौतिक शास्त्रांचें हें स्थान केवळ दुर्बोध व कुतूहलाचें नसून शास्त्रांना अमेरिकेनें सामान्य माणसाचे सेवक बनविलें आहे. शास्त्र ही एक नवनिर्मितीची शक्ति असून ती उत्पादन वाढविते, त्याचे फायदे सर्व लोकांपर्यंत पोंचविते म्हणून लोकशाहीच्या विकासाला शास्त्राची गरज आहे असें अमेरिका मानते. वाहतूक व दळणवळण यांचा वेग वाढल्यानें आमचें राहण्याचें जग मोठें झालें, आमची आपुलकी आणि आमची जबाबदारी यांचें क्षेत्र वाढलें, निरनिराळ्या कला आमच्या सैंपाकघरापर्यंत आल्या, स्त्रिया व पुरुष यांचीं कामें बदललीं आणि जगाचें रूप इतकें जलद पालटतें आहे कीं आतां आमचीं मुलें आम्हांला तें बदलतें स्वरूप पुन्हा पुन्हा नव्यानें समजून सांगत आहेत.

विज्ञानानें बालमृत्यु कमी झाले व आयुर्मान वाढलें. यामुळें तरुण व वृद्ध यांचें प्रमाण बदललें आहे. मुलें होणें अथवा न होणें ही गोष्ट आतां ज्याच्या त्याच्या इच्छेची झाली असल्यानें तें आतां ओझें न वाटतां आनंदाचें साधन झालें आहे. अनेक रोग विज्ञानानें नाहींसे केले, अनेक रोगांवर उपाय शोधले आणि मानवजातीचें दुःख किती तरी कमी केलें. सर्व लोकांना पुरेसें अन्न कसें पुरवावें हें विज्ञानाला माहीत आहे, त्याचबरोबर आपण पायाखालीं मुंग्यांचें

वारूळ जसें चिरडतों त्याप्रमाणें सर्व मानवजातीची राखरांगोळी कशी करावी हेंहि विज्ञानाला ठाऊक आहे.

विज्ञान हें हत्यार म्हणून वापरलें गेल्यानें आजची आपली संस्कृति आहे अशी झाली आहे. विज्ञानाचे काल्पनिक सिद्धांत संशोधनालयांत तपासले जाऊन व्यावहारिक उपयोगांत आणले जातात व त्यामुळें उपभोग्य धनांत वाढ होते. केवळ संशोधनांतून अगदीं अनपेक्षित असे प्रचंड नवे धंदे निर्माण होतात. निलॉन, प्लॅस्टिक वगैरे धंदे असे अगदीं अनपेक्षितपणेंच जन्मास आले.

पण विज्ञान ही एक मनोवृत्ति आहे, मनाची ती एक संवय आहे आणि या दृष्टीनें त्याचें महत्त्व फार आहे. कोणतेहि प्रश्न सोडविण्याचा बिनचूक मार्ग विज्ञान हाच होय, ही गोष्ट भौतिक जगांतच नव्हे तर मानवी व्यवहारांतहि आतां मान्य झाली आहे. अंधश्रद्धा व निराधार पूर्वग्रह यांची जागा आतां विज्ञानानें घेतली आहे. शास्त्रीय प्रयोगासंबंधानें लोकांना हल्लीं इतका विश्वास वाटतो कीं जाहिरातदार हे आपल्या मालाची खात्री पटविण्यासाठीं शास्त्रीय प्रयोगाचा उपयोग करतात. "पांचापैकीं चार डॉक्टरांचें एकमत आहे कीं..." "एंजिनिअरांना जी गाडी पसंत पडेल ती खरेदी करा." मोटारीच्या जाहिरातींत 'टॉर्सिअन बार सस्पेन्शन' असा शब्द प्रयोग असतो, तो कुणालाहि कळत नाहीं. पण त्यामुळें गाडी विकली जाते खास, असा मोटारनिर्मात्यांचा अनुभव आहे.

## शास्त्रसुधारणा व समाजसुधारणा

मोटारगॅरेजमधील तरुण, तरतरीत यंत्रज्ञ सदा मोटारींची कांहींना कांहीं दुरुस्ती करीत असतात त्याप्रमाणें अमेरिकन लोक आपला समाज सुधारण्याच्या हेतूनें त्यांत सदा कांहीं घडामोड करीत असतात. अमेरिकन राष्ट्राचा जन्म झाला तोच युरोपांत १७ व्या शतकांत जी परिस्थिति होती त्या परिस्थितीविरुद्धच्या बंडांतून झाला. बंडांतून सुधारणा हें अमेरिकन जीवनाचें पालुपदच आहे. पण त्याचबरोबर 'ईश्वरावर आणि मानवाच्या प्रगतीवर श्रद्धा' हेंहि आमच्या सुधारणेचें सूत्र असतें. अमेरिकन सुधारणेंतला हा नैतिक व धार्मिक सूर आजतागायत टिकलेला आहे. मार्क्स व लेनिन यांच्या शिकवणीचे सूर ज्यांच्या कानांत घुमत असतात त्यांना यामुळेंच अमेरिकन सुधारणाप्रकार समजत नाहीं अथवा त्यांत प्रामाणिकपणा दिसत नाहीं.

आपला गांव, आपली वसाहत सुधारावी या कल्पनेनें अमेरिकन मनाची पक्कड अगदीं आरंभापासून घेतली आहे. हें सुधारणास्वप्न सत्यसृष्टींत आणण्यासाठीं

*अनेक संस्था काम करीत असतात. या संस्थांसाठीं पैसा मिळवणारे वीस* लक्ष स्त्रीपुरुष ३० कोटि डॉलर्स, लोकांच्या घरोघर जाऊन अथवा कम्युनिटी चेस्टमार्फत गोळा करतात. हॉस्पिटलांत अथवा बालवीरसंघटनेंत लक्षावधि स्वयंसेवक दशलक्षावधि तास सेवा करतात. समाजाचा उत्कर्ष हा खरेदी करून मिळत नाहीं अथवा तो सरकारनें करायचा नसतो. समाजांतील व्यक्तींनीं स्वतः पुढें येऊन राजीखुशीनें वेळ व श्रम त्यासाठीं द्यायचे असतात.

वैद्यकशास्त्रांतील प्रगतीमुळें आतां अपेंडिक्स कापतां येते, मोडलेला पाय बसवितां येतो किंवा पोलिओवर मात करतां येतें. शेती शास्त्राची प्रगति इतकी झाली आहे कीं थोडया खर्चांत भरपूर अन्न निर्मून माणसाची भूक शमवितां येते. पण अजून हें युद्ध अर्धेंच झालें आहे. दुखणें माणसाला इजा करतें त्यापेक्षां माणसें एकमेकांना अधिक इजा करतात. तपासणी, कलह, स्पर्धा, लोभ यांना लोक इतके बळी पडतात कीं तितके रोगजंतूंना बळी पडत नाहींत. म्हणून हल्लीं निसर्गशास्त्रें व मानवी शास्त्रें यांचें सहकार्य सुरू आहे. आतां वैद्यकशास्त्रज्ञ मानसशास्त्रज्ञाची मदत घेतो. एकाद्या धंदेवाल्याला नवें यंत्र सुरू करायचें असलें तर तो मानवीसंबंधतज्ज्ञ, आपलें व्यवस्थापक मंडळ व कामगार-संघटना या सर्वांशीं सल्लामसलत करून यंत्र सुरू करण्याचा मार्ग सोपा करतो.

सामाजिक शास्त्रें व नैसर्गिक शास्त्रें यांचें सहकार्य होत आहे एवढेंच नव्हे तर त्या दोन्ही शाखा एकमेकींत मिसळतहि आहेत. बायोफिजिक्स व बायो-केमिस्ट्री या शास्त्रांनीं भौतिकशास्त्रें व प्राणिशास्त्रें यांतलें अंतर भरून काढलें आहे. अजून कांहीं अदृश्य दुवे आहेत त्यांचा शोध लागल्यास माणसाचा स्वभाव बदलणें व सामाजिक प्रगति करणें हें रासायनिक साधनानें शक्य होईल. आजच अशी परिस्थिति आली आहे कीं सकाळीं दांत धुतांच माणसानें कपाटांतून एक गोळी खावी म्हणजे बर्फावरून धावण्यासाठीं लागणारी शारीरिक हिंमत व एकादा माल विकण्यासाठीं लागणारा मानसिक उत्साह त्याला मिळूं शकतो. यंत्रानें माणसाचे शारीरिक कष्ट कमी होतील एवढेंच नव्हे तर त्याचे आजवरचे मानसिक कष्टहि कमी होतील. संपूर्ण शारीरिक व मानसिक स्वातंत्र्याचा कालखंड माणसाजवळ येत असून त्याला नवनिर्मितीसाठीं आपल्या सर्व शक्ति खर्चतां येणार आहेत.

## लोकशाहीचें शास्त्र

विज्ञान व विज्ञानाच्या पद्धति यांचा उपयोग लोकशाही समाजाच्या गरजे-प्रमाणें करणें याचें नांव अनुभववाद (प्रॅग्मॅटिझम्). अनुभववाद हा शुभाशुभ,

सत्यासत्य याविषयींचा निर्णय ठरवितांना निव्वळ अधांतरी सिद्धांतांचा आधार न घेतां अमुक एका कार्याचे परिणाम काय होतील याची तपासणी करतो. जग हें एका ठराविक पद्धतीचें बनलें आहे, त्याचीं मूलतत्त्वें समजलीं कीं त्यांतले सर्व प्रश्न सुटतात ही समजूत सर्व तत्त्वज्ञानांचा आधार असतो. पण अनुभववादी हा जग हें सतत बदलत आहे हें पाहत असून शब्दप्रामाण्य आणि 'अमुक हें अखेरचें' असें मानण्याचें ढोंग या गोष्टी प्रगतीस अपायकारकच असतात अशी अनुभववाद्यांची खात्री झालेली असते.

विल्यम जेम्सनें अनुभववादाची व्याख्या केली. युगानुयुगें तत्त्वज्ञानाच्या गुंता-गुंतीच्या चाललेल्या अधांतरी चर्चा तोडून टाकून तो म्हणाला, "कोणत्याहि सिद्धांताची कसोटी तो सिद्धांत माणसाच्या उपयोगीं किती पडेल यावरून ठरविली पाहिजे." जॉन ड्यूई यानें तत्त्वज्ञान आणि शास्त्रीय पद्धति यांची सांगड घातली व दोघांनाहि मानवाच्या दैनंदिन जीवनाच्या सेवेला लावलें. तो म्हणतो, उद्दिष्टें हीं साधनाचा भागच असतात. तुमच्या उद्दिष्टांचें महत्त्वमापन करतांना, तुम्ही वापरतां त्या साधनांची फलश्रुति काय होती हें पाहिलें पाहिजे असें ड्यूई म्हणतो. "आपण पत्करलेला मार्ग चांगला कीं वाईट हें ठरविण्या-पूर्वी त्या मार्गाची फलश्रुति काय झाली हें तपासून पाहिलें पाहिजे. ध्येयाबद्दल आपली निष्ठा अगदीं दृढ असली तरी त्या ध्येयांचे परिणाम तपासून पाहण्याची आपली जबाबदारी नष्ट होत नाहीं."

शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून समाजपुनर्घटना करण्याचें तत्त्वज्ञान ड्यूई निर्मीत होता त्या काळीं ऑलिव्हर वेंडेल होम्स हा कायद्याच्या क्षेत्रांत वास्तववादाची शिकवण देत होता. कायदा हें कांहीं काल्पनिक तत्त्व नव्हे तर माणसाच्या बदलत्या गरजा भागविण्याचें साधन आहे असें तो म्हणे. जेम्स हार्वे रॉबिन्सन यानें इतिहासाबद्दल असा सिद्धांत मांडला कीं इतिहास म्हणजे भूत काळांतली फक्त सनावळी नव्हे तर वर्तमानकाळ समजून घेण्याचें व भविष्यकाळाला वळण लावण्याचें तें साधन आहे. ड्यूई आणि रॉबिन्सन या दोघांचेंहि मत होतें कीं औद्योगिक क्रांतीनें पोसलेला शास्त्रीय दृष्टिकोन अखेरीस राजकारणास लावण्यांत येईलच. शास्त्रीय पद्धतीचा उपयोग करून उद्योगधंद्यांनीं जगाचें रूप पालटलें. पण यांत्रिक प्रगति होत असतां सामाजिक प्रगति न होऊन या दोहोंत भयानक दरी निर्माण झाली. ड्यूईनें यासाठीं औद्योगिक प्रगतीला कारण झालेल्या शास्त्रीय पद्धतीला दोष दिला नाहीं तर त्या प्रगतीला कारण झालेल्या पद्धतीचा उपयोग दारिद्य, अज्ञान व विषमता यांच्या नाशासाठीं करायचें ठरविलें.

साधनें आणि उद्दिष्टें यांचा डयूईनें जो संबंध लावून दाखविला तो अमान्य करणाऱ्या कांहीं लोकांचें मत असें आहे कीं विज्ञान नैतिक मूल्यें ठरवूं शकणार नाहीं. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं व्यक्तीलाहि लोकशाही मार्गच हिताचे, इतर मार्ग हिताचे नाहींत हें वैज्ञानिकांनीं दाखवून दिलें आहे. शिवाय विज्ञानानें वैद्यकीय, सामाजिक, औद्योगिक क्षेत्रांत संशोधन करून व शुद्ध संशोधन करून एका अर्ध्या शतकांत मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठीं जेवढें जगाचें जीवन अधिक चांगलें केलें आहे, तेवढें आदिकारण, अचल चालक, शुद्ध बुद्धि यांचीं तीन हजार वर्षें वावदूकी चर्चा करणाऱ्या तत्त्वज्ञानानें केलेलें नाहीं ही गोष्ट तत्त्वज्ञानाचे सिद्धान्त मांडणाऱ्यांना मान्य करावी लागेल.

अमेरिकनांनीं विज्ञानाचा स्वीकार केला तो अगदीं आपुलकीनें केला. त्यांचा समाज बहुविधतेला मान देणारा, नवीन वसाहती स्थापण्यांत पुढाकार घेणारा, आशावादी, सदा बदलणारा व हुकुमशाहीविरोधी आहे. नवीन नवीन वसाहती नित्य स्थापण्याच्या हव्यासामुळें अमेरिकनांची सरहद्द अमर्याद झाली आहे, ही सदा पुढें जाणारी सरहद्द हाच अमेरिकनांचा सतत प्रगतीचा व सुधारणेचा मार्ग आहे आणि याला विज्ञान उपकारक असल्यानें अमेरिकनांना त्याबाबत आपुलकी वाटते.

## फाउंडेशन्स

विज्ञानशास्त्रावरील अमेरिकनांची ही श्रद्धा शास्त्रांच्या प्रगतीसाठीं त्यांनीं स्थापलेल्या 'फाउंडेशन्स'मुळें (साहाय्यनिधि) फार चांगल्या प्रकारें व्यक्त होते. शास्त्र व तंत्र यांच्या प्रगतीमुळें ज्यांना खूप संपत्ति मिळाली अशा अमेरिकन धनवंतांनीं मानवी जीवन सुधारण्यासाठीं संशोधन चालावें म्हणून हे निधि स्थापले. हे निधि शेकडों आहेत. उदाहरणादाखल येथें कांहींचा उल्लेख करतों. 'कार्नेजी कॉर्पोरेशन ऑफ न्यूयॉर्क.' (कार्नेजी हा मूळचा स्कॉटलंडांतला. लहाणपणींच तो अमेरिकेंत आला व फार मोठा पोलाद कारखानदार झाला.) ज्ञानाचा विकास व प्रसार व्हावा म्हणून ही संस्था स्थापली गेली. जीवन-परिस्थिति सुधारूं शकेल असें नवें ज्ञान मिळविण्याचें अध्ययन ज्या संस्था चालवितात त्यांना ही संस्था मदत करते. 'रसेल सेज फाउंडेशन.' समाज-शास्त्रांतील संशोधित सिद्धांत समाजजीवनांत अंमलांत आणण्यासाठीं ही संस्था पैसे देते. 'ट्वेंटिएथ सेंचरी फंड' हा निधि बोस्टनचा व्यापारी एडवर्ड फिलेन यानें स्थापला. या निधीतर्फें प्रचलित आर्थिक व सामाजिक प्रश्नांवर संशोधन

करून लोकशिक्षणाचे कार्यक्रम अंमलांत आणले जातात. 'रॉकफेलर फौंडेशन' हा निधि जगांतील सर्व मानवजातीच्या उत्कर्षासाठीं साहाय्य द्यावें म्हणून स्थापण्यांत आला. अनेक प्रकारच्या संशोधनास यांतून मदत मिळते. माणसाचें ज्ञान वाढावें आणि माणसाचें हित व त्याच्या गरजा यांसाठीं त्या ज्ञानाचा उपयोग व्हावा या उद्दिष्टावर या निधीचा भर असतो. वैद्यक, प्राणिशास्त्र, शेती, सामाजिक शास्त्रें, वाङ्मय वगैरे क्षेत्रें या निधीच्या साहाय्यकक्षेंत येतात.

'जॉन सायमन गग्गनहीम फाउंडेशन' या निधीमार्फत शास्त्रज्ञ व संशोधक यांना मदत मिळतेच. पण शिवाय कवि, संगीतसंयोजक, खोदचित्रकार, रंग-चित्रकार वगैरे नवनिर्मितिकारांनाहि मदत मिळते. हा निधि इतर संस्थांमार्फत मदत देत नसून अपवादात्मक बुद्धिमत्तेचा एकादा अभ्यासक या निधीमार्फतच निवडला जातो व त्याला साहाय्य केलें जातें. अगदीं नवमार्गसंशोधनाच्या स्वरूपाचें जें अध्ययन असतें त्याला पैशानें मदत करावी अशी प्रवृत्ति समाजांत असत नाहीं. अशा संशोधकांचें काम एकांतांत चालतें. जनता अशा संशोधनाची दखल घेत नाहीं. संशोधनकार्यांत असलेल्या शेकडों संशोधकांना या निधीनें मदत करून हुरूप आणला आहे.

'फोर्ड फाउंडेशन' हा सर्वांत मोठा निधि. १९५३ सालीं या निधीचा जाहीर झालेला पैसा पन्नास कोटि डॉलर्सहून अधिक होता. पण १९५५ सालीं इतकी रक्कम या संस्थेनें एकाच हत्यानें चार हजार खाजगी कॉलेजें, विद्यापीठें, हॉस्पिटलें यांना दिली. या संस्थांच्या उद्दिष्टांचीहि चिकित्सा करण्यांत आली नाहीं. या निधीचा पैसा सारा मोटार धंद्याच्या नफ्यांतून मिळतो. एकादा खाजगी धंदेवाला सार्वजनिक कर्तव्याची जाणीव किती तीव्रतेनें ठेवतो आणि राष्ट्रकल्याणाला किती मदत करूं शकतो याचें हें ठळक उदाहरण आहे.

फोर्ड फाउंडेशनचीं धोरणें व कार्यक्रम कसे असावे याचा विचार करण्यासाठीं एक अभ्यासमंडळ नेमण्यांत आलें होतें. त्या मंडळानें (१) शांतता संस्थापन, (२) लोकशाहीबलवर्धन, (३) लोकशाहीसमाजशिक्षण, (४) अर्थसंघटनेचें सामर्थ्य-संवर्धन (५) आणि व्यक्तिदर्शन व मानवी संबंध यांचा अभ्यास, इतक्या बाबींस फोर्ड फाउंडेशननें मदत द्यावी असा निर्णय दिला. यांत दिसण्यांत चमत्कारिक पण खरोखर योग्य अशी घडलेली गोष्ट ही आहे कीं फोर्ड कंपनीचा प्रचंड नफा विज्ञान व तंत्र यांच्या साहाय्यानें मिळाला असतां त्या ज्ञानशाखांच्या विकासासाठीं या निधीचा पैसा खर्चण्याची जरुरी अभ्यासमंडळास मुळींच वाटली नाहीं.

याशिवाय कॅन्सरसंशोधन, इन्फंटाइल पॅरॅलिसिसचें नियंत्रण इत्यादींसाठीं

लक्षावधि लोक थोडथोड्या देणग्या देऊन निधि जमवितात. अशा या शेकडों निधींवरून दिसून येते ती गोष्ट ही कीं बुद्धिमान व विद्वान् होणें ही आपली नैतिक जबाबदारी आहे असें अमेरिकन्स मानतात, विज्ञानानें माणसांचे प्रश्न सुटतात या सिद्धांतावर अमेरिकन्स श्रद्धा ठेवतात, विज्ञानसंशोधनाला साहाय्य केलें पाहिजे ही आपली जबाबदारी अमेरिकन्स ओळखतात आणि या सर्वांहून विशेष म्हणजे भविष्यकाळाकडे आपण विचारानें व विधायक वृत्तीनें पावलें टाकलीं तर तो भविष्यकाल खास उज्ज्वल आहे हें अमेरिकन लोकांना पटलेलें आहे.

प्रकरण सतरावें

# आम्ही कोठें चाललों आहों?

"मी साऱ्या मानवजातीवर प्रेम करायला तयार आहें, पण अमेरिकनांवर प्रेम करायला राजी नाहीं." ही बेडूक-आरोळी सुमारें दोनशें वर्षांपूर्वी डॉ. सॅम्युअल जॉन्सननें ठोकली होती. त्यानंतरच्या काळांत हेंच मत धारण करणारे कमीअधिक लोक होऊन गेले आहेत. पण आमच्यावर त्यांनीं प्रेम कां करायचें नाहीं याबाबत मात्र त्यांच्यांत मतभेद असतो.

बराच काळपर्यंत अमेरिकेचा भौतिक दृष्टिकोन हें अमेरिकेवर प्रेम न करण्याचें कारण सांगितलें जाई आणि कांहीं अंशीं अजूनहि तें कारण कायम आहे. राष्ट्र उभारण्याच्या, राष्ट्रांतील साधनसंपत्ति राष्ट्राच्या उन्नतीच्या कामीं लावण्याच्या नादांत अमेरिकेनें भौतिक उत्कर्षाकडे गैरवाजवी लक्ष दिलें व कलेची उपेक्षा केली ही गोष्ट निःसंशय खरी आहे. पण तो कालखंड आतां फार दूर गेला आहे. बाहेरच्या पाहुण्यांना येथली जी भौतिक विपुलता चकित करते ती येथें आम्ही गृहीत धरून चालतों. जगांत दुःखहरण करण्यासाठीं, उद्योगधंद्यांच्या पुनर्घटनेसाठीं, परराष्ट्रांना तांत्रिक मदत देण्यासाठीं, कम्युनिझमच्या उघड उघड होणाऱ्या जुलुमाविरुद्ध आत्मरक्षण करण्यास परराष्ट्रांना मदत देण्यासाठीं अमेरिकेनें किती तरी पैसा खर्च केला. तो दूरदृष्टीच्या स्वार्थानेंच खर्च केला असें कोणींहि म्हणावें, पण भौतिक सुखसाहित्याचा लोभ, त्या साहित्याचा वियोग सहन न होण्याइतका असलेल्या लोकांनीं ही मदत केली असें म्हणतां येईल काय? परकीयांना ही मदत सरकारनें जशी केली तशीच खाजगी संस्थांनीं व व्यक्तींनीं स्वतंत्रपणें कार्यक्रम आंखून केली. आणि त्यामागें निवळ स्वार्थाखेरीज विविध हेतु होते.

## कांहीं विरोधाभास

इतर कोणत्याहि लोकांप्रमाणें अमेरिकनांनाहि अंगभूत बुद्धिमत्ता आहेच. पण ती कदाचित् प्रच्छन्न आहे. उदाहरणार्थ, युरोपीयांच्या मतें अमेरिकेंत बुद्धिवादी-वर्ग नाहींच. त्यांना असें वाटण्याचें कारण आमच्यांत ध्येयवादात्मक चर्चा होत नाहींत, ध्येयवादी गट नाहींत हें होय. पण यावरून अमेरिकनांत बुद्धिमत्ताच नाहीं असें नव्हे. अमेरिकेच्या इतिहासानें कोणत्याहि तत्त्ववादाबद्दल (इझमूबद्दल) अमेरिकनांच्या मनांत अश्रद्धा उत्पन्न केली आहे. लखोटबंद सिद्धांतांनीं व तत्त्वज्ञानांनीं सर्वंकष अशा कांहीं गृहीत समजुतींच्या आधारावर जगांतील सर्व घटनांचा उलगडा करतां येतो असें मानण्यास अमेरिकन्स तयार नाहींतच. बाहेरच्या जगांत अशा अनेक सिद्धांती पंथांचे उदयास्त झाले, पण त्यांचे अनुयायी कितीहि निष्ठावंत असले तरी त्यांनीं अंतिम सत्य कधींच मांडून दाखविलें नाहीं ही गोष्ट अमेरिकनांनीं पाहिली आहे.

म्हणून माणसांनीं सिद्धांतवादापेक्षां साधनवादी विविधत्ववादी असावें असें अमेरिकनांना वाटतें. ज्ञान हें माणसाच्या हितासाठीं आहे, व्यक्तिमात्राला समाजांत आपला जम बसवितां यावा हा ज्ञानाचा हेतु असला पाहिजे असें अमेरिकन्स मानतात. ते प्रयोगवादी असल्यानें अमुक एक कल्पना एका ठिकाणीं योग्य ठरेल तर दुसरी दुसऱ्या ठिकाणीं योग्य ठरेल हें त्यांना पटतें. अमुक एकच एक कल्पना उराशीं बाळगून तिच्या आधारावर साऱ्या जगाची एका रात्रींत पुनर्घटना करण्याची प्रतिज्ञा अमेरिकन्स करणार नाहींत. अमेरिकन हे सुधारक आहेत, पण माणसांचीं दुःखें निवारणें, दोषनिराकरण करणें याला ते सुधारणा समजतात, अमुक सिद्धांत बदलणें हें त्यांच्या सुधारणेंत बसत नाहीं.

क्लाइड क्लक हॉमजवळ एका जपानी विद्यार्थ्यानें अमेरिकनांबद्दल तक्रार केली. तो म्हणाला "अमेरिकन लोक आपला म्हणून सांगूं शकतील असा जीवन-सिद्धांत त्यांचेजवळ नाहींच. उलट रशियन लोक मात्र आपल्या जीवनासंबंधानें सुसंगत सिद्धांत सांगूं शकतात." वर वर्णिलेल्या अमेरिकन विचारसरणीमुळेंच जपानी विद्यार्थ्यानें ही तक्रार केली. रशियनांचा सर्व समाजरचनेसंबंधानें एक सिद्धान्त आहे. अमेरिकनांची मानवी हक्कासंबंधानें एक तत्त्वमाला आहे. हे हक्क मिळविण्याचे त्यांचे मार्ग अनंत असून औद्योगिक उत्पादन वाढविण्या-पासून सुप्रीम कोर्टाच्या निर्वर्गीकरणाच्या निर्णयापर्यंत सर्व मार्ग ते अवलंबतात.

फक्त दोनच आठवडे अमेरिका पाहणाऱ्याला अमेरिकेचा सांचा मोठा स्पष्ट

व तर्कशुद्ध वाटतो. पण आयुष्यभर अमेरिकेचा अभ्यास करणाऱ्यांना अनेक परस्परविरोधी घटना एका सांच्यांत बसविल्याचें आढळून येतें. येथें कितीतरी व्यक्तिस्वातंत्र्य आहे, पण तरीहि येथें माणसांच्या वागणुकींत विलक्षण सारखेपणा दिसून येतो, अफाट संपत्ति आहे तींतच दारिद्र्यहि आहे, अतिशय स्नेहपूर्णता जेथें दिसते तेथेंच अगदी निर्लज्ज क्रौर्यहि आढळतें, येथें औदार्य, अनीति, लाचबाजी आहे, सहज अनौपचारिक वर्तणूक आढळते तेथेंच जीव कासावीस करणारी तणातणीहि आढळते, मनुष्येतर प्राण्यांना आम्ही दया दाखवितों पण नीग्रो व इतर अल्पसंख्य यांजशीं निर्दयपणें वागतों, शिक्षणाबद्दल आम्हांला आदर वाढतो, पण प्रोफेसराबद्दल आम्हांला तुच्छता वाटते, आमच्या सामाजिक चालीरीति सहिष्णुतेच्या आहेत व त्यांतच प्यूरिटन शिकवणींतून आलेला संयमहि आहे, मोठ्या परिश्रमानें मिळविलेली संपत्ति येथें आहे पण त्या संपत्तीचा त्यागहि सहज लीलेनें केला जात आहे, अमेरिकन सरकार साऱ्या जगांत बलाढ्य आहे पण त्यालाच कित्येकदां घटक राज्यांपुढें दयेची याचना करावी लागत आहे. इतर देशांत सोशॅलिझम् कामगारांसाठीं जीं औद्योगिक उत्पादनाचीं फळें मागतो पण त्याला तीं मिळत नाहींत तीं फळें अमेरिकेंतील भांडलशाही शांतपणें कामगारांना देऊन टाकत आहे. अमेरिकेचें अंतरंग हें असें आहे.

अमेरिकेचा जन्म बुद्धिवादाच्या युगांत झाला यामुळें माणूस आपल्या बुद्धिबळावर अडचणींतून वाट काढून आपणासाठीं तर्कशुद्ध अशी समाजरचना निर्माण करील अशी अमेरिकेची दृढ श्रद्धा आहे. अमेरिकेच्या तरुणपणीं प्रेमळपणा व शौर्य यांचा पगडा अमेरिकेच्या मनावर होता. यामुळें मानवी जीवनांतील विविधता व व्यक्तीचें पावित्र्य हीं तत्त्वें अमेरिकेनें मान्य केलीं. जंगली जीवनांत संस्कृति निर्मून नंतर प्राणसंकटांतून तगून राहण्यासाठीं अमेरिकनांना लढावें लागलें. यामुळें अमेरिकन्स हे अनुभववादी बनले. कोणत्याहि बांधीव व आटोपशीर तत्त्वज्ञानापेक्षां प्रत्यक्ष परिणामाची कठोर कसोटी हीच अमेरिकनांनीं श्रेष्ठ मानली.

आमची अशी श्रद्धा आहे कीं, अमेरिकेच्या संस्थापकांनीं आम्हांस शिकविलेल्या राजकीय तत्त्वज्ञानांत जीवनाचीं नैतिक मूल्यें आहेत तसेंच राज्य चालविण्याचें तत्त्वज्ञानहि आहे. आम्हांला हें आयतें मिळालें असून त्यासाठीं आम्हांला लढावें लागलें नाहीं. आमच्या येथें झालेली क्रांति ही प्रथमतः राजकीय होती. आणि तिनेंच सामाजिक व आर्थिक प्रगति घडवून आणण्याचीं साधनें आम्हांला दिलीं. आमचा विकास क्रमाक्रमानें झाल्यामुळें एकादी एकदां

झालेली महत्त्वाची सुधारणा पुन्हा उद्‌ध्वस्त झाली नाहीं. त्या सुधारणेला ज्यांनीं प्रथम विरोध केला त्यांनींच पुढें ती सुधारणा स्वीकारली व नंतर ती आमच्या संस्कृतीचा भागच बनली. फ्रेंच व रशियन राज्यक्रांत्यांनीं एकेका समाजव्यवस्थेचा विध्वंस केला. तसें अमेरिकन राज्यक्रांतीनें केलें नाहीं. यामुळें वर्गकलहानें अमेरिकेची फाडाफाड झाली नाहीं. सामाजिक दृष्ट्या आमची क्रांति आम्हीं पचविली आहे. आमची क्रांति पायरीपायरीनें होत गेली. यामुळें एकमेकांच्या सहकार्यानें आपले प्रश्न सोडविण्याऐवजीं एकमेकांना उद्‌ध्वस्त करूनच टाकले पाहिजे असें मानणारे डावेउजवे गट आमच्यांत निर्माण झाले नाहींत.

राज्यघटनेनें जे हक्क सामान्य नागरिकाला दिले ते वापरावे कसे या मुद्द्यावर झालेला झगडा अलेक्झांडर हॅमिल्टन व थॉमस जेफर्सन यांच्यांतील वादाच्या रूपानें प्रकट झाला. त्यांचें भांडण पुढल्या प्रत्येक पिढींत भांडलें गेलें आहे. शेवटीं आमच्या पिढींत मात्र आतां कळून चुकलें आहे कीं त्या भांडणांत जेफर्सनचाच विजय झाला, त्यानें अमेरिकेच्या भवितव्यासंबंधानें बाळगलेलें तत्त्वच सत्यस्वरूपांत अवतरत आहे. यांत एक चमत्कारिक गोष्ट अशी आहे कीं जेफर्सन व हॅमिल्टन दोघेहि चूक होते व दोघेहि बरोबर होते. अमेरिका ही लहान मालकांची भूमि राहील असें जेफर्सनला वाटलें होतें पण तसें घडलें नाहीं. हॅमिल्टनला प्रचंड उद्योगधंदे हवे होते ते निर्माण झाले. पण जेफर्सनला हवा असलेला सार्वत्रिक मताधिकार लोकांना मिळाला आणि उद्योगधंद्यांनीं धनाचा फायदा बहुसंख्य जनतेला दिल्यामुळें धनाच्या न्याय्य वांटणीचें जेफर्सनचें तत्त्व साकार झालें.

युरोपच्या जुन्या संस्कृतींत क्रूरता, वर्गभेद आणि ऐतिहासिक वैरें होतीं. जुन्या जगांतली ही घाण नव्या जगांत नसावी, अमेरिकन संस्कृति ही वेगळी असावी असा अमेरिकेच्या संस्थापकांचा हेतु होता. बुद्धिवादी कालखंडाच्या प्रकाशांत अमेरिकेचा जन्म झाल्यामुळें जुन्या चालीरीती, जुने विद्वेष, जुन्या भोळ्या समजुती यांचा गळाठा आमच्या डोकीवर नव्हता. मानवसुखाचें घर, विपद्ग्रस्तांचें आश्रयस्थान अशी अमेरिका बनावी हें तिच्या संस्थापकांचें उद्दिष्ट होतें. राज्यघटनेच्या जाहीरनाम्यानें जे राजकीय हक्क दिले त्यांचा वापर करून राज्यघटनेनेंच मोकळ्या केलेल्या वाटेनें अमेरिकन नागरिक आपले सांस्कृतिक व आर्थिक हक्क पदरांत पाडून घेतील अशी अपेक्षा होती. योग्य कालानें, 'जगण्याचा हक्क' या शब्दांत नागरिकांचें आरोग्य, सतत रोजगारी व सर्व नागरिकांबद्दल दक्षता हीं सरकारचीं कर्तव्यें होत हा अर्थ अंतर्भूत झाला.

## मूलतत्त्वें

अमेरिकन समाजव्यवस्थेचीं मूलभूत तत्त्वें कोणतीं ? मानवी जीवन व मानवी दर्जा यांना मान देणें. सर्वांना समान हक्क व समान संधि. एकंदर समाजाच्या हिताशीं सुसंगत इतकें व्यक्तिस्वातंत्र्य. (याचा अर्थ असा कीं दुसऱ्याचें स्वातंत्र्य व हक्क यांवर आक्रमण न होईल अशा बेतानें प्रत्येकानें आपलें स्वातंत्र्य उपभोगावें.) श्रमाची महनीयता. श्रम व हितसाधनें या दोहोंचीहि न्याय्य वांटणी. (अमेरिकन समाज हा आतां नव्या वसाहतींसाठीं नव्या सरहद्दी शोधणाऱ्या थोडथोडया कुटुंबांचा राहिला नसून तो आतां आडव्या-उभ्या धाग्यांनीं विणलेल्या कपडयासारखा बनला आहे. त्याचे धागे एका विणींत न ठेवतां वेगळे वेगळे काढले तर वस्त्रच नष्ट होईल.) अशा समाजाला वागणुकीचा नियम विल्यम पेन यानें घालून दिला आहे : "आज्ञाधारकत्वावांचून स्वातंत्र्य म्हणजे अराजक, स्वातंत्र्यावांचून आज्ञाधारकत्व म्हणजे गुलामगिरी."

रॉबर्ट लिंड या लेखकानें "ज्ञान कशासाठीं ?" या ग्रंथांत अमेरिकन समाज-व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांची यादी दिली आहे. त्यांत कांहीं तत्त्वें परस्परविरोधी असल्यानें त्यांनीं तोल साधला आहे असें तो दाखवितो. उदाहरणार्थ, लिंड सांगतो :

व्यक्तिस्वार्थ (इंडिव्हिज्युॲलिझम्) हा निसर्गाचा नियमच आहे, पण कुणीहि माणसानें केवळ स्वतःसाठीं जगूं नये.

लोकशाही हा उत्कृष्ट राज्यप्रकार होय, पण प्रत्येक गोष्ट तुम्ही लोकांच्या मतदानावर सोपवूं शकणार नाहीं.

प्रत्येकानें विजयासाठीं झटावें, पण कोणत्याहि भौतिक यशापेक्षां तुम्ही स्वतः व्यक्ति या नात्यानें अधिक महत्त्वाचे आहां.

धर्म व इतर सूक्ष्म तत्त्वें महत्त्वाचींच आहेत, पण माणसानें प्रथम आपल्या कुटुंबासाठीं शक्य तितकें मिळवून ठेवावें.

प्रगति व नव्या गोष्टी यांचें स्वागत करावें, पण अखेर रुळलेला मार्गच सर्वांत चांगला.

शिक्षण हें चांगलें, पण ज्याला एकादी गोष्ट घडवून आणतां येते त्यालाच व्यवहारपटु म्हणतां येईल.

विज्ञानानें माणसाचा पुष्कळ फायदा केला आहे, पण धंद्यांच्या व्यवहारांत लुडबूड करण्याचा अधिकार विज्ञानाला नाहीं.

वरील समतोल मतांना कोणी भेकडांचें तत्त्वज्ञान म्हणतील, हेंच समंजसपणाचें खरें स्वरूप होय असें कुणी म्हणतील, अथवा जगच हें असें घोटाळ्याचें असल्यानें त्या जगाला असें हें घोटाळ्याचें व्यवहारशास्त्रच असलें पाहिजे असें कोणी म्हणतील. पण वरील विचारांत मानवी जीवनांतील अंतर्विरोधाची दखल घेतली असून परस्परविरोधी हक्कांना मान्यता दिली पाहिजे याची गरज यांत प्रतिपादिली आहे. खरोखर हे विचार हा शहाणपणाचाच पाया आहे एवढें मान्य करावें लागतें.

रॉबिन विल्यम्स या समाजशास्त्रज्ञानें आणखी कांहीं मूलतत्त्वें सांगितलीं आहेत.

भोवतालच्या परिस्थितीशीं जुळतें घेण्याचा मार्ग त्या परिस्थितीला शरण जाणें हा नसून त्या परिस्थितीवर ताबा मिळविणें हा होय.

आंतरिक अनुभवापेक्षां बाह्य जगाबद्दलची आस्था ही अधिक महत्त्वाची होय.

नुसत्या चिंतनापेक्षां वस्तूंची घडामोड करणें हें अधिक महत्त्वाचें.

बदल हेंच शाश्वत सत्य. म्हणून बदलाशीं आपणांस जुळतें घेतां आलें पाहिजे.

भूतकाळापेक्षां भविष्यकाळ अधिक महत्त्वाचा.

माणूस आपल्या बुद्धीनें जग बदलूं शकतो. माणसाचें हें कर्तृत्व आपलें मार्गदर्शक तत्त्व असलें पाहिजे. भूतकाळांत जें झालें त्याचें महत्त्व त्या मानानें कमी आहे.

नैतिक कायदा हा सर्वांना एकच असतो. मानवी हक्क हे सार्वत्रिक मानले गेले पाहिजेत.

विल्यम एच. व्हाइट (ज्यू.) यानें नवीन उपनगरांचा अभ्यास केला आहे. तो म्हणतो, "हे उपनगरवाले आपल्या लोकशाही ध्येयाचा पुरस्कार करतांना कांहीं प्रखर सत्यें दडवितात अथवा त्यांची उपेक्षा करतात. पण वर्गभेदांचें अस्तित्वच अमान्य करण्याचा त्यांचा जो हट्ट आहे त्यामुळेंच वर्गभेद थिजून घट्ट होण्याचें टळतें." अडचणींनीं आम्ही नाउमेद होत नाहीं. कारण त्यांचेशीं झगडून आम्ही पूर्वीं यशस्वी झालों आहों. अमेरिकेंतील बालगुन्हेगारी व लोकांचें मानसिक अराजक, परदेशांतील रोगराई व अन्नटंचाई, या गोष्टींनीं आम्ही डगमगत नाहीं, एकादी नवी संघटना स्थापन करतों आणि कामाला लागतों. बडे दरोडेखोर, घटसर्पासारखे भयंकर रोग, चांगल्या अन्नांत केली जाणारी हलकी भेसळ, आर्थिक इक्कदाऱ्या, चेटक्यांचे खटले, मताधिकाराला धनिकतेची गरज या सर्व आपत्तींचें, दोषांचें निराकरण आम्हीं केलेंच कीं नाहीं! अगदीं

गुंतागुंतीचे प्रश्न साध्या उपायांनीं सुटावे अशी आशा बाळगण्याची प्रवृत्ति आमच्यांत आहे. पण पुष्कळदां अगदीं साध्या उपायांनीं व दैवी योगायोगानेंहि पुष्कळ बिकट प्रश्न सुटले आहेत. शेतकऱ्यांचा माल खपत नव्हता त्यावेळीं त्यांचा प्रश्न अचानक परराष्ट्रीय बाजारांनीं सोडवला, कामगारांच्या अडचणी कामगारसंघटनांनीं सोडविल्या, आणि ऐच्छिकतेनें सारे प्रश्न सोडविले.

मेल्शिअर वँकोविट्झ् हा पत्रकार अमेरिकन जीवन पाहिल्यावर आपलें बनलेलें मत मांडतांना लिहितो, "संशयवादी अशा युरोपबद्दल भ्रम होऊन व थकून अमेरिकेला आलेला पाहुणा अमेरिकेंतलें तें समाधान, तो आशावाद पाहून उल्लासित होतो. अमेरिकेच्या देशाभिमानांत ध्येयवादाची गुंतागुंत नाहीं, नाट्यपूर्ण प्रदर्शन नाहीं. तो साधा, सरळ व नैतिक सामर्थ्य देणारा असून त्याचें सामर्थ्य अमर्याद आहे."

## लोकशाही ही कार्यपद्धति

डी टोकेव्हिलच्या मतें, अमेरिकन लोक तत्त्वज्ञानाकडे फारसें लक्ष देत नाहींत हें खरें, पण त्यांची सर्वांची विचारपद्धति तत्त्वज्ञानात्मकच आहे. "सिद्धांत व संवय यांचें बंधन न पाळणें, कौटुंबिक म्हणींतले आदेश, वर्गीय दृष्टीचीं ठाम मतें, आणि कांहीं प्रमाणांत राष्ट्रीय पूर्वग्रह इत्यादींची उपेक्षा करणें, परंपरागत गोष्टी या फक्त माहिती म्हणून समजून घेणें, वस्तुस्थितीहून भिन्न प्रकारें वागतांना वस्तुस्थितीच्या ज्ञानाचा मार्गदर्शक म्हणून उपयोग करणें, कार्यकारणभावाचें ज्ञान स्वतःसाठीं स्वतःपुरतें समजून घेणें, साधनांची फिकीर न करतां परिणामाकडे लक्ष देणें आणि वस्तुस्वरूपांतून वस्तूकडे जाणें हीं अमेरिकन कार्यपद्धतीचीं ठळक लक्षणें आहेत. त्यांनाच मी अमेरिकनांची तत्त्वज्ञानात्मक पद्धति असें म्हणतों." ही अनुभवादी पद्धति होय. कोणत्याहि कल्पनेचे परिणाम ही यांत त्या कल्पनेची कसोटी मानली जात असून अधांतरीं सिद्धांतापेक्षां अनुभवाचा हात धरून चालण्याची ही पद्धति आहे.

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कँट याला जीवनांतील जिवंत व विविध अनुभवांबद्दल तुच्छता वाटत असून सिद्धांताचें स्तोम त्यानें फार माजविलें. व्यवस्था, नियम-बद्धता यांचा त्यानें फार बडेजाव केला. यामुळें जीवनापासून अलग अशा ऐनजिनसी सिद्धांतांनाच फार महत्त्व आलें. मार्क्सनें हीच परंपरा अनुसरून एका अंतिम सामाजिक अवस्थेची अपेक्षा लोकांपुढें ठेवली. त्यापासून निर्माण झालेले प्रमाण आदेश इतके घट्ट आहेत कीं त्या प्रमाण आदेशांच्या साच्यांत न

बसणारी वस्तुस्थिति मार्क्सवादाला मान्यच होत नाहीं. रशियांत सामुदायिक शेती-साठीं लक्षावधि माणसांना ठार करण्यांत आलें हें जसें मार्क्सवाद्यांच्या लक्षांत येत नाहीं त्याचप्रमाणें अमेरिकेंत भांडवलाचेंच समाजीकरण चालू आहे हेंहि त्यांच्या लक्षांत येत नाहीं, रशियांत गुलामांच्या श्रमांनीं उत्पादन चालू आहे इकडे त्यांचें लक्ष जात नाहीं, हंगेरींत रशियाशीं राजकीय 'सहकार्य' करण्याच्या नांवानें झालेली कत्तल मार्क्सवाद्यांना दिसत नाहीं.

लोकशाही ही अशा पोलादी सांच्याच्या काल्पनिक सिद्धांतावर आधारलेली नाहीं. हक्क आणि कर्तव्यें यांनीं समतोल केलेली ही पद्धति आहे. या पद्धतींत सरकार आहे त्यापेक्षां सांघिक जीवन अधिक आहे. 'संयुक्त अनुभवांची देवघेव' असें या पद्धतीचें वर्णन जॉन ड्यूई हा तत्त्वज्ञ करतो. तो म्हणतो, "लोकशाहीचा नैतिक व आदर्शात्मक आशय हा आहे कीं, सामाजिक कर्तव्यें सर्वांनीं केलीं पाहिजेत, त्याचबरोबर ज्याच्या त्याच्या पात्रतेनुसार विकास करण्याची संधि प्रत्येकाला दिलेली आहे. लोकशाही ही माणसांहून भिन्न अशी स्वतंत्र संस्था नव्हे. वैयक्तिक जीवनाची ती एक रीत आहे."

याचें उत्तम उदाहरण म्हणजे ऐच्छिकता. आमची नागरिक जीवनाचीं कर्तव्यें पार पाडतांना आम्ही हाच मार्ग अवलंबतों. लोकशाही मार्गांत एक सिद्धांत गृहीत असतो तो हा कीं समाज हा स्थिर नसून बदलतो आहे. या दृष्टीनें अमेरिकन लोक लहान मुलांना असे अनुभव देतात कीं त्यामुळें वडिलांच्याच संवयींची पुनरावृत्ति मुलांच्या बाबतींत होत नाहीं. मुलांच्या संवयी वडिलांच्या पेक्षां अधिक चांगल्या होतात. जे लोक भूतकालापासून मार्गदर्शन घेतात आणि वाडवडिलांच्या मार्गानें चालत राहतात अशांना लोकशाही मार्ग अनुसरणें कठिण जातें याचें हें प्रमुख कारण आहे.

म्हणून अमेरिकन लोकशाही परंपरेचें मूळ नैतिक आहे, तांत्रिक नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. यांतील पायाभूत श्रद्धा अशी आहे कीं इतरांबद्दल आदर बाळगून व्यक्तीचें स्वातंत्र्य कायम राखणें, आणि सक्ती न करतां एकजुटीनें समाजस्थैर्य सांभाळणें यासाठीं अवश्य तें कर्तृत्व माणसांत आहे.

लोकशाही हें जसें नैतिक व धार्मिक ध्येय आहे तसेंच तें बौद्धिक ध्येयहि आहे. कारण लोकशाहींत खऱ्या अनुभवावर आधारलेल्या विचाराची गरज असून तो विचार उपयुक्त कृतींत उतरावा लागतो. जीवन हें अनेकांनीं वांटून घेऊन उपभोगावें ही लोकशाहीची श्रद्धा आहे. त्यामुळें जीवन विशाल होतें आणि जीवन व्यवहार्य करण्यासाठीं ज्या अनेक माणसांची गरज लागते त्यांच्याशीं

संबंध येण्यानें त्या जीवनांत अर्थ निर्माण होतो. लोकशाही हें एक रसिकतेचेंहि ध्येय आहे. कारण एकमेकांनीं आपल्या अनुभवसंवेदना इतरांना देणें हें लोकशाहीचें एक उद्दिष्ट आहे. सरंजामी संस्कृतींत कला मर्यादित क्षेत्रांतच कोंडलेली असे तर लोकशाहींत वाढत्या लोकसंख्येचें राहणीमान उंचावून त्यांच्यापर्यंत कला पोंचविली जाते.

शब्दप्रामाण्याऐवजीं अनुभवावर आधारलेला असा लोकशाही हा एकच जीवन-प्रकार आहे. म्हणूनच तो समजायलाहि कठीण आहे. सोशॅलिझम्, कम्युनिझम्, फॅसिझम् यांसारखें घडीव समाजतत्त्व लोकशाहींत असत नाहीं. लोकशाही स्पष्ट व्यावहारिक स्वरूपाचे प्रश्न हातीं घेते, स्वतःचा खास अनुभव, माणसाच्या विशिष्ट गरजा, समाजाच्या जीवनाची सुधारणा इत्यादि स्पष्ट स्वरूपाचे प्रश्न हातीं घेऊन तें सोडविण्याचा प्रयत्न लोकशाही करते. एकाद्या घडीव समाजसिद्धांतांत सर्व प्रश्नांचीं उत्तरें छापील असतात तशीं लोकशाहींत मिळत नाहींत अथवा आपण कधीं चुकत नाहीं असें म्हणण्याचें ढोंगहि लोकशाही करीत नाहीं. पण चुकांपासून बोध घेण्याचें आश्वासन लोकशाही खास देते. कम्युनिझम्सारखी लखोटबंद पद्धति ही इतिहासांत झालेल्या चुकांपासून बोध घेत नाहीं. कारण आपण करतों तेंच बरोबर असा त्यांचा ठाम सिद्धांत असल्यानें एकादेवेळीं अपेक्षेहून अधिक वाईटपणें घटना घडल्या तर कम्युनिस्ट हे अधिकाऱ्यांना दोष देतात, गुप्त खटले भरतात व माणसांना कंठस्नान घालतात. कम्युनिझम् चुकत नाहीं हें जर त्याच्या व्याख्येंतच गृहीत धरलें आहे तर मग जेव्हां घोटाळा उडतो तेव्हां लोक चुकतात असेंच अनुमान काढावें लागतें.

लोकशाहीचा दृष्टिकोन याउलट असतो. लोक आणि त्यांच्या गरजा या महत्त्वाच्या असें लोकशाही मानते. या गरजा अमुक एका पद्धतीनें भागल्या नाहींत तर ती पद्धत चूक ठरते. मग दुसरी पद्धत स्वीकारली जाते. म्हणून येथें सोशॅलिस्ट व कॅपिटॅलिस्ट अशा दोन्ही पद्धतींचा अवलंब केला जातो. परकीयांना यांत आश्चर्य वाटतें. पण आम्हांला हेंच स्वाभाविक वाटतें. आम्ही एकादी सर्वगुणसंपन्न समाजरचना बांधूं इच्छीत नाहीं. आम्ही फक्त माणसांच्या गरजा भागवितों.

अमेरिकन्स हे ध्येयभूत सिद्धांताबद्दल आस्था दाखवीत नाहींत म्हणून ते विचारप्रवण नाहींत असें म्हटलें जातें, पण याचें उत्तर असें आहे कीं ध्येयभूत सिद्धांताच्या मर्यादा आम्ही ओळखतों आणि लखोटबंद समाजपद्धतीपलीकडे आम्ही पाहूं शकतों यावरून आम्ही विचारप्रवण आहों हेंच सिद्ध होत नाहीं काय?

अशा तत्त्वज्ञानाचा अवलंब ही सोपी गोष्ट नव्हे. कारण तत्त्वज्ञानानेंच आमची काळजी घ्यावी अशी आपली पोरकट इच्छा असते ती येथें भंगते आणि आपणच आपला विचार करून आपल्या समाजाची व्यवस्था करावी अशी अपेक्षा लोकशाही बाळगते. सामाजिक बदल आणि प्रगति करतांना बरीच विघटना अपरिहार्य ठरते त्यामुळें उलथापालथ होते. म्हणून उघड्या डोळ्यांनीं हीं संकटें आणणारी लोकशाही स्वीकारण्याला धैर्य लागतें. याऐवजीं आपणांस सर्व कांहीं येतें म्हणणाऱ्यांच्या हातीं सत्ता सोपवून स्वकर्तृत्वाचा राजीनामा देण्याला फारसें धैर्य लागत नाहीं.

## व्यक्ति आणि समाज

व्यक्ति आणि समाज यांत श्रेष्ठ कोण हा प्रश्न प्रत्येक संस्कृतीनें आपापल्यापुरता सोडविला पाहिजे. प्रत्येक कालखंडांत या प्रश्नाचें उत्तर पुन्हा पुन्हा वेगळें शोधलें पाहिजे. आजवर अमेरिकेला व्यक्तिस्वातंत्र्याच्या कालखंडांतून जावें लागलें आहे. अमेरिकन समाजांत स्वतंत्र लहान धंदेवाले होऊन गेले. त्यांना आपल्या स्वतंत्र धंद्याचा मोठा अभिमान होता. याच व्यक्तिप्रधान समाजांत दरोडेखोर 'सरदार', नवकोट नारायण, एकांतिक दरिद्री गटहि होते. सरकारांत लाचलुचपत व नैतिक भ्रष्टाकार खूप होता. व्यक्तिप्रधान समाजाचे गुण आणि दोष अमेरिकेनें अनुभवले आहेत. व्यक्ति आणि समाज यांत अधिक महत्त्व कोणास हा प्रश्न सोडविण्याचे प्रयोग हजार मार्गांनीं अमेरिकेनें केले आहेत.

अमेरिकन संस्थांची रचना व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देऊन करण्यांत आली आहे. असा भर देण्यांतील फायदे व तोटे दोन्ही आम्हीं अनुभवले आहेत. पण अलीकडे समुदायाबद्दलचा आपला दृष्टिकोन आम्ही बदलत आहों. विल्यम व्हाइट (ज्यू.) आपल्या 'ऑर्गनायझेशन ऑफ मॅन' या ग्रंथांत म्हणतो कीं "आम्ही सामुदायिक दृष्टींत फार पुढें गेलों आहों. औद्योगिक संघटनेंत आम्ही सार्वत्रिक सारखेपणावर भर देत आहों, व्यक्तिविकासाला उपयुक्त अशा वैयक्तिक चिंतेऐवजीं व संशोधक विचाराऐवजीं आम्ही सामुदायिक जीवनाला महत्त्व देत आहों, विद्यमान परिस्थिति हीच बरी या विचारांत आम्ही रमलों आहों. यामुळें आम्ही निर्बुद्ध होत आहों. माणसाच्या सामाजिक जीवनाची संघटना करण्याच्या नादांत माणसाचा एकान्त व त्याचें व्यक्तिवैशिष्ट्य यांचा आम्ही नाश करीत आहों अथवा त्यांत विघ्न आणीत आहों. नवीन लहान शहरांतील माणसें गट करून राहतात आणि पुष्कळशा गोष्टी सामुदायिकपणें उपयोगांत आणतात.

चांदीचीं भांडीं, दागिने, शोभेच्या वस्तु, ताटें-वाट्या-ब्रशा, पुस्तकें, ध्वनिमुद्रिका या वस्तु नेहमीं एकमेकांकडून एकमेकांस उसन्या दिल्या घेतल्या जातात."

या लहान शहरांतले पुष्कळसे लोक पूर्वी मोठया शहरांत होते. तेथें त्यांना सामुदायिक जीवन जगायला मिळत नव्हतें. आतां जवळजवळच्या शेजाऱ्यांचा गट करून जुन्या अमेरिकेंतल्या गटजीवनाचें फार उशिरां पुनरुज्जीवन ते करीत आहेत. जुन्या लहान शहरांत हें जीवन नेहमींच आहे. पहिल्यानें जेव्हां जंगलें तोडून नवीन वसाहती स्थापण्यांत आल्या तेव्हां त्या सामुदायिक जीवनावरच आधारल्या होत्या. त्या त्या वेळीं लहान लहान होत्या, बाहेरच्या कोणत्याहि सत्तेपासून त्या स्वतंत्र होत्या, परस्परसाहाय्याची त्यांना त्या वेळीं गरज होती. हल्लीं नवीन शहरी वसाहतींत जो सामुदायिक जीवनावर भर दिला जात आहे तो जुन्या जीवनाचें पुनरुज्जीवनच आहे.

हल्लींची सामुदायिक संशोधनाची व सामुदायिक कारभाराची प्रवृत्ति आमचें अस्तित्वच उलथून पाडील हा समज खरा नव्हे. कारण एका प्रचंड समाजांत लक्षावधि लहान लहान गट असून ते एकमेकाविरुद्ध ताण देतात व समाजाचा समतोल राखतात. प्रचंड समाजांतले हे गट आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक असे विविध प्रकारचे असून त्यामुळें सामाजिक जीवन परिपूर्ण होतें. अशा विविधतायुक्त व बहुत्वयुक्त समाजांत आपणाकडे इतरांचें लक्ष वेधून घेण्यासाठीं गटागटांत चढाओढ लागते, आपसांत समेट घडवून आणण्यासाठींहि ओढाताण चालते, यामुळें हें सारें जीवन मोठें उत्साहयुक्त असतें. अमकी ही गाडी खरेदी करा, विमानांतून न जातां आगगाडीनें जा, सरकारच्या मालकींत वीज देण्याऐवजीं वीज खाजगी ठेवण्यास पाठिंबा द्या, रिपब्लिकनांना अथवा डेमोक्रॅटांना मतें द्या असें ज्याप्रमाणें सांगण्यांत येतें, त्याप्रमाणें कारखानदार व मजूरहि आमचीं आर्जवें करतात, धान्यशेतकरी व दूधशेतकरी आमची मर्जी संपादूं पाहतात, शिक्षणसुधारक व जुन्या शिक्षणाचे पुरस्कर्ते निरनिराळ्या धर्मांचे पुरस्कर्ते सर्वजण आपापली बाजू आम्हांला पटवूं पाहतात. इतकी विविध प्रकारची निवडसंधि ज्या जीवनांत आहे, इतक्या निरनिराळ्या जीवनांत गुंतण्याचे प्रसंग जेथें येतात तें जीवन माणसाला निर्बुद्ध करणारें नसून कार्यस्फूर्ति देणारेंच आहे.

यंत्रामुळें श्रमाचें ओझें जसें कमीकमी होत जातें तसतशी निवडसंधि वाढत जाते. औद्योगिक क्षेत्रांत नोकर मिळवूं इच्छिणाऱ्या एका अधिकाऱ्यानें अलीकडे तीनशें अर्जदारांच्या मुलाखती घेतल्या. पण एकानेंहि पगार किती मिळेल हा

प्रश्न विचारला नाहीं. विपुलता ज्या प्रमाणांत अधिकाधिक वांटली जात आहे त्या प्रमाणांत आरोग्य व सुख धोक्यांत घालूनहि अधिक पगार मिळविण्याची धडपड कमी होत आहे. धडपडीची गरज कमीकमीच होत आहे. मानसिक स्वास्थ्य, कौटुंबिक जीवन, वैयक्तिक छंद व करमणूक या नवीन मूल्यांना महत्त्व येत आहे. कामाचा वेळ व चिंता कमी झाली आहे.

## आमचें यश

सारें जग आज कोलाहलांत सांपडलेलें दिसतें, अशा काळीं विविध प्रकारच्या साहित्यांतून अमेरिकेनें जीवन चांगल्या प्रकारें जगतां येईल असा समाज निर्मिला आहे आणि विचारविनिमय व आर्थिक समान वांटणी हाच सुसंस्कृत समाज निर्मिण्याचा सरळ रस्ता होय ही गोष्ट सिद्ध केली आहे. आमचें व्यक्तिस्वातंत्र्य अजून कायम आहे. आम्ही कोठेंहि जाऊं येऊं शकतों, क्यूमध्यें उभे राहण्याची सक्ती नाहीं, अयुक्त कायदे पाळण्याची सक्तीहि आमच्यावर नाहीं. लेस्ली फील्डर लिहितो, "युरोपियनांना माणूस हा हताश व हतबल वाटतो; पण तरीहि तत्त्वतः ज्या गोष्टी अव्यवहार्य आहेत, अशी युरोपियनांची खात्री झालेली असते त्या गोष्टी, तत्त्वाचा विचार न समजण्याइतके हे निर्बुद्ध अमेरिकन्स, प्रत्यक्ष व्यवहारांत आणून दाखवितात हें पाहून युरोपियन माणूस आश्चर्यचकित होतो."

अमेरिकन समाज एवढा प्रचंड व विविध आहे कीं त्याच्या यशाचें संपूर्ण वर्णन करणें हें अशक्यच आहे. पण उदाहरणादाखल एका माणसाचा इतिहास सांगून हें वर्णन थोडेंसें करतां येईल. विल्यम डग्लस हा सुप्रीम कोर्टाचा एक जज्ज असून त्याचें नांव जगजाहीर असल्यानें त्याचेंच उदाहरण घेऊं. विल्यम डग्लस मिन्नेसोटा राज्यांत जन्मला. तो गांवोगांव घोड्यावरून फिरून धर्मोपदेश करणाऱ्या धर्मगुरूचा मुलगा. विल्यमचा बाप विल्यम सहा वर्षांचा असतांनाच, वारला. नंतर बाल-विल्यम व त्याचें सारें कुटुंब पश्चिम किनाऱ्याकडील वॉशिंग्टन राज्यांत गेलें. विल्यम रोजगारी करून शाळा शिकला, व्हिटमन कॉलेजांत जाण्यासाठीं त्याला स्कॉलरशिप मिळाली, तासाला दहा सेंट्स या मजुरीवर एका दुकानांत खिडक्या धुण्याचें व इतर काम त्यानें केलें, वाढप्याचें काम करून जेवण बाहेर काढलें आणि एका रिकाम्या जागेवर तंबू ठोकून व त्यांत कॉलेजचीं तीनचार वर्षें राहून विल्यमनें पैसा साचवला. उन्हाळ्याच्या सुटींत फळें काढणें, लाकडें तोडणें, वणवे विझवणें हीं कामें तो करी. पहिल्या महायुद्धांत कांहीं काल शिक्षण सोडून तो नोकरीवर गेला होता. पुढें विद्यार्थिसंघटनेचा अध्यक्ष झाला.

नंतर पदवीपरीक्षा देऊन त्यानें कॉलेजचा अभ्यासक्रम पुरा केला. दोन वर्षेपर्यंत विल्यम डग्लस आपल्या गांवीं शिक्षक होते. नंतर एका मालगाडीवर मेंढपाळाचें काम करीत डग्लस पूर्वेकडे गेले व न्यूयॉर्कला आले. त्यावेळीं त्यांचेजवळ ६ सेंट होते. तेथें त्यांनीं शिकवण्या केल्या व एक पुस्तक लिहून कोलंबिया लॉस्कूलची फी भरली. तेथें कायद्याचा अभ्यास केला. तेथें शेवटच्या परीक्षेंत ते दुसरे आले. नंतर त्यांनीं एका कॉर्पोरेशनच्या लॉ-फर्ममध्यें नोकरी केली, कोलंबिया व येल येथें ते कायद्याचे शिक्षक होते. त्यांनीं 'दिवाळखोरी' या विषयावरील कायद्यांत जें निष्णातत्व मिळविलें त्यामुळें ते सरकारच्या व्यापार खात्यांत गेले, नंतर सिक्युरिटीज् ॲंड एक्स्चेंज कमिशनचे अध्यक्ष त्यांना नेमण्यांत आलें. या वेळीं त्यांनीं आर्थिक व्यवहारांत महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या. १९३९ सालीं डग्लस यांना सुप्रीम कोर्टाचे जज्ज नेमण्यांत आले. त्या वेळेपासून अनेक उन्हाळे त्यांनीं जगांतील दूरदूरच्या देशांत प्रवास करण्यांत घालविले असून जगांतील इतर संस्कृतींचे प्रश्न व त्यांचे गुणविशेष यांचा अभ्यास केला आहे.

अमेरिकेची श्रद्धा अशी आहे कीं आज जीं मुलें मोलमजुरी करतात, त्यांत अनेक 'विल्यम डग्लस' विकास पावत आहेत आणि त्यांच्या पिढींत त्यांच्या समोर येणारे प्रश्न कसे सोडवावे हें त्यांना खास कळेल. आज राष्ट्रांपुढें जे प्रश्न आहेत ते अतिशय गंभीर असून धीर खचविणारे आहेत. गुन्हाप्रवृत्ति, दारूबाजी, मानसिक अनवस्था, गुन्हे, दुर्ग्रह, लाचबाजी हे आजचे बिकट प्रश्न होत. पण आम्ही आतां लोकांच्या मनःप्रवृत्तीकडे पाहण्यास शिकलों आहों. दोष हे माणसांत, समाजांत असणें अपरिहार्य असतें. पण लोकांच्या मनःप्रवृत्ति मात्र खास आशादायी आहेत. आमच्या पुढील प्रत्येक प्रश्न सोडविण्यासाटीं खाजगी ऐच्छिक व सरकारी प्रयत्न खूप होत आहेत व त्यांत काम पुष्कळ होत आहे, इतकेंच नव्हे तर लोकशाही मार्ग अवलंबले जात आहेत यामुळें विशेष हुरूप वाटतो.

आमची अपेक्षा आहे कीं १८९० च्या सुमारास आमची अर्थसंघटना खूप विकास पावली असेल. तीमुळें कामगारांना तीस तासांचा आठवडा व बारमहा काम मिळेल. पुढील दहा ते पंधरा वर्षांत कॉलेजशिक्षण घेणाऱ्यांची संख्या एवढी वाढेल कीं कॉलेजशिक्षकांची संख्या दुप्पट करावी लागेल. या सर्व नव्या शिक्षितांना रोजगार देण्यासाटीं आम्हीं गेल्या तीनशें वर्षांत बांधले इतके कारखाने पुढील दहापंधरा वर्षांत बांधावे लागतील.

आम्हीं येथें जी विपुलतेची अर्थसंघटना उभारली आहे ती तशी साऱ्या जगभर पसरावी अशी आमची मनीषा आहे. त्या कार्यांत आम्ही सहकारीहि

होऊं इच्छितों. परस्परसाहाय्य करून व परस्परांना मान देऊन सहकार्य देण्या-घेण्यास जे तयार आहेत त्यांच्याशीं आम्ही सहकार्य करूं इच्छितों.

अमेरिकेंत श्रम व समाजहित हीं एकरूप होत आहेत. आम्ही जी संस्कृति संस्थापीत आहों तीं नवी आहे आणि आम्हांला ती हुरूप आणीत आहे. दीर्घ कालानें कां होईना, स्त्रियांची खास दूरदृष्टि आम्हांस उपयोगांत आणतां येऊं लागली असून स्त्रिया व पुरुष यांचे कोणतेंहि प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न हे एक-मेकास उपकारकच होतात हें आम्हांस आतां कळून येत आहे. यामुळें आमच्या अर्ध्या मानवजातीची बुद्धिमत्ता, जी आजवर घराच्या चार भिंतींत कोंडली गेली होती ती मोकळी झाली असून नवसमाजाबद्दलच्या आमच्या कल्पना विकसित करण्याला मदत करीत आहे.

प्रत्येक देशाची एक श्रद्धा असते. तींत त्या राष्ट्राच्या आशाआकांक्षा व म्हणून त्यांचीं यशें-अपयशें साठविलेलीं असतात. त्या परंपरेंतून त्या राष्ट्राचें एक आकांक्षाचित्र तयार झालेलें असून त्याकडे सर्व प्रयत्न धाव घेत असतात. अमेरिकनांनीं युरोप सोडला व नव्या जगांत प्रवेश केला तेव्हांपासून अमेरिकनांनीं दुर्बलांची बाजू घेतली आहे. सत्ताधाऱ्यांबद्दल अमेरिकनांना नेहमीं संशय वाटतो व ते त्याला नेहमीं प्रतिकार करतात. तरुणांना कशांत आनंद वाटतो? निर्नियंत्रण, गुबगुबीत तरुणी, दांडगाईचे खेळ, दांडगाईचीं सुखें, अति आशावाद, अचानक आलेली पण फक्त थोडा काळ टिकणारी चिंता, आपल्या सामर्थ्याबद्दल आनंद, नवज्ञानाचा हव्यास, सौंदर्य इत्यादि गोष्टी अमेरिकन तरुणाला आनंद देतात. साऱ्या अमेरिकनांचें हे आनंदविषय आहेत.

## जीवनाचीं सहा तत्त्वें

आम्ही अमेरिकेंत जी नवी समाजव्यवस्था उभारीत आहों तिचें वर्णन व्यक्ति-स्वातंत्र्य, खाजगी मालकी, भांडवलशाही अशा एकाद्या शब्दानें करतां येणार नाहीं. फार काय लोकशाही हा शब्दहि या समाजव्यवस्थेस आतां जुन्या अर्थानें वापरतां येणार नाहीं. आमच्या समाजासंबंधानें पुष्कळ खोल तात्त्विक पृथक्करण व संशोधन झालें आहे. पण आमचें अमुक एक सुसंगत तत्त्वज्ञान आहे असें मात्र अजून म्हणतां येत नाहीं. तथापि वागणुकीच्या सहा प्रकारांत अमेरिकन समाज-जीवनाचें वर्णन करतां येईल. व्यक्तिस्वातंत्र्यवाद, ऐच्छिकता, संयुक्तता (फेडरे-लिझम) परस्परसमतोल (कौंटरबॅलन्स), अंतःप्रवेश (इंटरपेनेट्रेशन), एकजीवत्व (फ्यूजन) हे ते सहा प्रकार होत. या सहा प्रकारांनीं जी समाजव्यवस्था निर्माण

होते ती अजून विकासावस्थेंत आहे. तिच्या अंगभूत अशा जमतें घेण्याच्या गुणामुळें ही समाजव्यवस्था काळांतरानें चोहोंकडे पसरेल.

प्लायमाउथचा गव्हर्नर विल्यम ब्रॅडफोर्ड स्मिथ याचेंच उदाहरण घेऊं. तरुणपणीं तो 'पिल्ग्रिम्स' म्हणजे यात्रेकरू या नांवानें इंग्लंडांत प्रसिद्ध असलेल्या गटांत स्वेच्छेनें सामील झाला. हे पिल्ग्रिम्स इंग्लंडांतील तत्कालीन धर्माबद्दल मतभेद व्यक्त करणारे होते. ब्रॅडफोर्ड हा या ज्या 'पिल्ग्रिम्स'ना मिळाला ते समविचाराचे व स्वेच्छेनें एकत्र आलेले होते. त्यांच्यांत स्वेच्छेनें सामील झाल्यामुळें ब्रॅडफोर्डचा स्वतःचाच विस्तार झाला असा त्याचा अर्थ होता. हे धर्मकार्यासाठीं एकजूट झाले होते. पुढें ते सर्वजण इंग्लंड सोडून उत्तर अमेरिकेस आले आणि ऐच्छिकतेच्या तत्त्वाचा अवलंब करून त्यांनीं प्लायमाउथची छोटी कॉमनवेल्थ स्थापली. त्याचबरोबर त्या कॉमनवेल्थचे धंदाव्यापार वगैरेविषयक प्रश्न सोडविण्यासाठीं त्यांनीं एक कॉर्पोरेशनहि स्थापली. पुढें 'न्यू इंग्लंड कॉन्फेडरेशन' स्थापण्यांत आलें. त्यांत कांहीं थोडीं ग्रामीण लोकराज्यें लष्करी कार्यापुरतीं सामील झालीं. यांत संयुक्तता अथवा फेडरॅलिझम् तत्त्वाचा अवलंब करण्यांत आला. कांहीं काळ त्यांच्या छोट्या छोट्या शक्तींची ओढाताण चालून त्यांच्यांत समतोल निर्माण झाला. उदाहरणार्थ, बोस्टन व प्लायमाऊथ यांनीं कॉनेक्टिकट दरींतल्या प्रदेशासाठीं ओढाताण केली. नंतर अंतःप्रवेश सुरू झाला. हार्टफोर्ड, विदरफील्ड, सेब्रुक, वगैरे विभाग एकत्र येऊन त्यांनीं प्रांतिक सरकार उभारलें. एवढ्या या लहान क्षेत्रांत कॉनेक्टिकट हें जेव्हां राज्य बनलें त्यावेळीं फ्यूजन म्हणजे एकजीवन हा नवीन प्रकार अमलांत आला असें म्हणतां येईल. अमेरिकेचें जें संघसरकार स्थापन झालेलें आहे तेंहि या सर्व प्रकारांतून बनत गेलें आहे असें दाखवितां येईल.

आमच्या शिक्षणक्षेत्रांत हे सर्व प्रकार कसे अमलांत येतात हें आतां पाहूं.

प्रत्येक नागरिकाला समानसंधीचा हक्क आहे हें व्यक्तिवादाचें मुख्य तत्त्व असून शिक्षण मिळालें तरच ही संधि पदरांत पाडून घेतां येते यामुळें शाळेंत जाणें हें व्यक्तिवादाचें महत्त्वाचें अंग आहे. शाळांचा उगम ऐच्छिकतेंतूनच झाला. कारण प्रत्येक गांवानें आपली स्थानिक शाळापद्धति स्वतंत्रपणें स्थापली. गांवकऱ्यांनीं इमारतीचीं लाकडें स्वतः जमविलीं, शिक्षकांच्या राहण्याजेवण्याची तजवीज स्वतः केली आणि शाळेच्या खर्चासाठीं स्वतःवर कर लादून घेतले.

येथें ऐच्छिकता दोन स्वरूपांत कार्यान्वित होते. हे दोन प्रकार म्हणजे अमेरिकन चालतो कसा त्याचें तें लहानसें स्वरूपच आहे. शिक्षक हे ऐच्छिक संघटना

जी निर्मितात तिचा हेतु सामाजिक व व्यावसायिक असतो. म्हणून या संघटनेला आपण मुख्यतः व्यावसायिक संघटना म्हणूं. मुलामुलींचे आईबाप पालक-शिक्षक संघटना निर्माण करतात. तिला समाजसंघटना म्हणावें लागेल. कारण समाजांत शाळेला जें स्थान आहे त्यासंबंधींचे प्रश्न ही संस्था सोडविते. कुटुंब व शाळा या समाजाच्या आधारभूत अशा ज्या दोन संस्था त्या या संघटनेंत एकत्र येतात. नागरिक-शिक्षण ही समाजजीवनांतील जी महत्त्वाची बाब ती साध्य करण्याचें काम ही संघटना करीत असते.

या दोन्ही प्रकारच्या संघटना वरच्या संघटनांना जोडलेल्या असून त्यांच्या राष्ट्रीय संघटना झालेल्या असतात. यांत 'संयुक्तता' (फेडरॅलिझम्) या जीवन-प्रकाराचा अंमल झालेला दिसून येतो. मूळच्या स्थानिक व लहान लहान म्हणून दुबळ्या अशा या संघटना संयुक्त संघटनेंत सामील झाल्या म्हणजे त्यांचें सांघिक बळ वाढतें. आणि आपापल्या दिशेनें राष्ट्रास खेचणाऱ्या संस्थांचें जाळें जें राष्ट्रभर पसरलें आहे त्या जाळ्याच्या विभाग अशा या संघटना बनतात. देशांत कांहीं संस्था जकाती कमी कराव्या अशी मागणी करतात, कांहीं शेतकऱ्यांना साहाय्य द्या म्हणतात, कांहीं संस्था मजूरविषयक कायदे मजुरांना अधिक अनुकूल असावे म्हणून झटतात, कांहीं जंगलीं जनावरें संभाळलीं जावींत म्हणून झटत असतात; अशाच हजारों संस्था हजारों कामांसाठीं झटतात, त्यांतच वर सांगितलेल्या शिक्षण संघटना शाळांच्या व शिक्षणाच्या सुधारणेसाठीं झटत असतात.

अजूनपर्यंत ही अमेरिकन पद्धति कलहोत्पादनासाठीं आहे असें भासतें. दुसरा कोणताच हेतु तिच्यांत दिसत नाहीं. पण आतां अंतःप्रवेशाचा काळ आला आहे. निरनिराळे गट जेव्हां एकमेकांशीं स्पर्धेनें वागतात तेव्हां त्यांच्यांत केवळ वैर उद्भवतें असेंच नव्हे तर पुष्कळदां एकमेकांची नक्कल करण्याचीहि प्रवृत्ति त्यांच्यांत उद्भवते. शिक्षण ही आजवर शिक्षक व शाळा यांचीच मिरासदारी मानली गेली होती. पण आतां इतर संघटनांत शिक्षणकार्य करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते. कामगारसंघटनाहि आपल्या शाळा व वर्ग सुरू करतात. कारखान्यांत शिक्षणाचे वर्ग सुरू करण्यांत येतात अथवा कारखानदार ज्या कामगारांना विद्याभ्यास चालू ठेवायचा असेल त्यांची फी देतात. शेतीसंघटना-मार्फत चर्चामंडळें, व्याख्यानें, डॉक्युमेंटरी फिल्म्स, निबंधचढाओढी वगैरे कार्यक्रम होत असतात.

ही संघटनापद्धति आपल्या समाजांतल्या कोणत्याहि गटानें अमलांत आणण्या-सारखी आहे. वकील हा स्थानिक बार असोसिएशनचा सभासद असतो व

ही संघटना व्यावसायिक असते. तोच वकील लीगल एड सोसायटीचा सभासद असतो. ही संस्था गरिबांना अल्प खर्चांत कायद्याबाबत साहाय्य देणारी असल्यानें ही संस्था सामाजिक संस्था ठरते. अशा प्रकारें अमेरिकेंतील हजारों सामाजिक व व्यावसायिक संस्था समाजांतील व्यक्तिमात्राला सामाजिक जीवनांत दोन्ही बाजूंनीं गोवून टाकतात. कामगार व कारखानदार हे एका काळीं मूलतः एकमेकांचे वैरी मानले गेलेले घटक आतां एकमेकांत प्रवेश करीत आहेत, कामगारसंघटनांना आतां व्यवस्थाखात्याचे प्रश्न समजून घ्यावेसे वाटतात. व्यवस्थाखात्याच्या अधिकाऱ्यांना आतां कामगारसंघटनाशीं मिळतें घेतां येऊं लागलें. आतां यंत्रांचा उपयोग अधिक होऊं लागल्यामुळें कामाचे तास कमी होत असून मजुरी वाढत आहे यामुळें कामगार व कारखानदार यांच्यांत एकजीवत्व निर्माण होण्याचा संभव वाढला आहे. एक दिवस असा उगवेल कीं मालकीचें भौतिक धन, फुरसतीच्या काळचे उद्योग अथवा स्वभाव, प्रवृत्ति या सर्व बाबतींत कामगार व कारखानदार यांच्यांतील फरक कमी कमी होत जाऊन अगदींच क्षुल्लक असा होईल.

वर अमेरिकन जीवनांत दिसून येणारे जे सहा जीवनप्रकार म्हणून सांगितले त्यांची प्रत्यक्ष अमेरिकन राष्ट्रांत नित्य व सर्वत्र घडणारीं हजारों उदाहरणें देतां येतील. पूर्वी चर्च हें फक्त धार्मिक कार्यच करीत असे. पण आतां चर्च हें राजकीय व सामाजिक बाबतींतहि समाजाची सेवा करतें. राजकीय पक्ष एकमेकाशीं हाडवैरानें भांडावे अशी अपेक्षा असते. पण मतें देण्याबाबत आतां निरनिराळ्या पक्षांचे मिश्र गट बनत आहेत. सत्ता टिकविण्यासाठीं अथवा सत्ता मिळविण्यासाठीं प्रत्येक पक्ष सर्व राजकीय शक्ति आपल्या गोटांत आणीत असतो. यामुळें सर्व राजकीय पक्ष हे अमेरिकेंत एकमेकांचे आरसे झाले आहेत.

येथें आपण हल्लीं विकासावस्थेंत असलेल्या एका घटनेचें उदाहरण घेऊं आणि वर मांडलेली विकासपद्धति वापरून या घटनेचा विकास कसा होणार त्याविषयीं भाकित करूं. अलीकडे सर्व अमेरिकाभर लहानलहान मिळकतींच्या मालकांचे गट उत्पन्न झाले आहेत. आमची अर्थसंघटना सर्व बाजूंनीं नफ्याची असल्यानें हे छोटी मिळकतवाले निर्माण झाले हें उघड आहे. या सर्व छोट्या मिळकतवाल्यांना आपल्या मिळकतीचें भांडवल करायचें आहे. त्यांनीं भांडवलाचे क्लब्स स्थापले आहेत. ते आपले फंड एकत्र करतात, कोणीतरी रोखेबाजारांतला तज्ज्ञ गांठून त्याचा सल्ला घेतात, निरनिराळ्या रोख्यांच्या गुणावगुणांची चर्चा करतात आणि दर महिन्याला समाईकपणें आपले फंड गुंतवितात. आतां कालांतरानें या गटांचें

फेडरेशन होणें अपरिहार्य आहे. त्यांच्या राज्यपरिषदा, राष्ट्रीय परिषदा भरतील. ते वॉशिंग्टनमध्यें अथवा न्यूयॉर्कमध्यें अथवा दोन्ही ठिकाणीं कचेऱ्या उघडतील. ते आपल्या संघटित शक्तीनें असें दडपण आणतील कीं बडे भांडवलदार बँकवाले, मोठ्या कॉर्पोरेशन्स यांच्यापेक्षां त्यांचें दडपण अधिक वाढेल. लहान भांडवलदारांना करांच्या बाबतींत सवलत मिळावी म्हणून ते खटपट करतील. हें करीत असतां त्यांचे हितसंबंध एकजीव होतील. व्यक्ति या नात्यानें ते कामगार व धनोपभोक्ते आहेत. संघसदस्य या नात्यानें ते भांडवल गुंतविणारे आहेत. राष्ट्रीय संघटनेचे सदस्य या नात्यानें ते राजकीय वर्चस्वशाली आहेत. या सर्व प्रक्रियेंत भाग घेऊन ते सामाजिक एकजीवतेच्या कार्यांचा वेग वाढवितात, आणि निरनिराळ्या संघटनांच्या कार्यांतील पृथक्त्व नाहींसें होऊन व्यक्तींचे, गटांचे, अनेक गटांचे हितसंबंध समान होत जातात.

एकजीवता (फ्यूजन) हा शब्द मी वापरतों त्याचा अर्थ स्थिर, निर्बदल, अशी एक अवस्था मी मानतों असा नव्हे. तर ही एक प्रवृत्ति आहे एवढेंच मी म्हणतों. आमचा समाज बदलतो आहे. त्यांतच त्याचें सामर्थ्यहि आहे. पण विपुलता व सार्वत्रिक उत्पादन, उत्पन्न धनाची वाढती वांटणी आणि मिळकतींतील, शिक्षणांतील वर्गावर्गांतील विषमता नष्ट करण्याची प्रवृत्ति, यामुळें एकमेकांचे दृष्टिकोन एकमेकांना वाढत्या प्रमाणांत स्वीकारावे लागतील हें अपरिहार्य आहे. कामगार, कारखानदार, मंत्री यांचे मुलगे एका हायस्कुलांत शिकतात व पुष्कळदां एका कॉलेजांतहि जातात. ज्या वेळीं कॉलेजाचा खर्च भागविण्याची शक्ति सर्वांत येईल तेव्हां शिक्षणांतील विषमता नष्ट होईल. परदेशांतून आलेले भिन्नवंशीय लोक एकमेकांत मिसळून एकजीव होतात. प्रॉटेस्टंटांच्या शाखा आपलें फेडरेशन करतात. अखेरीस त्यांनाहि कदाचित् एकजीव व्हावें लागेल.

आमच्या यंत्रप्रधान समाजासंबंधानें कांहीं निराशावादी लोकांचें निदान असें आहे कीं माणूस हा या समाजांत यंत्रांतील चाकाच्या एकाद्या दात्याप्रमाणें निष्क्रिय होतो. हे निराशावादी लोक स्वतः निवळ काव्यदृष्टीचे (रोमँटिक) असतात पण वास्तववादाचा आव आणतात. यंत्रपूर्वकालांत जो हस्तव्यवसाय होता त्यांत एक समाधान होतें, स्वतःसाठीं स्वतः राबण्यांत एक सुरक्षितता होती, तें समाधान, ती सुरक्षितता या यंत्रानें नष्ट केली अशी या काव्यवाद्यांची तक्रार असते. पण ही अगदीं निरर्थक तक्रार आहे. अठराव्या शतकांतल्या कारागिरीला चढाओढ, औषधें माहीत नसलेलीं दुखणीं, जुलमी राज्यकर्ते, यांविरुद्ध कोणतें संरक्षण होतें ? बारा तासांचा दिवस, लहान मुलांना कामाची सक्ती असणारा तो

काळ परत यावा असें कोणास वाटतें ? चाळीस तासांचा (लवकरच तीस तासांचा) आठवडा, सामाजिक सुरक्षिततेचे फायदे, बेकारीची नुकसानभरपाई, आधुनिक वैद्यक आणि शिक्षण या सर्वांनीं माणसाला सर्व बाजूंनीं जी सुरक्षितता दिली आहे ती अवघ्या पन्नास वर्षांपूर्वींहि अंदाजण्याचें धाडस कोणी करूं शकला नसता. आणि सुरक्षितता मिळाली एवढेंच नव्हे; पूर्वींच्या काळीं सर्व सामाजिक कार्यें सर्व समाजाकडून केलीं जात यांतच कांहीं लोकांना मोठें काव्य दिसतें. पण खरोखर आजचा समाज त्या काळापेक्षां अधिक गुंतागुंतीचा असतां लोक स्वेच्छेनें आपापलीं कामें करण्यास पुढें येतात हीच अधिक चांगली गोष्ट आहे. यामुळें नव्या कल्पनांचा प्रयोग केला जाऊन त्यांची कसोटी लागते, पुढें मग त्या कल्पनेला सरकारकडून पुरस्कार मिळतो. या पद्धतींत लहान चुका वेळींच दुरुस्त होऊन त्यांना घोडचुकांचें स्वरुप येण्याचें टळतें.

अनेक हितसंबंध जेव्हां परस्परांशीं संयुक्त होतात (फेडरलाइज्), एकमेकांना तोलून धरतात, एकमेकांत अंतःप्रवेश करतात त्यावेळीं अपरिहार्यपणेंच परस्परांच्या समजुतींत मतभेदाचे कांहीं बदसूर ऐकूं आले तरी एक प्रकारचा सलोखा निर्माण होतोच. सलोखायुक्त विविधता ही अमेरिकन जीवनाची ठळक खूण आहे. मतभेदाच्या बदसुरानें या सलोख्यांत दृढताच येते, परस्परविरोधी तणावांनीं समतोल येतो.

समाज ही एक अखबंद, अखंड वस्तु होय असें ज्यांना वाटतें त्यांना विविध गट आणि हितसंबंध यांनीं बुजबुजलेला हा अमेरिकन समाज कार्यक्षम राहतो ही गोष्ट अविश्वसनीयच वाटते. परदेशी पाहुण्यांना अमेरिकन जीवनांत जो एकसारखेपणा दिसतो तो कांहीं अगदीं सपाट जीवनाचा द्योतक नव्हे. परस्परविरोधी हितसंबंधांत सलोखा घडवून आणण्यासाठीं, तीव्र मतभेदांत मतैक्याचीं क्षेत्रें शोधून तीं मजबूत करण्यासाठीं आणि विधायक दृष्टिकोनावर भर देण्यासाठीं जो सतत प्रयत्न केला जातो त्याचा परिणाम असा हा एकसारखेपणा दिसतो. आम्हीं आमचें मतैक्य मतभेदांतून निर्माण केलें आहे, फळ्याचिरफळ्यांतून एकजूट साधली आहे. आम्हीं आमच्या जीवनांतला एकसारखेपणा एवढ्या कष्टानें मिळविला असल्यानें आम्ही त्याला फार महत्त्व देतों यांत कांहींच आश्चर्य नाहीं. परदेशी निरीक्षकांना वाटतें कीं, आम्हांला एकमेकांनीं भिन्नभिन्नपणें कसें वागावें हें कळतच नाहीं. पण हें खरें नव्हे. आम्हीं सर्वांनीं शांततेनें एकत्र राहावें या हेतूनें अतिशय संयमपूर्वक आम्हीं आमचे मतभेद नष्ट केले आहेत. आमच्या ऐक्याचीं द्योतक अशीं लक्षणें मोघम अथवा पुसट आहेत हें खरें,

पण तीं तशीं असणें अपरिहार्यच आहे. कारण भिन्नभिन्न छटांचीं माणसें आम्हांस एकत्र आणायचीं असतात. उदाहरणार्थ, आमची समतेनें वागण्याची रीत, आमच्या अर्थसंघटनेस पाठिंबा देण्याची आमची प्रतिज्ञा इत्यादि ज्या गोष्टींत आम्ही अमेरिकन्स एकमेकासारखे वागतों त्या बाबी म्हणजे आम्हीं मोठ्या परिश्रमानें मिळविलेल्या एकमताच्या द्योतक होत. आमच्या संस्कृतींत राजकीय व धार्मिक विचार एकत्र वाहतात. खाजगी व सार्वजनिक विषय एकमेकांत मिसळतात, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय हितसंबंधांत अभिन्नता येते. जॉन डयूई या तत्त्वज्ञानें राजकीय सिद्धांताचें शैक्षणिक तत्त्वज्ञान बनविलें आहे आणि विपुलता आणि समता अमेरिकेंत आतां निर्माण झाली असल्यानें ध्येयवादी व वास्तववादी यांच्या भूमिका एकमेकींत मिसळल्याचा अनुभव ध्येयवाद्यांना येत आहे.

समता हें जसें आमचें ध्येय आहे तशीच ती आज वस्तुस्थितीहि आहे. यामुळें राष्ट्राला तीच एकजूट करीत आहे. आमच्या आधुनिक संस्कृतीचें हें स्वरूप जसजसें अधिकाधिक रुळत जाईल तसतसा त्यांतून आमच्या नव्या एकरूपतेचा सिद्धांत आम्हांला प्रतीत होत जाईल. कारण हितसंबंध एक झाले कीं कर्तृत्वाचे प्रेरक हेतूहि एक होत जातात. ही भावी आशा व्यक्त करतांना जॉन डयूई हा तत्त्वज्ञ लिहितो, "तत्त्वज्ञान जेव्हां चालू व्यवहाराशीं सहकार्य करील व रोजच्या व्यवहारांतला सुसंगत अर्थ स्पष्ट करील त्या वेळीं विज्ञान आणि भावना यांचा एकमेकांत प्रवेश होईल, व्यवहार व कल्पना एकरूप होतील, काव्य आणि धर्मप्रवृत्ति जीवनव्यवहारावर आपोआप फुलाप्रमाणें फुलतील. प्रचलित व्यवहाराचें हें स्पष्टीकरण मिळविणें व त्याचा आत्मप्रत्यय देणें हें तत्त्वज्ञानाचें कार्य असून संक्रमणकाळांत तत्त्वज्ञानापुढें हाच प्रश्न आहे."

समतेचा सिद्धांत, सामाजिक समतोल आणि विकास यांसाठीं अवश्य असणारी ऐच्छिक कृति करण्याची स्वयंस्फूर्त प्रेरणा (जीमुळें समाजांत परस्पर-विरोधी ताण निर्माण होतात व फेडरॅलिझम् म्हणजे संयुक्तता बलवान् होते), वाढत्या प्रमाणांत हितसंबंधांचें, मूल्यांचें व मनःप्रवृत्तींचें एकीकरण, रेल्वेचे रूळ जवळ जवळ येतातसे दिसतात पण कधींच एकत्र येत नाहींत त्याप्रमाणें कधींच हातीं न येणारें ध्येय—हें गतिमान समाजाचें चित्र होय. आपल्या भावी कालाचा हाच आराखडा असून परकीयांनाहि हाच योग्य आराखडा ठरेल. कारण सोशॅलिस्टांचा सामाजिक न्याय आणि लोकशाहीवादी भांडवलदाराची कर्तृत्वप्रेरणा व ईर्ष्या यांचा मिलाफ व्हावा असें ज्या परकीयांना वाटतें त्यांचा हा प्रश्नहि वरील आराखड्यानेंच सुटतो. या दोन रुळांवरून आमची गाडी हल्लीं चालली असून

परस्परविरुद्ध शक्तींच्या ताणामुळें ती डोलत आहे व प्रचंड संचालनशक्तीमुळें तिला धक्के बसत आहेत. पण या दोन रुळांपैकीं कोणता तरी एक काढून टाकून दुसरा ठेवावा असें म्हणणारे दोन्ही बाजूंस जे लोक आहेत ते प्रतिगामी आहेत.

## सांस्कृतिक वारसा

आमची ही अमेरिकन संस्कृति दीर्घकालापासून आमच्या वाडवडिलांकडून आमच्याकडे चालत आली आहे. सांस्कृतिक व भौतिक विकास अडखळतो, मध्येंच थोडा वेळ थांबतो, पण जीवनाचा प्रवाह अखंड वाहत असतो. युरोपप्रमाणें अमेरिकेलाहि ग्रीसची लोकशाही, विवेचकता, सौंदर्यप्रीति, शरीरसौख्याची आस्था वगैरेचा वारसा मिळालेला आहे. अमेरिकन संस्कृतींतील लैंगिक प्रांजळपणा, धर्मवेड व दारुडेपणा यांचीं मुळेंहि प्राचीन काळांत आहेत. प्राचीन ज्यू नैतिक नियमांचा आग्रह धरीत, जग हें ईश्वरशासित व शिस्तबद्ध आहे असें मानलें जाई, आणि आम्ही ईश्वराचे खास आवडते आहों असा प्राचीन काळीं अहंकार बाळगला जाई. या सर्व गोष्टींचा वारसा आमच्याकडे आला आहे. अंतःकरण प्रेममय असावें, शेजाऱ्याला साहाय्य करावें, गरजवंतांबरोबर आपल्या धनाचा उपभोग घ्यावा, सर्व व्यक्ति ईश्वरस्वरूप मानाव्या ही बायबलची परंपरागत शिकवण आम्हांला मिळाली असून तीच आमच्या इतिहासाची प्रेरक शक्ति व आमच्या अस्तित्वाची कारक शक्ति आहे असें आम्ही मानत आलों आहों.

रोमन लोकांची कायदा व सुव्यवस्था याबद्दलची प्रीति, भारतांतील अतींद्रिय ज्ञान्यांनीं प्रतिपादलेलें सर्व निसर्गाचें गूढ ऐक्य, आफ्रिकेचें संगीत, ज्या परदेशांत लोक न्यायासाठीं भुकेले होते आणि आपल्या सुप्तशक्ति वापरण्याच्या संधीसाठीं अधीर झाले होते अशा सर्व देशांतून आलेल्या वसाहतवाल्यांचा कणखरपणा व साहसी वृत्ति, या सर्व गोष्टींचा रांधा आमच्या जीवनांत झाला असून आजच्या नवजीवनांत उदित होणारी नवी आशा व नवी हिंमत हीहि यांत मिसळली आहे.

अटलांटिक किनाऱ्यावर ज्यांनीं पहिली वसाहत केली त्यांना आपण काय करीत आहों याची चांगली कल्पना होती. त्यांनीं तो प्रयोग विचारपूर्वक स्वीकारला होता. विल्यम ब्रॅडफर्डनें म्हटलें आहे, "एका लहानशा मेणबत्तीनें हजार मेणबत्त्या लावल्या जातील, येथें पेटलेल्या ज्योतीनें अनेकांना प्रकाशित केलें आहे, खरोखर आमचा सारा देश त्यामुळें प्रकाशित झाला आहे." अमेरिकन लोक हे आपलें राष्ट्र हा एक प्रयोग आहे असेंच मानतात. गेटिसबर्ग

येथें केलेल्या भाषणांत यादवीचा अर्थ समजून सांगतांना लिंकन म्हणाला, "लोकांचें, लोकांनीं, लोकांसाठीं चालविलेलें राज्य संकटांत टिकून राहतें कीं नाहीं याची ही कसोटीच होती."

औद्योगिक क्रांतीनें माणसाला त्याची जमीन, त्याचें कायमचें घर, आणि अमुक एक वस्तु संपूर्णपणें आपणच करतों अशी रोजगारी या सर्वांपासून दूर दूर नेलें. माणसाला जीवनांत बांधून टाकणारी साखळी औद्योगिक क्रांतीनें तोडून टाकली. घर, निसर्ग, ऋतु, सुपीक जमीन इत्यादि ज्या प्रतीकांतून जीवनाचें महत्त्व अनुभवतां येत होतें, तीं प्रतीकें औद्योगिक क्रांतीनें निरर्थक करून टाकलीं. पण या प्रतीकांचा पूर्वीचा अर्थ आतां आम्ही पुन्हा निर्मीत आहों. विज्ञानाचा विकास, जॉन ड्यूईचें तत्त्वज्ञान, उद्योगधंद्यांच्या सामाजिक कर्तव्याची जाणीव, नवीन घरबांधणींतील लोकांच्या सामुदायिक गरजांची जाणीव, शाळांनीं मार्गदर्शनाच्या केलेल्या सोयी, या व अशा शेकडों मार्गांनीं आमची संस्कृति माणसाच्या कर्तृत्वाचा अर्थ संशोधीत आहे आणि प्राचीन काळीं, यंत्रपूर्वकाळीं माणसामाणसांत जें सहकार्य रूढ होतें तें परत आणण्याच्या मार्गांचा विकास करीत आहे.

अमेरिकनांना गटानें काम करण्याची नेहमीं आवड दिसते. मुळांत पहिला गट म्हणजे कुटुंब. तीच कुटुंबभावना आम्ही आमच्या टीममध्यें, क्लबांत, संघटनांत, राजकीय पक्षांत आणि इतर सर्व गटकार्यांत आणीत असतों. प्रत्येक समाज हा एका भावनात्मक संस्कृतीवर आधारलेला असतो. आणि भावना या बालपणच्या संस्कारांतून निर्माण होत असल्यानें व बाळपण हें मुख्यतः कुटुंबांत जात असल्यानें समाजाला आपली संस्कृति कौटुंबिक नात्यावर आधारावी लागते. एकादें गांव अथवा एकादी वसाहत ही सामाजिक गट असते. या गटांत कौटुंबिक भावनेची संस्कृति प्रसृत होत असते. आम्ही आमच्या कॉलेजाला विद्यामाता म्हणतों, चर्चला धर्ममाता म्हणतों, राष्ट्राला पितृभूमि म्हणतों, एकाद्या गुप्त संघटनेला बंधुमंडळ म्हणतोंः हें स्वाभाविकपणेंच घडतें. कुटुंबभावना व तिचें प्रतीक आपला गांव, राष्ट्र व जग येथपर्यंत पोंचविणें ही लोकशाहीची तर्कशुद्ध परिणति आहे. कारण सामाजिक विकासकार्यांत व्यक्तिमात्रानें सामील व्हावें अशी लोकशाहीची अपेक्षाच असते. आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें लोकशाही हा कांहीं एक केवळ राज्यप्रकार नव्हे. ती जीवनपद्धतीच आहे. स्कॉट फिट्झरल्ड म्हणतो, "अमेरिका म्हणजे अंतःकरणाची कर्तृत्वेच्छा." हें बोलणें भावनाप्रधानतेचें आहे असें कोणी म्हणेल तर अमेरिका भावनाप्रधान आहे असेंहि आपण कबूल करूं या.

प्रकरण अठरावें

# अमेरिका आणि जग

पांचशें वर्षांपूर्वी युरोपीयांना अचानक अमेरिकेचें अस्तित्व कळलें. तेव्हांपासून अद्भुत शक्तीचें बालक या दृष्टीनें युरोप अमेरिकेकडे पाहत आहे. किंवा त्या काळीं युरोपांत सरंजामदार वर्ग प्रबळ होते ही गोष्ट लक्षांत घेतां अमेरिकेकडे युरोपीय राष्ट्रें एक सुंदर तरुणी म्हणून पाहत होते असें अधिक खरेपणानें म्हणतां येईल. शूर पुरुषांना तिचीं स्वप्नें पडलीं, त्यांनीं तिची प्रेमयाचना केली, तिच्यासाठीं युद्धें केलीं, तिच्यासाठीं आपलीं जीवितें धोक्यांत घातलीं, ती आपल्या हातीं आल्याचा आनंद मानला, तिच्या भयानक मगरमिठींत कित्येकांनीं प्राणार्पण केलें. चारशें वर्षें युरोपचा इतिहास अमेरिकेनेंच अस्वस्थ केला. पहिल्यानें युरोपीयांनीं अमेरिकेचा ताबा मिळविण्याची हाव धरली आणि नंतर निदान तिचा कृपाप्रसाद वांटून घेण्यासाठीं युरोपीय राष्ट्रें झगडलीं.

१५८८ सालीं स्पेनच्या आरमाराचा ब्रिटननें पराभव केल्यानंतर अमेरिकेच्या नव्या जगावर एकट्यानेंच ताबा चालविणें स्पेनला अशक्य झालें. तेव्हां स्पेननें अमेरिकेचा ताबा मिळवूं इच्छिणाऱ्या आणखी कांहीं राष्ट्रांची मदत घेतली. पण ही अमेरिकन सुंदरी आपल्या एकट्याच्याच मालकीची राहावी अशी हाव युरोपीय राष्ट्रांना सुटून फ्रान्स, स्पेन, इंग्लंड, हॉलंड वगैरे राष्ट्रांनीं या सुंदरीला आपली एकट्याची धर्मपत्नी बनविण्यासाठीं युद्धें केलीं.

शेवटीं इंग्लंडनें उत्तर अमेरिकेचा ताबा मिळविला व दक्षिण अमेरिका आपणांस मिळवितां येणार नाहीं अशी ब्रिटनची खात्री झाली. तेव्हां ही अमेरिकन सुंदरी एकच नसून त्या जुळ्या दोन आहेत असा 'शोध लागला'. त्यांतली थंड स्वभावाची (उत्तर अमेरिका) ब्रिटनच्या हातीं पडली आणि उबदार होती ती लॅटिन स्पेनच्या हातीं गेली. या विवाहापासून झालेल्या अपत्यांनीं (कानडा हा

अपवाद) कालांतरानें पित्याला घरांतून हुसकून लावून घराचा ताबा घेतला. पण अजूनहि आपल्या पूर्वजांच्या खुणा त्यांच्या ठिकाणीं दिसून येतात.

इंग्रजांना अमेरिकेंत सोनें मिळेल अशीं स्वप्नें पडत होतीं. पण व्हर्जिनिया व न्यू इंग्लंड येथें त्यांना फक्त वाळू, कॉड मासा व नाकाला झोंबणारें तंबाखू नांवाचें तण सांपडलें. यामुळें इंग्रजांना या अमेरिकन साहसांत फार नुकसान झालें असें वाटून पुढें एक शतकभर त्यांनीं दक्षिण अमेरिकेवर डोळा ठेवला होता. पण त्यानंतरच्या पुढल्या पिढीची दृष्टि बदलली. उत्तरेंतल्या जमीनीचा कठोरपणा हें आपणांस आव्हान असून लक्षावधि एकरांचीं मोकळीं मैदानें हें आपलें स्फूर्तिस्थान आहे असें त्यांनीं मानलें. दक्षिण विभागांतील तंबाखूची लागवड ही त्यांना सोन्यापेक्षां अधिक मूल्यवान् ठरली. पूर्वेकडल्या लहान लहान नद्यांच्या कांठीं गिरण्या, कारखाने उभारले गेले. पश्चिमेकडे छोट्या छोट्या वसाहती पसरत गेल्या त्या अगदीं पॅसिफिक किनाऱ्याला भिडल्या.

पहिल्यानें जे युरोपीय अमेरिकेंत आले त्यांना धोके पुष्कळ आले. पण नंतर युरोपीयांच्या झुंडीमागून झुंडी वसाहतीसाठीं आल्या त्यांनाहि पुष्कळ धोके पत्करावे लागले. त्यांनीं अनेक खेडीं व शहरें वसविलीं. आतां ही लोभनीय सुंदरी राहिली नसून त्या नववसाहतवाल्यांची ती आदरणीय माता होती. तिच्याकडून अधिकाधिक पोषण मिळविण्याची या वसाहतवाल्यांची भूक सतत वाढतच गेली.

अमेरिकेबद्दलची वर वर्णिलेली ही परीकथा निव्वळ कविकल्पना मानण्याचें कारण नाहीं. अमेरिकेच्या पहिल्या वसाहतवाल्यांचीं स्वप्नें अगदीं अशींच होतीं. जॉन डॉन, वॉल्टर रॅले, वगैरे लेखकांनीं व कवींनीं अमेरिकेचें वर्णन प्रियतमा, माता वगैरे शब्दांनींच केलें आहे. न्यूयॉर्क बंदरांत 'स्वातंत्र्या'चा पुतळा स्त्रीचा असून एमा लाझरू या कवयित्रीनें अमेरिका ही निर्वासितांची माता होय असेंच तिचें वर्णन केलें आहे.

विसाव्या शतकांतहि बालकांचें पोषण करणाऱ्या मातेची भूमिका अमेरिकेनें चालू ठेविली आहे. कारण अमेरिकेच्या भूमींतून इतकी संपत्ति निघत आहे कीं जगांतील सर्व राष्ट्रांना ती आतां वांटून घेतां येत आहे. पण अलीकडे दुसऱ्या महायुद्धापासून (तें शेवटलें ठरो) अमेरिकेच्या या स्त्रीभूमिकेंत बदल झाला असून अमेरिका पुरुष झाली आहे.

या अमेरिकन पुरुषानें आतां मूठ वळली असून बलवान् प्रेमिकाप्रमाणें तो आतां बाकीच्या जगाचें प्रियाराधन करतो आहे. शतकानुशतकें युरोपशीं स्नेह करण्याचें नाकारल्यानंतर आतां युरोपचें पाणिग्रहण करण्याची भूमिका या

अमेरिकन महापुरुषानें घेतली असून युरोपसुंदरीचें रक्षण करण्यासाठीं तिच्याशीं लग्न करण्याचा आग्रह त्यानें धरला आहे. पण अमेरिकन महापुरुषाचा हा आग्रह जितका अधिक तितकी ही युरोपीय वधू त्याला अधिक बिचकते आहे. या प्रियकर म्हणविणाऱ्याचा हेतु दुष्ट तर नाहीं ना? मध्ययुगांतील सरंजामदाराप्रमाणें हा एक दुष्ट राक्षस तर ठरणार नाहीं ना?

## शांततेचा शोध

अमेरिकेला सुंदरी मानण्याची संवय झालेल्या युरोपच्या सुसंस्कृत लोकांना आपणावर आतां लोभनीय सुंदरी होण्याची पाळी आली यामुळें सारी उलथापालथ झाल्यासारखें वाटत आहे. आजवर पँट्स घातल्या तेथें आतां झगे घालण्याची पाळी आली, धनकोचा ऋणको झाला, हा सत्तीचा पालट युरोपीयांना आवडत नाहीं. आपली आदर्श सुंदरी अचानक दाढी, पीळदार शरीर आणि चिलखत घालून उभी ठाकलेली त्यांना आतां पाहवत नाहीं.

अमेरिकेकडे जग जोंवर मातृभावनेनें पाहत होतें तोंवर अमेरिकेची ती नैतिक भूमिका युरोपीयांना पसंत होती. जुलुमास विरोध करण्यासाठीं, सर्व राष्ट्रांना स्वयंनिर्णय मिळावा यासाठीं, व्यक्तीचे हक्क रक्षिण्यासाठीं, लोकशाही सरकारसाठीं, सर्वांना न्याय व समता मिळावी यासाठीं क्रांति घडवून आणण्याचे आम्ही पुरस्कर्ते होतों. कित्येक वर्षें अमेरिका ही जगाची मूर्तिमंत सदसद्विवेकबुद्धीच होती. आम्ही आक्रमणाचा निषेध करीत होतों, सर्वत्र स्वातंत्र्यलढ्याला आम्ही प्रेरणा देत होतों, ज्या देशभक्तांना स्वदेशांतून पळून वनवासांत जावें लागे त्यांना आम्ही आश्रय देत होतों, राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यांना अमेरिकन डॉलर्सचें साहाय्य देत होतों. त्याचबरोबर वॉशिंग्टनचा आदेश व मन्रो तत्त्वाचें धोरण या अनुसार आम्ही जगाच्या भांडणापासून दूर राहत होतों.

आम्ही जरी अविचारानें स्पॅनिश युद्धांत पडलों व अचानक आमचे हातपाय पॅसिफिक ओलांडून फिलिपाइन्सपर्यंत पोंचल्याचें आम्हांस आढळून आलें, तरी पण साम्राज्यवादाच्या दिशेनें आम्ही घसरल्याबद्दल आमची आम्हांला शरम वाटली व आम्हीं जिंकलेल्या मुलुखांना 'कॉलनीज्' असें आम्हीं कधींच म्हटलें नाहीं. लवकरच फिलिपाइन्सना स्वातंत्र्यासाठीं सिद्ध करण्याची भाषाहि आम्ही बोलूं लागलों. चीनमधील बॉक्सरबंड प्रकरणीं आम्ही युरोपियन पद्धतीच्या साम्राज्यवादांत सांपडलों तेव्हां चीनकडून मिळालेला नुकसानभरपाईचा पैसा आम्हीं अमेरिकेंतील चिनी लोकांच्या शिक्षणासाठीं खर्चून टाकला.

अमेरिकेच्या दोन्ही खंडांतल्या इतर राष्ट्रांशीं आम्ही 'सज्जन शेजारी' या धोरणानें वागून अनेक अमेरिकन राष्ट्रांशीं स्नेहाचे करार केले. फिलिपाइन बेटें स्वतंत्र करण्याची योजना आम्हीं तडीस नेली. आम्ही एक वेळ अंकित राष्ट्र (कॉलनी) होतों याचें स्मरण ठेवून आम्हीं अंकित राष्ट्रांना सहानुभूति दाखविली, आमचे हेतु शांततेचे आहेत हें सिद्ध करण्यासाठीं १९२० व १९२१ सालीं आम्हीं आमची आरमारी शक्ति खची करून घेतली, आमच्या हितसंबंधांच्या रक्षणासाठीं रणशक्ति वापरायची नाहीं हें आम्हीं मान्य केलें (मॉंटीव्हीडो कॉन्फरन्स १९३३ व ब्यूनॉस आयर्स कॉन्फरन्स १९३६), ग्वाम व फिलिपाइन बेटांना तटबंदी करणार नाहीं (१९२२ व १९३०) अशी आम्हीं कबुली दिली, या व अशा अनेक कृतींनीं व धोरणांनीं आम्हीं लहान राष्ट्रांचें स्वातंत्र्य व आंतरराष्ट्रीय शांतता या संबंधानें आमची इच्छा इतकी तीव्र असल्याचें सिद्ध केलें कीं त्यासाठीं आमची शक्ति व सुरक्षिततताहि आम्हीं कमी करून घेतली.

१९३०–४० या काळांत आम्हीं परस्परदेवघेवीचे व्यापारी करार करून जागतिक अर्थसंघटना बलवान् करण्याला मदत केली. १९३९ सालीं कॉर्डेल हल यानें रिपोर्ट केला कीं, जगांतील आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तीनचतुर्थांश हिस्सा ज्यांनीं व्यापला आहे अशा एकोणीस राष्ट्रांशीं आमचे व्यापाराचे करार झाले होते. यामुळें आमच्या जकातीच्या भिंती फुटल्या नाहींत तरी पण त्या वाढण्याच्या थांबून कमी होऊं लागल्या.

दरम्यान जगांत शांततेची हमी निर्माण करण्यासाठीं एकीमागून एक योजना आम्ही स्वीकारीत होतों. त्या योजना व्यर्थ ठरल्या व त्या दुराग्रहाच्याच होत्या असें आतां आढळून येत असलें तरी पण आमचें स्वातंत्र्य व आमचा राज्य-प्रकार संरक्षिण्याखेरीज इतर कोणत्याहि कारणासाठीं युद्ध करणें हा गुन्हा आहे व तो टाळला पाहिजे अशी आमची खोल भावना आहे असें आम्हीं सिद्ध केलें. "चांगलें युद्ध व वाईट तह ही अशक्य गोष्ट होय" असें तत्त्व स्वयंसिद्ध म्हणून आम्ही मानूं लागलों.

१९२८ सालीं आम्हीं केलॉग-ब्रियाँ करार केला. तो अमेरिकेच्या शांतिमोहिमें-तूनच निर्माण झाला असून अमेरिकेसुद्धां साठ राष्ट्रांनीं युद्ध हें बेकायदा आहे या तत्त्वास संमति दिली. आक्रमक राष्ट्रें स्वतः शस्त्रवाढ करीत असतां पहिल्या महायुद्धाबद्दल आम्हीं आमच्या शस्त्रास्त्रनिर्मात्यांनाच दोष दिला. न्यूट्रॅलिटी ॲक्ट मंजूर करून आम्हीं जर्मनी व जपान यांच्या भक्ष्य राष्ट्रांना शस्त्रें देणार नाहीं असें जणूं आश्वासनच जर्मनी व जपान यांना दिलें आणि त्यांना त्यांच्या

आक्रमणांत उत्तेजनच दिलें. जपाननें मांचूरिया जिंकला तेथपासून जर्मनीनें पोलंडवर आक्रमण केलें तेथपर्यंत अमेरिकेनें युद्धापासून अलिप्त राहण्याचा जो निर्धार केला त्यामुळें आक्रमक धीट झाले आणि त्यामुळेंच पुढें जागतिक युद्ध भडकलें.

दोन महायुद्धांच्या दरम्यान जगांतलें बलाढ्य राष्ट्र या नात्यानें आमच्यावर ज्या जबाबदाऱ्या पडत होत्या त्यांचा विचार वास्तववादी दृष्टीनें न करतां आम्ही कायदा व नीति यांच्या रेषेंत चाललों. आर्थिक उपायांनीं केवढी कामगिरी होते याचा विचार न करतां आम्हीं जकातीच्या उंचउंच भिंती उभारल्या व पूर्वीच्या मित्र राष्ट्रांना आमचीं कर्जें फेडूं दिलीं नाहींत. जपानच्या लोकांना अमेरिकेंत वसाहतीस येण्याला मज्जाव करून व जपानचा माल खरेदी करण्याचें नाकारून जपानला आपला माल खपविण्यासाठीं व कच्चा माल मिळविण्यासाठीं इतर बाजार शोधण्याची आम्हीं सक्ति केली, यामुळें जपानला आक्रमणाबाबत उत्तेजनच मिळालें.

आमच्या सामर्थ्यानेंच आम्ही इतके घाबरलों कीं आमच्याच हातून आक्रमण होण्याचा धोका उद्भवूं नये म्हणून आम्हीं आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या टाळल्याच. दारूला बंदी घालून दारूबाजी थांबविण्याचा आणि शस्त्रास्त्रें बेकायदा ठरवून युद्धें थांबविण्याचा जो प्रयत्न आम्हीं केला तो नैतिक कायद्यानें पाप जिंकण्याच्या उच्च भावनेनें केला. पुष्कळ लोकांनीं अमेरिकेच्या या नैतिक भावनेवर प्रतिकूल टीका केली आहे. पण टीकाकारांनीं लक्षांत ठेवावें कीं आमच्या ठिकाणीं आक्रमणाबद्दल इतका द्वेष नसता तर अखेरीस आक्रमकाविरुद्ध जी आम्ही प्रचंड तयारी केली तिला लोकमताचा पाठिंबा कधींच मिळाला नसता.

अमेरिकेंत सरकारच्या मुत्सद्दीगिरीच्या धोरणांना जेवढा लोकांचा पाठिंबा हवा असतो इतका दुसऱ्या कोणत्याहि देशांत हवा असत नाहीं. अमेरिकेंत राज्यकर्ता वर्ग नाहीं, मुत्सद्दीगिरीचा मक्ता असलेला गट नाहीं; आमचे आंतरराष्ट्रीय संबंध फारच विस्तारलेले असल्यानें सामान्य लोकांना त्यांतली सर्व गुंतागुंत कळत नाहीं. म्हणून वादाचे मुद्दे त्यांना समजेल अशा त्यांच्या भाषेंत मांडावे लागतात. म्हणून, परदेशीयांना जरी आमचे नैतिक युक्तिवाद चीड आणीत असले तरी त्याच भाषेंत आम्हांला बोलावें लागतें. पण त्याचमुळें आम्हांला आमची मुत्सद्दीगिरी दुर्बल व लहान राष्ट्रांच्या बाजूनें, स्वातंत्र्य मिळवूं इच्छिणाऱ्यांच्या बाजूनें, शांततेच्या बाजूनें आणि लोकांना उत्पन्नांतला न्याय्य वांटा मिळावा अशा प्रकारें अर्थविकास करण्याच्या बाजूनें वापरावी लागते.

## दुसरें महायुद्ध व नंतर

युरोपांत युद्ध सुरू झालें आणि फ्रान्सचा पाडाव झाला तेव्हां आमचें नैसर्गिक साथीदार जें ग्रेटब्रिटन त्याच्याबरोबर आम्हीं अटलांटिक करार केला. त्यांत स्वातंत्र्य, लोकशाही व आर्थिक आणि सामाजिक हक्क या तत्त्वांची आम्हीं प्रतिज्ञा घेतली. आजवर आम्हीं याबाबत कितीहि कमी यश मिळविलें असलें तरी हींच आमचीं आजवरचीं मार्गदर्शक तत्त्वें आहेत.

युद्ध संपण्याच्या वेळेपर्यंत आम्हीं आमच्या सैन्यावर केलेल्या खर्चाशिवाय मित्रराष्ट्रांना उधारउसनवार खातीं ९ सहस्र कोटि डॉलर्स दिले. रशियाचा स्नेह मिळवून रशियाला राष्ट्रकुटुंबांत सामील करून घ्यावा म्हणून आम्हीं अटलांटिक कराराचा भंग करून व आमच्या ध्येयांचाहि त्याग करून बाल्टिक राष्ट्रें, पोलंडची पूर्व सरहद्द, रशियाचें बाल्कन्स व मांचूरिया या प्रदेशांतील वर्चस्व इत्यादि प्रश्नांवर रशियापुढें नमतें घेतलें. हिटलरचीं सैन्यें रशियाला मागें मागें हटवून रशियाचा मुलुख जिंकीत चाललीं असतां रशियानें मदत मागेपर्यंत ती देण्याचें टाळून पुढें आमच्या अटींवर आमच्या सोयीप्रमाणें आम्ही ती देऊं शकलों असतों. पण आम्हीं अधिक औदार्याचा मार्ग पत्करला आणि तोच मार्ग अधिक स्वाभिमानाचा आहे असें आम्हांस वाटलें.

युद्ध संपतांच घाईघाईनें आम्हीं आमचीं सैन्यें बरखास्त केलीं, नियंत्रणें काढून टाकलीं, युद्धकाळच्या संघटना मोडल्या आणि, आम्हांला वाटलें कीं, आम्हीं प्रयत्नानें मिळविलेल्या शांततेच्या काळखंडाकडे चाललों आहों. आम्हांला त्यामुळें फार समाधान वाटलें. ॲटमशक्तीचा वापर साऱ्या जगासमवेत करण्याची आम्हीं तयारी दर्शविली आणि ॲटॉमिक युद्ध हें बेकायदा ठरविण्याची ॲचेसन लिलिएंथॉल यांची सूचना पुरस्कारून शांततासंस्थापनेसाठीं फार मोठी सवलत देण्याचें आम्हीं मान्य केलें. पण रशियन सरकारनें आमची सूचना नाकारून तिच्या-ऐवजीं एक अगदीं उपहासास्पद सूचना केली.

दरम्यान रशियनांनीं भराभर आपलें साम्राज्य पसरविण्याचा उद्योग आरंभला. त्यांनीं बाल्टिक राष्ट्रें गट्ट केलीं, पूर्वजर्मनी आपल्या अमलाखालीं आणला, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, बल्गेरिया, रुमानिया व अल्बानिया या राष्ट्रांना घशांत घातलें. त्यामुळें रशियाच्या वर्चस्वाखालीं ३ लक्ष ९२ हजार चौ. मैल नवीन मुलुख आला व ९ कोटि लोकसंख्या त्यांना आपल्या वर्चस्वाखालीं मिळाली. याच काळांत अमेरिका फिलिपाइन्सना स्वातंत्र्य देण्याचें आपलें वचन पूर्ण करीत

होती, याच काळांत ग्रेट ब्रिटननें भारत, पाकिस्तान, सिलोन व ब्रह्मदेश यांच्या स्वातंत्र्यास संमति दिली, इंडोनेशियाला हॉलंडपासून स्वातंत्र्य मिळालें. या क्रांतीनें ५५ कोटि ५० लक्ष लोकसंख्या व २८ लक्ष ९४ हजार चौ. मै. मुलुख स्वतंत्र झाला.

अमेरिकेनें पूर्वीं ज्या परिषदा सुरू केल्या होत्या त्यांतून संयुक्त राष्ट्रसंघटना जन्मास आली. पूर्वीच्या राष्ट्रसंघाला शांतता व सुरक्षितता स्थापतां आली नाहीं, तें काम आतां संयुक्त राष्ट्रसंघटना करील अशी आशा अमेरिकनांनीं बाळगली. पण शेजारी राष्ट्रांना गट्ट करून दूरच्या राष्ट्रांतील सरकारें उलथून पाडण्याच्या रशियाच्या धोरणामुळें अमेरिकेची ही आशा सफळ होणें अशक्य झालें. तसेंच आंतरराष्ट्रीय राजकारणांत इतर राष्ट्रांशीं सहकार्य करण्याची जशी रशियाची इच्छा नव्हती तशीच आर्थिक बाबतींतहि (विविध यूनो संघटनांमार्फत) इतर राष्ट्रांशीं सहकार्य करण्याची रशियाची इच्छा नाहीं असें आढळून आलें.

१९४७ सालीं तुर्कस्तान व ग्रीस यांना आपण साहाय्य करूं शकत नाहीं असें जेव्हां ग्रेट ब्रिटननें जाहीर केलें तेव्हां आमच्या सामर्थ्यामुळेंच ती जबाबदारी ताबडतोब आमच्या अंगावर घेणें आम्हांला भाग पडलें. ट्रुमन सिद्धांत अमलांत आला आणि आमच्या परराष्ट्रधोरणांत एकदम फार मोठा फरक झाला. आता आपल्या आरामशीर सरहद्दींच्या आंत आम्ही सुखानें राहूं शकूं ही फसवणूक आम्ही आमची करणें अशक्य झालें. आतां ब्रिटन सातासमुद्रावर पाहरा करून आंतरराष्ट्रीय सामर्थ्याचा ताजवा समतोल राखील अथवा संयुक्तराष्ट्रसंघटना सर्व संकटप्रसंगीं तोंड देईल अशी अपेक्षा आम्हांला करतां येईना. जोंवर रशियाचें धोरण साम्राज्यविस्ताराचें आणि सर्वत्र बंडें व असंतोष माजविण्याचें आहे तोंवर अमेरिकाच रशियन चढाईला पायबंद घालूं शकेल. "सशस्त्र स्वदेशी अल्पसंख्य लोक अथवा परकी राष्ट्र एकाद्या राष्ट्राला गुलाम करीत असतां त्या राष्ट्रांतील स्वातंत्र्यवादी लोक जर आक्रमणाला प्रतिकार करीत असतील तर त्यांना साहाय्य देणें हें अमेरिकेचें धोरण असलें पाहिजे" हें ट्रुमन सिद्धांताचें सार आहे.

युरोपवरील आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठीं अमेरिकेनें मार्शल योजना हातीं घेतली. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांना इतिहासांत आजवर केलेल्या कोणत्याहि मदतीपेक्षां ही मदत अधिक मोठी होती. या योजनेचा फायदा ज्या राष्ट्रांना व्हायचा होता त्या राष्ट्रांवर उपकाराचें ओझें लादावें असा या योजनेचा हेतु नसून स्वतःचें हित साधणें त्यांना शक्य होईल अशा प्रकारें त्यांना साहाय्य करणें एवढाच त्या योजनेचा हेतु होता. यांत आमचाहि स्वार्थ होता. कारण

साऱ्या जगांत निर्दोष अर्थसंघटना अंमलांत येणें हें आमच्या सुरक्षिततेसाठींहि अवश्य होतें.

१९४७ सालींच आम्ही संरक्षण खातें स्थापन करून आमचीं सशस्त्र दळें अधिक बलवान् केलीं आणि पश्चिम गोलार्धातील अनेक राष्ट्रांशीं आम्हीं संरक्षण-करार केले. पुढील कांहीं वर्षांत आम्हीं संरक्षण करारांचें क्षेत्र युरोपांतील आणखी कांहीं राष्ट्रें व पॅसिफिक राष्ट्रें येथपर्यंत वाढविलें. १९४८ सालीं झेकोस्लोव्हाकियांत कम्युनिस्टांनीं सत्ता बळकावली. झेकोस्लोव्हाकियाच्या सरहद्दीजवळ फार मोठें रशियन सैन्य असल्यानें झेक कम्युनिस्टांना सत्ता बळकावतां आली. त्यानंतर आमची संरक्षणयोजना मजबूत करणें आम्हांला टाळतां येणार नाहीं अशी आमची खात्री झाली. कारण लोकसंख्येच्या प्रमाणांत रशियाचें लष्करी दळ आमच्या साडेतीन पट होतें.

यानंतर कोरियावर हल्ला झाला. त्यामुळें जगावर आपलें प्रभुत्व स्थापण्याच्या कम्युनिस्टांच्या योजनेनुसार ते कोठेंहि युद्धाचा धोका निर्माण करतील ही गोष्ट स्पष्ट झाली. यावेळीं अमेरिकेनें ताबडतोब प्रतिकार सुरू केला, यूनोनेंहि ताबडतोब पाठिंबा दिला आणि कम्युनिस्ट दहशतीस तोंड देण्यांत आलें.

खरोखर अमेरिकेचा जन्मच पारतंत्र्य नष्ट करण्याच्या युद्धांत झाला आणि दक्षिण अमेरिका खंडांत, फिलिपाइन्समध्यें व इतर अनेक प्रदेशांत अमेरिका स्वातंत्र्यवाद्यांची पाठीराखी ठरली आहे. उलट रशिया आपल्या सर्व भोंवतालच्या राष्ट्रांचें स्वातंत्र्य बरबाद करीत आहे. तरी पण अमेरिका हीच साम्राज्यवादी आहे असें दाखविण्याचा प्रयत्न रशिया करतो. एक गोष्ट खरी कीं युरोपांतील मित्रराष्ट्रांचें सामर्थ्य वाढवत असतां अल्जीरियासारख्या अंकित राष्ट्रांबद्दल आम्ही फारशी हाल-चाल करीत नव्हतों. कारण अल्जीरियाचा विचार करतांना अल्जीरियांत जन्मलेल्या युरोपीय नागरिकांच्या हितसंबंधांचा विचार करणें अवश्य होतें. तरीपण कोणाहि निःपक्षपाती निरीक्षकाला मान्य करावें लागेल कीं गेल्या दहा वर्षांत पश्चिमी राष्ट्रें जगांतील लोकांच्या स्वातंत्र्याला साहाय्य देत असतां रशिया परराष्ट्रांना गुलाम करीत आहे आणि जेथें प्रतिकार होतो तेथें त्या लोकांना नेस्तनाबूद करीत आहे.

आपले शत्रु शस्त्रत्याग करतात हें पाहून आक्रमक हे आक्रमणापासून मागें सरत नाहींत हा अतिशय कटु अनुभव आल्यानंतर अमेरिकनांनीं अखेरीस स्वतःचें भरपूर रणसामर्थ्य तयार ठेवून आणि आर्थिक सामर्थ्य मित्रराष्ट्रांसमवेत वांटून घेऊन आक्रमणास तोंड द्यायचें असें आपलें धोरण निश्चित केलें आहे. जग जिंकण्याचा रशियाचा जो बेत दिसतो त्याला विरोध करणाऱ्यांच्या स्वातंत्र्याचें

रक्षण करण्याची हमी देणें हा यांत अमेरिकेचा हेतु आहे. पण अमेरिकनांना आश्चर्य वाटतें तें हें कीं हा मोठ्या खर्चाचा व अवघड निर्धार अमेरिकेनें करतांच अमेरिकेच्या हेतूबाबत संशय घेण्यांत येऊं लागला. अमेरिकेनें युद्धांत पडण्याची तयारी ठेविली नाहीं म्हणून दोन्ही महायुद्धांचा दोष अमेरिकेकडे जातो असें पूर्वी मानण्यांत येई. पुढें आपण सामर्थ्यवान् राहून युद्ध टाळण्याची जबाबदारी अखेरीस आपणांवरच येऊन पडली आहे हें अमेरिकेनें ओळखलें. पण आतां अमेरिकाच युद्धखोर असल्याचा आरोप अमेरिकेवर येऊं लागला आहे.

तरी जग हें युद्धविरहित करायचें असें अमेरिकेचें आवडतें स्वप्न असल्यानें अमेरिकेनें शस्त्रसंन्यासाचे करार करण्याचा पुनः पुनः प्रयत्न केला. प्रथम अॅटॉमिक युद्ध बेकायदा ठरविण्याची सूचना केली. नंतर लष्करी तळ तपासण्याचा कार्यक्रम ठरविण्याची सूचना केली. कारण अशा तपासणीवांचून शस्त्रसंन्यासाचा करारच व्यर्थ होता. वर्षोगणती चिकाटीनें वाटाघाटी करण्यांत आल्या. पण रशिया कोणत्याहि प्रामाणिक तपासणीस तयार नाहीं हें कळून येण्याहून अधिक फळ त्या प्रयत्नास मिळालेंच नाहीं.

अमेरिकेच्या इतिहासांत एक गोष्ट स्पष्ट आहे कीं सोव्हिअट रशियानें फिन्लंडवर व पोलंडवर आक्रमण करण्याच्या जशा योजना केल्या तसें अमेरिकेनें कधींहि, कांहींहि केलें नाहीं. जुन्या काळच्या आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरींत तिसऱ्याच राष्ट्राचें बलिदान करून एकादें काम उरकण्याची रीत असे तसेंहि अमेरिकेनें कधीं केलें नाहीं. (याल्टा करारांत रशियाला मांचूरियावर प्रभुत्व चालवूं देण्याला अमेरिकेनें संमति दिली त्यामुळें पुष्कळ अमेरिकनांना शरम वाटली. पण अखेरीस चीननें रशियाला मांचूरियावर जें प्रभुत्व दिलें तें अमेरिकेनें केलेल्या शिफारसींपेक्षां फारच अधिक होतें.)

अमेरिका फार मोठी उत्पादनशक्ति असण्याला महत्त्व देते. म्हणून युद्धानें येणारी हुकुमशाही, कर्ज, करांचें फार मोठें ओझें, संपत्तीचा विध्वंस या गोष्टी अमेरिकन संस्कृतीला गुन्ह्यासारख्या वाटतात. उद्योगधंद्यांना मोठे नफे हवे असून युद्धानें ते नफे मिळतात म्हणून धंदेवाल्यांना युद्धें हवीं असतात असें म्हटलें जातें. पण येथें एक गोष्ट सांगतों कीं अमेरिकेंत युद्ध करारांची फेरपाहणी होते, त्या फेरपाहणीनंतर दुसऱ्या महायुद्धाच्या कंत्राटांतील नफ्यापैकीं १०४३ कोटि १६ लक्ष ३७ हजार डॉलर्स त्या कंत्राटदारांनीं सरकारला परत दिले. बाकीच्या नफ्यावरहि, शांततेच्या काळच्या नफ्याच्या पातळीवरील नफ्याबाबत,

९५ टक्के कर लादलेले होते. शिवाय खाजगी व्यक्तींना जे नफे वांटण्यांत आले त्यावरहि वरच्या-वरच्या उत्पन्नावर चढ्या दराचे कर लादलेले होते.

सशस्त्र आक्रमण हें राजकीय उद्दिष्टाचें एक साधन होय असें मानणाऱ्या विरोधकाशीं वागतांना अमेरिकेला परिस्थिति कांहींशी प्रतिकूल असते. कारण अमेरिकेच्या डोक्यांत हा विचार कधींच शिरत नाहीं. युद्ध हें राजकीय धोरणाचें साधन होय हा विचार अमेरिकनांच्या मनाला कधीं शिवतहि नाहीं. असें धोरण अवलंबणाऱ्या अमेरिकन सरकारला लोकमताचा पाठिंबा कधींच मिळत नाहीं. म्हणून विरोधकानें आक्रमणाच्या दिशेनें पहिलें पाऊल टाकीपर्यंत अमेरिकन सरकारला हात जोडून स्वस्थ बसावें लागतें.

आमची जगांतील भूमिका नैतिक आहे असें आम्ही मानीत आलों आहों. म्हणून ज्या राष्ट्रांचीं अंतर्गत धोरणें स्वातंत्र्यविरोधी असतात अशा राष्ट्रांना मित्र म्हणून मान्यता देणें आम्हांला फार अवघड जातें. पण हिटलर व मुसोलिनी बेताल झाले होते त्यावेळीं त्यांना कोंडण्यासाठीं ज्याप्रमाणें अमेरिकेनें रशियाशीं सख्य केलें त्याप्रमाणें रशियाला कोंडण्यासाठीं दुसऱ्या एकाद्या स्वातंत्र्यविरोधी राष्ट्राशीं सख्य करणें हें अमेरिकेला अपरिहार्य होतें.

शिवाय आम्हांला असें परराष्ट्रधोरण अवलंबावें लागतें कीं ज्याला जगाच्या सर्व भागांतून येथें वस्तीला आलेल्या जनतेचा पाठिंबा मिळेल. विदेशीभाषी गटांच्या कांहीं खास मागण्या असतात. उदाहरणार्थ, अमेरिकन-पोलिश असोसिएशन्सच्या कोऑर्डिनेटिंग कमिटीनें अमेरिकन सरकारकडे अशी मागणी केली होती कीं सोव्हिअट रशियाच्या अंकित असणाऱ्या सर्व राज्यांना दिलेल्या मान्यता काढून घेऊन त्या त्या देशांच्या वनवासांत असणाऱ्या राज्यांना आम्हीं मान्यता द्यावी. मजूर, धंदेवाले, शेतकरी, माजी युद्धसैनिक, स्त्रिया, धार्मिक गट या सर्वांचे हितसंबंध परराष्ट्रधोरणांत गुंतलेले असतात. यामुळें हे सर्व लोक आपापल्या बाजू वॉशिंग्टनमध्यें मांडत असतात.

परदेशीयांना अमेरिकेंत वसाहतीस येऊं देण्याबाबतहि पुष्कळ उलटसुलट शक्तींचें दडपण येत असतें. चालू शतकाच्या पहिल्या दोन दशकांत विदेशी वसाहतवाल्यांचा महापूरच येथें आला. जितक्या लोकांची सोय अमेरिका करूं शकेल त्यापेक्षां हे अधिक लोक आले होते. त्यामुळें कॉंग्रेसनें बरेचसे नियंत्रक कायदे केले. त्यांतला अगदीं अलीकडचा कायदा १९५२ चा मॅक्करन-वॉल्टर ॲक्ट हा होय. त्यानें कांहीं लायक व दुर्दैवी लोकांना अमेरिकेंत येण्याला मज्जाव केला आहे. हे लोक भूतकालांत दारिद्र्य व जुलूम यांतून सुटण्याचें एकमेव

आशास्थान म्हणून अमेरिकेकडे पाहत होते. यामुळें जुलूमग्रस्तांची पाठीराखीण अशी जी अमेरिकेची वंद्य मूर्ति जगापुढें आजवर होती ती आतां पुसट होऊं लागली आहे.

अनेक धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, मजूरवर्गीय वगैरे गटांनीं परदेशीयांना येथें येऊं देण्याचें धोरण अधिक उदार करावें अशी सतत मागणी केली असून त्यांच्या पाठिंब्यानें हल्लींच्या कायद्यांत बदल सुचविणारीं बिलें कॉंग्रेसमध्यें आलीं होतीं. हंगेरींतील कम्युनिस्ट हत्याकांडांतून निसटलेल्या निर्वासितांना आश्रय देण्यासाठीं खास व्यवस्था करण्यांत आली होती. पण जगाच्या सद्यःस्थितींत नवीन विदेशीयांना येथें वसाहतीसाठीं येऊं देण्याच्या धोरणाबाबत पुढील कांहीं वर्षें तीव्र मतभेद होणें अपरिहार्य आहे.

शंभरहून अधिक वर्षें जें राष्ट्र कोणत्याहि परराष्ट्रधोरणावांचूनच राहिलें आणि इतर राष्ट्रांना परराष्ट्रधोरणाचे धडे शिकण्याला कित्येक शतकें मिळालीं असतां तेच धडे ज्या राष्ट्राला एका रात्रींत शिकावे लागत आहेत त्या राष्ट्रांत परराष्ट्र-धोरणाबाबत वर दिल्या अशा अडचणी येणारच. पण परराष्ट्रधोरणाबाबत आम्ही आतां पुष्कळ प्रमाणांत उभयपक्षसंमत धोरण अवलंबत आहों. आणि साऱ्या जगांतील जनतेचें जीवनमान आणि व्यक्तिस्वातंत्र्य वाढविण्याला अवश्य त्या लढ्यासाठीं आमचीं नैतिक व भौतिक साधनें वापरण्याचा निर्धार अमेरिकन जनतेनें केला आहे.

१९४६ पर्यंत तटस्थतावाद हा एक आमचा अंगभूत दोष होता. आम्ही त्या दोषांतून अखेरीस सावध झालों. आतां उलट भारतासारख्या राष्ट्रांत तीच मनोवृत्ति वसत असलेली पाहून आम्हांला धक्का बसतो. पण आमचा स्वातंत्र्यलढा संपला व आपण जिंकलेल्या प्रदेशाचा विकास करणें एवढाच विचार आमच्या डोक्यांत होता, त्यावेळीं आम्ही ज्या विकासावस्थेंत होतों त्याच विकासावस्थेंत आज भारत आहे.

आम्हीं स्वतः फार मोठें नुकसान सोसून धोके व ताण पत्करले, तेव्हां आम्हांला साहाजिकच वाटतें कीं, या त्यागाचें बक्षीस प्रेम व सन्मान या स्वरूपांत आम्हांला मिळावें. आणि म्हणून आमचे मित्र जेव्हां कठोरपणें आमच्या जीवनपद्धतीवर टीका करतात, आमच्या कर्तृत्वाबद्दल संशय घेतात व आमच्या सामर्थ्याचा तिरस्कार करतात तेव्हां आम्ही आश्चर्यचकित होतों. आम्हीं फार उच्च दर्जाची वागणूक ठेवावी अशी युरोपची अपेक्षा असते. त्याचबरोबर आमचें कोठें थोडें पतन झालेलें दिसलें कीं युरोपीयांना आनंद होतो. पी. जी. वोरस्थॉर्न

लिहितो, "अमेरिकेनें युरोपची ढालहि व्हावें व सदसद्विवेकबुद्धीहि व्हावें, अथवा युरोपच्या गरजेप्रमाणें या दोहोंतलें कांहींहि व्हावें अशी युरोपची अपेक्षा आहे. उदाहरणार्थ, इंडोचीनबाबत आम्हीं आमची पारतंत्र्यविरोधी भूमिका मांडावी असा ब्रिटनचा आग्रह होता. पण इराणांत ध्येयवाद विसरून ब्रिटिश धोरणास पाठिंबा द्यावा असें ब्रिटनचें म्हणणें होतें."

अमेरिकन मुत्सद्दीगिरीबाबत आणखी एका अडचणीला आम्हांला तोंड द्यावें लागतें. आम्ही सर्व वाटाघाटी अगदीं उजेडांत करायच्या हें तत्त्वतः मान्य केलें आहे. अर्थात् वृत्तपत्रांना त्या कळाव्या लागतात. वृत्तपत्रें कलह व मतभेद यांवरच भर देतात आणि प्रत्येक परिस्थिति ही अमेरिकेचा विजय अथवा पराजय होय एवढ्याच दृष्टीनें तिजकडे पाहतात. पण वास्तविक मुत्सद्दीगिरी म्हटली कीं तींत तडजोड आलीच. खरोखर यूनोच्या संघटनांचे वृत्तांत जर अधिक तपशिलानें लोकांना कळतील तर वाटाघाटींनीं खूपच यश येतें हें लोकांना कळून लोकांचा वाटाघाटींवरचा विश्वास वाढेल.

## मदतीचे नवे कार्यक्रम

जागोजाग आक्रमणाची जी भीति आज उत्पन्न झाली आहे तीमुळें अमेरिका आर्थिक साहाय्याऐवजीं लष्करी सख्याचे करार व लष्करी खर्च यावर अधिक भर देत आहे. तरी पण युद्धानंतरच्या काळांत परराष्ट्रांना अमेरिकेकडून आर्थिक मदत ५ हजार ६०० कोटि डॉलर्सपर्यंत गेली आहे. हा आंकडा एवढा प्रचंड आहे कीं त्याचा पूर्ण अर्थबोधच होत नाहीं. याशिवाय परदेशांत खाजगी धंदेवाल्यांनीं एक हजार कोटि डॉलर्स भांडवल गुंतविलें आहे. पुष्कळदां हा पैसा ज्या देशाच्या हितासाठीं तें भांडवल दिलें त्या देशांतल्या भांडवलदारांकडूनच शोषला जातो. कित्येकदां हा पैसा आमच्याशीं सख्याचे करार न केलेल्या पण गरजू राष्ट्रांना दिला जाण्याऐवजीं अमुक राष्ट्र आमच्याशीं सख्य करारांत सामील झालें आहे एवढ्याचसाठीं त्याला दिला जातो. पण तरीहि एवढ्या प्रमाणांत परकीयांना मदत दिल्याचें उदाहरण माणसाच्या इतिहासांत नाहींच.

अमेरिकन मदतीनें युरोपीय उद्योगधंद्यांना जी प्रेरणा मिळाली तीमुळें युद्धापूर्वीपेक्षां युरोपीय धंद्यांचें उत्पादन ७० टक्क्यांनीं वाढलें आहे. अमेरिकन प्रवासी व सैनिक युरोपांत दरसाल तीनशेंवीस कोटि डॉलर्स खर्च करतात व त्याचे सुपरिणाम युरोपांतल्या प्रत्येक घरांत दिसून येतात. बार्बारा वॉर्ड ही ब्रिटनची अर्थपंडित म्हणते, अमेरिकेच्या मदतकार्यक्रमांनींच अमेरिकेला जागतिक

नेतृत्वाचा हक्क मिळाला आणि त्यामुळें जगांतल्या स्वातंत्र्यप्रिय माणसांची एकजूट राहिली.

फॉरेन ऑपरेशन्स ॲडमिनिस्ट्रेशनचा डिरेक्टर हॅरॉल्ड स्टॅसेन असतांना त्यानें लिहिलेल्या रिपोर्टांत म्हटलें आहे कीं, "आमचें 'तांत्रिक सहकार्य' (टेक्निकल कोऑपरेशन) हें फक्त एक नावीन्यपूर्ण नांव आहे, वास्तविक आमची ही ऐतिहासिक संवयच आहे. पूर्वी स्थिर झालेल्या वसाहतींत मिळालेलें ज्ञान नव्या वसाहतींत ऐच्छिक सहकार्यानें अंमलांत येई. मग ही वसाहत स्थिर होई आणि तींत मिळालेलें ज्ञान पुढल्या वसाहतीसाठीं उपयोगीं पडत असे. याच भावनेनें 'पॉइंट फोर'अन्वयें परदेशांत ज्या योजना अंमलांत येतात त्याअन्वयें आमच्या देशांतले तज्ज्ञ आणि इतर देशांतले तज्ज्ञ ऐच्छिक सहकार्यानें एकत्र येतात. याचे सुपरिणाम सर्वत्र दिसतात. जॉर्डनमध्यें उन्हामुळें रखरखीत असणाऱ्या एका वाळवंटांत आतां एक तलाव व हिरवेंगार गवत भरपूर निघतें, भारतांत गव्हाच्या उत्पादनाची वाढ पांचपट झाली आहे, इराणांत सुधारलेल्या शेतीचे प्रयोग दाखविले जात आहेत, ग्रामसुधारणायोजनांमुळें लोकांना सहकाराचें शिक्षण मिळालें आहे. बॉलिव्हियापासून लेबनॉन, पाकिस्तान, सयाम येथपर्यंत शेतकऱ्यांना आरोग्याच्या सोयी व पिण्याचें निर्दोष पाणी मिळालें आहे.

लेबनॉनमधील कार्यक्रमाच्या वर्णनांत म्हटलें आहे कीं अमेरिकेचें शास्त्रीय ज्ञान, तांत्रिक संशोधन व भौतिक प्रगति या गोष्टी अमेरिकन ध्येयवादासमवेत जो प्रवास करतात त्या प्रवासाचें वाहन 'पॉइंट फोर' हें आहे. माणसामाणसांत खराखुरा बंधुभाव निर्माण करावा ही अमेरिकेची आशा व आकांक्षा असून 'पॉइंट फोर'नें याच गोष्टी साधायच्या असतात.

अनेक चर्चेस, 'केअर', वर्ल्डनेब्रर्स यांसारख्या संस्था यांनीं लहान लहान साहाय्ययोजना पुरस्कारल्या आहेत. त्या लहान असल्या तरी आपलें वैभव व आपलें तांत्रिक ज्ञान जगासमवेत वापरावें ही जी अमेरिकनांची स्वयंस्फूर्त इच्छा तिच्या द्योतक अशा या योजना आहेत.

टोकिओच्या एपिस्कोपल विद्यापीठांत युद्धापूर्वी प्राध्यापक असलेला पॉल रश हा अमेरिकन समाजसेवक अमेरिकन औदार्याचें एक नमुनेदार उदाहरण आहे. युद्ध संपल्यावर तो जपानला परत गेला. तेथें अफाट वाढणारी लोकसंख्या आणि मर्यादित अन्नपुरवठा यामुळें ओढवत असलेलें संकट त्याला दिसलें. मग त्यानें स्वतःच एक प्रयोग करण्याचें ठरवून कियोसाटो हें डोंगरी खेडें त्यासाठीं निवडलें व तेथें K E E P (किओसाटो एज्युकेशनल एक्सपेरिमेंट प्रोजेक्ट) ही योजना

त्यानें अमलांत आणली. तेथें आतां एकोणीस प्रकारचा भाजीपाला होतो, सात प्रकारचें धान्य होतें, हेरेफोर्ड व जेर्सी जातीचीं गुरें तेथें आहेत, आधुनिक डेअरी आहे व हजारों कोंबड्या आहेत. पहिल्या गाई व कोंबड्या अमेरिकन मित्रांनीं दिल्या. ज्या प्रत्येक शेतकऱ्याला दहा कोंबड्या मिळाल्या त्यानें त्यांचीं दहा अंडीं उबवून दहा कोंबड्या दुसऱ्या शेतकऱ्याला देण्याचें मान्य केलें.

जीं माणसें थोड्याच दिवसांपूर्वीं अगदीं पोटापुरत्या अन्नावर जगत होतीं त्या माणसांच्या त्या खेड्यांत आतां एक चर्च, एक पुस्तकें वाचायला देणारी लायब्ररी व एक सर्व साधनयुक्त असें रुग्णालय आहे. सर्वांत अधिक चांगली गोष्ट म्हणजे एकमेकांना मदत करून स्वतांचा उत्कर्ष कसा करावा ही गोष्ट कियोसाटोचे लोक आतां शिकले आहेत. नवीन रस्ते तयार करण्यासाठीं दोनशें-दोनशेंच्या तुकड्या सहकार्यानें राबतात. एका अपंगांच्या वस्तींत एकदां अन्न संपलें. तेव्हां चारशें मुलें एकेक बटाटा देणगीदाखल घेऊन आलीं व त्यांनीं ४ बुशेल बटाटे दिले. पूर्वींच्या पांच शतकांत त्या गांवाची प्रगति झाली नसेल इतकी प्रगति पांच वर्षांत तेथें झाली. हजारों पाहुणे ही प्रगति पाहून गेले. जपानच्या डोंगराळ भागांत आतां अशा योजना सर्वत्र स्वीकारल्या जात आहेत.

ॲरिझोना राज्यांत फ्लॅगस्टाफ हें आठ हजार वस्तीचें गांव आहे. तेथें एक वृत्तपत्र जनतेला आवाहन करतें, "नोव्हेंबरमध्यें 'केअर' या संस्थेला द्यावयाच्या प्रत्येक डॉलराबरोबर नागरिकांनीं आणखी एक डॉलर द्यावा. त्या प्रत्येक डॉलरांतून अमेरिकन शेतीचा २२ पौंड माल पाठविला जाईल. त्यांत दुधाची भुकटी, चीज, तांदूळ, वाटाणे, आटा, कॉर्नमील इत्यादि माल असेल. संकटांत सापडलेल्या परदेशांतील एकोणीस प्रदेशांतल्या निर्वासितांना व बेकारांना यांतून साहाय्य मिळेल. परदेशांतील भुकी लोकांना खाऊं घालून परदेशांबद्दल आपला स्नेहभाव सिद्ध करण्याची ही संधि आहे." ही प्रत्येकीं बावीस पौंडाचीं पाकिटें ज्यांना मिळतात तीं माणसें फ्लॅगस्टाफच्या नागरिकांना कधींच दिसणार नाहींत. तरी पण ही देणगी देण्यांत त्यांना आनंद वाटतो. अशा आणखी पन्नासहून अधिक ऐच्छिक संस्था परदेशांना साहाय्य पाठवीत आहेत. यांपैकीं सर्वांत मोठ्या अशा दहा संस्थांनीं १९५६च्या पहिल्या सहामाहींत १६ कोटि २० लक्ष डॉलर्स मदत परदेशीं पाठविली.

एका धर्मगुरूनें आपल्या उपदेशांत श्रोत्यांना सांगितलें कीं "वैयक्तिक देणग्यांचें धर्मकृत्य हाच कम्युनिझमवर रामबाण उपाय आहे." या त्याच्या व्याख्यानांतून 'वर्ल्डनेबर्स' ही संस्था निघाली. ती संस्था आशिया व आफ्रिका

येथें आरोग्य, शिक्षण, शेती इत्यादि क्षेत्रांत विकासाचीं कामें करते, शेतकऱ्यांना शेती, हस्तव्यवसाय, आरोग्य, बालशुश्रूषा वगैरेबद्दलचे प्रयोग दाखवून शेतकऱ्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविते.

वर्ल्ड लिटरसी ही संस्था डॉ. फ्रँक लॉबॅश याच्या पद्धतीनें प्रौढांना लिहायला वाचायला शिकविते. पुस्तकें वाचून शेती, आरोग्य वगैरे बाबतींत स्वतःची प्रगति करणें, यामुळें शेतकऱ्यांना शक्य होतें. 'दि फॉस्टर पेरेंट्स प्लॅन फॉर वॉर चिल्ड्रेन', 'सेव्ह दि चिल्ड्रेन फेडरेशन', 'दि नॅशनल कमिटी फॉर ए फ्री यूरप', 'दि क्रूसेड फॉर फ्रीडम्', 'दि इंटरनॅशनल रेस्क्यू कमिटी' या व अशा अनेक संस्था परदेशांत मदत पाठविण्यासाठीं मोठमोठ्या रकमा ऐच्छिक तत्त्वावर जमा करतात.

कामगारसंघटना, विद्वन्मंडळें, रोटरी क्लबासारखीं सेवामंडळें अशा संस्थांचें अनुकरण करून आणखी अनेक ऐच्छिक संघटना अमेरिकेंत निघतील आणि परदेशांतल्या अशाच संस्थांशीं संघटना करून कार्य करतील तर जगांतील दुःखनिवारणाचें कार्य आणखी कितीतरी होईल. जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या जनतेंत जो एक जिव्हाळा निर्माण व्हावा लागतो तो सरकारी मुत्सद्द्यांच्या गांठीभेटींनीं होत नसून जगांतील लक्षावधि लोकांनीं एकमेकांना भेटलें पाहिजे, विचारविनिमय केला पाहिजे, एकमेकाशीं भावनात्मक संबंध जोडले पाहिजेत तर जगांत एकमेकाबद्दल समंजस आपुलकी व जिव्हाळा निर्माण होईल.

समजा कीं ही वैचारिक, वस्तुविषयक देवघेव वीस, तीस, पन्नास वर्षें अशीं चालू राहिली तर आज एकमेकांना एकमेकांचे शत्रु बनविणारे दुर्ग्रह नाहींसे होणार नाहींत काय? अमेरिकेंत 'कॉन्फेडरेशन'च्या (यादवीच्या) काळीं असेच वैरभाव, दुर्ग्रह होते ते पुढें गेलेच कीं नाहीं? आणि आज ज्याप्रमाणें आमच्या देशांतील शेकडों ऐच्छिक संस्था अमेरिकन सरकारवर नियंत्रण ठेवून त्यावर वजन पाडतात त्याप्रमाणें जगांतले लोक ज्या सर्व ऐच्छिक संस्था निर्मितील त्या संस्था संयुक्त राष्ट्रसंघटनेवर वजन पाडून तिचें नियंत्रण करूं शकतील अशी कल्पना करतां येणार नाहीं काय?

## जगासाठीं नवसंस्कृति

ज्या आजच्या जगांत रोज नवें संकट येत आहे त्या जगांत खराखुरा सामुदायिक अहंकार निर्मिण्यासाठीं अमेरिका काय करूं शकेल? आजच्या संकटांतच संधीहि आहे ही आजच्या जगाची अपूर्वता होय. ईश्वराची कृपा

आणि वैभवप्राप्तीची खात्री या गोष्टी हातीं असतांहि मानवनिर्मित कलहांनीं आम्हीं प्रगतीचा रस्ता बंद केला आहे. वास्तविक आतां भूक व आजार हीं संकटें दुर्लंघ्य नव्हेत. तरी आपण भांडत कां बसावें? चेस्टर बौल्स म्हणतो, "राष्ट्रीय स्वातंत्र्य, मानवी श्रेष्ठत्व, आर्थिक प्रगति आणि शांतता हीं चार क्रांतिकारक तत्त्वें होत." पोलादी पडद्याच्या कोणत्या बाजूला हीं चार तत्त्वें टिकाव धरूं शकतील या प्रश्नाचें अचूक उत्तर देण्याचे कामीं निःपक्षपाती अभ्यासकास काय अडचणी असाव्या हें सांगणें कठिण आहे.

मार्क्सवाद्यांजवळ जशीं सर्वरोगनिवारक अशीं सामाजिक पेटंट औषधें आहेत तशीं आमच्याजवळ नाहींत. पण यांतच लोकशाहीचें बळ आहे. कारण अमुक एक समाजव्यवस्था कोणावरहि लादण्याची इच्छा न बाळगतां आम्ही आरोग्य व आर्थिक सुस्थिति निर्माण करून लोकांना आपलीं ध्येयें स्वतःच ठरविण्याला अनुकूल संधि निर्मून देतों. यामुळें ज्याच्याशीं हस्तांदोलन करायचें त्याच्या हातांत त्याच वेळीं हळूच बेड्या न सरकवितां आम्ही मदत देऊं शकतों. रशिया बाहेरून क्रांति भडकवूं शकतो तसें आम्ही करूं शकत नाहीं. कारण मानवी हक्कांची हमी देणाऱ्या घटनेच्या आधारें केल्या जाणाऱ्या राजकीय चळवळींतूनच, अंतर्गत प्रयत्नानें सामाजिक व आर्थिक प्रगति होते हें आम्हांला आमच्या इतिहासानें शिकविलें आहे. पण अधिक अन्न व चांगलें अन्न, आरोग्य, फुरसत, शिक्षण, समता, संधि या साधनांनीं अधिकाधिक माणसांचें राहणीमान वाढवावें हा नित्यक्रांतीचा आराखडा आमच्या इतिहासानें आम्हांला घालून दिला आहे.

जगांत आम्हांला मान किती मिळावा ही गोष्ट आम्ही आमचे अंतर्गत प्रश्न आम्ही कसे सोडवितों यावर फार मोठ्या प्रमाणांत अवलंबून आहे. आमच्या येथली कर्तव्यच्युति व गुन्हेगारी, आमच्या गलिच्छ वस्त्या आणि औद्योगिक संस्कृतीवर तरंगणारी सामाजिक घाण हे आमच्या जीवनावरचे आमचे कलंक आम्ही कसे दूर करतों, आम्ही आमच्या सर्व नागरिकांना समान संरक्षण व समान सुखें देतां कीं नाहीं, जगांत आम्हांला आज जें उच्च स्थान आहे त्याला साजेल अशी परिपक्वता आणि जबाबदारीची जाणीव आम्हांला आहे कीं नाहीं या गोष्टी जगांत आम्हांला मान मिळण्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत. आम्ही स्वदेशांत एकमेकांशीं कसे वागतों याचा जगावर जेवढा परिणाम होईल तेवढा आंतरराष्ट्रीय स्नेहभावासंबंधानें आम्ही कांहींहि बोललों तरी होणार नाहीं.

अमेरिकन लोक आपलें वैभव जगाला वांटून जगासमवेत तें उपभोगण्याला

अतिशय आतुर असतात. पण त्याच वेळीं जगाला लोकशाहीचे धडे देण्याचा अधिकारहि आपणाला आहे असें मानून स्वतःच्या अडचणी वाढवितात. फ्रान्समध्यें व इंडोनेशियांत, ग्रीसमध्यें व फिन्लंडमध्यें ज्यांनीं स्वातंत्र्यासाठीं लढे दिले आहेत, त्यांना इतरांनीं लोकशाही शिकवायला नको. 'तुम्ही रशिया तरी पत्करा अथवा अमेरिका तरी पत्करा' असें आपण ज्याला त्याला आग्रहानें सांगू नये. जगापासून अलग राहण्यांत आपण एक शतकाहून अधिक काल घालविला. त्या काळापेक्षां आजच्या काळीं जगावर अधिक भयंकर संकट येऊं घातलें आहे हें खरें. पण आपलें भवितव्य घडविण्यासाठीं जे आंतरराष्ट्रीय तपासणीपासून अलग राहू इच्छितात त्यांचे संबंधानें आम्हीं सहानुभूति दाखविलीच पाहिजे. आमच्या संस्था अशाच्या अशा परदेशांत रुजाव्या अशी अपेक्षा आम्हीं करूं नये. फक्त, कार्यपद्धति व मनःप्रवृत्ति यांची देवघेव होऊं शकेल एवढीच आशा आपणांस बाळगतां येईल.

सार्वत्रिक शिक्षणाचें तत्त्व, कायद्याचें शासन, सार्वजनिक आरोग्य, सामाजिक सुरक्षितता, व्यक्तीचे हक्क आणि लोककल्याणाची सरकारी जबाबदारी इत्यादि पश्चिमी राष्ट्रांची शिकवण जशी जगानें मान्य केली आहे तशीच पश्चिमी राष्ट्रांची विज्ञानपद्धतीहि जगानें स्वीकारली आहे. पश्चिमी राष्ट्रांना इतर संस्कृतीपासूनहि पुष्कळ शिकण्यासारखें आहे हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे.

विश्वव्यापी, शाश्वत व प्रतिक्षणीं प्रतीत होणाऱ्या सौंदर्याचें ध्यान हा पौरस्त्यांचा स्वभाव आहे. पौरस्त्यांना काल ही प्रवाही नदी वाटत नसून स्थिर असा डोह वाटतो. पश्चिमी राष्ट्रें सर्व अनुभवाचें पृथक्करण व वर्गीकरण करतात, तर पौरस्त्यांना सर्वच विश्व अंशतः अज्ञेय वाटतें. म्हणून पौर्वात्य शहाणीं माणसें अमुक एका भूमिकेला घट्ट धरून बसत नाहींत. कारण आपण एकाच गोष्टीला घट्ट धरलें व, न जाणों, परिस्थिति बदलली तर जरुरीप्रमाणें माघार घेण्याचा आपला रस्ता बंदच होईल अशी भीति पौरस्त्यांना वाटत असते. आजच्या जागतिक राजकारणाशीं या दृष्टिकोनाचा फार महत्त्वाचा संबंध आहे.

विज्ञानाची पद्धति व समाजशास्त्राचें मार्गदर्शन यांच्या आधारानें चालणाऱ्या पाश्चिमात्यांचें उंचावलेलें जीवनमान आणि पौर्वात्यांची सार्वत्रिक सौंदर्यपिपासा, मनाची शाश्वत समता, आध्यात्मिक दृष्टिकोन व आत्मरूपता या दोन बाजूंत सलोखा व सुसंवाद निर्माण होईल असा दृष्टिकोन निर्माण करणें ही आजची फार मोठी जबाबदारी आहे.

अमेरिकन अतींद्रियवाद्यांनीं आमच्या भौतिक दृष्टिकोनावर हल्ला सुरू केला

व पौरस्त्यांच्या अध्यात्मविचारापासून स्फूर्ति मिळविली तेव्हांपासून पौरस्त्य विचार व कला यांसंबंधानें अमेरिकनांना सतत आस्था व कुतूहल वाटत आलें आहे. चीनमधून अमेरिकन जहाजांनीं मूल्यवान् वस्तु आणल्या तेव्हांपासूनच पौरस्त्यांच्या कलात्मक हेतूंचा प्रवेश अमेरिकन कलेंत झाला आहे. आमची रंगचित्रकला व शिल्पसौंदर्य यांवर जपानची छाया विस्तृतपणें पडलेली असून ती वाढत आहे. अमेरिकेंत अनेक पंथ पौरस्त्यांच्या धर्मांच्या आधारावर निघाले आहेत. सर्व मोठ्या विद्यापीठांत पौर्वात्य विचारांचा व जीवनाचा अभ्यास भराभर वाढत आहे. पौरस्त्यांच्या जीवनाची आम्हांला फक्त पुस्तकांवरून व चित्रांवरून माहिती होती. आतां प्रवासी व सैनिक जे पौरस्त्य देशांत जाऊन राहून आले त्यांनीं पौरस्त्य जीवनाची अंशतः कां असेना ओळख करून घेतली आहे व तिचा लाभ आम्हांला मिळत आहे. हवाई बेटांत पूर्व व पश्चिम यांची भेट होऊन अनेक पातळींवर त्यांचा मिलाफहि झाला आहे. अमेरिकन भूमीवर जीवनाबद्दलचे हे दोन दृष्टिकोन एकजीव होत आहेत.

प्रवासानें आणि सर्व प्रकारच्या ज्ञानसाधनांनीं लोकांपर्यंत पोंचविलेली सर्व माहिती यामुळें पूर्वीपेक्षां हल्लीं अमेरिकनांचा जगाशीं अधिक संबंध येत आहे. कामगार, शेतकरी, युवक, स्त्रिया वगैरेंच्या संघटनांनीं परराष्ट्रसंबंधांतील वस्तुस्थिति आपल्या सदस्यांपुढें मांडली आहे. कोणत्याहि एकाद्या क्लबाचें अथवा संघटनेचें नियतकालिक उघडून पाहा, त्यांत निदान एक व पुष्कळदां अधिकहि लेख जागतिक विषयावर लिहिलेले आढळतील. या संघटना परराष्ट्रांसंबंधानें जनतेंत व्यापक एकमत घडवून आणतात. तें लोकमत काँग्रेसवर वजन टाकतें व सरकारला पाठिंबा मिळवून देतें. अमेरिकन लोकमतांत फार मोठे बदल होण्याचा काल आतां निघून गेला असें मानण्याला हल्लीं भरपूर पुरावा आहे.

अमेरिकेनें जागतिक व्यवहाराची जबाबदारी पत्करणें व जागतिक व्यवहारांत स्वतःला गुंतवून घेणें याच्या गरजेची जाणीव अमेरिकेंत जशी वाढत आहे त्याच प्रमाणांत अमेरिकेचें व्यक्तिस्वातंत्र्यप्रेम, ऐच्छिकता व संयुक्तता (फेडरॅलिझम्) या तत्त्वांचाहि प्रसार वाढत आहे. पॉल रश, क्लिफर्ड क्लिंटन यांच्यासारख्या उदार व्यक्तींनीं ऐच्छिक सहकार्यानें केलेलीं सत्कृत्यें आणि यूनो व यूनोच्या संघटना यांनीं केलेलीं सत्कृत्यें हीं विद्यमान कालाचें वैशिष्ट्य दाखवितात, आजच्या आपल्या काळचें जग असें आहे कीं त्यांत निरनिराळ्या राष्ट्रांच्या सामर्थ्यांच्या समतोलाचें महत्त्व दीर्घ कालाच्या दृष्टीनें कमी झालें आहे. त्याऐवजीं निरनिराळ्या संस्कृतींचा एकमेकींत प्रवेश होण्याचें महत्त्व वाढलें असून त्यांतूनच एक जागतिक संस्कृति

निर्माण होत आहे. विज्ञानाचें पृथक्करण व कलांचें एकीकरण यांचा समतोल आतां साधला जात आहे. भौतिक जीवनाचा लोकांचा दर्जा वाढत आहे. यामुळें लोकांना आतां अधिकाधिक प्रमाणांत आपल्या बौद्धिक व आत्मिक ठेव्याचा उपयोग करतां येऊं लागेल.

१९२०-१९३० या कालांत अमेरिकेंत सुरक्षितता ही सरकारी बॉंड अथवा कंपन्यांचे शेअर्स यांनीं मिळते असें वाटत असे, असें जॉर्ज सौल म्हणतो. १९३०-४० त वार्धक्यांतील दारिद्र्याविरुद्ध संरक्षण हा सुरक्षिततेचा अर्थ झाला होता. १९४०-१९५० या काळांत हुकुमशहांच्या भीतीपासून जगाची मुक्तता करणें हा जगाच्या सुरक्षिततेचा अर्थ होय असें मानलें जाऊं लागलें. १९५०-६० या कालांत अमेरिकेच्या संभाव्य शत्रूच्या हातीं सरकारी ॲटॉमिक गौप्यें जाऊं न देणें हा सुरक्षिततेचा अर्थ झाला आहे. आपण जर आपली कर्तृत्वशक्ति चांगल्या प्रकारें वापरूं तर १९६०-७० या कालांत हेतुपूर्वक व नवनिर्मितीसाठीं केलेल्या परिश्रमानें जीवन सुरक्षित करणें हा सुरक्षिततेचा अर्थ ठरूं शकेल.

अशा त्या जीवनाचीं बीजें पेरलीं गेलींच आहेत. आम्हीं आमचा समाज नेहमीं खुला ठेवला असून आमच्या संस्थांना सुधारण्यासाठीं आम्ही त्यांत नेहमीं बदल करतों. हा समाज प्रगतीच्या मार्गावर असल्यानें त्याच्या दडपणाखालीं आम्ही भारावलेले असतों पण तरीहि आमच्या वागणुकींतील सहजता व स्नेहभाव आम्ही टिकवून धरतों. आमचा समाज जसा आमच्यांतील मतैक्यानें टिकून राहिला आहे त्याचप्रमाणें आमच्यांतील अंतःकलह व परस्परविरोध यांचाहि समाज टिकण्याला उपयोग झाला आहे. भविष्यकाळावरील श्रद्धा ही आमच्या कर्तृत्वाची प्रेरणा आहे. विद्यमान अन्यायाबद्दल आम्ही संतापतों, पण शारीरिक व भौतिक, त्याचप्रमाणें आध्यात्मिक व मानसिक असें आमचें सर्व प्रकारचें सामर्थ्य वाढतें आहे व त्यामुळें प्रत्यहीं आम्हांला नवजीवन लाभतें आहे. आमच्या समाजांत जो जोम आहे तो अंशतः त्याच्या तारुण्यामुळें आलेला आहे. त्याच्या ठिकाणीं जो आशावाद आहे तो आजच्या विपुलतेमुळें आलेला आहे.

कदाचित् या समाजाचा जास्तींत जास्त चांगला गुण सांगतां येईल तो हा कीं या समाजाच्या आकांक्षा अकरणात्मक नसून विधायक आहेत, निराशात्मक नसून आशावादी आहेत, द्वेषपूर्ण नसून प्रेमपूर्ण आहेत. आमचा समाज कांहींहि उद्ध्वस्त करूं इच्छीत नसून बांधणी, उभारणी करूं इच्छितो. जगांतील दारिद्र्याची वांटणी करून आम्ही विषमता नष्ट करूं इच्छीत नसून आम्ही उत्पादन वाढवून

आज थोड्यांनाच असलेली विपुलता सर्वांना देण्यानें विषमता नष्ट करूं चाहतों. परस्पर शेजाऱ्यांनीं एकमेकाशीं सहकार्य करून जीवन उभारण्याची संवय आम्हांला कित्येक शतकांची लागली आहे आणि आम्ही आतां सारें जग हेंच शेजार मानून जागतिक सहकाराचें जीवन उभारणार आहों.

ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५५७७२९ दि:
नों. दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५५९०
संदर्भ शाखा
REFBK 0009750
REFBK-0009750